# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
## तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) साठी सादर केलेला संशोधन प्रबंध

संशोधन प्रबंधाचा विषय

# 'आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)'


✻ संशोधक ✻

हिरालाल जगन्नाथ बावा.

(एम.ए., एम.एड्., एम.फिल्)

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,

ननाशी, ता. दिंडोरी जि. नाशिक.

✻ मार्गदर्शक ✻

डॉ. दत्तात्रय वाबळे

एम.ए., एम.फिल, पीएच.डी.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे

ता. शिरूर जि. पुणे.


मार्च २०१४

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील **विद्यावाचस्पती** (पीएच्.डी.) पदवीसाठी **हिरालाल जगन्नाथ बावा** यांनी ''**आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)**'' या विषयावरील संशोधन प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर संशोधन प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

मार्गदर्शक

**डॉ. दत्तात्रय वाबळे**
एम.ए., एम.फिल, पीएच.डी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय,
तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर जि. पुणे.

स्थळ : पुणे

दिनांक :

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी **हिरालाल जगन्नाथ बावा** असे लिहून देतो की, ''**आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)**'' या संशोधन प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलीत केली असून तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. सदर माहितीचा या शोधप्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

संशोधक

**हिरालाल जगन्नाथ बावा**

**स्थळ : पुणे**

**दिनांक :**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी ''**आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)**'' हा संशोधन प्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

या संशोधन प्रकल्पासाठी विषय सुचवून व्यवस्थित मांडणी करण्यासाठी मला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले ते माझे गुरूवर्य डॉ. दत्तात्रय वाबळे यांचे मी मन:पुर्वक आभार मानतो. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मी संशोधन प्रबंध वेळेत पूर्ण करू शकलो, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव मा. डॉ. उमेश केसकर यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. विजय कारेकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माणिक सोनवणे यांनी सुरुवातीपासून बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या संशोधनासाठी आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त श्री. सिताराम कापसे साो, नाशिक प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री. संतोष ठुबे साो, आणि शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ननाशी येथील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी वृंद यांनी संशोधनासाठी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

संदर्भ ग्रंथासाठी पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा ननाशी, येथील ग्रंथपालांनी

ग्रंथसंपदा, माहिती उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. तसेच मा. आमदार नरहरी झिरवाळ सो, आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम गायकवाड, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रा. डॉ. आमदार अपूर्व प्रशांत हिरे, यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्याचे आभार मानतो. तसेच संशोधनासाठी निवडलेले जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा सदस्यांनी मुलाखतीसाठी त्यांचा मौलिक वेळ देऊन सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानतो. तसेच आर. के. चौधरी यांनी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभी असलेली माझी आई श्रीमती निर्मलाताई बावा, तसेच पितास्थानी असलेले माझे वडीलबंधू सुभाष बावा, माझी बहिण सौ. रत्नमाला जालिंदर गोसावी, वहिनी सौ. मिना बावा, तसेच माझी पत्नी सौ. विजयश्री बावा, कु. आदिती, कु. अक्षदा, चि. अद्वैत या सर्वांनी भक्कम साथ दिली, प्रोत्साहन व पाठबळ दिले त्यामुळेच मी हे काम पूर्ण करु शकलो. तसेच माझे मामा श्री. विलास गोसावी, मामी सौ. लता गोसावी, माझा शालक श्री. अरविंद गोसावी व सौ. आरुषा गोसावी यांनी दिलेल्या सहकार्य व प्रोत्साहनाबद्दल त्यांचे मनःपासून आभार मानतो. या संशोधनात ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे मदत केली त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. श्री. रंगनाथ गुरव यांनी या प्रबंधाचे टंकलेखन अत्यल्प वेळेत पुर्ण करून दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

दिनांक :

**हिरालाल जगन्नाथ बावा**

# अनुक्रमणिका



| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | I |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV |
| | अनुक्रमणिका | VI |
| | तक्ते व नकाशांची यादी | VII |
| प्रकरण १ ले | संशोधन पध्दती व संशोधनाचा मागोवा | ०१ ते २८ |
| प्रकरण २ रे | आदिवासी समाजाच्या विकासाची वाटचाल | २९ ते १२६ |
| प्रकरण ३ रे | आदिवासी नेतृत्व | १२७ ते १९२ |
| प्रकरण ४ थे | नाशिक जिल्हा व आदिवासी बहुल तालुके एक दृष्टीक्षेप | १९३ ते २४२ |
| प्रकरण ५ वे | पंचायत राज्यातील नेतृत्वाचे विश्लेषण | २४३ ते २८५ |
| प्रकरण ६ वे | विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या योगदानाचे विश्लेषण | २८६ ते ३३२ |
| प्रकरण ७ वे | निष्कर्ष व शिफारशी | ३३३ ते ३४६ |
| | संदर्भ सूची | ३४७ ते ३५४ |
| परिशिष्ट १ | प्रश्नावली | ३५५ ते ३५८ |
| परिशिष्ट २ | जिल्हा परिषद सदस्य यादी | ३५९ ते ३६६ |
| परिशिष्ट ३ | विधानसभा व लोकसभा सदस्य यादी | ३६७ ते ३६८ |
| परिशिष्ट ४ | फोटो | ३६९ ते ३८२ |

# तक्ता यादी


| तक्ता क्रमांक | नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींच्या कालखंडानुसार वर्गीकरण | ८ |
| १.२ | विधानसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण | ९ |
| १.३ | लोकसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण | १० |
| २.१ | १९८१, १९९१ व २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याचे जिल्हानिहाय एकूण व आदिवासी लोकसंख्या (संख्या हजारात) | ४२ |
| २.२ | १९८१ ते २००१ या काळातील महाराष्ट्रातील आदिवासींची साक्षरता दर्शविणारा तक्ता | ५४ |
| ३.१ | सन १९५१ ते २०१४ पर्यंतच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांनुसार वर्गीकरण | १६६ |
| ३.२ | सन १९६२ ते २०१२ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकीतील अनु. जमातीसाठी राखीव जागांच्या आरक्षणानुसार वर्गीकरण | १७५ |
| ३.३ | १९९५ ते २०१२ या कालखंडातील महाराष्ट्र राज्यातील अनु. जमातीच्या विधानसभा सदस्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण | १८१ |
| ५.१ | जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे आरक्षणानुसार वर्गीकरण | २४५ |
| ५.२ | खुला / सर्वसाधारण जागेतून निवडून आलेले अनु. जमाती नेतृत्वानुसार वर्गीकरण | २४६ |
| ५.३ | आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातवार वर्गीकरण | २४७ |
| ५.४ | जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे वार्षिक उत्पनानुसार वर्गीकरण | २४९ |
| ५.५ | जि. प. सदस्य व पंचायत समिती सभापतींचे व्यवसायानुसार वर्गीकरण | २५१ |

| | | |
|---|---|---|
| ५.६ | जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण | २५३ |
| ५.७ | राजकीय वारसानुसार वर्गीकरण | २५५ |
| ५.८ | जि. प. सदस्य व प. स. सभापतींचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण | २५७ |
| ५.९ | जि. प. सदस्य व पं. स. सदस्यांचे (नेतृत्त्वाचे) पूर्वानुभवानुसार वर्गीकरण | २६० |
| ५.१० | पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभवानुसार वर्गीकरण | २६२ |
| ५.११ | जि. प. सदस्य व पं. स. सभापती होण्यापूर्वी सहकारी संस्थावर केलेल्या कामानुसार वर्गीकरण | २६४ |
| ५.१२ | जिल्हा परिषदेनंतर उच्च स्तरावर (राज्य व राष्ट्रीय स्तरावर) केलेल्या कार्यानुसार वर्गीकरण | २६५ |
| ५.१३ | जिल्हा परिषद सदस्य व पं. स. सभापतींनी विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य दिलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण | २६७ |
| ५.१४ | आदिवासींच्या विकासासाठी राबविलेल्या विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण | २७१ |
| ५.१५ | शासकीय योजनांचे अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | २७४ |
| ५.१६ | शासकीय योजनांशिवाय अन्य उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | २७६ |
| ५.१७ | जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची अंमलबजावणी बाबतच्या भूमिकेनुसार वर्गीकरण | २७९ |
| ५.१८ | आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | २८० |
| ५.१९ | निर्णय प्रक्रियेतील सहभागानुसार वर्गीकरण | २८३ |
| ६.१ | विधानसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण | २८८ |
| ६.२ | लोकसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण | २९० |
| ६.३ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे आरक्षणानुसार वर्गीकरण | २९२ |
| ६.४ | आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातवार विश्लेषण | २९३ |

| | | |
|---|---|---|
| ६.५ | विधानसभा व लोकसभा सदस्यांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण | २९४ |
| ६.६ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे व्यवसायानुसार वर्गीकरण | २९६ |
| ६.७ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण | २९८ |
| ६.८ | राजकीय वारसानुसार वर्गीकरण | ३०१ |
| ६.९ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण | ३०२ |
| ६.१० | विधानसभा व लोकसभा सदस्यांचे (नेतृत्वाचे) पूर्वानुभवानुसार वर्गीकरण | ३०६ |
| ६.११ | पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाच्या अनुभवानुसार वर्गीकरण | ३०७ |
| ६.१२ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी सहकारी संस्थावर केलेल्या कामानुसार वर्गीकरण | ३०९ |
| ६.१३ | पंचायत राज्यातून पुढे आलेल्या नेतृत्त्वानुसार वर्गीकरण | ३११ |
| ६.१४ | संस्थात्मक व संघटनात्मक कामानुसार वर्गीकरण | ३१४ |
| ६.१५ | विधानसभा व लोकसभा सदस्यांनी विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य दिलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण | ३१६ |
| ६.१६ | आदिवासींच्या विकासासाठी राबविलेल्या विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण | ३२१ |
| ६.१७ | शासकीय योजनांच्या अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | ३२४ |
| ६.१८ | शासकीय योजनांशिवाय अन्य उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | ३२६ |
| ६.१९ | शासनांच्या विकास योजनांची अंमलबजावणीबाबतची भूमिका | ३२८ |
| ६.२० | शासनाकडून विकासाच्या योजना राबविण्यासाठी मिळणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण | ३२९ |
| ६.२१ | आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण | ३३१ |

# नकाशा सूची



| आलेख क्रमांक | नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | सन १९५१ ते २०१४ पर्यंतच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांनुसार वर्गीकरण आलेख | १७३ |
| २ | सन १९६२ ते २०१४ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकीतील अनु. जमातीसाठी राखीव जागांच्या आरक्षणानुसार वर्गीकरण | १८० |
| ३ | २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातीच्या लोकप्रतिनिधी दर्शक आलेख | १९० |
| ४ | २००९ च्या विधानसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातीच्या लोक प्रतिनिधी दर्शक आलेख | १९० |
| ५ | महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्याचे स्थान दर्शक नकाशा | १९६ |
| ६ | २००१ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित जाती, जमाती लोकसंख्या दर्शक आलेख | २०३ |
| ७ | नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांचा स्थानदर्शक नकाशा | २०९ |

## प्रकरण पहिले

# संशोधन पध्दती व संशोधनाचा मागोवा


| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | २ |
| १.१ | विषयाचे महत्त्व | २ |
| १.२ | कार्यकक्षा | ३ |
| १.३ | संशोधन समस्या | ५ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ६ |
| १.५ | संशोधनाची गृहितके | ६ |
| १.६ | संशोधनाचा आराखडा | ६ |
| १.७ | नमुना निवड | ७ |
| १.८ | तथ्य संकलनाचे मार्ग | ११ |
| १.९ | माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण | १४ |
| १.१० | अभ्यासात आलेल्या अडचणी | १४ |
| १.११ | संशोधन प्रबंधाची प्रकरणात्मक मांडणी | १५ |
| १.१२ | संशोधन साहित्याचा आढावा | १७ |
| १.१३ | संशोधकांसाठी नवीन संशोधन विषय | २६ |
| | संदर्भ सूची | २७ |

# प्रकरण पहिले

# संशोधन पध्दती व संशोधनाचा मागोवा

## प्रस्तावना :

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय नेतृत्त्वाने देशाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले. स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय या तिन्ही पातळ्यांवरील राजकीय नेतृत्त्वाने विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षात देशाच्या विविध पातळ्यांवर विकास झालेला दिसतो. हा विकास घडवून आणण्यासाठी राजकीय नेतृत्त्वाचे योगदान महत्त्वाचे ठरते. कारण विकासासाठी नेतृत्त्वाकडे निश्चित भूमिका असावी लागते.

पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून नियोजनबध्द विकास करतांना राज्यशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची भूमिका महत्त्वाची ठरली. शासनाच्या माध्यमातून महिला, अनुसूचित जाती–जमाती या सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले गेले. या सर्व घटकांच्या विकासाचा विचार करता राजकीय नेतृत्त्वाची भूमिका निर्णायक ठरते.

## १.१ विषयाचे महत्त्व :

भारतातील पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्राकडे बघितले जाते. राज्याच्या स्थापनेनंतर राजकीय नेतृत्त्वाने समतोल विकासाला प्राधान्य दिले व प्रादेशिक विकासाबरोबरच अनुसूचित जाती व जमातीचा विकास करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली गेली. राजकीय, आर्थिक आणि सामजिकदृष्ट्या सर्वात मागास म्हणून अनुसूचित जमातीकडे बघितले जाते. अनुसूचित जमातीचा समाज हा डोंगरदऱ्या, पाड्यांच्या स्वरुपात विखुरलेला आहे. या समाजाचा विकास करणे हे मोठे आव्हान शासन व्यवस्था व राजकीय नेतृत्त्वासमोर होते. हे आव्हान पेलण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात त्यांच्या लोकसंख्येच्या

प्रमाणात ९ टक्के निधीची दरवर्षी तरतूद केली जाते. या निधीच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी विविध विकास योजना राबविल्या जातात. या योजना राबवितांना पंचायतराज संस्थामधील आणि विधीमंडळातील नेतृत्त्वाची भूमिका तपासणे आवश्यक ठरते. कारण लोकाभिमुख नेतृत्त्वामुळे समाजाचा विकास होतो. म्हणून विकासासाठी नेतृत्त्वाचा दृष्टीकोन, भूमिका आणि प्रत्यक्ष कृती कार्यक्रम महत्त्वाचा ठरतो. महाराष्ट्रातील विशेषतः नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांचा समतोल विकास झालेला दिसून येत नाही. विशिष्ट भागांचा विकास झाला मात्र त्या तुलनेत अन्य भागांचा विकास कमी प्रमाणात झालेला दिसतो. याची मूळ कारणे शोधून अविकसित भागाच्या विकासातील अडथळे दूर करुन त्यावर उपाययोजना करण्यासाठी हा अभ्यासविषय महत्त्वाचा ठरतो.

## १.२ कार्यकक्षा :

आदिवासी समाजाच्या विकासासाठी १९८३ साली प्रथम आदिवासी विकास विभाग या नावाने स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला. परंतु त्याचा परिणाम अंमलबजावणीवर दिसला नाही. त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील असमतोल दूर करुन चांगल्या रीतीने सुसूत्रता साधण्यासाठी आदिवासी विकास विभागाचे सर्वतोपरी बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने शासनाने आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय यंत्रणेची १५ जानेवारी १९९२ मध्ये पुनर्रचना केली व आदिवासी जमातीतील विकासासाठी महाराष्ट्रात नाशिक, ठाणे, नागपूर, अमरावती हे चार विभाग पाडण्यात आले आहेत. नाशिक विभागात अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून त्यात आदिवासी तालुक्यांची संख्या ७ इतकी आहे. त्यात पेठ, दिंडोरी, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, सुरगाणा, बागलाण या तालुक्यांचा समावेश होतो.

सन २०११ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या ६१,०७,१८७ इतकी असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या १५,६४,३६९ इतकी आहे. महाराष्ट्रात २८८ विधानसभा मतदारसंघ असून अनुसूचित जमातीसाठी राखीव मतदारसंघ २५ इतके आहेत. पूर्वी ही संख्या २२ होती मात्र सन २००९ मध्ये लोकसभा व विधानसभा मतदार संघाची पुनर्रचना करण्यात आली. त्यात ही संख्या २२ वरुन २५ करण्यात आलेली आहे. नाशिक जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघ १४

असून जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १५ आहे. त्यात आदिवासी तालुक्यांची संख्या ७ असून देखील आदिवासी समाजाची लोकसंख्या कमी असल्यामुळे लोकसंख्येच्या आधारे जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी ४ जागा राखीव आहेत. त्यात कळवण विधानसभा मतदारसंघास सुरगाणा तालुका जोडला गेला. दिंडोरी विधानसभा मतदार संघात पेठ हा तालुका जोडला गेला. इगतपूरी या मतदारसंघास त्र्यंबकेश्वर हा तालुका जोडला गेला आहे. तसेच बागलाण विधानसभा मतदारसंघास याच तालुक्यातील पूर्व भागातील ३६ खेडी ही पूर्वी कळवण मतदार संघास जोडली गेली होती. ती सर्व खेडे या मतदारसंघास जोडली गेली आहेत.

नाशिक जिल्ह्यातील १४ विधानसभा मतदारसंघापैकी ५ विधानसभा मतदारसंघ शहरी भागातील तर ९ विधानसभा मतदारसंघ ग्रामीण भागातील असून त्यापैकी ४ विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यात २ लोकसभा मतदारसंघ असून नाशिक जिल्ह्यातील (शहर वगळून) ४५ टक्के लोकसंख्या आदिवासीबहुल असल्यामुळे दिंडोरी लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव करण्यात आला आहे. तसेच अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या इगतपूरी मतदारसंघ हा नाशिक लोकसभा मतदारसंघात समाविष्ट आहे. त्यामुळे आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाच्या योगदानासंदर्भात अभ्यास करणे आवश्यक वाटते.

नाशिक जिल्ह्यात आदिवासी तालुक्यांची संख्या ७ असून या प्रत्येक तालुक्यात आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाचा तसेच विविध प्रश्नांच्या संदर्भात विचार केला असता नेतृत्त्वाची संख्या देखील वाढत आहे. मात्र तरीही आदिवासी तालुक्यातील विकासाच्यासंदर्भात तफावत आढळते. काही तालुक्यात आदिवासी समाजाचा विकास कमी प्रमाणात झालेला दिसतो तर काही तालुक्यात आदिवासी समाजाचा विकास हा इतर तालुक्यांपेक्षा जास्त प्रमाणात झालेला दिसतो. विकासातील हा असमतोल का? तसेच आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाची भूमिका काय? यासारख्या अनेक बाबी जाणून घेण्यासाठी आदिवासी समाजाच्या विकासाच्यादृष्टीने राजकीय नेतृत्त्वाने आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात राजकीय नेतृत्त्वाच्या योगदानाविषयी अभ्यास करीत असतांना नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास ही संशोधनाची कार्यकक्षा निश्चित करण्यात येऊन नाशिक जिल्ह्यातील

आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, सुरगाणा, बागलाण) पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य तसेच विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य यांची निवड करुन सन १९९५ ते २०१२ हा कालखंड निश्चित करण्यात आला.

अभ्यासक स्वतः नाशिक जिल्ह्यातील असून आदिवासी क्षेत्रात नोकरी करीत असल्यामुळे त्यास जिल्ह्यातील आदिवासी बहुल तालुक्यातील ग्रामीणभाग, सहकारी संस्था, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा क्षेत्रांची माहिती आहे. त्यांचा या संस्थांशी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ माहिती मिळविणे सोपे जाईल व जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्रातील माहिती मिळविणे व मिळालेली माहिती योग्य आहे किंवा नाही हे तपासणे सोपे जाईल. हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आदिवासींच्या विकासाच्या संदर्भात आदिवासीबहुल सात तालुके व जिल्हा परिषद तसेच विधानसभा व लोकसभा मतदारसंघ लक्षात घेऊन 'नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास' हे कार्यक्षेत्र निवडले आहे.

## १.३ संशोधन समस्या :

संशोधक आदिवासी क्षेत्रात नोकरी करीत असून बदलीच्या निमित्ताने संशोधकास आदिवासी क्षेत्रातील प्रत्येक भागातील परिस्थितीत तफावत आढळली. तसेच शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीत देखील तफावत आढळली.

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहाबरोबर आणण्यासाठी शासनस्तरावरुन विविध योजना राबविण्यात येत असतांना आदिवासी समाजाच्या काही भागाचा विकास तुलनेने अधिक झाला तर काही भागाचा विकास कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. त्यामुळे अजूनही हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजाच्या संदर्भात हीच समस्या निर्माण होऊन या समस्येची उकल करण्यासाठी संशोधकास आदिवासींचा विकास त्यासंबंधी राजकीय नेतृत्त्वाचे योगदान या संदर्भात संशोधन करण्याची आवश्यकता वाटली. त्यासाठी नाशिक जिल्हा हे कार्यक्षेत्र निश्चित करण्याचे ठरविले.

## १.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विकास कार्यक्रमांचा आढावा घेणे.

२. आदिवासी समाजातील राजकीय नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.

३. राजकीय नेतृत्त्वाने आदिवासी समाजाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

४. राजकीय नेतृत्त्वामुळे आदिवासी समाजाचा विकास झाला का? याचा शोध घेणे.

५. आदिवासी भागाचा समतोल विकास साधला गेला आहे काय? याचा शोध घेणे.

६. राजकीय नेतृत्त्वाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीचे अवलोकन करणे.

## १.५ संशोधनाची गृहितके :

१. आदिवासी समाजातून राजकीय नेतृत्त्व पुढे आले आहे.

२. विकासयोजनांच्या अंमलबजावणीत राजकीय नेतृत्त्वाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

३. राजकीय नेतृत्त्वामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

४. आदिवासी तालुक्यांचा समतोल विकास झालेला नाही.

५. वरिष्ठ पातळीवरील राजकीय नेतृत्त्वाच्या कार्याची सुरुवात पंचायत राज्यातून झाली आहे.

## १.६ संशोधनाचा आराखडा :

संशोधनामध्ये संशोधनपध्दती हा भाग महत्त्वाचा असतो. संशोधनाचा आराखडा तयार करुन योजनाबध्द पाऊले टाकली तर संशोधनाची समस्या, उद्दिष्ट्ये उभी करता येतात. हा एक रचनात्मक असा संशोधनाचा व्यूह असतो. यालाच 'संशोधनाचा आराखडा' म्हणतात. विमल शहा यांच्या मते

आराखडे म्हणजे अभ्यासाची योजना असते. नियंत्रित व अनियंत्रित व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या अभ्यासासाठी योजना तयार केली जाते.[१]

संशोधन कार्य सुरु करण्याअगोदर त्याचे पूर्व नियोजन केले जाते. कारण पूर्वनियोजन हा संशोधन आराखड्याचा आत्मा आहे. संशोधन नियोजित आराखड्यानुसार पूर्वनियोजित प्रक्रिया असते. यामध्ये अभ्यासात विषय निश्चित केला जातो. त्या अभ्यासाचे कार्यक्षेत्र निश्चित केले जाते. तसेच तथ्य अत्यंत वस्तुनिष्ठरितीने मिळविण्यासाठी केलेल्या पध्दतीचा वापर करावयास पाहिजे. तथ्य मिळविण्यात किती वेळ / कालावधी द्यावयाचा, संशोधनाच्या कामात किती घटकांशी संपर्क साधून तथ्य मिळवायची या गोष्टींचा संशोधनाच्या आराखड्यात समावेश करावा लागतो.

वरील बाबींचा विचार करुन प्रस्तुत संशोधनामध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत यासाठी संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

'आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)' हा विषय निश्चित करुन या कालखंडातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचा अभ्यास करण्याचे ठरविले. माहितीचे संकलन १) ग्रंथवाचन, २) प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, ३) कार्यालयीन कागदपत्रे, ४) विविध संस्थाच्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांशी चर्चा, दैनिके, मासिके इ. मार्गाने केले.

## १.७ नमुना निवड :

संशोधनामध्ये नमुना निवडीला विशेष महत्त्व असते. प्रस्तुत संशोधनात पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद सदस्य तसेच विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांच्या मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे अभ्यास करण्याचे नियोजन केले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमातील अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग व महिला या वर्गासाठी राखीव ठेवलेल्या जागांमधून व खुल्या जागेवरुन निवडून आलेल्या सदस्यांची संशोधनासाठी निवड केली आहे.[२]

प्रामुख्याने सन १९९५ ते २०१२ या कालखंडात आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) १७६ पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद सदस्यांनी काम केले तर २७ विधानसभा व लोकसभा सदस्यांनी काम केले. हे सर्व सदस्य संशोधनासाठी निवडले आहेत.

तक्ता क्र. १.१

**जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींच्या कालखंडानुसार वर्गीकरण**

| अ. क्र | तालुक्यांचे नांव | कालखंड | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९२ ते १९९७ | | १९९७ ते २००२ | | २००२ ते २००७ | | २००७ ते २०१२ | | | |
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १ | दिंडोरी | ०७ | २०.०० | ०९ | १८.७५ | ०८ | १६.६७ | ०९ | २०.०० | ३३ | १८.७५ |
| २ | पेठ | ०४ | ११.४३ | ०६ | १२.५० | ०४ | ०८.३३ | ०४ | ०८.८९ | १८ | १०.२३ |
| ३ | त्र्यंबकेश्वर | -- | -- | -- | -- | ०६ | १२.५० | ०५ | ११.११ | ११ | ०६.२५ |
| ४ | ईगतपूरी | ०६ | १७.१४ | ०८ | १६.६७ | ०७ | १४.५८ | ०७ | १५.५६ | २८ | १५.९० |
| ५ | कळवण | ०६ | १७.१४ | ०९ | १८.७५ | ०८ | १६.६७ | ०६ | १३.३३ | २९ | १६.४८ |
| ६ | सुरगाणा | ०४ | ११.४३ | ०६ | १२.५० | ०५ | १०.४२ | ०४ | ०८.८९ | १९ | १०.८० |
| ७ | बागलाण | ०८ | २२.८६ | १० | २०.८३ | १० | २०.८३ | १० | २२.२२ | ३८ | २१.५९ |
| | **एकूण** | **३५** | **१००** | **४८** | **१००** | **४८** | **१००** | **४५** | **१००** | **१७६** | **१००** |

(नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक प्रत्यक्ष पाहणीवरुन)[३]

नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील १९९५ ते २०१२ या कालखंडात येणाऱ्या एकूण १७६ जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींची प्रश्नावली भरुन घेऊन गृहितके तपासण्याची योजना आखली.

या १७६ सदस्यांपैकी १२ सदस्य मयत आहेत. उर्वरित १६४ पैकी १३ सदस्यांना दोन वेळा काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रत्यक्षात १५१ सदस्यांची संशोधनासाठी निवड करण्यात आली.

तक्ता क्र. १.२

**विधानसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण**

| अ. क्र | तालुक्यांचे नांव | कालखंड | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५ ते १९९९ | | १९९९ ते २००४ | | २००४ ते २००९ | | २००९ ते २०१४ | | | |
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १ | दिंडोरी | ०२ | ३३.३३ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | | |
| | दिंडोरी-पेठ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०५ | २५ |
| २ | सुरगाणा-पेठ-त्र्यंबकेश्वर | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | | |
| | | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | १५ |
| ३ | इगतपूरी | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | | |
| | इगतपूरी-त्र्यंबकेश्वर | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०४ | २० |
| ४ | कळवण | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | | |
| | कळवण-सुरगाणा | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०४ | २० |
| ५ | बागलाण | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | ०१ | २५ | ०४ | २० |
| | **एकूण** | **०६** | **१००** | **०५** | **१००** | **०५** | **१००** | **०४** | **१००** | **२०** | **१००** |

**(जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी नाशिक यांचे कार्यालय – परिपत्रक प्रत्यक्ष पाहणीवरुन)**[४]

तक्ता क्र. १.३

## लोकसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण

| अ. क्र | लोकसभा मतदार संघाचे नांव | कालखंड | | | | | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५ ते १९९९ | | | | | | १९९९ ते २०१४ | | | | | | | |
| | | १९९१ ते १९९६ | | १९९६ ते १९९८ | | १९९८ ते १९९९ | | १९९९ ते २००४ | | २००४ ते २००९ | | २००९ ते २०१४ | | | |
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १ | मालेगांव | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | – | – | ०५ | ७१.४२ |
| २ | दिंडोरी | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ०१ | ५० | ०१ | १४.२९ |
| ३ | नाशिक | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ०१ | ५० | ०१ | १४.२९ |
| | **एकूण** | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०२ | १०० | ०७ | १०० |

**(जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी नाशिक यांचे कार्यालय – परिपत्रक प्रत्यक्ष पाहणीवरुन)**[५]

अभ्यासात असलेल्या तक्ता क्र. १.२ व १.३ नुसार एकूण २७ विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांपैकी एका विधानसभा सदस्याला सलग ४ वेळा निवडून येण्याची संधी मिळाली असून ०२ विधानसभा व ०२ लोकसभा सदस्यांना ०२ वेळा निवडून येण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले. मात्र यापैकी एक लोकसभा सदस्य मयत असून एका लोकसभा सदस्याला विधानसभा सदस्य म्हणून यापूर्वी निवडून येण्याची संधी मिळाली होती. त्याचबरोबर एक विधानसभा सदस्य दोन लोकसभा सदस्य मयत असल्याने उर्वरीत १५ विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांशी प्रत्यक्ष भेटून प्रश्नावली, मुलाखत, निरिक्षण या माध्यमाद्वारे माहिती मिळविण्यात आली.

संशोधनासाठी जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती तसेच विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचा कार्यकाल व नांवे निश्चित केल्यानंतर अभ्यासासाठी उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून

प्रश्नावली तयार केली. त्यानंतर ती योग्य आहे किंवा नाही याची चाचणी करण्यासाठी १५ जिल्हा परिषद सदस्यांना ती भरण्यास लावली. त्यानंतर ती परत मिळवितांनाच त्यामध्ये साधारणतः कोणते बदल आवश्यक आहेत. त्यामध्ये कशावर भर दिला जावा यावर चर्चा केली. चार जिल्हा परिषद सदस्यांनी मार्गदर्शनपर सूचना केल्या. त्यांनी राजकीय पार्श्वभूमी, पूर्वीचा कामाचा अनुभव याकडे लक्ष वेधले. त्यांच्या सूचना, अभ्यासू व्यक्तींचे व मार्गदर्शक यांचे विचार यानुसार प्रश्नावलीत काही फेरबदल करुन ती निश्चित केली.

## १.८ तथ्य संकलनाचे मार्ग :

संशोधनात एखादा अभ्यासविषय निश्चित झाल्यानंतर त्या अभ्यासविषयासंबंधी तथ्ये गोळा करणे अत्यंत गरजेचे असते. कारण अभ्यास विषयासंबंधीचा निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ व सर्वमान्य होण्यासाठी तथ्थ्याचा आधार महत्त्वाचा असतो. तथ्य अधिक विश्वसनीय व वस्तुनिष्ठ असावी लागतात. कारण कोणत्याही समस्येचा शास्त्रीय अभ्यास करतांना त्या समस्येची कार्यकारण मिमांसा करावी लागते. त्याशिवाय समस्येविषयीचा निष्कर्ष काढता येत नाही व त्यावर उपाययोजनाही सुचविणे केवळ अशक्यच असते.

सामाजिक संशोधनात तथ्यांचे विभिन्न प्रकार व त्यांना प्राप्त करण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. अध्ययनाच्या स्वरुपानुसार ज्या तथ्यसामग्रीला इतर पध्दतीच्या तुलनेत अधिक महत्त्व आहे त्या पध्दतीला अधिक महत्त्व दिले जाते. परंतू तथ्य संकलन करणे हे सोपे कार्य नाही. तथ्य संकलन करतांना अनेक अडचणीतून जावे लागते. कधी–कधी अपमानही सहन करावा लागतो.

**तथ्य संकलन पध्दतीचे ढोबळमानाने दोन प्रकार पडतात.**

१. एक म्हणजे संशोधन समस्येच्या अनुरोधाने आपल्याला हवी असलेली माहिती स्वतः मिळविणे या पध्दतीने जमविलेल्या माहितींना प्राथमिक तथ्य सामग्री असे म्हणतात. निश्चित हेतू समोर ठेवून ही माहिती स्वतः मिळविलेली असते.

२. तर दुसरा प्रकार म्हणजे इतरांनी जमा केलेल्या माहितीवरुन संकलित करण्याचा होय. यालाच दुय्यम तथ्य सामग्री असे म्हणतात. ही माहिती इतरांनी त्यांच्या काही वेगळ्या हेतूसाठी जमा केलेली असते. तिचा उपयोग संशोधकाला स्वतःच्या संशोधन समस्येत होत असतो. म्हणून प्रा. रॉबर्टसन आणि राईट म्हणतात – विशिष्ट संशोधन समस्येचा ऊहापोह करण्याच्या निश्चित हेतूसाठी जी माहिती संकलित केली जाते. त्यास प्राथमिक सामग्री असे म्हणतात तर जी माहिती इतर काही हेतूंनी दुसऱ्यांनी जमा केलेली असते पण तिचा उपयोग संशोधन प्रकल्पात करुन घेतला जातो त्या माहितीस दुय्यम सामुग्री असे म्हणतात.[६]

प्राथमिक सामग्री ही संशोधक स्वतः मिळवित असतो. ही एक प्रकारची क्षेत्रकाम अभ्यासपध्दती असते. योग्य निरिक्षणाद्वारे संपादित केलेले ज्ञान सुसंघटीतपणे व पध्दतशीरपणे कोणत्याही विषयात मांडणे अगत्याचे असते. या पध्दतीमध्ये संबंधित घटकांशी एकरुप होऊन चर्चा, मुलाखती, शक्य असेल तेथे प्रश्नावली, अनुसूची इत्यादी माध्यमातून माहिती जमविली जाते. म्हणून यासाठीच क्षेत्रकाम अभ्यासपध्दती उपयुक्त ठरते. यामध्ये १) प्रत्यक्ष निरिक्षण, २) मुलाखती, ३) प्रश्नावली, ४) अनुसूची, ५) विशिष्ट अभ्यास याद्वारे माहिती संकलित केली जाते.

द्वितीय सामग्रीद्वारे संशोधकाला आपल्या विषयाशी संबंधित महत्त्वपूर्ण तथ्ये, आकडे प्राप्त होतात. अशी माहिती स्वतःला गोळा करणे संशोधकाला शक्य नसते. पत्रे, दैनंदिनी यावरुन व्यक्तीचे आंतरीक जीवन त्यांच्या महत्त्वकांक्षा, यशापयश याविषयी माहिती मिळते. द्वितीयक सामग्रीतून मिळणारी माहिती अध्ययन विषयांच्या बाबतीत प्राथमिक व सुक्ष्म स्वरुपाची असते.

ही माहिती विषयांची ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार करणे, संशोधनात यश मिळविण्याच्यादृष्टीने संशोधनाचा आरंभ करण्यापूर्वी सर्व प्रकारचे कागदपत्रीय पुरावे तपासणे आवश्यक असते. यामुळे संशोधनातील चूका, उणीवाआणि अडचणी टाळता येतात. दुय्यम सामग्री अंतर्गत विद्वानांनी लिहिलेले

ग्रंथ, सर्वेक्षण अहवाल, संस्मरणे, यात्रा वर्णने, पत्रे, दैनंदिनी, ऐतिहासिक दफ्तरे, सरकारी आकडेवारी अन्य प्रकाशित रेकॉर्ड इत्यादी बाबींचा समावेश होता.

तथ्य संकलनात प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली. प्रश्नावलीचे प्रामुख्याने १) संरचित प्रश्नावली, २) असंरचित प्रश्नावली असे प्रकार पडतात. यामध्ये प्रश्नाचे स्वरुप पूर्वनियोजित, सुस्पष्ट व निश्चित असते. संशोधन समस्या व गृहितकांचा विचार करुन प्रश्नावलीत प्रश्नांचे स्वरुप ठरविले. प्रश्नावलीत काही प्रश्न सामान्य स्वरुपाचे व काही प्रश्न उत्तरदात्यांची मते जाणून घेण्याच्यादृष्टीने खुल्या स्वरुपाचे समाविष्ट केले. प्रश्नावलीत सामान्य माहितीचे १७ व सामाजिक माहिती १४ असे एकूण ३१ प्रश्न विचारले. सुलभ, सोपे प्रश्न प्रारंभी विचारले व उत्तरदात्यांची मते, दृष्टीकोन यांविषयीचे प्रश्न नंतर विचारले.

जिल्हा परिषद सदस्यांना व विधानसभा सदस्यांना प्रश्नावली भरावयास दिल्या. मात्र त्यांपैकी थोड्याच सदस्यांनी प्रश्नावली दिलेल्या वेळेत भरुन दिल्या. अपूर्ण प्रश्नावली ही प्रश्न विचारुन भरुन घेतल्या. काही अशिक्षित व कमी शिक्षित जिल्हा परिषद सदस्यांना प्रश्नावलीच्या आधारे प्रश्न विचारले व प्रश्नावली स्वतः भरुन घेतली. काही प्रश्नांची उत्तरे त्यांच्यासमोर न लिहिता नंतर लिहिली. त्यांनी दिलेली माहिती खरी, योग्य आहे किंवा नाही याबाबत काही ठिकाणी जिल्हा परिषद गटातील व गावातील ग्रामस्थांशी चर्चा केली. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीचाही प्रश्नावली समावेश केला.

तथ्य संकलनात द्वितीय सामग्रीत ग्रंथालयातील पुस्तके, वृत्तपत्रे, दैनिके, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, शासकीय व अभ्यासकांचे अहवाल यांचा उपयोग करण्यात आला. सामाजिक व स्वयंसेवी संस्था, संघटना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवरील पदाधिकारी या संस्थांचे अधिकारी यांनी दिलेली माहिती यांचाही तथ्य संकलनात उपयोग करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून काम करतांना राजकीय नेतृत्त्वाला येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना याबाबत वृत्तपत्रांतून आलेल्या माहितीचाही तथ्य संकलनात उपयोग करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर काम करीत असतांना राजकीय नेतृत्त्वाला येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना याबाबत वृत्तपत्रांतून आलेल्या माहितीचाही तथ्य

संकलनात उपयोग करण्यात आला आहे. त्यामधून जिल्हा परिषद सदस्यांची तसेच विधानसभा व लोकसभा सदस्यांची राजकीय, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्थिती समजण्यास मदत झाली.

## १.९ माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :

माहिती स्वतः संकलित केल्यावर संशोधनाची गृहितके व उद्दिष्ट्ये यांच्या आधारे माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी तक्ते तयार केले व त्यावरुन विश्लेषण केले. वर्गीकरण करुन स्वतः निष्कर्ष काढले व त्याआधारे अहवाल लेखन केले आहे.

## १.१० अभ्यासात आलेल्या अडचणी :

अभ्यास करतांना व तथ्य संकलन करतांना ग्रंथालयीन अधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, उत्तरदाते जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, विधानसभा सदस्य, लोकसभा सदस्य यांनी सहकार्य केले. मात्र संशोधनाचे कार्यक्षेत्र ग्रामीण आदिवासी भाग असल्यामुळे काही अडचणी आल्या. काही जिल्हा परिषद सदस्यांकडे जाण्यासाठी वेळेवर बसची अथवा इतर वाहनांची सोय नव्हती. तसेच ९६ टक्के जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचा व्यवसाय शेती असल्यामुळे बहुतांश जिल्हा परिषद सदस्यांचे निवासस्थान हे शेतातच असल्यामुळे तेथे जावे लागले. दोन जिल्हा परिषद सदस्या ह्या निरक्षर होत्या. त्यांच्याशी चर्चा करुन प्रश्न विचारुन प्रश्नावली स्वतः भरुन घेतली.

उत्तरदात्यांकडून प्रत्यक्ष कार्याबाबत अचूक माहिती मिळू शकली नाही. त्यासाठी ग्रामस्थ, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून माहिती मिळवावी लागली. काही जिल्हा परिषद सदस्यांची प्रश्नावली स्वतः भरुन घ्यावी लागली. बहुतांश स्त्री जिल्हा परिषद सदस्यांना माहिती विचारतांना त्यांच्या नातेवाईकांचा अडथळा आला. तसेच बहुतांश जिल्हा परिषद सदस्य विधानसभा सदस्य व

लोकसभा सदस्यांनी प्रश्नावली भरुन दिली नाही. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करुन प्रश्न विचारुन माहिती भरावी लागली.

त्यासाठी जिल्हा परिषद सदस्यांना २ ते ३ वेळा भेटावे लागले तर बागलाण तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्याला ४ वेळा भेटीसाठी जावे लागले. तसेच विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी भेटीची तारीख व वेळ निश्चित केली असल्यामुळे विशेष अडचण आली नाही. मात्र दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्यांनी दोन वेळा भेटीची वेळ देऊनही भेट देवू शकले नाहीत. मात्र चौथ्या वेळी भेट घेण्यात यश मिळाले. तसेच इगतपूरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्यांना देखील तीन वेळा भेटावे लागले तर काही विधानसभा सदस्यांना व लोकसभा सदस्यांना कामाच्या व्यापामुळे भेटीची वेळ देऊनही कधी कधी विलंब होत असे तर कधी दोन ते तीन वेळा जावे लागले. त्यामुळे प्रश्नावली, मुलाखती व माहिती घेण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या. मात्र त्यांना नंतर भेटून चर्चा, प्रश्नावलीच्या आधारे मुलाखती घेऊन माहिती मिळवली.

एकूणच प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण या माध्यमांचा वापर करुन माहिती मिळविण्यात यश आले.

## १.११ संशोधन प्रबंधाचे प्रकरणात्मक मांडणी

संशोधन प्रबंधाचे प्रकरणात्मक मांडणी पुढीलप्रमाणे

### प्रकरण पहिले : संशोधन पध्दती व संशोधनाचा मागोवा

या प्रकरणात संशोधन विषयाचे महत्त्व, विषयाची निवड, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहितके, संशोधनाचा आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलनाचे मार्ग, इतर संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा मागोवा घेतला आहे.

### प्रकरण दुसरे : आदिवासी समाजाच्या विकासाची वाटचाल

या प्रकरणात विकास, आदिवासी व आदिवासी समाज या संकल्पना स्पष्ट करुन आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनांच्या वाटचालीचा आढावा घेतलेला आहे. आदिवासी समाजाच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळींचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाने केलेले कायदे, राबविलेले उपक्रम आणि विकास योजना, आदिवासी विकास महामंडळ इ. ची चर्चा केली आहे.

## प्रकरण तिसरे : आदिवासी नेतृत्त्व

या प्रकरणामध्ये नेतृत्वाची संकल्पना, राजकीय नेतृत्त्व आणि आदिवासी नेतृत्त्व याबाबतची चर्चा करतांना स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी नेतृत्त्वाचा आढावा घेतलेला आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींसाठी काम करणारे आणि आदिवासी समाजातून पुढे आलेले नेतृत्त्व यांची चर्चा केली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा व लोकसभेच्या आदिवासींसाठी राखीव जागा व त्यातील प्रतिनिधी यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

## प्रकरण चौथे : नाशिक जिल्हा व आदिवासीबहुल तालुके : एक दृष्टीक्षेप

या प्रकरणामध्ये नाशिक जिल्ह्यातील भौगोलिक स्थान, आर्थिक परिस्थिती, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान, सामाजिक व राजकीय परिस्थितीची चर्चा केली आहे. तसेच संशोधनाचे कार्यक्षेत्र असलेल्या आदिवासीबहुल दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण या सात तालुक्यांचे भौगोलिक स्थान, आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती यांची चर्चा केली आहे.

## प्रकरण पाचवे : पंचायत राज्यातील नेतृत्त्वाचे विश्लेषण

या प्रकरणामध्ये संशोधन कार्यक्षेत्रात १९९५ ते २०१२ या कालखंडात जिल्हा परिषदेचे निर्वाचित व पदसिध्द सदस्य म्हणून काम केलेल्या १५१ सदस्यांकडून प्रश्नावली व मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. त्यासाठी १९ तक्त्यांचा आधार घेतला आहे.

## प्रकरण सहावे : विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या योगदानाचे विश्लेषण

या प्रकरणात संशोधन कार्यक्षेत्रातील १९९५ पासून ते आजपर्यंत विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून काम केलेल्या नेतृत्त्वाचे प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहिती मिळविली आहे. यामध्ये १३ विधानसभा सदस्य व २ लोकसभा सदस्यांचा समावेश केला आहे. मिळालेल्या माहितीचे २१ तक्त्यांद्वारे वर्गीकरण करुन विश्लेषण केले आहे.

### प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणामध्ये संशोधनाच्या गृहितकांची पडताळणी केली आहे. संदर्भ ग्रंथ, प्रश्नावली व मुलाखती आणि निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष मांडलेले आहेत व आदिवासी समाजाच्या विकासाला पूरक शिफारशी केल्या आहेत.

## १.१२ संशोधन साहित्याचा आढावा

राजकीय नेतृत्त्व व आदिवासी समाजाच्या विकासासंदर्भात अनेक व्यक्तींनी अभ्यास केला आहे. त्या आधारे तालुक्याच्या, जिल्ह्याच्या राजकारणातील सामाजिक व राजकीय नेतृत्त्व, आदिवासींचे प्रश्न या संदर्भात आपआपली मते सांगितली आहेत. या अनुषंगाने आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल.

१. प्रा. बी. एच. बोराडे यांनी ग्रामपंचायतीच्या विकास कार्यातील नेतृत्त्वाचा सहभाग : भोर तालुका एक दृष्टीक्षेप या विषयावर राज्यशासन व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ अंतर्गत एम. फील् पदवीकरिता जुलै १९९० मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात भोर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या विकास कार्यासंदर्भात अभ्यास करतांना ग्रामीण भागासाठी विकास योजना राबविण्याविषयी नेतृत्त्वाची भूमिका कोणती? ग्रामपातळीवरील नेतृत्त्व सक्षम आहे का? सामान्य जनतेचा राजकारणाकडे बघण्याचा

दृष्टीकोन कसा आहे? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी भोर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचाची निवड करुन त्याआधारे त्यांची मते जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, राजकीय नेतृत्त्व ग्रामीण भागाच्या विकासापेक्षा पक्षहिताकडे अधिक लक्ष देते. त्यामुळे नेतृत्त्वात अकार्यक्षमता दिसून आली. तसेच सामान्य जनतेत राजकीय जागृतीचा अभाव दिसून आल्यामुळे ते राजकारणाविषयी उदासीन दिसून आल्याचे त्यांनी दाखवून दिले.

२. प्रा. अभिमन्यू केदार यांनी अहमदनगर जिल्हा ता. अकोले येथील महादेव कोळी या आदिवासी जमातीचा राजकीय विकास या विषयावर राज्यशासन व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत एम. फील् पदवीकरिता ऑक्टोंबर १९८८ मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात महादेव कोळी या आदिवासी जमातीचा शैक्षणिक, सामाजिक व राजकीय विकास झाला आहे का? आदिवासी जमातीपर्यंत विविध शासकीय योजना पोहचतात का? यासारख्या बाबींचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अकोले तालुक्यातील पंचायत समिती सदस्य, विधानसभा सदस्य, समाजसेवक यांची निवड करुन त्यांची मते प्रश्नावली व मुलाखतीद्वारे जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, महादेव कोळी या आदिवासी समाजातील शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, प्रबोधनाचा अभाव या राजकीयदृष्ट्या सामान्य जनतेत उदासिनता, राजकीय अज्ञान देखील दिसून आले. तसेच विविध शासकीय योजना ह्या ठराविक लोकांपर्यंत पोहचतात. त्यामुळे तळागाळातील आदिवासी जमाती शासकीय योजनांपासून वंचित राहतांना दिसून आल्याचे त्यांनी दाखवून दिले.

३. श्री. संतोष कृष्णात खारगे यांनी पलुस–कडेगांव विधानसभा मतदार संघाच्या विकासामध्य डॉ. पंतगराव कदम यांचे योगदान (सन २००४–२००९) या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, कोथरुड, पुणे या अभ्यासकेंद्रात राज्यशास्त्र या विषयात एम. फील् पदवीकरिता सन २०१० मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात पूलस–कडेगांव विधानसभा मतदार संघाचा डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या कारकिर्दित

कशा प्रकारचा विकास केला? पलुस–कडेगांव मतदार संघाची विकास कामांच्या दृष्टीने पूर्वीची व आजची स्थिती कशी आहे? शिक्षण क्षेत्रातील डॉ. पतंगराव कदमांचे योगदान काय? यांसारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी पलुस–कडेगांव विधानसभा मतदार संघातील राजकारणातले विरोधक, कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, कुटूंबातील सदस्यांची मते प्रश्नावली व मुलाखतीद्वारे जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, पलुस–कडेगांव विधानसभा मतदारसंघाच्या विविध संस्थांच्या माध्यमातून युवक महिलांना रोजगाराची संधी तसेच त्यांच्या राहनीमानात सुधारणा करण्याचे प्रयत्न डॉ. कदम करीत असल्याचे दिसते. तसेच या मतदार संघातील परिस्थिती दुष्काळसदृश्य होती. मात्र डॉ. कदमांच्या सक्षम नेतृत्त्वामुळे गावागावांत केलेली सुधारणा, विकास कामे, दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असा रस्ता हा घटक मानून गाव तेथे रस्ता ही भूमिका घेऊन सहकार क्षेत्राचा विस्तार केल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्याचबरोबर डॉ. कदम यांनी व्यक्ति विकासासाठी भारती विद्यापीठाची स्थापना करुन ग्रामपातळीपासून ते संपूर्ण भारतभर व परदेशात मिळून त्यांच्या एकूण १९० च्या वर असलेल्या शाखांचा विस्तार निर्माण करुन शैक्षणिक क्षेत्रात क्रांती निर्माण करुन त्यांनी शेतकऱ्यांच्या दारापर्यंत ज्ञानगंगा व अर्थगंगा आणून डॉ. कदमांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान किती मोठे आहे हे त्यांनी दाखवून दिले.

४) श्री. प्रमोद पुंडलिक बानवाडे यांनी ''गडचिरोली जिल्ह्याच्या राजकारणात ७३ व्या विशोधनानंतर उदयास आलेले आदिवासी नेतृत्त्व'' या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत सी.पी.ॲण्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग, नागपूर या अभ्यासकेंद्रात राज्यशास्त्र या विषयात एम. फील् पदवीकरिता सन २००८ मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात गडचिरोली जिल्ह्याच्या राजकारणात ७३ व्या विशोधनानंतर उदयास आलेल्या आदिवासी नेतृत्त्वाचा अभ्यास करतांना आदिवासी समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय स्थिती चांगली आहे का? ग्रामपंचायत, नगरपरिषद, पंचायत समितीमध्ये आदिवासी नेतृत्त्व उदयाला आले का? जिल्ह्याच्या राजकारणात आदिवासी नेतृत्त्व यशस्वी झाले आहे का? निवडणूक काळात आदिवासींवर नेतृत्वाच्या कोणत्या घटकांचा परिणाम होतो? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी गडचिरोली,

देसाईगंज व आरमोरी तालुक्यातील पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्यांची निवड करुन त्यांची प्रश्नावली व मुलाखतीद्वारे मते जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, आदिवासी समाजाची आर्थिक, सामाजिक स्थिती दयनीय असल्यामुळे हा समाज राजकारणापासून अलिप्त दिसतो. आरक्षणामुळेच आदिवासी समाजाचे नेतृत्त्व उदयाला आल्याचे दिसून आले. आरक्षणाव्यतिरिक्त कोणत्याही अन्य जागेवर आदिवासी नेतृत्त्वाला स्थान नाही. यामुळे या तालुक्यातील ग्रामपंचायत, नगरपालिका व पंचायत समितींमधील आदिवासी नेतृत्त्व फार कमी प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसले. तसेच आदिवासी नेतृत्त्वात शिक्षण व अनुभवाचा अभाव असल्यामुळे प्रबळ राजकीय पक्ष व त्या पक्षाच्या नेतृत्त्वाचा परिणाम आदिवासी समाजावर व त्या समाजातील नेतृत्त्वावर होऊन राजकीय पक्षाची मदत घेऊन प्रतिनिधीत्व प्राप्त केले जाते. त्यामुळे सत्ता व राजकीय पक्ष म्हणतील तसे उमेदवार काम करतांना दिसून आले. त्यामुळे या समाजातील नेतृत्त्वाचा अकार्यक्षमपणा व त्यांच्यात प्रबळ राजकीय जागृतीचा अभाव असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

५) श्री. ए. वाय. बच्छाव यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन – विशेष संदर्भ साक्री तालुका या विषयावर पुणे विद्यापीठात एम. फिल् पदवीसाठी सादर केलेल्या प्रबंधात आदिवासी विकास महामंडळाच्या एकाधिकार खरेदी योजनेतील त्रुटी कोणत्या? वीजपंप व तेलपंप वाटप योजना योग्य पध्दतीची आहे का? केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना आदिवासींसाठी फायदेशीर आहे का? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी साक्री तालुका ही संशोधन मर्यादा निश्चित करुन आदिवासी लाभार्थ्यांकडून माहिती जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळांतर्गत एकाधिकार खरेदी योजनेत मालाची खरेदी किंमत नियंत्रित मात्र विक्रीची किंमत अनियंत्रित असल्यामुळे महामंडळाला तोटा होत असून आदिवासींचा शेतमाल व गौण वनौपजे महामंडळ खरेदी करीत असताना त्यांची तातडीची आर्थिक गरज भागवू शकत नसल्यामुळे आदिवासी आपला माल व्यापाऱ्यांना विकून त्याचा गैरफायदा आदिवासींचे आर्थिक शोषण होतांना दिसून येते. तसेच सावकारी कर्ज योजना अल्पभूधारक व भूमिहिनांसाठी फायदेशीर असून देखील लाभार्थ्यांपैकी ७० टक्के थकबाकीदार असल्याने त्यांना पुन्हा कर्ज मिळाले नसल्याने थकबाकीदारांमुळे

महामंडळाला ही योजना फायदेशीर ठरत नाही. त्याचप्रमाणे वीजपंप व तेलपंप वाटप योजनेसाठी अर्ज केल्यावर विलंब लागत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होतो. तो कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असून अशिक्षित लाभार्थी शेतकऱ्यांची मध्यस्थामार्फत आर्थिक पिळवणूक होतांना दिसून येते. त्याचबरोबर केंद्रवर्ती अर्थसंकल्प याजनेत आदिवासींना दुध, गायी, म्हशी दिल्या जातात. परंतु दुधाची बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जात नसल्यामुळे ही योजना फायदेशीर ठरत नाही. महामंडळामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचेही त्यांनी दाखवून दिले.

६) श्री. एम. डी. साठे यांनी Economics study of a region with special reference to the consumption pattern – A Tribal region in a Ahmednagar District, Maharashtra State या विषयावर पुणे विद्यापीठात पीएच्. डी. पदवीसाठी सन १९६७ मध्ये सादर केलेल्या प्रबंधात आदिवासी लोक शेतीतील उत्पादनाचा उपभोग घेतात का? आदिवासी क्षेतात कोणत्या पिकाचे उत्पादन सर्वाधिक घेतले जाते? आदिवासींचा खर्च कोणत्या बाबींवर होतो? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अकोले तालुक्याचा पठार, प्रवरा कोरे, मुळा खोरे (डांगण) या तीन विभागातील २१२ कुटूंबाच्या उपभोग रचनेचा अभ्यास करुन माहिती जाणून घेतली.

यावरून त्यांनी असे दाखवून दिले की, अकोले तालुक्यातील पठार, प्रवरा खोरे, मुळा खोरे या तीन विभागातील आदिवासी लोक त्यांच्या शेतात उत्पादित होणाऱ्या अन्नधान्याचा जास्तीत जास्त उपभोग घेतात तर भाताचे उत्पादन सर्वाधिक होऊन त्याचाच उपभोग कमी प्रमाणात घेतला जाऊन जास्तीत जास्त दुधाची विक्री केली जाते. तसेच आदिवासींच्या उत्पादनाच्या तुलनेत मटण–मासे यांवरील उपभोग खर्च जास्त आहे. त्याचप्रमाणे उत्पन्नाच्या तुलनेत डाळींवर कमी खर्च केला जाऊन शेतात उत्पादित होणाऱ्या डाळीच उपभोगासाठी वापरल्या आहेत व मिळालेल्या उत्पन्नापैकी शिक्षणावर अत्यल्प खर्च केला जातो. खाद्यान्न पदार्थांवर जास्त खर्च केला जाऊन पालेभाज्यांचे उत्पन्न कमी असल्याने त्यावरील खर्च कमी केला जातो. तसेच विजेची उपलब्धता नसल्याने रॉकेल इंधनावर

मोठ्या प्रमाणात खर्च होतो. तो टाळू शकत नाही. या आदिवासींना चहाची आवड असल्यामुळे चहा, साखरेवर अधिक खर्च होत असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

७) श्री. गोविंद गारे यांनी Tribals in an urban settings – A case study of Mahadev Kolis या विषयावर समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत पीएच्.डी पदवीसाठी १९७१ मध्ये सादर केलेल्या प्रबंधात शहरात होणाऱ्या आदिवासींच्या स्थलांतराचा त्यांच्यावर काय परिणाम झाला? शहरीकरणाचा आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनावर काय परिणाम झाला? या बाबींचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी विशेष स्तरावर पुणे शहर व महादेव कोळी ही आदिवासी जमात निवडून त्यांची मते जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, स्थलांतर हे प्रामुख्याने मुंबई, पुणे, नाशिक या औद्योगिक शहरांमध्ये झाले असून त्यांचा वयोगट २० ते २५ वर्षे इतका आहे व या स्थलांतरीतांमध्ये साक्षर लोकांचे प्रमाण जास्त असून निरक्षरांचे प्रमाण अत्यल्प असून या स्थलांतरीतामध्ये पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असून स्त्रीचे स्थलांतर पत्नी या नात्याने झाल्याचे दिसून आले तर शहरात राहणाऱ्या महादेव कोळी लोकांची आर्थिक स्थिती ही ग्रामीण लोकांपेक्षा चांगली असून त्यांचे राहणीमानही चांगले असल्याचे दिसून आले तर शहरी राहणीमानाचा प्रभाव महादेव कोळी लोकांवर पडून त्यांची वेशभूषा व केशभूषा ही सुधारल्याचे दिसून आले. याचप्रमाणे शहरी वातावरणामुळे समाजातील लोकांत बदल दिसून येऊन त्यांच्या लग्नविधी, परंपरेत देखील बदल झाल्याचे दिसून आले. तसेच आदिवासींच्या स्थलांतरामुळे आदिवासींच्या कला, नृत्यप्रकार, काव्य यांचा लोप झाल्याचे दिसून आले. मात्र शहरातील सर्व महादेव कोळी लोकांनी आपले गावाकडील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध टिकवून ठेवून लग्न, जत्रा, सार्वजनिक समारंभ इ. सण गावाकडेच साजरे करतात असे त्यांनी दाखवून दिले.

८) श्री. भाऊसाहेब देशमुख यांनी आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणाम या विषयावर पुणे विद्यापीठात पीएच्. डी. पदवीसाठी सन २००४ मध्ये सादर केलेल्या प्रबंधात अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेतीचा विकास झाला का? अकोले तालुक्यातील उपयोजना क्षेत्रातील आदिवासींच्या कुटुंबाच्या

उत्पन्नात वाढ झाली का? शेतीशी संलग्न व्यवसायावर काय परिणाम होतो? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अकोले तालुका ही संशोधन मर्यादा निश्चित करुन तालुक्याच्या आदिवासी शेतकऱ्यांची मते जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, आदिवासी विकास योजनांतील खर्चात दरवर्षी वाढ होत असून अकोले तालुक्यातील विविध सुविधांमुळे आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शेतीचा विकास होऊन पाटबंधारे व पूरनियंत्रणामुळे सिंचन क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसून आले. तसेच अकोले तालुक्यातील उपयोजना क्षेत्रातील सर्वच आदिवासी कुटूंबाच्या उत्पादनात वाढ झालेली नाही तर गौण वनौपजांच्या विधीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होऊन दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले व पशुसंवर्धनात वाढ झाल्याचे दिसून आले. मात्र आदिवासी उपयोजना क्षेत्रात आरोग्य सुविधा मिळविण्यात त्रुटी असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

९) प्रा. सौ. छाया जाधव यांनी एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन : विशेष संदर्भ आंबेगाव तालुका, जि. पुणे. या विषयावर पुणे विद्यापीठात पीएच्.डी पदवीसाठी सन २००५ मध्ये सादर केलेल्या प्रबंधात आदिवासी लाभार्थ्यांपैकी कोणत्या जमातीचे प्रमाण जास्त आहे? तसेच आदिवासी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली का? आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना कितपत यशस्वी झाल्या? यासारख्या बाबी जाणून घेण्यासाठी आंबेगाव तालुका जि. पुणे येथील ४११ कुटूंबाची नमुना निवड करुन त्यांची मते जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, लाभार्थ्यांपैकी सर्वात जास्त प्रमाणात महादेव कोळी जमातीचे ८७ लोक होते तर ठाकर जमातीचे प्रमाण १२.७ टक्के एवढे कमी असून त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याचे दिसून आले. निरक्षरता, शैक्षणिक मागासलेपणा, कागदपत्रांची अपूर्तता यामुळे ९.५ टक्के व्यक्तींना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ झाला नाही. तसेच अपूर्ण रोजगार, कर्जफेड, नैसर्गिक प्रतिकूलता इत्यादींमुळे विविध योजनांचा लाभ मिळूनही आदिवासींच्या उत्पन्नात वाढ झाली नसून आदिवासींची ६३.३ टक्के कुटूंबे दारिद्र्य रेषेखालील असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

१०) प्रा. सुरेश देशमुख यांनी आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनावर झालेला परिणाम या विषयावर मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत पीएच्.डी. पदवीसाठी सप्टेंबर २०११ मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात सह्याद्री विभागातील महादेव कोळी या आदिवासी जमातीसाठी विविध आदिवासी विकासाच्या योजना राबविल्या जातात का? आदिवासी विकास योजनांचा शैक्षणिक प्रगतीवर व आरोग्यावर परिणाम झाला का? तसेच आदिवासी विकास योजनांचा स्त्री–पुरुषांच्या राहणीमान खर्चावर काय परिणाम झाला? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी सह्याद्री विभागातील नाशिक, अहमदनगर, पुणे व ठाणे, रायगड या पाच जिल्ह्यातील इगतपूरी, अकोले, जुन्नर, आंबेगाव, मोखाडा या पाच आदिवासीबहुल तालुक्यापुरती संशोधन संशोधन मर्यादा निश्चित करुन लाभार्थी प्रशासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. विभाग यांच्या मुलाखती, प्रश्नावली व निरीक्षणाद्वारे त्यांची मत जाणून घेतली.

याद्वारे त्यांनी असे दाखवून दिले की, आदिवासी जमातीसाठी आदिवासी विकास योजना राबवितांना लाभार्थ्यांचे प्रमाण वाढविणे आवश्यक असल्याचे सांगून शैक्षणिक गळतीचे प्रमाण दहावीनंतर मोठ्या प्रमाणात होते. ते टाळण्यासाठी आदिवासींना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन शिक्षण प्रसार करणे आवश्यक असल्याचे नमूद करुन बेकारी कमी करुन व रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखणे आवश्यक आहे तर आदिवासी विकास योजनांचे सुसूत्रीकरण करुन शेती विकासास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे व आदिवासींच्या सिंचन क्षेत्रात देखील वाढ करणे आवश्यक आहे.

तसेच आदिवासींच्या सह्याद्री विभागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचा पाणीपुरवठा, वाहतूक व दळणवळण सुविधा, रोजगाराची साधने या सर्व सुविधा चांगल्या प्रतीच्या उपलब्ध करुन दिल्या व आदिवासी विकास योजना अधिक प्रभावीपणे राबविल्या तर आदिवासींचे गुणात्मक जीवनमान निश्चितच उंचावण्यास मदत होईल असे त्यांनी दाखवून दिले.

११. प्रा. सुरेखा सदाशिवराव शिंदे यांनी ग्रामपंचायतीतील महिला संरपंचाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याचा विशेष संदर्भ या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयात पीएच्. डी. पदवीकरिता मे २०११ मध्ये सादर केलेल्या शोध प्रबंधात ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाच्या भूमिकेचा हिंगोली

जिल्ह्याचा विशेष संदर्भ घेऊन चिकित्सक अभ्यास करतांना ऐतिहासिक काळात पंचायतराज क्षेत्रातील महिलांचे स्थान कसे होते? ७३ व्या घटना दुरुस्तीने महिला नेतृत्त्व तयार झाले का? सरपंच म्हणून महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात का? हिंगोली जिल्ह्यातील महिला सरपंचाची भूमिका काय? यांसारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी हिंगोली जिल्ह्यातील महिला सरपंचाची मते प्रश्नावली व मुलाखतीद्वारे जाणून घेतली.

यावरुन त्यांनी असे दाखवून दिले की, वेदपूर्व काळात महिलांना आदराचे स्थान होते. मात्र मध्ययुगीन व ब्रिटिश काळात महिलांचा दर्जा दुय्यम स्वरुपाचा होता. थोडक्यात ऐतिहासिक काळात महिलांना पंचायतराज क्षेत्रात नगण्य स्थान असल्याचे दिसून आले. तसेच ७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांना ३३% आरक्षण मिळाले. त्यामुळे महिलांना सरपंच पदाची नवीन संधी निर्माण झाली व सर्व जाती धर्मातील महिला नेतृत्त्व पुढे येऊ लागले. मात्र त्यांचा सहभाग परिपक्व करणे आवश्यक असल्याचे त्यांनी दाखवून दिले. तसेच सरपंच म्हणून महिला नावापुरतेच असून कारभारात पतीचा हस्तक्षेप दिसून आल्यामुळे त्या स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नसल्याचे दिसून आले. त्यासाठी महिला सरपंचाना प्रशिक्षण देणे देखील आवश्यक असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर हिंगोली जिल्ह्यातील महिला सरपंचावर सामाजिक दबाव व त्या विशिष्ट घराच्या दबावाखाली येत असल्याचे दिसले. त्यांना सार्वजनिक कार्यक्रमात देखील प्रभावीपणे विचार मांडता येत नाहीत. मागासवर्गीय तसेच ग्रामीण महिला सबलीकरणाचे महिला आरक्षण हा प्रभावी मार्ग दिसून आला. मात्र कारभार पतीराजच बघत असल्यामुळे आरक्षणाच्या माध्यमातून सरपंच महिला असल्या तरी त्यांची भूमिका कठपुतलीच्या बाहुल्यांसारखी असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

वरील सर्व अभ्यासावरुन असे दिसून येते की, ग्रामपंचायतींच्या विकास कार्यातील नेतृत्त्वाच्या सहभागावर, विधानसभा मतदारसंघाच्या विकासातील योगदानावर, महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या राजकीय विकासावर, जिल्ह्यात उदयास आलेल्या आदिवासी नेतृत्त्वावर, आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याच्या मूल्यमापनावर, आदिवासींच्या उत्पादन व उपभोगाच्या संदर्भात, आदिवासींच्या शहरात होणाऱ्या स्थलांतर प्रक्रियेवर, आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेल्या परिणामावर, एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या अभ्यास व मूल्यमापनावर, आदिवासी विकास योजनांचा आदिवासींच्या

गुणात्मक जीवनावर झालेल्या परिणामावर तसेच जिल्ह्यातील ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाच्या भूमिकेवर संशोधन झाल्याचे दिसून येते. परंतु आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान या विषयावर संशोधन न झाल्यामुळे संशोधकाने आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२) हा विषय घेऊन संशोधन केले आहे.

## १.१३ संशोधकांसाठी नवीन संशोधन विषय :

'आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान : नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास (कालखंड १९९५ ते २०१२)' या संशोधन विषयात संशोधन करताना आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान तपासतांना पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, विधानसभा व लोकसभा सदस्य यांनी केलेल्या कार्याचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढले आहेत व शिफारशी केलेल्या आहेत. प्रस्तुत संशोधनात आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन, आदिवासी चळवळी आणि आदिवासी समाजाचे विकासाचे कार्यक्रम, आदिवासींसाठी काम करणारे व आदिवासींमधून पुढे आलेले सामाजिक व राजकीय नेतृत्व, लोकसभा व विधानसभेमध्ये आदिवासी नेतृत्त्वाची भूमिका यांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधन आदिवासी समाजाच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाने दिलेल्या योगदानापुरते मर्यादित आहे. आदिवासी समाज, त्यांची वाटचाल, विकासाचे विविध टप्पे इत्यादींच्या अनुषंगाने संशोधनासाठी पुढील संशोधन विषय सुचवित आहे.

१. आदिवासी चळवळीचा चिकित्सक अभ्यास
२. आदिवासी चळवळ व नक्षलवाद यांचा परस्पर संबंध
३. शासनाच्या योजनांचा आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास
४. आदिवासी संस्कृती व परिवर्तन
५. आदिवासींसाठीचे कायदे व आदिवासींमध्ये होणारे परिवर्तन
६. आदिवासी विकास कार्यक्रमाचा नक्षलवादी चळवळीवर होणारा परिणाम.
७. आदिवासी संस्कृतीच्या संदर्भात शासन व राजकीय नेतृत्वाची भूमिका.
८. आदिवासींचा निर्णय प्रक्रियेतील राजकीय सहभाग.

## संदर्भ सूची :


१. कऱ्हाडे बी. एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै २००७, पृष्ठ ११५.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पचायत समिती अधिनियम, १९६१, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे, नववी आवृत्ती, २००९, पृ. २४५.

३. नाशिक जिल्हा परिषद नाशिक, सामान्य प्रशासन विभाग, उपमुख्यकार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके यांनी परिपत्रकावरुन दिलेली प्रत्यक्ष माहिती.

४. जिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी परिपत्रकावरुन दिलेली प्रत्यक्ष माहिती.

५. उपरोक्त

६. नाडगौडा गुरुनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६, पृ. ५२.

७. बोराडे बी. एच., ग्रामपंचायतीच्या विकास कार्यातील नेतृत्वाचा सहभाग : भोर तालुका एक दृष्टीक्षेप, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल् प्रबंध, जुलै १९९०.

८. केदार अभिमन्यू, अहमदनगर जिल्हा तालुका अकोले येथील महादेव कोळी या आदिवासी जमातीचा राजकीय विकास, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल् प्रबंध, ऑक्टोंबर, १९८८.

९. खारगे संतोष, पलुस–कडेगांव विधानसभा मतदारसंघाच्या विकासामध्ये डॉ. पतंगराव कदम यांचे योगदान (२००४–२००९), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल् प्रबंध, सन २०१०.

१०. बानवाडे प्रमोद, गडचिरोली जिल्ह्याच्या राजकारणात ७३ व्या विशोधनानंतर उदयास आलेले आदिवासी नेतृत्व, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अप्रकाशित एम. फिल् प्रबंध, सन २००८.

११. बच्छाव अे. वाय, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन – विशेष संदर्भ साक्री तालुका, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल् प्रबंध, १९९०.

१२. Sathe M. D., conomics study of a region with special reference to the consumption pattern – A tribal region in Ahmednagar District, Maharashtra State, Ph.D., University of Pune, 1967.

१३. Gare Govind, Tribal in an urban settings – A case study of Mahadev Kolis, Ph.D., University of Pune, 1971.

१४. देशमुख भाऊसाहेब, आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला खर्च, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित, पीएच्. प्रबंध, २००४.

१५. जाधव छाया, एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन – विशेष संदर्भ, आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, २००५.

१६. शिंदे सुरेखा, ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याचा विशेष संदर्भ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, मे २०११.

१७. देशमुख सुरेश, आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनावर झालेला परिणाम, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, सप्टेंबर २०११.

# प्रकरण दुसरे

# आदिवासी समाजाच्या विकासाची वाटचाल


| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ३० |
| २.१ | विकास संकल्पना | ३० |
| २.१.१ | आदिवासी संकल्पना | ३२ |
| २.१.२ | आदिवासी समाज | ३६ |
| २.२ | आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये / लक्षणे | ३७ |
| २.३ | आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन | ४१ |
| २.४ | आदिवासींच्या चळवळी | ५९ |
| २.४.१ | सामाजिक चळवळीचा अर्थ | ५९ |
| २.४.२ | सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये | ६१ |
| २.४.३ | आदिवासी चळवळ : अर्थ व कारणे | ६३ |
| २.४.४ | आदिवासी चळवळीचे प्रकार | ६७ |
| २.५ | आदिवासी समाजाच्या विकासाचे कार्यक्रम | ८९ |
| २.५.१ | स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम | ९० |
| २.५.२ | स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम | ९१ |
| २.५.३ | आदिवासींच्या संरक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदी | ९१ |
| २.५.४ | नेहरुंची पंचशील तत्व | ९४ |
| २.५.५ | ढेबर समिती | ९५ |
| २.५.६ | बावा समिती | ९५ |
| २.५.७ | पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) १९९६ | ९८ |
| २.५.८ | वन अधिकार कायदा २००६ आणि आदिवासी | १०१ |
| २.६ | महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेची निर्मिती व उपयोजनेची उद्दिष्ट्ये | १०३ |
| २.६.१ | महाराष्ट्रातील आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा १९७६ | १०४ |
| २.६.२ | श्री. रमेश पी वळवी समिती | १०५ |
| २.६.३ | श्री. मधुकर पिचड समिती | १०७ |
| २.६.४ | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन प्रशासकीय संरचना | १०९ |
| २.७ | आदिवासी विकासाचा बहुउद्देशीय कार्यक्रम | ११३ |
| २.८ | आदिवासी विकास विभागाच्या योजना | १२० |
| | संदर्भ सूची | १२४ |

# प्रकरण दुसरे

# आदिवासी समाजाच्या विकासाची वाटचाल

## प्रस्तावना :

भारतात विविध वंश, धर्म व संस्कृतीचे लोक राहतात. प्रत्येक धर्मियांना भारतात कोठेही आपल्या धर्माचा प्रसार व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. इतकेच नव्हे तर विविध भाषा व बोली भाषा बोलणारे लोक देखील आहेत. त्यामुळे आपल्या भारतात विविधता दिसून येते. विविधता असून देखील आपण सर्वजण भारतीय आहोत हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय समाजात विविध प्रकारची भिन्नता असली तरीही भारतात वास्तव्य करणारी प्रत्येक व्यक्ती ही भारतीय आहे म्हणून भारतात राहणाऱ्या समाजाला 'भारतीय समाज' असे संबोधले जाते.

भारतीय समाज विविध जातींमध्ये विभागलेला आहे. आपल्या देशात ६ हजारांपेक्षा जास्त जाती व उपजाती आहेत. जातीप्रमाणेच विविध आदिवासी जमाती देखील आहेत. देशात जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक आढळतात.

२००१ च्या जनगणनेप्रमाणे आदिवासी समाजाची लोकसंख्या ८.४ कोटी आणि ती एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के इतकी आहे. आपल्या देशात २५० इतके मुख्य आदिवासी समूह आहे.[१] ते भारतात सर्वदूर पसलेले असून हिमालयाच्या पायथ्यापासून ते हिंदी महासागराच्या किनाऱ्यापर्यंत व अरबी समुद्राच्या किनाऱ्यापासून पूर्वोचलापर्यंत विखुरलेले असून ते १५० भाषा व २२५ उपभाषा बोलतात. भौगोलिक, वांशिक व भाषाशास्त्रीय दृष्टीने आदिवासी विभागांचे ईशान्य, मध्य व दक्षिण अशा तीन विभागात विभागणी केली आहे.

## २.१ विकास संकल्पना :

विकास ही संकल्पना सामाजिक शास्त्रामध्ये वाढ किंवा बदल, प्रगती या अर्थाने वापरली जाते. विकासाचा सामाजिक विकास, आर्थिक विकास, राजकीय विकास, सांस्कृतिक विकास इ. प्रकारे विचार केला जातो. पारंपारिक संस्था आणि परिस्थिती, संक्रमणकालीन संस्था आणि परिस्थिती हे विकासाचे टप्पे मानले जातात.

अप हॉफ आणि इलचमन यांच्या मते[२] – समाजविषयक शास्त्रांच्या वाङ्मयात विकास हा असा शब्द आहे की, जो जेवढा अर्थ समजला आहे त्यापेक्षा खूप जास्त व्यापक प्रमाणात वापरला जातो. शब्दकोषात त्याला उद्दिष्टप्रणित म्हटले आहे. विकास म्हणजे जास्त चांगल्या, परिपूर्ण व उच्च अशा प्रौढ परिस्थितीत वाढ होणे होय. परंतु अनेक समाजशास्त्रज्ञांना ही व्याख्या मान्य नाही. वईडनर हे एका निश्चित उद्दिष्टापेक्षा एका विशिष्ट दिशेने जाण्याच्या वेगात झालेल्या बदलाचे प्रमाण महत्त्वाचे मानतात.

जॉर्ज फ्रेडरिक यांच्या मते[३] – विकास म्हणजे मूलभूत गरजांना (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण व राजकीय स्वातंत्र्य, एकजूट आणि कल्पकता) वाव देणाऱ्या स्वयंपूर्णता, आर्थिक प्रगती व सामाजिक न्याय आणि स्वयंपूर्णता टिकविण्याची, विभागवार विकास तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपासून बऱ्याच अंशी मुक्त असल्याचं समाधान देणारी संतुलित प्रक्रिया.

रिंग्जच्या मते, – विकास तेव्हाच दिसेल कि, जेंव्हा विविध प्रकारचे कृती कार्यक्रम सुरु होतील. संस्था निर्माण होतील की, ज्यात श्रम विभाजन आणि विशेषीकरण असेल, ज्यांच्यात चांगला समन्वय असेल, एकात्मिक स्वरुप असेल आणि ज्यामुळे व्यवस्थेची पर्यावरणाच्या संदर्भात स्वयंपूर्णपणे कार्य करण्याची पात्रता वाढेल.

गांधीजींच्या दृष्टीकोनातून विकास म्हणजे माणसाचा सर्वांगीण विकास, त्याला त्याच्या विकास प्रक्रियेतील स्थानाची जाणीव करुन देणे, त्याचं राहणीमान आणि एकूण जीवनमान उंचावणे आणि केवळ परकीय जोखडाखालूनच नव्हे तर आर्थिक पिळवणूक, कर्जबाजारीपणा तसेच बौध्दिक दास्यातूनही त्याची मुक्तता होय. माणसात आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि स्वयंपूर्णता आणणारी ही प्रक्रिया आहे. आत्मविश्वास, आत्मसंतोष व स्वयंपूर्णता या गांधीजींच्या विकासाच्या संकल्पनेच्या महत्त्वाच्या बाजू आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांनी विकासाची मांडलेली संकल्पना[४] – 'सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय तसेच आर्थिक घटकांच्या सातत्याने वाढणाऱ्या आणि वेगवेगळ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी देशाच्या प्रशासन व मूल्यपध्दतीच्या क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे विकास.' अशी व्याख्या केली आहे.

या व्याख्येप्रमाणे 'विकास म्हणजे सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची राजकीय प्रणालीची क्षमता होय'.

## २.१.१ आदिवासी संकल्पना :

इंग्रजी भाषेतील Tribe या शब्दासाठी मराठी भाषेत जमात आणि Tribes शब्दासाठी जमाती ही संज्ञा उपयोगात आणली जाते. इंग्रजी भाषेत Tribe, Tribes या संज्ञेप्रमाणेच Tribal या संज्ञेचाही उपयोग केला जातो. Tribal हे विशेषण आहे. एखाद्या समूहाची व जमातीची अन्य जमातीपेक्षा उल्लेखनीय अशी वैशिष्ट्ये दर्शविण्यासाठी किंवा नमूद करण्यासाठी Tribal या विश्लेषणाचा उपयोग केला जातो. जवळपास त्याच अर्थाने 'आदिवासी' ही संज्ञा उपयोगात आणली जाते. आदिवासी ही संज्ञा जमात व जमातीच्या सदस्यांची काही जीवनवैशिष्ट्ये यांचा बोध करुन देणारी आहे असे म्हणता येईल. भारतात आदिवासी मोठ्या संख्येत आहेत व त्या भारतभर वास्तव्यास असल्याचे दिसते.[५]

आदिवासी लोक हे जगाच्या बहुतेक सर्व भागांमध्ये सापडतात. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळी नावे आहेत. उदा. अमेरिकेत त्यांना 'रेड इंडियन्स' म्हणतात. ऑस्ट्रेलियात 'ॲबोरीजन्स', युरोपीय देशांमध्ये जीप्सी तर आफ्रिकी आणि आशियाई देश तसेच भारतात 'आदिवासी' या नावाने परिचित आहेत. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारतीय जमातीचे लोक हे भारतीय द्विकल्पातीत आद्य निवासी समजले जातात.

प्राचीन काळात वेळोवेळी भिन्न वंश, भाषा, धर्म असणारे अनेक समूह आजूबाजूच्या प्रदेशातून भारतात आले. काळाच्या ओघात ते भारतीय समाजाचे अभिन्न अंग बनले असे असतांना वेगवेगळ्या भागातील काही लहान मोठ्या आकाराचे समूह मात्र त्या काळातील ग्रामीण व नागरी जीवन पध्दती असणारे समूह संघटीत समहापासून अलिप्त राहिले. अशा समूहांनी ग्रामीण व नागरी समूहाच्या जीवनपध्दतीपेक्षा काही बाबतीत आपली वेगळी असणारी जीवनपध्दती जाणीवपूर्वक टिकवून ठेवली. उदा. काळाच्या ओघात ग्रामीण व नागरी समूदायाच्या अनेक समूहांनी, सदस्यांनी आपापल्या वेशभूषेत व केशभूषेत काही बदल केले. याउलट भारतातील संघटित समाजाच्या परिघावर राहणाऱ्या काही

समूहांनी म्हणजेच जमातींनी आपापली पारंपारिक वेशभूषा व केशभूषा पध्दती, बोलीभाषा, नृत्य–गायन, विवाहपध्दती प्रयत्नपूर्वक टिकवून ठेवली. या समूहांनी आपापली सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि ग्रामीण व नागरी लोकांपेक्षा वेगळी असणारी जीवनपध्दती नष्ट होऊ दिली नाही. पिढ्यानपिढ्यांपासून पारंपारिक जीवनपध्दती जोपासणाऱ्या या समूहांनाच 'जमात–जमाती' या नावाने संबोधले वा ओळखले जाते.

आदिवासी हे भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत आणि त्यांच्याकडे समृध्द सांस्कृतिक वारसा आहे. अनेक भाषा आणि शारीरिक वैशिष्ट्यामधली त्यांची सांस्कृतिक एकात्मता आगळी–वेगळी आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी १९५२ मध्ये एका परिषदेत भाषण करतांना सांगितले होते की, 'जीवन कंठण्याचा कोणता मार्ग उत्तम आहे याची मला खात्री नाही, आपला की त्यांचा. पण काही बाबतीत मला खात्री आहे की, त्यांचाच मार्ग उत्तम आहे. त्यांच्या संस्कृतीकडून अनेक गोष्टी शिकता येतील.'[६] आदिवासींची संस्कृती व मूल्य योग्य तऱ्हेने समजून घेण्यासाठी हे शब्द अत्यंत योग्य आहेत. आपली सांस्कृतिक एकात्मता व अंतर्गत मूल्यांची जपवणूक करण्यासाठी हे आदिवासी शांतपणे एकाकी राहण्याची सवय लावून घेतात. या त्यांच्या सवयीचा अर्थ 'तुटकपणा' किंवा 'एकांतवास' असा लावला जातो. मात्र तो चूकीचा आहे. स्वाभिमान व विश्वास हे त्यांच्या संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. आपली संस्कृती व मूल्य यांच्याशी तडजोड करायला आदिवासी तयार नव्हते आणि राहणार नाहीत. आपल्या लोकसंख्येत राहून आपली अंतर्गत मूल्य व सांस्कृतिक एकात्मता जपण्याच्या आदिवासींच्या इच्छेमागे बहुधा हे मुख्य कारण आहे.

## अभ्यासकांनी वापरलेल्या संज्ञा :

डॉ. घुर्ये यांनी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे संबोधले आहे. डॉ. व्हेरियर इल्विन, ग्रीगसन व ठक्करबाप्पा यांनी आदिवासींना Aboriginals असे संबोधले आहे. Aboriginals म्हणजे मूळचे रहिवासी असे संबोधिले आहे. मूळचे रहिवासी हा अर्थभाव व्यक्त करण्यासाठी त्यांना धरतीची लेकरे या नावाने संबोधण्याचा प्रघात मराठी भाषिक समाजात रुढ झाला.

आदिवासी हे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहतात म्हणून त्यांना 'वन्यजमाती' किंवा 'गिरीजन' असेही म्हटले जाते. परंतू त्यांना वनवासी, गिरिजन म्हणणे योग्य नाही. कारण ते खऱ्या अर्थाने या देशाचे रहिवासी म्हणजेच मूळचे निवासी अर्थात मूलनिवासी आहेत.

भारतीय संविधानात आदिवासींना 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes) असे संबोधले आहे. संविधानाच्या तरतूदीनुसार भारताचे राष्ट्रपती घटनेच्या ३४२ (१) कलमान्वये नोटिफिकेशन काढून एखाद्या आदिम जमातीला अनुसूचित जमात (Scheduled Tribe) म्हणून घटनेच्या पाचव्या अनुसूचित ($5^{th}$ Scheduled Tribe) मध्ये टाकू शकतात. नंतर तिला अनुसूचित जमात असा दर्जा प्राप्त होतो. म्हणजेच राज्य–घटनेतील तरतूदी या 'अनुसूचित जमाती' या घटनात्मक संकल्पनेशीच संलग्न आहेत. त्यांच्यासाठी घटनेने अनेक तरतूदी केलेल्या आहेत. एकूणच सर्वसंमत अशी आदिवासी (Tribe) या शब्दाची व्याख्या उपलब्ध नाही. मात्र आदिवासी किंवा जमातींचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता **समाजशास्त्रज्ञ** व **मानवशास्त्रज्ञांनी** वेगवेगळ्या **व्याख्या** केल्या आहेत.

### १. गिलीन आणि गिलिन :–

''आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान बोली बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांचे एकत्रिकरण आहे. ''

(Any collection of preliterate local groups which occupy a common general territory, speak a common language & practices a comman culture is a tribe - Gillin & Gillin)[७]

### २. डॉ. रिव्हर्स (Dr. Rivers) :–

'जमात किंवा आदिवासी हा एक सरळ साधार सामजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोलीभाषेचा वापर करतात व युध्द वगैरे सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात.'

(A Tribe is a social group of a simple kind, the members of which speak a common dialect & act together in such common purpose as warfare – Dr. Rivers.)[८]

३.	**डॉ. डी. एन. मजुमदार :** (Dr. D. N. Majumdar)

''जमात किंवा आदिवासी समाज हा समान जीवन पध्दती असणारा, समान भाषा बोलणारा व व्यवहार, विवाह वगैरे बाबतीत समाज निषेध नियमांचे पालन करणारा आणि एकच भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या कुटूंबाचे किंवा कुटूंब समुहाचे एकत्रीकरण आहे''

(A Tribe is a collection of families or groups of families bearing a common name, members of which occupy the same territory, speak the sam language and observe certain taboos regarding marriage, professions or occupatons – Dr. D. N. Majumbar)[९]

४.	**बोगार्डस :–**

यांच्या मते, 'सुरक्षिततेची जरुरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला असतो.' [१०]

५.	**मदन व मजुमदार :–**

यांच्या मते, समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख 'आदिवासी समाज' म्हणून नेहमी केला जातो.[११]

६.	**ए. बी. वर्धन :–**

यांच्या मते, 'आदिवासी किंवा जमात म्हणजे विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर असलेली सामाजिक – सांस्कृतिक घटकांची स्थिती, ही सांस्कृतिक व मानसिकदृष्टीने आपला पूर्वापार वारसा जपणारी तसेच स्वजातीय विवाहप्रथा पाळणारी असते.'

७.	**इंपिरिअल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.**

'समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू–भागात राहणाऱ्या, सुरुवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटूंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.'

**८. इ. स. १९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या केली आहे. ती व्याख्या खालीलप्रमाणे आहे.**

'एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागसलेला, अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रमाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनशी गटाला आदिवासी समाज म्हणतात.'

वरील व्याख्यांवरुन आदिवासींचा अर्थ स्पष्ट होतो. थोडक्यात, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा व समान जीवनपध्दती असणारा तसेच तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागसलेला समाज म्हणजे 'आदिवासी' समाज होय.

## २.१.२ आदिवासी समाज

आदिवासी समाजाचा इतिहास पाहतांना माणूस त्याच स्थितीत राहिला नाही असे प्रकर्षाने दिसते. निसर्गात व मानवात सातत्याने संघर्ष होत राहिले. या संघर्षातून संस्कृतीचा उदय झाला.

आदिवासींचा इतिहास मूळात त्यांनी आक्रमणवाद्यांविरुध्द केलेल्या प्रतिकाराचा इतिहास आहे. वसाहतवाद्यांविरुध्द प्रतिकाराची व संघर्षाची सुरुवात आदिवासींनी केली. इ. स. पूर्व १५०० च्या सुमारास नागरी संस्कृती माहिती नसलेल्या भटक्या टोळ्यांचा भारतावर म्हणजे सिंधु संस्कृतीवर जो हल्ला झाला त्या आधीचे लोक, ते आदिवासी ऋग्वेद व सिंधु उत्खननाच्या अभ्यासकांच्या मते या हल्ल्यात किमान ६ लाख निरपराध नागरिक मारले गेले. इंद्र आर्यांचा नेता होता. या अगोदर आर्य सिंधू लोकांची मुले व गाई पळवून नेत. ३०० वर्षे असेच चालले होते. सिंधू संस्कृतीचे लोक हे आर्यांपेक्षा सुसंस्कृत होते. इ. स. पूर्व १२०० ते १५०० या काळात स्त्रियांना पुढे करुन आर्यांनी गनिमी कावा केला. कारण चंड व मुंड या आदिजमातींनी आर्यांचा पराभव करुन राज्ये ताब्यात घेतली होती. 'महिला' हा त्या काळातील भूषणभूत शब्द होता. निषाद, किरात, शबर, कावळ्याहून काळे, नरभक्षक

धरतीचे काळे पूत्र इत्यादी हिणकस नावांनी त्यांचा उल्लेख होत असल्याचे वेद, उपनिषदे व पुराणात आढळते.

आर्यांना पंजाबातील नद्यांच्या उन्हाळी महापुराची माहिती नसल्यामुळे जागोजागी आर्य गावे पुरात सापडली. इंद्र संस्कृतीची स्थापना झाल्यानंतर गावोगावचे शबर, किरात, निषाद व नागलोक भयभीत झाले. भीतीने ह्या लोकांच्या अनेक टोळ्या निरनिराळ्या देशात पळून गेल्या. विंध्य, सातपूडा ओलांडून ते तापी नर्मदेच्या खोऱ्यात आले. पुढे सह्याद्री पर्वताच्या व गोदावरीच्या खोऱ्यात स्थिरावले. त्यांनी 'सरमक' राज्य स्थापन केले. ते इ. स. पूर्व ६०० ते ३०० पर्यंत येथे होते. इ. स. पूर्व २०० मध्ये आर्यांनी आदर्शवादी वाङ्मयाची लाट सुरु केली. सूरलोकांची इतिहास लेखनाची प्रथा बंद पाडून चौथ्या शतकापासून पुराण लिहिणे सुरु केले. सातवाहन, होथसळ, यादव आणि त्यानंतरची मुस्लिमराज्य यात वेळावेळी आदिवासींचे अनेक उठाव झाले. काळाच्या ओघात आदिम जमातीची अनेक प्रदेशात राज्ये निर्माण झाली. त्यांच्या अनेक संस्कृति विकसित झाल्या. त्यात गोंडाची व भिल्लांची संस्कृती प्रसिध्द होती. गोंड, भिल्ल संस्कृतीबरोबरच संताळ, नाना, मिझो हूँ, ओरॉन, कोकणा, वारली यांच्याही संस्कृती विकसित झाल्या.

एका स्वतंत्र दृष्टीकोनातून आदिवासी समाजाकडे पाहिल्यावर असे म्हणता येईल की, आदिवासी हा पूर्ण विकसित मानव असून त्यांची स्वतंत्र भाषा, संस्कृती, जीवनपध्दती होती व आजही ती टिकून आहे. आदिवासींचे जीवन इतके एकसंघ आहे की, त्यांच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा इत्यादींबाबत विचार करता एखाद्या अंगाचा वेगळा विचार करता येत नाही.

## २.२ आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये / लक्षणे :-

मानवशास्त्रीय लिखाणात ज्यांचा आदिवासी / आदिम समाज म्हणून उल्लेख केला जातो. त्या समाजाच्या लक्षणांचा सविस्तर विचार करणे महत्त्वाचे ठरते. आदिवासी समाजाच्या लक्षणांचा विचार करतांना हे स्पष्ट केले पाहिजे की, आदिवासी समाजाची काही प्रमुख लक्षणे / वैशिष्ट्ये सापेक्ष स्वरुपाची आहेत. उदा. आदिवासी समाज हा अक्षरओळख नसलेला आहे. म्हणून या समाजाला

काटेकोरपणे निरक्षर समाज असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण आज प्रगत समाजाच्या प्रयत्नाने व संपर्काने आदिवासींना लिहिता, वाचता येते. परंतु बहुसंख्य आदिवासींना लिहिता वाचता येत नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आदिवासींच्या प्रत्येक लक्षणांचा अभ्यास करताना ही वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये / लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

### १. विशिष्ट भू–प्रदेश :–

आदिवासी लोक एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करतात. त्यामुळे ते बाह्य संपर्कापासून अलिप्त असतात. आदिवासी ज्या भूप्रदेशावर राहतात तो एक डोंगराळ जंगलांनी वेढलेला प्रदेश असतो. त्यामुळे या लोकांचा इतर लोकांशी विशेष संबंध येत नाही.

### २. प्रमाण लघुता :–

आदिवासी समाजाची इतर समाजाशी तुलना केली असता आदिवासी समाज अनेक बाबतीत लहान असतो. हा थोड्या लोकांचा समुदाय असतो. ज्या विशिष्ट भूप्रदेशांवर आदिवासी राहत असतात. तो भूप्रदेश मर्यादित असतो. या भूप्रदेशावरील लोकसंख्या शंभर ते दोनशे पर्यंत असते. समाजाची संख्या मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही तितकेच लहान असते. विशिष्ट भूप्रदेश, मर्यादित लोकसंख्या यामुळे त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.

### ३. सामान्यभाषा किंवा बोलीभाषा :–

आदिवासी समाजातील सर्व व्यक्तिंना एकत्र जोडणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दुवा म्हणजे स्वतःची बोलीभाषा होय. कोणत्याही समाजाची भाषा ही त्या समाजाच्या जीवनाचे प्रतिबिंब असते. आदिवासींच्या भाषेतील शब्दांतून त्यांचे सामाजिक संबंध, नात्यागोत्यांचे संबंध, श्रध्दा, ऋणानुबंध व्यक्त होतात. पण त्यांच्या बोली भाषेला भाषेचा दर्जा नाही. कारण भारतातील सर्व आदिवासी जमातीची एकच बोलीभाषा नाही. भारतात आदिवासींच्या एकूण २०५ प्रकारच्या बोली भाषा आहेत तर २०५ उपबोली भाषा आहेत.

## ४. समान सांस्कृतिक जीवनपध्दती :–

आदिवासी समाजाची जीवनपध्दती ही इतर समाजाहून अगदी वेगळी आहे. त्यांचे सामाजिक संबंध रक्त व दर्जा यांवर आधारलेले असतात. म्हणूनच व्यक्ती – व्यक्तींचे परस्परसंबंध करारात्मक नसतात. आप्तसंबंधानाच त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान असते. त्यांची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था ही कार्यक्षम व मजबूत असते. त्यांचे रितीरिवाज, रुढी, परंपरा, धर्मश्रध्दा इत्यादीनीच त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित झालेले असते. समान सांस्कृतिक जीवन असल्याने त्यांचे खाणे–पिणे, आचार–विचार, केशभूषा, वेशभूषा व एकूण जीवनविषयक दृष्टीकोन यामध्ये समानता दिसून येते. यामुळेच इतर कोणत्याही समाजात दिसून न येणारा सामाजिक ऐक्यभाव त्यांच्यात दिसून येतो.

## ५. एकाच रक्तसंबंधावर आधारित :–

आदिवासी समाजातील लोक परस्परांना रक्त – संबंधित मानतात. लोकांची उत्पत्ती एकाच पूर्वजाकडून झाली असा त्यांचा दृढविश्वास असतो. आपला पूर्वज एकच आहे ही भावना प्रबळ असते. या दृढनिश्चयामुळेच त्यांच्यात विलक्षण बांधिलकी, प्रेम, आपुलकी व सहचर्य निर्माण झालेले असते.

## ६. सीमित तंत्रविद्या :–

आदिवासींची तंत्रविद्या अत्यंत माफक असते. शेतीकरिता जमिनीची मशागत करण्याचे तंत्र व इतर आर्थिक क्रियातील पध्दती मागासलेली असते. मासे पकडण्याची जाळी, झोपडी, जनावरांचे व शेळ्या–कोंबड्यांचे संरक्षण कण्यासाठी बंदिस्त जागा, इतर सर्व वस्तूंचे उत्पादन ते स्वतःच करीत असतात.

सारांश, आदिवासींची आयुधे, हत्यारे, अवजारे व त्यांच्या आर्थिक क्रियांचे स्वरुप लक्षात घेता हे स्पष्ट होते की, त्यांचे तंत्रविद्यात्मक ज्ञान अगदीच मर्यादित स्वरुपाचे आहे.

## ७. समान धर्म :–

आदिवासी समाजातील धर्म व धर्माचरण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. निसर्ग शक्तींना ते अनन्यभावे शरण जातात. अतिमानवी शक्तींना संतुष्ट करण्यासाठी आदिवासी लोक पूर्वजपुजा, भूतपुजा, देवपूजा व निसर्गपूजा करतात. या अतिमानवी शक्तींना आपलेसे करुन घेण्याचे काम भगत, जादूटोणा, मंत्रतंत्र इ. च्या सहाय्याने करु शकतो. अशी त्यांची श्रध्दा दिसून येते. आदिवासी समाजाच्या या धर्मश्रध्देने त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन निश्चित झालेला असतो. यामुळेच आदिवासींचा समानधर्म हे त्यांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य बनले आहे.

## ८. साधी अर्थव्यवस्था :–

आदिवासी समाजाची साधी अर्थव्यवस्था हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. आदिवासी लोक आपल्या उपजिविकेसाठी सभोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून आहेत. वस्तूचा संचय, वस्तूंचे विनिमय नसल्याने पैसा व बाजारपेठ यांचा अभाव हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्षण बनले आहे.

फायदा मिळविणे हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे ध्येय आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत दिसून येत नाही. त्याऐवजी एकमेकांना मदत करणे व सर्वांना सहभागी करुन घेण्याची प्रवृत्ती त्यांच्यात विशेषत्वाने दिसून येते.

## ९. सामाजिक एकजिनसीपणा :–

आदिवासी समाजाचे हे एक प्रमुख लक्षण आहे. समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियमने यामुळे आदिवासींच्या संपूर्ण आचार विचारात एकजिनसीपणा दिसून येतो. त्यांचे रितीरिवाज, धर्मश्रध्दा व परंपरा यांचा प्रभाव जनमानसावर इतका पराकोटीचा असतो की, त्यांचे पालन ते अत्यंत काटेकोरपणे करीत असतात. यामुळेच जीवनात घडणाऱ्या

कोणत्याही घटनेविषयी आदिवासींची प्रतिक्रिया एकच असते. याच लोकमताचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडलेला असल्याने त्यांच्या आचरणात भिन्नता आढळत नाही.

सारांश, आदिवासी समाजाच्या वैशिष्ट्यांवरुन हे स्पष्ट होते की, आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा वेगळा आहे. बहुसंख्य आदिवासी हे दुर्गम, डोंगराळ भागात राहतात. रक्तसंबंधांना विशेष महत्त्व देणारे हे आदिवासी सामाजिक जीनात वैयक्तिक आकांक्षा ठेवत नाहीत. निसर्गाच्या सतत सहवासात राहून स्वच्छंदी जीवन जगणारे आदिवासी रितीरिवाजांच्या जोखडांनी बध्द झालेले असतात. म्हणूनच त्यांच्या जीवनाचा समतोल कधीही ढळत नाही. पारंपारिक जीवनाचे सातत्य अखंडीतपणे चालू आहे.

## २.३. आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन :–

गेल्या ६० वर्षात आदिवासींच्या जीवनाविषयी बाह्य समाजाला पुष्कळ माहिती झालेली आहे. या कालावधीत आदिवासींचा बाह्य समाजाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संपर्क आल्यामुळे संस्कार, संस्कृती, आचार विचारांची देवाणघेवाण त्यांच्यात वाढलेली दिसून येते. ज्या समाज सेवकांनी आदिवासींच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी स्वतः वाहून घेतले आहे त्यांच्या सेवेला आता महत्त्व प्राप्त झालेले आहे व त्यांच्या कार्याचे मूल्यमापनही होऊ लागले आहे. सेवाकार्यासाठी निर्माण झालेल्या सेवाभावी संस्थांची कामे व शासनाने दिलेला मदतीचा हात यामुळे आदिवासी समाजसुधारणेच्या कार्याला गती मिळत आहे.

## तक्ता क्र. २.१

## १९८१, १९९१ व २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याचे जिल्हानिहाय एकूण व आदिवासी लोकसंख्या (संख्या हजारात)

| अ. क्र. | जिल्हा | १९८१ जनगणना लोकसंख्या | | १९९१ जनगणना लोकसंख्या | | २००१ जनगणना लोकसंख्या | | आदिवासी क्षेत्र (चौ. कि. मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्य | ९.१९% | | ९.२७% | | ८.०५% | | |
| १ | मुंबई शहर | एकूण ८२४३ | आदिवासी ८४ | एकूण ३१७५ | आदिवासी २८ | एकूण ३३३८ | आदिवासी २१ | -- |
| २ | मुंबई उपनगर | -- | -- | ६७५१ | ७६ | ८६४० | ७१ | -- |
| ३ | ठाणे जिल्हा | ३३५२ | ७२९ | ५२४९ | ९५१ | ८१३२ | १९९९ | ६७२५ |
| ४ | रायगड | १४८६ | १९० | १८२५ | २३४ | २२०८ | २६९ | ७९३ |
| ५ | रत्नागिरी | १३८० | २६ | १५४४ | १५ | १६९६ | २० | -- |
| ६ | सिंधुदूर्ग | ७७४ | ०७ | ८३२ | ०४ | ८६९ | ०५ | -- |
| ७ | नाशिक | २९९२ | ७०२ | ३८५१ | ९३१ | ४९९४ | ११९४ | ६२९६ |
| ८ | धुळे | २०५० | ८३१ | १४७३ | ३७५ | १७०८ | ४४४ | १४०० |
| ९ | नंदूरबार | -- | -- | १०६३ | ६६१ | १३१२ | ८६० | ४७७२ |
| १० | जळगांव | २६१८ | २१६ | ३१८८ | ३१४ | ३६८३ | ४३६ | ४८ |
| ११ | अहमदनगर | २७०८ | १८८ | ३३७३ | २४० | ४०४१ | ३०३ | ११०९ |
| १२ | पुणे | ४१६४ | १५९ | ५५३३ | २१६ | ७२३२ | २६२ | १२३६ |
| १३ | सातारा | २०३९ | १३ | २४५१ | १८ | २८०९ | २२ | -- |
| १४ | सांगली | १८३१ | १५ | २२१० | ११ | २५८४ | १८ | -- |
| १५ | सोलापूर | २५९१ | ५१ | ३२३१ | ४८ | ३८५० | ६९ | -- |
| १६ | कोल्हापूर | २४६४ | २६ | २९९० | १५ | ३५२३ | २१ | -- |
| १७ | बुलढाणा | १५०९ | ६६ | १८८६ | ९५ | २२३१ | ११५ | २३१ |
| १८ | अकोला | १८२७ | ११५ | १३५२ | ९१ | १६३० | १०० | ८०४ |
| १९ | वाशिम | -- | -- | ८६२ | ६५ | १०२० | ७१ | १३७ |
| २० | अमरावती | १७८६१ | २४२ | २२०० | ३१६ | २६०७ | ३५७ | ४४५४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | यवतमाळ | १७३६ | ३६० | २०७७ | ४४६ | २४५८ | ४७३ | ६६५८ |
| २२ | नागपूर | २५८९ | ३५३ | ३२८७ | ४५८ | ४०६८ | ४४४ | १५६९ |
| २३ | वर्धा | ९२७ | १४२ | १०६७ | १६६ | १२३६ | १५४ | ४६२ |
| २४ | भंडारा | १८३८ | २९८ | ९७५ | १०२ | ११३६ | ९८ | २०९ |
| २५ | गोंदिया | -- | -- | ११३३ | २०८ | १२०१ | १९६ | २१४९ |
| २६ | चंद्रपूर | १४१८ | २९९ | १७७२ | ३४९ | २०७१ | ३७५ | ३१६२ |
| २७ | गडचिरोली | ६३७ | २५१ | ७८७ | ३०५ | ९७० | ३७२ | ११२६६ |
| २८ | औरंगाबाद | १५८८ | ५८ | २२१४ | ८४ | २८९७ | १०० | -- |
| २९ | जालना | १०३२ | २० | १३६४ | २८ | १६१३ | ३२ | -- |
| ३० | बीड | १४१३ | १२ | १८२२ | २१ | २१६१ | २४ | -- |
| ३१ | परभणी | १६४३ | ७६ | १२९२ | ७५ | १५२८ | ३५ | -- |
| ३२ | हिंगोली | -- | -- | ८२५ | ३६ | ९८७ | ८७ | १०१ |
| ३३ | नांदेड | १७४९ | १७८ | २३३० | २७६ | २८७६ | २५४ | ११८२ |
| ३४ | उस्मानाबाद | १०३० | १९ | १२७६ | २२ | १४८७ | २८ | -- |
| ३५ | लातूर | १२९४ | ३५ | १६७७ | ३८ | २०८० | ४८ | -- |
| | **एकूण** | **६२७८४** | **५७७५** | **७८९३७** | **७३१८** | **९६८७९** | **८५७७** | **५५४६६** |

(संदर्भ : जिल्हा वार्षिक उपयोजना २००३-२००४, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, मुंबई, पृ. २५२)[१२]

## आदिवासींचे सामाजिक जीवन :-

महाराष्ट्रात आदिवासींच्या ज्या अनेक जमाती आहेत त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरिती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा दिसून येत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगेवगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातीचा मानसिक पिंड - व्यापक अर्थाने सामाजिक जीवन हे त्यांच्या भोवतालच्या भौगोलिक, आर्थिक व परंपरागत चालत आलेल्या व रुढ झालेल्या जीवनपध्दतीने बनलेले आहे. तसे असले तरी देखील सर्वसामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्य व वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा दिसून येतो.

सर्वसामान्य आदिवासी हा भोळाभाबडा, अबोल, ग्रामस्थांबरोबर शक्यतो न बोलणारा, प्रामाणिक, पापभिरु, परंपरागत जीवनसृष्टीचा, दैववादी, निसर्गाच्या सान्निध्यात रमणारा, जीवनाचा स्वच्छंदपणे आनंद घेणारा असतो. तो जंगल, दऱ्याखोऱ्यात राहणारा असला तरी त्यांची राहणी त्यांच्या निर्मळ अंतःकरणाप्रमाणे साधी व स्वच्छ असते. त्यांच्यातील आत्मीयता व सचोटी हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. त्यांची जीवनाकडे पाहण्याची स्वतंत्र व वेगळी दृष्टी आहे. त्यांच्या जीवनात अलिकडच्या काळात पैशांना महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते. जमीन, गुरे–ढोरे, कोंबड्या, बकऱ्या, मासे, खेकडे व शेतात राबण्यासाठी मजबूत हात पाय ही त्यांची परंपरागत संपत्ती आहे. आपल्याला हवे असेल तेव्हा निसर्गातून, सभोवतालच्या साधनांतून मिळण्याची शक्यता असेल तर आजही आदिवासी स्वतःला अतिशय सुखी समजतो.

**आदिवासींची गृहरचना व पोशाख :–**

दळणवळणाच्या साधनाअभावी दूरवरच्या बाजारात चालत जाऊन आपल्या वस्तू विकायच्या व त्याच्या मोबदल्यात आपल्याला हव्या त्या वस्तू घ्यावयाच्या ही आदिवासींच्या जीवनाची आर्थिक घडी होय. तिच्यात हळूहळू बदल होत चालला आहे. आदिवासींची गावे सर्वसामान्यपणे एकाच जमातीची व गटागटाने वसलेली असतात. त्यामुळे या भागात कारागीर वर्ग सापडत नाही. स्थानिक साधनांद्वारे दोन–चार किंवा दहा–पंधरा झोपड्या गटागटांनी दिसतात. काही ठिकाणी वस्तीत जवळजवळ घरे असतात. हे लोक पाडा किंवा पुडा, झाप किंवा वाडी असा त्याचा उल्लेख करतात. चार–पाच पाड्यांमिळून आदिवासींचे एक गाव होते. पाड्याचे नांव तेथे राहणाऱ्या प्रमुख कुळाचे, भौगोलिक स्थळाचे, वनस्पतीचे अगर प्राण्यांचे असते. उदा. गोरपाडा, डोंगरपाडा, वाघ्याची वाडी.

आदिवासींच्या झोपड्या लहान असतात. झोपडींचे क्षेत्रफळ सामान्यपणे १०० ते २०० चौ. फूट असते. घरांना मातीच्या भिंती किंवा बांबूचे अगर कारवीचे कूड असतात. छप्पर गवताचे असते. काही घरे कौलारु देखील असतात. आदिवासींची वस्ती जंगलात दूरवर असल्याने बऱ्याचवेळा वाघ, बिबटे गावात येऊन गुरे मारुन नेतात. यासाठी गुरांचा गोठा हा घरात असण्याची पध्दत बहुतेक

आदिवासी भागात असते. भिल्लांची व काही ठाकरांची घरे मात्र त्यामानाने मोठी असतात. भरपूर लाकडांचा, उपलब्ध सागवानाचा वापर त्यामध्ये केलेला असतो.

आदिवासी घराचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक गावात, किमान काही घरांवर तरी वाळलेले मोठे मोठे भोपळे दिसतात. भोपळे भाजीसाठी वापरतात. शिवाय तारप्यासारखी वाद्ये करण्यासाठी किंवा शेतावर शिकारीला जातांना वाळलेल्या पोकळ भोपळ्यात पाणी भरुन नेण्यासाठी उपयोग होतो.

आदिवासींचा पोशाख अगदी साधा असतो. कमरेला लंगोटी किंवा गुडघ्यापर्यंत लावलेला धोतराचा काच्या, अंगात कोपरी किंवा पेहरण असते. बहुतेक सर्व जमातीत अत्यंत मोजके व थोडेच कपडे अंगावर असतात. परंतु पारंपारिक कपड्यांमध्ये आता खूपच फरक झाला आहे. पूर्वी आदिवासी पुरुष बहुधा लंगोटीवरच असत. क्वचित कधीतरी गुडघ्यापर्यंत धोतर असे. भिल्लांमध्ये बिनगळ्याचा सदरा किंवा थंडी असे. पागोटे हे भिल्लांत प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यानंतर त्याच्याजागी पायजमा वापरला जाऊ लागला. आता तर शर्ट पँट सुध्दा नियमित वापरतात. स्त्रियांचा पोशाख हा चोळी व काष्ट्याचे मांडीपर्यंत घट्ट लुगडे असा असे. ठाकर व वारली स्त्रिया टॉवेल अथवा पंचा गुंडाळतात. विवाहित माडिया व गोंड स्त्रिया चोळी घालत नाहीत. फक्त मांड्यापर्यंत घट्ट साडी नेसतात. बऱ्याचशा आदिवासीत चोळी, लुगडे व डोक्यावरुन कापड घेण्याची प्रथा आहे. स्त्रियांचा पोशाख प्रत्येक आदिवासी जमातीत वेगवेगळा आढळतो. कोकणा, महादेव कोळी, ठाकर या जमातीच्या स्त्रिया डोक्यावर फडकी नावाचे वस्त्र घेतात. ते वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिझाईन केलेले असते. भिल्ल समाजातील स्त्रिया नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे करतात. एक तुकडा नेसतात व दुसरा तुकडा डोक्यावरुन घेतात.

मात्र आजकाल बहुतेक पुरुषांसाठी धोतर, कुर्ता, पायजमा, पँट, शर्ट तर स्त्रियांसाठी नऊवारी अथवा गोल साडी वापरली जाते. परंतु वयस्कर मंडळी दूर्गम भागात किंवा पारंपारिक आदिवासी भागातील मंडळी आपला पारंपारिक पोशाख वापरणे पसंत करतात.

**आदिवासी धर्म :–**

आदिवासी धर्म म्हणजे मानवाचे सुरुवातीचे धार्मिक जीवन. सर इ. बी. टेलर आणि जेम्स फ्रेझर यांनी धर्माचा उगम कसा झाला, हे अभ्यासतांना असे नमूद केले की, आदिवासी धर्म ही धर्माची अगदी सुरुवातीची अवस्था आहे. म्हणजेच आदिवासी धर्म हा अशा लोकांचा धर्म की, ज्यांचा इतर नागरी समाजाशी सांस्कृतिक संबंध आलेला नाही.[१३]

आदिवासींच्या धार्मिक रुढी ह्या निसर्ग आणि प्राणीपुजेतून निर्माण झाल्या आहेत. निसर्गातील गुढ, अनाकलनीय ते सर्व पूजनीय असे ते मानतात. आकाशात चमकणारी वीज,सूर्य, चंद्र, तारे, ढग, प्रचंड वृक्ष, वाघ, सिंह, साप, विंचू अशा निसर्गनिर्मित सजीव, निर्जीव वस्तूंची आणि प्राण्यांची ते पूजा करतात. त्यांच्यात हिरवा, हिमाई, बडापेन, वाघदेव, चित्ता, डोंगरदेव, वनदेव, गावदेव, कणसरी, धरतारी आणि नारनदेव इ. देवदेवता आहेत. आदिवासी आपल्या पूर्वजांना व पितरांना देव मानतात. भूत–पिशाच देखील त्यांना देवासारखीच वाटतात. त्यांना ते चेडा, मंजा, सुपली, वीर, हडळी, खैस इ. नावांनी ओळखतात. दगडाचे किंवा लाकडाचे मुखवटे करुन गावाच्या वेशीबाहेर उभी केलेली दैवते हे त्यांचे पूर्वज असतात.

बऱ्याच आदिवासी जमातींनी हिंदू खेतांचा स्वीकार केला आहे. दत्तेश्वरी, मन्नादेवी, लक्ष्मी, चामुंडा, महादेव, भैरोबा, खंडोबा, मारुती इत्यादी हिंदू देवतांची ते पुजा करतात. कॉलरा, देवी यासारख्या रोगराई असल्यास भूत–पिशाचांच्या कोपामुळे ही रोगराई होते. अशी त्यांच्यापैकी अनेकांची समजूत आहे. ही रोगराई कशी होते, त्यावर उपाय काय आहेत हे शोधून काढण्यासाठी गावात भगत असतो. भूत–पिशाचांचे निर्मूलन किंवा बंधन करण्याचे तंत्र भगताना अवगत असते. त्यावर आदिवासींचा विश्वास आहे. भोळेभाबडे आदिवासी श्रध्दाळूपणाने भगताने सुचविलेले उपाय करतात. आदिवासींमध्ये धार्मिक आणि सामाजिक विधित मद्याला, दारुला विशेष स्थान असते. जन्म, मृत्यू, लग्न, पंचायत, पाहुण्यांचा आदर सत्कार, घेणे–देणे, कोणत्याही निमित्ताने एकत्र येणे झाले की, दारु घेण्याचा कार्यक्रम होतो. काही जमातीत स्त्रिया, मुले देखील दारु पितात. जन्मापासूनच त्यांची ही सवय असते. मूल जन्मल्यानंतर मुलाच्या तोंडात दारुचा थेंब टाकला नाही तर ते मूल नशीबवान निघणार नाही असा त्यांच्यात समज आहे. मृत्यू पावलेल्या माणसाच्या तोंडातही दारुचा थेंब घालावा

लागतो. मनुष्याला मृत्यू आला तर प्रेत जागविण्यासाठी लोकांना दारु देण्याची व प्रेत वाहून नेणाऱ्यांनाही दारु देण्याची प्रथा काही आदिवासी जमातीत आढळते.

महाराष्ट्रात आदिवासी जमाती हिंदूचे सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. हिंदू सणात आदिवासी सणांचे मिलन झाल्यामुळे त्यांचे सण अर्धे हिंदू व अर्धे आदिवासी झाल्याचे दिसून येतात. आदिवासी समाजात बाळंतपणासाठी जी स्त्री असते तिला 'सुईण किंवा सोयरीण' असे म्हणतात. ती मूल जन्मल्यावर त्याची नाळ कापण्याचे काम करते. गर्भवती स्त्री मरण पावल्यास ती हडळ होते असाही लोकांचा समज आहे. त्यामुळे अशा स्त्रीचे प्रेत पुरण्याऐवजी जाळण्याकडे कल असतो.

माडीया गोंड आदिवासींत गोटूल ची प्रथा आहे. गोटूल म्हणजे गावातील तरुण–तरुणींचे निवासस्थान. रात्रीचे जेवण झाल्यानंतर तरुण–तरुणी या गोटूलात जमतात. गाणी व नृत्ये यांचे प्राथमिक धडे त्यांना गोटूलातच मिळतात. गाणी व नृत्य हे आदिवासींचे वैशिष्ट्ये. त्यात त्यांच्या धार्मिक भावनाही असतात. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळे नृत्य केली जातात. पावसाळा संपून सुगीचा हंगाम आल्यानंतर आदिवासींच्या नृत्यांना सुरुवात होते. दिवाळीपासून पुढे महिनाभर नृत्ये चालतात. तारवा, कामठी, छीर, ढोल, भवाडा, करमा, भगोऱ्या, रेला, दण्डार, होली नाच, गौरी नाच, दुडक्या यासारखे अनेक नाच करण्यात आदिवासी रमलेले असतात व आज देखील विविध सण उत्सवात त्यांचे नाच–गाण आपल्याला पहावयास मिळते. ही सांस्कृतिक परंपरा त्यांनी आजही टिकवून ठेवलेली दिसते.

**आदिवासी कला संस्कृती :–**

कला निर्मिती ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. आदिमानवापासून कला निर्मिती सुरु झाली. कला आदिमानवाच्या जीवनाचाही अविभाज्य भाग होता. दैनंदिन जीवनातील अनुभवांच्या आधारे आणि त्यांच्या काही गरजांच्या पूर्तीतून सुरुवातीला कला निर्माण झाली. त्या कलेत कृत्रिमता दिसत नाही. तिचे स्वरुप उत्स्फूर्त जाणवते.

शहरी समाजापासून दूर व मूळच्या आदिम कलेचा वारसा जपणाऱ्या आदिवासी कलेत मात्र आपल्याला ती सहजता प्रभावीपणे जाणवते. कारण कला ही आदिवासींच्या लोकजीवनात भिनलेली गोष्ट आहे. तांत्रिक कौशल्यापेक्षाही उत्स्फूर्त अविष्कार हा आदिवासी कलेचा प्राण आहे. आवश्यक ते तांत्रिक कौशल्य किंचित ओबडधोबड स्वरुपात का होईना, त्यांनी प्रयत्नपूर्वक आत्मसात केलेले जाणवते. त्यांच्या कला निर्मितीचे मूळ निसर्ग आहे. त्याचं माध्यम निसर्ग आहे व त्यांचा अविष्कारही निसर्गच आहे. निसर्गाकडून घेऊन निसर्गालाच देणे हेच आदिवासी कलेचे सूत्र आहे. चित्र असो किंवा शिल्प असो किंवा वस्तू असो परिसराशी सुसंवाद साधणारी निर्मिती हे प्रमुख वैशिष्ट्य आदिवासी कला अविष्कारात आपल्याला जाणवेल.

भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या समृध्दतेमागे आदिवासी कलेचा मोठा आधार आहे. आजच्या नागरी जीवनात कोणत्याही संस्कृतीच्या प्रभावापासून मुक्त, परंपरागत चालत आलेले निसर्ग प्रेम, सहज उपलब्ध साहित्यातून झालेला उत्स्फूर्त आविष्कार म्हणजेच आदिवासी कला असे या कलेचे सोपे समीकरण मांडता येईल. महाराष्ट्राला आदिवासी कलांचा समृध्द वारसा लाभलेला आहे. त्यात वारली चित्रे, लाकडी कोरीव काम, मुखवटे, मृणमूर्ती, धातूकाम, पाषाणमूर्ती, वाद्य, शिकारीची साधने व इतर कलात्मक वस्तू यांचा समावेश होतो. आदिवासी कलांचा हा वारसा निश्चितच वरच्या दर्जाचा आहे.

भारतीय प्रागैतिहासिक काळातील गुहाचित्रांत शिकारीची दृश्ये वा प्राण्यांचे चित्रण प्रामुख्याने दिसते. कारण शिकार हीच आदिवासींच्या दैनंदिन जीवनातील त्याकाळी मुख्य गरज होती. शिकार मिळण्याची उपलब्धता कालांतराने जसजशी दुर्लभ होऊ लागली. तसा तसा मानव निसर्गातील उद्‌भूत व अज्ञान शक्तीचा शोध घेऊ लागला व या शक्तीला प्रसन्न करुन घेण्यासाठी व वश करण्यासाठी गुहांच्या भिंतीवर चित्रे काढू लागला. नंतरच्या काळात केवळ शिकार हीच मानवाची गरज राहिली नाही. कालांतराने त्याला शेतीसारखी बाब आत्मसात झालेली होती. त्यांच्या दैनंदिन जीवनातील संघर्ष कमी झालेला होता. अन्न मिळविण्यातील संघर्ष व असुरक्षितता कमी होऊन अन्नाची गरज सहज भागू लागलेली होती. त्यामुळे या काळात चित्राचा हेतू बदललेला दिसतो. आता देवतांना संतुष्ट करणे व त्यांचा कोप टाळणे ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली होती. दैनंदिन कामाच्या व्यापातून सवड

मिळाल्यावर त्याची सृजनता पुन्हा बहरु लागली. अधिक समृध्दता मिळण्याच्या दृष्टीने त्याचे प्रयत्न सुरु झाले. ज्या निसर्गातून त्याला हे सारं मिळत होत तो निसर्गच त्याचा देव बनला. मोठे शिलाखंड, खळखळणारं पाणी, कोसळणारा पाऊस अशा प्रत्येक निसर्गाच्या आविष्काराला तो देव मानू लागला व त्याला संतुष्ट करण्यासाठी आदिमजनांनी चित्रकलेचा प्रामुख्याने आधार घेतला. पुजा–अर्चा, नृत्ये, दैनंदिन कामे, आजुबाजुचा निसर्ग या सगळ्यांचे प्रतिबिंब त्यामुळे त्याच्या चित्रात प्रगट होऊ लागले.

**वारली चित्रकला :–**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, मोखाडा तालुक्यातील छोटी गावे / पाडे हे वारल्यांचे वसतिस्थान. त्यांची चित्रकला धार्मिक, गुढ व सांकेतिक स्वरुपाची आहे. प्रागैतिहासिक काळातील आदिम कलेचा प्रभाव या कलेवर आहे. आदिम कलेचे मूळ बीजच विकसित स्वरुपात आपणाला या चित्रकलेत दिसते. चित्र निर्मितीचा मुख्य हेतू धार्मिक समारंभ, सण याशिवाय रोगराईचे निवारण, समृध्दी, मुलाबाळाचे, घराचे संरक्षण यासाठी ही भित्तीचित्रे निर्माण केली जातात. क्वचित काही वेळा सुशोभन हा हेतूही असतो. शेणामातीने सारवलेल्या भिंतीवर तांदुळाच्या आंबवलेल्या पिठाच्या द्रावणाने ही चित्रे रेखाटली जातात. गवताची व बांबूची पातळ काडी चित्रकाम करण्यासाठी वापरली जाते. आवश्यकतेनुसार रंग वापरले जातात. (शेंदूर, राख, हळद, कूंकू) विविध देवदेवता, निसर्ग, पशुपक्षी, मानवाकृती, दैनंदिन जीवनातील वेगवेगळे प्रसंग, पुराणकथा, दंतकथा यावर आधारीत विषयांचे चित्रण या चित्रकलेत केले जाते. प्रथम आरेखन व नंतर छायांकित पध्दतीने सपाट रंगविणे. त्रिकोणी आकाराचा वापर करुन मानवाकृती पशुपक्ष्यांचे चित्रण करणे, लालित्यपूर्ण मांडणी करणे हे या कलेचे तंत्र म्हणता येईल. वारली चित्र शैलीत सांकेतिक व गुढता असणारे वर्णनात्मक चित्रण प्राधान्याने आढळून येते.[१४]

भिंतीवर चित्र काढण्याची व रंगविण्याची कला ही आदिवासी वारली स्त्रियांची कला म्हणून समजली जाते. या कलेचे शिक्षण प्रत्यक्ष कुठेच दिले जात नाही. परंपरेने निरिक्षणातून ही कला वारली कलाकार शिकत असतात. चित्रकलेची त्यांची ही परंपरा अलिखित परंपरा आहे. मागच्या पिढीकडून

पुढच्या पिढीकडे ती परंपरेने चालत आलेली आहे. विशेषतः ज्या कुटूंबात 'भगत' व 'धवलेरी' ची परंपरा आहे. अशा कुटुंबांनी श्रध्देने ही चित्रकला जोपासलेली आहे. ही कला जोपासावयाची व चालवायची, अशा वारली कुटूंबाना रुढी, परंपरा, चालीरीती आणि संस्कृती धर्माची चांगली माहिती असावी लागते. कारण वारली चित्रकला ही निव्वळ चित्रकला नसून ती एक चित्र संस्कृती आहे. वारली संकृतीचा तो एक निखळ आरसा आहे.

प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये भगत असतो. देवदेवतांची पुजा विधी करणे, मंत्रतंत्राच्या साहाय्याने त्यांच्याशी वेळप्रसंगी सुसंवाद प्रस्थापित करणे. ह्या व अशा अनेक भूमिका तो पार पाडत असतो. वारली लोकात धवलेरीला व भगताला त्यांच्या शिष्यांना चित्रांचा विषय सुचवून मार्गदर्शन करण्याचे काम करावे लागते. चित्र कोणत्या पध्दतीने व कशा स्वरुपाचे काढावयाचे हे प्रसंगाचे महत्त्व, विधिचे गांभीर्य व गरज लक्षात घेऊन भगत व धवलेरी ठरवत असतो.

**वारली चित्रकार व केलेचे संवर्धन :-**

ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींची चित्रकला ही त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. भोळ्या भाबड्या वारलीच्या खडतर जीवनातला तो एक आनंदाचा क्षण असतो. त्याचे वेगळे जग रीतीरिवाज, सण, उत्सव, लग्नविधी, दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंग नकळत कुडाच्या भिंतीवर साकार होत जातात. वारली लोकांचे सांस्कृतिक जीवन व सभोवतालच्या निसर्ग यांच संमिश्रण त्याच्या कलाकृतीत प्रतिबिंबित होते. जुने-नवे असे अनेक कलावंत वारली प्रदेशात या परंपरेचे जतन करत आहेत. या परंपरेचा प्रणेता प्रख्यात वारली चित्रकार श्री. जिवा सोमा म्हसे हे होत.

वारली चित्रकलेच्या प्रांगणातले आपण होतकरु कलाकार आहोत. याची जाणीवही वारली कलाकारांना होऊ लागली आहे. पूर्वीची त्यांची जुनी जीवनपध्दती त्यांना या विचाराकडे फिरकू देत नव्हती. त्यामुळे ते आपली कला जगासमोर स्वतः ठेवू शकत नव्हते. त्यांच्या ह्या कला भास्कर कुलकर्णी, पुपूल जयकर यांनी प्रथम उजेडात आणली व भारत महोत्सवासारख्या महोत्सवात चित्रकलेसाठी वाहून घेतलेल्या काही लोकांनी वारली कलाकारांची चित्रे उजेडात आणली व

जगभरातील लोकांना महाराष्ट्रातील या वैशिष्ट्यपूर्ण चित्रकलेची ओळख करुन दिली. आज वारली चित्रकलेला सर्वत्र महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जगभरातील प्रमुख संग्रहालयात आता वारली चित्रकला व प्रदर्शित झालेली आहे. प्रसिध्द वारली चित्रकार श्री. जिवा सोमा म्हसे यांनी या चित्रकलेची प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी इंग्लंड, नार्वे, फ्रान्स, जर्मनी या देशांचा दौरा केला आहे. जिवा सोमा म्हसे यांच्या परंपरेत तयार झालेले अनेक तरुण कलाकार या क्षेत्रात नाव कमावत आहेत. त्यात कृष्णा जेठ्या पसारी, बाळू लाडक्या दुमाडा, नथू देऊ सुतार, राजेस चेत्या बांगड, मानकी बापू वायडा, चिंतु देऊ कडू, रत्ना बुध्या धुळसाडा, दामा मंगळ्या देसक, शांताराम तुंबडा, कांजीभाई सोमजीभाई, रत्नाभाई, बाबूभाई, बाळू जिवा म्हसे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

आज या चित्रकलेने गावाच्या सीमा ओलांडल्या आहेत. एवढेच नाही तर परदेशातही वारली चित्रकलेची प्रदर्शने होऊ लागली आहेत. फ्रान्समधील लिऑन शहरात टोनी गार्नियरच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या म्युझियमच्या एका भिंतीवर वारली चित्राने जागतिक चित्रकलेत मानाचे स्थान मिळवले आहे. टोनी गार्नियर हा लिऑन शहराचा जनक. या गावाचे शहर करण्याचे काम १९२० ते १९३० च्या दरम्यान त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. येथील म्युझियमच्या सहा मजली इमारतीमध्ये लावण्यासाठी जगभरातील वेगवेगळ्या चित्रांची निवड करण्यात येणार होती. त्या चित्रांच्या निवडीसाठी 'पेट्रीट कॉमेसी' भारतात आले असता त्यांनी दिल्ली ते डहाणू अशी शोधयात्रा काढली. त्यात त्यांनी अनेक आदिवासींच्या भिंती डोळ्याखालून घातल्या व शेवटी श्री. शांताराम तुंबडा या तरुण वारली चित्रकाराच्या चित्राची निवड केली. आज श्री. शांताराम तुंबडा यांचे हे चित्र मेक्सिकन चित्राच्या समोर या म्युझियममध्ये मानाने झळकत आहे. १९८४ साली हस्तकला विभागाचा राज्य पुरस्कार नथु देऊ सुतार या वारली चित्रकाराला मिळालेला होता. वर उल्लेख केलेल्या नामवंत चित्रकाराच्या चित्राची आजपर्यंत अनेक प्रदर्शने पुणे, नागपूर, नाशिक, मुंबई, दिल्ली, भोपाळ, बडोदा येथे आयोजित करण्यात आली आहेत.

एकूणच आदिवासी वारली समाजातील चित्रकारांनी आपली कला संस्कृती चित्रकलेच्या माध्यमातून गाव, राज्य वा देशापुरती मर्यादित न ठेवता तिला जगमान्यता मिळवून दिल्याचे दिसून येते.

**आदिवासी विवाह :–**

आदिवासी जमातीमध्ये मुलामुलींची लग्ने वयात आल्यावर म्हणजे १६–१७ व्या वर्षी होतात. आदिवासी जमातीमध्ये बहुपत्नीत्वाची पध्दत रुढ आहे. घटस्फोटाची प्रथाही सर्व जमातीत रुढ आहे. त्याचप्रमाणे स्त्री पुरुषांना पुनर्विवाहालादेखील या समाजात पूर्ण वाव आहे.

बिगर आदिवासी समाजाचा सहवास लाभल्यामुळे आदिवासी समाजामध्ये लग्नासाठी खूप खर्च होऊ लागला. हा खर्च करण्यासाठी सावकारांचे, जमिनदारांचे पाय आदिवासींना धरावे लागतात. वयाच्या १६ व्या वर्षापासून आदिवासी लोक लग्नगडी म्हणून सावकारांकडे आयुष्यभर राहतात. या लग्नगड्याला पैसे फेडण्यासाठी अत्यंत त्रास सहन करावा लागे. त्यांच्यावर खूप अन्याय केला जात असे. हा अन्याय थांबला पाहिजे असे तरुण आदिवासींना वाटायचे मात्र मार्ग सापडत नव्हता. कालांतराने या लग्नगड्याची चर्चा आदिवासी क्षेत्राबाहेर होऊ लागली. या चर्चेत सामाजिक कार्यकर्ते सहभागी होऊ लागली. लग्नगडी व वेठबिगार या विषयावर बुध्दीवाद्यांनी चर्चासत्र घडवली. बुध्दीवाद्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आदिवासी क्षेत्राबाहेर व आदिवासी क्षेत्रात कार्यकर्ते व ग्रामस्थ यांच्यात जाणीवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कार्यकर्ते व ग्रामस्थ यांच्या विचारातून आदिवासींना या वेठबिगार आणि लग्नगडी या प्रथेमधून सोडविण्यासाठी सामुदायिक विवाहाची संकल्पना पुढे आली. या संकल्पनेला सावकार व जमीनदारांनी तीव्र विरोध केला. पण सामाजिक कार्यकर्ते व बुध्दीवाद्यांनी त्यांची पर्वा केली नाही. त्या सावकारांचा व जमिनदारांचा विरोध गावातील व परिसरातील आदिवासी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोडून काढला. त्याच दिवशी एका वेळेला त्या परिस्थितीत आदिवासींच्या पध्दतीनुसार चौदा विवाह एकत्रित लावण्यात आले. या कार्यक्रमासाठी काळूराम दोधांडे यांचे योगदान फार महत्त्वाचे होते. १९७७ साली सुरु केलेल्या सामूदायिक विवाह कार्यक्रम आता आदिवासी लोकासांठी किंवा आदिवासी परिसरासाठी न राहता याची व्याप्ती बिगर आदिवासी लोकांसाठी किंवा आदिवासी परिसरासाठी न राहता याची व्याप्ती बिगर आदिवासी भागातसुध्दा पसरत आहे.[१५]

आदिवासी क्षेत्रात लग्नाचा मौसम सुरु झाल्यावर स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्या सहकार्याने आदिवासी भागात सामुदायिक विवाह ही आता चळवळ झालेली आहे. ही चळवळ प्रभावी असून आदिवासींचे आत्मभान जागवणारी व त्याला आत्मनिर्भयतेकडे नेणारी ठरत आहे.

**आदिवासींचे आरोग्य, शिक्षण व बोलीभाषा :–**

आदिवासी जमाती ह्या दुर्गम भागात व जंगल दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे वर्षातून कित्येक दिवस आदिवासींना शुध्द, स्वच्छ व भरपूर पाणी मिळत नाही. अपुरा व निकृष्ठ आहार, अस्वच्छ पाणी यामुळे मलेरिया, हगवण, क्षय, ताप, पोटाचे विकार, कातडीचे रोग यांच्याशी त्यांना सामना करावा लागतो. रोगराई संदर्भात त्यांच्या कल्पना ह्या परंपरागत व भ्रामक आहेत. डॉक्टरांच्या औषधांपेक्षा भगताच्या अंगाऱ्या धुपाऱ्यावर त्यांचा अधिक विश्वास आहे. त्यांची अघोरी धार्मिकता व पिशाच्च पुजा यामुळे रोगाच्या साथीत आदिवासी लोकांची फार मोठी हानी होते. ठाणे, अमरावती, धुळे, नंदुरबार जिल्ह्यात कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण बरेच आढळते.

गेल्या अनेक वर्षापासून आदिवासी विभागात अनेक सामाजिक संस्थांनी व शासनाने चालविलेल्या आश्रमशाळा, शैक्षणिक प्रगतीसाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत. तरी देखील आदिवासी विभागातील शिक्षणाची प्रगती समाधानकारक नाही. त्याला मुख्यतः पालकांची व शासनाची उदासिनता, लोकांचे अज्ञान व गरिबी ही कारणे आहेत. आदिवासी मुलांचे शिक्षण या दुष्ट चक्रातून अद्याप बाहेर पडलेले नाहीत. काही जमातीमध्ये अलिकडे शैक्षणिक जागृती वाढत आहे. आदिवासी विभागात आश्रमशाळा, समूह केंद्र, निवासी केंद्रशाळा, आदिवासी मुला–मुलींसाठी वसतिगृहे, बालवाड्या, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या वाढत आहे. शाळेत जाणाऱ्या व शिक्षण घेणाऱ्या मुलांचीही संख्या वाढत आहे. गेल्या ६० वर्षात साक्षरतेचे प्रमाण ६ टक्क्यावरुन ४५ टक्क्यांपर्यंत वाढलेली आहे.

### तक्ता क्र. २.२

### इ. स. १९८१ ते २००१ या काळातील महाराष्ट्रातील आदिवासींची साक्षरता दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | विभाग / जिल्हा | साक्षरता प्रमाण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९८१ जनगणना | | १९९१ जनगणना | | २००१ जनगणना | |
| | | एकूण | आदिवासी | एकूण | आदिवासी | एकूण | आदिवासी |
| | **महाराष्ट्र राज्य** | ४७.१८ | २२.२९ | ६४.८७ | ३६.७७ | ७६.८८ | ५५.२१ |
| १ | **कोकण विभाग** | | | | | | |
| | मुंबई शहर | ६८.१८ | ४९.०७ | ८२.५० | ६८.२४ | ८६.४० | ८०.८१ |
| | मुंबई ग्रामीण | – | – | – | – | ८६.८९ | ८६.८३ |
| | ठाणे | ५०.५० | १४.४० | ६९.५० | २५.८४ | ८०.६६ | ४६.९१ |
| | रायगड | ४५.५९ | १६.४५ | ६३.९० | २५.७४ | ७७.०३ | ४५.०५ |
| | रत्नागिरी | ४७.७५ | १०.२६ | ६२.३० | ३२.२१ | ७५.०५ | ५१.२६ |
| | सिंधुदुर्ग | – | – | ७५.८० | ६२.४५ | ८०.३० | ७३.९४ |
| २ | **नाशिक विभाग** | | | | | | |
| | नाशिक | ४४.३६ | १६.७३ | ६२.३० | २९.८४ | ७४.३६ | ५०.६८ |
| | धुळे | ३७.५१ | १५.२५ | ५१.२० | २३.५९ | ७१.६५ | ४५.८८ |
| | नंदुरबार | – | – | – | – | ५५.७८ | ४२.३४ |
| | जळगांव | ४८.१४ | १९.९४ | ६४.३० | ३४.७० | ७५.४३ | ५२.२३ |
| | अहमदनगर | ४३.१६ | १६.८६ | ६१.०० | ३०.०५ | ७५.३० | ५३.८७ |
| ३ | **पुणे विभाग** | | | | | | |
| | पुणे | ५४.०३ | २७.८० | ७१.१० | ४४.२७ | ८०.४५ | ६२.२१ |
| | सातारा | ४८.१५ | २९.६६ | ६६.७० | ५२.३८ | ७८.२२ | ६५.०५ |
| | सांगली | ४६.८७ | ४०.१९ | ६२.६० | ५४.०५ | ७६.६२ | ७३.८६ |
| | सोलापूर | ४०.६८ | ३१.६४ | ५६.४० | ४७.६९ | ७१.२५ | ६३.७९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोल्हापूर | ४५.४० | ३४.३६ | ६६.९० | ६१.०६ | ७६.९३ | ७५.०५ |
| ४ | **अमरावती विभाग** | | | | | | |
| | बुलढाणा | ४४.६४ | २५.१५ | ६१.७० | ४१.४० | ७५.७८ | ५७.४२ |
| | अकोला | ४७.८२ | ३३.५७ | ६५.८० | ५१.०३ | ८१.४१ | ७०.४९ |
| | वाशिम | – | – | – | – | ७३.३६ | ६०.१० |
| | अमरावती | ५१.८२ | २५.६९ | ७०.१० | ४४.५७ | ८२.५४ | ६४.०७ |
| | यवतमाळ | ३९.२९ | २४.३५ | ५७.९० | ४१.४३ | ७३.६२ | ६२.१५ |
| ५ | **नागपूर विभाग** | | | | | | |
| | नागपूर | ५४.५६ | ४२.६३ | ७३.६० | ६२.२१ | ८४.०२ | ७५.९९ |
| | वर्धा | ५१.०५ | ३४.७७ | ६९.७० | ५५.४३ | ८०.०७ | ६९.१६ |
| | भंडारा | ४३.९२ | ३३.१३ | ६४.७० | ५१.९३ | ७८.४७ | ७३.२५ |
| | गोंदिया | – | – | – | – | ७८.५२ | ६९.७७ |
| | चंद्रपूर | ३४.६९ | २२.२७ | ५९.४० | ४७.३० | ७३.१७ | ६४.४१ |
| | गडचिरोली | – | – | ४२.९० | ३०.०० | ६०.१० | ४८.९८ |
| ६ | **औरंगाबाद विभाग** | | | | | | |
| | औरंगाबाद | ३५.८० | १६.८७ | ५६.९० | ३२.८६ | ७२.९४ | ५४.२४ |
| | जालना | – | – | ४६.२० | ३२.०८ | ६४.४० | ५५.५५ |
| | बीड | ३१.७९ | १७.६९ | ४९.८० | ३८.३८ | ६७.९९ | ६०.१२ |
| | परभणी | ३०.३३ | १६.७८ | ४७.६० | ३३.७८ | ६६.०७ | ५८.८३ |
| | हिंगोली | – | – | – | – | ६६.२५ | ५६.६४ |
| | नांदेड | २९.७८ | २०.५३ | ४८.२० | ३६.०९ | ६७.७७ | ५९.८६ |
| | उस्मानाबाद | ३५.३६ | २३.२१ | ५४.३० | ३९.४५ | ६९.०२ | ५८.३५ |
| | लातूर | – | – | ५५.६० | ४३.०९ | ७१.५४ | ६५.३२ |

(संदर्भ : देवगाकर एस. जी., आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २३ फेब्रुवारी २०११, पृष्ठ क्र. १९३–९४).[१६]

आदिवासी बोलीभाषेचा प्रश्न शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती निरनिराळ्या बोलीभाषा बोलतात. यात काही मराठीच्या बोलीभाषा आहेत तर काही स्वतंत्र बोलीभाषा आहेत. जनगणनेनुसार केवळ २०% आदिवासी चांगल्या प्रकारे मराठी बोलणारे व समजणारे आहेत अशी नोंद झालेली आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या माडिया–गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल जमातीच्या लोकांना मराठी भाषा बोलण्याची थोडीफार अडचण जाणवते. भाषेच्या अडचणीमुळे विकास कार्यात विचारांची देवाण घेवाण करण्यात काही अडचणी निर्माण होतात. मुले शाळेत जाऊ लागली की, शाळेतील शिक्षण समजण्याच्यादृष्टीने भाषेची अडचण त्यांनाही जाणवते.

**आदिवासींची आर्थिक स्थिती :**

महाराष्ट्रात आदिवासींची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. त्यांचे उपजिविकेचे साधन शेती, शेतमजूरी व जंगलकाम आहे. शेती व्यवसाय करणाऱ्यात स्वतःचे शेत असणारे, कुळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजूर असे गट दिसून येतात. कुळ कायद्यापूर्वी अनेक लोक शेतमजूर होते. कुळ कायद्याच्या आधारामुळे ते आता शेतमालक झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कायदेशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतराचा कायदा केल्यामुळे जे आदिवासी जमीनीला मुकले होते त्यांना जमीनी मिळवून ते पुन्हा जमीन मालक झालेले आहेत. आदिवासी समाजात शेतमजुरांची संख्या सुमारे ४० ते ४५ टक्के आहे. ज्या शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन आहे ते परंपरागत पध्दतीने शेती करतात. त्यामुळे शेतीतून बेताचेच उत्पन्न निघते. अत्याधुनिक शेती विकास योजनांचा फायदा अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही.

शेतीशिवाय दुसरा धंदा म्हणजे मजुरी, लाकूड वाहतुक, जंगलातील वस्तू गोळा करणे उदा. मध, डिंक, तेंडूची पाने, मोहाची फुले, कडीपत्ता, हिरडा, भेडा, शिकेकाई, जंगली फळे या व्यतिरिक्त रोजगार मिळवून देणारा दुसरा जोडधंदा नाही. ठाणे जिल्ह्यातील काही भागात गवत कापण्याचा व्यवसाय मिळतो पण तो फक्त दिवाळी नंतरच्या हंगामात तर गडचिरोली जिल्ह्यात तेंडूपत्ता तोडण्याचे काम २/३ महिने आदिवासींना मिळते. शेतीच्या व्यवसायात गुंतलेल्या आदिवासींची संख्या मोठी आहे. बहुसंख्य लोकांना जमीनी अपुऱ्या आहेत. अपुऱ्या जमीनीतून उत्पन्नही अपुरेच मिळते. त्याचा परिणाम उदरनिर्वाहासाठी आदिवासींना शासनाचे, बँकेचे, महामंडळाचे, सावकाराचे किंवा जमीन

मालकाचे कर्ज घ्यावे लागते. मूलतः उत्पादन कमी, अपुरा रोजगार, बाजारभावासंबंधीचे अज्ञान व त्याशिवाय सण समारंभाचे व लग्न विधीचे खर्च यामुळे कर्जावाचून त्यांना दुसरा पर्यायच नसतो.

अशा प्रकारच्या कर्जावर सावकार, धनिक, जमीन मालक भरगच्च व्याज आकारतात. पीक आल्यावर सावकार कमी भावाने त्यांची धान्य खरेदी करतात. व्याजाची रक्कम प्रथम वसूल केली जाते. मुद्दल तशीच राहते. पुढच्या वर्षी पुन्हा तेच चक्र फिरते असे चक्र अव्याहतपणे चालूच असते. त्यातून आदिवासींना बाहेर पडता येत नाही. आदिवासी लग्नासाठी कर्ज काढतो पण कर्ज फेडण्यासाठी नवऱ्या मुलाला सावकाराच्या वा जमिनदाराच्या घरी घरगडी म्हणून राहून त्यांची कामे करतो. त्याला लग्नगडी म्हणतात. सावकाराकडून कर्ज घेणे व फेडत राहणे हे पवित्र व प्रामाणिक कार्य आहे. अशी त्यांची मनोभूमिका आहे. सावकारांच्या दानतीवर त्यांचा विश्वास आहे. सावकारांनाही आदिवासींची मनोभूमिका चांगली माहित आहे. प्रसंगी कोणतेही तारण न देता तो आदिवासीला कर्ज देतो.

कर्जबाजारीपणातून आदिवासींना वाचविण्यासाठी व आदिवासी उपयोजनेच्या कार्यक्रमात आदिवासी सहकारी सोसायट्यांमार्फत आदिवासींना शेती विकासासाठी व खावटीसाठीही कर्ज देण्याची योजना सुरु करण्यात आलेली आहे. आदिवासींचा शेतीमाल खरेदी करण्यासाठी आदिवासी सहकारी सोसायट्यांची यंत्रणा उभी केली आहे. सावकार आदिवासींच्या ज्या गरजा भागवितो. त्या आदिवासी सहकारी सोसायट्यांनी भागवाव्यात व कर्जबाजार निर्मूलनाला मदत करावी अशी त्यात कल्पना आहे. आदिवासींचा शेतीमाल खरेदी करावा व त्यांच्या या शेतीमालाला योग्य भाव मिळवून द्यावा हा ही त्यामागील हेतू आहे. २७४ आदिवासी सहकारी सोसायट्या उपयोजना व म्हाडा क्षेत्रात स्थापन करुन २८ लाख आदिवासींना त्यांचा फायदा मिळत आहे. आदिवासी सहकारी विकास महामंडळाच्या नियंत्रणाखाली हे कार्य चालू आहे. आदिवासींचे शोषण थांबविण्यात व त्यांच्या मालाला योग्य किंमत मिळवून देण्यात महामंडळ यशस्वी झालेले दिसून येते.

आदिवासींच्या सामाजिक प्रश्नांबाबत म्हणायचे झाले तर त्यांच्या एकंदर राहणीमानात अलिकडे फरक पडू लागला आहे. बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंध वाढू लागला आहे. त्याचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर होऊ लागला आहे. कोकणा, महादेव कोळी, ठाकर, आंध ह्या जमातींनी

शेजारील समाजाच्या चालीरिती उचलल्या आहेत. इतकेच नव्हे तर त्यांनी आपला जूना धर्म सोडून हिंदू आचार विचार, पध्दती स्वीकारली आहे. इतरही जमाती या बदलात सामील होत आहेत.

वारली आदिवासी जमातीत पूर्वी धवलेरी गाणी म्हणून लग्न लावीत असे. परंतु आता ही प्रथा मागे पडत चालली आहे. काही जमाती अलिकडे भटजी किंवा ब्राम्हणांकडून मुहूर्त काढून लग्न लावू लागल्या आहेत. त्यांच्यात पिंडदानही होत आहे. आजारपणातही लोक भगताकडे जाण्याऐवजी डॉक्टरांकडे जाऊ लागले आहेत. थोड्याफार प्रमाणात स्त्रियाही बाळंतपणासाठी सरकारी दवाखान्यात जाऊ लागल्या आहेत. सुशिक्षित आदिवासींना न्याय–अन्यायाची लाज वाटू लागली आहे. जंगले तोडून शेती करण्याची पध्दती म्हणजे स्थलांतरीत शेतीची पध्दत बंद होऊन स्थिर व कायमस्वरुपी शेती करण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. सुधारित बी–बियाणे, खते, अवजारे यांची आवड आदिवासींमध्ये वाढू लागली आहे. आदिवासी आता आधुनिकतेच्या जवळ येऊ लागला आहे. ढोल किंवा झांजळी वाद्यांच्या तालावर हल्ली म्हटली जाणारी गाणी आधुनिक पध्दतीची वाटतात. जुनी गाणी लोप पावत आहेत. काही ठिकाणी शिक्षणाची उत्तम सोय होऊ लागली आहे. आदिवासींची मूले आश्रमशाळेत जाऊ लागली आहेत. धीट होऊ लागली आहेत. स्वच्छ कपडे घालू लागली आहेत. नाच–गाण्याइतकाच शिक्षणातही रस घेऊ लागली आहेत. आदिवासी नृत्यांनी जेवढा आनंद होईल त्याहून कितीतरी जास्त आनंद आश्रमशाळेतील तरतरीत मुलांच्या दर्शनाने होईल अशी स्थिती येऊ लागली आहे. आदिवासींच्या जीवनातील ही पहाट विलोभणीय आहे. आदिवासी स्त्री–पुरुषांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा भेकडभाव असतो. तो हळूहळू कमी होऊ लागला आहे. एकूणच आदिवासी जागा होण्याची सुप्रभात होत आहे.

आदिवासींचे संपूर्ण जीवन आता बदलू लागले आहे. हळूहळू त्यांच्यात देखील नवनिर्मितीची प्रक्रिया वाढत आहे. ठक्करबाप्पा, आचार्य भिसे, अनुताई वाघ यासारखी माणसे आता मिळणार नाहीत. माणुसकी असलेली, त्यांना जाणून घेणारी, त्यांच्या सुखदुःखाशी समरस होणारी माणसे आज त्यांना हवी आहेत. नव्या जाणीवा व नव्या चेतना देणाऱ्या नेतृत्त्वाची आदिवासींना आज खरी गरज आहे.

## २.४ आदिवासींच्या चळवळी :–

भारतात आदिवासी चळवळीविषयी विशेष चर्चा केली जात नाही. परंतु आदिवासी चळवळी ह्या भारतातील सामाजिक चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर व पाश्चात्य विचारांचा अभ्यास सुशिक्षित लोकांनी केल्यानंतर देशात सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. परंतु या सामाजिक चळवळीपूर्वीच आदिवासींच्या चळवळी निर्माण झाल्यात. एवढेच नव्हे तर इंग्रजांच्या विरुध्द स्वातंत्र्याची चळवळ ही आदिवासी क्रांतिकारकांनी सुरु केली होती. हीच बाब विशेष महत्त्वाची आहे. १९५७ पासून इंग्रजांविरूद्ध उठाव करण्यास प्रारंभ केला होता. इंग्रजांची सत्ता उलथून लावण्यासाठी आदिवासींनी अनेक बंड केले. परंतु या बंडाला त्यावेळी सभ्य समजल्या जाणाऱ्या लोकांनी मदत केली नाही. उलट तथाकथित सभ्य समाजातील जमीनदार, सावकारांच्या साहाय्याने इंग्रजांनी हे बंड मोडित काढले व आदिवासी क्रांतिकारकांचा अतोनात छळ केला. जर या आदिवासी चळवळीस या इतर लोकांनी सहकार्य करुन इंग्रजांविरूध्द आंदोलन केले असते तर इंग्रजांची सत्ता देशात प्रस्थापित झाली नसती. आदिवासींच्या चळवळी ह्या स्वाभिमान व स्वातंत्र्याच्या चळवळी होत्या. त्या चळवळी शोषण करणाऱ्यांच्या विरूध्द होत्या. भारतातील ह्या चळवळी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आदिवासी चळवळीचा अभ्यास करण्यापूर्वी सामाजिक चळवळीचा अर्थ जाणून घेणे आवश्यक वाटते.

### २.४.१ सामाजिक चळवळीचा अर्थ :

समाजात सतत परिवर्तने होत असतात. ही परिवर्तने आपोआप होत नाही तर त्यासाठी काही विशिष्ट कारणे जबाबदार असतात. समाजातील अनेक परिवर्तने ही व्यक्तीगत किंवा सामूहिक प्रयत्नाद्वारे घडवून आणलेली असतात. समाजात परिवर्तने घडवून आणण्यासाठी किंवा परिवर्तनास विरोध करण्यासाठी जे संघटितरित्या प्रयत्न केले जातात त्यास 'सामाजिक चळवळ' असे संबोधले जाते. किंवा परिवर्तन होऊ नये यासाठी देखील चळवळी निर्माण होतांना दिसतात. या चळवळीमध्ये निदर्शने, बहिष्कार व काही वेळा हिंसेसारख्या साधनांचादेखील अवलंब केला जातो. उदा.

अमेरिकेतील निग्रोंनी आपल्या चळवळीमध्ये बहिष्कार, निदर्शने व त्याचबरोबर हिंसात्मक मार्गाचा अवलंब करुन आपल्या प्रश्नाचे गांभीर्य गोऱ्या अमेरिकन लोकांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला जातो. एकंदरीत समाजात परिवर्तन आणण्यासाठी किंवा परिवर्तनास विरोध करण्यासाठी संघटित समूहाद्वारे जे प्रयत्न केले जातात. त्यास 'सामाजिक चळवळ' म्हणतात.

**व्याख्या :**

**१. हर्बर्ट ब्लूमर :**

यांच्या मते, सामाजिक चळवळ हा असा एक सामूहिक प्रयत्न आहे की, ज्यातून जीवनाची नवीन व्यवस्था निर्माण होते.[१७]

**२. टर्नर आणि किलिन :**

एखाद्या समाजात किंवा मानवी समूहात लोक सामूहिकरित्या आणि सातत्याने अशी कृती करीत असतात की, जी समाजात विरोध व परिवर्तने यांना चालना देते तिला 'सामाजिक चळवळ' असे म्हणतात.

**३. लुंडबर्ग आणि इतर :**

एका मोठ्या समाजातील अभिवृत्ती, वर्तन आणि सामाजिक संबंधामध्ये परिवर्तन आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणाऱ्या लोकांची समिती म्हणजे 'सामाजिक चळवळ' होय.

**४. पॉल विल्किन्सन :**

विचारपूर्वक सामूहिक प्रयत्नांद्वारे कोणत्याही दिशेने आणि हिंसा बेकायदेशीर कृत्य, क्रांती यापैकी कोणत्याही साधनांद्वारे परिवर्तनास प्रोत्साहन देणे म्हणजे 'सामाजिक चळवळ' होय.

वरील व्याख्यांवरून सामाजिक चळवळीचा अर्थ स्पष्ट होतो. सामाजिक चळवळ म्हणजे सामूहिक प्रयत्नांद्वारे समाजाच्या प्रचलित व्यवहार, विचार व सामाजिक संबंधामध्ये परिवर्तन घडवून आणणे होय. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे नवीन परिवर्तनास विरोध करण्यासाठी देखील सामजिक चळवळी निर्माण केल्या जातात.

## २.४.२ सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये :

### १. सामूहिक प्रयत्न :

सामाजिक चळवळ ही व्यक्तीगत स्वरुपाची नसते तर त्यासाठी सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे असतात. विशिष्ट समूहातील लोकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे परिवर्तन आणले जाते किंवा नवीन परिवर्तनास विरोध केला जातो. सामाजिक चळवळीत अनेक लोकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग असतो. सामाजिक चळवळीत सहभागी झालेले लोक सामूहिक प्रयत्न करतात. म्हणून सामूहिक प्रयत्न हे सामाजिक चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

### २. परिवर्तन आणणे किंवा परिवर्तनास विरोध :

सामाजिक चळवळीचा उद्देश हा प्रस्थापित समाजव्यवस्थेत परिवर्तन करणे किंवा समाजात होत असलेल्या नवीन परिवर्तनास विरोध करणे हा असतो. समाजातील रुढी, परंपरा, विचार किंवा सामाजिक संबंधात परिवर्तन करण्याची आवश्यकता असते. अशावेळी समाजात परिवर्तन करणे हा सामाजिक चळवळीचा उद्देश असतो. उदा. अस्पृश्यता नष्ट करणे, स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देणे, समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, विचार यांमध्ये बदल करणे इत्यादी गोष्टीसाठी सामाजिक चळवळी निर्माण केल्या जातात. कधी कधी समाजात होणारे नवीन परिवर्तन थांबविण्यासाठी देखील सामाजिक चळवळ उभारली जाते.

### ३. संघटित किंवा असंघटित चळवळ :

सामाजिक चळवळ ही संघटित किंवा असंघटित देखील असू शकते. अनेकदा सामाजिक चळवळ ही संघटित असते. लोकांमध्ये विशिष्ट प्रश्नासंदर्भात जागृती घडवून आणण्यासाठी देखील संघटीत प्रयत्न केले जातात. त्याकरिता संघटनासुध्दा स्थापन केली जाते. मजुरांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी किंवा समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी संघटना स्थापन करुन व्यापक प्रमाणात सामाजिक चळवळ केली जाते तर कधी कधी एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात उत्स्फूर्तपणे सामाजिक चळवळ निर्माण होते. अशा चळवळी या बहुतेक असंघटित असतात.

### ४. शांततापूर्ण किंवा हिंसात्मक मार्ग :

सामाजिक चळवळ ही शांततेच्या मार्गाने उभारली जाते. कोणत्याही हिंसात्मक मार्गाचा अवलंब न करता लोकांमध्ये जागृती निर्माण करुन सामाजिक चळवळ राबविली जाते. परंतु जेव्हा शांततेच्या मार्गाने चळवळीचे उद्दिष्ट साध्य होत नाही. प्रस्थापित वर्ग अशा सामाजिक चळवळीचा प्रखर विरोध करते. तेव्हा मात्र सामाजिक चळवळीमध्ये हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला जातो. उदा. रशियन क्रांती, महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ.

### ५. अनिश्चित कालावधी :

सामाजिक चळवळीचा उद्देश निश्चित नसतो. जर एखाद्या प्रश्नांकरिता निर्माण झालेल्या चळवळीचा उद्देश लवकर साध्य झाला तर ती चळवळ लवकर संपुष्टात येईल. परंतू चळवळीचा उद्देश लवकर साध्य होईलच याची निश्चिती नसते. काही वेळा चळवळी दिर्घकाळपर्यंत अस्तित्त्वात असतात. अमेरिकेतील निग्रो लोकांना नागरीक हक्क मिळावे यासाठी अस्तित्त्वात असलेली चळवळ अनेक वर्षापासून सुरु होती. काही वेळा चळवळीचा उद्देश साध्य होत नाही. हे बघून अनेक लोक निराश होतात. त्यामुळे चळवळीमधील आपला सहभाग देखील कमी करतात. चळवळीला जर गतिमान नेतृत्त्व मिळाले तर चळवळीला व्यापक स्वरुप प्राप्त होते व दिर्घकाळपर्यंत ती राहू शकते. जर अचानक

चळवळीचे नेतृत्त्व करणाऱ्या नेत्याचे निधन झाले तर ती चळवळ विस्कळीत होण्याची शक्यता असते. म्हणजेच सामाजिक चळवळीचा एक निश्चित कालावधी नसतो. सामाजिक चळवळ ही दिर्घकाळपर्यंत अस्तित्त्वात राहू शकते. अथवा ही चळवळ लवकर नष्ट होण्याची शक्यता असते.

अशा प्रकारे वरिल वैशिष्ट्यांवरुन सामाजिक चळवळीचे स्वरुप स्पष्ट होते.

## २.४.३ आदिवासी चळवळ : अर्थ व कारणे :–

बहुतांश आदिवासी लोकांचा सहभाग असणारी आणि आदिवासी लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी सुरु असणाऱ्या चळवळींना 'आदिवासी चळवळ' असे संबोधले जाते. सामान्यतः अशा चळवळीचे नेतृत्त्वदेखील आदिवासी व्यक्तीकडेच असते. आदिवासी चळवळीत गैर आदिवासी लोकांचाही सहभाग असतो. मात्र त्यांची संख्या अत्यंत कमी असणार हे निश्चित आहे. काही स्थानिक शास्त्राचे अभ्यासक आदिवासी चळवळीचा उल्लेख आदिवासींचा विद्रोह, आदिवासींचा असंतोष, आदिवासींची बंडाळी अथवा आदिवासींचा सशस्त्र उठाव यासारख्या नावानेही करतात.

**आदिवासी चळवळीची कारणे किंवा घटक :**

आदिवासी चळवळीचा अभ्यास करतांना असे दिसून येते की, त्यांचा सभ्य समाजाशी संपर्क नव्हता तोपर्यंत त्यांच्यात चळवळी निर्माण झाल्या नव्हत्या. भारतात इंग्रजांची राजवट आली व आदिवासी क्षेत्रामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सामाजिक सेवेच्या माध्यमातून धर्मप्रसाराचे काम सुरु केले. त्यामुळे आदिवासींमध्ये लहान मोठ्या चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीची तीव्रता वेगवेगळ्या आदिवासी जमातीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची राहिली.

बी. के. राय, बर्मन यांनी आदिवासींमध्ये चळवळी का निर्माण झाल्यात? याविषयी काही आधार सांगितले असून ते पुढीलप्रमाणे आहेत.[१८]

१. नैसर्गिक आवाजाची गोपनियता भंग होण्याच्या भीतीने निर्माण झालेली चळवळ.

२. नैसर्गिक साधनांवर आपले स्वतःचे नियंत्रण नष्ट झाल्याच्या भितीने निर्माण झालेली चळवळ.

३. संपूर्ण सामाजिक आंतरक्रियांच्या संरचनेमध्ये त्यांची परंपरागत परिस्थिती व भूमिकेस धक्का लागण्याच्या भितीने निर्माण झालेली चळवळ.

४. आपला समाज व सरकार यांच्यातील संबंधाचा नवीन धर्म शोधण्याच्या संदर्भातील चळवळ.

५. व्यक्ती व समाज यांतील संबंधाचा नवीन अर्थ शोधण्याच्या संदर्भातील चळवळ.

६. आपला समाज व समुदायाची स्वतंत्र ओळख कायमस्वरुपी टिकून ठेवण्याच्या प्रयत्नांच्या संदर्भातील चळवळ.

७. आपल्या क्षेत्राच्या साधनांवर आपल्या समुदायाचे नियंत्रण कायमस्वरुपी ठेवण्याबाबतची चळवळ.

८. प्रत्येक पातळीवर आपल्या समुदायावरील अधिकाधिक सत्ता किंवा स्वायत्तता प्राप्त करण्याबाबतची चळवळ.

कोणतीही चळवळ ही सहज निर्माण होत नाही. चळवळ निर्माण होण्यासाठी काही विशिष्ट घटक किंवा कारणे जबाबदार असतात. आदिवासींची चळवळ निर्माण होण्यासाठी काही घटक व कारणे जबाबदार आहेत.

**आदिवासींच्या चळवळीची महत्त्वाची कारणे किंवा घटक हे पुढीलप्रमाणे आहेत.**

**१. सभ्य समाजाशी संपर्क :**

आदिवासींचा सभ्य समाजाशी संपर्क नव्हता तोपर्यंत त्यांच्यात चळवळी निर्माण झाल्या नाहीत. मात्र त्यांचा सभ्य समाजाशी संपर्क आल्यानंतर त्यांच्यात चळवळी निर्माण झाल्यात. म्हणून सभ्य समाजाशी आदिवासी लोकांचा संपर्क येणे हे आदिवासी चळवळीचे प्रमुख कारण आहे. इतर सभ्य समाजाशी आदिवासी समाजाचा संपर्क आल्यामुळे त्यांचा सभ्य लोकांच्या जीवनमानाशी परिचय झाला व त्यांच्यामध्ये अधिकारपूर्ण जीवनाच्या संदर्भात जागृती निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्या लक्षात आले की, आपल्या समाजात काही त्रुटी आहेत. त्या त्रुटी दूर करण्याच्या दिशेने संघटीत प्रयत्नांचे महत्त्व त्यांनी ओळखले म्हणून आदिवासी लोक देखील इतर सर्व समाजाच्या लोकांप्रमाणे हळूहळू संघटीत झाले व या संघटनेतूनच चळवळीचा जन्म झाला.

## २. नवीन शासनव्यवस्था :

इंग्रजांच्या शासनकाळापूर्वी भारतात प्रत्येक आदिवासी क्षेत्रामध्ये स्थानिक स्वशासन होते व आदिवासी लोक त्या स्थानिक स्वशासनाचे प्रमुख होते. ते आपल्या प्रथा परंपरेनुसार आपले शासन चालवित होते. त्यांच्यावर बाहेरच्या शासकाचा दबाव किंवा नियंत्रण नव्हते. परंतु इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर आदिवासींची स्थानिक स्वायत्तता संपुष्टात आली. इंग्रज शासनाने वेगवेगळे कायदे केले तर प्रशासन व्यवस्थेने त्यांच्यावर अनेक निर्बंध लावलेत. परंपरेने निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी लोकांना इंग्रजांचे नियंत्रण असह्य वाटू लागले. त्यातून त्यांच्या चळवळीचा उदय झाला.

## ३. आर्थिक शोषण :

आपल्या देशातील आदिवासी चळवळीचे प्रमुख कारण शासकीय व गैरशासकीय स्तरावरील आदिवासी लोकांचे आर्थिक शोषण होय. आदिवासी लोकांमध्ये उपलब्ध नैसर्गिक संसाधनांवर शासकीय नियंत्रण आहे. शासकीय संस्था या साधनांचा उपयोग आदिवासींच्या विकासासाठी न करता व्यावसायिक लाभासाठी मोठ्या प्रमाणावर करतात. त्यामुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये विशेष सुधारणा झाली नाही. त्यांना सतत गरिबी, उपासमार यासारख्या समस्या भेडसावत राहिल्यात. व्यापारी, सावकार, जमीनदार व ठेकेदार आदिवासींच्या अज्ञानाचा, भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण करीत राहिले. मात्र कालांतराने हा वर्ग आपले आर्थिक शोषण करीत आहे याची जाणीव आदिवासींना झाल्यामुळे त्यांच्यात हळूहळू असंतोष निर्माण झाला. त्या असंतोषातूनच आदिवासींची चळवळ निर्माण झाली.

## ४. ख्रिश्चन मिशनऱ्यांशी संबंध :

भारतीय आदिवासी अज्ञानी, साधे भोळे, गरीब व मागासलेले असल्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्म प्रसाराच्यादृष्टीने लोकांकडे आपले लक्ष केंद्रित केले. आदिवासी भागात दवाखाने

उघडले. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरु केल्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासींची सेवा करुन त्यांच्या मनात आपल्या विषयी व येशूविषयी आदर निर्माण केला व हळूहळू आदिवासी लोकांचे धर्मांतर घडवून आणणे सुरु केले. विविध आदिवासी जमातीच्या लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. शिक्षणामुळे त्यांच्यात जागृती निर्माण झाली. या जागृतीतून चळवळी निर्माण झाल्यात. काही आदिवासी जमातींनी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याला विरोध करण्यासाठी देखील चळवळी केल्याचे दिसून येते.

### ५. **शासनाचे वनधोरण :**

केंद्र व राज्यशासनाद्वारे चुकीचे वनधोरण लागू केल्यामुळे देखील आदिवासींमध्ये चळवळी निर्माण झाल्या आहेत. आदिवासी लोक हे जंगलात किंवा जंगलाच्या जवळपास निवास करतात. वनसंपत्ती हीच त्यांची सर्वांत मोठी संपत्ती आहे. वनसंपत्तीचे महत्त्व हे आर्थिक नव्हे तर भावनात्मक देखील आहे. कारण आदिवासी लोक आपल्या क्षेत्रामधील प्रत्येक झाडे व पशुपक्षांना ओळखतात. त्यांच्याशी प्रेम करतात. ते अनेक झाडाची पूजा करतात. परंतु शासनाच्या वनधोरणाने आदिवासी लोकांचा जंगल संपत्तीवर असणारा अधिकार संपुष्टात आला. त्यामुळे त्यांना शासनाच्या कायद्याप्रमाणे जीवन जगणे कठीण झाले. जंगल संपत्तीवरील आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित झालेल्या आदिवासी लोकांमध्ये विद्रोहाची भावना निर्माण झाली.

### ६. **संस्कृतीकरण :**

संस्कृतीकरण हे देखील आदिवासी चळवळीचे महत्त्वाचे कारण आहे. आदिवासी लोकांचा संपर्क एकीकडे हिंदू संस्कृतीशी व दुसरीकडे पाश्चात्य संस्कृतीशी आला. या दोन्ही संस्कृती परस्परांच्या विरोधी आहेत. जेंव्हा आदिवासी जमातीचे लोक हिंदू संस्कृतीचा स्विकार करतात तर काही लोक पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करतात. तेव्हा एकाच आदिवासी जमातीमधील दोन संस्कृतीच्या लोकांपुढे नवीन समाजाकडे सामाजिक, सांस्कृतिक समस्या निर्माण होतात. या समस्या नव्या चळवळीस जन्म देतात.

## २.४.४ आदिवासी चळवळीचे प्रकार :

भारतात १७७८ ते १९७१ या सुमारे २०० वर्षाच्या कालखंडात आदिवासींच्या ७० चळवळी झाल्या आहेत असे आदिवासी चळवळीचा अभ्यास करणारे राघवैया यांचे म्हणणे आहे. आदिवासी चळवळीचा अभ्यास करणारे पुस्तक त्यांनी १९७१ मध्ये लिहून प्रकाशित केले. म्हणून १९७१ पर्यंतच्या काळाचाच विचार केला आहे. मात्र १९७१ नंतरच्या कालखंडातही आदिवासी चळवळी सुरु झाल्या. त्या थांबलेल्या नाहीत. आदिवासींचे सर्व प्रश्नही सुटलेले नाहीत. यामुळे आदिवासी चळवळी यापुढील काळातही सुरु राहणार यात शंका नाही. ब्रिटीश शासन काळापासून आजपर्यंत झालेल्या आदिवासी चळवळींची नेमकी एकूण संख्या सांगणे अवघड आहे. भारतातील आदिवासी चळवळींचे स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे ब्रिटीश काळातील आदिवासी चळवळीत व स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळी अशा दोन भागात वर्गीकरण करता येईल.

**ब्रिटीश काळातील आदिवासींच्या चळवळी :**

ब्रिटीश काळात आदिवासींनी अनेक चळवळी उभारल्या होत्या. जमीनदार आणि सावकारांनी इंग्रज सरकारच्या सहकार्याने बिहार मधील राजमहल टेकड्यांच्या प्रदेशातील आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शोषण केले होते म्हणून येथील आदिवासींना जागृत करण्यासाठी व इंग्रजांकडून सुरक्षिततेची हमी मिळविण्यासाठी आदिवासींची ही चळवळ उभारली होती. ही चळवळ देशभर पसरू नये म्हणून बिहारमध्ये आदिवासींमध्ये वेगळा प्रदेश, वेगळा कायदा करण्यात आला. या प्रदेशाला वन्य जमातीचा प्रदेश असे नाव देण्यात आले. हा प्रदेश सामान्य कायद्याच्या कक्षेतून वगळून त्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला व त्या कायद्याप्रमाणे या भागाचा कारभार चालावा असे ठरले.

ईस्ट इंडिया कंपनीत सरकारने भारतातील एक एक प्रांत हस्तगत केला. त्यानंतर त्या त्या प्रांतातील आदिवासी जमातींनी वेगवेगळ्या कारणांसाठी चळवळी उभारल्या. ईस्ट इंडिया कंपनीला देशातील जमीनदारांनी, श्रीमंतानी मदतीचा हात देऊन इंग्रजांचा वरदहस्त प्राप्त केला व इंग्रजांनी मिळते जुळते घेऊन जमातीवरील आपले वर्चस्व कायम टिकवून ठेवले. आदिवासींच्या जमीनीवर त्यांनी बेकायदेशीर ताबा मिळविला होता. त्यामुळे आदिवासींमध्ये जमीनदार व इंग्रजांविषयी असंतोष

वाढत गेला. १७८६ ते १७९५ या काळात छोटा नागपूर विभागात 'संथाल' जमातीने १७९५ ते १८०० या काळात बिहार मधील 'चेरा' जमातीने लढे उभारले. इंग्रजांच्या वर्चस्वाखाली राजस्थानातील भिल्लांच्या जमिनी राजपूत जमीनदारांनी बळकावल्या होत्या. त्या मिळविण्यासाठी १८१२ मध्ये गुजरात व राजस्थान सीमा भागातील भिल्लांनी एकत्र स्वसन्मानाची चळवळ उभारली. १८१९ मध्ये ओरिसातील कोल्हान प्रदेशात आदिवासींनी सामाजिक चळवळ उभारली होती. या चळवळीला छोटा नागपूर विभागातील अनेक जमातींनी साथ दिली. चळवळीचे स्वरुप हिंसक बनले. पुढील अनर्थ टाळून आपल्यावर विश्वास बसावा यासाठी इंग्रजांनी या प्रदेशासाठी सामान्य कायद्याच्या कक्षेतून वगळलेल्या प्रदेशासाठी वेगळा कायदा करुन तेथील आदिवासींना प्रथमच संरक्षण दिले.

ईशान्य पूर्व भारतातील आदिवासी प्रदेशाकडे १८२० ते १८३२ या काळात इंग्रजांचे लक्ष वेधले गेले. या प्रदेशातील अनेक जमाती स्वतंत्र होत्या. या जमातीच्या लोकांचे स्वतंत्र प्रशासन होते. मात्र इंग्रजांनी त्या प्रदेशात प्रवेश करुन त्यांच्या कारभारात हस्तक्षेप सुरु केला. तेंव्हा सिंगपो, मिशीपी, लुशाई, डफला, खम्या, नागा, खासी, मिझो इ. जमातींनी इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष वाढला. इंग्रजांच्या हस्तक्षेपाविरूद्ध १८२५ ते १८४३ मध्ये शिंगपो जमातीने, १८२७ मध्ये मिशिमी जमातीने १८२९ मध्ये खासी जमातीने, १८३२ मध्ये अंगामा नागांनी, १८३५ मध्ये हफला आणि जंतिया टेकड्यावरील जमातींनी, १८५५ मध्ये मिशिमी जमातीने, १८४२ व १८६० मध्ये लुशाई जमातीने, १८७१ मध्ये लाभा नागांनी, १८७४ मध्ये रेंगमा नागांनी आणि १९३० मध्ये सेमा नागांनी चळवळी उभारल्यात. इंग्रजांनी आपल्या प्रदेशात प्रवेश करु नये. जमातीची स्वायत्तता कायम टिकून रहावी यासाठी या प्रदेशातील आदिवासींनी चळवळी उभारल्या होत्या.[१९]

इ. स. १८३० ते १८३५ का काळ मध्य भारतातील आदिवासींनी उभारलेल्या चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. या काळात बिहारमध्ये कोल मुंडा व खारवार जमातींनी इंग्रजांच्या सत्तेविरुध्द व जमिनदारांविरूद्ध अनेक लढे दिलेत. १८३२ मध्ये 'संथाल' जमातीचे नेतृत्व 'गंगा नारायण' नावाच्या 'संथाल' आदिवासी नेत्याकडे होते. बिहारमधील मानभूम व बाराभूम जिल्ह्यात आदिवासी लोक जमीनदाराचे 'पाईक' म्हणून कसत असत. त्यातून त्यांना मालगुजारी कर भरावा

लागत नसे. इंग्रजांची सत्ता आल्याबरोबर जमिनदार व मालगुजार लोकांच्या 'पाईकान जमिनी' इंग्रजांनी जप्त केल्या व त्यावर कर बसविण्यात आले. त्यामुळे गरीब आदिवासींची उपासमार होऊ लागली. त्यातून भूमीज चळवळीचा उदय झाला. इंग्रजांच्या या दडपशाहीच्या विरोधा गंगा नारायणने 'भूमीज सेना' उभारली होती. परंतु १८३२ मध्ये भूमीज सेनेचा प्रमुख गंगा नारायण इंग्रजांकडून मारला गेल्यामुळे ही चळवळ संपुष्टात आली.

१८९० च्या सुमारास आंध्र प्रदेशात गोदावरी जिल्ह्यातील 'पहाडी रेड्डी' या जमातीने मालकी हक्कांचे पट्टे मिळविण्यासाठी चळवळ उभी केली होती. १८९७ मध्ये बिहारमधील बिरसा मुंडाची चळवळ देशभर गाजली. इंग्रज, जमिनदार व ख्रिश्चन मिशनरी यांच्या विरोधातील ही चळवळ होती. या चळवळीतून बिरसाने आदिवासी समाजाला नवीन शिकवणस दिली. आजच्या छत्तीसगड राज्यातील बस्तर जिल्हयातील 'गोंड' जमातीने १९१० मध्ये 'स्वायत्त राज्याच्या मागणीची चळवळ' उभारली होती. उराँव जमातीने १९१३–१४ साली ताना भगताच्या नेतृत्त्वाखाली ब्रिटिशांकडून सन्मानजनक न्याय मिळावा म्हणून अहिंसक चळवळ उभारली होती. याच चळवळीतून पुढे संथाली धर्मगुरुंच्या नेतृत्त्वाखाली छोटा नागपूर विभागात झारखंड प्रदेशाच्या स्वायत्त राज्याच्या मागणीसाठी चळवळ निर्माण झाली. १९२२ मध्ये आंध्र प्रदेशात अल्लूरी सीताराम राजू यांच्या नेतृत्त्वाखाली 'रम्पी चळवळ' व १९४०–४१ मध्ये आदिलाबाद जिल्ह्यात भीमू कुमरा गोंड यांच्या नेतृत्त्वाखाली गोंड व कोलाम जमातीची शेतकरी चळवळ निर्माण झाली.

**महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी :**

भारतात ब्रिटिशांची सत्ता आल्यानंतर पूर्वीच्या मुंबई राज्यातील भिल्ल, गोंड, महादेव कोळी ह्या जमातीचे हक्क काढून घेण्यात आले व त्यांच्यावर बंधने बसविण्यात आली. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये असंतोष निर्माण झाला. त्यातून आदिवासी जमातीने ब्रिटिशांविरूध्द बंड पुकारुन आदिवासी चळवळीचा उदय झाला. या आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध निर्माण करण्यात आलेल्या चळवळीपैकी प्रमुख चळवळी / उठाव पुढीलप्रमाणे –

## १. उमाजी नाईक :–

भारतातील आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक हे आहेत. इंग्रजांविरूद्ध सर्वप्रथम सशस्त्र लढा उमाजी नाईकांनी दिला. हा इतिहास सूर्यप्रकाशाइतकाच सत्य आहे. उमाजी तलवार, दांडपट्टा फिरविण्यात तरबेज होते. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी सर्वशक्तीनिशी पुण्यावर स्वारी केली. त्यात पेशव्यांचा पराभव झाला व पुण्याचा मुलुख ताब्यात घेतला. त्यावेळी पुरंदरवर रामोशांचा दबदबा होता. पेशव्यांनी पुरंदर ताब्यात देण्याचे आदेश किल्लेदारांना दिला. मात्र रामोशी किल्लेदारांनी त्यास नकार दिला व पेशव्यांच्या सैन्याशी दोन हात केले. मात्र त्यात अपयश आले. पेशव्यांना या रामोशांच्या कृतीबद्दल राग आला व त्यांनी छत्रपती शिवरायांनी रामोशींना दिलेले वतने, इनामे व ताम्रपत्रे रद्द केली. पेशव्यांच्या या कृतीला इंग्रजांनीसुध्दा आपल्या राज्यात कायम केले व इथेच विद्रोहाची पहिली ठिणगी पडली. या दोन सत्तांमुळे आपला मानसन्मान, उदरनिर्वाहाची साधने, अधिकार नष्ट झाले. याचा उद्रेक उमाजींच्या मनात झाला होता.

आपल्या जमातीला पुन्हा गुन्हेगारीला व लुटमारीला लावणाऱ्यांची सत्ता संपवायची व छत्रपती शिवरायांचे रयतेचे राज्य पुन्हा स्थापन करण्याची शपथ क्रांतीवीर उमाजी नाईक यांनी घेतली.

उमाजींनी प्रथम टोळी स्थापन केली. व्यापारी व सावकार यांच्या लुटालुटीचे सत्र सुरु केले. लुटीत मिळालेल्या पैशाचा वापर गरीबांच्या कल्याणासाठी करायचे. मात्र त्यातच उमाजींना इंग्रजांनी पकडले. त्यांना सक्त मजुरीची शिक्षा झाली.

तुरुंगातून सुटल्यावर उमाजी गप्प बसले नाहीत. त्यांनी परत क्रांतीकारकांची संघटना उभारली व पुण्याच्या भांबुर्डे येथील इंग्रजांचा सहा हजाराचा खजिना लुटला व प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे लुटली. इंग्रजांची झोप उडाली. त्यांनी गावोगावी इंग्रजांविरूध्द लढण्यासाठी कर बसविला. जनताही उमाजींच्या पाठींशी खंबीरपणे उभी राहिली. इंग्रजांची जुलमी राजवट नेस्तनाबूत करणे हे एकमेव ध्येय उमाजींचे होते.

क्रांतीवीर उमाजी नाईकांच्या चळवळीचा विस्तार, नाशिक, नगर, सातारा, पुणे व तळकोकणापर्यंत होता. उमाजींचे वाढते प्राबल्य पाहून इंग्रज अस्वस्थ झाले. त्यांनी उमाजींना पकडून

देणाऱ्यास १००० रुपये व ४०० बीघे इनाम जमिन बक्षीसी म्हणून जाहीर केले. या जाहिरनाम्यांनी व ओदशांनी उमाजी नाईक इंग्रजांच्या जाळ्यात सापडला व उमाजींवर १८३२ मध्ये जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुण्यात खटला सुरु झाला.[२०] शेवटी ३ फेब्रुवारी १८३२ मध्ये उमाजींना फाशी देण्यात आली. परंतु उमाजींच्या विचाराने व प्रेरणेने भविष्यात अनेक लढे उभे राहण्यास मदत झालेली दिसून येते.

## २. भागोजी नाईक :–

भागोजी नाईक यांचा जन्म भिल्ल कुटुंबात १८०४ साली झाले. त्यांचे वडील नांदूर शिंगोटे ता. सिन्नर जि. नाशिक येथे कोतवाल होते. घराच्या गरीबीमुळे लहानपणीच शिक्षणाला मुकलेले भागोजी गुरे, शेळ्या वाळण्याचे काम करीत असे. जनावरांच्या भटकंतीतच नेमबाजी, गलोल चालविणे, काठी फिरविणे, तिरकमान चालविणे कला त्याने आत्मसात केल्या. एकदा जंगलात वाघाला प्रतिकार करुन कुऱ्हाडीने मारुन ठार केले. हा त्याचा पहिला पराक्रम होता.

भागोजी नाईकाने नगर जिल्ह्यातील भिल्लांना संघटित करुन इंग्रजांविरूध्द १८५० ते १८५९ या दरम्यान चळवळ उभारली. टोळी करुन इंग्रजांचा खजिना लुटणे, सैन्याचे नुकसान करणे, जमिनी व वतनदाऱ्यांवरील हक्क प्रस्थापित करणे ही या चळवळीची मुख्य उद्दिष्ट्ये होती.

भागोजी नाईकांचा लढा देण्याची पध्दत इतकी वेगळी होती की, इंग्रज सत्तेला त्याचा मागमूस सापडत नसे. परंतु भागोजी नाईकांचा बंदोबस्त करणे इंग्रज सत्तेला गरजेचे होते. ऑक्टोंबर १९५७ मध्ये 'लेफ्टनंट हेन्री' भागोजी नाईकांवर चाल करण्यास सिध्द झाला. 'हत्यारे खाली ठेवून शरण या' असा आदेश त्याने भागोजीस दिला. मात्र भागोजीने त्याला दाद दिली नाही. हेन्ड्रीने भागोजीवर चाल केली. पहिल्याच माऱ्यात हेन्ड्रीच्या पाठीमागचा पोलिस ठार झाला. दुसऱ्या गोळीने हेन्ड्री ठार झाला. भागोजीचा असा प्रतिकार पाहून बाकी पोलिस ऑफिसरांनी माघार घेतली.

भागोजीने हेन्ड्रीचा पराभव केला ही बातमी ऐकून भिल्ल व महादेव कोळी बंडखोरात उत्साह वाढला. १८५७ साली स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात भागोजी नाईक व त्यांच्या सवंगड्यांनी

ठिकठिकाणी उठाव करुन इंग्रज सत्तेला घाम फोडला. भागोजीला जंगलाची खडानखडा माहिती होती. १८ फेब्रुवारी १८५८ रोजी येवला येथील किल्ल्यात भागोजीच्या टोळीवर मेजर पाँटीजर व कॅप्टन नट्टल यांनी अचानक हल्ला केला. याही धुमश्चक्रित भागोजीने इंग्रजांचा ४० सैनिकांना ठार केले व मोठ्या हिंमतीने आपली सुटका करुन घेतली.

५ जुलै १८५९ मध्ये संगमनेर जवळच्या 'दरा' येथे इंग्रज सैनिकांबरोबर भोगाजीची मोठी धुमश्चक्री झाली. त्यावेळी त्याचा मुलगा यशवंत मारला गेला. त्यामुळे भागोजी नाईक अधिक आक्रमक झाले. या लढाईत मुलगा गेल्याचे दुःख व हरजी नाईक यास इंग्रजांनी कैद करुन नेल्याचे दुःखही मनात होते. अपमानाचा बदला म्हणून २६ ऑक्टोंबर १८५९ रोजी भागोजीने अहमदनगर जिल्ह्यांतील कोपरगांव तालुक्यात कुऱ्हाळे गांव लुटून इंग्रज सत्तेवरचा सूड उगवला.

भागोजी सापडत नाही म्हणून इंग्रज सत्तेने भागोजीस पकडून देणाऱ्या किंवा खास बातमी देणाऱ्यास मोठ्या रकमेचे व जमीन इनामाचे बक्षीस जाहीर केले. १८५९ मध्ये नाशिक मध्ये नवीनच सुपरिडेंट म्हणून आलेल्या 'शाऊटरने' भागोजीवर करडी नजर ठेवली. भागोजीचे वय होत चालले होते. मात्र जिद्द तिच होती. उठाव, चकमक, धावपळ यातून विश्रांतीसाठी त्यांनी सांगवी ता. सिन्नर येथील संगामावरील बेटात राहत असलेल्या 'खंडेराव काळे' या मराठा समाजाच्या माणसाकडे मुक्कामाची जागा निवडली. मात्र मिठसागरे येथील एक ब्राम्हण भोगोजीवर नजर ठेवून होता. त्याने पाळत ठेवून १० नोव्हेंबर १८५९ च्या रात्री भागोजी आल्याचे पाहून पोलिसांना बातमी दिली. साऊटरने रातोरात बेटास वेढा दिला. सकाळी मार्गक्रमणासाठी भागोजी बाहेर पडतांनाच त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार सुरु केला. बंदुकीच्या दोन्ही बाजूंनी फैरीवर फैरी झडू लागल्या अखरे एका गोळीने भागोजीचा बळी घेतला. तो दिवस होता ११ नोव्हेंबर १८५९. त्यामुळे भागोजीच्या साथीदारांना आपला उठाव मागे घ्यावा लागला.[२१]

### ३. १८५७ चा पेठ येथील उठाव

सन १८५७ मध्ये आताच्या नाशिक जिल्ह्याच्या माळेगांव येथे राऊत घराणे पाटिलकी करीत होते. त्यावेळी पेठ येथे भाऊराजा (देशमुख–दिंडोरी) राज्य करीत होता. राजा देशमुख असला

तरी खरी सत्ता इंग्रजांची होती. इंग्रजांची सत्ता असणे हे कोणालाच मान्य नव्हते. त्यावेळी माळेगांव, पेठ, हरसूल, कोहोर अशी प्रमुख ठाणी होती. पेठ येथील भाऊराजाने इंग्रजांविरूध्द उठाव करण्याचे ठरवून सर्व प्रमुख ठाणेदारांना हा बेत कळविला. सर्व गावांच्या लोकांनी मदत करावी हे ठरले. या वातावरणाचा फायदा घेऊन डांगहून भिल्ल मंडळी पेठ येथे आली. पेठ येथे जाताना माळेगांवच्या अरतन पाड्यातील एका वाणी दुकानदाराला लुटले व नंतर पेठ येथे आले. पेठ येथे भाऊराजा व इंग्रज या दोघांचे खजिने होते. त्यापैकी भाऊराजांचा खजिना वगळून इंग्रज सरकारचा खजिना लोकांनी लुटला. त्यामुळे गोरासाहेब चिडला. त्यामुळे ठाण्याठाण्यातल्या मुख्य लोकांबद्दल त्याला संशय आला. त्यामुळे त्यात कुंभाळे, माळेगाव व बाऱ्हे येथील लोकांना त्या त्या ठिकाणीच फाशी दिली.

सन १८५७ च्या सुमारास माळेगाव येथे देवाजी रामजी राऊत हे पाटिलकीचे काम करीत होते. माळेगांवचे देशमुख हे त्यावेळी पाहुचीबारीचे जहागीरदार होते. पेठचा खजिना लुटीनंतर इंग्रजसाहेब पोलिसांची तुकडी घेऊन माळेगांव येथे आले. त्याने देवाजी पाटलांना आपल्याजवळ बोलावले. देवाजी पाटलांना काहीच कल्पना नव्हती व तेथेच देवाजी पाटलाला अटक करण्यात आली व त्यांच्या घरातील अन्न व गुरेढोरांची जप्ती केली. या आकस्मित घडलेल्या घडामोडींमुळे देवाजी पाटलाच्या घरातील मंडळी गोंधळून, घाबरुन गेली. देवाजी पाटलाला दुसऱ्या दिवशी फाशी देण्याचे ठरविले. मुले रडू लागली तेव्हा घरातील माणसांना त्याने सांगितले की, धान्य, गुरे गेली मात्र घर राहिले आहे. तुम्ही घराच्या आधाराने जगाल. आपल्या घराच्या माळ्यावर टोकरात (बांबूत) पैसे आहेत ते वापरा. हे बोलणे इंगज अधिकाऱ्याने ऐकले त्यामुळे घरही जप्त केले. चांदीचे ३००० पैसे होते तेही जप्त केले.

दुसऱ्या दिवशी देवाजी पाटलाला उंबरपाड्यात फासावर चढविले. त्यावेळी फाशीचा दोर तुटून देवाजी पाटिल जिवंत राहिला. त्याला पुन्हा फासावर चढवून ठार करण्यात आले. त्याचबरोबर राऊत घराण्याची पाटीलकी काढून माळेगांवचे वतन जप्त करण्यात आले. दिंडोरीचे राजे देशमुख यांना प्रमुख पाटिल मंडळीचा पाठिंबा होता. इंग्रजांनी सारा मुलुख बळकावला याची त्यांना खंत होती. राजे लोकांची राज्ये गेली. आपल्यावरही तीच पाळी येणार म्हणून तो बंडात सामील झाला व त्याने प्रमुख मंडळींना सांगितले की, साहेब आता सर्वांना बाटवून ख्रिस्ती करणार आहेत. त्यामुळे लोक बंडात सामिल झाले.

डांगहून आलेल्या भिल्लांनी देशमुखांना मदत केली. पेठचा भाऊराजा बंडात सामील झाला. त्याला इंग्रजांनी फाशी दिली.[२२]

नाशिक व डांग भागातील आदिवासींनी इंग्रजी सत्तेविरूद्धचा आपला संताप पेठ येथील बंडातून व्यक्त केला. यादृष्टीने महाराष्ट्रातील आदिवासींच्या इतिहासात पेठ येथील हे बंड महत्त्वाचे आहे..

### ४. होन्या केंगले :–

सन १८५७ नंतर सावकारांनी आदिवासी क्षेत्रात आपला सावकारीचा धंदा सुरु करुन त्यांनी कर्जबाजारी आदिवासींच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या. आदिवासी शेतकऱ्यांकडून कर्जापोटी शेतीचे उत्पादन सावकारच घेऊ लागले. त्यामुळे आदिवासींची अतिश वाईट अवस्था झाली. त्यांची उपासमार होऊ लागली. म्हणून सावकारशाहीचा बंदोबस्त करण्यासाठी पुणे जिल्ह्यात १८७४ मध्ये होन्या केंगले या आदिवासी नेत्याने महादेव कोळी जमातीचे लोक संघटित केले. इतकेच नव्हे तर त्यांनी हातात शस्त्र घेऊन पुणे, ठाणे, रायगड जिल्ह्यात सावकारांवर चांगला वचक निर्माण केला. होन्या केंगले आणि त्याच्या साथीदारांचा हा उठाव मोडून काढण्यासाठी सरकारने बंदोबस्त वाढविला. शेवटी १८७६ मध्ये सावकारांचा कर्दनकाळ होन्या केंगले आणि त्याच्या साथीदारांना नांदगांव (रायगड) येथे पकडून फाशी देण्यात आली. मात्र या चळवळीच्या माध्यमातून आदिवासींमध्ये सावकार व इंग्रजांविरूध्द तीव्र चीड निर्माण करण्यात होन्या केंगलेचा उठाव यशस्वी झाला.

के. एस. सिंग यांनी 'Tribal Society in India' या पुस्तकात स्वातंत्र्यापूर्वी म्हणजेच ब्रिटिश राजवटीतील आदिवासींच्या चळवळीचे तीन कालखंडात विभाजन केले आहे.[२३]

१. आदिवासींच्या चळवळीचा पहिला कालखंड म्हणजे १७९५ ते १८५७ हा कालखंड होय. भारतात ब्रिटिश सत्तेचा उदय होणे व त्यांच्या सत्तेचा विस्तार होण्याचा कालखंड होय.

२. आदिवासींच्या चळवळीचा दुसरा कालखंड म्हणजे १८५७ ते १९२० हा होय. इंग्रजी सत्तेचा जम बसविण्याचा हा काळ होता. याच काळात सावकारांच्या भांडवलाने आदिवासी अर्थव्यवस्थेत प्रवेश केला होता. ज्यामुळे जमीन व जंगलाशी असलेल्या आदिवासींचे अधिकार प्रभावित झाले होते.

३. १९२० ते १९४७ हा आदिवासी चळवळीचा तिसरा कालखंड होय. या कालखंडात आदिवासींनी पृथ्वकतावादी चळवळीबरोबरच त्यांनी राष्ट्रीय आणि शेतकऱ्यांच्या चळवळीत सहभाग घेतला होता.

वरिलप्रमाणे ब्रिटिश काळातील आदिवासी चळवळीचा आलेख सांगता येईल. ब्रिटिश काळातील आदिवासी चळवळीमधील काही जमातीच्या चळवळी महत्त्वपूर्ण आहेत. त्या चळवळी पुढीप्रमाणे आहेत.

## ५. संथाल चळवळ :–

संथाल लोक प्रामुख्याने बिहार व पश्चिम बंगालमध्ये आहेत. आसाम, मेघालय, ओरिसा, नेपाळ व बांग्लादेशात देखील संथाल जमातीचे लोक आहेत. संथाल लोक जंगलांना साफ करणे व शेतीकार्यात निष्णांत होते. म्हणून ते इतर क्षेत्रात जाऊन राहू लागले.

बिहारमध्ये संथाल परगणा निर्माण होण्यापूर्वी या क्षेत्रात पहाडिया आदिवासी जमातीचे शासन अस्तित्त्वात होते. पहाडिया जमातीचा राजा, सरदार, रावबहादूर हे सर्व मंडळी आपल्या मातृभूमीचे संरक्षण करण्यासाठी व आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी स्वतःच प्राणाची आहुती देण्यास तयार झाली होती. बिहारमधील राजमहल टेकड्यांमध्ये मोगलांचे शासन दुबळे झाले होते. पहाडिया जमातीने मोगलांना जेरीस आणले होते. या दरम्यान पहाडिया जमातीने मोठे युध्द केले. पहाडिया जमात स्वातंत्र्य जपण्यासाठी सतत संघर्ष करीत होती. इंग्रजांशी लढा देत होती. १७७० मध्ये पहाडिया सरदारांनी जमिनदार, जहागीरदारांना सकारागढ भागातून पळवून लावले होते. राजमल टेकड्यांच्या मार्गांनी तेलीया गढवरुन जो सरकारी खजिना जात येत होता त्याची पहाडिया सरदार लुटमार करीत होते तर सुलतानगंज राजशाही व वीरभूममध्ये संथाल लोक सरकारी खजिन्याची लुटमार करत होते.

१७७४ ते १७७८ पर्यंत पहाडी प्रदेशाचा गव्हर्नर कॅप्टन जेम्स ब्राऊन होता. त्याने पहाडी प्रदेशातील लोकांवर शासन करण्यासाठी एक योजना बनवली व ही योजना क्लीवलँन्डने १७७६ मध्ये पूर्ण केली. क्लीलॅन्डने चलाखीने पहाडिया जमातीचा विश्वास संपादन केला. पहाडिया सरदारांच्या

मदतीने मुस्लिम जमीनदार शासकांना दडपण्याची निती अवलंबिली होती तर पहाडिया क्षेत्रात त्यांना शह देण्यासाठी संथाल लोकांना मदत देऊन त्यांना बसविण्याचे काम इंग्रजांनी केले. सुरुवातीला पहाडिया व संथाल यांच्या चकमकी झाल्या. या क्षेत्रात संथालाची वस्ती वाढली. कालांतराने संथालांच्या लक्षात आले की, इंग्रज आपल्या शासनाचा विस्तार वाढविण्यासाठी पहाडिया व संथाल आदिवासींना आपसात लढवित आहेत. अशावेळी या परिसरात 'तिलकामांझी' हा संथाल जमातीचा तरुण नेता इंग्रजांविरुध्द लढण्यासाठी समोर आला. तिलकामांझीने सर्वप्रथम सर्व जाती-धर्मातील लोकांना संघटित करुन त्यांचा विश्वास संपादन केला व ब्रिटिश सत्तेचा नायनाट करण्याचा संकल्प मांझीने केला.

मांझीने साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेला समूळ नष्ट करण्याचा दृढ निश्चय केला होता. आपले उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी त्यांनी सर्वत्र विद्रोह सुरु केला होता. गंगा आणि ब्रम्हपूत्रा नद्यांच्या मधल्या जंगल तराई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात ब्रिटिशांसोबत मांझीने अनेक वेळा धुवांधार लढाया केल्या होत्या. एका बाजूला सेनापती क्लीवलँन्ड, सर आयरपूट यांचे नेतृत्व व दुसऱ्या बाजूला तिलका मांझी व त्याचीं संघटित सेना असा संघर्ष व्हायचा. सुरुवातीला प्रत्येक लढाईत तिलका मांझीने विजय मिळविला. १३ जानेवारी १७८४ चा तो संस्मरणीय दिवस! तिलाका मांझी ताडाच्या उंच झाडावर जाऊन बसला व घोड्यावर स्वार होऊन जाणाऱ्या क्लीवलॅन्डच्या छातीवर त्यांनी क्षणार्धात उंचावरुन धनुष्यबाणाने मारा केला व ब्रिटिश सेनेचा सेनापती मृत्यू पावला. त्याच रात्री अंधाराचा फायदा घेऊन आयरफूट व सेनापती जाऊराह यांनी तिलका मांझीच्या लोकांवर हल्ला केला. त्यात अनेक लोक मारले गेले. परंतु तिलका मांझी हाताला लागला नाही. अनेक वर्ष तो इंग्रजांशी व पहाडियांच्या सैन्याशी टक्कर देत होता. ज्या सुलतानगंजच्या पहाडाचा मांझीने आश्रय घेतला होता. त्याला इंग्रजांनी घेराव घातला. शेवटी पहाड सोडून मांझी व त्याच्या सेनेला मैदानात येऊन इंग्रजी सैन्याशी लढावे लागले. लढाई चालू असतांना धोक्याने तिलका मांझीला पकडण्यात आले व त्याला अतिशय क्रूरपणे मारले. तिलका मांझी हा स्वातंत्र्य लढ्यातील पहिला सेनानी होता.

इंग्रजांनी जंगल जमीनीचा बंदोबस्त केल्यामुळे संथाल लोक जमिनीपासून वंचित होते. त्यावेळी वेठबिगारी पध्दत होती. संथाल वेठबिगारी काम करीत होते. ते महाजनांच्या शेतात काम करीत होते.

मात्र त्यांना मजूरी दिली जात नसे. हटवादी जीवनभर कर्जातच रहायचे. जमीनदार, ठेकेदार, व्यापारी, राजस्व अधिकारी संथालांचे शोषण करीत होते. या लोकांना संस्थाल लोक 'डिकू' म्हणत असत. संथालांनी ब्रिटिश शासनाकडे तक्रार करुनही त्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. म्हणून संथाल आदिवासी जमातीने विद्रोह केला. महेशलाल दरोगा याने संथाल लोकांवर प्रचंड अन्याय केला होता. त्याच्याविरोधात सिध्दा व कान्ह या दोन बंधूच्या नेतृत्त्वाखाली १८५५ मध्ये ३० हजार संथालांनी सशस्त्र कलकत्ता येथे मोर्चा काढला. त्याचा सूड म्हणून त्यांनी त्याचे डोके धडापासून वेगळे केले. जमीनदार, सावकार व महाजन पळून गेलेत. संथालाचा भागलपूर व राजमहाल या भागात विजय झाला. सर्व भूभाग ताब्यात घेतला गेला. इंग्रज अधिकारी व मेजर पळून गेले. शेवटी ब्रिटिशांनी 'मॉर्शल लॉ' घोषित केला. ९ ऑगस्ट १८५५ पर्यंत संथाल व ब्रिटिश घनघोर युध्द झाले. त्यात ५० हजार संथाल मारले गेले. या चळवळीचे दूरगामी परिणाम झालेत. २२ डिसेंबर १८५५ ला 'XXXVII' अधिनियम पास झाला व संथाल–परगणा नावाचा नवा जिल्हा निर्माण करण्यात आला. वेठबिगारी प्रथेत सुधारणा, पोलिसांच्या वर्तनात परिवर्तन करण्यात आले. १८५६ मध्ये कान्हू व इतर संथालांना कैदेत टाकले. संथालांचा पराभव झाला तरी ब्रिटिशांना आपल्या धोरणात बदल करावा लागला हे विशेष महत्त्वाचे आहे. संथालांची चळवळ निघृणपणे दाबण्यात आली. मात्र ह्या चळवळीला राष्ट्रीयदृष्टीने महत्त्व होते हे मात्र नक्की.

## ७. **खारवार चळवळ :**

संथालांच्या चळवळीचा विस्तार नंतरच्या काळात असमान्य संथाली नेत्यांच्या रुपाने झाला. सुधारलेल्या संथाल लोकांची चळवळ म्हणजे खारवार चळवळ होय. 'भगीरथ मांझी' हे प्रमुख नेते होते. भगीरथ मांझी हे बाबाजी नावाने प्रसिध्द होते. ही चळवळ १८७१ मध्ये एकदम प्रकाशात आली. संथाल लोकांनी एकाच देवाची पूजा करावी. मी स्वर्णयुगाची पुर्नस्थापना करील अशा पध्दतीचा संदेश भगीरथ मांझीनी लोकांना दिला. त्यांनी जमिनीचा कर भरण्यास मनाई केली. खारवार चळवळीचा प्रभाव वाढू लागला. भगीरथ मांझीचा वाढता प्रभाव लक्षात घेता इंगजांनी त्यांना त्वरीत पकडून कैदेत ठेवले. जेलमध्ये त्यांचा मृत्यू झाला.

भगीरथ मांझीचा मृत्यू झाला तरी चळवळीचे विचार लोकांमध्ये पेरले गेले होते. त्यांच्यानंतर अनेक गुरुंची परंपरा निर्माण झाली. त्यापैकी 'जराईराम बाबा' हे महत्त्वाचे गुरु होत. सर्व जमीन मूळ निवासी संथालांची आहे. या जमीनीवर इंग्रजांचा अधिकार नाही अशी घोषणा या चळवळीच्या नेत्यांनी केली. त्यामुळे इंग्रज सरकारने ही चळवळ दडपून टाकून प्रमुख नेत्यांना अटक केली.

नेत्यांना अटक केल्यानंतर ह्या चळवळीची आग आतल्या आत टिकूनच होती. १८८० मध्ये 'दुबिया गोसाई' या नेत्याचा उदय झाला. या नेतृत्त्वाने चळवळीला व्यापक स्वरुप दिले. त्यामुळे १८८१ मध्ये इंग्रजांनी दुबिया गोसाईला जेलमध्ये टाकले.

त्यानंतर १८९१ मध्ये चळवळीने जोम धरला. चळवळीचे स्वरुप आक्रमक होते. येथील माती काळीभोर आहे त्यामुळे जमीन काळ्या खारवारांची आहे. गोऱ्या लोकांची नाही. अशी भावना लोकांत निर्माण झाली. पुढे या चळवळीला धार्मिक स्वरुप प्राप्त झाले. सफाहीर, सामरा, बाबाजीऊ अशा तीन धार्मिक संप्रदायाच्या रुपात ही चळवळ सुरु होती. या संप्रदायाचे अनुयायी महादेवास ईष्ट मानत होते. ईश्वर चिंतन, शाकाहारी जेवण, पांढरे वस्त्र परिधान इ. गोष्टींना संप्रदायाने महत्त्व दिले.

१९३० मध्ये बंगम मांझी यांनी 'सफाहोर' चळवळ सुरु केली. १९०७ नंतर खारवार चळवळीद्वारा संथालांचे हिंदुकरण करण्याच्या प्रक्रियेस विशेष महत्त्व देण्यात आले. १९४२ च्या स्वातंत्र्याच्या चळवळीत संथाल परगण्यातून ७६ लोकांनी आपले बलिदान दिले होते. त्यापैकी २५ लोक 'सफाहोर' संप्रदायाचे हाते. यावरुन स्पष्ट होते की, संथाल आदिवासींनी देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत इंग्रजांविरूध्द असलेली आपली चळवळ सुरु ठेवली होती.

## ८. **बिरसा मुंडांची चळवळ :**

आदिवासींच्या चळवळीमध्ये बिरसा मुंडा ही चळवळ महत्त्वाची आहे. तत्कालिन बिहार प्रदेशातील छोटा नागपूर भागातील मुंडा लोकांची ही स्वाभीमानाची व स्वसन्मानाची चळवळ होती. मुंडा आदिवासींची स्वतंत्र सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था होती. मुंडाची स्वतंत्र शेतीव्यवस्था

होती. त्यांची अर्थव्यवस्था ही शोषणमुक्त होती. इंग्रजांची राजवट आल्यानंतर मुंडाची शेतीव्यवस्था नष्ट करुन शेती व वनासाठी नवे नियम व कायदे करण्यात आले. त्यामुळे आदिवासींची परंपरागत सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था पूर्ण नष्ट झाली.

या नव्या व्यवस्थेचा परिणाम प्रामुख्याने आदिवासी समाजावर झाला. त्यांच्या जमिनी सावकार, जमीनदार व ठेकेदारांनी हडप केल्यात. इंग्रजांचा या व्यवस्थेविरूध्द मुंडा आदिवासींनी अनेकदा उठाव केले होते. १७८९ मध्ये मुंडानी उठाव केला होता. १८३१–३२ मध्ये कोलांचा उठाव झाला. १८५८ मध्ये जमीन व आपल्या अधिकाराच्या रक्षणार्थ पुन्हा एकदा आदिवासी चळवळ उभी केली. ही चळवळ 'सरदारी चळवळ' म्हणून प्रसिध्द आहे.

बिरसा सरदारी चळवळीत सामील झाला. इंग्रज व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या विरूध्द त्याने लोकांना संघटित केले. मात्र घरची परिस्थिती अतिशय वाईट होती. अनेकदा घरातील सर्वजण उपाशी झोपायचे. म्हणून एके दिवशी बिरसाने थडगे खणून प्रेतावरील दागिने काढले व ते दागिने विकून तांदूळ, दाळ घेऊन आला. परंतू गावातील लोकांना ही बातमी कळाली होती. बिरसाचे आई–वडिल त्याच्यावर रागावले. त्याला स्वतःबद्दल तुच्छतेची भावना निर्माण झाली. म्हणून तांदूळ, डाळ फेकून देत तो सुसाट पळत सुटला. लोक त्याला वेडा बिरसा म्हणू लागले. यानंतर बिरसा जंगलात गेला. तेथे बारा–तेरा दिवस राहिला. वणवण भटकणाऱ्या बिरसाला आपले आयुष्य, समाजाची झालेली दशा, काळाची गरज यावर सांगोपांग विचार करायला वेळ मिळाला. येथेच त्याला स्वप्न पडले. स्वप्नानंतर एक धार्मिक पुरुष म्हणून तो लोकांसमोर आला.

बिरसाजवळ अद्भूत शक्ती आहे असे लोकांना वाटू लागले. आजारी, रोगी, कष्टी झालेल्या रोग्यांना तो बरे करु लागला. बिरसा लोकांना सांगायचा, 'मी आता लवकरात लवकर मुंडाना परकीयांच्या तावडीतून मुक्त करीन' कुणाही मुंडाने यापुढे कंपनी सरकारचा आदेश पाळू नये. पोलिस, जमीनदार यांचा अपमान करा, त्यांची आज्ञा मोडा. यापुढे कुणीही वेठबिगारी करु नका. बिरसाजवळ प्रचंड स्वविश्वास होता. १८९५ मध्ये बिरसाने स्वराज्याचा उद्घोष केला होता. बिरसाने राजकीय चळवळीबरोबरच आदिवासी समाजातील अंधविश्वास व वाईट चालीरितीविरूध्द आंदोलन उभारले होते.

इंग्रजांच्या विरूध्द चळवळीचा पहिला टप्पा म्हणून बिरसाने असहकार चळवळ सुरु केली. बिरसाला पकडण्यासाठी पोलिस ८ ऑगस्ट १८९५ रोजी चालकाडला पोहचले. पण ते त्याला पकडू शकले नाहीत. इंग्रजांची हिंसात्मक प्रवृत्ती बघून बिरसाने आपल्या विश्वासू सहकाऱ्यांशी चर्चा करुन रक्त सांडण्याची, लढाई करण्याची योजना आखली. ही बातमी इंग्रज अधिकाऱ्यांना मिळताच कमिशनराने २३ ऑगस्ट १८९५ रोजी एक बैठक घेऊन बिरसाचे हे बंड मोडून काढण्याचे ठरविले. त्यानुसार पोलिसांनी गुपचुप गावाला वेढा देऊन बिरसाला पकडले व बेड्या घातल्या. बिरसाला अटक झाल्यावर आदिवासी दुःखी झाले.लोक अनवाणी पायांनी रांची तुरुंगासमोर जाऊन पोहोचले होते.

बिरसाची ३० नोव्हेंबर १९९७ ला सुटका झाली. पुन्हा आदिवासींमध्ये चैतन्य निर्माण झाले. फेब्रुवारी १९९८ मध्ये बिरसाने आपल्या अनुयायांची एक मोठी सभा घेतली व आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना सेनापती, मंत्री केले व त्यांना त्यांच्या गावात फौजा तयार करण्यासाठी पाठविले. त्यात ४ हजार मुंडाची सेना निर्माण केली.[२४] बिरसाच्या फौजेने ख्रिश्चन मिशन, पोलिस चौक्यांवर हल्ले केलेत. एकामागून एक हल्ले करीत असतांना बिरसाच्या अनुयायांना इंग्रजांनी अटक करण्यास सुरुवात केली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बिरसाच्या लोकांना पकडून देण्यास मदत केली व जे धर्मांतर करुन ख्रिस्ती होत असत त्यांना सोडून दिले जात होते. अटकेच्या भीतीने अनेक आदिवासींनी धर्मांतर केले. बिरसा इंग्रजांना सापडला नाही. बिरसा आपली फौज संघटित करण्यासाठी पुन्हा हिंडू लागला. शासकीय हेर बिरसाचे शिष्य म्हणून त्याला भेटले व त्यांनी त्यांच्या ऐंशी साथीदारांसह अटक केली व त्यांना रांचीच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

रांचीच्या तुरुंगात बिरसाला वेगळे ठेवण्यात आले. त्याच्या कमरेभोवती व पायामध्ये मोठमोठ्या लोखंडी साखळ्या बांधण्यात आल्या होत्या. ९ जून १९०० रोजी बिरसाचे निधन झाले. ब्रिटिश सत्तेविरूध्द बिरसाने विद्रोह केला. आपल्या मायभूमीस स्वतंत्र करण्यास तो पुढे आला. आदिवासींना शोषणमुक्त करण्याची त्याने शपथ घेतली. सशस्त्र सेना उभारली. आदिवासींना हक्काची जाणीव करुन दिली. जंगलावर पहिला अधिकार आमचा आहे. तो अधिकार मिळालाच पाहिजे असे त्याने आदिवासींना आवाहन केले. त्या विचाराने प्रेरीत होऊन आदिवासी माणसं जागृत झाली. बिरसा मुंडाचे नांव अजरामर झाल्याचे दिसून येते.

## ९. झारखंड चळवळ :

झारखंड स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच छोट्या नागपूरच्या आदिवासींमध्ये एक नवीन राजकीय चेतना निर्माण झाली. या राजकीय चेतनेस 'झारखंड चळवळ' या नावाने ओळखले जाते. संथाल आदिवासींच्या आशा–आकांक्षाशी या चळवळीची विचारधारा मिळतीजुळती होती. परंतु सुरुवातीला संथाल लोक चळवळीत सहभागी नव्हते. नंतर लवकरच ते या चळवळीत सहभागी झालेत. झारखंड चळवळीचा मुख्य उद्देश म्हणजे गैर आदिवासी लोक ज्यांना आदिवासी डेकू किंवा डिकू म्हणतात. त्यांना आदिवासी क्षेत्रातून बाहेर काढणे होते. छोटा नागपूरमधील आदिवासी लोकांमध्ये असंतोषाचे महत्त्वाचे कारण म्हणजे डिकू लोक आहेत. चळवळीच्या इतर कारणांमध्ये त्या क्षेत्रात ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रवेश होय. ज्यांनी आदिवासी लोकांमध्ये नव्या जाणीवा निर्माण केल्यात. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. दवाखाने उघडले व अनेक सामाजिक कल्याणाचे काम केले. त्यामुळे एकीकडे ख्रिश्चन असलेल्या आदिवासींमध्ये आर्थिक सुधारणा होऊ लागल्या व दुसरीकडे राजकीय जागृती निर्माण झाली.

सुशिक्षित व ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या लोकांना एक संयुक्त आदिवासी संघटनेची आवश्यकता वाटू लागली. म्हणून त्यांनी १९२० मध्ये छोटा नागपूर उन्नती संघ या संघटनेची स्थापना केली. त्यानंतर आदिवासी लोकांच्या हिताच्या रक्षणासाठी 'आदिवासी आमसभेची' निर्मिती करण्यात आली. या संघटनेचा मुख्य उद्देश हा 'डिकू शोषणकर्त्यांच्या विरुध्द संघर्ष करणे. आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीमध्ये सुधारणा करणे व आदिवासींकरिता एका वेगळ्या राज्याची निर्मिती करणे हे होते. त्यानंतर १९३९ मध्ये जयपालसिंग यांच्या चमत्कारिक नेतृत्त्वामुळे ही चळवळ छोटा नागपूरच्या संपूर्ण क्षेत्रात पसरली.

## स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळी :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वांना समान अधिकार देण्यात आले. इंग्रजांच्या विषयी आदिवासींच्या मनातला असंतोष संपला. परंतू स्वातंत्र्यानंतर देखील आदिवासींच्या समस्या संपलेल्या नाहीत. सावकारशाही, वेठबिगारी, कमी मजुरी, जमीन बळकावणे या समस्या स्वातंत्र्यानंतरदेखील

तशाच राहिल्या. म्हणून त्यांच्या चळवळीचे हे प्रमुख मुद्दे राहिले. १९६० मध्ये पश्चिम बंगाल व आंध्र प्रदेशात नक्षलवादी चळवळ ही आदिवासींच्या शोषणाच्या विरूध्द निर्माण झाली होती. नक्षलवाद्यांनी आदिवासींची शोषणातून मुक्तता व्हावी यासाठी ही सशस्त्र चळवळ उभारली. न्यूनतम वेतन मिळावे, कर्ज माफ करावे, तसेच जमीनदारीच्या शोषणाच्या विरोधात बिहार, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र व गुजरातमध्ये आदिवासींनी चळवळी केल्यात.

महाराष्ट्रात १९७० च्या दशकात शहादा व भूमीसेना चळवळीत आदिवासी लोकांचा सहभाग सर्वात जास्त होता. छोटा नागपूर क्षेत्रातील जमातींनी डिकूंच्या विरोधात स्वातंत्र्यपूर्व चळवळ केली होती. परंतु स्वातंत्र्यानंतर देखील सावकार, जमीनदार यांच्या विरोधात आदिवासींना संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींचे अध्ययन केल्यानंतर जाणवले की, शासनाच्या वनधोरणाचा विरोध, आरक्षण, प्रादेशिक स्वायत्तता व स्वतंत्र राज्याची निर्मिती हे त्यांच्या चळवळीचे प्रमुख मुद्दे राहिले आहेत.

गुजरातमधील डांग क्षेत्रातील आदिवासींनी १९८० ते १९९० पर्यंत वनकायद्याच्या संदर्भात वनविभागाच्या विरोधात संघर्ष केला. वनविभागाने त्यांना त्याची जमीन व वनोत्पादनाचे संकलन करण्याच्या अधिकारांपासून वंचित केले होते. हा संघर्ष तब्बल १० वर्ष सुरु राहिला. स्वातंत्र्यानंतर अनेक आदिवासी जमातींनी स्वायत्तता प्राप्त राज्य किंवा जिल्हा बनविण्याच्या मागणीसाठी चळवळी केल्यात. पूर्वीच्या द्विभाषिक मुंबई राज्यात एक वेगळा जिल्हा बनविण्याच्या मागणीसाठी डांग आदिवासी जमातीने चळवळ उभारली होती. छोटा नागपूरच्या आदिवासींनी १९८३ पासून स्वतंत्र राज्याची मागणी सुरु केली. पुढे या मागणीसाठी झारखंड चळवळीने उग्र स्वरुप धारण केले व २००० मध्ये झारखंड व छत्तीसगड या नव्या दोन राज्याची निर्मिती होणे हे स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळीचाच परिणाम होय. तसेच ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रभाव, शिक्षण, राजकीय जागृती इ. च्या कारणांमुळे भारतातील अनेक आदिवासी क्षेत्रात चळवळी निर्माण होत राहिल्या. या संदर्भात गारो, खासी, मिझो, नागा, उल्फा, बोडो इ. चा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासीची झालेली आंदोलनाची एकूण संख्या सांगणे अवघड असले तरी काही आंदोलन मात्र ऐतिहासिक ठरली आहेत. त्या काही महत्त्वाच्या आदिवासी चळवळी पुढीलप्रमाणे आहेत.

## १.	झारखंड चळवळ :–

झारखंड व आदिवासींचे एक घटक राज्य निर्माण करावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व काळातच समोर आली होती. या मागणीच्या समर्थनासाठी स्वातंत्र्यानंतर आदिवासी महासभा ही संघटना १९५० नंतर राजकीय पक्षाच्या स्वरुपात पुढे आली. ह्या संघटनेने १९५० मध्ये जमशेटपूर येथे अधिवेशन भरले. या अधिवेशनात 'झारखंड पक्षाची' स्थापना केली. या पक्षाचा मुख्य नारा, 'झारखंड आमचा आहे, डाकू बिकू (बाहेरचे लोक) जातील बाहेर!' १९५२ च्या विधानसभा निवडणूकीत झारखंड क्षेत्रातील सर्व म्हणजे ३२ ही जागा या पक्षाने लढविल्या व सर्व जागांवर दणदणीत विजय मिळविला. ओरिसामध्ये देखील या पक्षाला समाधानकारक यश मिळाले. त्यानंतर लगेच तीन वर्षानी राज्य पुनर्रचना आयोगासमोर वेगळे झारखंड हे घटक राज्य निर्माण करण्याची मागणी मांडली. मात्र ती मागणी आयोगाने धुडकावून लावली.

सप्टेंबर १९६३ मध्ये झारखंड पक्षाचे सत्ताधारी काँग्रेस पक्षात विलिकरण करण्यात आले. वेगळ्या झारखंड राज्याच्या निर्मितीस काँग्रेस सहकार्य करेल हा विलिनीकरणाचा उद्देश होता. १९६७ च्या सार्वजनिक निवडणुकीत झारखंड पक्ष तीन वेगळ्या पक्षात विभक्त झाला. त्यामुळे ताकद कमी झाली. एक सशक्त झारखंड पक्ष आपआपसांतील शुल्लक भेदांमुळे विभाजीत झाला. त्यामुळे या मागणीचा जोर कमी झाला.

१९६८ मध्ये बिरसा सेवादलाने स्वतंत्र झारखंडची मागणी केली. बिरसा सेवा दलाची चळवळ जमीन बळकाविणाऱ्याविरुध्द व सावकार, महाजन यांच्याविरूध्द जोर पकडू लागली. त्यातच पुढे १९७३ मध्ये शिबू सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना केली व त्यांनी चळवळ अधिक तीव्र केली. १९८५ च्या निवडणुकीत मुक्ती मोर्चाला १४ जागा मिळाल्यात.

झारखंड पक्षाने वेगळ्या झारखंड राज्याच्या मागणीसाठी १६ मार्च १९९३ पासून आर्थिक नाकेबंदीचे अभियान सुरु केले. झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते शिबू सोरेन यांना संसदेत सरकारद्वारा असे आश्वासन देण्यात आले की, वेगळे झारखंड राज्य बनविण्याचा अखेरचा निर्णय घेण्यापूर्वी बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्याना विश्वासात घेतले जाईल. १९९५ ते ९६ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सतत राजकीय चर्चेत राहिले. यावेळी बंड, मोर्चे, आंदोलन आदिंच्या

माध्यमातून या मागणीला पाठिंबा देणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होत गेली. सर्व पक्षांनी झारखंड हे घटक राज्य निर्माण करण्याच्या मागणीला एकमताने समर्थन केले. त्यामुळे शेवटी १५ नोव्हेंबर २००० मध्ये स्वतंत्र झारखंड राज्याची स्थापना करण्यात आली. या स्वतंत्र झारखंड राज्यात १८ जिल्हे आहेत. राज्याची राजधानी 'रांची' ठेवण्यात आली. स्वतंत्र झारखंड राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. बाबुलाल मरांडी हे बनले.

## २. बोडो चळवळ :–

बोडो म्हणजे कछाटी लोक. हे मध्य आशियातून ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात इ. स. ५००० वर्षापूर्वी येऊन राहू लागले. एका दंतकथेनुसार त्यांच्या अडिंबापूर सध्याचे दिनापूर ही राजधानी होती. १३ व्या शतकात अहोम लोकांनी त्यांना त्या क्षेत्रातून हाकलून लावले. या लढाया तीन शतके चालल्यात. नंतर बोडो आदिवासींना कछाटच्या पहाडावर आपले राज्य स्थापन केले. ज्याची राजधानी गुवाहाटी होती. तेथून पुन्हा त्यांना मैदानात जाण्यास भाग पाडले. ब्रिटिशांच्या राजवटीतच बोडोंनी आपल्या वेगळ्या राज्याची मागणी केलेली होती. १९२७ मध्ये कछाटी युध्दाच्या संघटनेने सायमन कमिशन समोर स्वतंत्र राज्याची मागणी केलेली होती. बोडो लोकांचे स्वतंत्र राज्य करावे ही त्यांची मागणी आहे. त्यासाठी त्यांनी 'अखिल बोडो विद्यार्थी परिषद' स्थापन केली. बोडो भाषेला आठव्या अनुसूचित टाकणे, नोकऱ्यांत आरक्षण इ. त्यांच्या मागण्या आहेत.

आसामात एकूण २ कोटी ६५ लाख विविध आदिवासी जमातीचे लोक आहेत. त्यापैकी ४२ लाख ९६ हजार केवळ बोडो आदिवासी आहेत. ते राहत असलेल्या क्षेत्राला स्वायत्तता द्यावी यासाठी बोडो चळवळ आहे. त्यांची ही मागणी ७८५२३ चौ. कि.मी. क्षेत्रासाठी आहे. त्यामध्ये कोकटाझार, ध्रुवी, गोलपाडा, बारपेठा, नळबारी, कामरु, दरांग, शांतीपूर, लखीलपूर, उंजली व शेंदिया या भागाचा समावेश होतो. 'बोडो पिपल ॲक्शन कमिटी' आणि 'ऑल बोडो स्टुंडंटस युनियन' या बोडोच्या वेगवेगळ्या संघटनांची वेगळ्या 'बोडोलँड' 'राज्याची मागणी केली. अखिल बोडो विद्यार्थी संघटनेने आपली मागणी पूर्ण करण्यासाठी चळवळीला हिंसात्मक स्वरुप दिले. त्यांनी आसाम बंद व रेलरोको

आंदोलन केले. त्यांनी जाळपोळही केली. त्यांचा नेता उपेंद्रनाथ ब्रम्हा याने 'करो वा मरो' असा नारा दिला. त्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे –

१. ब्रम्हपुत्रेच्या वरील किनाऱ्यापलीकडे मैदानात राहणाऱ्या आदिवासींसाठी स्वतंत्र राज्य.

२. ब्रम्हपुत्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या आदिवासी क्षेत्रातील जिल्ह्यांना स्वायत्तता.

३. कारबी, एकलांगच्या बोडो कछाटी वंशाच्या आदिवासींना सातव्या अनुसूचित टाकणे.

बोडो आदिवासींनी आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या दहशतवादी कारवाया केल्या आहेत. १९९० मध्ये दहा जिल्ह्यात लहान मोठ्या बॉम्ब स्फोटात ७५ लोक मृत्यूमुखी पडले व २४० लोक जखमी झाले. ऑक्टोंबर १९९२ मध्ये त्यांनी २२ लोकांची हत्या केली व ५० लोक जखमी केले व त्यानंतर बॉम्ब विस्फोटात ४४ लोक मारले गेले. फेब्रुवारी १९९३ मध्ये आसाम राज्यात शासनाने 'बोडो लॅन्ड स्वायत्तता परिषद' स्थापन केली. आसाममधील १५ हजार चौ. कि.मी. भूप्रदेशात ३८ विशेष विभागांचा विकास करण्याची पूर्ण स्वायत्तता या परिषदेस देण्यात आली. त्यानंतर देखील बोडो चळवळ सुरुच आहे. त्यांना बोडो लॅन्ड एक स्वतंत्र राज्य हवे आहे.[२५]

### ३. नागा चळवळ :–

भारताला स्वातंत्र्य मिळाले व ब्रिटिशांची सत्ता संपुष्टात आली. स्वतंत्र भारतात आपले अस्तित्व राहिल की नाही यांची चिंता नागा लोकांना भेडसावत होती. त्यांना त्यांची सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवायची होती. नागा व्यतिरिक्त इतर लोक आपले शोषण करतात. आपल्या संस्कृतीवर अतिक्रमण करतात ही भिती त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे नागा जमातीमध्ये एकता निर्माण होऊन ते संघटित झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नागा चळवळ अधिक वेगाने पुढे आली. सुरुवातीला नागा लोकांनी १९१८ मध्ये कोहिमा येथे 'नागा क्लब' स्थापन केला. त्यावेळी ही पहिली व एकमेव संघटना होती. नंतर १९४५ पर्यंत आदिवासी परिषदा स्थापन झाल्यात. एप्रिल १९४५ मध्ये सर्व आदिवासी

परिषदेचे एकत्रिकरण झाले. १९४६ मध्ये नागा परिषदेचे नाव बदलून ते 'नागा नॅशनल कौन्सिल' असे ठेवण्यात आले. हा नागा जमातीचा एक राजकीय कोरम होता. या कौन्सिलच्या माध्यमातून 'नागा' च्या स्वतंत्र राज्याची संकल्पना पुढे आली.

सन १९४७ ते १९४९ पर्यंत नागा लोक शांत राहिले. त्यांनी कोणतेही हिंसात्मक कृत्य केले नाही. मात्र १९४९ च्या शेवटी नागा नॅशनल कौन्सिलच्या धोरणात बदल होऊन नागाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने उद्दिष्ट्ये ठेवली. १९५१ मध्ये कौन्सिलच्या अध्यक्षाने नागाच्या स्वातंत्र्याबद्दल मत घेतले. तेंव्हा ७ हजार स्त्री पुरुषांनी आपल्या अंगठ्याचे ठसे घेतले. नागाच्या स्वातंत्र्यासाठी शपथा घेऊन लढण्याचा निर्धार केला. नागा जमातीने आम्हाला भारतीय राज्यघटना मान्य नाही. भारतीय सत्ता आमच्यावर नको म्हणून निदर्शने केली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीवर नागानी बहिष्कार टाकला. कोणीही मतदान केले नाही. हा नागांच्या चळवळीचा विजय होता.

१९५६ मध्ये नागा शांतता समिती स्थापन करण्यात आली. १९५७ मध्ये नागा लोकांची पहिली सभा बोलावण्यात आली. १९५९ मध्ये नागाची तिसरी सभा संपन्न झाली. या सभेत भारताच्या संघराज्यात परराष्ट्र मंत्रालय अंतर्गत नागालँड हे स्वतंत्र राज्य राहिल असा प्रस्ताव मांडण्याचे ठरविले. १९६० मध्ये पंडित नेहरु व नागाशिष्ट– मंडळ यांच्यात १६ मुद्यांवर करार झाला. १ ऑगस्ट १९६० रोजी पंडित नेहरुनी संसदेत स्वतंत्र नागालँड राज्याचा निर्णय जाहीर केला. १ डिसेंबर १९६३ मध्ये 'नागालँड' राष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी प्रयत्न करीत होता व गनिमी काव्याने भारतीय सैनिकाशी लढत होता. पुढे १९७५ च्या सुमारास या गटातील बहुतांश नागा बंडखोर शरण आले व आपआपली शस्त्रे सरकारच्या स्वाधीन केली. त्यानंतर स्वतंत्र व सार्वभौम नागालँड राष्ट्र निर्माण करण्याची नागा आदिवासींची चळवळ संपुष्टात आली.

### ४. नर्मदा बचाव आंदोलन / चळवळ :

नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या श्रीमती मेधा पाटकर यांचा जन्म मुंबईत १९५५ साली झाला. मेधा पाटकरांना समाजसेवेचा वारसा आई वडिलांकडूनच मिळाला. अतिशय कुशाग्र बुध्दीमत्ता, रुईया कॉलेजला बी.एस्सी. केमिस्ट्री विषय घेऊन प्रथम वर्ग प्राप्त केला. समाजसेवेची आवड

असल्याने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समध्ये त्यांनी प्रवेश घेऊन 'मास्टर ऑफ सोशल वर्क' ही पदवी प्रथम वर्गात मिळविली. टाटा इन्स्टिट्यूट फॅकल्टी मेंबर म्हणून दोन तीन वर्ष काम केले. मात्र प्रत्यक्ष फिल्डमध्ये काम करण्याची प्रचंड इच्छा. त्यामुळे समाजसेवा संस्थेत अधिकार पदाची नोकरी केली. पण आदिवासी क्षेत्रात काम करण्याच्या प्रबळ इच्छेमुळे नोकरी सोडली व अहमदाबाद येथील 'सेतू' या संस्थेत प्रवेश मिळविला. काही वर्ष काम केल्यानंतर ही संस्था सोडून सरदार सरोवराच्या विरोधात नर्मदा धरणग्रस्त सहाय्यक समितीची धुळे येथे स्थापना केली. धुळे जिल्ह्यातील सरदार सरोवर धरणाखाली जाणाऱ्या ३३ गावांना अनेकदा पायी चालून भेटी दिल्या. विस्थापितांची संपूर्ण माहिती, जागतिक बँक व संबंधित लवादाकडे देऊन तेथील लोकांमध्ये जागृती निर्माण केली. १९८९ मध्ये हरसूल (मध्य प्रदेश) येथे २५ हजार लोकांचा धरणविरोधी मेळावा आयोजित केला. बडवाई येथे मध्य प्रदेशासाठी केंद्र स्थापना करुन व बरोडा येथे गुजरात येथील जनतेत सरदार सरोवर विरोधी जागृती करण्याचे काम केले.

मेधा पाटकर यांच्या चळवळीतील पहिला कार्यक्रम होता तो म्हणजे लोकांशी संबंध जोडण्याचा. १९८५ ते १९८७ पर्यंत त्यांचा हा कार्यक्रम अव्याहतपणे चालू होता. महाराष्ट्रातील ३३ गावे या प्रकल्पामुळे उध्वस्त झाली. रोज ३० – ३० कि.मी. ते फिरत असत. आदिवासींशी संवाद साधत असत व जे शब्द समजले नाहीत ते वहीत लिहून घेत असत व भाषण करताना वहीचे पान समोर ठेवून त्यांचे शब्द वापरावयाचे म्हणजे त्यांच्याशी पटकन जवळीक साधली जाईल. विस्थापित होणाऱ्या गावात तडवी, वसावा, पावरा या जमाती होत्या. मेधाताईंना गाव पातळीपासून ते थेट दिल्लीपर्यंत आदिवासी लोकांचे प्रश्न मांडताना शहरीपणा, इंग्रजीचे ज्ञान, टाटा इन्स्टिट्यूटची बॅकग्राऊंड उपयोगी आले.

मेधाताईंनी आदिवासींशी संवाद साधून त्यांच्या धरणापर्यंत जनजागृती करुन त्यांची महाराष्ट्र – ३३ गावे, मध्यप्रदेश – १९६ गावे, गुजरातमधील १९ गावे या गावात पायी भेटी देऊन त्यांना प्रकल्पाविषयीच्या भूमिका व धरणामुळे होणारे संभाव्य धोके समजावून सांगून त्यांच्याशी योग्यप्रकारे संवाद साधून जवळीक साधली. त्याचबरोबर राज्यसरकार, केंद्र सरकार, जागतिक बँक प्रतिनिधी यांच्याशी प्रकल्पातील त्रुटी, प्रकल्पामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके, आदिवासींचे विस्थापन,

पर्यावरणीयदृष्ट्या निर्माण होणारा धोका, वेळोवेळी होणाऱ्या अभ्यासपूर्ण चर्चेतून शासनास जाणीव करुन दिली. मात्र तरीही १९८७ ला प्रकल्पाला मंजूरी मिळणार अशी बातमी गुजरातच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. या धरणामुळे कोणाचा फायदा होणार, कोणाचे नुकसान होणार, कोणाचे कसे पुनर्वसन करणार, कोठे करणार, पर्यावरणाची नैसर्गिक साधनसंपत्तीची जी हानी होईल ती कशी भरुन काढणार अशा सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली तरच विस्थापनाला अनुमती द्यावयाची अन्यथा नाही. अशी नर्मदा आंदोलनाची भूमिका होती. त्यावेळी सातपुड्याच्या खेड्यापाड्यातून मेधा पाटकर आल्या होत्या. त्यामुळे त्यांना सर्व प्रश्नांची जाण होती. धुळ्यात जेंव्हा त्यांनी पहिली बैठक घेतली तेव्हा सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनाही बोलावले. पण बैठकीला राजकीय स्वरुप येणार नाही याची काळजी घेतली. बैठक बराच वेळ चालली. रात्री दीड वाजता निवेदन तयार करण्यात आले. आंदोलकांनी गावपातळीपासून ते दिल्लीपर्यंत गाठीभेटी घेऊन निवेदने देऊन त्यांची बाजू मांडली होती. हे प्रतिनिधीत्व करण्यासाठी त्यांनी आदिवासींची तयारी करुन घेतली होती.

मेधाताईंनी धुळ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार मांडण्यासाठी काही आदिवासी नेले होते. लोक आदिवासी भाषेत त्यांची बाजू मांडत होते. जिल्हाधिकारी जरा घाईत होते. ते म्हणाले ताई, तुम्हीच मराठीत पटकन सांगून टाका. तेंव्हा मेधाताई खरेतर चिडल्या. 'त्यांची बाजू मांडण्यासाठी ते ६० कि.मी. पायी चालत आलेले आहेत. त्यांचे म्हणणे आपल्याला ऐकून घ्यावे लागणार. ' त्याशिवाय तुम्हाला जाता येणार नाही. अशामुळे सरदार सरोवर प्रकल्पाच्या बैठका नेहमी उशीरापर्यंत चालत. सरदार सरोवर प्रकल्पात विरोध करताना मानवी व पर्यावरणीय बाबींवर मेधा पाटकरांचा विशेष भर होता. सरदार सरोवर प्रकल्प हा महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात या तिन्ही राज्यांना सामावणारा प्रकल्प असल्यामुळे प्रकल्पग्रस्तामध्ये या तीन्ही राज्यांचा समावेश होता. पैकी गुजराची केवळ १९ गावे पाण्याखाली जात असून महाराष्ट्रातील ३३ गावे तर मध्यप्रदेशातील एकूण १९६ गावे या प्रकल्पामुळे बुडणार आहेत. याऊलट सर्वाधिक लाभ गुजरात राज्याला अर्थातच त्यामुळे 'नर्मदा बचाव' आंदोलनाला महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील प्रकल्पग्रस्तांचा पाठिंबा गुजरातच्या मानाने अधिक मिळाला.

पूर्वी नर्मदा बचाव आंदोलनाला गुजरात येथील विस्थापितांचा पाठिंबा मिळत नव्हता. परंतु सौराष्ट्र व कच्छ ह्या प्रदेशांना फारसा लाभ मिळणार नाही याची विस्थापितांना खात्री झाल्यानंतर या आंदोलकांचा पाठिंबा वाढतच चालला होता.[२६]

आंदोलकांनी आत्मसमर्पण गट नर्मदातीरी बसविल्यानंतर काहि दिवस पैलतीरी येण्यासाठी आंदोलकांना फार अडचणी येत होत्या. हे जाणून कच्छच्या विस्थापितांनी नर्मदा बचाव आंदोलकांना एक नाव बक्षिस दिली. एकावेळी २० लोकांना तारुण नेईल अशी ती नाव होती. एकीकडे धरणाचे काम सुरु होते व दुसरीकडे आंदोलन अधिक व्यापक व गंभीर होत चालले होते.

महाराष्ट्र व गुजरात सिमेवर बांध बांधला असून त्यात ५७३ गावे बुडणार होते व ४ लाख लोक विस्थापित होणार होते. एकूण ५१ टक्के विस्थापित होणाऱ्यात ९ टक्के आदिवासी होते. शेतीखालच्या शेतजमीनीपैकी ४० हजार एकर जमीन पाण्याखाली जाणार होती. तत्पूर्वी या भागातील जंगलेही कापली जाणार होती. त्यात अनेक उपयुक्त वृक्षांच्या प्रजाती तसेच प्राणीही नष्ट होणार होते. मेधा पाटकरांबरोबर इतरही पर्यावरणवादी नेते यात सामील होऊ लागले. त्यात बाबा आमटे, श्रीपाद नंदिनी, सिल्वी, अरुंधती रॉय हे होत. एकीकडे राज्यसरकार व त्यांचे सरकारी आकडे, दुसरीकडे आंदोलनकर्ते व स्थानिक रहिवासी अशी ही चळवळ सुमारे १० ते १५ वर्षे चालली. बांधाची उंची कमी करण्याचा आग्रह मेधाताईंच्या नेतृत्त्वाखाली आंदोलनकर्त्यांनी धरला व सरकारला शेवटी त्यांची सूचना स्विकारावी लागली. विस्थापितांना चांगल्या रितीने पुर्नस्थापित करण्यावर त्यांचा भर होता. अनेकांना जमीनीच्या मोबदल्यात पैसे देऊन नुकसान भरपाई तर जिथे शक्य झाले तिथे जमीनी देण्यात आल्या. महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेशातील विस्थापितांच्या समस्यांचे शक्य होईल तेवढे निराकरण करण्याचा प्रयत्न झाला.

मात्र धरणाविरुध्द जी आंदोलने होतात त्यांच्याविषयी असे म्हटले जाते की, धरणामुळे जी हानी होते त्यापेक्षा त्यापासून होणारे लाभ हे पुष्कळ प्रमाणात होतात.

## २.५ आदिवासी समाजाच्या विकासाचे कार्यक्रम :

आदिवासी समाजाच्या विकासाच्या कार्यक्रमासंदर्भात विचार केला असता स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ या दोन विभागात विभाजन करता येते.

### २.५.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम :

सरकारी पातळीवरील आदिवासी कल्याण कार्यक्रम व बिनसरकारी पातळीवरील आदिवासी कल्याण कार्यक्रम असे आदिवासी कल्याण कार्यक्रमाचे दोन प्रकार पडू शकतात. स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रमाचा विचार केला असता बिनसरकारी पातळीवरील आदिवासी कल्याण कार्यक्रमाचाच विचार करावा लागतो. कारण ब्रिटिशांनी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी कधी होकारात्मक भूमिका घेतलीच नाही. आदिवासींच्या प्रकारांची गुंतागुंत लक्षात घेऊन ब्रिटिश शासनाचे धोरण नकारात्मक स्वरुपाचे होते. परिणामी सरकारी पातळीवरील आदिवासी कल्याण कार्यक्रमाचा प्रारंभ खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातच झाला असे म्हणता येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळात देश स्वतंत्र करणे एवढाच उद्देश असल्याने आदिवासींच्या समस्यांकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. पण त्यातही महात्मा गांधीजींची प्रेरणा घेऊन समाज सुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी हातभार लावल्याचे दिसून येतो. इ. स. १९२२ मध्ये कै. ठक्कर बाप्पा यांनी गुजरातमध्ये 'भिल्ल सेवा' ही संस्था स्थापन केली. तसेच खान्देशात इ. स. १९१८ मध्ये श्री. काकासाहेब बर्वे व शंकरराव ठकार यांनी 'खान्देश भिल्ल सेवा मंडळ' ही संस्था स्थापन केली. त्याचबरोबर श्रीमती गोदूबाई परुळेकर यांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार व आसाम राज्यात मिशनऱ्यांनी केलेले कार्य मोठे आहे. मात्र धर्मांतराच्या संकुचित हेतूसाठी त्यांनी हे कार्य केले. महाराष्ट्र राज्यात कल्याण या गावाच्या बाजारात 'चर्चे ऑफ दि बेदरेन मिशन' या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडम एबी यांनी इ. स. १९०३ साली वारल्यांकरिता लहान दवाखाना उघडला होता. इ. स. १९२३ साली मिशनने पालघरला 'ग्रामीण वसतिशाळा' सुरु केली होती. अशी अनेक उदाहरणे मिशनऱ्यांच्या आदिवासी कार्याची देता येतील. जर मिशनऱ्यांचा हेतू धर्मांतराचा नसता तर त्यांच्या कामाचे महत्त्व द्विगुणीत झाले असते.

मिशनऱ्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन भारतभर भिल्लसेवा मंडळ, वनवासी सेवा मंडळ, आदिमजाती सेवा संघ यासारख्या संस्था अस्तित्वात आल्या. थोडक्यात स्वातंत्र्यपूर्वकाळात बिनसरकारी पातळीवरच आदिवासींसाठी कार्य केल्याचे दिसून येते.

## २.५.२. स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारतावर आदिवासींच्या प्रश्नांची फार मोठी जबाबदारी येऊन पडली. आदिवासींसारख्या दिर्घकाळ उपेक्षित असलेल्या समाजाचे प्रश्न म्हणजे स्वतंत्र भारतापुढील एक फार मोठे आव्हान होते. विसाव्या शतकातील राज्याच्या जबाबदारीच्या नवीन कल्पनेनुसार कल्याणकारी राज्याची जबाबदारी राज्याचीच. शासन संस्थेची असते. तेंव्हा स्वातंत्र्यानंतर राज्यपातळीवर आदिवासींचे कल्याण कार्यक्रम हाती घेतले आहेत. 'आदिवासींचा उध्दार' हा आजच्या शासनसंस्थेचा ध्रुवतारा आहे.

स्वतंत्र भारताने ब्रिटिशांच्या नकारात्मक धोरणाचा पूर्णपणे त्याग करुन आदिवासींसाठी होकारात्मक धोरणाचा अवलंब केला. आदिवासींना जाणीवपूर्वक अलग ठेवण्याच्या धोरणाने प्रत्यक्ष आदिवासींना काहीही फायदा झालेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा मिशनरी लोक घेतात. हे ही स्पष्ट झाले आहे. तेंव्हा आदिवासींची ही परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासींना घटनात्मक संरक्षण दिलेले आहे.

## २.५.३ आदिवासींच्या संरक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदी :

स्वतंत्र भारताने २६ जानेवारी १९५० साली नवी राज्यघटना अंमलात आणली. भारतातील सर्व नागरिकांना यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. पण आदिवासींचे जीवन अधिक दुर्बल व असहाय्य असल्याने त्यांच्यासाठी काही विशेष तरतूद करणे आवश्यक होते. म्हणून समानतेचे तत्व विचारात घेऊन आदिवासी समाज हा पुढारलेल्या समाजाच्या पातळीवर आला पाहिजे. या उद्देशातून आदिवासी जमातींच्या संरक्षणासाठी काही विशेष तरतूदी करण्यात आल्या. त्या पुढीलप्रमाणे[२७] –

१.	घटनेच्या १५ व्या कलमानुसार धर्म, वंश, जाती, लिंगभेद व जन्मठिकाण यावरुन कोणताही भेदभाव केला जाणार नाही. तेव्हा या समानतेच्या तत्वाचा फायदा आदिवासींना विशेषत्वाने झालेला आहे.

२.	घटनेच्या १६ व्या कलमानुसार शासकीय नोकऱ्यांबाबत भेदभाव केला जाणार नाही. सर्वांना समान संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. समान संधी तत्वाप्रमाणे आदिवासी व्यक्तीला अन्य भारतीय व्यक्तीप्रमाणे समान स्वरुपाचे स्वतंत्र अधिकार बहाल करण्यात आले आहेत. घटनेच्या १७ कलमानुसार अस्पृश्यता नष्ट करणे शक्य झाले आहे.

३.	घटनेच्या १७ व्या कलमानुसार अस्पृश्यता नष्ट करणे शक्य झाले आहे.

४.	घटनेच्या १९ व्या कलमानुसार आचार, विचार, उच्चार, व्यवसाय व देशात कोठेही संचार करणे, संपत्तीची विल्हेवाट इ. बाबतीत सर्वांना स्वतंत्रता प्राप्त झालेली आहे.

५.	घटनेच्या २३ व्या कलमांन्वये सक्तीने काम करुन घेणे, वेठबिगारी पध्दत, व्यक्तीचा अनैतिक व्यापार इ. बाबी बेकायदेशीर ठरविण्यात आलेल्या आहेत. या तरतूदीमुळे अनेक आदिवासी व्यक्तींची व आदिवासी कुटुंबाची वेठबिगारीमधून मुक्तता करणे शासनाला शक्य झाले आहे.

६.	घटनेच्या २५ व २९ व्या कलमाप्रमाणे व्यक्तिंना धार्मिक स्वातंत्र्य, शैक्षणिक व सांस्कृतिक हक्कांची जपणूकही केली आहे. अशा प्रकारे या घटनात्मक तरतुदीमुळे संख्येने अल्प असणाऱ्या आदिवासी जमातीच्या संस्कृतीचे रक्षण करणे शक्य झाले आहे.

७.	घटनेच्या ४ थ्या भागातील १६४ व्या कलमान्वये आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या बिहार, ओरिसा व मध्यप्रदेश या राज्यात आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासासाठी एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे. त्याचबरोबर आदिवासींच्या कल्याणासाठी मध्यवर्ती सरकार व राज्यसरकार यांनी खास निधी उपलब्ध करावा. प्रत्यक्ष व्यवहारात सामान्यपणे ज्या घटक राज्यांमध्ये आदिवासींची संख्या बरीच मोठी आहे. या सर्व घटक राज्यांच्या मंत्रीमंडळात एक मंत्री आदिवासी जमातीचा असतो. तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातही किमान एका आदिवासी व्यक्तीचा समावेश असतो. अशा प्रकारे आदिवासी जमातींना

शासनामध्ये प्रतिनिधीत्व देण्याची पध्दती भारतातील सर्वच घटक राज्यात प्रत्यक्ष व्यवहारात निर्माण झाल्याचे दिसून येते.

८. घटनेच्या १६ व्या भागातील कलम ३३० ते ३३२ अन्वये लोकसभेत व राज्याच्या विधानसभेत आदिवासींच्या प्रतिनिधींकरिता लोकसंख्येच्या आधारावर काही जागा राखून ठेवलेल्या आहेत. या राखीव व सुरक्षित मतदारसंघाच्या तरतूदीमुळे आदिवासी प्रतिनिधीला घटक राज्यातील विधानसभेत व लोकसभेत आदिवासी जमातीचे लोकमत व्यक्त करणे शक्य झाली आहे.

९. भारतीय संविधानाच्या ३३८ व्या कलमान्वये अनुसूचित जमातीच्या (आदिवासींच्या) संरक्षणासाठी राष्ट्रपती अधिकारी नियुक्त करु शकतात.

१०. आसाम व आसामच्या परिसरातील प्रदेशात म्हणजे ईशान्य भारतात आदिवासी जमातींची संख्या बरीच जास्त आहे. या जमातींच्या प्रश्नांचे स्वरुपही गुंतागुंतीचे आहे. हे लक्षात घेऊन घटनेत काही खास तरतूद करण्यात आली आहे.

आसामच्या जनजातीय क्षेत्रास दोन भागात विभागता येईल. एक स्वायत्त जिल्हे व दुसरा स्वायत्त क्षेत्र. या स्वायत्त जिल्ह्यात जिल्हा समित्या व स्वायत्त क्षेत्रात क्षेत्रसमित्या असतील. या समित्यांना भूमी, जंगल, शेती, मालमत्ता, विवाह व अन्य सामाजिक प्रथा याबाबत कायदे करण्याचा अधिकार दिला असून न्यायदानाचे कार्यही याच समितीकडे सोपविले आहे. संसदेचे सर्वमान्य कायदे या भागास लागू होणे किंवा न होणे हे देखील समितीच्या मनावर अवलंबून राहिल. अशा प्रकारे २४४ व्या कलमाच्या ५ व्या शेड्युलनुसार आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनासाठी एक स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

घटनेमध्ये आदिवासी जमाती असणाऱ्या राज्यात राज्यपालाला आदिवासी कल्याणासाठी सल्ला देण्याकरिता एक आदिवासी सल्लागार मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

११. भारतीय संविधानातील ३३५ व्या कलमानुसार आदिवासी उमेदवाराकरिता शासकीय सेवेत काही जागा आरक्षित ठेवल्या असून त्यांच्यासाठी नोकरीतील प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात आली आहे.

आदिवासीमध्ये शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी संविधानाने शासनावर सोपविलेली आहे. हे आदिवासी कल्याणासाठीच्या घटनात्मक तरतूदीवरुन स्पष्ट होते. या घटनात्मक तरतूदीमुळे आदिवासी कल्याण कार्यक्रमात शासनाची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची ठरते असे म्हणता येईल.

आदिवासी कल्याणासाठीच्या काही योजना केंद्र सरकारकडून तयार केल्या जातात तर काही योजना घटक राज्य सरकारकडून तयार केल्या जातात. दोन्ही स्तरावरील सरकारांना आदिवासी कल्याण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करावी लागते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासन यंत्रणेला या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक अनुदानही दिले जाते. थोडक्यात, सत्तारुढ राजकीय पक्षाचे धोरण, दुर्बल घटक म्हणून आदिवासीबद्दलची कणव, नेत्यांची दूरदृष्टी या कारणांमुळे आदिवासी कल्याण कार्यक्रम तयार केले जात नाही तर ते सांविधानिक जबाबदारी पूर्ण करण्यासाठी तयार केले जातात व अंमलात आणले जातात.

### २.५.४ नेहरुंची पंचशील तत्वे :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आदिवासींना वेगळे न ठेवता त्यांना मुख्य प्रवाहामध्ये कसे समाविष्ट करता येईल, त्यायोगे भारताची एकात्मता कशी साधता येईल यादृष्टीने विचार सुरु झाला.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी १९५२ साली आदिवासींच्या विकासाची पंचसूत्री जाहीर केली. ती नेहरुंची पंचशील तत्वे या नावाने प्रसिध्द झाली. ती तत्वे पुढीलप्रमाणे होती.[२८]

१. आदिवासींचा विकास त्यांच्या प्रतिभा व क्षमतेप्रमाणे व्हावा.
२. आदिवासींचा जंगल व जमीनीवरील हक्क मान्य करण्यात यावा.
३. आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांच्या मार्फत आदिवासींच्या विकासाला गती द्यावी व बाह्य लोकांचा हस्तक्षेप कमी करावा.

४. आदिवासी विकास त्यांच्या सांस्कृतिक व सामाजिक परंपरांना बाधा न आणता साधण्यात यावा.

५. आदिवासींचा विकासाचा निकष हा त्यांच्यावर झालेला खर्च न मानता त्यांचे जीवनमान किती उंचावले यानुसार ठरविण्यात यावा. या पंचसुत्रीच्या आधारे आदिवासी विकासाची धोरणे आखण्यात यावीत.

## २.५.५ ढेबर समिती :

१९६० साली यु. एन. ढेबर यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण करण्यात आले. 'अनुसूचित क्षेत्रातील' आदिवासींच्या विकासासाठी भारताच्या राज्यघटनेतील अनुसूची सहा मधील आदिवासींच्या क्षेत्रातील तरतुदींचा वापर करता येईल किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी ढेबर समिती गठीत केली होती. या समितीने अनुसूची सहा मधील तरतुदी लागू करण्याची गरज नसून अनुसूचित क्षेत्राचे अधिकार राज्य शासनाला असावेत अशी शिफारस केली.[२९]

## २.५.६ बावा समिती :

आदिवासी भागातील विशेषतः आदिवासी प्रकल्प चालू असलेल्या भागातील सहकारी संस्थांच्या कामकाजाचे परीक्षण करणे आणि त्या भागातील सहकारी रचना भक्कम करण्यासाठी योग्य उपाय सूचविण्याच्या दृष्टीने केंद्रीय कृषी मंत्रालयाने श्री. के. एस. बावा यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास प्रकल्पातील सहकारी संस्थांवरील अभ्यास पथकाची नियुक्ती केली. बावा अभ्यास पथकाने १९७२–७३ मध्ये आदिवासी विकास प्रकल्पातील सहकारी संस्थांच्या कार्याची पाहणी केली आणि आदिवासींच्या विकासासाठी सुदृढ व पुनर्रचित सहकारी यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या शिफारशी केल्या. बावा अभ्यास पथकाने आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा व मध्य प्रदेश या चारही राज्यातील आदिवासी विकास प्रकल्पांबाबत स्वतंत्र अहवाल सादर केले असून १९७३–७४ मध्ये समग्र अहवाल सादर केला. बावा अभ्यास पथकाने आपल्या अहवालात ज्या शिफारशी केल्या आहेत त्यापैकी मूलभूत शिफारशी पुढील प्रमाणे[३०] –

१. आदिवासींना एकत्रित स्वरुपात सेवा हव्या असतात. या एकत्रित सेवांमध्ये उत्पादन आणि खावटी कर्जपुरवठा, बी–बीयाणांचा व इतर कृषी गरजांचा पुरवठा, ग्राहक वस्तूंचा पुरवठा आणि कृषी व जंगल उत्पादनाची विक्री व्यवस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो. या कार्यामध्येच आदिवासींचे शोषण होत असते आणि सहकारी रचनेने आदिवासींना एकात्मिक कर्जपुरवठा व इतर सेवांचा पुरवठा केला पाहिजे.

२. आदिवासींना सहाय्यासाठी निरनिराळ्या संस्थांकडे जावे लागू नये. आदिवासींशी संबंधीत असलेल्या प्राथमिक संस्थेनेच त्याला आवश्यक असलेल्या सर्व महत्त्वाच्या सेवांचा पुरवठा केला पाहिजे. आदिवासी नेहमी बाजारासाठी ज्या ठिकाणी येतो त्याच ठिकाणी या सेवांचा पुरवठा झाला पाहिजे.

३. प्रकल्प विभागातील आदिवासींच्या आर्थिक कार्यक्रमासाठी सहकारी बँका, रिझर्व्ह बँक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम इत्यादींनी पुरेसा निधी पुरवठा करावा. हा निधी पुरवठा सुरळीतपणे व्हावा म्हणून या संस्थांनी आपल्या आकृतीबंधात आणि पुरवठा पध्दतीत योग्य बदल करावा.

४. आदिवासींसाठी किरकोळ जंगल उत्पादने गोळा करणे हा महत्त्वाचा उत्पन्न मिळविण्याचा मार्ग आहे. याच कार्यात त्यांचे आर्थिक शोषण होत असते. म्हणून जंगल उत्पादने गोळा करण्याचा हक्क हा केवळ आदिवासींनाच असला पाहिजे. तसेच आदिवासींना त्यांना गोळा केलेल्या जंगल उत्पादनाची योग्य किंमत त्यांच्या सहकारी संस्थांमार्फत मिळाली पाहिजेत.

५. आदिवासीने व्यक्तीशः केलेले आणि त्यांच्या सहकारी संस्थेने केलेले आर्थिक व्यवहार हे भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या दृष्टीने सक्षम बनायला फार कालावधी लागेल. हे व्यवहार यशस्वी व सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने सबसिडी पध्दतीचा अवलंब केला पाहिजे किंवा आदिवासी विकास यंत्रणेच्या निधीतून वा राज्य सरकार आणि यंत्रणा या दोहोंनी मिळून सबसिडी दिली पाहिजे.

६. राज्य सरकार आणि आदिवासी विकास यंत्रणेच्या मदतीने चाललेल्या कार्याचा योजनांचा फायदा हा खऱ्या अर्थाने आदिवासीला मिळतो आहे किंवा नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे. आदिवासींच्या ऐवजी इतरांना या कार्याचा वा योजनांचा फायदा मिळता कामा नये. यासाठी प्राथमिक संस्थांमार्फत ६० ते ७० टक्के कर्जपुरवठा हा आदिवासींनाच झाला पाहिजे अशा

प्रकारची तरतूद या संस्थेच्या पोटनियमात करणे आवश्यक आहे. आदिवासींच्या संस्थांमध्ये बिगर आदिवासींना शक्यतो कार्यकारी मंडळात स्थान देण्यात येऊ नये.

७. प्रकल्प, विभागात विविध सरकारी कार्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संस्थांच्या प्रशासनात योग्य प्रशासकीय व्यवस्थेची निर्मिती करावी. तसेच संस्थांवर चांगली देखरेख असावी आणि संस्थांना चांगले मार्गदर्शन केले जावे.

थोडक्यात, आदिवासींना पतपुरवठा, बाजार कार्य आणि ग्राहक वस्तूंचा पुरवठा या बाबतच्या सर्व सेवा पुरविणाऱ्या मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची स्थापना करण्याची शिफारस बावा समितीने केली.

बावा अभ्यास समितीच्या शिफारशी केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक आणि संबंधित राज्यसरकारे यांनी स्वीकृत केल्याचे दिसून येते.

सन १९९३ साली ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीने पंचायत राज संस्थांना काही घटनात्मक अधिकार देण्यात आले. त्यामध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पंचायत राज संस्थेकडे एकूण २९ विषय वर्ग करण्यात आले व त्यांचा समावेश ११ व्या अनुसूचीमध्ये करण्यात आला. या सूचीमध्ये ज्या विषयांचा समावेश करण्यात आला ते ग्रामीण विकासाशी अत्यंत निगडीत आहेत.

भारताच्या संविधानातील अनुच्छेद २४३ (ड) नुसार ७३ व्या घटना दुरुस्तीतील तरतुदी अनुच्छेद २४४ खंड १ मध्ये निर्देश केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना व खंड २ मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित जनजाती क्षेत्रांना लागू करता येत नव्हत्या. परंतु संसदेला काही अपवाद व फेर बदलाच्या अधीन राहून सदर तरतुदींचा विस्तार अनुसूचित क्षेत्राला व अनुसूचित जनजाती क्षेत्राला लागू करण्याचा अधिकार होता.

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास विभागाने खासदार दिलिपसिंग भुरिया यांच्या अध्यक्षतेखाली वरील तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठित केली. सदर समितीने पुढील प्रमुख शिफारशी केल्या.[३१] –

१.	ग्रामसभेला कायदेशीर अधिष्ठाण प्राप्त व्हावे व तिच्या अधिकाराखाली आदिवासी विकासाचे निर्णय घ्यावेत.

२.	आदिवासींचा जमीनी व जंगलातील हक्क मान्य करण्यात यावा आणि

३.	आदिवासींच्या अंतर्गत व्यवहारामध्ये बाह्य हस्तक्षेप कमी करावा अशा शिफारशी केल्या.

या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने २४ डिसेंबर १९९६ रोजी पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ पारित केला व त्यायोगे आदिवासींना स्वशासनाचा अधिकार प्राप्त झाला.

## २.५.७ पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) १९९६ :

आपल्या देशाच्या संविधानातील अनुच्छेद ३३९ मध्ये अनुसूचित जाती जमातीच्या हिताचे संरक्षण होण्यासाठी खास तरतूद केली आहे. या तरतुदीच्या आधारे केंद्र शासनाने पंचायतक्षेत्र विस्तार कायदा १९९६ पारित केला.

हा कायदा २४ डिसेंबर १९९६ रोजी पारित केला. भारताच्या संविधानातील अनुच्छेद २४४ मधील क्लॉज (१) मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित क्षेत्रासाठी हा कायदा लागू होतो. या कायद्यातील बाब ४ नुसार राज्य शासनाला खालील दर्शविलेल्या बाबींची विसंगत कायदा पारीत करता येणार नाही. परंतु आदिवासी समाजामध्ये चालत आलेले परंपरागत कायदे, धार्मिक व सामाजिक प्रथा आणि त्यांच्या सामुहिक मालकीच्या संसाधनांबाबत जी व्यवस्था असेल त्याला पूरक कायदे बनविता येतील. अनुसूचित क्षेत्रातील आपआपल्या रितीरिवाज, रुढी, प्रथेप्रमाणे चालणारे गाव, वस्त्या, वस्त्यांचा समूह, पाडा किंवा पाड्यांचा समूह असे गाव असेल.[३२]

- गावासाठी एक ग्राम सभा असेल व ज्या व्यक्तीचे नाव गावाच्या मतदार यादीमध्ये असेल ती व्यक्ती ग्रामसभेला सदस्य असेल.
- प्रत्येक ग्रामसभेची आदिवासींच्या रुढी, परंपरा, सांस्कृतिक ओळख, सामूहिक मालमत्ता, विवाद तंट्यावर निर्णय देण्याची रुढ पध्दती यांचे जतन व संवर्धन करण्याचा अधिकार असेल.

- ग्रामसभेला गावाच्या सामाजिक, आर्थिक विकासासंबंधी विकास आराखडे, प्रकल्प यांना मान्यता देण्याचा अधिकार असेल. ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर पंचायत सदर मंजूर आराखड्याची अंमलबजावणी करेल.
- ग्रामसभेला विकास योजनेचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार असेल अशा रितीने निवडलेल्या लाभार्थ्यांना विकास योजनेचा लाभ देण्यात येईल.
- शासनामार्फत जो पंचायतीला निधी प्राप्त होतो तो शासनाने ज्या कामासाठी दिलेला असेल त्याच कामासाठी खर्च करावा लागतो. तसेच या संबंधित शासनाने ज्या अटी घातलेल्या असतील त्यांचे पालन करावे लागते. अशा रितीने मिळालेली रक्कम खर्च केल्याचे एक प्रमाणपत्र द्यावे लागते त्याला विनियोग दाखला असे संबोधले जाते. पंचायतीने केलेल्या खर्चाचा विनियोग दाखला देण्याचा अधिकार ग्रामसभेला असेल.
- एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जाती–जमातीचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणात अनुसूचित क्षेत्रामधील पंचायतीमध्ये आरक्षित केले जातील. मात्र अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदांची संख्या १/२ पेक्षा कमी असणार नाही.
- ज्या पंचायत समितीमध्ये किंवा जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जमातीचा सदस्य नसेल त्या ठिकाणी राज्य शासन अनुसूचित जमातीच्या व्यक्तीची सदस्य म्हणून नेमणूक करेल. परंतु शासनाने अशा नेमणूक केलेल्या सदस्यांची संख्या एकूण सदस्य संख्येच्या १/१० हून अधिक असणार नाही. अशा रितीने या पंचायत समितीत व जिल्हा परिषदेत अनुसूचित जमातीची प्रतिनिधी सदस्य म्हणून निवडून आले नसतील अशा ठिकाणी राज्य शासन वरील प्रमाणे निर्णय घेईल.
- ज्याप्रमाणे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये सदस्य पदाचे आरक्षण असेल त्याचप्रमाणे पदाधिकाऱ्यांचे देखील आरक्षण असेल. तसेच असे आरक्षण असूनही पदाधिकारी पदाची पदे रिक्त राहत असल्यास अनुसूचित जमातीच्या व्यक्तीची पदाधिकारी म्हणून शासन निवड करेल. परंतु अशा लोकांची संख्या एकूण पदाधिकाऱ्यांच्या संख्येच्या १/१० पेक्षा जास्त असणार नाही.

- अनुसूचित क्षेत्रातील जमीनीचे अधिग्रहण करण्यापूर्वी तसेच प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरण ग्रामसभा किंवा ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेशी विचार विनिमय करेल. तसेच विकास प्रकल्पाच्या व पुनर्वसनाच्या कामाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी राज्य स्तरावरुन संबंधित विभागामध्ये योग्य तो समन्वय राखला जाईल.
- छोट्या पाणी साठवण बंधाऱ्याची कामे व त्यांच्या व्यवस्थापनाच्या कामाची जबाबदारी योग्य त्या स्तरावरील पंचायत राज संस्थेकडे सोपविली जाईल.
- अनुसूचित क्षेत्रातील गौण खनिजांसाठी परवानगी देण्यापूर्वी किंवा जमीनी लीजवर देण्यापूर्वी ग्रामसभेची किंवा योग्य त्या स्तरावरील पंचायत राज संस्थेची शिफारस घेण्यात येईल.
- गौण खनिजांचे लिलाव करण्यापूर्वी पंचायत स्तरावर ग्रामसभेची किंवा वरिष्ठ स्तरावरील पंचायत समितीची किंवा जिल्हा परिषदेची शिफारस अनिवार्य असेल.
- <u>पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ मध्ये राज्य शासनाने पंचायत राज्य संस्थांचे सबलीकरण करावे अशी तरतूद केली आहे.</u> खाली नमूद केलेल्या बाबींसंबंधी केंद्र शासनाने पंचायत राज्य संस्थांना आवश्यक ते अधिकार देण्याबद्दल निर्देशित केले आहे.
- अनुसूचित क्षेत्रामध्ये दारुबंदी कायदा लागू करणे तसेच अंमली पदार्थांची विक्री सेवन करण्यावर मर्यादा घालणे किंवा बंदी आणणे.
- वन क्षेत्रातील आदिवासींना गौण वनउपजेची मालकी देण्याबाबत कायदे करणे.
- अनुसूचित क्षेत्रातील जमीनीचे बिगर आदिवासींकडे होणाऱ्या हस्तांतरावर बंदी आणणे व बेकायदेशीररित्या हस्तांतरीत झालेल्या जमीनी आदिवासींना परत करणे.
- बाजार सुरु करणे व त्याचे नियमन करण्यासंबंधी अधिकार देणे.
- सावकारी धंद्यामुळे आदिवासींची पिळवणूक होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

- अनुसूचित क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यालयांवर व संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकार बहाल करणे.
- अनुसूचित क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या आदिवासी उपयोजना तसेच अन्य विभागांमार्फत घेण्यात येणाऱ्या योजनांना व प्रकल्पांना मान्यता देणे व त्यांची अंमलबजावणी करण्यासंबंधी अधिकार प्रदान करणे.
- राज्य शासनाने पंचायत राज्य संस्थांना आवश्यक असतील असे अधिकार देण्यात यावते. जेणेकरुन त्या स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून आपली कर्तव्ये पार पाडू शकतील. असे अधिकार देतांना निम्न स्तरावरील काम करणाऱ्या संस्थेच्या अधिकाराचा संकोच होणार नाही याची आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.
- जिल्हा स्तरीय पंचायत राज्य संस्थांची प्रशासकीय रचना तयार करतेवेळी राज्य शासनाने संविधानाच्या सहाव्या सूचीमध्ये तरतूदींचा विचार करावा.

  पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) १९९६ मधील तरतूदींचे स्वरुप सर्वसाधारणपणे वरील प्रमाणे आहे.

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) १९९६ ला भारताच्या राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतर एका वर्षाच्या आत आपल्या देशातील राज्यांनी त्याला पूरक कायदे करावयाचे होते. आपल्या राज्याचा विचार करता महाराष्ट्र शासनाने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये सुधारणा करुन कलम ५४ अ, ५४ ब, ५४ क व ५४ ड या तरतुदींचा अधिनियमामध्ये अंतर्भाव करुन पेसाच्या अंमलबजावणी संदर्भात प्रयत्न केल्याचे दिसून येते.

### २.५.८ वन अधिकार कायदा २००६ आणि आदिवासी :

आदिवासी आणि जंगल यांचे सहजीवन अत्यंत जुने व शेकडो वर्षापासून सुरु आहे. या दोघांमधील नाते परस्परावलंबी व एकमेकाला पूरक ठरल्याने त्यांचे अस्तित्व आजही टिकून आहे.

वन अधिकार कायदा २००६ मध्ये तरतुदीनुसार आदिवासींच्या समस्यांचा विचार झाला असून त्यांना काही अधिकार देण्याचा प्रयत्न केला आहे.

आदिवासींचे वास्तव्य वनाजवळ किंवा वनातच असल्याने ते उदरनिर्वाहासाठी वापरत असलेली जमीन वनाच्या जवळपास किंवा वनातच होती. इंग्रजांच्या काळात आदिवासींच्या जीवनशैलीचा विचार न करता त्यांना उपरे ठरविल्याने जमीनीच्या मालकीचा प्रश्न निर्माण झाला. अजूनही वन विभाग व आदिवासींमध्ये जमीनीच्या मालकी हक्कावरुन विवाद आहेत. मात्र वन हक्क कायदा २००६ ने हा अधिकार ग्रामसभेला दिला आहे. या कायद्यान्वये आदिवासी व्यक्ती आपल्या जमीनीच्या हक्काबाबतचा अर्ज वन हक्क समितीला देईल. वन हक्क समिती जागेची पाहणी करेल व त्यावर ग्रामसभा आपला ठराव पारीत करुन उपविभागीय समितीकडे पाठवील व उपविभागीय समिती याबाबतची शिफारस जिल्हा समितीकडे पाठवील. आदिवासींच्या जमीनीबाबत जिल्हा स्तरावरील समिती अंतिम निर्णय घेईल. आदिवासींनी आपल्या जमीनी वादाच्या समस्या ग्रामसभेमध्ये मांडून जिल्हा स्तरीय समितीकडून अशा समस्या सोडवून घेण्याचा अधिकाधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. या कायद्यांन्वये आदिवासींची जमीन व वनविभागाची जमीनीची मालकी निश्चित करण्यास मदत होईल व त्या आधारे जमीनीच्या अपूर्ण नोंदी अचूक करता येतील व अतिक्रमणाबाबतही निर्णय घेता येईल.

वन हक्क कायदा २००६ व पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ या दोन्ही कायद्यांमध्ये गौण वन उपजेवरील आदिवासींचा हक्क मान्य करण्यात आला आहे.[३३] अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्य करणे) २००६ मधील कलम २ (झ) मध्ये 'गौण वनोत्पादन' यामध्ये बांबू, खुरटी झाडे, खोड, वने, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा तेंदू पत्ता, औषधी वनस्पती, कंद मुळे, मुळे, लहान खोडे यांच्या सारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनाचा समावेश होतो अशी तरतूद केली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५४ अ (फ) मध्ये गौण वनौत्पादनाचे विनिमय, समुपदेशन, व्यवस्थापन आणि व्यापार याबाबत ग्रामसभेला अधिकार दिले असून पंचायतीने त्या प्रमाणे पुढील कार्यवाही करावयाची आहे. आपले हक्क मिळविण्यात काही अडचण येत असेल तर आदिवासींना ग्रामसभेच्या माध्यमातून अडचण दूर करणे आता शक्य झाले आहे.

गौण वनउपज ही अत्यंत महत्त्वाची वनसंपत्ती आहे. एकूण वनउपजेच्या फक्त ५ टक्के हिस्साच सध्या आदिवासींकडून वापर होतो. आदिवासी युवक युवतींना गौण उपजेवर प्रक्रिया करणारे

छोटे उद्योगधंदे, अन्य उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल तयार करणे अशा प्रकारचे प्रशिक्षण दिल्यास त्याच्या आर्थिक उन्नतीसाठी त्याचा निश्चितपणे उपयोग होईल. आदिवासींच्यासाठी ज्या योजना आहेत त्यातून यासाठी तरतूद करणे आज सहज शक्य झाले आहे.

तसेच वन हक्क कायदा २००६ व पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ अन्वये गौण वनउपजेवरील आदिवासींचा हक्क मान्य करण्यात आला आहे. तसेच अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला बाजाराचे नियमन करण्याचा देखील अधिकार प्राप्त झाला आहे. त्याच्या आधारे आदिवासींच्या हिताचे संरक्षण करता येते.

एकूणच वनहक्क कायद्यामुळे आदिवासींच्या जीवनात विधायक स्वरुपाचा बदल होत आहे.

## २.६ महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेची निर्मिती व उपयोजनेची उद्दिष्ट्ये :

आदिवासीची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, मध्यवर्ती सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्म क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करुन १९७५–७६ साली 'आदिवासी उपयोजना' तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनाला दिले. त्यानुसार १५ जिल्ह्यातील ६८ तालुक्यातील ५६२ गावे व १२ शहरांचा उपयोजनेत समावेश आहे. (ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा)

**योजनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेली होती.**[३४]

अ) सर्व स्तरांवर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी योजना आखणे.

ब) समाजाच्या मुख्य प्रवाहातून आदिवासी समाज अलग पडला आहे. त्याचा मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे, त्याकरिता दळणवळणाची साधने वाढविणे, शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती करुन देणे.

क) आदिवासींमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय व शोषण यामुळे ज्यांच्या जीवनात उदासिनता आहे. ती दूर करण्यासाठी आदिवासी तरुणांना व त्यांच्यावरील नव्या नेतृत्त्वाला स्वतःचा विकास करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.

ड) तोट्यात जाणारी आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपाययोजना करणे व त्यायोगे आदिवासींचे जीवनमान उंचावणे.

इ) आदिवासी विभागात शेती व्यवसायाला पूरक धंद्याचा अभाव आहे, तो दूर करणे.

ई) आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थांचे जाळे पसरून त्याद्वारा पतपुरवठा करणे, आदिवासींच्या शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.

वरील उद्दिष्ट्ये उपयोजनेत स्पष्टपणे मांडण्यात आलेली होती. ती साध्य करण्यासाठी उपयोजना क्षेत्रांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने १) सह्याद्री विभाग व २) गोंडवन विभाग असे दोन भाग करण्यात आलेले होते. या विभागाच्या कारभारासाठी दोन वेगवेगळे अतिरिक्त आयुक्त, नागपूर–नाशिक येथे नेमण्यात आलेले होते. त्यांच्या कार्यक्षेत्रातील कलेक्टर, आदिवासी उपायुक्त व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी, आदिवासी सह उपआयुक्त व प्रकल्प अधिकारी अशी यंत्रणा उभारण्यात आलेली होती. उपयोजनांतर्गत कार्यक्रमांची अंमलबजावणी व एकसूत्रीपणासाठी त्यांना प्रशासकीय अधिकार देण्यात आलेले होते. आदिवासी सहकारी सोसायट्यांच्या कार्यक्षमतेसाठी आदिवासी आयुक्तांना सहकार आयुक्ताचा दर्जा देण्यात आलेला आहे.

## २.६.१ महाराष्ट्रातील आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा १९७६ :–

आदिवासी क्षेत्रातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीची आजची पातळी व यापूर्वी केलेल्या प्रगतीशील प्रयत्नांच्या परिणामांचा अनुभव लक्षात घेता, आदिवासी जमातीतील लोकांचे जीवनमान सुधारुन आदिवासी व बाहेरील क्षेत्रातील प्रगतीच्या स्तरावरील अंतर कमी करणे हे आदिवासी उपयाजनेचे उद्दिष्ट्य आहे. राज्य शासनाने आदिवासी उपयोजना तयार करुन महाराष्ट्रातील

तत्कालीन १४ जिल्ह्यातील आदिवासींच्या प्रगतीची गती वाढविण्याचे मोठे पाऊल उचलले आहे. सावकारी व सौदेबाजी अस्तित्वात असल्यामुळे पिळवणूक करण्याच्या प्रथा दूर करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा, १९७६ हा एक व्यापक स्वरुपाचा कायदा अधिनियमित केला आहे. या कायद्याद्वारे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सावकार व व्यापारी यांना दूर केल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी बहुउद्देशीय आदिवासी सेवा सहकारी सोसायट्यांची स्थापना केली आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात २५८ आदिवासी सहकारी सोसायट्या चालू करण्याचे ठरविले होते. आतापर्यंत ३५४ आदिवासी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या आहेत.[३५] व त्यांचे कामकाज सुरु झाले आहे. ह्या आदिवासी सेवा सहकारी सोसायट्यांनी आदिवासी विकास महामंडळाचे सदस्यत्व स्वीकारले आहे.

आदिवासींची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाने आदिवासी जिल्ह्यातील १९७७–७८ मध्ये फक्त प्रथम २ व नंतर ७ तालुक्यांचे विनिर्दिष्ट अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांची एकाधिकार खरेदी योजना प्रस्तुत केली होती. १९७८–७९ मध्ये ही योजना राज्यातील ४० तालुक्यांसाठी लागू करण्यात आली व पुढे ती ६२ तालुक्यात लागू करण्यात आली. वर उल्लेख केलेल्या कायद्याखाली आदिवासी उपयोजना क्षेत्रात अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांच्या एकाधिकार खरेदीसाठी, आदिवासी विकास महामंडळ ही संस्था शासनाचे मुख्य एजंट म्हणून काम करीत आहे. आदिवासी विकास यंत्रणा १९९२ पर्यंत कार्यरत होती.

## २.६.२ श्री. रमेश पी वळवी समिती

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना करण्यासंबंधी सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आमदार श्री. रमेश पी वळवी यांच्या अध्यक्षतेखाली २० ऑगस्ट १९८० रोजी समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे[३६] –

१. वरीष्ठ पातळीपासून निम्न स्तरापर्यंत एकसुत्री नियंत्रण असणारी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे.

२. अनुसूचित क्षेत्राचा खास विकास करण्यासाठी राज्य स्तरावर तज्ञ प्रतिनिधी व्यक्ती असलेल्या मंडळाची किंवा प्राधिकरणाची निर्मिती करावी व या प्राधिकरणास जनजातीचा विकास

करण्यासाठी व जलद गतीने काम करण्यास शासनाने अनेक अधिकार प्रदाने करावेत. तसेच प्राधिकरणचा आर्थिक व्यवहारावरसुध्दा विधान सभेची तसेच लेखापालाचे नियंत्रण राहिल. या प्राधिकरणाचे नाव 'महाराष्ट्र आदिवासी विकास प्राधिकरण' असे ठेवण्यात यावे. प्राधिकरणाचे अध्यक्ष हे मंत्री आदिवासी विकास व उपाध्यक्ष हे राज्यमंत्री आदिवासी विकास कल्याण असावेत. राज्यमंत्री (वित्त) व राज्यमंत्री (नियोजन) हे पदसिध्द सभासद असावेत. याशिवाय इतर १० आदिवासी आमदारांची व २ खासदारांची नेमणूक शासनाने करावी. आदिवासींच्या विकासासाठी अनेक वर्षे झटलेले इतर व्यक्तीमधून ३ समाजसेवक नेमावेत.

३. या प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे मुख्य आयुक्त राहतील. त्यांच्यावर असलेली ही जबाबदारी पार पाडण्यासाठीच व राज्य स्तरावरील सचिव व तत्सम अधिकाऱ्यांकडून आदिवासी उपयोजना करुन घेण्यासाठी प्राधिकरणावरील आदिवासी मुख्य आयुक्तांचा अधिकार हा विशेष सचिव असे स्थान देऊन मंत्रालयाच्या स्तरावर काम करण्यासाठी त्यांना अधिकार द्यावे. आदिवासी कल्याण खात्याबरोबरच इतर खात्यांकडून आदिवासी क्षेत्रासाठी योजना करुन घेणे हे आयुक्तांचे प्रमुख कार्य आहे.

४. जितका आदिवासी प्रदेश दुर्गम व अवघड त्या प्रमाणात सवलती, सोई व भत्ते जास्त उपलब्ध करण्यात यावेत. त्यासाठी आदिवासी क्षेत्राचे अति दुर्गम व दुर्गम असे दोन भाग करण्यात यावेत.

५. आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाच्या ध्येयधोरणानुसार कार्यक्षम अशाच अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. कमी श्रेणीचे अथवा अकार्यक्षम अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती करु नये.

यासारख्या महत्त्वपूर्ण शिफारशी वळवी समितीने करुन आदिवासींच्या विकासाला दिशा देण्याचे काम केले.

### २.६.३ श्री. मधुकर पिचड समिती

आदिवासी उपयोजना महाराष्ट्रात सुरु झाल्यानंतर या आदिवासी सहकारी संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आमदार श्री. मधुकर पिचड यांच्या अध्यक्षतेखाली १९८४ साली समिती नेमली. या समितीने काही महत्त्वपूर्ण शिफारशी केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे[३७] –

१. आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र जास्तीत जास्त १० किलोमीटर असावे.

२. आदिवासी सभासदांच्या पीककर्ज थकबाकीचे दहा वार्षिक हप्त्यांत रुपांतर करण्यात यावे.

३. आदिवासी संस्थेवर राज्यातील इतर विविध कार्यकारी सहकारी संस्थांप्रमाणेच सचिवांची नियुक्ती करावी.

४. संस्थेचे रास्त भावाचे दुकान व्यवहारात सध्या मिळणारे कमिशन वाढवून व ज्यामुळे सर्व खर्च भागतील व संस्थेस नुकसान सोसावे लागणार नाही अशा रितीने कमिशन देण्यात यावे.

५. आदिवासी सहकारी संस्थेच्या सुरुवातीच्या १५ वर्षाच्या कालावधीपर्यंत अथवा ती स्वयंपूर्ण होईपर्यंत 'ना नफा ना तोटा' या तत्वावर काम करता येईल अशा प्रकारे व्यवस्थापकीय अनुदान देण्यात यावे.

६. आदिवासी भागातील असणाऱ्या विविध कार्यकारी संस्थांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कर्जपुरवठा व्हावा याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ५ वर्षाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार त्यांना कर्जपुरवठा होईल अशी व्यवस्था करावी.

७. काही आदिवासी संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर समितीस असे दिसून आलेले आहे की, संस्थेने बँकेच्या पीककर्ज दरानुसार केलेली पीककर्ज मागणीची रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संपूर्णपणे मंजूर करीत नाही. तसेच नवीन झालेल्या सभासदाला देखील काही ठिकाणी कर्ज दिले जात नाही. त्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारे शेती करणे शक्य होत नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी त्यांच्या पीककर्ज धोरणानुसार आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार संपूर्ण कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

८. आदिवासी सेवा सहकारी संस्थांना ऑडिट फी व सुपरव्हिजन फी माफ करण्यात यावी.

९. आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेचा घेतलेला निर्णय हा अंतिम असावा व त्यावर कोणत्याही प्रकारची अपील करण्याची तरतूद असू नये. याकरिता मा. राज्यपालांचा अध्यादेश काढून ही कार्यवाही करणे गरजेचे आहे.

१०. पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना त्यांचे अल्पमुदत व मध्यम मुदत कर्ज व्यवहार तसेच इतर व्यवहार हाताळण्यासाठी ४ ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्जाची आवश्यकता राहील. महाराष्ट्र राज्य सहकारी कायद्यातील तरतूदीनुसार प्रत्येक आदिवासी सेवा सहकारी संस्थेला तिच्या स्वनिधीच्या (तोटे वजा जाता) दहापट कर्जाची उचल करता येते. म्हणून वरील मर्यादेपर्यंत उचल करता यावी. यासाठी प्रत्येक आदिवासी सेवा सहकारी संस्थेस ५० हजार रुपयांचे शासकीय अर्थसहाय्य शासनाने भाग भांडवल म्हणून उपलब्ध करुन द्यावी.

११. आदिवासी संस्थांना खते, बी–बियाणे इत्यादींचा रोखीचा व्यवसाय करता यावा. याकरिता आदिवासी विकास महामंडळाने रास्त दराने वरील सामग्रीचा पुरवठा हा आदिवासी संस्थांना रोखीने करावा अशी पध्दत अंमलात आणल्यास आदिवासी संस्थांना एक निश्चित स्वरुपाचा व किफायतशीर व्यवसाय निर्माण होईल व स्थानिक पातळीवर रास्त दराने खते, बी–बियाणे उपलब्ध झाल्यास तेथील सभासदांचा खताचा वापर करण्याच्या वृत्तीत वाढ होईल.


१२. पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्था या 'ना नफा ना तोटा' या तत्वावर चालविणेसाठी शासनास सर्वसाधारणेपणे रुपये ३०,०००/– अनुदान प्रती वर्षी प्रत्येक पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थेस द्यावे लागेल. तथापि वरील व्यवस्थापकीय अनुदान एखाद्या विशिष्ट रकमेपर्यंत सीमित न करता संस्थेस होणाऱ्या तोट्याइतकेच असणे आवश्यक आहे. म्हणजे सरासरीपेक्षा कमी व्यवहार असलेल्या संस्थांना त्यांचा खर्च व उत्पन्न यातील तफावती इतके व्यवस्थापकीय अनुदान प्राप्त होईल व त्यांचे कामकाज सुरळीतपणे चालू शकेल.

१३. आदिवासी संस्थेच्या कार्यक्षेत्रात समान उद्दिष्ट्ये असलेली संस्था काढण्यात येऊ नये.

यासारख्या महत्त्वपूर्ण शिफारसी पिचड समितीने करुन आदिवासींचे जीवनमान उंचावण्या संदर्भात भूमिका घेतल्याचे दिसून येते.

## २.६.४ आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन – प्रशासकीय संरचना :

आदिवासी विकास विभागाची क्षेत्रीय यंत्रणा एकछत्री नियंत्रणाखाली आणून प्रभावी प्रशासन होण्याच्या हेतूने व आदिवासी विकासाच्या कार्यक्रमाची योग्य व प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या उद्देशाने दिनांक १५ जानेवारी १९९२ पासून आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना करण्यात आली. या विभागाचा नवीन आकृतीबंध खालीलप्रमाणे ठरविण्यात आला.[३८]




आदिवासी प्रदेशातील योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी नियमित निरीक्षण व आढावा हे पूर्वापेक्षित आहे. म्हणून राज्य सरकारने प्रकल्प स्तरावरील अंमलबजावणी समित्या स्थापन केल्या. यामध्ये विधानसभेतील आदिवासी प्रतिनिधी हा या समितीचा अध्यक्ष असतो. या समितीच्या इतर सदस्यांमध्ये जर विधानसभेवर आणखी प्रतिनिधी असतील तर अतिरिक्त आदिवासी आयुक्त हे उपाध्यक्ष, प्रकल्प प्रदेशातले लोकसभेतील आदिवासी प्रतिनिधी हे विशेष निमंत्रीत, त्याच प्रकल्पाच्या

/ प्रदेशांतल्या जिल्हा परिषदांच्या समाज कल्याण समिती व महिला व बालकल्याण समितीचे अध्यक्ष ही निमंत्रित असतात.

पंचवार्षिक योजना व आदिवासी उपयोजनेत राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे हे या समितीचं काम आहे. प्रकल्प स्तरावर आखल्या जाणाऱ्या योजनांच्या नियोजन प्रक्रियेतही ही समिती सहभागी असते. या समितीद्वारे आदिवासी उपयोजना आखतांना व त्यांची अंमलबजावणी होतांना त्यात आदिवासी लोकप्रतिनिधींचा सहभाग निश्चित केला जातो.

१९९६–९७ या वर्षाकरिता राज्याच्या एकूण नियोजनाच्या ७.४८% नियतव्यय देण्यात आला. १९९७–९८ या वर्षाकरिता ५५४.०० कोटी रुपये एकूण नियतव्यवसायाच्या ९ टक्के नियतव्यय आदिवासी विकास विभागाकरिता प्रस्थापित करण्यात आला होता. हळूहळू आदिवासी उपयोजनेच्या नियतव्यय राज्य नियोजन आराखड्याच्या ९% पर्यंत उपलब्ध करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. नियोजन प्रक्रियेतील या महत्त्वाच्या बदलामुळे आदिवासी जनतेची उन्नती होण्यास मदत होत आहे.

**प्रशासकीय समित्या :**

**१. महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषद :**

या मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. मा. मंत्री, आदिवासी विकास हे समितीचे पदसिध्द उपाध्यक्ष असतात. समितीत आदिवासी आमदार, खासदार आणि आदिवासी भागांतील दोन कार्यकर्त्यांचा समावेश असतो. या समितीद्वारे शासन आदिवासींच्या हिताचे संरक्षण व विकासाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता मार्गदर्शन केले जाते व सल्ला दिला जातो. या समितीला भारतीय संविधान कलमान्वये विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. या समितीचा सल्ला सरकारवर बंधनकारक नसला तरी शासनाला तो टाळता येत नाही. विशेष अधिकार वापरण्यासाठी राज्यपालांना सल्ला देणारी ही समिती समजली जाते.

## २. अनुसूचित जमाती कल्याण समिती :

आदिवासी विकासाच्या कामांचा वेळोवेळी आढावा घेऊन देखरेख ठेवण्यासाठी व सुधारणा सुचविण्यासाठी महाराष्ट्र विधान मंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीची स्थापना केली जाते. ज्यात फक्त विधानसभेच्या व विधानपरिषदेच्या १५ सदस्यांचा समावेश असतो. त्यापैकी एका सदस्यास मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, समिती प्रमुख म्हणून नामनियुक्त करतात.

## ३. प्रकल्पस्तरीय समिती :

आदिवासी उपयोजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी प्रकल्प स्तरावर या समितीचे गठण केलेले असते. या समितीचे अध्यक्ष त्या भागातील आदिवासी आमदार असतात. या समितीची रचना खालीलप्रमाणे असते.

| | | |
|---|---|---|
| १. | अ) प्रकल्प क्षेत्रातील आदिवासी विधानसभा सदस्य | अध्यक्ष |
| | ब) प्रकल्प क्षेत्रातील आदिवासी विधानसभा नसतील तर शासन नियुक्त पंचायत समितीचे सभापती किंवा शासन नियुक्त प्रमुख आदिवासी व्यक्ती. (एकापेक्षा जास्त आदिवासी विधानसभा / विधानपरिषद सदस्य असल्यास उर्वरित समितीचे सदस्य राहतील.) | सदस्य |
| २. | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास | उपाध्यक्ष |
| ३. | प्रकल्प क्षेत्रातील संसद सदस्य (लोकसभा / राज्यसभा) | विशेष निमंत्रीत |
| ४. | जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीचे सभापती व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती | निमंत्रित |
| ५. | प्रकल्प क्षेत्रातील शासनाने नियुक्त करावयाचे अशासकीय सदस्य (यामध्ये अनु. जमातीची १ महिला सदस्य | ३ सदस्य |

व अनु. जमातीतील २ पुरुष सदस्य)

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रकल्प क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक किंवा सहाय्यक प्रादेशिक व्यवस्थापक | सदस्य |
| ७. | प्रकल्प क्षेत्रातील सर्व आदिवासी विकास योजनांचे जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी अधिकारी | सदस्य |
| ८. | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य–सचिव |

राज्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासींच्या कल्याणासाठी कोणकोणत्या योजनांवर भर दिला पाहिजे या संबंधीच्या प्रकल्प समित्यांच्या शिफारशी आदिवासी विकास विभागाचे आयुक्त शासनाला करु शकतात.

## ४. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र उच्चाधिकार समिती :

आदिवासींना दिलेल्या निरनिराळ्या सवलतीचा गैरफायदा घेणाऱ्या बिगर आदिवासींच्या प्रयत्नांना आळा घालण्याबाबत उपाययोजना करण्यासाठी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र उच्चाधिकार समिती गठीत करण्यात येते.

या समितीची रचना खालीलप्रमाणे असते.

| | |
|---|---|
| १. मंत्री, आदिवासी विकास | अध्यक्ष |
| २. राज्यमंत्री, आदिवासी विकास | उपाध्यक्ष |
| ३. विधानसभा सदस्य | ३ सदस्य |
| ४. सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ५. आयुक्त, आदिवासी विकास | सदस्य |
| ६. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | सदस्य–सचिव |

### ५. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे नियामक मंडळ :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकरिता मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची स्थापना करण्यात येते. यात अशासकीय सदस्य म्हणून मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिक विज्ञान, संग्रहालय शाखातील तज्ञ आणि आदिवासी क्षेत्रात काम करणारे अनुभवी, सेवाभावी संस्था, प्रतिनिधींचा समावेश असतो.

### ६) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती :

महसूल विभागातील तालुका उपविभागीय व जिल्हा दंडाधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रांची तपासणी करण्याकरिता पुणे, नाशिक व नागपूर येथे शासन तीन समित्या स्थापन करते. त्याची रचना खालीलप्रमाणे असते.

| | |
|---|---|
| १. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था | अध्यक्ष |
| २. अपर आयुक्त, आदिवासी विकास (संबंधित विभाग) | सदस्य |
| ३. उपसंचालक (सं) (संबंधित विभाग) | सदस्य–सचिव |

या समित्यांचे कार्य अर्थन्यायिक स्वरुपाचे असते. यांच्या निर्णयावर फक्त उच्च न्यायालयातच आपील करता येते.

## २.७ आदिवासी विकासाचा बहुउद्देशीय कार्यक्रम :

आदिवासी उपयोजना कार्यक्रमांतर्गत आदिवासी क्षेत्र विकासाला व आदिवासी कुटूंब कल्याणाला केंद्र मानून विकासाचे कार्यक्रम आखण्यात येतात. जिल्हा पातळीवर कार्यालयीन अधिकाऱ्याच्या सहकार्याने प्रकल्पस्तरीय समिती जिल्हा नियोजनाचा आराखडा तयार करते. आराखडा जिल्हा नियोजन व विकास मंडळापुढे मान्यतेसाठी ठेवला जातो. मान्यतेच्या शिफारशीनंतर आराखडा शासनास (आदिवासी विकास विभागास) सादर करुन अंतिम मान्यता घेण्यात येते.

आदिवासी उपयोजनेच्या नियोजनाची संपूर्ण जबाबदारी १९९३–९४ पासून आदिवासी विकास विभागावर सोपविण्यात आली आहे. सन २०११–१२ ची आदिवासी उपयोजनेसाठी नियोजन विभागाने रु. ३६९३.५० कोटी एवढा अर्थसंकल्पीत होणारा नियतव्यय निश्चित करुन दिलेला आहे.

आदिवासी विकासाचा कार्यक्रम शासकीय चौकटीच्या नऊ विभागात आखला जातो. ते विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

१. कृषी व संलग्न सेवा.
२. ग्रामीण विकास
३. पाटबंधारे व पूरनियंत्रण
४. विद्युत विकास
५. वाहतुक व दळणवळण
६. उद्योग व खनिजे
७. सामाजिक व सामूहिक सेवा
८. विशेष क्षेत्रीय कार्यक्रम

## १. कृषी व संलग्न सेवा :

या विकास संवर्गात पीकसंवर्धन, फलोत्पादन, मृदू व जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्य व्यवसाय विकास, वन, सहकार व भांडारे वखारी या विभागांच्या विविध योजनांचा समावेश होतो. आदिवासी लोकसंख्येच्या ८८% लोक शेतीवर आपली उपजिविका करतात. ही शेती डोंगराळ भागात असल्याने शेती विकासासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करते. आदिवासी शेतकऱ्यांना अन्नधान्य तसेच बी–बियाणे, खरेदीकरिता अनुदान दिले जाते. हा कार्यक्रम केंद्रपुरस्कृत असल्याने केंद्रसरकार ७५% व राज्यसरकार २५% या प्रमाणात निधी उपलब्ध होतो. शेतीला लाभपात्र करण्याकरिता सुधारित शेती अवजारे खरेदीसाठी अनुदान दिले जाते. पाणी पुरवठ्याकरिता तुषार व ठिबक सिंचन योजना वापरली जाते. विहिरी खोदण्यासाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. आदिवासी शेतकरी कुटुंबाला दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी देखील अर्थसहाय्य दिले जाते.

## २. फलोद्यान :

फलोत्पादन कार्यक्रमात रोप, मळे तयार करण्याचे काम हाती घेण्यात येते. आदिवासी शेतकऱ्यांना फलोत्पादनाचा सुधारीत कार्यक्रम समजावून सांगण्यासाठी एक आठवड्याचे प्रशिक्षण दिले जाते. गावठी बोर, आंबा, काजू झाडांचे सुधारीत प्रजातीच्या झाडांमध्ये रुपांतर केले जाते. तसेच रोजगार हमीद्वारेही फलोत्पादनाचा कार्यक्रम आदिवासींच्या क्षेत्रांमध्ये घेतला जातो.

## ३. मृद व जलसंधारण :

आदिवासी भागांत सखोल पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमावर भर देण्यात आलेला आहे. यामध्ये बांधबंदिस्ती, भूविकास, नालाबांध करणे, कोल्हापूर बंधारे वगैरे कामे केली जातात.

शेतीला जोडधंदा म्हणून पशुसवर्धन, पशुवैद्यकीय सेवा, पशुआरोग्य राखण्यासाठी पशू प्रथमोपचार केंद्रे, पशुवैद्यकीय केंद्रे व फिरते पशुवैद्यकीय दवाखाने यावर भर देण्यात आला आहे.

## ४. दुग्धविकास :

आदिवासींना दुग्ध व्यवसाय विकास व सुधारित पशुपालन पध्दतीची माहिती देण्याकरिता एक आठवड्याचे प्रशिक्षण दिले जाते. एक वर्ष वयाच्या उच्च पैदास क्षमतेच्या पाड्यांचे वाटप केले जाते. भाकड–गाभण म्हशीचे वाटप देखील केले जाते. दारिद्र्य रेषेखाली असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना ८०% अनुदानावर ३००० रु. किंमतीपर्यंतची दुभती जनावरे पुरविली जातात. आदिवासी सहकारी दुग्ध संस्थांना भांडवली अनुदान देण्याची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.

## ५. वने :

वनविभागाच्या कार्यक्रमात रोपवाटिकेची स्थापना, औद्योगिक व व्यापारी प्रयोजनासाठी प्रजातीय वनलागवडी व निकृष्ठ वनात वैरण साधनसंपत्तीचा विकास यांचा समावेश करण्यात आला आहे.

सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमात खाजगी शेतकऱ्यांच्या जमीनींवर वनीकरण करणे व निवडक पाणलोट क्षेत्रातील सामूहिक जमिनीवरील वृक्षलागवडीचा कार्यक्रम घेणे असा आहे.

## ६. सहकार :

सहकार चळवळ ही आदिवासी क्षेत्रात आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. सहकारी संस्थांना भाग भांडवल, अंशदान कर्ज व व्यवस्थापकीय अनुदान शासनामार्फत देण्यात येते. कर्जफेडीसाठी सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरिता व स्वस्त धान्य दुकान व्यवस्थापनासाठी अनुदान दिले जाते.

## ७. ग्रामीण विकास :

ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत दारिद्र्य निर्मूलन करण्याच्या कामावर भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील आदिवासींना रोजगार उपलब्ध करुन देणे, ग्रामीण जीवनाचा दर्जा उंचावणे यांसारखी कामे घेतली जातात. या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्य रेषेखालील आदिवासींना लाभ दिला जातो. ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत खालील विकास कार्यक्रम घेतले जातात.

१. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
२. अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम
३. जवाहर रोजगार योजना
४. जमीन सुधारणा कार्यक्रम
५. सामूहिक विकास व पंचायत

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, ग्रामीण कारागीर यांचे गट तयार केले जातात व या गटांच्या आर्थिक विकासासाठी उत्पादक कार्यक्रम घेऊन त्यांना कर्ज व अनुदान स्वरुपात अर्थसहाय्य दिले जाते.

## ८. पाटबंधारे व पूरनियंत्रण :

आदिवासी हे प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात. त्यांची शेती डोंगरमाथ्यावर किंवा डोंगर उतारावर असते. पाटबंधारे प्रकल्पाचा फायदा जास्तीत जास्त आदिवासींना होईल. अशा प्रकल्पांना आदिवासी उपयोजनेतून आदिवासी लाभ धारकांच्या प्रमाणानुसार सहाय्य देण्याचे धोरण आहे. आदिवासी भागातील प्रकल्पाचा फायदा बिगरआदिवासींना होत असला तरी प्रकल्प आदिवासी भागात असल्यामुळे बिगर आदिवासींच्या योजनांवरील खर्चातून भागविण्यात येतो. १५० हेक्टरपर्यंतची लहान पाटबंधाऱ्यांची कामे स्थानिक क्षेत्रातून म्हणजे जिल्हा परिषदेकडून केली जातात. यामध्ये प्रामुख्याने लहान पाटबंधारे, तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, भूमिगत बंधारे, पाझर तलाव, उपसा जलसिंचन योजना यांसारखी कामे केली जातात तर २५० हेक्टरवरील प्रकल्पांची कामे सिंचन विभागामार्फत केली जातात.

## ९. भूविकास :

सिंचनक्षमतेची वाढ करण्याच्या दृष्टीने आदिवासी क्षेत्रात भूविकास करण्याचे काम ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत केले जाते.

## १०. विद्युत विकास :

वीज ही पायाभूत सुविधा असल्याकारणाने तिचा प्रत्येक क्षेत्रातील विकासावर परिणाम होतो. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांना, पाड्यांना, वाड्यांना विद्युत पुरवठा करणे व कृषीपंपाना वीजपुरवठा करणे हा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. तसेच ३३ केव्हीची उपकेंद्रे उभारणे व ३५ एम.व्ही.ए. क्षमतेची ट्रान्सफॉर्मर्स कार्यान्वित करणे हे देखील कार्यक्रम घेण्यात येतात. सन २०१०–११ मध्ये आदिवासी उपयोजनेमध्ये टी.एस.सी. क्षेत्रासाठी २६.६९ कोटी निधी मंजूर करण्यात आला. मात्र २१.६२ कोटी रुपये खर्च करण्यात आला तर ओटिएसपी क्षेत्राकरिता ५.६६ कोटी निधी मंजूर करण्यात आला पण ४.२० कोटी रु. खर्च करण्यात आला तर सन २०११–१२ मध्ये या योजनेत टिएसपी क्षेत्राकरिता रुपये ५२.५६ कोटी तर ओटीएसपी क्षेत्राकरिता रुपये ७.८० कोटी निधीची तरतूद केली आहे.

**११. वाहतूक व दळणवळण :**

वाहतूक व दळणवळणासाठी शासनाकडून रस्ते बांधण्याकरिता विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ५०० ते १००० लोकवस्ती असलेली गांवे मुख्य रस्त्याला जोडते. अशा प्रकारच्या कामाबरोबरच दुर्गम भागातील रस्ते तयार करुन ते मुख्य रस्त्याला जोडणे या कामास प्राधान्य देण्यात आलेले आहे. तसेच राज्य शासनाने दुर्गम गावांसाठी रस्त्यांच्या बांधकामाचा मास्टर प्लॅन तयार केला आहे. या क्षेत्रांमध्ये वनक्षेत्राचा समावेश असल्याने केंद्र शासनाच्या वनसंवर्धन अधिनियम, १९८० अन्वये केंद्र शासनाकडून पूर्वपरवानगी घेऊन ही कामे करण्यात येतात.

**१२. उद्योग व खनिजे :**

सुशिक्षित बेरोजगारांना आपला स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी बीजभांडवल देण्यात येते. १८ ते २५ वयोगटातील उद्योजक हे घेण्यास पात्र ठरतात. त्यांना १,००,००० पर्यंतच्या प्रकल्पांना १० टक्के व्याजाने कर्ज २२.५ टक्के बीजभांडवल दिले जाते.

**१३. सामाजिक व सामूहिक सेवा :**

शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषदेतर्फे चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळा, आदिवासी विद्यार्थ्यांना पोशाख, पुस्तके इत्यादींसारखे साहित्यही पुरविले जाते. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच शिष्यवृत्तीच्या काही योजनाही राबविण्यात येतात. आदिवासी विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण देण्याकरिता व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे, शासकीय तंत्र विद्यालये उघडण्याची योजना राबविली जाते. आदिवासी गावांमध्ये व्यायामशाळा उघडणे, उपलब्ध शाळांचा, क्रीडांगणाचा विकास करणे, शैक्षणिक संस्थांना खेळ साधनसामग्रीचा पुरवठा करणे हे कार्यक्रम घेण्यात येतात.

**१४. सामान्य आर्थिक सेवा :– स्थानिक विकास कार्यक्रम**

स्थानिक विकासामध्ये छोटी कामे जी दोन वर्षात पूर्ण होणारी असतात. उदा. रस्ते, लहान पूल, जोडरस्ते, प्राथमिक शाळांचे बांधकाम, समाजमंदिर बांधकाम, कोल्हापूर पध्दतीचा बंधारा अशा प्रकारची कामे घेतली जातात.

## १५. सार्वजनिक आरोग्य :-

आदिवासी भागात विशेषतः दुर्गम भागांत दरवर्षी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालये उघडली जातात. आतापर्यंत आदिवासी उपयोजना क्षेत्रांत ७३ ग्रामीण व कुटीर रुग्णालये, ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २०५५ उपकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या रुग्णालयांना क्ष किरणे यंत्रे, रुग्णवाहिका, फर्निचर, साधनसामग्री, यंत्रसामग्री व अवजारे पुरविण्यात येतात. राज्यशासनाकडून हिवताप निर्मूलन, एड्स निर्मूलन, हत्तीरोग निर्मूलन, नेत्ररुग्णालयाची स्थापना, आश्रमशाळा, विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी यासारखे कार्यक्रम घेण्यात येतात.

## १६. मागासवर्गीयांचे कल्याण :

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, शासकीय वसतिगृह चालविणे, शासकीय अनुदानित आश्रमशाळा सुरु करणे व चालविणे. आदिवासी मुलांचे भरतीपूर्व प्रशिक्षण चालविणे, शेती विकासाकरिता विद्युतपंप / तेलपंप पुरवठा, आदिवासींच्या घरावरील गवती छप्पर बदलून मंगलोरी कौलांचा पुरवठा इत्यादी योजना घेण्यात येतात.

आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून महाराष्ट्रात एकूण ११७६ आश्रमशाळा (५५२ शासनामार्फत व ५७४ स्वयंसेवी संस्थांमार्फत) चालविल्या जात आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाशिवाय भोजन, निवास, पाठ्यपुस्तके, लेखनसामग्री, गणवेश वगैरेच सोयी मोफत दिल्या जातात. शिवाय ३ ते ५ वयोगटातील मुलांसाठी अंगणवाड्या उघडल्या आहेत.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्यात शासनाकडून सन २०११-२०१२ या वर्षापर्यंत ४७१ वसतिगृहे चालविण्यात येत असून त्यापैकी १९५ वसतिगृहे खास मुलींसाठी व उर्वरित २७६ वसतिगृहे मुलांसाठी आहेत. या वसतिगृहांतून एकूण ३९४२३ प्रवेशित विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत.

## १७. विशेष क्षेत्रीय कार्यक्रम :

आदिम जमातींसाठी विशेष योजना : महाराष्ट्र राज्य शासनाने आदिम जमातीच्या उत्थानासाठी आतापावेतो सर्वसाधारण नियोजन पध्दती अवलंबिण्यात आली होती. परंतु विशेष प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नव्हते. आदिम जमाती अत्यंत मागासलेल्या असल्याने आदिवासी जमातीपेक्षा आदिम जमातींसाठी जादा व कायमस्वरुपी अनुदाने उपलब्ध करावीत असे राज्य व केंद्र शासनाने धोरण ठेवले आहे.

## २.८ आदिवासी विकास विभागाच्या योजना :

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची व त्यांची सामाजिक अन्याय व इतर पिळवणूकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वाला अनुसरुन पाचव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमांवर भर देण्यात आला होता. परंतु 'व्यक्ती' हा केंद्रबिंदू मानून विकास योजना परिणामकारक होऊ शकली नाही हे दिसून आल्याने ह्या व्यक्तींचा परिसराचा विकास करणे आवश्यक वाटल्याने क्षेत्र विकास संकल्पना अस्तित्वात आली. क्षेत्र विकसित केल्यास त्या व्यक्तिंचाही विकास होईल असे मानण्यात आले व ही विचारप्रणाली प्रत्यक्षात अंमलात आणण्यात आली. क्षेत्र व परिसर विकासांत शिक्षण, तंत्रशिक्षण, स्वास्थ केंद्रे, कृषीकेंद्रे, दुग्धविकास केंद्रे त्यांच्या विकासासाठी आवश्यक असलेले आधारभूत विकास कार्यक्रम यांचा प्रामुख्याने विचार करण्यात येतो.

आदिवासी विकास विभागाच्या योजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. शासकीय आश्रमशाळा.

२. शासकीय कनिष्ठ महाविद्यालये.

३. आदिवासी शासकीय वसतिगृह

४. अनुदानित आश्रमशाळा

५. भारत सरकार शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत)

६. आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंपाचा पुरवठा

७. मागासवर्गीय गृहनिर्माण योजना

८. गृहनिर्माण मंडळ व प्राधिकरण गृहनिर्माण मंडळ यांच्या योजने अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांमध्ये ६% गाळे आदिवासींना राखीव ठेवणे.

९. आदिवासींना नोकरीविषयक सवलती

१०. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवा योजना.

११. आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजना प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र

१२. आदिवासींच्या पारंपारिक नृत्यस्पर्धा.

१३. आदिवासी संशोधन प्रकल्पास आर्थिक मदत (शिष्यवृत्ती)

१४. आदिवासी सेवक राज्य पुरस्कार व 'आदिवासी सेवक संस्था' राज्य पुरस्कार.

१५. आदिवासी जनजागृती व माहिती सप्ताह

१६. आदिवासी हस्तकला प्रदर्शन

१७. आदिवासी जमाती प्रमाणपत्र तपासणी

**आदिवासी विकास योजना : न्यूक्लिअस बजेट :–**

आदिवासी विकास कार्यक्रमाच्या योजनांमध्ये स्थल, कालानुरुप लवचिकता व अभिनवता आणणे आवश्यक असल्याने त्यासाठी सुयोग्य असे विविध कार्यक्रम स्थानिक पातळीवरच मंजूर करुन तातडीने कार्यान्वित व्हावेत या उद्देशाने सन १९८१–८२ पासून केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत 'न्यूक्लिअस बजेट' या नावाने एक स्वतंत्र निधी स्थानिक गरजेनुसार वैयक्तिक विकासाची कामे / उपक्रम घेण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास सुरुवात करण्यात आली.

आदिवासींचा सर्वांगीण विकास साधण्याचे न्यूक्लिअस बजेट हे प्रभावी साधन आहे हे लक्षात घेऊन या योजनेचे चार प्रमुख गट पाडण्यात आले आहेत.

**उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना :**

यामध्ये सिंचनासाठी कूपनलिका, पाईप पुरवठा, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन, फळबाग विकास, मत्स्य व्यवसाय विकास, कुटिरउद्योग, हस्तकला, व्यवसाय इत्यादीचा समावेश होतो.

**प्रशिक्षणाच्या योजना :–**

यामध्ये विविध स्पर्धात्मक परिक्षांची पूर्वतयारी व उद्‌बोधन वर्ग चालवणे, संगणक प्रशिक्षण, शिवणकाम, सुतारकाम, वायरमन, रेडियो / दूरदर्शन दुरुस्ती प्रशिक्षण, पोलीस भरती, सैन्य भरती प्रशिक्षण, परिचारिकांसाठी प्रशिक्षण वर्ग, बँकींगमधील प्रशिक्षण, यांसारख्या प्रशिक्षणात्मक योजनांचा समावेश या गटात होतो.

**मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना :–**

यामध्ये शिक्षण, आदिवासींच्या पारंपारिक कलाकृतीचे प्रदर्शन, पारंपारिक नृत्यकलेचे जतन व संवर्धन, पारंपारिक लोकगीतांचा, कथांचा संग्रह करणे, युवा महिला मंडळाचे मेळावे, शिबिरे, आश्रमशाळा शिक्षकांसाठी कार्यशाळा / उद्‌बोधन वर्ग इ. चा समावेश या गटात होतो.

**आदिवासी कल्याणात्मक योजना :–**

या गटात आदिवासी घरांचे विद्युतीकरण, आदिवासींच्या आपत्कालीन किंवा अपवादात्मक विशेष प्रसंगी आर्थिक सहाय्य, आदिवासींचे सामुहिक विवाह आयोजित करणे व संसारोपयोगी वस्तूचे सहाय्य करणे इ. योजनांचा समावेश या गटात होतो.

**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना :-**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा, १९६० अन्वये महाराष्ट्र सरकारने मार्च १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ ही संस्था स्थापन केली. त्याचे मुख्यालय नाशिक येथे आहे. आदिवासी क्षेत्रातील अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांच्या एकाधिकार खरेदीसाठी आदिवासी विकास योजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**एकाधिकार धान्य खरेदी योजना**

१. अ) आदिवासी सोसायटयांमार्फत धान्य खरेदी केंद्रे

ब) गौन वनोत्पादनाची खरेदी.

२. गरीब आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज योजना.

३. विद्युतपंप व तेलपंप पुरवठा व जोडणी योजना.

४. गॅस युनिट पुरवठा योजना.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ.**

**सुशिक्षित बेकार आदिवासी तरुणांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना :**

महामंडळाने आत्मनिर्भरतेच्या दृष्टीकोनातून काही आर्थिक विकासाच्या योजना राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय व विकास संस्थेच्या व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने सुरु केलेल्या आहेत. उदा. सारथी ऑटो रिक्षा योजना, कल्पतरु फोटो स्टॅट मशीन योजना, टेम्पो ट्रॅक्स, ट्रॅक्टर व ट्रक पुरवठा इ.

या सर्व उपक्रमांचे वैशिष्ट्य म्हणजे लाभार्थींनी प्रकल्प योजनेच्या सुमारे १० टक्के पर्यंत वैयक्तिक सहभाग दिल्यास प्रकल्प खर्चाची सुमारे ९० टक्के इतकी रक्कम कर्जरुपाने व विशेषतः ६ टक्के सरळव्याजाने मिळते.

अशा प्रकारे वरिल आदिवासी विकास विभागांच्या या विविध योजनांच्या माध्यमांतून आदिवासी समाजाच्या विकासाची वाटचाल सुरु आहे.

संदर्भसूची :


१. पुरी चंद्रकांत, आदिम समाजाचा विकास एक चिकित्सक अभ्यास, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, प्रथम आवृत्ती २८ डिसें. २०१०, पृ. ७.

२. देवगावकर एस. जी., आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – २३ फेब्रुवारी २०११, पृ. २४.

३. पुरी चंद्रकांत, आदिम समाजाचा विकास एक चिकित्सक अभ्यास, परममित्र पब्लिकेशन्स, मुंबई, प्रथमावृत्ती – २८ डिसेंबर २०१०, पृ. ३.

४. उपरोक्त, पृ. ४.

५. लोटे रा. ज., आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै, २०१०, पृ. ३, ४.

६. वर्मा आर. सी, भारतीय जमाती काल, आज आणि उद्या, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण, मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, २००३, पृ. २.

७. Gillin and Gillin – Cultural Socieology, The Macmillan Co. Ltd., New York, 1950, P. – 282.

८. Majumdar D. N., Races and Culture of India, Asia Publishing House, Bombay, 1958, P. 356.

९. Ibid, P. 355.

१०. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २०००, पृ. २.

११. उपरोक्त.

१२. जिल्हा वार्षिक उपयोजना २००३–२००४, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, मुंबई, पृ. २५२

१३. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑक्टोंबर २००९, पृ. ४२.

१४. गारे गोविंद, वारली चित्र संस्कृती, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, पृ. १४४.

१५. कोडीतकर सुरेश, आदिवासी जीवन कथा आणि व्यथा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च २००८, पृ. २७.

१६. देवगाकर एस. जी., आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २३ फेब्रुवारी २०११, पृष्ठ क्र. १९३–९४

१७. देवगांवकर एस. जी., देवगांवकर शैलजा, डुमरे जयमाला, सामाजिक चळवळी, (परंपरागत आणि नवीन), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २००९, पृ. ४.

१८. मुखर्जी रविंद्रनाथ, सामाजिक मानवशास्त्र की रुपरेषा, विवेक प्रकाशन, दिल्ली, २००८, पृ. ४४८.

१९. गारे गोविंद, स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००४, पृ. १ ते ३.

२०. निकम गौतम, क्रांतीकारी आदिवासी जननायक, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगांव, जि. जळगांव, प्रथम आवृत्ती, १७ ऑक्टोंबर २०१०, पृ. १९ ते २१.

२१. गायकवाड दिपक, आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट, पृ. ५० ते ५२.

२२. गारे गोविंद, आदिवासी वीर पुरुष, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १५ डिसेंबर १९९४, पृ. २६–२७.

२३. Singh K. S., Tribal Society in India, An Anthropo Histoical perspective, Manohar Publication, Delhi, 1985, P-121.

२४. मडावी शेषराव एन, आदिवासी महानायकांचे चरित्र, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती, मार्च २०१०, पृ. ६३.

२५. आगलावे प्रदिप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती, फेब्रुवारी २०११, पृ. ३३५, ३३६.

२६. गारे गोविंद, आदिवासी विकासातील दिपस्तंभ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २५ डिसेंबर २००३, पृ. १७५.

२७. वर्मा आर. सी., भारतीय जमाती : काल, आज आणि उद्या, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, २००३, पृ. १३३, १३५.

२८. Elwin Verrier, Philosophy of Nefa, 1952, Introduction of literature written by Pandit J. Nehru.

२९. ढेबर समिती अहवाल, भारत सरकार, आदिवासी विकास मंत्रालय, १९६०–६१.

३०. देसाई जयराम, सहकार जगत, आदिवासी विशेषांक, सहकार मुद्रणालय, पुणे, जुलै १९७६, पृष्ठ ५३–५४.

३१. भुरिया समिती अहवाल, भारत सरकार, ग्रामीण विकास विभाग, १९९५–९६.

३२. वाघमारे एम. एल., पंचायत क्षेत्र विस्तार कायदा, १९९६ आणि आदिवासी विकास, सौ. वैशाली वाघमारे प्रकाशन, हडपसर, पुणे – २७, प्रथमावृत्ती – जुलै २०११, पृष्ठ ५१, ५२, ५३.

३३. देवगावकर एस. जी., आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – २३ फेब्रुवारी २०११, पृ. १९६.

३४. आदिवासी विकास विभाग (आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाहेरी क्षेत्र), कार्यक्रम अंदाजपत्रक २०१२–२०१३, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर, २०१२, पृ. १.

३५. उपरोक्त, पृ. १११.

३६. वळवी समिती अहवाल, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, सन १९८०–८१

३७. मधुकर पिचड समिती अहवाल, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, सन १९८४–८५.

३८. गारे गोविंद, आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृष्ठ १४–१६.

प्रकरण तिसरे

# आदिवासी नेतृत्त्व


| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १२८ |
| ३.१ | नेतृत्व | १२८ |
| ३.२ | राजकीय नेतृत्व | १३१ |
| ३.३ | स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय नेतृत्व | १३३ |
| ३.४ | स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींसाठी काम करणारे नेतृत्व | १३९ |
| ३.५ | आदिवासी चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व | १४७ |
| ३.६ | आदिवासींमधून पुढे आलेले राजकीय नेतृत्व | १५३ |
| ३.७ | सार्वत्रिक निवडणूका आणि आदिवासी नेतृत्व | १६४ |
| | संदर्भ सूची | १९१ |

# प्रकरण तिसरे

# आदिवासी नेतृत्त्व

## प्रस्तावना

प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व या घटकाला विशेष महत्व आहे. नेतृत्व दोन प्रकारचे असते. सामाजिक चळवळीतील नेतृत्व व राजकीय नेतृत्व. या दोन्ही नेतृत्वापैकी चळवळीच्या नेतृत्वाच्या बाबतीत चळवळ कशाशी संबंधित आहे व ती कशासाठी उभारली गेली यावर त्या नेतृत्वाचे यश अवलंबून असते. तर राजकीय प्रक्रियेत नेतृत्व या घटकाला महत्वाचे स्थान असून या प्रक्रियेत 'जात' या घटकाला विशेष महत्व असते. संबंधित नेतृत्व कोणत्या जातीतून पुढे आले आहे यावर त्या नेतृत्वाचे पुढील यश अवलंबून असते. मात्र त्या त्या समाजाच्या / जातीच्या समस्या दूर करीत असताना त्यातून पुढे आलेल्या नेतृत्वाला राजकीय प्रक्रियेत विशेष महत्त्वाचे स्थान निर्माण होत असते. यामध्ये आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढे आलेल्या नेतृत्वाचा विचार करीत असताना प्रथमतः नेतृत्व म्हणजे काय? या संकल्पनेबरोबरच राजकीय नेतृत्वाचा विचार करुन आदिवासी नेतृत्वाचा विचार करणे आवश्यक आहे.

## ३.१ नेतृत्त्व (Leadership)

राजकीय प्रक्रियेत नेतृत्त्वाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आधुनिक काळात बहुतांश राज्यांनी कल्याणकारी राज्याचा स्विकार केलेला असल्या कारणाने राज्यांची कार्यक्षेत्र व्यापक झाली. त्यामुळे या लोककल्याणकारी राज्यात शासनाला योग्य पध्दतीची ध्येयधोरण ठरविण्यासाठी व ती ध्येयधोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रभावी व कार्यक्षम नेतृत्त्व उपयुक्त ठरते.

नेतृत्त्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्त्वही आपल्याला स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्त्व म्हणजे काय? या प्रश्नाचे सोपे, सुटसुटीत व सर्वसमावेशक उत्तर

थोडक्यात देणे मात्र कठीण जाते. चांगल्या नेत्याच्या अंगी ''इथॉस (ethos), पॅथॉस (pathos) आणि लॉगॉस (Logos)'' असे तीन गुण असणे आवश्यक असते. असे ॲरिस्टॉटल म्हणाला होता. त्या संज्ञांचे मराठी पर्याय पुढीलप्रमाणे देता येतील. सामाजिक भावनिष्ठा (इथॉस), कारुण्य (पॅथॉस) आणि शब्दशक्ती (लॉगॉस), सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळते. कारुण्याच्या आधारे नेता लोकांच्या भावनांना हात घालू शकतो व त्यांना भावनिक प्रेरणा देऊ शकतो. कोशानुसार लॉगॉसचा अर्थ जगाच्या उत्पत्तीपूर्वी व उत्पत्तीनंतर जगाविषयी ईश्वराच्या मनात असलेला विचार व्यक्त करणारा शब्द असा होतो. नेत्याच्या संदर्भात शब्दशक्ती (लॉगॉस) म्हणजे स्वतःच्या कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण, समर्थन करण्याची आणि त्याआधारे लोकांना बौध्दिक पातळीवर प्रेरीत करण्याची नेत्याची क्षमता असा अर्थ घेता येतो. जगातील सर्वच महान नेत्याच्या अंगी हे तिन्ही गुण प्रकर्षाने होते असे आढळते.[१]

सामान्यतः नेतृत्त्व दोन प्रकारे प्राप्त होत असते. काही व्यक्तींच्या अंगी जन्मजात नेतृत्त्वाचा गुण असतो तर काही व्यक्ती राजकीय प्रक्रियेत नेतृत्त्व हा गुण संपादन करताना दिसतात.

नेतृत्त्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येतील.

१. **चेस्टर बर्नार्ड :–**

'नेतृत्त्व म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीतील असे गुण की, ज्यामुळे संघटितपणे कार्य करणाऱ्या लोकांना आणि त्यांच्या कार्याला मार्गदर्शन मिळते.'

२. **वेबस्टर :–**

'नेतृत्त्व म्हणजे अशी व्यक्ती की, जी समूहाला निर्देश देते, आज्ञांकित करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते.'

(Leadership refers to the qulity of the behavior of individuals whereby they guide people and their activities in organized efforts)[२]

## ३. कुंटझ आणि ओडोनेल :–

'नेतृत्त्व म्हणजे समान उद्दिष्ट सामूहिकरित्या साध्य करण्यासाठी लोकांचे मन वळविणारी कृती होय.'

(Leadership has been defined as, the activity of persualing people to co-operate in the achievement of a common objective)[३]

## ४. टेरी

'विशिष्ट उद्दिष्टांकरिता व्यक्तींना स्वेच्छेने प्रभावित करण्याची प्रक्रिया म्हणजे नेतृत्त्व.'[५]

नेतृत्त्वासाठी शारीरिक गुण, बुध्दी, आत्मविश्वास, सामाजिकता, संकल्पशक्ती, परिश्रमशीलता, कल्पनाशक्ती, अंतःदृष्टी, परिवर्तनशीलता, उद्दिपकता, धडाडी, जबाबदारीची भावना, उद्दिष्टांविषयी कळकळ व निष्ठा, प्रामाणिकपणा, प्रेमळ व्यवहार यांसारख्या बहुतेक गुणांचे मिश्रण व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात असेल तर ते लोकप्रिय नेतृत्त्व बनू शकते.

नेतृत्त्वाचा उदय परस्पर आंतरप्रक्रियेतून होतो. समूहाची अस्थिरता, संकटजन्य परिस्थिती, समूहाची जटिलता, नेतृत्त्वगुणांचा ऱ्हास, नेतृत्त्वाच्या गरजा या बाबी जरी नेतृत्वाच्या उदयासाठी कारणीभूत असल्या तरी समूहात आढळून येणारी वर्तमान परिस्थिती तसेच संभाव्य नेता व अनुयायांची संवेदने व गरजा या दोन्हींच्या आंतरक्रियेवर नेतृत्वाचा उदय अवलंबून असतो.

नेतृत्वाचा उगम कुटूंबातूनच होत असतो. कुटुंबात बालमनावर होणारे संस्कार, आई–वडील, मोठी भावंडे यांची राजकीय घडामोडीवर होणाऱ्या चर्चेचा प्रभाव मुलांवर पडतो. त्यामुळे वडिलांच्या राजकीय मताशी मुले सुसंगत होत जातात. त्यातून मुलांच्या व्यक्तीमत्त्वाला वळण लागते. त्यानंतर शाळेत राष्ट्रीय पुढारी, राष्ट्रगीत यासंदर्भात ज्ञान मिळते. राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणापेक्षा त्या पक्षाच्या नेत्यांच्या नावावरुन विद्यार्थी पक्ष ओळखू लागतात. पुढे महाविद्यालयीन स्तरावर छात्रसंघाच्या निवडणूकांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने नेतृत्वाची जडणघडण होत असते. त्यातून विद्यार्थी नेतृत्व

नावारुपास येतात. त्यांच्यात निर्माण होणारी राष्ट्रभक्ती, आत्मसन्मान, श्रेष्ठत्वाची भावना, महत्वकांक्षा ही कशा पध्दतीने तयार होते यावर त्या नेतृत्वाचे भावी काळातील यश अवलंबून असते.

## ३.२ राजकीय नेतृत्व :–

मानवी समूहातील जीवनात नेतृत्वाची भूमिका फार महत्त्वाची राहिली आहे. समाज जीवनाचे कोणतेही क्षेत्र विचारात घेतले तरी त्यात नेतृत्वाचे महत्व अनन्यसाधारण दिसून येते. राष्ट्रसमुहाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या राष्ट्रपुरुषांचे गोडवे इतिहासकारांनी गायले आहेत. ते त्यांच्या नेतृत्वगुणांमुळेच. समाज पुढारलेला असो किंवा विकासाच्या प्राथमिक अवस्थेतील असो, समाजाला विशिष्ट वळण लावायला नेतृत्वच कारणीभूत ठरते. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहणारे छत्रपती शिवाजी, समाजाला सामाजिक समतेचा मंत्र देणारे लोकनेते महात्मा ज्योतिबा फुले, स्त्री–शिक्षण व सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते धोंडो केशव कर्वे, संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करणारे लोकमान्य टिळक अशा विविध नेत्यांनी देशाला एक सफल नेतृत्व देऊन देशाच्या उन्नतीच्या कार्याला हातभार लावला व एक नवे वळण लावले. हे मात्र कोणालाही नाकारता येणार नाही. राजकीयदृष्ट्या नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची वैशिष्ट्ये व त्यांची ध्येयधोरणे व त्याचप्रमाणे विशिष्ट वेळची परिस्थिती ह्या दोन्हींच्या योग्य समन्वयावर समाजाचे भवितव्य अवलंबून असते. त्यामुळे नेतृत्व ही अत्यंत जिव्हाळ्याची समस्या आज निर्माण झालेली दिसते.

प्राचीन काळापासून प्रत्येक समाजात पुढारी व अनुयायी असे दोन वर्ग अस्तित्वात होते व आजही आहेत. समाजाच्या नेतृत्वाचे कार्ये करणे. हे पुढाऱ्यांचे व पुढाऱ्यांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करणे हे अनुयायांचे कार्य आहे.

’राजकीय’ ह्या अतिव्याप्त संज्ञेमुळे एखादे नेतृत्व हे राजकीय आहे किंवा गैरराजकीय आहे असा स्पष्टपणे फरक करणे शक्य नसते. कित्येक वेळा आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक तथा चित्रपट क्षेत्रातील पुढाऱ्यांना त्यांच्या लोकप्रियतेमुळे ते निवडून येतात व राजकीय पुढारी बनतात. उदा.

जललिता, राजबब्बर, जयाप्रदा इत्यादी नावावरुन पुढारी, नेता हा शब्द राजकीय पुढाऱ्यांमार्फत वापरला जातो असे नव्हे तर इतर क्षेत्रातील नेत्यांसाठी देखील वापरला जातो.

दुसरे असे की, नेतृत्व ही संज्ञा देखील अपरिचित आहे. कारण भूतकाळातील 'राजांपासून' तर वर्तमानकाळातील राजनेत्यापर्यंत सर्वांचा यात समावेश होतो. भौगोलिक क्षेत्राची देखील नेतृत्वाला सीमा नसते. सामान्यतः पुढाऱ्यांच्या कार्यक्षेत्रावर त्याच्या नेतृत्वाची सीमाही बदलते. एकदा एखादी व्यक्ती पुढारी बनल्यानंतर ती कायस्वरुपी पुढारी असतेच असे नाही तर कालांतराने तिच्या पुढारीपणाचा लोप होतो.

प्रत्यक्ष कार्याच्या आधारावर कार्यात्मक नेतृत्व व संस्थात्मक नेतृत्व असे प्रकार मानले जातात किंवा यालाच अनुक्रमे अनौपचारिक नेतृत्व व औपचारिक नेतृत्व असेही म्हटले आहे. उदा. मंत्री, आमदार, खासदार हे पुढारी आहेत. ह्यांना मिळणाऱ्या या पदाचे तिकीट किंवा उमेदवारी ही कशी मिळते ह्याचे निरिक्षण केल्यानंतर असे आढळून आले की, प्रत्येक व्यक्ती ही आपल्या क्षेत्रात कार्यात्मक आधारावर पुढारी असते. म्हणून त्यांना हे तिकीट किंवा उमेदवारी मिळते असे नाही. एखाद्या पुढाऱ्याची पत्नी, मुलगा म्हणजे व्यक्तिगत निष्ठा, जातीय, भाषिक किंवा प्रादेशिक राजकारण, केंद्रीय पुढाऱ्याची मान्यता, उमेदवाराचे हितसंबंध, स्त्रिया, दुर्बल घटक तथा अल्पसंख्यांक समूहाचे प्रतिनिधीत्व इत्यादींच्या आधारावर आमदार, खासदार, मंत्रीपद मिळू शकते. जसे पंडित नेहरुनंतर, इंदिरा गांधी त्यांच्यानंतर राजीव गांधी, मध्यप्रदेशचे जसे केंद्रीय मंत्री माधवराव शिंदे व राजस्थानचे केंद्रीय मंत्री राजेश पायलट यांच्यानंतर अनुक्रमे त्यांचे चिरंजीव ज्योतिरादित्य शिंदे, सचीन पायलट हे केंद्रीय मंत्री म्हणून कार्यरत आहेत. अशी बरीच उदाहरणे देता येतील. राजीव गांधीच्या हत्येनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती सोनिया गांधी ह्यांना काँग्रेसचे अध्यक्ष बनविले. वस्तुतः त्या राजकीय पुढारी नव्हत्या. अशा प्रकारे पद प्राप्त झाल्यामुळे ह्या प्राप्त होणाऱ्या पदाला 'औपचारिक नेतृत्व' असे म्हणतात.

ह्या एकुणच चर्चेवरुन 'राजकीय नेतृत्व' म्हणजे राजकीय सत्ताधारी व्यक्ती त्यांचे प्रतिनिधीत्व, देश–विदेशातील त्यांना मानणारे व न मानणारे अशा विभिन्न घटकांचे भूतकाळ, वर्तमानकाळ तथा भविष्यकाळातील परस्परावलंबी ह्यांचे 'सामूहिक वर्तन' होय. असे ग्लेन डी पेगचे मत आहे.[६] याचा

अर्थ असा नव्हे की, केवळ उच्चपदव्यांचे वर्तन येथे अभिप्रेत आहे. मध्यम तथा निम्न स्तरावरच्या संबंधितांच्या वर्तनाचाही त्यात समावेश होतो. म्हणजे यात पंतप्रधान, मंत्री, निरनिराळ्या राज्यातील मुख्यमंत्री, राज्यपाल, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकीय संस्थांचे अध्यक्ष, महानगरपालिका, नगरपालिकेचे प्रमुख, ग्रामपंचायतीचे प्रमुख, सर्व पातळीवरील राजकीय पक्षाचे प्रमुख तथा दुय्यम व सर्व स्तरावरील अनुयायी वर्ग यांचा समावेश होतो. तसेच विभिन्न प्रकारच्या संस्था जसे संसद, विधिमंडळे, राजकीय पक्ष, दबावगट, निर्वोचन प्रक्रिया या सर्व प्रक्रियांचा समावेश होतो.

नेतृत्वामध्ये पुढारी व अनुयायी व विशिष्ट परिस्थिती हे महत्वाचे घटक असतात. पुढारी व अनुयायी यांचे वर्तन ज्या विशिष्ट परिस्थितीत घडते ती नेहमी कायम स्वरुपाची नसते. परिस्थिती बदलल्यास नेतृत्वही बदलते.

## ३.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी नेतृत्व

प्रत्येक स्तरावरील नेतृत्वासाठी कुटुंब, शाळा, समाज, जात, विशिष्ट परिस्थिती ही फार महत्त्वपूर्ण असते. यासारख्या बाबींतून बहुतांश नेतृत्वाची निर्मिती होते.

आदिवासी नेतृत्व हे सुरुवातीच्या काळात विशिष्ट उद्भवलेल्या परिस्थितीतून, होणाऱ्या अन्यायातून निर्माण झाले. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळातील नेतृत्वाबरोबरच, स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींसाठी काम करणारे नेतृत्व तसेच आदिवासीमधून पुढे आलेले सामाजिक व राजकीय नेतृत्वाच्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील चळवळीतील नेतृत्वात बिरसा मुंडा, राघोजी भांगरा, खाज्या नाईक, तंट्या भाऊसिंग भिल्ल, भागोजी नाईक, उमाजी नाईक, सिध्दा व कान्ह, होन्या केंगले यासारख्या चळवळीतील नेतृत्वांचा उल्लेख करता येईल. यापैकी बिरसा मुंडा, राघोजी भांगरा, तंट्या भाऊसिंग भिल्ल यांचा विशेषत्वाने उल्लेख केला आहे.

## १. बिरसा मुंडा :–

स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीतील नेतृत्त्वामध्ये बिरसा मुंडाचे नाव अग्रभागी घेतले जाते. त्यांनी तत्कालिन बिहार प्रदेशातील छोटा नागपूर भागातील मुंडा लोकांचा उभारलेला लढा सामाजिक व राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा होता.

बिरसाचे वडिल सुगना मुंडा यांना दारिद्र्याने गांजल्यामुळे त्यांनी ख्रिस्ती धर्म स्विकारला. त्यानंतर त्यांचे नाव मसीहादास ठेवण्यात आले. बिरसाचेही नांव बदलून त्याला दाऊद हे नांव मिळाले. मिशनरी शाळेत शिकत असतांना बिरसाला ख्रिस्ती मिशनऱ्यांबद्दल घृणा निर्माण झाली.

मुंडा आदिवासींची स्वतंत्र सामाजिक, धार्मिक व राजकीय व्यवस्था होती. मुंडाची स्वतंत्र शेती व्यवस्था होती. त्यांची अर्थव्यवस्था शोषणमुक्त होती. त्यांची भांडणे पंचांमार्फत व पंचायतमार्फत मिटविले जात. मात्र इंग्रजांची राजवट सुरु झाल्यानंतर मुंडाची शेतीव्यवस्था नष्ट करुन वनासाठी नवे नियम व कायदे तयार झाले. पारंपारिक वसूलीची पध्दत बंद करुन महसूल वसूल जिल्हाधिकारी, अबकारी अधिकारी करु लागले. त्याचा परिणाम आदिवासींवर झाला. छोटा नागपूर प्रदेशातील आदिवासी त्यांच्या जमीनीचे मालक होते ते आता स्वतःच्या जमिनीवर नोकर म्हणून राबू लागले. त्यांच्या जमिनी सावकर व जमीनदारांनी हडप केल्या. इंग्रजांच्या या नव्या व्यवस्थेचा परिणाम मुंडा आदिवासींवर झाला. या आव्हानाला तोंड देण्यासाठी मुंडा जमातीचे १७८९, १८५८ अशा पध्दतीचे अनेक उठाव केले. या चळवळीचा प्रभाव बिरसा मुंडावर खोलवर झाला. त्यामुळे बिरसासहित सर्व कुटुंबाने ख्रिस्ती धर्म सोडून दिला.

बिरसाच्या घरची परिस्थिती हलाखीची होती. अनेकदा घरातील सर्वजण उपाशी राहत. एकदा बिरसाने थडगे खणून एका प्रेतावरील दागिणे काढून तांदूळ व दाळ आणली हे समजल्यावर आई–वडिल रागावले. बिरसाला केलेल्या कृतीचा पश्चाताप झाला व जंगलात पळत सुटला. जंगलात १२ ते १३ दिवस राहिला. समाजाची झालेली दशा, काळाजी गरज या गोष्टींवर सारासार विचार करण्याची संधी मिळाली. मध्येच त्याला एक स्वप्न पडले या स्वप्नानंतर बिरसा एक धार्मिक पुरुष म्हणून लोकांसमोर आला.

बिरसाकडे एक उद्भूत शक्ती आहे असे लोकांना वाटू लागले. म्हणून दूरदूरवरचे विविध आजाराने ग्रासलेले रोगी, पिडित बिरसाकडे येऊ लागले. तो मुळी देऊन ते आजार बरे करु लागला. त्यामुळे लोकांमध्ये, आदिवासींमध्ये त्यांच्याबद्दल आस्था, प्रेम, दैवी शक्तीचा उद्भुत चमत्काराचा महापुरुष असल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली. बिरसा सांगेल ती बाब मानण्यास समाज तयार झाला. बिरसाने मी आता लवकरात लवकर मुंडांना परकीयांच्या तावडीतून मुक्त करणार व मुंडांनी कंपनी सरकारचा आदेश पाळू नये व पोलिस, जमीनदार यांची खुशाल आज्ञा तोडा व अपमान करा, कुणीही वेठबिगारी करु नका. बिरसाजवळ प्रचंड आत्मविश्वास होता. आता इंग्रजांचे, महाराणीचे राज्य जाणार व आपले राज्य येणार आहे. लोकही त्याच्या पाठोपाठ घोषणा देऊ लागले. त्यामुळे आदिवासींमध्ये जागरुकता निर्माण होण्यास मदत झाली.

बिरसाने राजकीय चळवळीबरोबरच आदिवासींमधील अंधश्रध्दा, वाईट चालीरितींसाठी देखील आंदोलन केले. मानसशास्त्रीयदृष्ट्या लोकांना समजावून सांगितले त्याचा लोकांवर प्रभाव पडला. त्यामुळे बिरसाच्या चळवळीला प्रचंड प्रमाणात समर्थन मिळू लागले.[७]

इंग्रजाविरूध्द बिरसाने असहकार चळवळ सुरु केली. त्याने सर्व आदिवासींना शेतात पेरणी न करण्याबद्दल सांगितले. त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरले व बिरसाला पकडण्यासाठी ८ ऑगस्ट १८९५ रोजी चालकाडला पोहचले. मात्र बिरसा सापडला नाही.

इंग्रजांची हिंसक प्रवृत्ती बघून बिरसाने आपल्या विश्वासू सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना तयार केली. याची माहिती इंग्रज अधिकाऱ्यांना मिळताच २३ ऑगस्ट १८९५ एक विशेष बैठक होऊन हे बंड मोडून काढण्यासाठी आदेश दिला. त्यानुसार पोलिसांनी गुपचूप गावाला वेढा देऊन बिरसाला पकडले. त्यामुळे सर्व आदिवासींना दुःख होऊन अनवाणी, पायी रांचीच्या तुरुंगात पोहोचले.

१९ नोव्हेंबर १८९५ रोजी बिरसाच्या केसचा निकाल लागला व त्यात दोन वर्षाची शिक्षा झाली. ३० नोव्हेंबर १९९७ मध्ये बिरसाची सुटका झाली. त्यामुळे आदिवासींमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

फेब्रुवारी १९९८ मध्ये बिरसाने आपल्या अनुयायांची एक मोठी सभा चालकाडच्या डुंबारी पर्वतराजीत भरवली होती. त्यात इंग्रज अधिकारी व देशी एजंटाला मार्गी लावण्याचे आव्हान केले. त्यामुळे आदिवासींमध्ये एक वेगळा नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांनी आदिवासींची क्रांतीकारी फौज तयार करण्याचा निर्णय घेऊन आपल्या विश्वासू साथीदारांना सेनापती व मंत्री करुन गावात फौजा तयार करुन पाठविले. ख्रिश्चन मिशन व पोलिस चौकींवर हल्ला करण्याचा निर्णय घेऊन फौजेची तीन तुकड्यात विभागणी करुन १८९९ मध्ये नाताळात सरवादाग मिशन, बुडजू मिशन व मुद्दू मिशनवर हल्ले केले. त्यामुळे शासन घाबरले. ९ जानेवारी १९०० मध्ये डुंबारी बुरुवर गोळीबार करण्याचे आदेश पोलिसांना मिळाले. बिरसाचे सैनिक बिरसाचा जयजयकार करत लढू लागले. गोळीबारानंतर बिरसाच्या अनुयायांना अटक करण्यात आली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बिरसाच्या अनुयायांना पकडून देण्याचे काम केले. यापैकी जे धर्मांतर करीत होते त्यांना सोडून दिले जात होते. मात्र बिरसा सापडला नाही. तेथून पुन्हा फौज संघटित करण्यासाठी हिंडू लागला. शासनाचा हेर बिरसाचा शिष्य म्हणून बिरसाला भेटले व त्यांनी बिरसाला त्यांच्या ऐंशी साथीदारासह अटक केली. त्यांना रांचीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तुरुंगात बिरसाला वेगळे ठेवण्यात आले. त्याच्या कमरेमध्ये व पायामध्ये लोखंडी साखळ्या होत्या. ९ जून १९०० मध्ये बिरसाचे निधन झाले.

आदिवासींना शोषणमुक्त करणे, जमीनदारी, वेठबिगारी, धर्मांतर, पिळवणूक या विरोधात बिरसा मुंडांनी केलेला उठाव, लढा पुढील काळात आदिवासींसाठी मार्गदर्शक ठरला.

## २) राघोजी भांगरा :-

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्रजांना विरोध होऊन पुणे, नगर, नाशिक, ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात महादेव कोळी व भिल्लांच्या संघटना स्थापन झाल्या. त्यांनी इंग्रजांविरूध्द बंडाचे निशाण उभारले होते. इंग्रजांविरूध्द बंडाचा पहिला उठाव जुन्नर भागात इ. स. १८३० साली झाला. त्यानंतर त्याचे लोण सर्वत्र पसरु लागले. इ. स. १८३८ मध्ये रतनगड किल्ल्याच्या परिसरात क्रांतीकारकांच्या बंडाने व्यापक स्वरुप धारण केले पण त्यांचेही मार्ग इंग्रजांनी रोखून धरले व त्याला

उत्तर म्हणून बंडखोरांनी इंग्रजांचा खजिना व ३ गावे लुटली. या झटापटीत राघोजी भांगराचे ८० लोक कैद करण्यात आले. तरी देखील राघोजीने चळवळ चालूच ठेवली.[८] त्याला अमिषे दाखविण्यात आली मात्र समाजाचा छळ, वचनभंग, बंडखोरांची कत्तल यामुळे तो चिडला. त्याचा पिंड क्रांतिकारकाचा असल्यामुळे क्रांतीकारकाला शोभेल असा जाहीर लढा त्याने पुकारला. ही बातमी आदिवासी समाजात सर्वत्र पसरली. शेकडो तरुण त्यांच्या चळवळीत सामील झाली. पोलिसांच्या अनेक तुकड्या त्याला पकडण्यासाठी पाठविण्यात आल्या पण त्याचा सुगावा लागला नाही. त्यामुळे इंग्रज अधिकारी चिडले. राघोजीच्या आईचा अमानुष छळ केला. या कृत्यामुळे महादेव कोळी जमातीत मोठी खळबळ निर्माण झाली. राघोजीला मदत म्हणून बापू भांगरेने आपल्या नेतृत्त्वाखाली एक नवी संघटना तयार केली. मात्र बापू भांगरेचाही फितुरीने घात केला. राघोजीला पकडण्यासाठी ५००० रु. बक्षीस जाहिर केले. त्यामुळे राघोजी वेषांतर करुन घाट उतरुन कोकणात गेला. पण अखेर ते दुर्दवी ठरले. तो साधुच्या वेषात असतांना ठाणे जिल्ह्यात पकडण्यात  पोलिसांना यश आले व फाशीची शिक्षा दिली. मात्र फाशी देण्यापेक्षा मला वीरमरण द्या. तलवारीच्या वाराने माझे एक घाव दोन तुकडे करा असे त्याने इंग्रज सरकारला फर्माविले. त्याचे म्हणणे मान्य झाले नाही. या वीर पुरुषाला अखेर २ मे १८४८ रोजी ठाण्याच्या तुरुंगात फासावर देण्यात आले. फितुरीमुळे राघोजी भांगराचा अंत झाला. मात्र राघोजी भांगरांनी उभ्या केलेल्या या लढ्यात व चळवळीत नाशिक, नगर, पुणे, ठाणे या जिल्ह्यातील आदिवासी तरुणांनी प्रेरणा घेऊन या चळवळीचे स्वरुप अधिक व्यापक व उग्र करण्याच्या दिशेने वाटचाल केली.

### ३. तंट्या भाऊसिंग भिल्ल :–

तंट्या भिल्ल हा आदिवासी चळवळीच्या इतिहासातील पराक्रमी व्यक्तिमत्व. तंट्या जातीव्यवस्थेचा गुन्हेगार होता. मध्य प्रांतातील निमाड जिल्ह्यातील एका सामान्य खेड्यात १८४२ साली तंट्याचा जन्म झाला. तंट्या लहानपणातच भाला फेकणे, धनुष्यबाण चालविणे यात तरबेज होता व निम्या वयापर्यंत तो शेती करीत होता पण सरंजामशाहीने त्याचे शेत बळकविण्याचा प्रयत्न केल्यावर तंट्या चिडला व सरंजामशाही मोडीत काढण्यावर त्याने भर दिला. प्रथम लढा त्याने 'भिवा पटेल' या

सरंजामदाराविरूध्द दिला पण भिवा पटेलने त्याच्या या कृत्याला गुन्हेगार ठरवून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यात त्याला एक वर्षाचा कारावास झाला. शिक्षा भोगून आल्यानंतरही त्याच्यावर खोट्या चोरीच्या आरोपाखाली पुन्हा तीन महिने शिक्षा भोगावी लागली. त्यामुळे ब्रिटिश राजवटीच्या हद्दीत राहायचे नाही असे त्याने ठरविले तंट्याचा पाठलाग केला व राजपूतांची साथ घेऊन तंट्याला पुन्हा चोरीच्या आरोपाखाली अडकविले पण पोलिसांच्या हाती सापडण्याअगोदर तंट्याने जंगलाचा आश्रय घेतला. जंगलात टोळी करुन सरंजामशाहीविरूध्द शह देण्यास सुरुवात केली पण नशिबाने साथ दिली नाही. विश्वासघाताने सरदार पटेल, मोहन यासारख्या गावगुंडांनी परत पोलिसांच्या ताब्यात दिले.

२९ नोव्हेंबर १८७८ रोजी तंट्याचा खटला उभा राहिला. तंट्या व त्याच्या साथीदारांना दोषी ठरविण्यात आले पण निकाल एक दिवस राखून ठेवला. त्यामुळे साथीदारांना तुरुंगात ठेवले. या एका दिवसाचा फायदा घेऊन तुरुंगातून पलायन केले व विरोधकांचा, सरंजामशाहीचा काटा काढण्याचे ठरविले. शिवा पटेल, सरदार पटेल यांची घरे जाळली व आपल्याविरूध्द खोटी साक्ष देणाऱ्या हिम्मत पटेलला गोळी घालून ठार केले.[९] त्यामुळे इंग्रज तंट्याच्या मागावरच होती. तंट्या आपल्या जातीतील लोकांना कधीच त्रास देत नसे. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यात तो धन्यता मानत असे. त्यामुळे भिल्ल समाज तंट्याला मानत असे. तंट्या श्रीमंत, जमीनदार, सरंजामदार यांची लूट करुन ते धन गरिबांना, गरजूंना वाटत असे. त्यामुळे गरीब आदिवासींना त्याच्याविषयी आस्था वाटत असे. गोटी, इचीलपूर, मेळघाट, हेमगीरी, तिनसीया, मुलगाव, बारुर यासारख्या गावांत दरोडे घालून त्याने पोलिसांना चक्रावून सोडले. तंट्याच्या या लुटालुट, जाळपोळीमुळे इंग्रज पोलिस अधिकारी हताश झाले होते. कालांतराने मात्र एका दमात साठ मैल न थांबता चालणारा तंट्या आता वीस मैल चालू शकत नव्हता. पहिल्यासारखे त्याला दिसत नव्हते. गणपत राजपूतने कपटाने त्याला घरी बोलावून आदरातिथ्य करुन त्याच्या जवळील बंदूक हासत हातात घेऊन घराभोवती दबा धरलेल्या पोलिसांना इशारा करुन अलगद तंट्याला पकडून दिले व त्यामुळे त्याच्यावर खटला चालला. दरोडा, कत्तल या गुन्ह्याखाली ७ ऑक्टोंबर १८८९ रोजी जन्मठेपेची शिक्षा झाली व त्यानंतर त्याला फाशी देण्यात आली.

अशा प्रकारे फितूरीने जरी तंट्याचा घात केला तरी आदिवासी समाजात तंट्या भाऊसिंग भिल्ल यांचे नांव अजरामर असल्याचे दिसून येते.

## ३.४ स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींसाठी काम करणारे नेतृत्व :–

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींसाठी विविध समाजसुधाकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यात श्री. ए. व्ही. ठक्कर उर्फ ठक्करबाप्पा, बाळासाहेब देशपांडे, गोदाताई परुळेकर, दादासाहेब बिडकर, मेधा पाटकर, अनुताई वाघ, नानासाहेब दिक्षित, महाजन गुरुजी यासारख्या आदिवासींसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाचा उल्लेख करता येईल.

### १. श्री. ए. व्ही. ठक्कर उर्फ ठक्करबाप्पा :–

आदिवासींसाठी काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये सर्वप्रथम गांधीवादी नेतृत्व ठक्करबाप्पांचे नाव आदराने घेतले जाते. ठक्करबाप्पांचा जन्म भावनगर (सौराष्ट्र) येथे २९ नोव्हेंबर १८८९ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नांव अमृत विठ्ठलदास ठक्कर होय. त्यांचे कुटूंब मध्यमवर्गीय. अनेक कष्ट सोसून वडिलांनी ठक्करबाप्पांचे शिक्षण पूर्ण केले. ते इंजिनियर झाले. शिक्षण व नोकरी यात त्यांची ४५ वर्षे गेली. पोरबंदरमध्ये असतांना त्यांना त्यांच्या वडिलांनी दुष्काळग्रस्तांच्या सेवेत उपसलेल्या कष्टाची माहिती दिली. त्याचवेळी त्यांनी वडिलांचे मानव सेवेचे व्रत पुढे चालविण्याचा संकल्प केला.

पुण्यात १९०५ साली नामदार गोपाळकृष्ण गोखले व त्यांचे सहकारी यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. समाजसेवेची तीव्र इच्छा असल्यामुळे ठक्करबाप्पांनी भारत सेवक समाजाचे आजीवन सदस्यत्व स्विकारले व तेथूनच खऱ्या अर्थाने समाजसेवेच्या कार्याची सुरुवात झाली व त्यांचे कार्य पुढे ३६–३७ वर्षे सतत चालले. त्यासाठी ठक्करबाप्पींनी अहोरात्र मेहनत घेतली.

भारत सेवक समाजाचे घटक म्हणून १९१४ च्या चारा टंचाईच्या काळात ठक्करबाप्पांनी मथुरा जिल्ह्यात उत्कृष्ट मदतकार्य केले. त्यांच्या या कार्याचा सर्वत्र गौरव झाला. १९१८–१९ मध्ये पंचमहाल जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला. या जिल्ह्याची लोकसंख्या त्यावेळी १५ लाख होती. पैकी ५ लाख भिल्ल आदिवासी जमातीचे होते. त्यावेळी भारत सेवक समाजाच्या माध्यमातून ठक्करबाप्पांनी भिल्लांची होणारी पिळवणूक थांबविली व त्यांना फार मोठी मदतदेखील केली.

सन १९२०–२१ मध्ये ओरिसा प्रांतात दुष्काळ पडला. ४०० खेड्यातील जवळजवळ दिड लाख लोकांना या दुष्काळाचा फटका बसला. या दुष्काळात ठक्करबाप्पांनी खेडोपाडी अन्न व कपडे यांची मदत पोहोचविली. त्यांना भिल्ल बांधवांचे जीवन संस्कारी व प्रामाणिक आढळले. सावकाराचे कर्ज भिल्लाचा मुलगा व कधी कधी नातूही प्रामाणिकपणे फेडतो हे आढळले. तरीही सरकारी नोकर त्यांची पिळवणूक करतात याचे त्यांना दुःख झाले. भिल्ल बांधवांचे जीवन सुखी व्हावे यासाठी त्यांनी त्यांच्या विकासासाठी एक संघटना असावी या निर्णयाप्रत येऊन बाप्पांनी पंचमहाल जिल्हा भिल्ल सेवा मंडळ ही संस्था उभी केली व आजीवन सभासद मिळवून कार्य सुरु केले.

मंडळाचे काम सुरु असतांना सरकारी नोकरीत देखील अडचणी आणल्या. भिल्ल कार्यकर्त्यांवर खोटेनाटे खटले भरविले. बाप्पांनी हे खटले कसे खोटे आहेत. याची कार्यकर्त्यांना पत्रे देऊन व भेटी घेऊन लोकजागृती केली. शेवटी परिणाम कार्यकर्ते दुप्पट उत्साहाने कामाला लागले.

पंचमहाल जिल्ह्यात भिल्लांसाठी आश्रमांचे जाळे पसरविले व त्यासाठी लागणारा निधि मुंबई व गुजरातेतून गोळा करीत असत. त्यांचे हे धोरण प्रत्येक क्षेत्रात दिसून येई. त्यांची राहणी साधी होती. मंडळाचे अध्यक्ष म्हणून ते दोहदला राहत. त्यांच्या अश्रमानांही ते भेटी देत असत. स्वच्छतेवर त्यांचा कटाक्ष होता. प्रथम त्यांनी एक छात्रालय व चार प्राथमिक शाळा सुरु केल्या. पुढे तीन वर्षाच्या कालवधीत नुसत्या दोहदमध्ये चार छात्रालय व आठ प्राथमिक आश्रमशाळा सुरु केल्या. त्यात सर्व मिळून ५८० भिल्ल बालके शिक्षण घेत होती.

गुजरातमधील व विशेषतः पंचमहाल जिल्ह्यातील आदिवासी बांधवांची परिस्थिती पाहून इतर आदिवासींची परिस्थिती तितकीच भीषण असेल याची कल्पना बाप्पांना आली. ती प्रत्यक्ष पहावी यासाठी भारतात सर्वत्र प्रवास करण्याचे त्यांनी ठरविले. ज्या भागात जायचे त्या भागाचा भूगोल ते अभ्यासत. पं. बंगाल, बिहार, अमेरिका वगैरे प्रांतातील आदिवासी भागात त्यांनी प्रवास केला. तेथील संथाल, नागा, खासी, मुंडा, गोंड वगैरे आदिवासींना ते भेटले. त्यांचे आर्थिक, सामाजिक प्रश्न व धर्मपरिवर्तन वगैरे बाबींचा त्यांनी नीट अभ्यास केला व या प्रश्नांची त्यांनी माहिती गोळा केली व परत आल्यावर ते विस्तृत लिखाण करीत त्यायोगे आदिवासींचे प्रश्न उजेडात आले. नागालँण्डमधील

मिशनऱ्यांचे धर्मपरिवर्तनाचे कार्य व त्यांच्या प्रेरणेने भारतातून फुटण्याची अनिष्ट वृत्ती ठक्करबाप्पांच्या त्यावेळी लक्षात आली होती.

बाप्पांची ईश्वरावर नितांत श्रध्दा असे. त्यांनी रामायणाचा भिल्ल बांधवात प्रसार केला. त्यायोगे भिल्ल बांधव रामभक्त बनले. भिल्ल बांधवांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी पतपेढ्या स्थापन केल्या. प्रथम आश्रमशाळेद्वारे हे काम सुरु केले. हळूहळू जिल्ह्यातील आदिवासी भागात सहकारी पतपेढ्या स्थापन करुन या संस्थांचे जाळे जिल्हाभर पसरले व भिल्ल लोकांत सहकारी संस्थाबद्दल प्रेम निर्माण झाले.

भिल्ल सेवा मंडळाचे काम चांगल्या प्रकारे सुरु झाल्यावर इतर ठिकाणच्या आदिवासी बांधवांसाठी सेवा संस्था निघाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले व त्यात त्यांना यशही आले. महाराष्ट्रात ठाणे, पश्चिम खानदेश (धुळे), नाशिक, डांग जिल्ह्यात अशा सेवा संस्था निघाल्या. त्यांच्यामार्फत आदिवासी बांधवांच्या विकासाचे कार्य सुरु झाले. ओरिसा, बिहार सरकारला देखील आदिवासी कल्याण कार्यात बाप्पांनी मार्गदर्शन केले.

स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटनापरिषद मुक्रर झाली. घटना तयार करतांना घटनेत आदिवासी कल्याणाकरिता कोणत्या तरतूदी असाव्यात हे ठरविण्यासाठी घटना परिषदेने ठक्करबाप्पांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली. त्यावेळी बाप्पा घटनापरिषदेचे सभासद होते. ती कमेटी देशभर हिंडली व तीने जनमत आजमाविले. उपसमितीने ज्या शिफारशी घटनापरिषदेत सादर केल्या त्यात सर्वात महत्त्वाची शिफारस होती, आदिवासी बांधवांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पार्लमेंटमध्ये व राज्यविधीमंडळात प्रतिनिधीत्व देण्यात यावे. त्याप्रमाणे आदिवासींना पार्लमेंटमध्ये सुमार ५० जागा मिळाल्या व प्रत्येक राज्याच्या कायदेमंडळात आदिवासींना सभासदत्व मिळाले. काही राज्यात आदिवासी सभासद मंत्रिमंडळात घेण्याची तरतूद झाली. आज राज्यमंत्रिमंडळात आदिवासी मंत्री, उपमंत्री घेतले जातात. ही आदिवासी बांधवांची राजकीय प्रगती महत्त्वपूर्ण समजली जाते.[१०] तसेच या उपसमितीने पुन्हा एक महत्त्वपूर्ण शिफारस सुचविली ती म्हणजे हरिजन व आदिवासी यांच्या कल्याणासाठी भारत सरकारने एक कमिशनर नेमावा. ही शिफारस घटना परिषदेने स्विकारली. कमिशनरची या कामासाठी नियुक्त करण्याची वेळ आली तेव्हा कोण असावा

यासाठी भारत सरकारने बाप्पांना विचारणा केली. तेव्हा त्यांचे उत्तर, कमिशनर सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ता असावा असे होते. सरकारने ही सूचना मान्य केली व राज्यकर्त्यांनी बाप्पांजवळ मागणी केली. बाप्पांनी पहिले कमिशनर म्हणून श्रीकांतभाई यांचे नांव सुचविले. श्रीकांत भाईंनी हे काम दहा वर्षे केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बाप्पांचे मुख्य कार्यालय दिल्लीस आले. तेव्हा आदिवासींकरिता एक देशव्यापी संघटना असावी असे त्यांना वाटू लागले. त्यातूनच त्यांनी अखिल भारतीय आदिम जाती सेवक संघ नावाची संघटना उभारली. प्रत्येक राज्यात जरी संस्थेच्या राज्य पातळीवर संस्था नसल्या तरी त्या राज्यात काम करणाऱ्या जिल्हा संस्थांना संलग्नता देण्याची व्यवस्था संघातर्फे करण्यात आली. त्यांनी भारतभर सर्व भागात कार्यकर्ते गोळा करुन राज्याराज्यात व गावागावात आदिम जाती सेवक संघाच्या कामास सुरुवात केली. या कामाचे स्वरुप राष्ट्रीय असे.

१९३२ मध्ये महात्मा गांधीनी अखिल भारतीय हरिजन सेवक संघाची स्थापना केली. तेव्हा ठक्करबाप्पांना त्याचे पहिले सेक्रेटरी नेमले. गांधीचा त्यांच्यावरील असलेला विश्वास स्पष्ट होतो. हिंदू समाजात हरिजनांना मानाचे स्थान मिळवून देणे हे आपले परम कर्तव्य आहे असे ते व गांधी मानत. अखेरपर्यंत आदिमजाती सेवक संघाच्या व हरिजन सेवक संघाच्या कार्याशी ते निगडीत राहिले.

आपल्या आयुष्याचा अखेरचा काळ कुटुंबियांमध्ये घालविण्याचा निर्णय पक्का झाल्यावर भावनगरमधील धाकटे बंधू डॉ. कशेवलाल ठक्कर यांच्याकडे ते राहू लागले. वृध्दापकाळात प्रकृती खालावली व १३ जानेवारी १९५१ मध्ये कोट्यावधी दिनदुबळ्यांच्या जीवनाला प्रकाशमान करणारा मानवसूर्य अस्तास केला. त्यांच्या देहावसानाचे वृत्त देशभर पसरले. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पंतप्रधान, पं. नेहरुंनी आदरांजली वाहिली.

एकूणच ठक्करबाप्पांच्या सेवेचा व कार्याचा आदर्श आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था व सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला मार्गदर्शक ठरत आहे.

## २) गोदावरी परुळेकर :–

गोदावरी या पुण्यातील नामांकित वकील लक्ष्मण रघुनाथ गोखले यांच्या ज्येष्ठ कन्या. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९०७ रोजी झाला. गोदावरी श्रीमंतीत वाढल्या. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. बी. ए. एल.एल.बी. झाल्यानंतर त्या वडिलांच्या ऑफीसमध्ये बसत. ऑफिसमध्ये बसून गोपाळकृष्ण गोखले यांच्या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीसंबंधी माहिती त्यांना होऊ लागली. या सोसायटीच्या स्थापनेवेळी गोखले यांच्या बरोबर गो. कृ. देवधर, अ. वि. पटवर्धन, एन. ए. द्रविड होते. त्यांच्यातील देवधरांच्या स्वीय सचिव म्हणून गोदावरीबांईना संधी मिळाली. देवधरांचा पत्रव्यवहार तेच बघत. महात्मा गांधीशी देखील त्यांचा पत्रव्यवहार असे. या कामाचा उपयोग गोदावरीताईंना झाला.

कालांतराने गोदाताई ट्रेड युनियनकडे वळाल्या. कारण त्यांना व्यापक स्वरुपाचे कार्य करायचे होते. अशातच शामराव परुळेकरांनी १९२८, १९२९, १९३४ साली गिरणी कामगारांचा संप लढविला होता. त्यांची विलक्षण जहाल भाषणे ऐकूण गोदावरीबाई त्यांच्याकडे आकृष्ट झाल्या व २६ मे १९३९ रोजी वयाच्या ३२ व्या वर्षी बाईंनी शामरावांशी लग्न केले. चळवळ्या माणसाशी लग्न केल्याने चळवळीला जोर चढला. नंतर त्या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीतून बाहेर पडल्या. वजनमापाचा लढा हा शेतकरी व सावकार यांच्यातील महत्त्वपूर्ण लढा होता. हा लढा गोदाबाईंनी लढला. त्यात त्यांना यशही आले वर्षाचा खंड घेतांना सावकार जे माप वापरत त्यातला खोटेपणा गोदाबाईंनी हेरला होता. शहापूर, मुरबाड, ठाणे येथे त्यांनी अनेक सभा घेतल्या. चळवळींमुळे ठाणे जिल्ह्यात जाण्यासंदर्भात त्यांच्यावर बंदी घातली गेली. नगर, नाशिक येथेही त्यांनी शेतकऱ्यांना एकत्रित केले. त्यात त्यांना अटक. आठ वर्षे तुरुंगवास, अडीच वर्ष भूमिगत व एक वर्ष सक्तमजूरी अशी कालक्रमना करावी लागली. परुळेकरांनाही सतत तुरुंगवास भोगावा लागला.

पतीपत्नी दोघेही कम्युनिष्ट व क्रियाशील कार्यकर्त होते. १९४५ साली परुळेकर पतीपत्नी व त्यांचे सहकारी ठाणे जिल्ह्यातल्या वारली आदिवासींच्या भागात फिरले. वारल्यांना त्यांनी कम्युनिष्ट तत्वज्ञान सोप्या भाषेत सांगितले.

आदिवासी भागात त्यावेळी जमीनदारांची खटली होती. खटले म्हणजे वेठबिगाराने काम करणारे स्त्री–पुरुष, जमीनदार या आदिवासींना सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत कामाला लावत असे व मजुरी घासभर भात मिळत असे. त्यामुळे आदिवासींची पिळवणूक होत होती. गोदाताईंनी वारली आदिवासी समाजात जागृती करुन त्यांच्यात एकरुप झाल्या. पुढे ११ जानेवारी १९४५ रोजी किसान सभेची स्थापना केली. टिटवाळा येथे परिषद घेतली. हजारो वारली लोक या परिषदेला आले. परुळेकरांच्या भाषणाचा प्रभाव आदिवासी लोकांवर पडला. त्यांनी आपल्या भाषणात वारली लोकांच्या खडतर जीवनाबद्दल चेतावणी दिली व प्रत्यक्ष तिथे जाऊन काम करायचे व्रत गोदाताईंनी केले.

टिटवाळ्याची परिषद पाहून वारल्यांची हिंमत वाढली. वेठ बंद करण्याच्या त्यांनी निश्चय केला. वारल्यांनी वेठ करण्याचे नाकारण्यास सुरुवात केली. त्यामुळे जमिनदारांनी दडपशाही सुरु केली. त्यामुळे गोदाताईंनी आदिवासींची जाहीर सभा घेण्यास सुरुवात केली व वारली समाज संघटित करुन जमीनदार, सावकार गवत कापायला वारली मजुरांना दोन आणे मजुरी देत. हे भयानक शोषण थांबविण्यासाठी गोदाताईंनी संपाला सुरुवात केली. वारली मजुरांनी दिवाळीनंतर गवत कापणे बंद केले. त्यामुळे सावकारांचे नुकसान होऊ लागले. पोलिसांनी गोदाताईंना हद्दपार केले. मात्र ठाण्याच्या कलेक्टरने तो हुकुम रद्द केला. सावकार पुन्हा चिडले. गोदाताईंच्या नावाने खोटी सभा बोलावली व तिथे गोळीबार केला. दशहतीने वातावरण तयार करण्यात आले. तरी देखील वारली लोकांनी गवत कापले नाही. बाईमध्ये दैवी शक्ती आहे असे आदिवासींना वाटत होते. गवत पुरवठा नसल्यामुळे मुंबईच्या दुध पुरवठ्यावर परिणाम झाला. गोदाताईंना परत बोलावण्यात आले व मजुरीचे दर अडीच–तीन, साडेतीन, चार असे ठरविण्यात आले. अवघ्या एका दशकाच्या आत वारल्यांची वेठबिगारी त्यांनी नष्ट करुन टाकली. सावकारी नष्ट झाली असा त्यांचा दावा नसला तरी सावकारशाही उरली नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी गोदाताईंना खूप कष्ट घ्यावे लागले. कठीण अडचणींवर मात्र करुन त्यांनी वारल्यांच्या मुक्ततेचा लढा यशस्वी केला.

गोदावरीबाईंनी केवळ चळवळ केली नाही. 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात वारल्यांचा मुक्ततेचा लढा त्यांनी शब्दबध्द केला आहे. त्यांचे हे जीवंत अनुभव तितक्याच प्रखरपणे या पुस्तकात व्यक्त झाले आहेत. या पुस्तकाला १९७२ मध्ये मराठी भाषेतील सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून राष्ट्रीय

अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांच्या कार्याचा व साहित्याचा गौरव म्हणून १९८५ साली त्यांना त्याच पुस्तकाला सोव्हिएत ॲवार्ड मिळून त्यांचा सन्मान झाला.

अशा प्रकारे गोदाताई परुळेकरांनी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून भावी पिढीपुढे एक नवा आदर्श घालून दिल्याचे दिसून येते.

### ३. बाळासाहेब देशपांडे :–

बाळासाहेब देशपांडे यांचे खरे नांव रमाकांत केशव देशपांडे. बाळासाहेबांचा जन्म अमरावतीत २६ डिसेंबर १९१३ मध्ये एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण एम. ए., एल.एल.बी. झाल्यानंतर काही काळ वकिली केली व १९४३ मध्ये लग्न झाल्यानंतर रेशनिंगमध्ये नोकरी मिळाली. मात्र दोन वर्षांनी १९४५ मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

१९४८ साली देश नुकताच स्वतंत्र झालेला असताना पं. रविशंकर शुक्ला यांच्याकडे मध्यप्रदेशचे नेतृत्व आले. ते जशपूरच्या दौऱ्यावर गेले असता मिशनऱ्यांच्या चिथावणीमुळे आदिवासींनी त्यांचे स्वागत काळी झेंडे दाखवून केले. मिशनऱ्यांच्या देशविरोधी कारवायांवर उपाय योजण्याच्या दृष्टीने त्यांनी हालचाल करण्यास सुरुवात केली. महात्माजींचे अनुयायी ठक्करबाप्पा यांनीही या भागाचा दौरा केला. आदिवासींसाठी काही विधायक कार्य करण्याचे ठरवले. त्याचवेळी त्यांनी रचनात्मक कार्यातील आपले सहकारी पी. जी. वर्णेकरांजवळ चर्चा केली. मागास विभाग कल्याण योजनेखाली कार्य करण्यासाठी बाळासाहेब देशपांडे यांची नियुक्ती झाली. येथूनच बाळासाहेबांच्या जीवनातील नवे पर्व सुरु झाले.

ख्रिश्चन मशिनऱ्यांच्या जशपूर परिसरातील कारवाया एवढ्या राष्ट्र विघातक होत्या की, त्यामुळे भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेलही चिंताग्रस्त झाले होते. आदिवासी बांधवांचे सामुदायिक धर्मांतर केले जाई. गावेच्या गावे ख्रिश्चन होत होती. ही राष्ट्रविघातक कृती वाढतच होती. यावर राष्ट्रीय पातळीवर उपाययोजना होणे आवश्यक होते. ठक्करबाप्पांनी मध्य प्रदेश सरकारला योजना तयार करुन दिली. त्या योजनेची अंमलबजावणी स्वयंसेवी पातळीवरुन व्हावी अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठीच बाळासाहेब देशपांडे नियुक्त केले गेले व बाळासाहेबांनी आपला वकिली व्यवसाय सोडला.

जशपूर क्षेत्रात प्रवेश केला व बाळासाहेबांनी परिस्थितीचे गांभीर्य चटकन ओळखले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या आव्हानाला तोंड द्यायचे असेल तर कामाचा वेग कितीतरी पटीने वाढविणे आवश्यक आहे हे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी एका वर्षात शंभर पाठशाळा, आठ माध्यमिक विद्यालये सुरु करण्याची प्रवृत्ती पाहून त्याला तेवढाच भरघोस प्रतिसाद मिळाला. त्यांची मागणी स्पेशल केस गणली गेली व त्यांना परवानगी मिळाली. माणसे नेमण्याचेही स्वातंत्र्य त्यांना मिळाले. राष्ट्रविरोधी कारवायांना प्रतिबंध घालण्याचा सर्व मार्गांनी त्यांनी प्रयत्न केला. वनवासींचे कल्याण या दृष्टीने विचार करता केवळ शासकीय योजना पुरेशा नाहीत हे जाणून सरकारी कामाबरोबर बिगर सरकारी कामालाही सुरुवात केली. मध्यप्रदेशातील उराँव, कँवर इत्यादी जमातीच्या लोकांना बोलाविले. त्यांना व्यासपीठावर आणले व भजन किर्तनाद्वारे धार्मिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धर्मसभा स्थापन केली.

विदेशी मिशनऱ्यांच्या दडपणामुळे येथील धर्मांतरीत लोक 'जयहिंद' चा नारा देत नसत. त्याऐवजी 'जय येशू' 'जय ईसाईस्थान' असे नारे दिले जात. मात्र बाळासाहेबांच्या कठोर प्रयत्नातून या लोकांनी 'जयहिंद' नारा देण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक गोळवलकर गुरुजी एकदा छत्तीसगडच्या दौऱ्यावर होते. त्यांनी त्या परिसरातील आदिवासींची परिस्थिती पाहिली व त्यांच्या प्रेरणेतून <u>वनवासी कल्याण आश्रमाची</u> कल्पना पुढे आली व जशपूरचे महाराजा विजयभूषणसिंह यांनी जागा दिली. छात्रालय सुरु झाले. सुरुवातीस चार विद्यार्थी होते. १९ डिसें. १९५२ या दिवशी 'वनवासी कल्याण आश्रम' संस्थेची स्थापना बाळासाहेबांच्या अथक प्रयत्नातून झाली.[१२]

वनवासी कल्याण आश्रमशाळेच्या कार्यपध्दतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे <u>एकरुपता</u> होय. छात्रावास, चिकित्सालये, जाणीव केंद्र, धर्मजागरण पर्व, भाव जागरण ही कल्याण आश्रमाची शक्तीकेंद्रे मानली जातात. सर्वधर्मसमभाव हे कल्याण आश्रमाच्या कार्यपध्दतीचे वैशिष्ट्ये होय. ख्रिश्चनांच्या राष्ट्रविरोधी कारवायांना, जबरदस्तीने केलेल्या धर्मांतराला, अज्ञानाचा फायदा घेऊन ख्रिश्चन धर्म लादला जातो. त्याला सर्वसमावेशक कार्यपध्दतीच्या बळावरच कल्याण आश्रमाचे काम अधिक गतीने वाढू लागले.

१९६९ मध्ये मध्यप्रदेशात वनवासी कल्याण परिषदेची स्थापना झाली. मंडला, सीधी, इंदोर, उजैन, जबलपूर, रांची, बिलासपूर, लोहरदगा, सिमडेगा इ. ठिकाण कल्याण आश्रमाचे कार्य पसरले. आज देशातील प्रत्येक राज्यातील आदिवासी भागात वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य पोहोचले आहे. कल्याण आश्रमाने निर्माण केलेल्या स्नेहबंधाने लोक धर्मांतराचा विचार करु लागले आहेत. स्वयंस्फूर्तीने बहुतेक जण स्वधर्मात परत येत आहेत.

आदिवासींच्या बाबतीत बाळासाहेब म्हणतात की, सर्व समाज बांधवांनी दाखविलेली अनास्थाच त्यांच्या या स्थितीला कारणीभूत आहे. विदेशी लोकांकडून होणारे सांस्कृतिक शोषण व स्वकियांकडून होणारे आर्थिक शोषण यामुळे त्यांचे जीवन अंधकारमय बनले आहे. वनवासी कल्याणाच्या योजना एरिया ओरिएंटेड असाव्यात असे त्यांना वाटते.

बाळासाहेबांच्या वाढत्या कामाचे प्रतिक म्हणजे 'सूर्यनिकेतन केंद्र'. नवीन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून सूर्यनिकेतन येथे वनवासी क्षेत्राचे नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक दृष्टीने अध्ययन केंद्र स्थापन केले आहे. त्या केंद्रात आदिवासींचा इतिहास, परंपरा, भाषा, बोली यांचा अभ्यास केला जातो. बदलत्या परिस्थितीत वनवासी विकासासाठी आधुनिक तंत्र शोधले जाते. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा चिकित्सक आढावा घेतला जातो. याच कार्यात सहभागी असणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या योजनांचा समन्वय घातला जातो. कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले जाते. बाळासाहेबांच्या रचनात्मक दृष्टीकोनाचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे हे 'सूर्यनिकेतन' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अशा प्रकारे बाळासाहेबांनी वनवासी कल्याण आश्रम चळवळीच्या माध्यमातून आदिवासींसाठी उभारलेला लढा मोठ्या प्रमाणात यशस्वी केल्याचे दिसून येते.

## ३.५ आदिवासी चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व :-

आदिवासींमधून पुढे आलेल्या नेतृत्त्वात सामाजिक चळवळीतून आलेले नेतृत्त्व व राजकीय स्तरातील नेतृत्व असे दोन प्रकार करता येतील.

भारतामध्ये आदिवासी सामाजिक चळवळीतून पुढे आलेल्या नेतृत्वात शिबु सोरेन, नारायणसिंग उईके, गोविंद गारे, जयवंतराव नटावदकर इत्यादींचा समावेश होतो. त्यातील प्रमुख नेतृत्वाची चर्चा पुढीलप्रमाणे –

## १. शिबु सोरेन :–

सामाजिक चळवळीतून पुढे आलेल्या नेतृत्वात शिबु सोरेन यांचा समावेश करता येईल. तत्कालिन बिहार राज्यातील व आताच्या झारखंड राज्यातील इ. स. १९५० मध्ये जमशेदपूर येथे आदिवासींना समान न्याय मिळण्यासाठी आर्थिक उन्नतीसाठी, समांतर विकासासाठी स्वतंत्र राज्य निर्मिती होणे आवश्यक आहे. हा विचार डोळ्यासमोर ठेवून झारखंड पार्टीची स्थापना झाली. त्यावेळी या पाटीचे नेते जयपाल सिंह होते. या चळवळीच्या रुपाने स्थापन झालेल्या पार्टीने १९५२ ची निवडणूक लढविली. त्यात ३२ जागा मिळाल्या. परंतु जयपालसिंग काँग्रेसच्या जवळ गेल्यामुळे १९५७ च्या निवडणूकीत ही संख्या २५ वर आली तर इ. स. १९६२ मध्ये झारखंड पार्टीचे नेते जयपालसिंगांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे नेतृत्वात फाटाफूट झाली. चळवळ बऱ्याच प्रमाणात थंडावली.

बिरसा सेवादलाने इ. स. १९६८ मध्ये झारखंडची मागणी केली. बिरसा आंदोलन भूमी बळकावणाऱ्यांच्या विरूध्द तसेच सावकार व महाजन यांच्या विरूध्द जोर धरु लागले. अशातच श्री. शिबु सोरेन यांनी इ. स. १९७३ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना केली.[१३] झारखंड स्वतंत्र राज्य निर्माण झाले पाहिजे. आर्थिक उन्नती, आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी झारखंड राज्य निर्माण करणे किती आवश्यक आहे. हे केंद्रीय स्तरावरील शासनाला वेळोवेळी चर्चेच्या माध्यमातून प्रसंगी राजकीय व आंदोलनाच्या माध्यमातून स्वतंत्र राज्याची गरज लक्षात आणून दिली असतानांही विशेष यश मिळत नव्हते. १९८५ च्या निवडणुकीत श्री. शिबु सोरेन यांच्या मुक्ती मोर्चाला १४ जागा मिळाल्यात. झारखंड को–ऑर्डिनेशन कमिटी, श्री. केलरी यांनी स्थापन केली. या चळवळीला कम्युनिस्ट, नक्षलवादी व इतर सर्वांनीच पाठिंबा दिला होता. त्यामुळे शिबु सोरेन यांच्या नेतृत्त्वाखाली

या पक्षाला व आंदोलनाला धार आली. १६ मार्च १९९३ पासून आर्थिक नाकेबंदी अभियान सुरु केले. संसदेत शिबु सोरेन यांना आश्वासन देण्यात आले की, वेगळे झारखंड राज्य बनवितांना अखरेचा निर्णय घेण्यापूर्वी बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा व पं. बंगालच्या मुख्यमंत्र्यांना विश्वासात घेतले जाईल.

१९९५ आणि १९९६ मध्ये स्वतंत्र झारखंड निर्मितीच्या संदर्भात शिबु सोरेन सतत राजकीय चर्चेत राहिले. शेवटी १५ नोव्हेंबर २००० मध्ये स्वतंत्र झारखंड राज्याची स्थापना करण्यात आली. या स्वतंत्र राज्यात १८ जिल्हे असून त्यांची राजधानी 'रांची' ठेवण्यात आली.

एकूणच शिबु सोरेन यांनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करण्यासाठी चळवळीतून निर्माण झालेल्या पक्षाच्या माध्यमातून यश मिळाल्याचे दिसून येते.

## २. नारायणसिंग उईके :–

महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्याच्या ठिकाणापासून पाच कि. मी. अंतरावरील कंटगी (नागरा) या लहानशा गावी ११ जुलै १९१७ रोजी नारायणसिंगाचा जन्म झाला. वडिल शिक्षक होते. ते ज्या ज्या ठिकाणी आदिवासींची सभा, संमेलने व मेळावे घेत त्या त्या ठिकाणी ते आवडीने जात. समाजसेवेचे हेच संस्कार त्यांनी नारायणवर केले.

नारायणसिंगाचे बी. ए. पर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९४१ साली त्यांना चंद्रपूर येथे शासकीय विद्यालयात शिक्षकाची नोकरी मिळाली. काही काळ त्यांनी धानोरा, गोडपिंपरी या ठिकाणी रेव्हेन्यू इन्स्पेक्टर म्हणूनही काम केले. नोकरीच्या निमित्ताने आदिवासींच्या तृणाच्या पानाच्या चंद्रमोळी झोपड्या त्यांनी जवळून पाहिल्या. आदिवासींचे खरे जीवन त्यांनी पाहिले. आदिवासी मागे का रहावा त्यांनीच वर्षानुवर्षे अन्याय का सहन करावा अशा शेकडो प्रश्नांनी त्यांच्या डोक्यात थैमान घालायला सुरुवात केली. यातून मार्ग काढण्याच्या निर्णयाप्रत ते आले. आपल्या नोकरीतून वेळ काढून ते चंद्रपूरचा भूप्रदेश पाहण्यासाठी आदिवासी बांधवांशी संपर्क वाढवून समरस झाले. आदिवासी समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एका समाजसेवी मंडळाची स्थापना केली. या मंडळाचे नाव

'चांदा जिल्हा काँग्रेस आदिवासी सेवा मंडळ' असे ठेवण्यात आले.[१४] गावोगावी मंडळाच्या शाखा स्थापन केल्या. शिक्षकी पेशा सांभाळून नारायणसिंगजी हे कार्य करीत होते. मात्र सामाजिक कार्याचा व्याप वाढत गेला. त्यांना समाजकार्यासाठी नोकरी सोडावी लागली.

नोकरी सोडल्यानंतर आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी राजकारणात प्रवेश करण्याचा निर्धार केला. १९५२ साली चंद्रपूर जिल्ह्यातील पुराडा (हेटी) मतदार संघातून निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाचे तिकिट मिळाले नसतांना देखील लोकप्रियतेच्या जोरावर लोकांनी केलेल्या आर्थिक तरतूदीतून ते निवडून आले. राजकारणात असतांनाही त्यांनी समाजसेवेचे कार्य सुरुच ठेवले.

१ मे १९९० रोजी महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये अलग करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे स्वतंत्र सरकार निर्माण झाले. मा. यशवंतराव चव्हाण पहिले मुख्यमंत्री झाले. तेव्हापासून नारायणसिंग महाराष्ट्र विधानसभेत सदस्य झाले. यानंतरचा सारा संघर्ष महाराष्ट्र शासनाशीच राहिला. ६ डिसेंबर १९६० रोजी महाराष्ट्र विधानसभेवर ६० हजार आदिवासींचा प्रचंड मोर्चा नेला. तरीही आदिवासींच्या ज्वलंत समस्येकडे सरकारचे पुरेसे लक्ष वेधले नाही. हे त्यांच्या लक्षात येताच काही मागण्यांच्या संदर्भात शिष्टमंडळ घेऊन ते दिल्लीला गेले. कॉम्रेड ए. बी. वर्धन व रेणू चक्रवर्ती यांच्याबरोबर होत्या. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री स्व. लालबहादूर शास्त्री यांना ४ सप्टेंबर १९६१ रोजी त्यांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये आदिवासींच्या विकासाबद्दल त्यांचा जिव्हाळा दिसून येतो.

१८ ऑक्टोंबर १९६२ रोजी नागविदर्भ आदिवासी मंडळाच्या वतीने विदर्भाचे तिसरे अधिवेशन नारायणसिंगानी भरविले. या अधिवेशनात आदिवासींच्या अस्मितेची अधिकारांची व हक्कांची जाणीव त्यांनी तीव्रतेने मांडून आदिवासी विकासासंदर्भात प्रखर टिका केली. त्यामुळे ह्या अधिवेशनात त्यांची प्रखरता, आक्रमकता व लोकप्रियता दिसून आली. १९६३ साली मंडळाच्या वतीने तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरुंना निवेदन सादर केले. या निवेदनात आदिवासींची स्थिती सुधारण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजावेत. विदर्भाबाबत शासनाने केलेला भेदभाव त्यांनी निदर्शनास आणून दिला. शेवटचा उपाय म्हणून गडचिरोली येथे १८ एप्रिल १९६५ रोजी विदर्भातील ९ लाख आदिवासींच्या काही महत्त्वाच्या मागण्यांसाठी त्यांनी प्राणांतिक उपोषणास सुरुवात केली. परिणामी काही मागण्या मान्य झाल्याने उपोषण सोडले.

नारायणसिंग उईकेंनी आपल्या नेतृत्त्वाखाली इ. स. १९५२ ते १९७२ या काळात आदिवासींमध्ये जाणीव–जागृती करुन चळवळी उभ्या केल्या. एक चळवळ त्यांनी हल्लीच्या गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा–धानोरा या भागात जबरनजोत चळवळ सुरु केली. जे आदिवासी शेतकरी २६ ते ३० वर्ष शेती करीत होते परंतु ज्यांना जमिनी व मालकी हक्क नव्हता. त्यांच्यासाठी ही चळवळ सुरु करण्यात आली. परिणामतः हजारो आदिवासींना मालकी हक्क प्राप्त झाले.

एकूणच आदिवासींच्या सामाजिक चळवळीच्या माध्यमातून व राजकारणाच्या माध्यमातून त्यांनी आदिवासींचे खरे प्रश्न सोडविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते.

### ३. डॉ. गोविंद गारे :

डॉ. गारे यांचा जन्म १९३९ साली जुन्नर तालुक्यातील निमगिरी गावी गरीब महादेव कोळी कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण गावी झाले. पुढे जुन्नर–पुणे अशी शिक्षणाची वाटचाल केली.

विद्यार्थी दशेपासूनच डॉ. गारे यांना समाजाबद्दल तळमळ आस्था होती. त्यांच्या गावात १९५४ साली स्थापन झालेल्या आदिवासी शिक्षण संस्था, निमगिरी या संस्थेच्या उभारणीच्या काळात विद्यार्थीदेशत त्यांनी भाग घेतला. त्या काळात संस्थेने अनेक वसतिगृह काढली. आज संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाल्याचे दिसते. शिक्षण घेत असतांना समाजाबद्दल तळमळीने लिहिण्याची प्रेरणा त्यांना दै. विशाल सह्याद्रीचे संपादक अनंतराव पाटील व थोर साहित्यिक शंकरराव खरात यांच्यापासून मिळाली. कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांनाच महादेव कोळी समाजाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर प्रकाश टाकणारी लेखमाला त्यांनी दै. विशाल सह्यादी या दैनिकांतून १९६२–६३ साली प्रसिध्द केली.

त्याकाळी एम. ए. पदवी संपादन करणारे डॉ. गोविंद गारे हे महादेव कोळी समाजाचे पहिले पदवीधर व त्यानंतर या समाजावर ११ वर्षे संशोधनाचे काम परिश्रमपूर्वक करुन त्यांनी पीएच.डी पदवी मिळविली. केलेल्या संशोधनामुळे त्यांना शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालकपद मिळाले. या पदाच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचे जतन, सामाजिक स्थिती तसेच

आश्रमशाळा व आश्रमशाळा शिक्षिकांचे प्रशिक्षण, त्यांचे व समाजाचे प्रश्न यांविषयी बहुमोल मदत केली व तसेच अनु. जमातीच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी शासनाला आवश्यक मदत, सल्ला देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

शासनाच्या सेवेतील २० वर्षाच्या कार्यात त्यांनी आदिवासींचा खरा मित्र व मार्गदर्शकाची भूमिका बजावली. सेवेत असतांना देखील त्यांनी आदिवासींसाठी लेखनीच्या माध्यमातून व अधिकाराच्या माध्यमातून एक नवी चळवळ व लढा उभा केला. खोट्या आदिवासींच्या संदर्भात वेळोवेळी आवाज उठवून त्यांनी प्रामाणिक आदिवासींचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांना खऱ्या आदिवासींचा रक्षणकर्ता असे संबोधले जाते.

मराठी साहित्यात देखील त्यांनी भौतिक कामगिरी बजावली. आदिवासी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून देखील त्यांनी आदिवासींच्या समस्या, आदिवासींची संस्कृती यांचे जतन करणे कसे आवश्यक आहे याचे उद्बोधन व विपुल प्रमाणात केलेल्या लेखनीच्या व ग्रंथसंपदेच्या माध्यमातून आदिवासींमध्ये एक वेगळी वैचारिक स्वरुपाची चळवळ निर्माण करण्याचे काम डॉ. गारेंनी केले.

आदिवासी आश्रमशाळेची योजना आदिवासींसाठी फार महत्त्वपूर्ण समजली जात होती. डॉ. गारेंनी या आश्रमशाळांचे नियोजन करणारा १० वर्षाचा आराखडा तयार केला. त्याचे नियोजन शासनाला व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरते. तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था राज्यभर व देशभर नावारुपाला आणण्याचे सर्व श्रेय डॉ. गारेनांच आहे. महाराष्ट्र राज्य आदिवासी महादेव कोळी समाज संघटनेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. या संघटनेच्या माध्यमातून देखील त्यांनी समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

एकूणच डॉ. गारेंनी आदिवासींच्या विविध प्रश्नांच्या बाबतीत विद्यार्थी दशेतच सामाजिक कार्यातून व त्यानंतर शासनाच्या सेवेत असतानाही शासनाशी वेळोवेळी चर्चा, सल्ला–मसलीतून व लेखनीसारख्या चळवळीच्या माध्यमातून व त्याचबरोबर आदिवासी समाजाच्या संघटनात्मक चळवळीच्या माध्यमातून आदिवासींचे प्रश्न पोटतिडकीने सोडविण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते.

## ३.६ आदिवासींमधून पुढे आलेले राजकीय नेतृत्व :

आदिवासी समाजासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात देखील विविध नेतृत्वाने महत्त्वपूर्ण भूमिका व धोरणात्मक कार्यक्रम राबविल्याचे दिसते. मात्र आज आदिवासी समाजाच्या विकासासाठी आदिवासींमधून देखील राजकीय नेतृत्व पुढे आल्याचे दिसते. त्यात मधुकरराव पिचड, शिवाजीराव मोघे, ए. टी. पवार, माणिक होडल्या गावीत, स्वरुपसिंग नाईक, विजयकुमार गावीत, पद्माकर वळवी यासारख्या राजकीय नेतृत्वाचा विशेष उल्लेख करता येईल.

### १. मधुकरराव पिचड :-

आदिवासी समाजाचे एक जबाबदार व कर्तृत्ववान अभ्यासू नेतृत्व म्हणून मधुकरराव पिचड यांचा उल्लेख केला जातो. मधुकरराव पिचड यांचा जन्म मौजे राजूर ता. अकोला जि. अहमदनगर येथे जून १९४० साली झाला. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांचा शेती हा परंपरागत व्यवसाय प्राथमिक शिक्षण मेहेंदूरी या गावी व माध्यमिक शिक्षण संगमनेर येथे तर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी १९५८ साली पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेमध्ये प्रवेश घेतला. १९६२ साली ते बी. ए. झाले. मधुकररावांनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आपल्या सामाजिक चळवळीचा श्रीगणेशा येथूनच केला. महाविद्यालयीन शिक्षण व राजकारणाचे धडे त्यांनी येथूनच गिरवले.

स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय, प्रस्थापित व्यवस्थेतील विसंगतीविरुध्द बंड करायला प्रवृत्त करते. मधुकररावांचेही तसेच झाले. नोकरीची, व्यवसायाची संधी असतांना राजूर येथील सत्य निकेतन विद्यामंदिर संस्थेची नोकरी सोडून दिली व तळागाळातील आदिवासी व दलितांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी काम करायला सुरुवात केली.

सुरुवातीला आमदार यशवंतराव भांगरे यांच्या सहवासात राहून त्यांनी सामाजिक व राजकीय धडे घेतले. त्यांनी सहकारी उत्पादन व संकलन करणाऱ्या संस्था तालुक्यात, गावागावात उभ्या केल्या. १९६२ साली राजूर येथे आदिवासी विभागातील पहिली सहकारी दुध संस्था स्थापन केली. त्यातूनच पुढे तालुका दूध संघाची कल्पना प्रत्यक्षात उतरली. सहकारी तत्वावर भात गिरणीही स्थापन

करण्यात आली. आदिवासी शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून गायी, म्हशी पाळण्याची आवड लोकांमध्ये वाढविली. दुधाचे व शेतीचे अर्थशास्त्र त्यांनी लोकांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. अमृतसागर दूध सहकारी संघाची स्थापना झाली. काही वर्ष ते अध्यक्षही होते. त्यामुळे आदिवासींचे अर्थशास्त्रच बदलून गेले. त्यांचे हे कार्य लोकांच्या कायम लक्षात राहिले. या जोरावर १९७२ साली ते अहमदनगर जिल्हा परिषदेवर राजूर मतदारसंघातून निवडून आले. १० वर्ष तालुका पंचाय समितीचा सभापती व जिल्हा परिषद सदस्य म्हणून जनतेची सेवा केली.

१९८२ साली आमदार यशवंतराव भांगरे यांच्या अकाली निधनामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर राखीव मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर मधुकरराव पिचड निवडून आले. त्यानंतर सतत सात वेळा विधानसभेवर निवडून येण्याचा मान त्यांनी मिळविला आहे.

मधुकररावांनी महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विभागाचे राज्यमंत्री म्हणून १९८४ ते १९८९ पर्यंत काम केले तर आदिवासी विकासमंत्री म्हणून १९८९ ते १९९४ व १९९९ ते २००३ तर मे २०१३ ते आजपर्यंत या खात्याच्या कारभार सांभाळत आहेत. मधुकररावांनी आदिवासी शेतकऱ्यांसाठी सहकारी तत्वावर अगस्ती सहकारी साखर कारखाना १९९२ मध्ये अकोले येथे सुरु केला.

महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आल्यानंतर आदिवासींच्या संरक्षणासाठी राज्यातील आदिवासी आमदारांना एकत्र करुन आदिवासी आमदार मित्र मंडळाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. हा फोरम आदिवासींच्या विविध प्रश्नांसाठी प्रभावी कार्य करत आहे. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेचे गेली ७ / ८ वर्ष ते अध्यक्ष आहेत तर २००१ साली राष्ट्रीय पातळीवर त्यांची परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली. या माध्यमातून ते देशपातळीवर आमदार, खासदारांना संघटित करण्याचे काम करत आहेत. बोगस आदिवासींच्या विरूध्द समाजजागृती व हक्क संरक्षणाची चळवळ त्यांनी राज्यभर उभी केली. आदिवासी विकास विभागाची पुर्नचना व आदिवासी क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण त्यांच्याच कुशल नेतृत्वाखाली घडले. आदिवासींच्या प्रश्नांची चांगली जाण असल्यामुळेच त्यांनी आदिवासींसाठी स्वतंत्र बजेट मंजूर करुन घेतले. आदिवासींना आर्थिक स्वायत्तता मिळवून दिली.[१५]

१९९४ ला सत्तांतर झाल्यानंतर मधुकररावांना विरोधी पक्षाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. या पाच वर्षाच्या काळात आपल्या वक्तृत्वशैलीने विधानसभा गाजविली व जनतेचे अनेक प्रश्न सोडविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एका आदिवासी कार्यकर्त्यांने महाराष्ट्र विधानसभेतील विरोधी पक्षाच्या नेतृत्त्वाची धुरा सांभाळावी ही सत्तेतील मंत्रिपदापेक्षाही बहुमानाची विशेषतः आदिवासी समाजाला अभिमान वाटेल अशी बाब समजली पाहिजे. मधुकरराव पिचड यांनी आदिवासी भागातील रस्ते, पाटबंधारे योजना, उपसासिंचन योजना तसेच अतिदुर्गम भागातील कुपोषण टाळावे यासाठी जलदगतीने आर्थिक, शैक्षणिक विकास व्हावा म्हणून स्पेशल ॲक्शन प्लॅन तयार करुन त्याद्वारे अशा विभागासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली. तसेच पिचड यांनी आश्रमशाळांसाठी नवी संहिता आणली. हे कार्य शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे व आदिवासी विकासाला निश्चित दिशा देणारे ठरले आहे. न्यूक्लिअस बजेट योजनांची पुनर्रचना, आदिवासींसाठी १०० टक्के अर्थसहाय्यावर लिफ्ट योजना. खडकातील टाक्यांची पाणीपुरवठा योजना, आश्रमशाळेतून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय, मुलींसाठी वेगळ्या आश्रमशाळा इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा, अतिसंवेदनशील प्रकल्पासाठी विशेष यंत्रणा व नवसंजीवनी योजना, खोट्या आदिवासीच्या घुसखोरीला प्रतिबंध, तपासणी समित्यांची पुनर्रचना, सुप्रीम कोर्टापर्यंत आदिवासीच्या हक्कासाठी व रक्षणासाठी लढा, जाती प्रमाणपत्र तपासणी कायदा २००१, अनुसूचित जाती व जमाती आदेश (दुसरी आवृत्ती) अधिनियम २००२ साठी त्यांनी दिलेले योगदान इ. चा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

आज ते राज्याच्या मंत्रिमंडळात आदिवासी विकास मंत्री म्हणून कार्यरत असून त्यांची आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भातील वाटचाल निरंतर सुरुच असल्याचे दिसते. यातून त्यांचे नेतृत्व हे बहुआयामी, सर्वमान्य असल्याचे सिध्द होते.

## २. ॲड. शिवाजीराव मोघे :–

आदिवासींचे हित जोपासणाऱ्या नेतृत्वात शिवाजीराव मोघेंचे नांव विशेषत्वाने घेतले जाते. श्री. शिवाजीराव मोघे यांचा जन्म आंध आदिवासी जमातीत मरसूळ ता. पूसद या गांवी २७ मार्च १९४५ रोजी झाला. आई, वडील निरक्षर त्यामुळे मुलाने शिकावे असे त्यांना वाटे. शिवाजीरावांनी वर्ध्याला

एम. कॉम् पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पुढे शिवाजीरावांनी समाजाच्या सेवेसाठी वकिली करावी असेलोकांना वाटे. त्यातून त्यांनी नागपूरहून वकिलाची सनद घेऊन बाहेर पडले. त्याकाळी श्री. बाबुराव देवरावजी डवले हे आँध समाजातील पहिले वकिल होते. त्यानंतर वकिल होण्याचा मान शिवाजीरावांना मिळाला. त्यांचे नांव आंध समाजात झळकू लागले. पुढे अकोला जिल्हा परिषद सदस्य श्री. चिंतामणराव झळके यांच्या सुकन्येशी शिवाजीरावांचा विवाह झाला. राजकारण व समाजकारणात पुढे येण्यासाठी चांगल्या घराण्याशी संबंध जुळून यावे लागतात. तसेच काहीसे शिवाजीरावांच्या बाबतीत घडले असावे.

समाजासाठी आपण काही तरी केले पाहिजे. या भावनेतून १९७१ साली शिवाजीरावांनी आदिवासी तरुणांना एकत्र आणले व सारा आँध समाज एकत्र आला. तरुणांमध्ये उत्साह वाढला व त्यातून मोठे समाजसंघटन घडून आले. ११ सप्टेंबर १९७१ रोजी श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते आँध संघटनेचे रितसर उद्घाटन झाले. त्यानंतर संघटनेने जिल्हावार जनजागृती, मेळावे, सामाजिक मेळावे, सभा, बैठका घेतल्या. ह्या मेळाव्यांनी समाजात आलेली मरगळ घालविणे शक्य झाले. या परिवर्तनाचे कल्पक व शिल्पक शिवाजीराव मोघे यांचे नाव आजही लोक गावोगाव घेतात. पैनगंगेच्या काठी घनदाट जंगलात कोटी या वनग्रामात आँध समाजाचा भव्य मेळावा त्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे आदिवासी कल्याण खात्याचे राज्यमंत्री श्री. रामू पटेल यांच्या हस्ते झाले. आदिवासी बांधवाच्या मोठ्या उपस्थितीमुळे मंत्री देखील भारावून गेले. शिवाजीराव मोघेंनी आपल्या भाषणात आदिवासी बांधव मागे का पडला आहे व त्याला पुढे आणण्यासाठी काम केले पाहिजे. या दिशेने उपस्थितांना मार्गदर्शन केले. जुन्या रुढी सोडा, अंधश्रध्दा सोडा, मजूरी करा पण दुसऱ्याचे गुलाम होऊ नका. स्वाभिमानाने जगायला शिका. त्यांचे हे मार्गदर्शन आदिवासी युवक सेवा संघाच्या व पुढे येऊ पाहणाऱ्या सामाजिक संस्थांना मार्गदर्शक ठरले. समाजासाठी त्यांचे हे योगदानच मानले पाहिजे. आँध समाजाच्या परिवर्तनाचे व बदलाचे क्षेत्र शिवाजीरावांना द्यावे लागेल. दारु सोडणाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, मानसन्मान मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी सर्वांच्या साक्षीने दारु सोडणाऱ्यांचे सत्कार घडविले. त्यांना मानपत्रेही दिली. गावपातळीवर व्यसनमुक्त गावांचेही मानसन्मान घडविले. समाजापुढे नवा आदर्श आणण्याचा त्यांचा हा उपक्रम स्तुत्य होता.

१९६०–६५ पर्यंत सावरगड येथे या परिसरातील आँध समाजाच्या ५२ गावांची सामाजिक बैठक भरत असे. ही बैठक म्हणजे समाजनियंत्रणाची एक कडी होती. हे ओळखून शिवाजीरावांनीही बैठकीला हजर राहण्याचे ठरविले. अंधश्रध्दा, जुन्या रुढी–परंपरा, चालीरीती व प्रथा पध्दती कशा चालू ठेवल्या पाहिजेत. यावर जुन्या समाजधुरीणांचा रोख असे. बैठकीत शिवाजीरावांनी अंधश्रध्दा, जुन्या रुढी परंपरेचे उच्चाटन झाल्याशिवाय समाजात नव्या सुधारणा होणार नाहीत असे सांगितले. तेव्हा ५२ गावातील समाजसुधारकांनी या अंधश्रध्दा, रुढी–परंपरा मोडून काढण्यासाठी मदत करावी व समाजाला वाचवावे असे आवाहन केले. या बैठकीत त्यांच्या आवाहानाचे सर्वांनी स्वागत केले व नवा समाज घडविण्यासाठी 'जुनी समाज बैठक' तोडून आता नवीन समजाची घडी बसवायला हवी असे ठरले. याचा सर्वत्र गाजावाज झाला व त्याचा अपेक्षित परिणाम लवकरच सर्वत्र दिसू लागला. अंधश्रध्दा निर्मूलनातील शिवाजीरावांचे हे योगदान नोंद घेण्यासारखे आहे.

आदिवासी समाजात मुलामुलींच्या विवाहासाठी कोठूनही पैसा गोळा करुन कोंबडे, बकरे, जमिनी विकून कर्जबाजारी होऊन लग्न केली जात असत. म्हणून गरिबाला मुला–मुलींची लग्न कमी खर्चात करता यावीत. खर्चाला आळा बसावा यासाठी शिवाजीरावांनी पुसद येथे सामूहिक विवाह मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला यवतमाळ जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. सुधाकरराव नाईक हजर होते. या मेळाव्यात फक्त तीन विवाह सामूहिक विवाह पध्दतीने पार पडले व त्याचा खर्च वराला फक्त रु. १०१/– व वधुला फक्त ५१/– एवढा झाला होता. ही बाब छोटी होती. मात्र आँध समाजाला पुढे मार्गदर्शक ठरली. विवाह परंपरेत परिवर्तन घडून आले.

१९७४ साली तत्कालिन पंतप्रधान स्व. श्रीमती इंदिरा गांधी व राष्ट्रपती श्रीमान व्ही. व्ही. गिरी यांना भेटण्यासाठी आँध समाजाचे शिष्टमंडळ दिल्लीस गेलेले होते. पैनगंगा नदिच्या पलिकडे मराठवाड्यात राहणारा आँध आदिवासी ठरला होता तर नदिच्या अलिकडे विदर्भात राहणारा आँध आदिवासी ठरत नव्हता. हा समाजावर मोठा अन्याय होता. हे या समाजाचे मोठे दुःख असण्याची कथा इंदिराजींना सांगितली. त्यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतले व १९७६ मध्ये क्षेत्रबंधन उठवून इंदिराजींनी आँध व इतर आदिवासी जमातींना न्याय मिळवून दिला. वसंतराव नाईकांच्या या शिष्टमंडळात शिवाजीराव देखील होते. शिवाजीरावांनी एक भाऊ पैनगंगा नदिच्या पलिकडे गेला तर तो

आदिवासी ठरतो व दुसरा भाऊ मात्र नाही. हा मुद्दा शिवाजीरावांनी इंदिराजींना चांगल्या प्रकारे पटवून दिला. त्यामुळे विदर्भातील या समाजाचे लोक आदिवासी म्हणून पुढील काळात ठरले गेले.[१६]

पांढरकवडा मतदार संघातील शिवाजीरावांचे कार्य मोठे आहे. त्यामुळे या मतदारसंघात गोंड, कोलाम, परधान या आदिवासी समाजाचा मतदारसंघ असतांनाही व आँध समाज या मतदारसंघात नसतांनाही या समाजाचे शिवाजीराव गेल्या ३० वर्षापासून निवडून येत आहेत.

शिवाजीरावांना १९७८ ला दिग्रस मतदारसंघातून विधानसभेची उमेदवारी मिळाली. मात्र अपयश आले. त्यानंतर १९८० मध्ये केळापूर राखीव मतदार संघातून काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आले. १९८२ मध्ये डॉ. बाबासाहेब भोसले मंत्रिमंडळात त्यांना उपमंत्रीपद भूषविण्याचा मान मिळाला. १९८५ मध्ये दुसऱ्यांदा केळापूरहून निवडून आले. १९८६ मध्ये मा. शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात शिवाजीरावांना आदिवासी विकास विभागाचे कॅबिनेट मंत्रिपद मिळाले व आदिवासी विकासाला नवा दृष्टीकोन देण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करुन गडचिरोली आदिवासी जिल्हा निर्मितीचे काम केले. १९९० मध्ये काँग्रेसचे शिवाजीरावांना केळापूर मतदारसंघातून उमेदवारी मिळाली. मात्र स्थानिक राजकारण आडवे आले व त्यामुळे पराभव झाला. १९९५ मध्ये चौथ्यांदा काँग्रेसच्या तिकिटावर ते निवडून आले. २००४ च्या व २००९ च्या विधानसभा निवडणुकीतही ते निवडून आले. आज काँग्रेस–राष्ट्रवादी प्रणित लोकशाही आघाडी मंत्रिमंडळात ते सामाजिक न्याय खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून कार्यरत आहेत.

अशा प्रकारे तळागाळातील आदिवासींची सखोल जाण असणारे व आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात वेळोवेळी योग्य भूमिका घेऊन कार्यरत असणारे आदिवासी नेतृत्व म्हणून आजही ते सक्षमपणे काम करतांना दिसून येतात.

### ३. अर्जुन तुळशीराम पवार (ए. टी. पवार)

नाशिक जिल्ह्यातील एक कार्यक्षम व कर्तव्यदक्ष नेतृत्व म्हणून ए. टी. पवारांचे नांव अग्रस्थानी घेतले जाते. अर्जुनराव पवार उर्फ ए. टी. यांचा आदिवासी अतीदुर्गम भागात असलेल्या दळवट गांवी

आदिवासी कोकणा समाजात १९३८ मध्ये जन्म झाला. परिस्थिती गरीबीची असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून एम. ए. पर्यंत शिक्षण केले. परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी प्राध्यापक म्हणून नोकरीस सुरुवात केली. मात्र पुढे नोकरीत न राहता त्यांनी समाजसेवेचे व्रत हाती घेतले. तत्कालीन समाजातील दुःखे, दारिद्र्य, शिक्षणाअभावी अज्ञानी, कालबाह्य रुढी यात परिवर्तन व्हावे, हा हेतू बाळगून त्यांना त्यावेळचे राजकीय सहकारी पोपट पाटील, साहेबराव देशमुख, टी. एस. पाटील, एकनाथ जाधव याारख्या कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद कनाशी गटात उमेदवारीसाठी आग्रह केला व १९६७ मध्ये निवडून आले. सन १९६७ ते १९७२ पर्यंत ते जि. प. सदस्य तसेच अध्यक्ष व जि. प. सभापती, कृषी पशुसंवर्धन ही पदे मिळाली. या पदांना त्यांनी न्याय दिला.

आदिवासी प्रदेश सर्वच क्षेत्रात प्रगत झाला पाहिजे. हे त्यांचे लक्ष्य आहे. आदिवासी जनतेची लोकोपयोगी कामे ते करतात. मात्र प्रसिध्दीच्या झगमटापासून दूर राहून शांतपणे, निष्ठेने कार्य करीत राहण्यात पवारांना रस आहे. संवेदनशीलता, व्यावहारिकता, नित्य नवीन शिकण्याचा उत्साह, निगर्वी, संयमी स्वभाव यांचा सुरेख मिलाफ पवारांच्या ठिकाणी झालेला आहे. त्यांच्या या स्वभावामुळे ए. टी. पवार अजातशत्रू राजकारणी मानले जातात. कमी बोलून अधिक काम करणे हा त्यांचा मूळ स्वभाव गुण होय.

ए. टी. पवारांचा राजकीय प्रवास नागमोडी वळणाचा झाला. भाक्रांद, काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस असा टोपीबदल त्यांनी केला. जनता हेच मायबाप मानून जिल्ह्याच्या व आदिवासींच्या प्रश्नांवर ते ठाम राहिले. त्याच कारणांमुळे कळवण मतदार संघात ए. टी. पवार हाच पक्ष बनला आहे. कळवण या आदिवासी तालुक्याचे नंदनवनात रुपांतर करण्याचे श्रेय निःसंकोचपणे ए. टी. पवार यांनाच जाते. 'गाव तेथे रस्ता, गाव तेथे बस, गाव तेथे वीज, जमीन तेथे पाणी' या घोषणा त्यांनी त्यांच्या मतदारसंघात खऱ्या करुन दाखविल्या आहेत. कळवण व बागलाण तालुक्यात लघु पाटबंधाऱ्यांचे जाळे उभे करण्यात घेतलेले परिश्रम जनता कधीही विसरु शकत नाही. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, आश्रमशाळा व वसतिगृहांचे जाळे, रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरणासाठी त्यांनी दिलेले योगदान अशा विकास कार्याची जंत्री करणे ठरविले तर यादी फार मोठी होईल.

ए. टी. पवार सन १९७२ ते १९७८ कळवण (प) सुरगाणा पेठ आदिवासी राखीव मतदार संघातून प्रचंड मतांनी निवडून आले. तद्नंतर १९८५ चा अपवाद वगळता ७ वेळा विधानसभेवर प्रचंड बहुमताने निवडून आले आहेत. (कळवण मतदार संघातून) तसेच त्यांना महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात ४ वेळेस मंत्रिपद भूषविण्याची संधी मिळाली. सन १९८३ ते १९८५ पर्यंत ते आदिवासी विकास / समाजकल्याण खात्याचे राज्यमंत्रीपदी होते तर १९९८ ते १९९९ या कालखंडात आदिवासी विकास विभागाचे कॅबीनेट मंत्री होते. त्याचबरोबर सन १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी शासनाने पशुसंवर्धन, दुग्ध व वनखात्याचे राज्यमंत्रीपदी संधी दिली तर फेब्रुवारी २०१० पासून ते आजपर्यंत तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी ते कार्यरत आहेत. या मिळालेल्या सर्व पदांचा आदिवासी समाजाच्या सार्वत्रिक विकासासाठी पूर्ण उपयोग त्यांनी केल्याचे दिसते. यापैकी बागलानमधील केळझर धरण तसेच कळवण तालुक्यातील ५०० कोटींचा पुनंद पाटबंधारे प्रकल्प तर चणकापूर व पुनंद या दोन मोठ्या धरणांतर्गत १६० कि.मी. अंतरामध्ये पाच कालवे, २३ लघु पाटबंधारे प्रकल्प, १५० पाझर तलाव यांसारख्या बाबींचा उल्लेख करता येईल.[१७] आदिवासी तालुक्याचे नेतृत्व करीत असतांना आदिवासी व बिगर आदिवासी असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही. त्यामुळे ते सर्वसामान्य लोकांच्या व आदिवासींच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच दऱ्याखोऱ्यात हिंडणारा आदिवासी आता पूर्णतः लोप पावू लागला आहे. प्रगत तंत्राच्या आधारे आदिवासी प्रगतीशील शेतकरी होऊ लागला आहे.

आदिवासी विकास विभागाची पुर्नरचना आदिवासी क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण करण्यात ए. टी. पवारांचा मोठा वाटा आहे. आदिवासी आयुक्तालयाची निर्मिती व नाशिक येथे स्थापना, आदिवासी उपयोजनेची निर्मिती व आखणी, न्यूक्लिअस बजेट योजनेची जडणघडण, आश्रमशाळा योजनेचा विस्तार, महामंडळाची पुनर्रचना, अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची निर्मिती, शबरी वित्तीय महामंडळाची निर्मिती, आश्रमशाळांसाठी फिरती आरोग्य पथके, धान्यकोष योजना, लघुपाटबंधारे, मध्यमपाटबंधारे, लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटची मागणी इत्यादी राज्यपातळीवरील निर्णयात ए. टी. पवारांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

एकूणच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या संदर्भात वेळोवेळी घेतलेल्या योग्य निर्णयामुळे आदिवासी समाजाचा कायापालट करण्यात त्यांना फार मोठे यश मिळाल्याचे दिसून येते.

## ४. माणिक होडल्या गावीत :–

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या धुळीपाडा ता. नवापूर, जि. नंदूरबार या लहानशा गावात सन २९ ऑक्टोंबर १९३४ रोजी माणिकरावांचा जन्म झाला. घरची परिस्थिती बेताची होती. दहावीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर समाजासाठी काही तरी केले पाहिजे हा विचार मनात कायमच घोळत होता. त्यामुळे त्यांनी समाजकारण व राजकारणाची सुरुवात गावापासून करुन १९६२ रोजी गावात ग्रामपंचायत सदस्य झाले. १९६२ ते १९७१ पर्यंत ते या पदावर होते. त्यानंतर १९७१ ते १९७८ या काळात ते धुळे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण कमीटीचे चेअरमन झालेत. त्यानंतर त्यांचा आलेख सतत उंचावत राहिला. सन १९८०–८१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य झाले व त्यानंतर लागलीच १९८१ मध्ये लोकसभा सदस्य होण्याची संधी मिळाल्यानंतर आजपर्यंत सलग ९ वेळा खासदार म्हणून ते निवडून आले. भारतीय संसदेतील लोकसभागृहात सर्वाधिक जेष्ठ सदस्यांच्या यादीत ते अग्रस्थानी आहेत. त्यांच्या कारकिर्दीमुळे त्यांना सन २३ मे २००४ मध्ये केंद्रीय गृहराज्यमंत्रीपदाची संधी मिळाली. त्यानंतर १७ जून २०१३ ते आजपर्यंत ते केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्रीपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत.[१८]

माणिकराव एक साधे सरळ व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. माणिकरावांनी केवळ मतदारसंघातीलच नव्हे, तर धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील गोरगरीबांच्या सुख–दुःखात सहभागी होत. त्यांच्या वेदनेवर नेहमीच फुंकर घालत आले. विरोधाला विरोध न करता विधायक कामासाठी ते नेहमीच झटतात. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया तर आहेच त्याचबरोबर ती शाश्वत होण्यासाठी वाट पहावी लागते. म्हणूनच माजी मंत्री स्वरुपसिंह नाईक यांच्या सोबतीने विकासाचा पाया रचला. आज त्याची फळे या भागात दिसत आहेत. विधायक दृष्टीकोनातून त्यांनी जलसिंचन, कृषी विकासाला प्राधान्य दिल्याने डोकारे येथे आदिवासी सहकारी साखर कारखाना नावारुपाला आला. सन २००९ मध्ये ते नवव्यांदा खासदार झाले. धुळे–नंदुरबार जिल्ह्यात विस्तारलेले दूरसंचाराचे जाळे, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील रस्ते, उधना–जळगांव रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण, विद्युतीकरण, आदर्श रेल्वेस्थानक केंद्र शासनाच्या विविध योजना, महामार्गाचे चौपदरीकरण, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील उड्डाणपुलांच्या माध्यमातून श्री. गावीत यांनी शाश्वत विकासाची पायाभरणी केली आहे. त्यांच्या

प्रयत्नांमुळे उधना–जळगांव रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण झाले. पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागात व वाड्या–पाड्यात रस्त्यांचे विस्तृत जाळे विणले गेले. त्यांनी दूरसंचार विभागाच्या विविध योजना दऱ्याखोऱ्यात राबवण्यात पुढाकार घेतला. धडगांव–अक्कलकुवा विशेष कृती कार्यक्रमांसाठी २२२ कोटींचा निधी त्यांनी मिळवला. नंदूरबार शहरात दोन रेल्वे उड्डाणपुलांचे काम झाल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे माणिकराव गावीतांनी आदिवासी समाजाचा सार्वत्रिक स्वरुपाचा विकास करुन आदिवासी समाजाच्या मनात आपल्याविषयी एक आगळेवेगळे स्थान निर्माण केल्याचे दिसून येते.

### ५. श्री. पद्‌माकर वळवी :–

तळागाळातील आदिवासींची जाण असणारं व्यक्तीमत्व म्हणून पद्‌माकर वळवी या नेतृत्वाकडे बघितले जाते. मोदलपाडा ता. तळोदा या लहानशा गावात शिकून पुणे येथील महाविद्यालयात विधी शाखेची पदवी मिळविणारे वळवी विद्यार्थी दशेपासूनच समाजकार्यात आहेत. जेव्हा ते विद्यार्थीदशेत होते. त्यावेळी कोणत्याही शासकीय कामासाठी जनतेला धुळे येथे जावे लागत होते. तळोदा ते धुळे हे अंतर आताही चार तासांचे आहे. २० वर्षापूर्वी हे अंतर पूर्ण दिवसाचे ठरत होते. अशावेळी युवकांना लागणारी विविध कागदपत्रे, ग्रामीण भागातील वसतिगृहाच्या अडचणी लक्षात घेत त्यांनी आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे संघटन उभारण्यासाठी पुढाकार घेतला. प्रारंभापासून विद्यार्थी आणि युवकांविषयी त्यांना आत्मीयता आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना पदोपदी जाणवणाऱ्या अडीअडचणी, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन, प्रशासन पातळीवर लढा उभारुन त्यांना न्याय मिळवून देण्याचा ते सातत्याने प्रयत्न करतात.

श्री. वळवी यांचे गांव तळोदा तालुक्यात असले तरी जिल्ह्याच्या सर्वच भागात त्यांचे कार्य आहे. अक्कलकुवा, धडगांव व शहाद्याचा काही भाग हा सातपुडा पर्वतरांगामध्ये आहे. या भागातील वनक्षेत्र हळूहळू नष्ट होत आहे. तेथे पुन्हा नवनिर्माण होणे ही काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेत दहा वर्षापूर्वीपासून श्री. वळवी वनक्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यात लोक सहभाग

वाढवण्यासाठी त्यांनी आतापर्यंत कोट्यावधी रोपांचे, बियाण्यांचे नागरिकांना वाटप केले आहे. त्यातून बांबूची लागवड या भागात मोठ्या प्रमाणात झाली. याचा उपयोग आदिवासींना हस्तकौशल्याच्या वस्तू तयार करण्यासाठी होईल व त्यातून रोजगार निर्मिती होईल असा त्यांचा दृष्टीकोन आहे. गावागावात व्यसनमुक्ती व्हावी, अवैध व्यवसाय बंद व्हावेत यासाठी ते प्रयत्नशील आहेत. लहान लहान गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सतत ऐरणीवर असतो. त्यात जिल्ह्यातील गांव व पाडे विखुरलेले आहेत. अनेकांना एक ते दोन कि. मी. पायी जाऊन पाणी मिळवावे लागते याची जाण डॉ. वळवींना प्रारंभापासून होती. ज्यावेळी ते आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी गावपाड्यात कुपनलिका केल्या. त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र खाजगी युनिट कार्यान्वित केले. त्यातून प्रत्येक गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न व कूपनलिका दुरुस्तीचा प्रश्न सोडविण्यात त्यांना यश आले.

राज्याचे स्वतंत्र युवा धोरण असावे असे केंद्र शासनाने राज्यांना कळविले. त्यानुसार राज्याचे स्वतंत्र युवा धोरण ठरविण्यासाठी डॉ. वळवी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली. त्यांचा अहवाल शासनाने स्वीकारला. भौगोलिक, वैविध्य, सामाजिक परिस्थिती, स्थानिक स्तरावर उपलब्ध व विकसित होऊ शकणाऱ्या संधी यावर भर देण्यात आला. युवा प्रशिक्षण केंद्र जिल्हा व राज्यस्तर युवा पुरस्कार, युवा वसतिगृहे, युवा आदान–प्रदान कार्यक्रम, सुविधा केंद्र उभारणी आदि हितावह योजना या युवा धोरणात अंतर्भूत करण्यात आल्या.[१९]

नंदूरबार जिल्ह्यातील वनक्षेत्रातील झाडे नष्ट होत असतांना झाडे लावण्याचा उपक्रम राबवणाऱ्या वळवी यांना प्रियदर्शनी इंदिरागांधी वृक्षमित्र पुरस्कार देण्यात आला. त्यांनी काही वर्षापूर्वी अक्कलकुवा–तळोदा तालुक्यातील ज्या प्रकल्पांसाठी आंदोलन केले त्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याचे कामही मंत्री झाल्यावर केले. आदिवासी विकास विभागचे राज्यमंत्री असताना विविध योजना त्यांनी राबविल्या. त्यांनी युवकांच्या आरोग्यासाठी गावागावात व्यायामशाळा, क्रिडांगण अनुदान, व्यायामशाळांना साहित्य, व्यक्तिमत्व विकासासाठी शिबीरे यासारखे उपक्रम राबविले आहेत. अक्कलकुवा–तळोदा तालुक्याचे प्रतिनिधीत्व करतांना डॉ. पद्माकर वळवी यांनी या भागात रस्ते आणि दळणवळणाची सुविधा व्हावी यासाठी २२२ कोटींचा विशेष कृती कार्यक्रम राबविला. धडगाव–तळोदा तालुक्यांतील लोकांसाठी जिल्ह्याच्या मुख्यालयाचे अंतर कमी व्हावे, त्यांचे कामे वेळेत व

कमी श्रमात व्हावी म्हणून यासाठी महाराष्ट्र गुजरातला जोडणारा तापी नदीवरील हातोडापूल बांधण्याचे काम डॉ. वळवींच्या प्रयत्नांतून मार्गी लागले आहेत.

एकूणच डॉ. पद्माकर वळवी सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नांबरोबरच तळागाळातील आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासंदर्भात व सार्वजनिक विकास कामात अग्रेसर असल्याचे दिसून येते.

## ३.७ सार्वत्रिक निवडणूका व आदिवासी नेतृत्व :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाही शासन व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीनंतर देशात सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक होते. त्यानुसार १९५१ पासून ते आजपर्यंत सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून देशातील सर्व समाजातील घटकांना स्थान देण्याच्या प्रयत्नातून लोकशाही तळागाळातील लोकांपर्यंत बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून देशातील व त्या त्या घटकराज्यातील लोकसंख्येवर आधारित अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना (आदिवासींना) राजकीय प्रतिनिधीत्व देण्याचा प्रयत्न होतांना दिसून येतो. देशात व महाराष्ट्र राज्यात आदिवासी नेतृत्वाला सार्वत्रिक निवडणूकीतून निर्वाचित होऊन त्यांनी आदिवासींसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

# भारतीय संसद, नवी दिल्ली



**भारतातील सार्वत्रिक लोकसभा निवडणूक :–**

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे घटना समितीच्या कामकाजास गती आली. घटना समितीचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारत देश स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने झाल्यानंतर सन १९५१ मध्ये देशातील पहिली सार्वत्रिक लोकसभा निवडणूक घेण्यात आली. त्यामुळे सन १९५१ ते २००९ च्या १५ व्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीपर्यंतच्या अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांच्या संदर्भात विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

**तक्ता क्रमांक ३.१**

सन १९५१ ते २०१२ पर्यंतच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांनुसार वर्गीकरण

| अ. क्र. | सार्वत्रिक लोकसभा निवडणूक वर्ष | लोकसभेच्या एकूण जागा | अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ४८९ | ८ | १.६४ |
| २ | १९५७ | ४९४ | १५ | ३.०४ |
| ३ | १९६२ | ४९४ | ३० | ६.०७ |
| ४ | १९६७ | ५२० | ३७ | ७.१२ |
| ५ | १९७१ | ५१८ | ३६ | ६.९५ |
| ६ | १९७७ | ५४२ | ३८ | ७.०१ |
| ७ | १९८० | ५४२ | ४१ | ७.५६ |
| ८ | १९८४ | ५४१ | ४० | ७.३९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | १९८९ | ५२९ | ३९ | ७.३७ |
| १० | १९९१ | ५३४ | ४१ | ७.६८ |
| ११ | १९९६ | ५४३ | ४१ | ७.५५ |
| १२ | १९९८ | ५४३ | ४१ | ७.५५ |
| १३ | १९९९ | ५४३ | ४१ | ७.५५ |
| १४ | २००४ | ५४३ | ४१ | ७.५५ |
| १५ | २००९ | ५४३ | ४७ | ८.६६ |

(संदर्भ – www.eci.nic.in/eci_main1/election statistics.aspx )[२०]

तक्ता क्रमांक ३.१ मध्ये सन १९५१ ते सन २०१२ पर्यंतच्या भारताच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतील अनु. जमातीसाठी (आदिवासींसाठी) राखीव जागानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.

सन १९५१ च्या पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत लोकसभेच्या एकूण ४८९ जागांपैकी ०८ जागा अनु. जमातीसाठी राखीव असून लोकसभेच्या एकूण जागेच्या संख्येच्या १.६४ टक्के अनु. जमातीसाठी राखीव जागा आहेत. त्यात बिहार राज्यासाठी – ०२ जागा, मध्यप्रदेश – ०१, ओरिसा – ०३, मध्यभारत – ०१, राजस्थान – ०१ असे एकूण ०८ जागा अनु. जमातीसाठी राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत लोकसभेच्या एकूण ४९४ जागांपैकी १५ जागा अनु. जमातीसाठी राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ३.०४ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०१, बिहार – ०१, बॉम्बे – ०१, मध्यप्रदेश – ०४, ओरिसा – ०२, राजस्थान – ०१, उत्तरप्रदेश – ०२, त्रिपुरा – ०१ अशा एकूण १५ जागा अनु. जमातीसाठी राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत एकूण ४९४ जागांपैकी ३० जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ६.०७ टक्के जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्यात आंध्र प्रदेश – ०३, आसाम – ०२, बिहार – ०४, गुजरात – ०२, मध्यप्रदेश – ०७, महाराष्ट्र – ०२, ओरिसा – ०४, राजस्थान – ०२, पश्चिम बंगाल – ०२, मणिपूर – ०१, त्रिपुरा – ०१ अशा एकूण ३० जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९६७ च्या चौथ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत एकूण ५२० जागांपैकी अनु. जमातीसाठी ३७ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.१२ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०३, मध्यप्रदेश – ०८, महाराष्ट्र – ०३, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्वीप, मिनीकॉम व अमीनदेवी आइसलँण्ड – ०१,मणिपूर – ०१, त्रिपुरा – ०१ अशा एकूण ३७ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९७१ च्या पाचव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५१८ जागांपैकी अनु. जमातीसाठी ३६ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ६.९५ जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०३, मध्यप्रदेश – ०८, महाराष्ट्र – ०३, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, मणिपूर – ०१, त्रिपुरा – ०१ अशा एकूण ३६ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९७७ च्या सहाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४२ जागांपैकी अनु. जमातीसाठी ३८ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.०१ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०८, महाराष्ट्र – ०३, मणिपूर – ०१, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, त्रिपुरा – ०१, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१ अशा एकूण ३८ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९८० च्या सातव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४२ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.५६ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, मणिपूर – ०१, मिझोराम – ०१, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, त्रिपुरा – ०१, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१ अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९८४ च्या आठव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४१ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४० जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.३९ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, मणिपूर – ०१, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, त्रिपुरा – ०१, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१, आसाम – ०२ अशा एकूण ४० जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९८९ च्या नवव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५२९ जागांपैकी अनु. जमातीसाठी ३९ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.३७ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, मणिपूर – ०१, मिझोराम – ०१, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, त्रिपुरा – ०१, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१ अशा एकूण ३९ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९९१ च्या दहाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५३४ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.६८ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, बिहार – ०५, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, मणिपूर – ०१, मिझोराम – ०१, ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, त्रिपुरा – ०१, प. बंगाल – ०२, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१ अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९९६ च्या अकराव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४३ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.५५ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, बिहार – ०५, आसाम – ०२, पश्चिम बंगाल – ०२, गुजरात – ०४, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, मणिपूर – ०१, त्रिपुरा – ०१, मिझोराम – ०१, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१ ओरिसा – ०५, राजस्थान – ०३, अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९९८ च्या बाराव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४३ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून त्यात आंध्रप्रदेश – ०२, आसाम – ०२, प. बंगाल – ०२, तर मणिपूर – ०१, मिझोराम – ०१, त्रिपुरा – ०१, दादरा व नगर हवेली – ०१, लक्षद्विप – ०१, ओरिसा – ०५, बिहार – ०५, मध्यप्रदेश – ०९, महाराष्ट्र – ०४, गुजरात – ०४, राजस्थान – ०३ अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन १९९९ च्या तेराव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४३ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.५५ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल प्रत्येकी – ०२, गुजरात, महाराष्ट्र प्रत्येकी – ०४, बिहार – ०५, मध्यप्रदेश – ०९, राजस्थान – ०३, ओरिसा – ०५, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, दादरा व नगर हवेली, लक्ष्यद्विप प्रत्येकी – ०१ अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.


सन २००४ च्या चौदाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४३ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४१ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ७.५५ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल प्रत्येकी – ०२, गुजरात, महाराष्ट्र प्रत्येकी – ०४, छत्तीसगढ – ०४, ओरिसा, झारखंड, प्रत्येकी ०५, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, दादरा व नगर हवेली, लक्ष्यद्विप प्रत्येकी – ०१, राजस्थान – ०३, मध्यप्रदेश – ०५ अशा एकूण ४१ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

सन २००९ च्या पंधराव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत एकूण ५४३ जागांपैकी अनु. जमातीसाठी ४७ जागा राखीव असून लोकसभेच्या एकूण जागांच्या संख्येच्या ८.६६ टक्के जागा अनु. जमातीसाठी राखीव असून त्यात आंध्रप्रदेश, राजस्थान प्रत्येकी – ०३, आसाम, कर्नाटक, मेघालय, पश्चिम बंगाल प्रत्येकी – ०२, गुजरात, महाराष्ट्र, छत्तीसगड प्रत्येकी – ०४, ओरिसा, झारखंड प्रत्येकी – ०५, मध्यप्रदेश – ०६, मणिपूर, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, लक्ष्यद्विप प्रत्येकी – ०१ अशा एकूण ४७ जागा राखीव असल्याचे दिसून आले.

तक्ता क्रमांक ३.१ मध्ये असे दिसून येते की, १९५१ च्या पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत अनु. जमातीला ०८ जागांचे आरक्षण होते. १९५६ साली राज्यांची पुनर्रचना करण्यात आल्यानंतर सन १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत अनु. जमातीच्या जागेच्या संख्येत वाढ होऊन ०८ वरुन १५ करण्यात आली तर १९६२ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत पुन्हा अनु. जमातीच्या राखीव जागांच्या संख्येत वाढ होऊन १५ वरुन ३० करण्यात आली. त्यानंतर १९६७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत राज्यांची संख्या वाढल्याने लोकसंख्येच्या प्रमाणात अनु. जमातीला स्थान देण्याचा प्रयत्न करण्यात येऊन ही संख्या ३० वरुन ३७ करण्यात आली. त्यानंतर १९७७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत जागेच्या संख्येत ३७ वरुन ३८ करण्यात आली. त्यानंतर १९८० च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत अनु. जमातीच्या राखीव जागांची संख्या ३८ वरुन ४१ करण्यात आली. त्यानंतर दहावी लोकसभा (१९९१) व चौदावी लोकसभा (२००४) पर्यंत अनु. जमातीच्या राखीव जागांच्या आरक्षणात बदल झाला नाही. मात्र २००९ मध्ये लोकसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार अनु. जमातीच्या राखीव जागेच्या आरक्षणात बदल करण्यात आला.

सन २००९ च्या पंधराव्या सार्वत्रिक निवडणुकीत अनु. जमातीच्या राखीव जागांची संख्या ४१ वरुन ४७ करण्यात आल्यामुळे अनु. जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात आल्याचे दिसून आले. त्याचबरोबर देशातील विविध राज्यांचा विचार केला असता असे दिसून येते की, देशात एकूण २८ घटक राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांपैकी आंध्रप्रदेश, आसाम, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, ओरिसा, राजस्थान, त्रिपुरा,

पश्चिम बंगाल, छत्तीसगड, झारखंड या १६ घटकराज्य व लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशातच आदिवासींची संख्या आरक्षण मिळविण्याइतपत व निवडणूक लढविण्यास सक्षम असल्याचे दिसून आले. अन्य राज्यात आदिवासींचे प्रमाण कमी असल्यामुळे त्या राज्यांना राखीव जागांचे आरक्षण मिळू शकले नाही. मात्र आज या १६ घटकराज्यांचा व १ केंद्रशासित प्रदेशाचा विचार करता सर्वाधिक अनु. जमातीच्या राखीव जागा या मध्यप्रदेशात असून त्यांची संख्या ०६ इतकी आहे. पूर्वी ही संख्या ०९ होती मात्र मध्यप्रदेश या राज्यातून छत्तीसगड या राज्याची निर्मिती झाल्यामुळे ही संख्या कमी झाल्याचे दिसून येते. तरी देखील राज्यातील आदिवासींची संख्या विचारात घेता इतर घटक राज्याच्या तुलनेत सर्वाधिक अनु. जमातीच्या राखीव जागा या राज्यात असल्याचे दिसून येते. त्यानंतर ओरिसा, झारखंड या प्रदेशात अनु. जमातीच्या राखीव जागांची संख्या ०५ असून महाराष्ट्र, छत्तीसगड, गुजरात प्रत्येकी ०४ तर आंध्रप्रदेश ०३ त्यानंतर आसाम, मेघालय, कर्नाटक, पश्चिम बंगाल प्रत्येकी ०२ तर मणिपूर, मिझोरम, नागालँड व लक्षद्विप प्रत्येकी १ असा क्रम दिसून येतो.


सन १९५१ ते २०१२ पर्यंतच्या सार्वत्रिक लोकसभा
निवडणुकीतील अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांनुसार
वर्गीकरण आलेख
50
45
40
35
30
25
20
15
10
5
0
1951 1957 1962 1967 1971 1977 1980 1984 1989 1991 1996 1998 1999 2004 2009
ST

## महाराष्ट्र विधान भवन, मुंबई



**महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणूकीतील अनु. जमातीच्या राखीव जागा :-**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० मध्ये झाल्यानंतर पहिली सार्वत्रिक विधानसभेची निवडणूक १९६२ साली झाली. १९६२ ते २००९ रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीपर्यंत अनु. जमातीसाठी निर्माण करण्यात आलेल्या एकूण राखीव जागांच्या संदर्भात विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

**तक्ता क्रमांक ३.२**

सन १९६२ ते २०१२ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकीतील अनु. जमातीसाठी राखीव जागांच्या आरक्षणानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | विधानसभा निवडणूक कार्यकाल | विधानसभेच्या एकूण जागांची संख्या | अनु.जमातीसाठी राखीव जागांची संख्या | जिल्हानिहाय विधानसभा सदस्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १९६२-१९६७ | २६४ | १४ | ठाणे - ०३<br>रायगड - ०१<br>अहमदनगर - ०१<br>नाशिक - ०२<br>धुळे - ०४<br>जळगांव - ०१<br>चंद्रपूर - ०१<br>यवतमाळ - ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १९६७–१९७८ | २७० | १६ | ठाणे – ०४<br>नाशिक – ०३<br>धुळे – ०४<br>अमरावती – ०१<br>चंद्रपूर – ०२<br>यवतमाळ – ०१<br>अहमदनगर – ०१ |
| ३ | १९७८–२००९ | २८८ | २२ | ठाणे – ०५<br>धुळे – ०५<br>नंदुरबार – ०४ (१९९९ पासून)<br>धुळे – ०१ (१९९९ पासून)<br>नाशिक – ०५<br>अमरावती – ०१<br>चंद्रपूर – ०३ (१९८५ पर्यंत)<br>गडचिरोली – ०३ (१९८५ पासून)<br>यवतमाळ – ०२<br>अहमदनगर – ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | २००९–<br>२०१४ | २८८ | २५ | ठाणे – ०६<br>नाशिक – ०४<br>धुळे – ०२<br>नंदुरबार – ०४<br>अमरावती – ०१<br>गडचिरोली – ०४<br>यवतमाळ – ०२<br>अहमदनगर – ०१<br>जळगांव – ०१ |

(संदर्भ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या दफ्तर नोंदीवरुन)[२१]

तक्ता क्रमांक २.२ मध्ये सन १९६२ ते २०१४ पर्यंतच्या विधानसभा निवडणूकीत अनु. जमातीसाठी राखीव जागांच्या आरक्षणानुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

त्यानुसार १९६२ ते १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत विधानसभा सदस्यांची एकूण सदस्य संख्या २६४ असून त्यात १४ जागा अनु. जमातीसाठी राखीव असल्याचे दिसून आले. त्यात जिल्हानिहाय वर्गीकरण करण्यात आले असून ठाणे जिल्ह्याला ०३ जागा, रायगड – ०१, अहमदनगर – ०१, नाशिक – ०२, धुळे – ०४, चंद्रपूर – ०१, यवतमाळ – ०१, जळगांव – ०१ याप्रमाणे राखीव जागांचे आरक्षण आहे.

तसेच १९६७ ते १९७८ या दोन पंचवार्षिक कालखंडातील विधानसभा निवडणुकीत विधानसभा सदस्यांची एकूण सदस्य संख्या २७० असून त्यात १६ जागा अनु. जमातीसाठी राखीव आहेत. त्यात ठाणे – ०४, नाशिक – ०३, धुळे – ०४, अमरावती – ०१, गडचिरोली – ०२, यवतमाळ – ०१, अहमदनगर – ०१ याप्रमाणे राखीव जागा आहेत.

तर १९७८ ते २००९ या सात पंचवार्षिक कालखंडातील विधानसभा निवडणुकीत विधानसभा सदस्यांची एकूण सदस्य संख्या २७० असून त्यात २२ जागा अनु. जमातीसाठी राखीव आहेत. त्यात ठाणे – ०५, नाशिक – ०५, धुळे – ०५, (१९९९ मध्ये धुळे – ०१, नंदुरबार – ०४) अमरावती – ०१, गडचिरोली (१९८२ पर्यंत चंद्रपूर जिल्हा) – ०३, यवतमाळ – ०२, अहमदनगर – ०१ याप्रमाणे राखीव जागा आहेत.

त्याचबरोबर २००९ ते २०१२ या कालखंडातील विधानसभा निवडणुकीत विधानसभा सदस्यांची एकूण सदस्य संख्या २८८ असून त्यात २५ जागा अनु. जमातीसाठी राखीव आहेत. त्यात ठाणे – ०६, नाशिक – ०४, धुळे – ०२, नंदुरबार – ०४, अमरावती – ०१, गडचिरोली – ०४, यवतमाळ – ०२, अहमदनगर – ०१, जळगांव – ०१ याप्रमाणे राखीव जागा आहेत.


यावरुन असे दिसून येते की, १९६२ ते १९६७ या पहिल्या विधानसभा निवडणुकीत अनु. जमातीसाठी १४ जागा राखीव होत्या. मात्र १९६७ च्या दुसऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यात २ सदस्यांची वाढ होऊन १८ सदस्यसंख्या करण्यात आली. त्यात नाशिक व ठाणे जिल्ह्याला प्रत्येकी १ विधानसभा सदस्य वाढविण्यात आले. हे आरक्षण १९६७ ते १९७८ या दोन पंचवार्षिक विधानसभा निवडणूकीपर्यंत कायम ठेवण्यात आले. मात्र १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत अनु. जमातीच्या राखीव जागांच्या आरक्षणात विधायक बदल करण्यात येऊन पूर्वीची १६ विधानसभा सदस्य संख्या ६ ने वाढवून २२ सदस्यसंख्या करण्यात आली. त्यात नाशिक जिल्ह्यातील अनु. जमातीच्या सदस्य संख्येत वाढ करुन पूर्वीच्या ०३ वरुन ०५ सदस्य संख्या करण्यात आली. मात्र १ जुलै १९९८ मध्ये धुळे जिल्ह्यातून नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली व १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत अनु. जमातीच्या राखीव जागांची संख्या नंदुरबार जिल्ह्यासाठी ०४, व धुळे जिल्ह्यासाठी ०१ करण्यात आली तर चंद्रपूर जिल्ह्याची सदस्य संख्या ०२ वरुन ०३ करण्यात आली. मात्र ६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातून गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत चंद्रपूर जिल्ह्यातील अनु. जमातीचे राखीव जागांचे आरक्षण रद्द करण्यात येऊन गडचिरोली जिल्ह्यासाठी अनु. जमातीच्या राखीव जागांची संख्या

०३ करण्यात आली तर यवतमाळ जिल्ह्याची सदस्य संख्या ०१ वरुन ०२ करण्यात आली. अनु. जमातीसाठीचे राखीव जागांचे आरक्षण १९७८ ते २००९ या कालखंडात कायम ठेवण्यात आले.

२००९ च्या राज्य विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार राज्यातील अनु. जमातीच्या राखीव जागांच्या आरक्षणात बदल करण्यात येऊन पूर्वीची अनु. जमातीची सदस्य संख्या २२ वरुन २५ करण्यात आली. त्यात ठाणे जिल्ह्याची सदस्य संख्या ०५ वरुन ०६ करण्यात आली तर नाशिक जिल्ह्याची सदस्य संख्या ०१ ने कमी करुन ०४ करण्यात आली तर अनु. जमातीची लोकसंख्या जळगांव जिल्ह्यात वाढल्यामुळे या राज्य विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेत जळगांव जिल्ह्याला ०१ सदस्य संख्येच्या रुपाने प्रतिनिधीत्व देण्यात आले तर गडचिरोली जिल्ह्याची विधानसभा सदस्य संख्या ०३ वरुन ०४ करण्यात आली तर धुळे जिल्ह्याची सदस्य संख्या ०१ वरुन ०२ करण्यात आली.

२००९ च्या विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार अनु. जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभेत राखीव जागांचे आरक्षण मिळावे म्हणून या राखीव जागांनुसार राज्यात ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक अनु. जमातीसाठी ०६ जागा राखीव असून त्यानंतर नाशिक, नंदूरबार, गडचिरोली या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी ०४, धुळे, यवतमाळ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी २ तसेच अहमदनगर, अमरावती व जळगांव जिल्ह्यांसाठी प्रत्येकी ०१ जागा राखीव आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते. म्हणूनच अलिकडे ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन स्वतंत्र आदिवासी जिल्हा निर्मितीसाठी राजकीय स्तरावर जोरदार प्रयत्न होतांना दिसून येतो.

महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे चार क्षेत्रीय विभाग असून त्यात नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर या विभागांचा समावेश होतो. त्यात नाशिक विभागात अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची संख्या १२ करण्यात आली असून ही संख्या इतर तीन विभागांच्या तुलनेत सर्वाधिक असल्याचे दिसून येते. त्यानंतर ठाणे विभागात अनु. जमातीचे ०६, नागपूर विभागात अनु. जमातीचे ०४ तर अमरावती विभागात अनु. जमातीचे ०३ विधानसभा सदस्यांसाठी राखीव जागांचे आरक्षण करण्यात आले आहे. यावरुन राज्याच्या विभागात नाशिक तर जिल्ह्यात ठाणे आदिवासींच्या लोकसंख्येच्या बाबतीत अग्रेसर आहे.


सन १९६२ ते २०१२ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकीतील अनु. जमातीसाठी राखीव जागांच्या आरक्षणानुसार वर्गीकरण
30
25
20
15
10
5
0
1962
1967
1972
1978
1980
1985
1990
1995
1999
2004
2009
ST

### महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विधानसभा सदस्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण :–

महाराष्ट्र राज्यातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींची संख्या विचारात घेऊन त्या त्या जिल्ह्यात अनु. जमातीच्या विधानसभा सदस्यांसाठी राखीव जागा निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार त्या त्या जिल्ह्यात विधानसभा सदस्यांची संख्या व त्यांचा जिल्ह्यातील व राज्याच्या राजकारणावर असलेला प्रभाव जाणून घेण्यासाठी संशोधन कालखंडातील विधानसभा सदस्यांनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ३.३**

१९९५ ते २०१२ या कालखंडातील महाराष्ट्र राज्यातील अनु. जमातीच्या विधानसभा सदस्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | निवडणूक वर्ष | जिल्ह्याचे नांव | मतदारसंघ व आमदाराचे नांव | विधानसभा सदस्यांची जिल्ह्यातील संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १९९५ ते १९९९ | नाशिक | दिडोरी – श्री. चारोस्कर रामदास किसन<br>सुरगाणा – श्री. चव्हाण हरिश्चंद्र देवराम<br>कळवण – श्री पवार अर्जुन तुळशीराम<br>बागलाण – श्री बोरसे दिलीप मंगळू<br>इगतपूरी – श्री. झोले शिवराम शंकर | ०५ |
| | | धुळे | साक्री – श्री. चौधरी गोविंदराव शिवराम<br>नवापूर – श्री. नाईक स्वरुपसिंग हिऱ्या<br>नंदुरबार–श्री.गावीत विजयकुमार कृष्णराव<br>तळोदा – श्री. पाडवी नरेंद्रसिंग भगतसिंग<br>अक्रानी – श्री. पाडवी के. सी. | ०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ठाणे | वाडा – श्री. सावरा विष्णु रामा<br>पालघर– श्रीम. निमकर मनिषा मनोहर<br>डहाणू – श्री. नाम शंकर सखाराम<br>जव्हार – श्री. वराटा रामजी महादू<br>शहापूर – श्री. दरोडा दौलत भिका | ०५ |
| | | अहमदनगर | नगर–अकोला श्री.पिचड मधुकर काशिनाथ | ०१ |
| | | अमरावती | मेळघाट– श्री. पाटल्या लंगडा मावस्कर | ०१ |
| | | गडचिरोली | आरमोरी – श्री. माडवी रामकृष्ण हरी<br>गडचिरोली – श्री. कोवसे मारोतराव सैनुजी<br>सिरोंचा –श्री. आत्राम राजे सत्यवानराव राजे | ०३ |
| | | यवतमाळ | राळेगांव– श्री. पुरके वसंतु चिंधुजी<br>केलापूर– श्री. मोघे शिवाजीराव शिवरामजी | ०२ |
| ०२ | १९९९ ते २००४ | नाशिक | दिडोरी – श्री. चारोस्कर रामदास किसन<br>सुरगाणा – श्री. गावीत जीवा पांडू<br>कळवण – श्री पवार अर्जुन तुळशीराम<br>बागलाण – श्री. अहिरे शंकर दौलत<br>इगतपूरी – श्री. गांगड पांडूरंग छापू | ०५ |
| | | धुळे | साक्री – श्री. सूर्यवंशी वसंत दोधा | ०१ |
| | | नंदूरबार | नवापूर – श्री. नाईक स्वरुपसिंग हिऱ्या<br>नंदुरबार–श्री.गावीत विजयकुमार कृष्णराव<br>तळोदा – श्री. वळवी पद्माकर विजयसिंग<br>अक्रानी – श्री. पाडवी के. सी. | ०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ठाणे | वाडा – श्री. सावरा विष्णु रामा<br>पालघर– श्रीम. निमकर मनिषा मनोहर<br>डहाणू – श्री. घोडा कृष्णा अर्जुन<br>जव्हार – श्री. वराटा रामजी महादू<br>शहापूर – श्री. दरोडा दौलत भिका | ०५ |
| | | अमरावती | मेळघाट– श्री. राजेशकुमार दयाराम पटेल | ०१ |
| | | गडचिरोली | आरमोरी – श्री. माडवी रामकृष्ण हरी<br>गडचिरोली – श्री. नाटे अशोक महादेवराव<br>सिरोंचा–श्री.आत्राम धर्मरावबाबा भगवंतराव | ०३ |
| | | यवतमाळ | राळेगांव– श्री. पुरके वसंतु चिंधुजी<br>केलापूर– श्री. मोघे शिवाजीराव शिवरामजी | ०२ |
| ३ | २००४ ते २००९ | नाशिक | दिडोरी – श्री. झिरवाळ नरहरी सिताराम<br>सुरगाणा – श्री. गावीत जीवा पांडू<br>कळवण – श्री पवार अर्जुन तुळशीराम<br>बागलाण – श्री. चव्हाण संजय कांतीलाल<br>इगतपूरी – श्री. मेंगाळ काशिनाथ दगडू | ०५ |
| | | धुळे | साक्री – श्री. अहिरे धनाजी सिताराम | ०१ |
| | | नंदूरबार | नवापूर – श्री. नाईक स्वरुपसिंग हिऱ्या<br>नंदुरबार–श्री.गावीत विजयकुमार कृष्णराव<br>तळोदा – श्री. वळवी पद्‌माकर विजयसिंग<br>अक्रानी – श्री. पाडवी के. सी. | ०४ |
| | | अहमदनगर | नगर–अकोला श्री. पिचड मधुकर काशिनाथ | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ठाणे | वाडा – श्री. सावरा विष्णु रामा<br>पालघर– श्रीम. निमकर मनिषा मनोहर<br>डहाणू – श्री. घोडा कृष्णा अर्जुन<br>जव्हार – श्री. ओझरे राजाराम नथु<br>शहापूर – श्री. बरोरा महादू नागू | ०५ |
| | | अमरावती | मेळघाट– श्री. पटेल राजेशकुमार दयाराम | ०१ |
| | | गडचिरोली | आरमोरी – श्री. गेडाम आनंदराव गंगाराम<br>गडचिरोली – श्री. नाटे अशोक महादेवराव<br>सिरोंचा–श्री.आत्राम धर्मरावबाबा भगवंतराव | ०३ |
| | | यवतमाळ | राळेगांव– श्री. पुरके वसंतु चिंधुजी<br>केलापूर– श्री. धुर्वे संदिप प्रभाकर | ०२ |
| ४ | २००९ ते २०१४ | नाशिक | दिडोरी श्री. महाले धनराज हरिभाऊ<br>कळवण – श्री पवार अर्जुन तुळशीराम<br>बागलाण – श्री. बोरसे उमाजी मंगळू<br>इगतपूरी – श्री. गावित निर्मला रमेश | ०४ |
| | | धुळे | साक्री – श्री. भोये योगेंद्र रेश्मा<br>शिरपूर – श्री. पावरा काशिराम वेचन | ०२ |
| | | नंदूरबार | नवापूर – श्री. गावीत शरद कृष्णाराव<br>नंदुरबार– श्री.गावीत विजयकुमार कृष्णराव<br>अक्कलकुवा – श्री. पाडवी के. सी.<br>शहादा – श्री. वळवी पद्माकर विजयसिंग | ०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जळगांव | चोपडा – श्री. वळवी जगदीशचंद्र रमेश | ०१ |
| | | अहमदनगर | नगर–अकोला श्री. पिचड मधुकर काशिनाथ | ०१ |
| | | ठाणे | डहाणू – श्री. ओझरे राजाराम नथू<br>विक्रमगड – श्री. वानगा चिंतामण<br>पालघर– श्री. गावित राजेंद्र धेड्या<br>भोईसर – श्री. तरे विलास सुकूर<br>भिवंडी ग्रामीण – श्री. सावरा विष्णू रामा<br>शहापूर – श्री. दरोरा दौलत भिका | ०६ |
| | | अमरावती | मेळघाट– श्री. काळे केवलराम तुळशीराम | ०१ |
| | | गडचिरोली | आरमोरी – श्री. गेडाम आनंदराव गंगाराम<br>गडचिरोली – श्री. उसेन्दी नामदेव दलुजी<br>आमगाव– श्री.राऊत रामरतनबापू भरतबापू<br>अहेरी – श्री. अत्राम दिपक मालाजी | ०४ |
| | | यवतमाळ | राळेगांव– श्री. पुरके वसंतु चिंधुजी<br>अरणी– श्री. मोघे शिवाजीराव शिवरामजी | ०२ |

(संदर्भ : www.eci.nic.in/eci_main1/election statistics.aspx )[२२]

तक्ता क्र. ३.३ मध्ये १९९५ ते २०१२ या कालखंडातील अनुसूचित जमातीच्या विधानसभा सदस्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण करण्यात आले आहे.

१९९५ ते १९९९ या कालखंडात नाशिक जिल्ह्यात – ०५, धुळे – ०५, अहमदनगर जिल्ह्यात – ०१, ठाणे – ०५, अमरावती – ०१, गडचिरोली – ०३, यवतमाळ – ०२ असे एकूण २२ विधानसभा सदस्य आहेत.

१९९९ ते २००४ या कालखंडात नाशिक जिल्ह्यात – ०५, धुळे – ०१, नंदुरबार – ०४, अहमदनगर जिल्ह्यात – ०१, ठाणे – ०५, अमरावती – ०१, गडचिरोली – ०३, यवतमाळ – ०२ असे एकूण २२ विधानसभा सदस्य आहेत. या कालखंडात सदस्य संख्या कायम असली तरी १ जुलै १९९८ साली धुळे जिल्ह्यातून नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाल्यामुळे अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभेच्या जागांचे विभाजन धुळे व नंदुरबार या दोन जिल्ह्यात झाले आहे.

सन २००४ ते २००९ या कालखंडात नाशिक जिल्ह्यात – ०५, धुळे – ०१, नंदूरबार – ०४, अहमदनगर जिल्ह्यात – ०१, ठाणे – ०५, अमरावती – ०१, गडचिरोली – ०३, यवतमाळ – ०२ असे एकूण २२ विधानसभा सदस्य आहेत.

तर २००९ ते २०१४ या कालखंडात नाशिक जिल्ह्यात – ०४, धुळे – ०२, नंदूरबार – ०४, जळगांव जिल्ह्यात – ०१, अहमदनगर जिल्ह्यात – ०१, ठाणे – ०६, अमरावती – ०१, गडचिरोली – ०४, यवतमाळ – ०२ असे एकूण २५ विधानसभा सदस्य आहेत.

तक्ता क्रमांक ३.३ मध्ये असून दिसून येते की, सन २००९ च्या राज्यविधानसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार अनुसूचित जमातीच्या विधानसभा मतदार संघाची संख्या २२ वरुन २५ करण्यात आली. त्यामुळे राज्यात आदिवासींची लोकसंख्या वाढल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ज्या जिल्ह्यात आदिवासींची संख्या जास्त आहे त्या जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विधानसभा मतदार संघाची निर्मिती करण्यात आली. यात ठाणे जिल्ह्यात आदिवासींची संख्या जास्त असल्याचे दिसून येते. त्यानंतर नाशिक, नंदुरबार, गडचिरोली, धुळे, यवतमाळ, अहमदनगर असा क्रम असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात विशिष्ट आदिवासी आमदारांचा प्रभाव जिल्ह्यात व राज्याच्या राजकारणात अधिक दिसून येतो. यामध्ये नाशिक जिल्ह्यात कळवण मतदार संघातील आमदार श्री. ए. टी. पवार हे सात वेळा विधानसभा सदस्य असल्यामुळे मतदार संघात केलेली कामे त्यांच्याजवळ असलेला प्रदीर्घ अनुभव राज्याच्या राजकारणात असलेली विकासात्मक प्रतिमा यामुळे त्यांचा जिल्ह्यात प्रभाव दिसून येतो. यापूर्वी त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात आदिवासी विकास मंत्री, दुग्धोत्पादन व वने राज्यमंत्री ही पदे भूषविली असून आज ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून तापी

खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांची नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात आजही पकड मजबूत असल्याचे दिसून येते.

तसेच धुळे जिल्ह्यात मा. आमदार गोविंदराव चौंधरींचा प्रभाव होता. १९९५ ते १९९९ या कालखंडात त्यांनी शिवसेना भाजपा प्रणित आघाडीच्या शासनात त्यांनी राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या कॅबिनेट मंत्रीपदाची धुरा सांभाळली. मात्र १ जुलै १९९८ रोजी नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर नंदुरबार जिल्ह्यातील नेतृत्व पुढे आले. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विजयकुमार गावीत व काँग्रेसचे आमदार पद्माकर वळवी या दोन आमदारांचा उल्लेख विशेषत्वाने करता येईल. विजयकुमार गावीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्रीमंडळात १९९९ पासून कार्यरत असून यापूर्वी त्यांच्याकडे आदिवासी विकास विभागाचे कॅबीनेट मंत्रीपद होते. आज त्यांच्याकडे कॅबीनेट दर्जाचे वैद्यकीय शिक्षण हे मंत्रीपद आहे तर काँग्रेसचे आमदार पद्माकर वळवींकडे यापूर्वी आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्रीपद होते. आज त्यांच्याकडे कॅबीनेट दर्जाचे क्रीडामंत्रीपद आहे. त्यामुळे आज पक्षीय पातळीवर व इतरत्र जिल्ह्यात या दोन आमदारांचा मंत्री म्हणून विशेष प्रभाव दिसून येतो. तसेच गडचिरोली जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मराव बाबा अत्राम यांचा १९९५ ते २००९ या कालखंडात विशेष प्रभाव होता. याच कालखंडात ते काही काळ राज्याच्या मंत्रीमंडळात कॅबीनेट मंत्रीपदी देखील कार्यरत होते. मात्र नंतर त्यांचा प्रभाव ओसरला. आज या जिल्ह्यात चार विधानसभेचे आमदार असून देखील राज्याच्या राजकारणात विशेष प्रभाव दिसत नसून जिल्ह्यात आमदार आनंदराव गेडामांचा व दिपक अत्रामांचा काही प्रमाणात प्रभाव दिसून येतो.

तर यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेसचे वसंतराव पुरके व शिवाजीराव मोघे या दोहोंचाही आदिवासी आमदार म्हणून जिल्ह्यातील आदिवासी जनतेवर व पक्षातदेखील प्रभाव दिसून येतो. आमदार वसंतराव पुरके २००४ ते २००९ या कालखंडात काँग्रेसचे आदिवासी आमदार असून देखील त्यांना शालेय शिक्षण मंत्रीपदाची जबाबदारी दिली. त्यानंतर  २००९ नंतर ते आजपर्यंत विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच याच जिल्ह्याचे काँग्रेसचे जेष्ठतम नेते श्री. शिवाजीराव मोघे यांनी यापूर्वी आदिवासी विकास मंत्री पदाची जबाबदारी सांभाळली आहे. आजही ते काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित आघाडीच्या शासनात सामाजिक न्याय विभागाचे कॅबीनेट मंत्रीपदी कार्यरत आहेत.


तसेच २००९ च्या राज्य विधानसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार अनुसूचित जमातीसाठी जळगाव जिल्ह्यातील चोपडा विधानसभा मतदार संघ राखीव करण्यात आला. या मतदार संघात श्री. वळवी जगदीशचंद्र रमेश आमदार म्हणून कार्यरत असून जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या इतर समाजाच्या तुलनेत कमी असल्यामुळे त्यांच्या जिल्ह्याचा राजकारणात वा राज्याच्या राजकारणात कमी प्रमाणात प्रभाव दिसून येतो तर अमरावती जिल्ह्यात मेळघाट हा एकच अनुसूचित जमातीसाठी राखीव विधानसभा मतदार संघ असून या मतदार संघात १९९५ ते १९९९ कालखंडात आमदार म्हणून पाटल्या लंगडा मावस्कर हे निवडून आले. मात्र त्यानंतर १९९९ ते २००९ या दहा वर्षाच्या कालखंडात आमदार श्री. पटेल राजेकुमार दयाराम यांचा प्रभाव दिसून आला. मात्र २००९ मध्ये आमदार म्हणून श्री. काळे केवलराम तुळशीराम निवडून आल्यामुळे श्री. पटेल राजेकुमार यांचा प्रभाव कमी झाल्याचे दिसून आले.

तसेच ठाणे जिल्ह्यातील वाडा मतदार संघातील व आता भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा आमदार विष्णू सावरांचा विशेष प्रभाव दिसून येतो. १९९५ ते १९९९ या कालखंडात शिवसेना भाजपा आघाडी मंत्रीमंडळात त्यांनी आदिवासी विकास विभागाच्या कॅबीनेट मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली. १९९५ ते आजपर्यंत ते सलगपणे आमदार म्हणून निवडून आल्याचे दिसते. याच जिल्ह्यातील पालघर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे आमदार राजेंद्र गावित यांचा प्रभाव ठाणे जिल्ह्यात वाढत असल्याचे दिसते. २००९ पासून ते आजपर्यंत ते आदिवासी विकास राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत.


त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यात एकच विधानसभा मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव असतानाही या मतदार संघातील आमदार श्री. मधुकरराव पिचड यांचा प्रभाव जिल्ह्याबरोबरच राज्याच्या राजकारणावर देखील मोठ्या प्रमाणात दिसून येतो. ते सलग आठवेळा विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आलेले आहेत. तर यापूर्वी त्यांनी राज्याच्या मंत्रीमंडळात आदिवासी विकास मंत्री तसेच १९९५ ते १९९९ या कालखंडात विधानसभेत काँग्रेसचे विरोधी पक्षनेते तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष या जबाबदाऱ्या सांभाळण्याबरोबरच आज ते राज्याचे आदिवासी विकास विभागाचे कॅबीनेट मंत्री म्हणून कार्यरत आहेत.

एकूणच राज्याच्या ३५ जिल्ह्यांपैकी आदिवासी विधानसभा मतदार संघ असलेल्या जिल्ह्यांची संख्या ०९ आहे व या जिल्ह्यांमध्ये आदिवासी आमदारांची एकूण संख्या २५ असतानाही या आदिवासी आमदारांना आदिवासी विकास विभागाच्या मंत्रालयाची जबाबदारी व्यतिरिक्त शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सामाजिक न्याय, वने व पर्यावरण, पशु संवर्धन व दुग्ध विकास, वैद्यकीय व तंत्र शिक्षण तसेच विरोधी पक्षनेतेपद, विधानसभा उपाध्यक्ष व राजकीय पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद यांसारख्या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या या समाजातील नेतृत्वाला राजकीय पक्षाच्या माध्यमातून मिळत असल्यामुळे या राज्याच्या आदिवासी समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याचे काम हे आदिवासी नेतृत्व करताना दिसून येते.

## २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातीच्या  लोकप्रतिनिधी दर्शक आलेख




## २००९ च्या विधानसभा निवडणुकीतील अनुसूचित जमातीच्या  लोक प्रतिनिधी दर्शक आलेख



## संदर्भ सूची :


१. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे आणि कंपनी, नागपूर, जुलै १९९८, पृष्ठ १४६–१४७.

२. Webster's New Twentieth Century Dictionary of the English Language, Page 103.

३. पाटील बी. बी., लोक प्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल १९९८, पृ. १८४.

४. उपरोक्त.

५. देशपांडे श्रीकांत व्ही., लोकप्रशासन, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती १९९४, पृ. १७०.

६. खेकाळे ना. रा., राजकीय नेतृत्त्व, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. १०२.

७. निकम गौतम, क्रांतीकारी आदिवासी जननायक, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगांव जि. जळगांव, प्रथमावृत्ती – १७ ऑक्टोंबर २०१०, पृ. ४६.

८. गारे गोविंद, आदिवासी वीर पुरुष, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती – १९९४, पृ. ४४.

९. गायकवाड दिपक, आदिवासी चळवळ : स्वरुप व दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २००५, पृ. ५४.

१०. गारे गोविंद, आदिवासी विकासाचे शिल्पकार, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००३, पृ. ९.

११. देवगांवकर एस. जी., देवगावकर शैलजा, डुमरे जयमाला, सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – नोव्हेंबर २००९, पृ. १३६.

१२. गारे गोविंद, आदिवासी विकासाचे शिल्पकार, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००३, पृ. १९३.

१३. आगलावे प्रदिप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती – फेब्रुवारी २०११, पृ. ३३५.

१४. मडावी शेषराव एन्., आदिवासी महानायक चरित्र, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती – मार्च २०१०, पृ. ६६.

१५. गारे गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, आदिम साहित्य प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, मार्च २००३, पृ. ९.

१६. गारे गोविंद, आदिवासी विकासातील दिपस्तंभ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २५ डिसेंबर २००३, पृ. १३४.

१७. दैनिक देशदूत, नाशिक, १ डिसेंबर २०१२,

१८. www.eci.nic.in.

१९. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, नोव्हेंबर २०१३, पृ. १३.

२०. www.eci.nic.in/eci_main1/election statistcs.aspx.

२१. महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक यांच्या दफ्तर नोंदीवरुन.

२२. www.eci.nic.in/eci_main1/election statistcs.aspx.

## प्रकरण चौथे

# नाशिक जिल्हा व आदिवासीबहुल तालुके एक दृष्टीक्षेप


| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| ४.१ | नाशिक जिल्हा | १९४ |
| ४.१.१ | प्रस्तावना | १९४ |
| ४.१.२ | भौगोलिक स्थान | १९४ |
| ४.१.३ | आर्थिक परिस्थिती | १९७ |
| ४.१.४ | धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान | १९८ |
| ४.१.५ | वाङ्मयीन परंपरा | २०० |
| ४.१.६ | सामाजिक परिस्थिती | २०२ |
| ४.१.७ | राजकीय परिस्थिती | २०५ |
| ४.२ | आदिवासीबहुल तालुके | २०७ |
| ४.२.१ | प्रस्तावना | २०७ |
| ४.२.२ | भौगोलिक स्थान | २०८ |
| ४.२.३ | आर्थिक परिस्थिती | २१० |
| ४.२.४ | धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान | २१५ |
| ४.२.५ | वाङ्मयीन परंपरा | २२७ |
| ४.२.६ | सामाजिक परिस्थिती | २३० |
| ४.२.७ | राजकीय परिस्थिती | २३४ |
|  | संदर्भ सूची | २४१ |

# प्रकरण चौथे

# नाशिक जिल्हा व आदिवासीबहुल तालुके एक दृष्टीक्षेप

## ४.१ नाशिक जिल्हा

### ४.१.१ प्रस्तावना :

सह्याद्री पर्वताच्या कुशीतील गोदावरी नदीच्या तीरावर नाशिक हे शहर वसलेले आहे. नाशिक हे शहर पुरातन काळापासून प्रसिध्द व पवित्र क्षेत्र म्हणून ओळखले जाते. पौराणिक काळातील जंगलात लक्ष्मणाने शूर्पणखा नावाच्या राक्षसीणीचे नाक कापले होते. संस्कृत भाषेत नाकाला 'नासिका' म्हणतात. म्हणून या भागाचे / जिल्ह्याचे नांव 'नाशिक' असे पडले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर, अनंत कान्हेरे या क्रांतीकारकांबरोबर सुप्रसिध्द नाटककार वसंत कानेटकर व ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची ही कर्मभूमी होय.

अलिकडच्या काळात नाशिक जिल्ह्याची प्रगती फार झपाट्याने होतांना दिसून येते. साहित्य, कला, क्रीडा, अर्थ, विज्ञान, शिक्षण, कृषी, उद्योग या सर्व क्षेत्रात जिल्हा प्रगतीपथावर आहे. धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर असलेला हा जिल्हा अलिकडच्या काळात एक अग्रगण्य शैक्षणिक व औद्योगिक जिल्हा बनू पाहत आहे.

### ४.१.२ भौगोलिक स्थान :-

नाशिक जिल्हा १९° ३३' ते २०° ५३' उत्तर अक्षांश आणि पूर्व ७३° १६' ते ७५° १६' पूर्व रेखांश भौगोलिक पट्ट्यामध्ये वसला आहे.[१] महाराष्ट्रातील पाच जिल्हे व गुजरात राज्यातील दोन जिल्हे यामध्ये जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर धुळे जिल्हा व ईशान्य दिशेला जळगांव जिल्हा, आग्नेय दिशेला औरंगाबाद जिल्हा आहे. अहमदनगर जिल्हा दक्षिणेस तर पश्चिम व नैऋत्य दिशेस ठाणे जिल्हा


असून डांग व सूरत हे राज्यातील जिल्हे वायव्य दिशेस आहेत. जिल्ह्याची सरासरी उत्तर दक्षिण लांबी १२० कि.मी. असून पूर्व–पश्चिम लांबी २०० कि.मी आहे.

नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५,५३० चौ.कि.मी आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ५.०४ टक्के व्यापलेल्या या जिल्ह्याचा राज्याच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार करता पाचवा क्रमांक आहे. २००१ च्या जनगणनेनुसार राज्याच्या ५.१५ प्रतिशत असलेल्या ४९.९४ लाख लोकसंख्या असलेल्या या जिल्ह्याचा लोकसंख्येबाबत राज्यात चौथा क्रमांक आहे. राज्याच्या दर चौ.कि.मी. ला ३१४ लोकसंख्या घनतेच्या तुलनेत जिल्ह्याची दर चौ. कि.मी ला लोकसंख्या घनता ३२१ इतकी आहे.

नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके व १५ पंचायत समित्या आहेत. जिल्ह्यात आठ नगरपालिका, एक जिल्हा परिषद, नाशिक व मालेगांव या दोन महानगरपालिका आहेत. तसेच देवळाली, कँटोमेंट बोर्ड हे एक कटक मंडळ आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण १९३१ खेडी वस्ती असलेली व ४ खेडी ओसाड आहेत. इतर जिल्ह्याच्या तुलनेत ओसाड खेड्यांची संख्या नगण्य आहे. जिल्ह्यामध्ये सन २००७–२००८ या वर्षात १३७३ ग्रामपंचायती होत्या.[२]

नाशिक जिल्ह्यामध्ये हवामान सर्वसाधारण विषम स्वरुपाचे असून वार्षिक सरासरी पर्जन्यमान १०७५.८० मि.मि. आहे. जिल्ह्यातील जमीन काळी, गाळ, कोरड व बरड या चार प्रकारात विभागली आहे.

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्याचे स्थान दर्शक नकाशा



### ४.१.३ आर्थिक परिस्थिती :–

कोणत्याही ग्रामीण भागाचा विकास हा त्या भागातील पाणीपुरवठ्यावरच अवलंबून असतो. औद्योगिक विकासाला कृषी विकासाची जोड असेल तर संपूर्ण विभागाचा विकास जलदगतीने होत असतो. नाशिक जिल्ह्याचा पश्चिम व वायव्य भाग हा डोंगराळ आहे. त्यामुळेही तेथे कृषी विकास फारसा झालेला नाही. पूर्व व उत्तर भागात मात्र बागायत क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्राने नेत्रदिपक प्रगती केल्याचे दिसून येते.

नाशिक जिल्ह्यात गंगापूर, चणकापूर, करंजवण, वाघाड, ओझरखेड, पालखेड, दारणा, पुणेगांव, तिसगांव, पुणंद, दसरवाडी, कडवा अशी १३ मोठी धरणे आहेत. याशिवाय आठ लघुमध्यम प्रकल्प आहेत. या धरणांचा फायदा मुख्यत्वे पूर्व व उत्तर भागात होतो. धरणांच्या लाभ क्षेत्रात ऊस, द्राक्षे, कांदा हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. आज द्राक्षांचा जिल्हा म्हणून देशात नाशिकची ओळख आहे. द्राक्षाबरोबरच डाळी व कांदा उत्पादनातही जिल्हा अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या एकूण कांदा उत्पादनापैकी ३५ टक्के कांदा जिल्ह्यात उत्पादित होतो. जगातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ नाशिक जिल्ह्यातील लासलगांव येथे आहे.

नाशिक जिल्ह्यातील शेतकरी हा कृतीशील व प्रगतीशील आहे. निलगीरीच्या लागवडीद्वारे वनशेतीचा प्रयोग श्री. विनायकदादा पाटील यांनी महाराष्ट्रात प्रथमतः नाशिक जिल्ह्यात केला. व्हॅनीला, कॉफी अशा शेती मालाचे उत्पादन करण्याचे यशस्वी प्रयोग नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केला आहे. जलसिंचनाच्या तुषार व ठिबक सिंचन पध्दती, हरितगृहे इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर गेली अनेक वर्षे जिल्ह्यातील शेतकरी करीत आहे.

नाशिक जिल्ह्यात सहकारी तत्वावर चालणारे सात साखरकारखाने असून या कार्यक्षेत्राचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. शैक्षणिक व आर्थिक विकासामुळे या भागातील लोकांचे राहणीमान उंचावलेले आहे. जिल्ह्यात सहकारी दुग्धउत्पादक संस्था ६२४ असून एकूण सहकारी संस्था ९३६३ आहेत. या संस्थांच्या माध्यमातून व विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून लहानमोठ्या शेतकऱ्यांना पतपुरवठा केला जात असल्यामुळे त्यांचा

आर्थिक विकास होण्यास मदत झाली आहे. धरणांच्या पाण्याचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे जिल्ह्याचा बराच भाग अजूनही जिरायती असून पाण्यावाचून वंचित आहे.

औद्योगिक क्षेत्रातही हा जिल्हा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करु पाहत आहेत. जिल्ह्यात नोंदणीकृत कारखाने १०,६३८ असून मध्यम उद्योग ७४, लहान उद्योग २०० आहेत. जिल्ह्यात प्रामुख्याने सातपूर, अंबड, मालेगाव, सिन्नर व मनमाड येथे औद्योगिक वसाहती आहेत. ग्रामीण भागात विशेषतः नाशिक जवळील एकलहरे येथे राज्यातील महत्त्वाचा औष्णीक विद्युत प्रकल्प, ओझर येथे विमानांचा कारखाना, पिंपळगांव बसवंत जवळ द्राक्षापासून थंड पेय बनविण्याचा कारखाना, येवला येथे शालू व पैठणी, रावळगांव येथे चॉकलेट व टॉफीज बनविण्याचा कारखाना आहे. त्यामुळे युवकांना रोजगार निर्मिती झाली आहे. अलिकडे नाशिक जिल्ह्यातील उत्तम प्रतीच्या व मध उत्पादनासाठी विशिष्ट प्रकारच्या द्राक्षांची लागवड केली जात आहे. जिल्ह्यात विंचूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत शेतकऱ्यांचा सहभाग असलेले 'वाईन पार्क' स्थापन करण्यात येत आहे. तसेच नाशिकमध्ये माहिती तंत्रज्ञान उद्यान (आय.टी. पार्क) विकसित केले आहे. एकूणच नाशिक जिल्हा औद्योगिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करताना दिसून येतो.

### ४.१.४ धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान :-

नाशिक हे प्राचीन काळापासून पवित्र धर्मतीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जात आहे. शिवाय नाशिक मधील काही मुख्य मंदिराचा संबंध थेट रामायण काळाशीही जोडला जातो.

नाशिकचे धार्मिकदृष्ट्या प्रमुख आकर्षण म्हणजे सिंहस्थ कुंभमेळा होय. नाशिकला दर १२ वर्षाने सिंहस्थ कुंभमेळा भरत असतो. सन २००३ साली हा कुंभमेळा भरला होता. कुंभमेळ्याला आलेले समस्त भारतीय भाविक रामभक्तांना रामकुंडात स्नान करणे पवित्र व पुण्य कर्म वाटते. कारण वनवास काळात राम सिता यांचे जणू एक प्रकारचे स्थानच होते. रामकुंडात खाली खोलवर जीवंत पाण्याचा झरा आहे. रामकुंडाचे महत्त्व अस्थिविलयतीर्थ म्हणून विशेष आहे. हिंदू धर्मानुसार रामकुंडावर स्नान केलं, पूजा केली की, भाविकांना ओढ लागते ती श्रीराम भेटीची. ही भेट होते काळाराम मंदिरात.

सिंहस्थासाठी मंदिराचे प्रवेशद्वार आता नव्याने परंतु मूळ रचना कायम ठेवून बनविले आहे. सिंहस्थ काळात पर्वणी स्नानाचे साधुसंताच्या दर्शनाचे पुण्य मिळते.

मृत्यूनंतर पवित्र जलात अस्थि विसर्जन करण्याची प्रथा आहे. रामकुंडात अशा अस्थी सहजगत्या विरघळून जातात. इतर कोणत्याही कुंडात असे घडत नसल्याने रामकुंडास पवित्र, पुण्यशील मानले जाते. गोदावरी नदीच्या या भागातील प्रवाहात एकूण १७ तीर्थ आहेत.[४] त्यामुळे रामकुंडात सिंहस्थ काळात व नंतरही स्नान करणे फार महत्त्वपूर्ण व पुण्यशील मानले जाते.

नाशिकच्या काळाराम मंदिरापासून जवळच 'सिता गुंफा' आहे. या सिता गुंफेत वडाची पाच मोठी झाडे आहेत. या वडाच्या झाडावरुनच पंचवटी असे नाव पडले आहे. मथुरा वृंदावनात जशी अनेक छोटी मोठी देवळे आहेत तशीच छोटी मोठी मंदिरे नाशिकच्या पंचवटी विभागात १ कि.मी. चौरस क्षेत्रात एकवटली आहेत. म्हणून पंचवटीला नाशिक धर्मक्षेत्राचा गाभा असे म्हटले जाते.

नाशिकचे कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रेरणेने दिनांक २६ मार्च १९९० रोजी 'कुसुमाग्रज प्रतिष्ठानाची' स्थापना नाशिक येथे करण्यात आली. समाजाचा वैचारिक स्तर उंचावणे, कुसुमाग्रजाच्या विचाराचा प्रसार करणे ही या प्रतिष्ठानाच्या स्थापनेमागील भूमिका आहे. तसेच चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके (३० एप्रिल १८७० ते १६ फेब्रुवारी १९४४) यांच्या चित्रपट क्षेत्रातील अलौकिक कार्याची चिरंतन स्मृती म्हणून नाशिक महापालिकेने 'पांडवलेणी' या अतिप्राचीन कोरीव शिलाकृतीलगत पायथ्याशी एका भव्य स्मारकाची उभारणी केली. याच स्मारकात दादासाहेब फाळके यांच्या कार्याची साक्ष देणारे दस्तऐवज, ध्वनीफित, चित्रे इ. उपलब्ध आहेत. चित्रपटातील गीतांचे भव्य पडद्यावर सादरीकरण करुन पर्यटकांना आकर्षित केले जाते. या स्मारकाच्या नामाभिदामागील दडलेली पार्श्वभूमी या स्मारकाची सार्थकता दर्शविते.

नाशिक जिल्ह्यात पर्यटकांना आकर्षित करणारे 'ब्रम्हगिरी', 'साल्हेर' हे थंड हवेची ठिकाणे आहेत. जिल्ह्यात सुमारे ३८ किल्ले आहेत.[५] ऐतिहासिक असलेले 'अंकाई–टंकाई', 'मांगी–तुंगी', 'साल्हेर–मुल्हेर', 'भुईकोट', 'रामशेज' यांसारख्या किल्ल्यांचा उल्लेख करता येईल.

## ४.१.५ वाङ्मयीन परंपरा :–

नाशिकची गोदावरी पुण्यवाहिनी आहे. या गोदा मातेने अनेकांना साहित्य निर्मितीसाठी स्फूर्ती दिली आहे. नाशिकची वाङ्मय परंपरा पुरातन आहे. नारायण सूर्याजीपंत ठोसर म्हणजेच समर्थ रामदास स्वामी यांनी जुना 'दासबोध' या ग्रंथाची रचना केली. तसेच निरंजन स्वामी संत ज्ञानेश्वरांना अमृतानुभवांचे विवरण करणारा ग्रंथ प्रसिध्द आहे. सन १८७६ मध्ये गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांची नाशिक येथे न्यायाधिशपदी नियुक्ती झाली. त्यांच्या एकूण ग्रंथसंपदेपैकी लोकहितवादी उद्‌धृत गीतातत्व, प्राचीन आर्यविद्यांचा क्रमविचार परीक्षण यांसारखी पुस्तके त्यांनी नाशिक येथे लिहिली व तेथेच छापली.

नाशिकचे भूषण कवीवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांनी आपल्या उत्तुंग प्रतिभेने उदात्त व्यक्तित्त्वाने आणि समाजहितैबी वृत्तीने मराठी साहित्यात अद्वितीय स्थान प्राप्त केले आहे. सतत पाच दशके कुसुमाग्रजांची कविता रसिकांना रिझवत राहिली. 'समिधा, 'किनारा', 'मेघदूत', 'हिमरेषा', 'थांब', 'सहेली' इ. संग्रह विलक्षण लोकप्रिय झाले. तसेच 'नटसम्राट', 'ययाती' आणि 'देवयानी', 'महंत', 'कैकयी' इ. त्यांची प्रभावी नाट्यसंपदा होय.[६]

स्वातंत्र्यवीर सावकरांचे 'माझी जन्मठेप' हे आत्मकथन सामाजिक कार्यकर्त्या शांताबाई दाणी यांचे 'रात्रं दिन आम्हा' हे आत्मचरित्र गाजले. वसंत पोतदार यांचे 'कुमार गंधर्व', 'भिमसेन' डॉ. बाबुराव पवार यांचे 'भाऊसाहेब हिरे', 'डॉ. अनुराधा औरंगाबादकर यांचे' 'देवानंद' ही अशी चरित्र आत्मचरित्र लेखनाची परंपरा आहे.

नाशिकची ही काव्य परंपरा अनेक कवी जोमाने पुढे नेत आहेत. किशोर पाठक या तरुण कवीने पुण्याचे साहित्य संमेलन गाजविले. 'पल्लव' या पहिल्या काव्यसंग्रहापासून पाठक त्यांच्या कवितेने व बालगीताने रसिकांना रिझवत आहेत.

नाशिक जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या वाङ्मयीन परंपरांचा भाग प्राचीन काळापर्यंत जाऊन काढता येतो. भालेगावच्या साहित्य परंपरेचा विचार वालचंद हिराचंद मेहता यांच्यापासून झाला. मेहता यांनी कथा, कविता, एकांकिका, नाट्यछटा वगैरे प्रकारात विपुल साहित्य निर्मिती केली. 'कुसुमावती',


'सुबोधस्तवन', 'काव्यकौमुदी' ही महत्त्वपूर्ण पुस्तकांची नावे होत. दुसऱ्या पर्वातील खांडेकर हे भावगीत म्हणून महाराष्ट्रभर परिचित, त्याचप्रमाणे डॉ. दा. गो. बोरसे यांची एकविसच्या आसपास पुस्तके प्रसिध्द आहेत.

सिन्नर तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समर्थ अविष्कार करणारे 'वामनदादा कर्डक' यांनी ४ ते ५ हजार गीते लिहिली. 'वाटचाल', 'मोहक', 'दुकानातील दिवे' यांसारखी गीते संग्रहित असून बरीच गीते असंग्रहित आहेत. तसेच निफाड तालुक्यातील साहित्य परंपरेचा विचार करताना न्यायमूर्ती गोविंद महादेव रानडे यांचे नाव प्रथम येते. त्यांचे इतिहास साहित्य सामाजिक प्रश्न हे आस्थेचे विषय होते. विनायक दादा पाटील हे दर्जेदार ललित लेखन करतात. त्यांची 'महतो कहीन', 'पुनरागमनायच' अशी ललित लेखांची नावे अविस्मरणीय होत. तसेच प्रकाश होळकर हे प्रसिध्द कवी असून कोरडे नक्षत्र हा त्यांचा शेतीवाडीची व्यथा मांडणारा काव्यसंग्रह आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात साहित्य परंपरेत अग्रभागी असलेले नाव म्हणजे चरित्रकार श्री. पांडूरंग बाळाजी कवडे हे होत. पांडूरंग बाबांनी शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांची चरित्रे लिहिली आहेत. दुसरे चरित्रकार म्हणजे नांदगाव तालुक्यातील पोखरीचे काशिनाथ गोपाळराव शिंदे उर्फ शिंदे नाना हे होत. नानांनी 'श्री. संत जनार्दन लिला अमृत', 'सहस्त्रवंदन जनार्दना', 'श्री. जनार्दन अष्टक', 'अवतरले जगी जनार्दन' अशी चरित्रे लिहिली आहेत. तसेच आदि बंधनिष्ठ समीक्षा व तृष्णेचा साहित्य सिध्दांत परिचित करुन देणारे मान्यवर समीक्षक म्हणजे डॉ. म. सु. पाटील हे होय. 'दलित कविता', 'अक्षरवाटा', 'बालकवींचे काव्य विश्व' आदीबंधात्मक समीक्षा, भारतीयांचा साहित्य विचार, 'इंदिरा' यांचे 'काव्य विश्व', 'ज्ञानेश्वरीचा तृष्णा बंध' व तुकाराम : अंर्तबाह्य संघर्षाची अनुभव रुपे ही एकूण म. सु. पाटील यांची ग्रंथसंपदा मराठी समीक्षेला मौलिक परिमाणे मिळवून देणारी आहेत. या प्रमाणे नाशिक जिल्ह्याची वाङ्मयीन परंपरा गोदामाईसारखी सतत वाहती राहणार आहे यात शंका नाही.

### ४.१.६ सामाजिक परिस्थिती :-

सामाजिकदृष्ट्या नाशिक जिल्हा हा पुरोगामी म्हणून ओळखला जातो. नाशिक जिल्ह्याच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करीत असताना नाशिक शहर व नाशिक ग्रामीण असा विचार करावा लागतो. कारण या भेदानुसार आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात फरक दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळात व नंतरच्या काही काळात नाशिक शहर सामाजिकदृष्ट्या आघाडीवर होते. १९६० नंतर राज्याचे नेतृत्त्व यशवंतराव चव्हाण यांच्याकडे गेल्यामुळे व त्यातच १९६२ साली यशवंतराव चव्हाण नाशिक मतदारसंघातून बिनविरोध निवडून आल्यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक परिस्थितीत सुधारणा झाली. यामुळे शहर व ग्रामीण असा भेद कमी होण्यास मदत झाली.

जिल्ह्याच्या एकूण २००१ च्या लोकसंख्येपैकी ६१.२० टक्के लोक खेड्यात राहतात तर १९.३८ लक्ष लोकसंख्येपैकी सर्वाधिक ५९.४८ टक्के लोक नाशिक या प्रथम क्रमांकाच्या मोठ्या शहरात राहतात. २३.५३ टक्के लोक हे मालेगांव या दुसऱ्या क्रमांकाच्या शहरात राहतात.




सन २००१ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४९,८७,९२३ असून २५,९०,२१२ पुरुष व २४,०२,८८४ स्त्रीया आहेत. सन १९९१ ते २००१ या १० वर्षाच्या कालावधीत नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या वाढीचा दर २९.६६ टक्के होता. हा राज्याच्या वाढीच्या दरापेक्षा ६.९५ टक्के अधिक आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ८.५४ टक्के लोक अनुसूचित जातीचे व २३.९२ टक्के लोक अनुसूचित जमातीचे होते. महाराष्ट्र राज्यासाठी हे प्रमाण अनुक्रमे ७.१३ टक्के व ९.१९ टक्के होते.

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ७४.३६ टक्के लोक साक्षर होते. हे प्रमाण ७६.८८ टक्के होते. ग्रामीण भागात ६७.७३ टक्के तर शहरी भागात ८४.५८ टक्के लोक साक्षर होते. पुरुष व स्त्रीया यांच्या साक्षरतेची टक्केवारी अनुक्रमे ८३.६५ व ६४.३५ टक्के होती.[७]

नाशिक जिल्ह्यात शैक्षणिक सेवा / सुविधा उपलब्ध असून २००९–२०१० अखेर प्राथमिक शाळा ४,३५९ तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा १,१६४ आणि ४४ सामान्य शिक्षणाची महाविद्यालये होती. सर्व शाळा, विद्यालये व महाविद्यालयातून २००९–२०१० अखेर १५.३१ लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत होते.[८] याशिवाय १६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व एक आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

नाशिक जिल्ह्यात 'मराठा विद्या प्रसारक समाज' व 'महात्मा गांधी विद्यामंदीर' या दोन संस्था प्राथमिक, महाविद्यालयीन, वैद्यकीय अभियांत्रिकी, कृषी, विधी, संगणक विषयक शिक्षण देणाऱ्यात अग्रेसर समजल्या जातात. तसेच नाशिक जिल्ह्यातील पहिले अभियांत्रिकी कॉलेज क. का. वाघ तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक शहरात कार्यरत आहे. तसेच जागतिक दर्जाचे मुंबई एज्युकेशन ट्रस्टचे 'भुजबळ नॉलेज सिटी' ही संस्था अभियांत्रिकी व संगणक सारखे उच्चतम शिक्षण देणारी सर्वोत्तम शिक्षण देणारी संस्था नाशिक शहरात आडगाव शिवारात कार्यरत आहे. तसेच नाशिक येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय शिक्षण मंडळ देखील कार्यरत आहे. याशिवाय संपूर्ण महाराष्ट्र राज्य अशी व्याप्ती असलेले 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' व 'आरोग्य विज्ञान विद्यापीठ' ही दोन विद्यापीठे नाशिकमध्ये आहेत.

जिल्ह्याच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करीत असताना १८ व्या शतकापासून सुरु झालेल्या वेगवेगळ्या चळवळीचा आढावा घ्यावा लागेल. कारण या सर्व चळवळीमध्ये आजच्या सामाजिक परिस्थितीचे मूळ असल्याचे दिसते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी, जी. व्ही. जोशी, जी. एन. केतकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाळासाहेब खरे यांसारख्या ज्येष्ठ समाजसुधारकांचा वारसा या जिल्ह्याला लाभला आहे.

स्वातंत्र्यानंतर देखील समाजसुधारकांचा वारसा या शहराला सतत लाभलेला आहे व हा प्रभाव जिल्ह्यात टिकलेला आहे. यामध्ये माधवराव लिमये, बापूसाहेब उपाध्ये, काकासाहेब वाघ, दादासाहेब गायकवाड, नाना मालुसरे, गोविंदराव देशपांडे, भाऊसाहेब हिरे, दोधू आनंदा बुवा, आण्णासाहेब मुरकुटे, रावसाहेब थोरात यांच्या कार्याचा उल्लेख करावा लागेल. तसेच शहरांमध्ये व जिल्ह्यामध्ये अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. सामाजिक विकासाच्या दृष्टीने शहरात प्रकाशित

होणारी वृत्तपत्रे, साप्ताहिके यांचाही वाटा निश्चितपणे महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्योत्तर सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक जातीच्या संघटना नाशिक शहरात तसेच जिल्ह्यात निर्माण झाल्या आहेत. महिलांच्या विकासासाठी काही महिला संघटना कार्य करीत आहेत. त्या संघटनाद्वारे ॲड. वसुधा कऱ्हाड, डॉ. शोभा बच्छाव, शोभा मगर, सत्यभामा गाडेकर, शेफाली भुजबळ, कविता कर्डक, पुनम वीर इ. कार्यकर्त्या महिलांमध्ये जागृती घडवून आणताना दिसतात.

## ४.१.७ राजकीय परिस्थिती :–

राजकीय क्षेत्रामध्ये नाशिक जिल्हा हा स्वातंत्र्य चळवळीच्या काळापासून आघाडीवर आहे. देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणातही अनेक नेते व विचारवंत यांची कर्मभूमी ही नाशिक आहे. न्या. रानडे, स्वातंत्र्यवीर सावरकर, दादासाहेब गायकवाड, जी. एन. केतकर, लोकहितवादी ही अग्रणी नेते नाशिक जिल्ह्याचीच आहेत.

महात्मा गांधीच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाऊसाहेब आकुत, बाळासाहेब मराठे, रामभाऊ मराठे, भाऊसाहेब पाटणकर, आप्पासाहेब केतकर यांनी स्वातंत्र्य चळवळीत काम केले. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात जिल्ह्याच्या राजकारणात ब्राम्हण समाजाचे वर्चस्व होते. राज्याचे नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आल्यानंतर जिल्ह्यातील ग्रामीण नेतृत्वाला खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली.

जिल्ह्याच्या राजकारणावर सुरुवातीपासून काँग्रेस पक्षाचा दबाव आहे. गोविंदराव देशपांडे, वसंतराव नाईक, पृथ्वीराज निमाणी, वालचंद हिराचंद, भाऊसाहेब हिरे ही सर्व काँग्रेसचे नेते व रावसाहेब थोरात हे शेकापचे काम करीत होते. तसेच काकासाहेब वाघ, ब्राम्हणेतरांचे नेते म्हणून पुढे आले. संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला. नाशिक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसला टिकवून ठेवण्याचे आणि वाढविण्याचे श्रेय खऱ्या अर्थाने गोविंदराव देशपांडे, भाऊसाहेब हिरे यांच्याकडे जाते.

मराठा, ब्राम्हण तसेच माळी समाज नाशिक जिल्ह्यामध्ये राजकीयदृष्ट्या अधिक जागरुक असलेला दिसतो. त्या त्या समाजातील नेत्यांनी आपल्याच जातीचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळवून राजकीय सत्ता हस्तगत केली. नाशिक शहरात ब्राम्हण मराठा समाजाचा तर ग्रामीण भागात मराठा व मराठेत्तर समाजाचा प्रभाव अधिक दिसून येतो.

जिल्ह्याच्या राजकीय पार्श्वभूमीचा विचार करता १९९० पर्यंत नाशिक जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा प्रभाव दिसून येतो. अपवाद फक्त १९८५ च्या विधानसभेच्या निवडणुकीचा. १९८५ साली शरद पवारांच्या काँग्रेस आघाडीला विधानसभेच्या १४ पैकी ११ जागा मिळाल्या होत्या.[९] त्यानंतर शरद पवारांनी आपल्या पक्षाचे काँग्रेसमध्ये विलिनीकरण केले. मात्र १९९९ साली शरद पवारांनी पुन्हा काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्मितीचा तोटा काँग्रेस पक्षाला सहन करावा लागला. कारण नाशिक जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे मातब्बर नेते शरद पवारांच्या पाठीशी उभे राहिले. यात प्रामुख्याने डॉ. वसंत पवार, प्रशांत हिरे, ए. टी. पवार, श्रीराम शेटे, तुकाराम दिघोळे इ. चा समावेश होतो.

नाशिक जिल्ह्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसने प्रभावाचे क्षेत्र व्यापक केल्याचे दिसून येते. त्यातील प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे पालकमंत्री सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री छगन भुजबळ यांची नाशिक जिल्ह्यावर प्रभावी पकड आहे आणि त्याहीपेक्षा शरद पवार यांना मानणारा बराच मोठा माळी, बंजारा व मराठा समाजातील वर्ग नाशिक जिल्ह्यात आहे. आज नाशिक जिल्ह्यातील सत्ता संघर्ष काँग्रेस विरूध्द सेना–भाजप नसून राष्ट्रवादी विरूध्द सेना–भाजपा दिसून येतो.

आज नाशिक जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. तसेच जिल्ह्यातील बहुतांश सहकारी संस्थेवर राष्ट्रवादी काँग्रेसची पकड आहे. मात्र आज नाशिक शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा वरचष्मा दिसून येतो. नाशिक महापालिकेत महाराष्ट्र नवनिर्वाण सेना प्रणित आघाडीची सत्ता अस्तित्वात आहे. त्याचबरोबर नाशिक शहरात तीनही आमदार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आहेत. त्यामुळे शहरात मनसेचे वर्चस्व दिसून येते तर नाशिक शहरात कामगार वर्गाची संख्या लक्षणीय असून देखील शहरात माकपला स्थान नाही. सुरगाणा वगळता इतर सर्व ठिकाणी डाव्या पक्षाची राजकीय शक्ती क्षीण होताना

दिसून येते. एकूणच जिल्ह्यात व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसचे बऱ्यापैकी वर्चस्व दिसून येते.

## ४.२ आदिवासीबहुल तालुके (दिंडोरी, पेठ, त्र्यंबक, इगतपुरी, कळवण, सुरगाणा, बागलाण)

### ४.२.१ प्रस्तावना :–

महाराष्ट्रातील सर्व विविधता नाशिक जिल्ह्यात दिसून येते. उत्तर दक्षिण पसरलेल्या सह्याद्री पर्वतांच्या रांगांनी जिल्ह्याचा पश्चिम भाग व्यापला असून इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा हे तालुके पूर्णतः आणि दिंडोरी, कळवण, बागलाण या तालुक्यांचा पश्चिम भाग यात समाविष्ट आहे. या तालुक्यातील पावसाचे प्रमाण जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या मानाने सर्वाधिक दिसून येते. या तालुक्यातील हवामान, पिके हे कोकणातील सर्व बाबीशी समरुप आहेत.

जिल्ह्यातील सर्व नद्या जिल्ह्यातच उगम पावतात. जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ तालुके इतर भूभागाच्या तुलनेत समुद्र सपाटीपासून कमी उंचीवर वसलेले आहेत. या तालुक्यातील सर्व नद्या सह्याद्री पर्वतात उगम पावून पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. ही दोन तालुके वगळता इतर सर्व जलप्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात. या आदिवासी बहुल तालुक्यात अनेक डोंगर आहेत. बहुतेक सर्व डोंगर पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताचे पूर्वेकडील पसरलेले फाटे आहेत. या तालुक्यातील वनात उत्कृष्ट प्रतीचा साग व इतर वनउपज मोठ्या प्रमाणात मिळतात. याच डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी राहतात.

या आदिवासी बहुल तालुक्यात आदिवासींची आपली लोककला संस्कृती, रुढी पंरपरा, धार्मिक सण, उत्सव, वेशभूषा, वाद्ये आदिंचे जतन व संवर्धन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच अलिकडच्या काळात या तालुक्यात स्थलांतरीत शेतीस फाटा देऊन स्थायी स्वरुपाची शेती केली जात आहे. पारंपारिक भात, नागली या पीकांबरोबरच इतरही पिके घेतली जात आहेत.

साहित्य, कला, क्रीडा, अर्थ, विज्ञान, शिक्षण, कृषी, उद्योग या सर्व क्षेत्रात या तालुक्यांची कमी अधिक प्रमाणात प्रगती होत आहे.

## ४.२.२ भौगोलिक स्थान :-

नाशिक शहराच्या पश्चिमेस त्र्यंबकेश्वर तालुक्याचे स्थान असून उत्तरेस दिंडोरी तालुका व त्याला लागून कळवण तालुका असून कळवणच्या लगत बागलाण तालुक्याचे स्थान आहे. तसेच नाशिक शहराच्या नैऋत्येस इगतपूरी व वायव्येस पेठ व सुरगाणा तालुक्याचे स्थान आहे.

जिल्ह्यामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासीबहुल तालुका निहाय असलेल्या खेड्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. दिंडोरी – १५८, पेठ – १४५, त्र्यंबकेश्वर – १२५, इगतपुरी – ११९, कळवण – १५२, सुरगाणा – १९१ तर सटाणा – १७० अशी असून तालुकानिहाय ग्रामपंचायतीची संख्या पुढीप्रमाणे – दिंडोरी – १२०, पेठ – ७३, त्र्यंबकेश्वर – ८४, इगतपुरी – ९४, कळवण – ८७, सुरगाणा – ५८ तर, बागलाण – १२९ आहे.[१०]

दिंडोरी तालुक्याचे क्षेत्रफळ १,३४२.१९ चौ. कि. मी असून पेठ तालुक्याचे ५६०.६० चौ. कि. मी., त्र्यंबकेश्वर ८८४ चौ. कि.मी., इगतपुरी ८४६.३२ चौ. कि.मी., कळवण १,१९५ चौ.कि.मी., सुरगाणा ८२२.८८ चौ. कि.मी. तसेच बागलाण तालुक्याचे क्षेत्रफळ १,४७७.८३ चौ. कि.मी. आहे. या आदिवासी बहुल तालुक्यांचे हवामान सर्वसाधारणपणे विषम स्वरुपाचे असून वार्षिक सरासरी पर्जन्यमान अनुक्रमे दिंडोरी तालुक्याचे ७५७ मि.मि. असून पेठ तालुक्याचे १,८८६ मि.मि., त्र्यंबकेश्वर २,२७८.६० कि.मी., इगतपुरी २५०० मि.मि., कळवण ६८७ मि.मि., सुरगाणा १,४६८ मि.मि. तर बागलाण तालुक्यात ५४० मि.मि. इतके आहे.[११] या आदिवासीबहुल तालुक्यातील जमीन काळी, कोरड, गाळ व बरड या प्रकारात विभागलेली दिसते.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांचा स्थानदर्शक नकाशा



### ४.२.३ आर्थिक परिस्थिती :

नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुका हा धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील सर्वाधिक सहा धरणे या तालुक्यात असून त्यात ओझरखेड, वाघाड, करंज वण, तीसगांव, पालखेड, पुणेगांव यांचा समावेश आहे. कादवा व कोलवण नद्यांमुळे व त्यावर बांधलेल्या धरणांमुळे तालुक्यातील ६६ टक्के जमीन ही ओलिताखाली आलेली आहे. उर्वरित ३४ टक्के भाग हा पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. बागायती भागात ऊस, कांदा, द्राक्षे, भाजीपाला ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जात असल्यामुळे हा भाग आर्थिकदृष्ट्या सुधारलेला आहे.

दिंडोरी तालुक्यात पाणीपुरवठ्याच्या मुख्य साधनांमध्ये ५ कालवे, लिफ्ट इरिगेशन – ६, कच्च्या विहिरी – ३७७, पक्क्या विहिरी – ३३०९, इंजिन पंप – ५२ व विद्युतपंप १४,१११ आहेत. त्याचबरोबर सहा मोठ्या धरणांबरोबरच १२ लहान धरणे, ९७ पाझर तलाव, ३५ गांवतळे असून कृषि विकासास पूरक असणारी पाणी पुरवठ्याची साधने या तालुक्यात दिसून येतात.[१२]

दिंडोरी तालुक्यातील कोलवण नदीवर सन १९७८ साली बांधण्यात आलेल्या 'वाघाड धरणावर' पाणी वापर सहकारी संस्था स्थापन करण्यात आले. हा वाघाड प्रकल्प पथदर्शी म्हणून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जागतिक पातळीवर गौरविला गेला आहे. धरणाची क्षमता ७२.२० दशलक्ष घनमीटर आहे. सिंचनक्षेत्र ६७५० हेक्टर इतके आहे. धरणाच्या कार्यक्षेत्रात एकूण २४ पाणी वापर संस्था स्थापन झाल्या. 'जेवढे पाणी तेवढेच सिंचन' हा उपक्रम संस्थेने राबविला आहे. पाणी वापर विकासात सर्वांचा सहभाग, पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर या त्रिसूत्री कार्यक्रमावर या संस्थाचा जास्तीत जास्त भर असतो. संस्था स्थापन करण्यामागे कै. बापूसाहेब उपाध्ये यांचा खारीचा वाटा आहे. त्यांच्या निधनानंतर शहाजी सोमवंशी, भरत कावळे, श्रीराम शेटे आदिंनी विशेष परिश्रम घेतले. एकंदरीत या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

पाण्याची मुबलकता, द्राक्षे व भाजीपाला पिकास योग्य जमिन यामुळे येथील द्राक्षे परदेशात तर नाशिक, मुंबई, गुजरात राज्यात येथील भाजीपाला विकावयास जाऊ लागला आहे. आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान विकसित करुन प्रीकुलिंगसारखे प्रकल्प या भागात मोठ्या प्रमाणात झाले आहेत.

दिंडोरी तालुक्यातील बोपेगांव येथील शेतकऱ्यांची १९९२ साली नाशिक जिल्ह्यातील पहिली सहकारी पतपेढी स्थापन केली. याकामी वणीचे थोर समाजसेवक कै. रावसाहेब थोरात, खेडगांवचे श्री. महादेव पाटिल, मोहाडीचे श्री. रावसाहेब देशमुख यांसारख्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे तालुक्यातील सहकारी पतपेढ्यांची वाढ झाली.[१३] तालुक्यात एकूण १९४ सहकारी संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून लहान मोठ्या शेतकऱ्यांना पतपुरवठा केला जात असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासास चालना मिळाली. तसेच कर्मवीर राजाराम सखाराम वाघ यांच्या अथक परिश्रमातून 'कादवा सहकारी साखर कारखाना' व तालुक्यातील धरणे साकार झाल्याचे दिसून येते. यामुळे या कार्यक्षेत्राचा आर्थिक विकास व राहणीमान उंचावल्याचे दिसून येते.

दिंडोरी तालुका हा औद्योगिक क्षेत्रातही प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतांना दिसून येतो. तालुक्यात पाण्याची उपलब्धता, शासनाच्या सवलतीच्या योजना यामुळे तालुक्यात परमोरी–वलखेड, लखमापूर, पालखेड बंधारा इ. ठिकाणी औद्योगिक वसाहती निर्माण झालेल्या आहेत. मेगाफाईन, एव्हरेस्ट, सी. ग्राम, बॉटल सम्राट, मॅकडॉनेल इत्यादीबरोबरच अनेक स्टील कंपन्या, वाइन फॅक्टरी, पोल्ट्री फार्म इ. चे जाळे पसरले आहे. अलिकडे दिंडोरी तालुक्यात उत्तम प्रतीच्या व मद्य उत्पादनासाठी विशिष्ट प्रकारच्या द्राक्षांची लागवड केली जात आहे. त्यादृष्टीने तालुक्यात वाईनरी प्रकल्प स्थापन करण्यात येत आहे. एकूणच दिंडोरी तालुका औद्योगिक विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

पेठ तालुक्यात हरणगांव, लिंगवणे, ईनामबारी, गावंधपाडा, पाहुचीबारी ही पाच धरणे असून या धरणाखाली बागायत क्षेत्रात ऊस, कांदा, भाजीपाला आदि पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. पेठ तालुक्यातील लागवडीखालील क्षेत्र ३००७६ हेक्टर आहे.[१४] यापैकी बहुतांश क्षेत्र पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

पेठ तालुक्यात व्यापारी अधिकोषांची संख्या ०४ असून सहकारी अधिकोषांची संख्या ३८ आहे. आदिवासी महामंडळाच्या जोगमोडी, करंजाळी, कोहोर, पेठ आदि गावांत सोसायट्या व बँक अस्तित्वात आहेत. या संस्थांच्या माध्यमातून लहान–मोठ्या शेतकऱ्यांना पतपुरवठा होत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासास चालना मिळाली. त्याचबरोबर तालुक्यात स्वयंसहाय्यता बचत गटांची

संख्या ४४ असून या बचतगटांच्या माध्यमातून देखील अलिकडच्या काळात रोजगार उपलब्ध होत आहे.

औद्योगिकदृष्ट्या विचार करता पेठ येथे भात गिरण्या आहेत व लाकडी साहित्य बनविण्याचा कारखाना असून आंबे या गावात बांबूपासून टोकरी, सूप आदि वस्तू तयार करणे, करंजाळी उंबरपाडा येथे सिंधीच्या झाडापासून झाडू बनविणे, सावरणा या गावात करवंद्याचे लोणचे बनविणे, वनऔषधी बनविणे, तर कोटंबी, करंजाळी आदि गावांत विटा, कौले तयार करणे आदि कुटिरोद्योग सुरु असून त्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व आर्थिक विकास होऊ पाहत आहे.

पूर्वी त्र्यंबकेश्वर / हरसूल हा भाग पेठ तालुक्यात होता. मात्र २६.०६.१९९९ रोजी त्र्यंबकेश्वर या नवीन तालुक्याची निर्मिती झाली. या तालुक्यात लागवडीखालील क्षेत्र ३३५२४ हेक्टर असून बहुतांश क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. या तालुक्यात तांदूळ व नाचणी ही पिके मुख्यत्वे घेतली जातात. तालुक्यात व्यापारी अधिकोषांची संख्या ०७ असून सहकारी अधिकोष ०१ आहे. स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या ४२१ आहे.[१५] या बचतगटांच्या माध्यमातून अनेक हातांना रोजगार मिळाल्याचे दिसून येते. हरसूल, त्र्यंबकेश्वर, ठाणापाडा याठिकाणी सरकारी व सहकारी बँका तसेच तालुक्यात सहकारी पतसंस्था, सोसायट्यांमुळे आदिवासी बांधवांना पतपुरवठा होऊ लागला. त्यामुळे शेतीबरोबरच राहणीमान उंचावण्यास कमी–अधिक प्रमाणात मदत होत आहे.

त्र्यंबकेश्वर तालुक्यात हरसूल येथे राईस मिल, लाकडाची वखार, लाकडाच्या वस्तू बनविणे आदि कुटिरोद्योगांमुळे रोजगार निर्मितीस वाव निर्माण झाला. त्याचबरोबर त्र्यंबकेश्वर हे सात ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असल्यामुळे एक तिर्थक्षेत्र म्हणून देशी व परदेशी पर्यटकांची सतत ये जा सुरु असते. तिर्थक्षेत्र / पर्यटनाच्या माध्यमातून अनेक आदिवासी तरुणांना या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

पाऊसाचे माहेरघर म्हणून इगतपूरी तालुक्याचा नावलौकिक आहे. तालुक्यात लहान–मोठी अशी अकरा धरणे आहेत. त्यापैकी भावली, दारणा, मुकणे, कडवा, वैतरणा या धरणांचा मुख्यत्वे करुन मोठ्या धरणांमध्ये समावेश होतो. नांदूरमध्यमेश्वर प्रकल्पांतर्गत इगतपूरी तालुक्यात दारणा,

मुकणे, भावली ही धरणे बांधली आहेत तर वाकीखापरी धरणाचे काम पूर्ण झाले आहे व भाम धरणाचे काम सुरु आहे. तालुक्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्र २९,५०० हेक्टर असून धरणांमुळे बहुतांश क्षेत्र हे ओलिताखाली आल्याचे दिसून येते.[१६] या क्षेत्रात भात, वरई बरोबरच ऊस, भाजीपाला व फुलझाडांचीही शेती फार मोठ्या प्रमाणात केली जाते. इगतपूरीतील फुले आज मुंबई व परदेशातही निर्यात केली जात आहेत.

इ. स. १९२३ च्या दरम्यान मध्य रेल्वेची इगतपूरी येथे वर्कशॉप्स स्थापन झाली. इगतपूरीत रेल्वेलाईन आल्यानंतर गावाच्या विकासास चालना मिळाली. एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन म्हणून त्यांच स्वरुप कायम राहिले. त्यामुळे लोकांना काही प्रमाणात उदरनिर्वाहासाठी रोजगार उपलब्ध झाला. तालुक्यात स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या ४८ असून त्यामुळे देखील रोजगार निर्मितीस वाव मिळत आहे.

इगतपूरीचा बारीक तांदूळ प्रसिध्द आहे. ब्रिटिश काळापासून तांदळासाठी येथे संशोधन सुरु केले व ते आजही सुरुच आहे. इगतपूरी व घोटीत राईस मिल्स असून तांदळाची बाजारपेठ म्हणून घोटी गावाचा नावलौकिक आहे. त्याचबरोबर इगतपूरीत महिंद्रा कंपनीचा प्लँट आल्यानंतर खऱ्या स्थित्यंतराला सुरुवात झाली आहे. स्थानिकांना नोकऱ्या मिळाल्या. नव्या वसाहती उभ्या राहू लागल्या. गावात एकच बॉम्बे हॉटेल होत. तिथं आता अनेक हॉटेल्स झाली. मानससारखं रिसॉर्ट आलं. चरणदेवीपर्यंत वस्ती वाढली. तळेगांवही जवळ जवळ विभिन्न झाले. थोडक्यात लोकांचा आर्थिक विकास होऊन राहणीमान उंचावण्यास मदत झाली.

कळवण तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात लहान चणकापूर धरणाची मूहूर्तमेढ रोवली. कळवण परिसरातील पाण्याचा प्रचंड स्त्रोत पाहता महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर चणकापूरचे वाढीव धरणाचे काम पूर्ण झाले. आज तालुक्यात गिरणा, पुनंद (अर्जुनसागर), मार्कंड्ये, बेहडी या नद्यांवर लहान, मध्यम व मोठे अशा साधारणतः ५० तलाव व धरणांची निर्मिती झाल्याचे दिसते.[१७] याचा परिपाक म्हणून तालुका आज जिल्ह्याचा कॅलिफोर्निया झालेला दिसतो. म्हणून परिसरातील आदिवासी बारमाही शेतीकडे वळलेली दिसत आहेत. तालुक्यात भात पिकाबरोबरच द्राक्षे, कांदा, ऊस, भाजीपाला व

फुलांचीही शेती मोठ्या प्रमाणात केली जात आहे. त्यामुळे या कार्यक्षेत्राचा आर्थिक विकास व राहणीमान उंचावल्याचे दिसते.

कळवण तालुक्यात सरकारी, सहकारी बँका, वि. का. सेवा संस्था, आदिवासी वि. का. सेवा संस्था, जंगल कामगार, कुक्कुटपालन सहकारी पतसंस्थांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो व शासनाच्या अनेक योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचल्याचे दिसते. तसेच कै. ग्यानदेवदादा देवरे यांच्या अथक परिश्रमातून वसंतदादा पाटिल सहकारी साखर कारखान्याची निर्मिती झाली व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासास चालना मिळाली. आज तालुक्यातील महत्त्वपूर्ण प्रकल्पात भेंडी येथील कांदा आणि डाळींब निर्यात केंद्र व शीतगृह, सप्तशृंग ट्रॉली प्रकल्पाचा उल्लेख करता येईल.

कळवण तालुक्यात औद्योगिक वसाहतीच्या दृष्टीने कोल्हापूर फाट्याजवळील जागेत ५१ उद्योगधंदे सुरु होतील. एवढी मुबलक जागा आहे. आजमितीस आनंद ॲग्रो, एम. एम. केमिकल्स, उमेश इंडस्ट्रिज, मल्टी फर्निचर इंडिस्ट्रीज, रुक्मिणी दाल मिल, एस.के.डी. फूडस्, आकाश फुडस् ॲण्ड किटस्, आहेर इंडिस्ट्रीज, गारवा सॉफ्ट ॲण्ड कोल्ड्रींक्स, भगवती दाल मिल, महाराष्ट्र पॅकेजिंग, कृष्णा टाइल्स, सारिका केमिकल्स, संगम लाईन, मे. सुनिल बेबिवाल संचेती आदि उद्योजकांनी आपले उद्योगधंदे औद्योगिक वसाहतीमध्ये स्थापन केले आहेत. एकूणच कळवण तालुका औद्योगिक होऊ पाहत आहे.

सुरगाणा तालुक्यात मोरगांव, घोटूळे या गावात धरणे असून लहान मध्यम अशा साधारणतः १८ तलाव व धरणांची निर्मिती झाल्याचे दिसते. लागवडीखालील क्षेत्र ३२९०० हेक्टर असून बागायत क्षेत्र फारच कमी दिसून येते. मुख्यत्वे भात, वरई ही पिके घेतली जातात.

सुरगाणा तालुक्यात आदिवासी वि. का. सेवा संस्था, जंगल कामगार, वि. का. सेवा सोसायटी, सहकारी बँका कार्यरत आहेत. व्यापारी अधिकोषांची संख्या ०४ व सहकारी अधिकोषांची संख्या ०४ आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून आदिवासी शेतकरी कर्ज घेऊन आर्थिक विकासासाठी प्रयत्न करीत आहे.

सुरगाणा तालुक्यात वनऔषधी वनस्पती असून ती जिल्ह्याबाहेर दूरवर निर्यात केली जाते. तालुक्यातील ठाणगांव येथे घोंगड्या विणणे, सुरगाण्यात लाकडी साहित्य तयार करणे आदि कुटिरोद्योग आहेत तर स्वयंसहाय्यता बचतगटांची संख्या ६८ असून बचतगटांच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण होतांना दिसून येतो.

बागलाण तालुक्यात केळझर, हरणबारी ही मोठी धरणे असून लहान मध्यम अशी साधारणपणे ३० तलाव व धरणे झाल्याचे दिसते. तालुक्यातील लावगडीखालील क्षेत्र ७११०० हेक्टर आहे.[१८] पश्चिम भागात मुख्यत्वे भाताचे पिक घेतले जाते तर तालुक्याचा पूर्व भागात तलाव व धरणांच्या खाली तसेच गिरणा नदीच्या परिसरात बहुतांश क्षेत्र ओलिताखाली आले असून द्राक्षे, कांदा, ऊस व भाजीपाल्याची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे कार्यक्षेत्राचा आर्थिक विकास दिसून येतो.

बागलाण तालुक्यात विविध कार्यकारी सोसायट्या व सहकारी बँकांच्या माध्यमातून लोकांच्या प्रगतीस चालना मिळत आहे. तालुक्यात व्यापारी अधिकोषांची संख्या १३ तर सहकारी अधिकोषांची संख्या १६ आहे. तसेच शेवरे येथे द्वारकाधिक साखर कारखाना खाजगी तत्वावर सुरु असून बागलाण मध्ये तेलगिरण्यांबरोबरच जिनिंग व प्रेसिंगचा उद्योगही आहे. त्यामुळे काही प्रमाणात रोजगार निर्माण झाल्याचे दिसते. तसेच तालुक्यात स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या २८२ असून या बचतगटांच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाल्याचे दिसते.

## ४.२.४ धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान :–

नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुक्याचे धार्मिकदृष्ट्या फार महत्त्व आहे. प. पू. सद्‌गुरु मोरे दादांनी शहरात श्री. स्वामी समर्थ दरबाराची स्थापना करुन या शहराला महत्त्व प्राप्त करुन दिले. दिंडोरीचे स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र हे तालुक्याचे भूषण ठरले असून हजारो सेवेकरी या मातीला प्रणाम करण्यासाठी स्वामी समर्थांच्या चरणास स्पर्श करण्यासाठी दिंडोरीला येत असतात. शहराच्या मध्यभागी अत्यंत शांत, स्वच्छ, पवित्र असलेले ठिकाण दिंडोरी शहराचे मात्र वैभव ठरले आहे.

दिंडोरी तालुक्यातील ‘वरखेडा’ या गावातील कादवा, उनंदा, कोळवण या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर वसलेले रामेश्वर मंदिर हे अति प्राचीन देवस्थान म्हणून ओळखले जाते. या मंदिराचा संबंध थेट प्रभू श्रीरामांशी जोडला गेला असल्यामुळे या मंदिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे व त्रिवेणी संगमाच्या पार्श्वभूमीवर येथे स्नान करणे पवित्र समजले जाते.[१९] त्याचबरोबर प्राचीन तीन मजली असलेले ‘अष्टभुज गोपालकृष्ण मंदिर’ हे बहुधा संपूर्ण भारतातील आठ हातांची कृष्णमूर्ती असलेले एकमेव मंदिर तालुक्यातील ‘मोहाडी’ या गावात आहे.

दिंडोरीपासून ३ कि. मी. अंतरावर उमराळे रस्त्यावर उंच डोंगराच्या ठिकाणी असलेले ‘विंध्यवासिनी देवीमंदिर’ हे पवित्रस्थान दिंडोरीत प्रसिध्द आहे. तालुक्यातील वणी येथील भाविकांचे श्रध्दास्थान ‘जगदंबा देवीचा’ उल्लेख विशेषत्वाने करावा लागतो. तसेच दिंडोरीच्या गणपती मंदिराचेही धार्मिकदृष्ट्या फार महत्व दिसून येते.

दिंडोरी तालुक्यातील ‘आशेवाडी’ गावात ‘रामशेज’ किल्ल्यावर श्री. प्रभू रामचंद्र वनवासाच्या काळात वास्तव्यास होते. येथील काळ्या पाषाणातूनच नाशिकचे ‘काळाराम मंदिर’ बांधले आहे. किल्ल्यावर नऊ छोटी तळी आहेत. ‘रामतळे’ हे मुख्य रामकुंडाएवढेच महत्त्वाचे आहे. कारण यातील पाणी आटत नाही व उन्हाळ्यातही ते थंड असते. दुसरीदोन तळी शेजारी शेजारी असून एकाचे पाणी काळसर व दुसऱ्याचे पिवळसर आहे. डोंगरात श्रीराम मंदिर कोरलेले दिसून येते. चैत्र शुध्द नवमीस येथे यात्रा भरते. रामरथाची मिरवणूक व कुस्त्यांच्या दंगली देखील येथे होतात.

दिंडोरीपासून ४ कि. मी. अंतरावर असलेले ‘रणतळं’ हे स्थान ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिध्द आहे. छत्रपती शिवाजी महाराज व दाऊदखान यांच्यातील पहिलेच युध्द या पठारावर लढण्यात आले. ही लढाई वणी दिंडोरीची लढाई म्हणून प्रसिध्द आहे. दि. ३ ऑक्टोंबर १६७० रोजी महाराजांनी सुरतेवर कब्जा केला. खूप लूट महाराजांना मिळाली. परतीच्या वाटेवर मोगल सेनानी दाऊदखान कुरेशी याने छत्रपती शिवाजी महाराजांना गाठले. वणी–दिंडोरी परिसरात ‘रणतळं’ येथे मोठा संघर्ष झाला. त्यात दाऊदखानचा दारुण पराभव झाला. या युध्दामुळे स्वातंत्र्याला आगळेवेगळे महत्त्व प्राप्त होऊनही ही लढाई शिवचरित्रातील एक सोनेरी पान बनल्याचे दिसून येते.[२०]

पेशवेकाळात माधवराव पेशव्यांच्या मामांनी सरकारी दरबारात कर जमा न करता स्वतःजवळ ठेवला. ही गोष्ट माधवरावांना समजताच त्यांनी आपल्या मामांना तीन लाख दंड ठोठावला. त्याचा राग माधवरावांच्या आई गोपीकाबाई यांना आला व या रागातच त्यांनी पुणे सोडले व 'दिंडोरी' येथील गढीवर निवासस्थान केले. माधवरावांनी आईच्या चरितार्थासाठी दिंडोरी जवळचा परिसर आईच्यानावे केला. दरवर्षी दसऱ्याला तालुक्याच्या तहसीलदारांच्या उपस्थितीत येथे गावकऱ्यांची बैठक घेण्यात येते. दिंडोरीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची कल्पना देणाऱ्या या कथांना लेखी पुरावे नसले तरी गावातील वास्तू, वाडे व गढीचे अवशेष इतिहासाची साक्ष आहेत.

दिंडोरी तालुक्यात पर्यटकांना आकर्षित करणारे 'रणतळ' हे नयनरम्य ठिकाण असून येथे अनेक विदेशी पक्षांचे आगमन वेगवेगळ्या ऋतूत होत असते. पाणकोंबड्या येथे विहारत असतात. मोरांचेही वास्तव्य या परिसरात दिसून येते. त्याचप्रमाणे दिंडोरी तालुक्यातील 'अहिवंत किल्ला', 'रामशेज किल्ला' यांना ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्व आहे.

पेठ तालुक्यातील आदिवासी लोककलेच्या बाबतीत 'धाब्याचा पाडा' या गावातील सोंगे, मुखवटे, नृत्य कलापथक देशभर प्रसिध्द आहे. विविध सणसमारंभातून हे पथक आपले कलागुण सादर करीत असते. दिवसभर राबणारा आदिवासी रात्रीच्यावेळी दिवसभराचा थकवा घालविण्यासाठी नृत्य करीत असे. काळानुरुप पिढी दर पिढी यात बदल होत गेले. या विविध कला सादर करीत असतांना त्यांच्या भावना, श्रध्दा त्या संगीताशी, कलेशी जोडलेल्या असतात. आदिवासींच्या विविध कलांमधून त्यांच्या पारंपारीक देवतांचा, कथांचा उल्लेख आढळतो. आदिवासी हा इथला मूळ निवासी असल्याने त्याचा पूर्वीपासून जंगलाशी जवळचा संबंध आहे. आपल्या विविध नृत्यकथांमधून आपल्या नैसर्गिक साधर्म्य असलेल्या देवतांचे सादरीकरण होत आले आहे. त्यात प्रामुख्याने जंगलाचा राजा सिंह, वाघ, राष्ट्रीय पक्षी मोर, नाग असे विविध प्राणी पक्षी याबरोबरच आपल्या शेतात पिकणाऱ्या धान्यालाही आदिवासींनी देवतेचे स्थान दिले आहे. आपल्या प्रत्येक सणसमारंभात सादर केल्या जाणाऱ्या कला प्रकारातून या देवतांचा उल्लेख आढळतो. आदिवासींची संगीतातील वाद्येही स्वयंनिर्मित आहेत. नमुने दाखल कातड्यापासून बनविलेला ढोल असू दे किंवा येथील आदिवासींच्या संगीताचा खास ओळख असलेली भोपळ्यापासून बनविलेली तारपा असो. आदिवासी बांधव चैत्र पौर्णिमेला विविध

मुखवटे धारण करुन सोंगे नाचवित असत. परंपरेनुसार साधारणतः होळी सणानंतर हे सोंगे नाचविणे सुरु व्हायचे. त्यात विविध प्रकारची वेशभूषा, मुखवटे धारण करुन संगीताच्या तालावर व नृत्याद्वारे कथा सादर केली जाते.[२१]

या पारंपारिक सोंग नृत्याची परंपरा जोपासत पेठ तालुक्यातील धाब्याचा पाडा येथील काही ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकनृत्य सोंगी मुखवट पथक उदयाला आले. गावातील कलावंत श्रावण लक्ष्मण गवळी यांच्या नेतृत्वाखाली १९८४ साली या पथकाची वाटचाल सुरु झाली. या कला पथकास नाशिकच्या आदिवासी विकास केंद्राच्या सांस्कृतिक विभागाचे संचालक वसावी व काशीकर या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभल्याने हे पथक जोमाने पुढे आले. या पथकाला जिल्ह्याबाहेर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. ती १९८५ साली पेठ तालुक्यातील निरगुडे (बु.) या गावातील कार्यक्रमाच्या निमित्ताने तत्कालीन राज्यपाल आय. एस. लतिफ हे आले होते. त्यांच्या स्वागतासाठी धाब्याचापाडा या कला पथकाला बोलाविण्यात आले. या पथकाचे मुखवटे संगीत नृत्य बघून राज्यपालांनी पथकाचे भरभरुन कौतुक केले व या कलानृत्याची त्यांनी तात्काळ नागपूर येथील कला केंद्राकडे शिफारस केली. नागपूरहून भरतू साहेब यांनी या कलापथकास भेट देऊन त्यांची मेहनत, कौशल्य पाहून पथकाची नागपूरला होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड केली. यातून या कलापथकास आपली नृत्यकला राज्यपातळीवर दाखविण्याची संधी मिळाली. २६ जानेवारी १९८६ च्या प्रजासत्ताकदिनी तत्कालिन पंतप्रधान यांच्या स्वागतासाठी दिल्लीच्या राजपथावर या सोंगे, मुखवटे, लोकनृत्यकला पथकाने आपले नृत्य सादर केले. त्यावेळी देशातील इतर राज्यातीलही इतर लोकनृत्ये होती. राज्यभरातून आलेल्या नृत्यकलाकारामधून ७ कलाकेंद्राची निवड करण्यात आली. आजही हे पथक देशभर कार्यक्रमानिमित्त जात असते. हे लोकनृत्य, कलापथक राष्ट्रीय पातळीवरील प्रख्यात असे कलापथक असून यातील बरीच कलाकार मंडळी वयोवृध्द झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पेठ तालुक्यातील वाघेरा (खैराई दुर्ग), सोनगिरी, पिंडवळ इ. गड व किल्ल्यांना ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्व आहे.

त्र्यंबकेश्वर १२ ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. याच परिसरात कुशावर्त तीर्थ असून रामकुंडाइतकेच महत्त्व त्र्यंबकेश्वर येथील 'कुशावर्त' तीर्थास आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याला समस्त

भारतीय हिंदू भाविक या  कुशावर्तात आधी स्नान करुन त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जाण्याची परंपरा पाळतात. कुशावर्तात खाली जीवंत पाण्याचे झरे आहे व गोदावरीच्या उगमस्थानापासून नंतरचा नदीप्रवाह कुशावर्तात येऊन पुढे वळण घेतो. गौतम ऋषींनी प्राचीनकाळी गंगेला अडविले होते व तिर्थात पुण्यस्नान केले होते अशी पौराणिक कथा आहे.

तसेच अंजनेरी हे त्र्यंबक गावाच्या वाटेवरील गाव. ते इतिहास प्रसिध्द आहे. परंतु हनुमानाचा जन्म अंजनेरीच्या डोंगरावर झाल्याची आख्यायिका असल्याने येथे हनुमान जयंतीला मोठी यात्रा भरते. इ. स. ७२० मधील दोन ताम्रपट व १३ व्या शतकातील दोन ताम्रपट या गावात सापडल्याने या गावाचे महत्त्व स्पष्ट झाले. हरिश्चंद्रवंशीय घराणे सहाव्या शतकापासून येथे राज्य करीत होते. अंजनेरी ही त्यांची राजधानी होती.[२२] त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील पर्यटन स्थळापैकी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी येथील नाणेनिधी संग्रहालयाला मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे. असे संग्रहालय देशात नाही तर आशिया खंडातील एकमेव असे संग्रहालय आहे. येथील संग्रहालयात सुमारे अडीच वर्षापासून ते आतापर्यंतच्या तीन हजारपेक्षा जास्त नाण्यांचा संग्रह करण्यात आलेला आहे. संग्रहालयात केवळ नाण्यांचा संग्रह होत नाही तर येथे संशोधन, प्रशिक्षण देण्याचे काम केले जाते. त्यामुळे देशासह परदेशासह हजारो पर्यटक येथे भेटी देऊन अभ्यास करतात. ऐतिहासिक वारसा असल्याने संग्रहालय नाशिकच्या / त्र्यंबकेश्वरच्या वैभवात भर घालण्याचे काम करीत आहे.

इगतपुरी दोन बाबींसाठी प्रसिध्द आहे. घाटन देवीचे मंदिर व सत्यनारायण गोयंकाद्वारा स्थापित योगचरित्र विपश्यना केंद्र इगतपुरीच्या या मंदिराला घाटनादेवीचे मंदिर यासाठी म्हटले जाते की, ईगतपुरीचे गाव चारही बाजूंनी घाटांनी वेढलेले आहे. मंदिराच्या मागे मिंगलवाडीचा किल्ला आहे. इगतपुरीमधील घाटना देवीचे मंदीर दर्शनी स्थान आहे. असे समजले जाते की, या मंदिराचे नामकरण स्थानिक लोकांनी आपले आराध्य घाटना देवी (घाटाचे रक्षक) यामुळे केले आहे. मंदिरातून एक विशालतम पश्चिमी डोंगर रांगाचे विलोभनीय दृश्य दिसते.

दुर्गाच्या नऊ अवतारापैकी इगतपुरीतील घाटना देवीचा शैलपूत्री अवतार मानला जातो. दुर्गा सप्तशती व पुराणात याचा उल्लेख मिळतो. अशी आख्यायिका आहे की, घाटना देवी वज्रेश्वरीतून पुण्याजवळ ज्योतिर्लिंग भिमाशंकर येथे जात होती आणि जेव्हा घाटनादेवी इगतपुरीत आली तेव्हा देवी

येथील प्राकृतिक सौंदर्य बघून अत्यंत मोहित झाली व येथील सौंदर्याने मोहित होऊन कायमस्वरुपी इगतपुरीत राहण्याचा निर्णय घेतला. तसेच इगतपुरीतील विपश्यना केंद्र जगप्रसिध्द आहे. पू. सत्यनारायण गोयंका यांना इगतपुरीहून जाता–येता येथील अध्यात्मिक स्पंदनाची अनुभूती आली व १९७४ साली धम्मगिरीच्या गंगोत्रीची निवड केली.

२७ ऑक्टोंबर १९७६ रोजी येथे दहा दिवसाचे पहिले शिबीर झाले. विशुध्द धर्माचे, कायिक, वाचिक, शुध्दतेचे बीजारोपण झाले. आज ही विपश्यना साधना साता समुद्रापलिकडे गेली आहे.

विपश्यना साधनेचे मूळ उद्दिष्ट्य मन शुध्द, निर्मळ करणे हे आहे. वि म्हणजे विशेष तऱ्हेने आणि पश्यना म्हणजे बघणे. साक्षीभावाने आपल्या आत बघणे, समदृष्टीने स्वतःकडे बघणे म्हणजे विपश्यना आणि असे बघता बघता आसक्ती आणि द्वेष या विकारातून सुटका करुन मन निर्मळ करणे होय. ही अनुभूती लक्षावधी लोकांना सुखकारक वाटू लागल्याने लक्षावधी लोक येथे येऊन ही साधना करीत आहेत. दुःखाकडून सुखाकडे, अशुध्दीकडून शुध्दीकडे, बंधनातून मुक्तीकडे आणि अज्ञानातून ज्ञानाकडे असा हा वास्तव परिवर्तनाचा मार्ग आहे. जगातील सर्व धर्मीयांनी, संप्रदायांनी, पंथांनी विपश्यनेचा अभ्यास केला. धम्मगिरी प्रमाणे आणखी ४० केंद्राची निर्मिती झाली. कारण या साधनेची उपयुक्तता सर्वांना पटू लागली. आज ९० देशातील साधकांना सुमारे ५०० सहाय्यक आचार्य सेवाभावी वृत्तीने ही विद्या प्रदान करीत आहेत. साधकांच्या दहा दिवसांचा शिबिराचा खर्च दानावरच चालतो. मात्र ज्या साधकांनी शिबीर पूर्ण केले आहे अशांचेच दान स्विकारले जाते.

व्यक्तिमत्त्व परिवर्तनासाठी आचार्य विनोबा भावे यांनीही कारागृहातील बंदिजन व शालेय विद्यार्थ्यांसाठी विपश्यना सुरु करण्याची सूचना केली होती. त्यानुसार अनेक प्रयोग यशस्वी देखील झाले. प्रशासन, व्यवस्थापन क्षेत्रातील अधिकारीही या साधनेकडे आकृष्ट झाले असून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाल्याचे सिध्द झाले आहे. या साधनेत तंत्रशुध्दता, अध्यात्मिक मूल्ये यांचा समन्वय आहे. त्यातून वैश्विक धर्माचे मर्म सांगण्यावर भर असतो. या विपश्यना साधनेत माणसाचे मन व चारित्र्य निर्मळ करण्याचे सामर्थ्य आहे. असा असंख्य साधकांचा अनुभव आहे.

तसेच इगतपुरीच्या पश्चिमेकडील डोंगर रांगेत कावनयी, अलंग–पुलंग, मदनगड, भास्करगड, मोरधन, पट्टागड, औंढ या गड–किल्ल्यांचे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण स्थान आहे.

कळवण तालुक्यात धार्मिकदृष्ट्या सप्तश्रृंग गडाच्या स्थानाला विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून मानव शक्तीची उपासना करीत आहे. मानवी जीवनात शक्ती उपासनेला विशेष महत्त्व आहे. श्री. जगदंबेची ५१ पीठे भूतलावर असून उपासकांना त्यापासून लाभ झालेला आहे. या शक्तीपीठांपैकी महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या तीनही स्थानांचे त्रिगुणात्मक साक्षात ब्रम्हस्वरुपीनी धर्मपीठ ओंकारस्वरुप अधिष्ठित आहे आणि तेच म्हणजे सप्तश्रृंग गडावरील श्री. सप्तश्रृंगी देवी होय. दुष्ट शक्तीच्या नाशानंतर विसावा घेण्यासाठी देवीने या गडावर वास्तव्य केले. सप्तश्रृंगीचे पुराणकाळापासून असलेले महात्म्य लक्षात घेता या देवीची स्वयंभू अशी मूर्ती असून नवनाथ सांप्रदायातून नाथापासूनचा कालावधी स्पष्टपणे सांगता येतो. सागरी कवित्व अर्थात मंत्रशक्ती ही सप्तश्रृंगीच्या आशिर्वादाने नाथाला प्राप्त झाली. उत्तरोत्तर काळात संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, पेशवे सरकार, दाभाडे, विंचूरकर, होळकर इ. देवी भक्तांचा या पीठाशी अगदी जवळचा संबंध होता असे दिसून येते. याशिवाय कळवणचे प्रति पंढरपूर– श्री. विठोबा महाराज मंदिर, श्री. सिध्दीविनायक, गणेश खेडगाव, श्री. क्षेत्र कनाशीतील – पाच पांडव मंदिर, श्रीमंत श्री. इच्छामणी गणेश, मार्कंडेय ऋषी, कार्तिकेय मंदिर आदि धार्मिक स्थळांचा उल्लेख विशेषत्वाने करता येईल.

तसेच कळवण तालुक्यातील कन्हेरा गड, पिंपळा गड, अभोणा (ठोकेंची गढी) यासारख्या गडकिल्ल्यांना ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे.

सटाणा तालुक्यात गुजरात राज्याच्या सीमेवर मांगी–तुंगी हे धार्मिकदृष्ट्या महत्वपूर्ण पवित्र तीर्थक्षेत्र आहे. मांगी आणि तुंगी अशी ही दोन पर्वत शिखरे आहेत. मांगीजी पर्वतावर सात तर तुंगीजी पर्वतावर तीन प्रमुख मंदिरे आहेत. येथे ९९ कोटी मुनी मोक्षाला गेले अशी आख्यायिका सांगितली जाते. मांगी व तुंगी ही एकाच पर्वताची दोन शिखरे आहेत. ४५०० पायऱ्या चढून गेल्यावर मांगी–तुंगी पर्वतावर अत्यंत प्राचीन गुहा दिसतात. गुहेत संस्कृत व अर्ध मागधी भाषेत शिलालेख आहेत. येथील जलकुंडे बाराही महिने स्वच्छ पाण्याने भरलेली असतात. जैन धर्मीयांचे एकूण २४ तीर्थंकर मानले जातात. त्यात पार्श्वनाथ आणि महावीर हे अनुक्रमे २३ वे २४ वे तीर्थंकार विशेष महत्त्वपूर्ण आहेत

परंतु मांगी–तुंगी येथे सर्वच्या सर्व २४ तिर्थंकराचे दर्शन घेता येते. जैन धर्मियांचे ते अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र झाले आहे.

त्याचप्रमाणे साल्हेर–मुल्हेर (औरंगगड), हतगड, मोरागड, भिलाई, साल्हेर, सालोटा, हनुमंत गड, तांबोळ्या, न्हावी गड (रतनगड), जैतापूर, मांगी–तुंगी, पोहोज, रुपगड, कऱ्हा, अजमेरा, दुंधा या सटाणा तालुक्यातील गड किल्ल्यांबरोबरच सुरगाणा तालुक्यातील हतगड किल्ल्याचे स्थानही ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते.

**आदिवासी समाजातील भाया उत्सव / डोंगऱ्या देव :**

विविध प्रकारची आदिवासी लोकगीते, तालाच्या ठेक्यात, घुंगुरुकाठी, पावरी, बांबूचा खराटा आणि सोबतच्या टाळ्यांचा नाद, तोंडातून भुर्र!!! अशा प्रकारचा आवाज आदिवासी भागातील रानावनात, डोंगराच्या कडेकपारीत घुमत आहे. निमित्त आहे आदिवासी भागातील 'भाया' उत्सवाचे. वसुबारस झाल्यावर दिवाळीच्या किंवा चैत्र पौर्णिमेच्या प्रारंभी या उत्सवाची आदिवासी भागात मोठ्या उत्सावात सुरुवात होते. पेठ, सुरगाणा, कळवण दिंडोरीचा पश्चिम भाग, सुरगाणाचा पश्चिम भाग, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी या भागात डोंगऱ्या देवाचा कार्यक्रमाचा उत्सव साजरा केला जातो.

डोंगऱ्या देवाचा कार्यक्रम करण्यासाठी घरी एक महिन्यापासूनच लग्नासारखी लगबग सुरु होते. भगताची पाणी, पावरी वाजविणारा पावरकर, ढोल वाजविणारा ढोलकर, वांगळी, थाळ गाणार अशा प्रकारचे वाजंत्रीवाले यांची जमवाजमव केली जाते. डोंगरदेवाचा उत्सव हा घरगुती किंवा सर्व गांव मिळून साजरा केला जातो. त्यास सामुदायिक 'भाया' असे म्हणतात. टापऱ्या भाया, कोलत्या भाया अशा प्रकारचे भायाचे आयोजन केले होते. इंद्रदेवाची कथा, बाळंतिणीची कथा, भुताची कथा, शौर्यकथा, अंजनीची कथा अशा कितीतरी कथा वर्णिल्या जातात. देवीदेवता, महादेव, भवानी–सप्तश्रृंगी, रेणुका, मुंग्या, कणसरी माता यांची पुजा थोंबाजवळ केली जाते. थोंबाजवळ नागली, तांदूळ, वरई, आंब्याची पाने, खारीक, सुपारी, खोबरे, चिभड, नारळ, देवकुरडू, देव अंबाडी, वाळूक (काकडी), झेंडूची फुले, पोलाडा (एक प्रकारचे गवत) यांची मांडणी केली जाते. याच्या सभोवती गोमूत्र शिंपडून ही जागा पवित्र

केली जाते. डोक्यावर मोराचे पिस भिजवून शिंतोडे उडविल्याशिवाय या जागेवर कोणीही बसत नाही. या थोंबाजवळ भगत, कथेकरी, पांगळीवादक, थाळीवादक, पावरकर, ढोलक्या हे सर्व एकत्र बसतात. कथा लावताना घुमारे शांतपणे बसतात. कथा संपल्यावर सूड पाडला जातो. यात सर्व वाद्ये जोरजोरात वाजवून मोठा आवाज केला जातो. रात्रीची वेळ असल्याने पावरीचे सुरेल सूर, ढोलाचा आवाज केला जातो. रात्रीची वेळ असल्याने पावरीचे सुरेल सूर, ढोलाचा आवाज निसर्गालाच जणू साद घालतो. देवदेवतांना सुन्न प्रहरी जागे करतो. आराधना, विनवणी करतो. सूड पाडल्यावर ज्यांच्या अंगात देवता संचारली आहे, वारे आले आहे ते घुमतात. हातात घुंगराची काठी घेऊन गोलाकार फिरून थोंबाभोवती समुहनृत्य करतात. हे नृत्य विलोभनीय असते. मध्यभागी टापरा असतो. 'टापरा' म्हणजे देवीचा खरा भक्त, नायक असतो.

या उत्सवात भगत रात्रभर थाळी, घांगळी वाद्य वाजवून विधिवत पूजा अर्चा मांत्रिक–तांत्रिकाने केली जाते. थाळगावाद म्हणजे थाळी वाजवून सुरेल आवाज काढून कथा म्हणतात. काशाच्या ताटात मेणाचा गोळा ठेवून त्यास 'मेण' लावून त्यावरुन हात ओढल्यास कंपने निर्माण होऊन आवाज निघतो. तो श्रवणीय असल्यामुळे कानाला गोड वाटतो. त्या सुरात सूर मिसळून कथेकरी कथा सांगत असतो.

घांगळी हे एक वाद्य असते. दोन मोठे भोपळे लावले जातात. त्यास बांबूची आडवी काठी लावली जाते. त्यास तारा लावून वीणा अथवा तंबोऱ्यासारखे तयार करुन वाद्य वाजविले जाते. त्यास घांगळी असे म्हटले जाते. यानंतर प्रत्यक्ष एखाद्या गडावर किंवा डोंगराच्या कडेकपारीत 'मावली' असते. तिला पुजा देण्यासाठी गड चढतात. मावल्या दोन प्रकारच्या असतात. चोखा मावली, बाटक मावली, चोखी शाखाहारी, बाटक म्हणजे मांसाहारी त्यास बोकड, कोंबडे मारतात. जंगलातील रानखळीवर जातांना मावल्या त्या जंगलात दोन दिवस थांबतात. या जंगलात खळे तयार केले जाते. त्या जागेवर थोंब उभारला जातो. त्या ठिकाणी देखील सूड पाडला जातो. त्या ठिकाणी सकाळीच डोंगर मावलीची पुजा केली जाते. देवीला बोकडाचा नैवेद्य अर्पण केला जातो. शेवटी भगत पुजा झाल्यावर कथा म्हणतो. पुजा झाल्यावर सर्वच गावाकडे परतत असतात. गावात प्रवेश न करता गावाबाहेर थांबून गावाला मांसाहारी किंवा शाखाहारी गावजेवण दिले जाते. गडाच्या पायथ्याशी नाचतात. त्याला धानीवर नाचणे असे म्हणतात. पाच मावल्यांना जेवण दिल्यावर सर्व घुमाऱ्यांना जेवण दिले

जाते. तोच डोंगऱ्या देवाचा प्रसाद सागाच्या पानात गुंडाळून गावामधील प्रत्येकाच्या घरी पोहोचवला जातो. अशा प्रकारे आदिवासी तालुक्यात डोंगऱ्यादेव मोठ्या उत्सवात साजरा केला जातो.

**आदिवासी तालुक्यातील आदिवासींची दिवाळी (धिंडवाळी) :–**

आदिवासी बांधव सण, उत्सव, धार्मिक परंपरा मोठ्या भक्तीभावाने निसर्गाशी एकरुप होऊन, निसर्गाच्या चरणी लीन होऊन निसर्गालाच देव मानून साजरे करतात. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, इगतपूरी, कळवण, बागलाण, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर या तालुक्यात राहणारे कोकणा. कातकरी, वारली, महादेव कोळी, भिल्ल जमातीतील आदिवासी बांधव दिवाळी सणाची सुरुवात वाघबारशीने (वसुबारशीची) पुजा–अर्चा करुन करतात. वाघबारशीच्या दिवशी बाळदी (गुराखी) जंगलात गायी चारण्यासाठी घेऊन जातात. या दिवशी गुराख्याचा उपवास असतो. दिवसभर जंगलातून फिरुन आल्यावर सायंकाळी पाचच्या सुमारास ‘वाघबारस‘ पुजली जाते. त्यापूर्वी गावाच्या सीमेवर वाघदेवताची सुंदर शिल्पाची कोरीव मूर्ती बसविलेली असते. वाघदेवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा ही शक्यतो रस्त्याच्या कडेलाच गाव सीमेवर केली जाते. आखीव, रेखीव लक्ष वेधून घेणारी वाघदेवतेची मूर्ती भव्य, दिव्य रुपात स्थापन केलेली असते. या मूर्तीवर सूर्य, चंद्र, वाघदेव, नागदेव, झाडे, डोंगर यांची चित्रे कोरलेली असतात. ती विलोभनीय असतात. त्या मूर्तीला कोंबड्यांचा बळी दिला जातो. यामध्ये रानभूत, डोंगरदेव, गावदेवी, स्मशानभूत, हिरवा, कणसरी माता, रानवा, लक्ष्मी (गाय) या सर्वांची विधिवत पूजा वाघदेवाला पूजन केली जाते.

वाघदेवतेची पूजा संपल्यावर गावी रानावनातून घरी आणल्यावर त्यांची पूजा केली जाते. यामध्ये बाळदी (गुराख्याची) पूजा केली जाते. शेवटीच्या फांदीचा खांब रस्त्यावर उभा करुन त्या जागी शेणाने सारवून हळद–कुंकू वाहून त्या जागी कोंबडीचे पिल्लू अगर अंडे ठेवले जाते. त्यावरुन गायी–गुरांचा कळप ढोल–ताशांनी, फटाक्यांनी जोरजोरात वाजवून गायीना भडकविले जाते. ठेवलेले अंडे किंवा पिल्लू चिरडून गेले तर निसर्गदेवतेला समर्पित झाले असे समजले जाते. पिल्लू जिवंत राहिले तर त्याला घरी आणत नाहीत. जंगलात सोडले जाते. सर्व घरातून तांदूळ, डाळ मागविली जाते.

त्याला 'इरा' असे म्हणतात. सर्व एकत्र करुन इरा शिजवला जातो. 'वाघबारस' पूजनाच्या दिवशी सर्व मिळून घराबाहेर निसर्गजेवण केले जाते. त्यानंतर तांदूळ, गोमूत्र, मंतरलेले सर्व गायी–गुरांच्या गोठ्यात झेंडूच्या फुलांनी गोमूत्र शिंपडले जाते. अशा तऱ्हेने 'वाघबारस' पूजानाने आदिवासींची निसर्ग दिवाळीची सुरुवात होते.

वाघबारशीच्या दिवशी रात्री ८ ते १२ वाजेच्या दरम्यान 'धिंडवाळी' मागितली जाते. यामध्ये गायीला लक्ष्मी मानून प्रत्येक गावांगावातून 'धिंडवाळी' मागण्यासाठी गटागटाने दुसऱ्या गावात जातात. यावेळी गायीच्या गोठ्यात 'गोमूत्र शिंपडून' गायीचे गोडवे गायिले जातात. याच दिवशी लक्ष्मी गायीच्या रुपात घराघरात येते. तिची पुजा गाणी गाऊन करतात. विशेष म्हणजे, ही धिंडवाळीची गाणी गातांना कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवले जात नाही. लय–सूर–तालात गाणी मुखाने गातात. रात्री धिंडवाळ्यांना धान्य, पैसा, तत्व या रुपात दक्षिणा दिली जाते. धान्य हे सुपात भरुन दिले जाते. यावेळी धिंडवाळी गुराख्याने, गायीचे, बैलाचे, वाघांचे, निसर्गातील देवदेवतांची नावे घेऊन गायन करतात. आदिवासी बांधवांची दिवाळी ही निसर्गपुजनाने होते. या धार्मिक उत्सवाबरोबरच जन्म व लग्नाचे उत्सव साजरा करतात. घरांच्या भिंती निसर्गचित्रांनी रंगवतात. बांबूवर, लाकडावर कोरीव काम करतात. निसर्गाचे गुणगान करीत नाचतात. आदिवासी मनाने भोळेभाबडे असतात. निसर्गाने जेस ठेवले आहे तसे राहतात. निसर्गातील परमेश्वराला मानतात. निसर्गाला देव मानणारा आदिवासी जंगलातील देवमाणूस आहे. जंगलातील वाघाला, सिंहाला घाबरणार नाही. मात्र निसर्गातील भूताखेतांना, निसर्गातील चमत्कारांना, खोटे बोलण्याला, चोरी करण्याला, फसवणुकीला इज्जत, अब्रुला, कोर्ट कचेऱ्यांना खूप घाबरणारा आहे.

रानावनातील देवदेवतांना भूताखेतांना खुश ठेवण्यासाठी त्यांना कोप होऊ नये म्हणून वाघबारशीच्या दिवशी 'धिंडवळीची' गाणी गाऊन, जल, जंगल, अग्नी, वायू, पशू, प्राणी, वाघदेव, नागदेव यांची पुजा केली जाते. भविष्यात वर्षभरात रानावनात उघड्या शरीरांनी, अनवाणी पायांनी काट्याकुट्यातून हिंडताना काहीही होऊ नये, निसर्गानेच आजपर्यंत सांभाळ केला त्याचीच उपकाराची परतफेड म्हणून 'वाघबारस' साजरी केली जाते.[२३] दिवाळीच्या दिवसात वर्षभर काबाडकष्ट करुन जमिवलेल्या पै–पै मधून पोटभर खाण्यासाठी अंगभर कपडे खरेदीसाठी आदिवासींचा कल असतो.

सर्वांना नवीन कपडे खरेदी केली जातात. सूगीचे, भात कापणीचे दिवस असल्याने धन–धान्यांची भरभराट होत असल्याने आदिवासींच्या चेहऱ्यावर या दिवसांत आनंद ओसंडून वाहत असतो. गावठी मद्य सेवनाबरोबर गावठी कोंबडीचे मटण, भात, मासे असा बेत या सणासुदीच्या दिवसांत आदिवासींच्या भोजनात असतो. अशा प्रकारची आदिवासी बांधवांची दिवाळी दिसून येते.

**आदिवासीबहुल तालुक्यांतील आदिवासींची आखाजी :–**

आखाजीचा सण आदिवासी भागात दिंडोरी, पेठ, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, सुरगाणा, बागलाण या भागात उत्साहात साजरा करण्यात येतो. सण समारंभ म्हटला, की आदिवासी भागातील रीतिरीवाज ठरलेलाच. शहरी भागात अक्षयतृतीयेला मौल्यवान वस्तूंची खरेदी केली जाते तर ग्रामीण भागात घरे बांधण्याचा प्रारंभ व याच दिवशी महिलांसाठीचा गौराईचा सण साजरा करताना सर्वत्र दिसून येत असतो.

गौराई हा महिला वर्गाचा खास सण. या सणासाठी सासुरवाशीण आपल्या माहेरी येतात. किशोरवयीन मुलतही या सणाची विशेष आवड असते. या सणाआधी सात दिवस महिलावर्ग बांबूच्या टोपलीत विविध धान्यांचे सात थर व मातीचे सात थर देऊन गौराईची पेरणी करतात व तिला रोज सकाळ सायंकाळ पाणी घालतात. उगवलेल्या गौराईला पिवळा रंग येण्यासाठी तिला सूर्यप्रकाश मिळणार नाही, यासाठी या गौराईला अंधारात अर्थात कोणत्या तरी साधनांनी झाकून ठेवतात. त्यामुळे ही उगवलेली गौराई पिवळी दिसते. या सात दिवसात रोज सायंकाळी मुली, महिला गौराईची गाणी गातात. आखाजीच्या दिवसात सर्व गावागावातून वाडीवस्तीवरुन गौराई एक करुन मुली, महिला नटूनथटून डोक्यावर गौराई घेऊन मिरवणूक काढत पाणवठ्यावर नेतात. तिथे पूजन झाल्यानंतर गौराईची खुडणी करुन ती आपल्या कुलदेवतांना वाहतात. त्यानंतर महिला, मुली खुडलेली गौराई आपल्या डोक्याला माळतात. यानंतर उर्वरित गौराई पुरुषांच्या कानात अडकवून नमस्कार करतात. त्या बदल्यात पुरुषवर्गाकडून महिला व मुलींना पैशारुपी ओवाळणी देण्यात येते. या गौराईचा दुसराही

काही उद्देश असल्याचे लोकांकडून सांगण्यात येते. अक्षयतृतीया हा साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभमुहूर्त. या शुभमुहर्तावर आगामी खरीपाची स्थिती काय असेल, याचा संभाव्य अंदाज या गौराईच्या पेरणी व उगवणीतून घेतला जातो. उगवलेली गौराई चांगली असेल तर येणाऱ्या खरीपाची स्थितीही चांगली व गौराई विरळ किंवा कमी अधिक उंचीची उगवलेली असेल तर खरीपाच्या पिकांचीही स्थिती साधारण असणार अशा प्रकारचा पूर्वानुभव या गौराईच्या निमित्ताने अनुभवला जात असल्याची माहिती जुन्या लोकांकडून सांगितली जात आहे.

हल्ली काळाच्या ओघात गौराई सर्वत्र पेरल्या जातात. पण गौराईची गाणी मात्र फार कमी प्रमाणात गायली जातात. आखाजीच्या सणात दुपारी जेवणाआधी पित्रांना नैवेद्य दाखवण्याचा प्रघात मात्र आजही दिसून येतो. त्याला आगारी असेही म्हणतात.

एकूणच आदिवासीबहुल तालुक्यांना धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## ४.२.५ वाङ्मयीन परंपरा :–

आदिवासीबहुल तालुक्यातील प्रथमः दिंडोरी येथील वाङ्मय परंपरेचा आढावा घेतांना सर्वप्रथम नावे आढळतात. ती वणीचे थोर सुपूत्र कर्मवीर रावसाहेब थोरात व वणी येथे काही काळ वास्तव्य केलेल्या कविवर्य रेव्हरंड नारायण वामन टिळक व 'स्मृतिचित्रे' कार लक्ष्मीबाई टिळक यांची! रावसाहेबांनी वेळोवेळी जी पत्रे लिहिली ती 'बोधामृत' नावाच्या पुस्तकात एकत्रित आहेत. या पत्रसंग्रहास महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची प्रस्तावना आहे. प्रबोधनकालीन पत्रवाङ्मयात मानाचे स्थान लाभावे असे हे वाङ्मय आहे. लक्ष्मीबाईंनी वणी येथील वास्तव्याचा आपल्या 'स्मृतिचिन्हे' या असमान्य आत्मचरित्रात उल्लेख केला आहे.

कविवर्य कुसुमाग्रज तथा तात्याहेब शिरवाडकर यांच्या लेखकीय जडणघडणीत वणीच्या वाटा असल्याचे तात्यासाहेबांनी कृतज्ञनेने नमूद केले आहे. वणी येथील श्री. दादा वाघ यांच्या 'शीतकडा', 'देवचक्र' नावाच्या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. श्री. विजयकुमार मिठे हे ग्रामीण कथालेखक म्हणून आज

आघाडीवर आहेत. 'घोंगट्याचोर' 'कादवेचा राणा' 'बुजगावणं', 'गावाकडची माणसं' व 'लाऊक' हे त्यांचे पूत्र पूर्णतः ग्रामीण कथासंग्रह म्हणून प्रसिध्द आहेत.

दिंडोरी तालुक्यात कवितेच्या प्रांतात अमोल बागुल (ऋतूंचे मृत्यूपत्र), लक्ष्मण महाडिक (कुणब्याची कविता), दिलिप पाटील (कोंडी), मोतीराम पगारे (उमाळा), दौलतराव सोमण (रानवेली), प्रभुती कवींचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. याशिवाय के. के. अहिरे, संदिप जगताप, नितीन बागुल, राजेंद्र गांगुर्डे, किशोर सोनवणे, गोरक्ष गाढवे, इ. एन. निकम, प्रि. यशवंतराव पाटील, तात्या निकम, गोपाळ गवारी इ. नावे साहित्यिक वर्तुळात बऱ्यापैकी दिसू लागली आहेत. या सर्वांची साहित्य संपदा प्रसिध्द झाली असून काही प्रसिध्दीचा मार्गावर आहेत. 'कादवा शिवार' नावाचे एक मासिक तालुक्यातील वाचकांच्यादृष्टीने आवडीचे झाले आहे. 'रणतळं' नावाचा वार्षिक अंकही येथे पहावयास मिळतो.

पेठ तालुक्याचा विचार करता आवारी गुरुजींची आदिवासींची लोकगीते व 'कोकणी शब्दसंग्रह' ही कामे समोर येतात. त्याचप्रमाणे सुरगाण्याचे श्री. चिंतामण गावीतांचे लेखन देखील लक्षात घ्यावे लागते.

त्र्यंबकेश्वर तालुक्याचा विचार करता श्रीसंत निवृत्तीनाथ यांच्यापासून वाङ्मयीन परंपरा सुरु केली तर वावगे ठरु नये. श्रीनिवृत्तीनाथांची अभंगसंख्या पावणेचारशे असून त्यांनी 'निवृत्तेश्वरी' नावाची गीताटीका लिहिल्याची माहिती मिळते. त्र्यंबकेश्वर हे पुरातन क्षेत्र असल्यामुळे येथे धार्मिक ज्योतीषविषय व कीर्तनविषयक वाङ्मय बरेच निर्माण झाल्याचे उल्लेख मिळतात. अलिकडच्या पिढीतील कवीपैकी रंगनाथ टोके, डॉ. किरण कांबळे, डॉ. अनिल उपासनी यांचा उल्लेख करायला हवा. श्री. गिरीश दीक्षित, राजेश दीक्षित, विजयाताई पंडित हे अनेकाविध विषयांवर वैचारिक लेखन करीत असतात.

इगतपूरी तालुक्यातील साहित्य परंपरेचा विचार करतांना काव्य क्षेत्रातील कैलास पगारे, पुंजा त्र्यंबक लहामगे, भाऊराव काळे, तुकाराम धांडे ही महत्त्वाची नावे आहेत. कैलास पगारे यांचे 'सर्व्हे' व या ही मौसमात, भाऊराव काळे यांचा 'पानाआडची फुले' व लहामगे यांचे 'अंतर्मुख' हे कवितासंग्रह

प्रसिध्द आहेत. याशिवाय प्रा. देविदास गिरी, देवराम पाटील–चौधरी, स्वामी गायकर, नवनाथ गायकर, ज्ञानेश्वर गुळवे, राजू आतकरे, नंदकुमार कर्डक, प्रभाकर आवारे, उत्तम गायकर, उत्तम ढगळे ही काही ज्येष्ठ व नवोदित कवीची नावे होत. श्री. पुंजाजी मालुंजकर हे कथा कादंबरीकार असून 'कोणासाठी?' व 'पायफुटी' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. ते 'सहस्त्रबाहू' नावाचे पाक्षिक प्रसिध्द करतात व त्यांनी या पाक्षिकाच्या वतीने 'भावज्योत' नामक प्रातिनिधीक काव्य संग्रह प्रसिध्द केला आहे.

कळवण तालुक्यातील वाङ्मयीन परंपरेचा विचार करता कळवण महाविद्यालयातील डॉ. उषा शिंदे यांचा 'विभावरी शिरुरकर : स्त्रीवादी आकलन' हा समीक्षा ग्रंथ प्रसिध्द आहे. प्रा. राजेंद्र कापडे हे काव्यलेखन करतात. उत्तरेतील प्राध्यापक सुरेश मेने यांचा ये 'हृदयीचे ते हृदयी' काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. श्री. बाबुलाल केदा पगार यांचा 'रानमळा' काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. धनंजय पवार, विलास पवार (चांदोबा), प्र. दा. पगार, संजीव अहिरे (सांजवात), किशोर पगार, रुपाजी भामरे यांचीही कवी म्हणून नोंद घेतली पाहिजे. ॲड. शशिकांत पवार हे उत्तम ललित लेखन करीत असतात.

बागलाणच्या साहित्य / वाङ्मयीन परंपरेचा विचार करताना ज्ञानदेवांच्या 'बागलाण नवरीच्या अभंगा' पर्यंत जाता येते. ज्ञानदेवांनी अहिरणी भाषेत एक गवळण लिहिली आहे. जयराम पिंडचे संपादित 'राधामाधवविलासचंपू' या शहाजी महाराजांच्या स्तुतीपर ग्रंथात 'मोरीरना भाट' या कवीची अहिराणी रचना समाविष्ट आहे. मुल्हेर येथील उध्दवस्वामी यांनी मराठी व हिंदी भाषांत विपुल रचना केलेली आढळते. 'भक्तीप्रकाश', 'तत्वबोध', 'स्वआत्मबोध', 'नवविधाभक्ती', 'मराठी तत्वबोध', 'मानसपूजा', 'एकादशी', 'स्फुटपदे' अशी महाराजांची काव्यसंपदा आहे.

यानंतरच्या स्वातंत्र्यपूर्व काळात इ. स. पूर्व १९३० साली शंकर बाबाजी पोतदार यांनी 'भाऊ चिंगू शेठ' यांचे चरित्र लिहिले. बागलाण तालुक्यातील आजमीर सौंदाणे, येथील श्री. निंबाजीराव पवार यांनी प्रथम 'जेव्हा गुराखी राजा होतो' हे सयाजीराव महाराजांचे चरित्र लिहिले. नंतर यांनी राजरत्न माणिकराव, सेनापती बापट आणि श्री. शरद पवार यांची चरित्रे लिहिली.

आजच्या काळात बागलाण तालुक्यात विविध वाङ्मय प्रकारात लेखन करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. शरद मुंजवाडकर, प्रभाकर वाघुल हे कादंबरीकार असून त्यांनी अनुक्रमे 'चिंचवण' व

‘धर्मात्मा’ या कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. श्री. बागुल यांच्या इतर डझनभर कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या आहेत. प्राचार्य डॉ. किशोर पवार यांनी ‘आमराई’ नावाची कादंबरी लिहिली आहे. कवितेच्या प्रांतात तर अनेकांनी मुशाफिरी केली आहे. डॉ. मोहन मानगावकर यांचा ‘अनाहूत’, प्रा. शं. क. कानिस यांचे ‘आषाढधारा’ व ‘पाझर’, डॉ. सुधीर देवरे यांचे ‘डंक व्यालेला अवकाश’, दिपक अहिरे यांची ‘आठवणी’, शफिक शेख यांना ‘वेदना’, अशी ही काव्य परंपरा रेखाटता येते.

इतर स्फूट लेखनात डॉ. माजगावकर यांचे ‘कोरलेले क्षण’, प्रा. कापडणीस यांचे ‘चिंतन सरिता’, ॲड. कैलास झोरगे यांचे ‘साहित्य आणि चित्रपट’ या पुस्तकांचा व डॉ. देवरे यांचा ‘कला व संस्कृती : एक समन्वय’ या ग्रंथाचा उल्लेख करता येईल. याशिवाय श्री. दिलीप शंकर सोनवणे, सुरेश बच्छाव, श्री. ए. एस. भामरे, प्रा. बी. जे. शेवाळे, श्री. वाय. एस. पगारे, श्री. बी. डी. बोरसे, किरण देशमुखे, सौ. पुष्पलता पाटील ही स्फूटलेखन करणारी मंडळी प्रसंगोपात्त लिहित असते.

एकूणच आदिवासीबहुल तालुके असले तरी वाङ्मयीन परंपरा ही आज बऱ्यापैकी प्रगतिपथावर दिसून येते.

## ४.२.६ सामाजिक परिस्थिती :–

आदिवासीबहुल तालुक्यांची सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात विचार करता कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, दादासाहेब बिडकर, आदिवासी सेवक गंगाराम जानू उर्फ आवारी गुरुजी यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा वारसा नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांना आहे. रावसाहेब थोरात यांचे शैक्षणिक, दादासाहेब गायकवाडांचे अस्पृश्यता निवारण, दादासाहेब बिडकरांचे आदिवासी कल्याण, कृषी सहकार, गंगाराम जानू उर्फ आवारी गुरुजी यांचे आदिवासी साहित्य व शैक्षणिक तसेच भाऊसाहेब हिरे यांचे सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्याचबरोबर सीताराम भोये (पेठ), गोपाळराव गुळवे (इगतपूरी), शंकरराव मराठे (कळवण), कचरुभाऊ राऊत, महादू पाटील (दिंडोरी) आदिंनी सुरुवातीच्या काळात आपल्या तालुक्याच्या विकासासाठी प्रयत्न केले.

स्वातंत्र्यानंतर सहकार क्षेत्रास खऱ्या अर्थाने चालना मिळाली. दिंडोरीत कादवा सहकारी साखर कारखाना, कळवणमध्ये वसंतरावदादा सहकारी साखर कारखाना, सटाण्यात खाजगी तत्वावरील द्वारकाधिश साखर कारखाना, सहकारी दुध उत्पादक संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती, तालुका शेतकरी सहकारी संघ, विविध कार्यकारी सोसायट्या, पतसंस्था इ. संस्था मोठ्या प्रमाणात स्थापन झाल्या. यामुळे त्या त्या तालुक्याचा विकास होण्यास चालना मिळाली. कमी–अधिक प्रमाणात आदिवासी तालुक्यात सहकाराचे जाळे विणले जात असल्यामुळे शेतीवर नवनवीन प्रयोग होऊन शेतीचे उत्पादन वाढले. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनण्यास मदत झाली. त्याचबरोबर सहकारी संस्थांच्या माध्यमातून नवीन नेतृत्व उदयाला आले. दिंडोरीत १९८१ पासून सलग दहा वर्ष पंचायत समितीचे सभापती असलेले श्रीराम शेटे यांचे नेतृत्व तर जिल्हा परिषदेचे सलग दहा वर्ष अध्यक्ष असलेले इगतपूरीतील कै. गोपाळराव गुळवे, पुत्र संदिप गुळवे व आ. निर्मला गावीत, तर कळवणमध्ये सहकार क्षेत्र व आदिवासींच्या विकासासाठी सतत धडपडणारे श्री. ए. टी. पवार पेठ तालुक्याहून सलग पंधरा वर्ष नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून कार्यरत असलेले श्री. यशवंत भोये त्याचप्रमाणे सुरगाणा तालुक्यात गेल्या ३५ ते ४० वर्षापासून सहकारी क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले श्री. जीवा पांडू गावीत यांनी सहकारी चळवळीला प्रोत्साहन व ताकद देण्याचे काम केले. साहजिकच वरील संस्था त्यांच्या प्रभावाखाली आल्या.

आज आदिवासीबहुल तालुक्यात व शहरात सामाजिक विकासाच्या दृष्टीने प्रकाशित होणारी साप्ताहिके, वार्षिक अंक यांचाही वाटा महत्त्वपूर्ण आहे. स्वातंत्र्यानंतर सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक जातीच्या संघटना आदिवासीबहुल तालुक्यात निर्माण झाल्या आहेत. तसेच महिलांच्या विकासासाठी काही महिला संघटना कार्य करीत आहेत. त्या संघटनांमध्ये विमलताई झिरवाळ, संगीता राऊत, शैलाताई उफाडे, सरीता हाडळ, सुनंदा भोये, पुनम चौधरी, उत्तरा सोनवणे, जयश्री पवार, सुमन देवरे, गंगूबाई कडाळी यांसारख्या कार्यकर्त्या महिलांमध्ये जागृती घडवून आणण्याचे काम करीत आहेत.

आदिवासीबहुल तालुक्यातील तालुकानिहाय लोकसंख्येचा विचार करता दिंडोरी तालुक्याचे क्षेत्रफळ १३४२.१९ चौ. कि .मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण

लोकसंख्या २६४४२७ असून त्यात आदिवासींची (अनु. जमाती) लोकसंख्या १३९०३३ आहे. एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ही ५२.५२ टक्के आहे.[२४]

पेठ तालुक्याचे क्षेत्रफळ ५६०.६० चौ. कि.मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार पेठ तालुक्याची एकूण लोकसंख्या ९६७७४ असून त्यात आदिवासींची (अनुसूचित जमाती) लोकसंख्या ८९९२६ इतकी आहे. तालुक्याच्या एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ही ९२.९२ टक्के आहे.[२५]

त्र्यंबकेश्वर तालुक्याचे क्षेत्रफळ ८८४ चौ. कि. मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार त्र्यंबकेश्वर तालुक्याची एकूण लोकसंख्या १३६४१७ असून त्यात आदिवासींची लोकसंख्या १०६३१५ आहे. तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची (अनूसूचित जमाती) लोकसंख्या ७७.९३ टक्के इतकी आहे.[२६]

इगतपूरी तालुक्याचे क्षेत्रफळ ८४६.३२ चौ.कि.मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या २२८२०८ असून आदिवासींची (अनु. जमातीची) लोकसंख्या ८६३७० इतकी आहे. तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ३७.८५ टक्के आहे.[२७]

कळवण तालुक्याचे क्षेत्रफळ ११९५ चौ. कि. मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या १६५६०९ असून आदिवासींची (अनु. जमातीची) लोकसंख्या १०८९५५ इतकी आहे. तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ६५.७९ टक्के आहे.[२८]

सुरगाणा तालुक्याचे क्षेत्रफळ ८२२.८८ चौ. कि. मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या १४५१३५ असून आदिवासींची (अनु. जमातीची) लोकसंख्या १३७६०२ इतकी आहे. तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ९४.८१ टक्के आहे.[२९]

बागलाण तालुक्याचे क्षेत्रफळ १४७७.८३ चौ. कि. मी. असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या ३११३९५ असून आदिवासींची (अनु. जमातीची) लोकसंख्या १०७२८८ इतकी आहे. तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ३४.३५ टक्के आहे.[३०]

एकूणच सामाजिकदृष्ट्या आदिवासीबहुल तालुक्यातील आदिवासींची संख्या विचारात घेण्यासारखी परिस्थिती दिसून येते.

शैक्षणिकदृष्ट्या आदिवासीबहुल तालुक्यात बऱ्यापैकी शैक्षणिक प्रगती दिसू लागली आहे. दिंडोरी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २१४ शाळा, माध्यमिक शाळा – ५९, शासकीय आश्रमशाळा – १०, जवाहर नवोदय विद्यालय – ०१ असून तालुक्यात ६५४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३१] त्याचबरोबर महाविद्यालये – ०५, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०२, डी. एड् कॉलेज – ०१, नर्सिंग कॉलेज – ०१ आहे. तालुक्यात मराठा विद्या प्रसारक समाज व कर्मवीर रा. स. वाघ या शैक्षणिक संस्थांनी तालुक्यात शैक्षणिक जाळे उभारल्याचे दिसून येते.

पेठ तालुक्यात जिल्हापरिषदेच्या १९८ शाळा, माध्यमिक शाळा – २८, शासकीय आश्रमशाळा – १० असून तालुक्यात २५८६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३२] त्याचबरोबर महाविद्यालये – ०२, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०२, कनिष्ठ महाविद्यालय – ०५ आहेत. तालुक्यात डांग सेवा मंडळ व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे शैक्षणिक योगदान दिसून येते.

त्र्यंबकेश्वर तालुक्यात जिल्हापरिषदेच्या २६३ शाळा, माध्यमिक शाळा – ३०, शासकीय आश्रमशाळा – ०६, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०१ असून तालुक्यात ३७५४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३३] त्याचबरोबर महाविद्यालये – ०५ असून नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्रम्हा व्हॅली व कल्याण ट्रस्टची सपकाळ नॉलेज हब या दोनही सर्व शैक्षणिक सोयींनीयुक्त अशा संस्था तालुक्यातील अंजनेरी या गावात स्थित आहेत.

इगतपुरी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २२२ शाळा, माध्यमिक शाळा – ६०, शासकीय आश्रमशाळा – ०६ असून तालुक्यात ५५३२१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३४] तसेच महाविद्यालये – ०३, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०१ असल्याचे दिसून येते.

कळवण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या – २०७ शाळा, माध्यमिक शाळा – ३८, शासकीय आश्रमशाळा – १४ असून तालुक्यात ४२४५७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३५] तसेच महाविद्यालये – ०३, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०२, शिक्षणशास्त्र महाविद्यालये – ०२, असून सर्व अत्याधुनिक सोयीनी युक्त अशी श्री. गुरुदत्त शिक्षण संस्था संचलित मा. शरद पवार पब्लिक स्कूल तालुक्यातील मानूर या गावी कार्यरत आहे.

सुरगाणा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या – ३३० शाळा, माध्यमिक शाळा – ३८, शासकीय आश्रमशाळा – ०८ असून तालुक्यात ४१२५७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३६] तसेच महाविद्यालये – ०२, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०३, अध्यापक विद्यालय – ०१, असून तालुक्यात शैक्षणिकदृष्ट्या आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

बागलाण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या – ३०८ शाळा, माध्यमिक शाळा – ७८, शासकीय आश्रमशाळा – ०९ असून तालुक्यात ८९५५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३७] तसेच महाविद्यालये – ०३, शिक्षणशास्त्र महाविद्यालय – ०१, औद्योगिक प्रशिक्षण संस्था – ०३, तालुक्यात मराठा विद्या प्रसारक समाज या या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण समजले जाते.

एकूणच शैक्षणिक क्षेत्रातदेखील आदिवासीबहुल तालुके कमी अधिक प्रमाणात प्रगतीपथावर दिसून येतात.

### ४.२.७ राजकीय परिस्थिती :–

आदिवासीबहुल तालुक्यांचा राजकीय परिस्थितीचा तालुकानिहाय आढावा घेता येईल.

राजकीय क्षेत्रात दिंडोरी हा स्वातंत्र्य चळवळीपासून आघाडीवर आहे. रावसाहेब थोरात, दादासाहेब गायकवाड, दादासाहेब बिडकर ह्या अग्रणी नेत्यांनी दिंडोरी तालुक्याबरोबरच जिल्ह्यात ठिकठिकाणी सभा घेतल्या व १९३० च्या काळाराम सत्याग्रहात त्यांना दिंडोरीतून समाजवादी विचारांच्या अनेक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला होता. 'भूमिहीन मजुरांचा सत्याग्रह', आदिवासी

वनजमिनीचा दिंडोरीतील सत्याग्रह यात ते आघाडीवर होते. याच सुमारास वणी, दिंडोरी भागात पुंजाजी आव्हाड, रमन मोकाशी, केदारमल भंडारी आदि स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिश सरकार विरोधी प्रचार, तारा तोडणे असा संघर्ष सुरु ठेवला होता. या काळात दिंडोरीच्या आदिवासी भागाला विकासाचा स्पर्शही झाला नव्हता. आदिवासी भागात शेतकऱ्यात सावकारांचा वरचष्मा होता. याच सुमारास सावकार विरोधी चळवळ सुरु झाली. सावकारांवर हल्ले होऊ लागले. काहींची नाके कापण्यात आल्यावर ते तालुक्यातील वणी या गावी स्थायिक झाले व एक संघर्षात्मक व सत्याग्रही तालुका म्हणून दिंडोरीची ओळख तयार झाली.

दिंडोरी ग्रामपंचायत १५ ऑगस्ट १९२२ रोजी स्थापन झाली. त्यानंतर १९३५ मध्ये तालुक्यातील खेडगांव, वणी आदि भागात / ठिकाणी ग्रामपंचायती स्थापन झाल्या व तेंव्हापासून तालुक्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

तालुक्याच्या राजकारणावर सुरुवातीला काँग्रेस पक्षाचा प्रभाव दिसून येतो. काँग्रेस पक्षाचे श्री. रावसाहेब थोरात हे सन १९५२ रोजी दिंडोरी विधानसभा मतदार संघातून निवडून आले. त्यानंतर सन १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समितीचे रामदास पांडू बागूल, सन १९६२ मध्ये काँग्रेसचे कचरुभाऊ राऊत, सन १९६७ मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे शंकर पोटिंदे व पुन्हा सन १९७२ मध्ये काँग्रेसचे कचरुभाऊ राऊत आमदार झाले. सन १९७७ च्या मालेगांव लोकसभा मतदार संघातून दिंडोरी तालुक्यातून 'वारे' या गावातील जनता पक्षाचे हरिभाऊ शंकर महाले हे निवडून आले व तेव्हापासून हरिभाऊ महालेंचा तालुक्यात प्रभाव वाढला. पुढे शरद पवारांच्या भारतीय काँग्रेसने (समाजवादी) च्या सहकार्याने सन १९८० व १९८५ मध्ये हरिभाऊ महाले जनता पक्षाचे आमदार झाले.[३८] तालुक्यात हरिभाऊंना मानणारा आदिवासी व इतर समाजातील मोठा वर्ग निर्माण झाला. मात्र त्याहीपेक्षा तालुक्यात शरद पवारांना मानणारा आदिवासी व मराठा समाजातील मोठा वर्ग निर्माण झाला.

दिंडोरी तालुक्यातील पंचायत समितीत सलग दहा वर्ष (१४-१०-१९८१ते ३०-०६-१९९०) सभापतपदी असलेले श्रीराम शेटे सारखे नेतृत्व दिंडोरी तालुक्यात उदयाला आले. या कार्यकालात त्यांनी केलेली तालुक्यातील रस्ते, शेती व इतर विकासात्मक कामांमुळे हे सभापतीपद

त्यांच्या आयुष्यात राजकारणात शिखरावर पोहोचविण्यासाठी महत्त्वाचे ठरले. तालुक्यात श्रीराम शेटेंना मानणारा सर्व स्तरातील मोठा वर्ग निर्माण झाला व त्यामुळे काँग्रेस पक्षाला बळ मिळाले. मात्र १९९९ साली शरद पवारांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची निर्मिती केली. त्यावेळी शरद पवारांना पाठिंबा देणाऱ्यामध्ये जिल्ह्यातून श्रीराम शेटे आघाडीवर होते व १९९९ मध्ये श्रीराम शेटे नाशिक जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष झाले. त्यामुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा जबरदस्त प्रभाव निर्माण झाला.

श्रीराम शेटे यांनी दिंडोरी तालुक्याचा विकास व्हावा म्हणून विविध उपक्रम राबविले. सहकारी संस्थांचे जाळे वाढविले. तालुक्यातील सर्व जाती धर्माचा त्यांना पाठिंबा मिळाला. दिंडोरी विधानसभा मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव असल्याकारणाने श्रीराम शेटेंना राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळत नसल्याचीखंत त्यांच्या कार्यकर्त्यांना आहे. मात्र आजपर्यंतचा इतिहास पाहता त्यांच्या मर्जीतीलच उमेदवार हा विधानसभा सदस्य (आमदार) होताना दिसून येतो. मात्र याला अपवाद ऑक्टोंबर २००९ ची विधानसभा निवडणूक होय. या निवडणूकीत शिवसेनेचे धनराज महाले हे निवडून आले. त्यामुळे शिवसेनेचा तालुक्यात प्रभाव वाढण्यास मदत झाली.

दिंडोरी तालुक्यात कादवा सहकारी साखर कारखाना, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद, पंचायत समिती, दुग्ध संघ, जिल्हा बँक, मराठा विद्या प्रसारक संस्था, लहान–मोठ्या पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या, ग्रामपंचायत इत्यादी सर्व ठिकाणी श्रीराम शेटेंच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे.

एकूणच तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांचा फारसा प्रभाव दिसून येत नाही.

पेठ तालुक्याच्या राजकारणावर सुरुवातीपासून काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता. सन १९६२ साली जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत पेठ तालुक्यात काँग्रेसचे पॅनेल निवडून आले व पहिल्या पेठ पंचायत समितीचे श्री. सिताराम भोये बिनविरोध सभापती झाले. त्यातून त्यांचा तालुक्याच्या राजकारणावर प्रभाव वाढण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. पुढे त्यांच्याच नेतृत्वाखाली तालुक्यातील सहकार क्षेत्रातील निवडणूका लढविल्या गेल्यात व त्यात त्यांना अर्थात काँग्रेसला यश

मिळत गेले. सन १९६७, १९७२, १९७९, १९८४ ची पंचायत समिती व जिल्हा परिषदेवर सीताराम भोयेंच्याच नेतृत्वाखाली काँग्रेसने सत्ता संपादन केली. पुढे १९८४ साली काँग्रेस पक्षाने सीताराम भोयंना मालेगांव लोकसभा मतदार संघातून उमेदवारी दिली. त्यात ते प्रचंड मतांनी निवडून आले. त्यामुळे तालुक्यातील अनेक प्रश्न सोडविण्यात त्यांना यश मिळाले.

सन १९९५ नंतर यशवंत भोये, आनंदा वाघेरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे वर्चस्व टिकून राहिले. मात्र २००७ मध्ये शिवसेनेचे श्री. भास्कर गावीत यांच्या रुपाने पेठ तालुक्याला नवीन नेतृत्व मिळाले. त्यानंतर २००९ मध्ये दिंडोरी–पेठ विधानसभा मतदार संघातून शिवसेनेचे धनराज महाले हे आमदार म्हणून निवडून आल्यामुळे या नेतृत्वाला बळकटी मिळाली. आजही पेठ पंचायत समितीत सभापती शिवसेनेचा असून तालुक्यात शिवसेनेचा प्रभाव दिसून येतो. मात्र सहकार क्षेत्रात काँग्रेसचा वरचष्मा टिकून आहे.

पूर्वी त्र्यंबकेश्वर / हरसूल हा भाग पेठ तालुक्यात होता. मात्र २६ जून १९९९ रोजी त्र्यंबकेश्वर या नवीन तालुक्याची निर्मिती झाली. सुरुवातीच्या काळात काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व निर्माण झाले. सन २००२ च्या पंचायत समितीच्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाचे उमदेवार बहुमताने निवडून आले व त्र्यंबकेश्वर पंचायत समितीच्या पहिल्या सभापतीपदी काँग्रेसच्या श्रीमती सुनंदा खंडू भोये ह्या झाल्या. मात्र २००७ च्या पंचायत समितीच्या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्षाकडे सत्ता आली व तालुक्यातील काँग्रेसची पकड काही प्रमाणात ढिली झाल्याचे दिसून आले. मात्र सन २००९ च्या विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार त्र्यंबकेश्वर तालुका हा इगतपुरी या विधानसभा मतदार संघासाठी जोडला गेला व या मतदार संघात काँग्रेसला बळकटी आली. विविध संस्था, सहकार क्षेत्रांवर तालुक्यात काँग्रेसचाच वरचष्मा दिसू लागला. आज याच तालुक्याचे संपतराव सकाळे नाशिक जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. आमदार श्रीमती निर्मला गावीत यांनी मतदार संघातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचा केलेल्या प्रयत्नांमुळे आज त्र्यंबकेश्वर तालुक्यात काँग्रेसचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.

इगतपूरीच्या राजकारणावर सुरुवातीपासून काँग्रेस पक्षाचा प्रभाव दिसून येतो. काँग्रेस नेते कै. गोपाळराव गुळवे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांचा सहकार क्षेत्रात असलेला प्रभाव

नाकारता येत नव्हता. स्वतः तद्यात जिल्हा बँकेचे संचालक म्हणून कार्यरत होते. सन १९७८ ते १९९९ पर्यंत गुळवेंच्या नेतृत्वाखाली विधानसभा सदस्य म्हणून काँग्रेसचे उमेदवार निवडून येत. मात्र सन १९९९ ते २००९ पर्यंत विधानसभेच्या निवडणूकीत शिवसेनेचे उमेदवार निवडून आले. त्यामुळे तालुक्यात शिवसेनेचा प्रभाव वाढण्यास मदत झाली. मात्र सन २००९ च्या विधानसभेच्या निवडणूकीपूर्वी शिवसेनेचे आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केल्यामुळे तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. त्याचा परिणाम ऑक्टोंबर २००९ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसच्या श्रीमती निर्मला गावीत आमदार म्हणून निवडून आल्या व तालुक्यात पुन्हा काँग्रेसचा प्रभाव वाढण्यास मदत झाली. मात्र तरीही आज पंचायत समितीचे सभापतीपद महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे आहे. त्यामुळे तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा प्रभाव नाकारुन चालणार नाही. त्याचबरोबर ग्रामपंचायत, सहकारी सोसायट्या, जिल्हा बँक, पतसंस्था आदि सहकार क्षेत्रात अॅड. संदिप गुळवे व आ. निर्मला गावीत अर्थात काँग्रेसचा प्रभाव अजूनही टिकून असल्याचे दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील राजकारणाचा विचार केला असता कळवण तालुक्याचे राजकारण वेगळ्या वळणाचे दिसून येते. कळवण तालुक्यात सुरुवातीपासून काँग्रेस या पक्षाचा प्रभाव दिसून येतो. सन १९७२, १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसचे ए. टी. पवार आमदार म्हणून निवडून आले. त्यामुळे तालुक्यात काँग्रेसचा प्रभाव वाढण्यास मदत झाली. सन १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार ए. टी. पवारांचा पराभव होऊन समाजवादी काँग्रेसचे काशिनाथ बहिरम आमदार म्हणून निवडून आले. तरीही तालुक्यात सहकार क्षेत्रात काँग्रेसचा प्रभाव टिकून होता. काँग्रेस पक्षाचे ए. टी. पवार यांनी १९९० मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला व तालुक्याच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले याचा परिणाम सन १९९० व १९९५ या विधानसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षोचे ए. टी. पवार हे आमदार म्हणून निवडून आले व युतीच्या शासन काळात त्यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाल्याने तालुक्याच्या विकासात मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. याच कालखंडात ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायट्या, जिल्हा बँक, वसंतरावदादा पाटील सहकारी साखर कारखाना आदि संस्थांवर भाजपाला बऱ्याच अंशी यश मिळाले. मात्र तालुक्यातील पंचायत समितीवर काँग्रेसचा वरचष्मा नाकारुन चालणार नव्हता.

सन १९९९ मध्ये शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली व जिल्ह्यातून पाठिंबा देणाऱ्यात भा.ज.पा. नेते आ. ए. टी. पवार अग्रेसर होते. त्यामुळे तालुक्याच्या राजकारणाला पुन्हा वेगळे वळण मिळाले. बहुतांश कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व त्यातून सन १९९९, २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ए. टी. पवार हे आमदार म्हणून निवडून आले व आजही तालुक्यातील विविध संस्थावर सहकार क्षेत्रात राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस प्रणित आघाडीची सत्ता तालुक्यात सर्वत्र दिसून येते व तालुक्यात इतर पक्षांना नगण्य स्थान असल्याचे दिसते.

सुरगाणा तालुक्यात भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) या पक्षाचा प्रभाव दिसतो. सन १९७८, १९८०, १९८५ व १९९० च्या सुरगाणा–पेठ विधानसभेच्या निवडणूकीत मा.क.पा. उमेदवार जीवा पांडू गावीत आमदार म्हणून निवडून आले व तालुत्यात मा.क.प. चा सर्वत्र प्रभाव वाढत गेला. मात्र १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत अपक्ष उमेदवार हरिश्चंद्र देवराम चव्हाण हे आमदार म्हणून निवडून आले व त्यांचा प्रभाव तालुक्यात वाढण्यास मदत झाली. तसेच हरिश्चंद्र चव्हाणांनी सुरुवातीला काँग्रेस व नंतर भा.ज.पा. त प्रवेश केल्याने सुरगाणासारख्या आदिवासी तालुक्यात भारतीय जनता पक्षाची पाळेमुळे त्यांनी रुजविली. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेतही भारतीय जनता पक्षाचे उमेदवार काही प्रमाणात निवडून आले. मात्र मा.क.पा. चा प्रभाव ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व जिल्हा बँका आदि सहकारी संस्थावर टिकून होता. त्याचबरोबर सन १९९९ व २००४ च्या विधानसभा निवडणूकीत मा.क.पा. उमेदवार जीवा पांडू गावीत पुन्हा आमदार म्हणून निवडून आल्यामुळे मा.क.पा. ला बळ मिळाले. मात्र सन २००९ मध्ये लोकसभा व विधानसभा मतदार संघ पुनर्रचनेत सुरगाणा तालुका हा कळवण विधानसभा मतदारसंघास जोडला गेला व त्यातच मा.क.पा.चे जीवा पांडू गावीतांचे जवळचे सहकारी चिंतामण गावीत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे मा.क.प. ची शक्ती काही प्रमाणात कमी झाली व त्याचा परिणाम कळवण–सुरगाणा विधानसभेच्या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार ए. टी. पवार आमदार म्हणून निवडून आले व तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची शक्ती काही प्रमाणात वाढण्यास मदत झाली. असे असले तरी विधानसभा निवडणूकीनंतर सन २०१२ च्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत

सुरगाणा तालुक्यातून मा.क.प. चे उमेदवार बहुमताने निवडून आल्यामुळे सुरगाणा तालुका पंचायत समितीत मा.क.पा. ची सत्ता दिसून येते. त्याचबरोबर आज तालुक्यात ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायट्या, पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा बँक आदि संस्थांवर मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचेच वर्चस्व सर्वत्र दिसून येते.

बागलाण तालुक्यात प्रारंभी काँग्रेसचा प्रभाव दिसून येतो. सन १९७८ ते १९९० पर्यंतच्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसचे उमेदवार निवडून आले व काँग्रेस नेते पंडित धर्माजी पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली तालुक्याच्या सहकार क्षेत्रात देखील प्रभाव टिकून होता. मात्र सन १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत अपक्ष उमेदवार दिलीप मंगळू बोरसे हे आमदार म्हणून निवडून आले व तालुक्याचे राजकारण बदलले. आ. दिलीप बोरसे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यामुळे तालुक्यात भा.ज.पा.चा प्रभाव वाढण्यास मदत झाली. त्यामुळे सन १९९९ च्या विधानसभा निवडणूकीत भा.ज.पा. उमेदवार शंकर दौलत आहिरे हे आमदार म्हणून निवडून आले तर सन २००४ च्या विधानसभा निवडणूकीत संजय कांतीलाल चव्हाण हे अपक्ष उमेदवार आमदार म्हणून निवडून आले. पुढे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढण्यास मदत झाली. मात्र सन २००९ च्या विधानसभा निवडणूकीत भा.ज.पा. चे उमाजी मंगळू बोरसे हे आमदार म्हणून निवडून आले व तालुक्याच्या राजकारणात भा.ज.पा. चा पुन्हा प्रभाव वाढला. असे असले तरी सटाणा (बागलाण) नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आली. जिल्हा परिषदेत सर्वाधिक उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले. ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायट्या, जिल्हा बँक यासारख्या संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व दिसून येते. मात्र आज पंचायत समितीचे सभापती पद भा.ज.पा. कडे आहे तर उपसभापती पद काँग्रेसकडे असल्याचे दिसते. एकूणच तालुक्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस विरूध्द इतर पक्ष असा सामना असला तरी तालुक्याच्या राजकारणावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव नाकारता येत नाही.

## संदर्भ सूची :


१. देशपांडे पी. एस., जिल्हा नकाशा, नाशिक, प्रकाशक–विज्ञान मंदिर औरंगाबाद.

२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक

३. पवार पंडितराव, जनस्थान, प्रकाशक – प्रा. डॉ. पवार वसंत, नाशिक, जाने. २००५, पृ. १०१.

४. नाशिककर मीना, नाशिक मंदिरे, लेडिज टाईम्स प्रकाशन, नाशिक, पृ. १०.

५. केशिरसागर शोभादेवी, महाराष्ट्रातील जिल्हे, के. सागर पब्लिकेशन,पुणे, २००८, पृ. ७५.

६. पवार पंडितराव, जनस्थान, प्रकाशक – प्रा. डॉ. पवार वसंत, नाशिक, जाने. २००५, पृ. १६–१७.

७. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नाशिक जिल्हा २००६–२००७.

८. जिल्हा सांख्यिकी माहिती संचलनालय, नाशिक.

९. जिल्हा निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.

१०. उपरोक्त

११. नाशिक जिल्हा परिषद, वार्षिक प्रशासन अहवाल, सन २०१०–२०११.

१२. तहसील कार्यालय दिंडोरी.

१३. ठाकरे रमाकांत, ''एच.ए.एल. (नाशिक विभाग) एम्प्लॉइज क्रेडीट को–ऑप. सोसायटी लि. ओझर टाऊनशिपचे आर्थिक अध्ययन,'' (कालखंड सन १९८४–८५ ते १८८८–८९), एम्. फिल्. पदवी शोध प्रबंध, अमरावती विद्यापीठ, १९९० (अप्रकाशित).

१४. तहसील कार्यालय पेठ

१५. पंचायत समिती कार्यालय पेठ

१६. तहसील कार्यालय इगतपूरी

१७. www.wikipedia.com.

१८. तहसील कार्यालय सटाणा.

१९. दैनिक गांवकरी, शुक्रवार दि. १ ऑगस्ट २००८.

२०. दैनिक देशदूत, बुधवार दि. ४ फेब्रुवारी, २००९.

२१. दैनिक पुण्यनगरी, गुरुवार दि. ३१ जानेवारी २०१३.

२२. उन्मेश, आपला नाशिक जिल्हा (तालुके व जिल्ह्याची विशेष माहिती), वैशाली प्रकाशन, पुणे – ३०, मार्च २०१०, पृ. १० ते ११.

२३. दैनिक सकाळ, रविवार, दि. २२ ऑक्टोंबर २०११.

२४. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नाशिक

२५. उपरोक्त.

२६. तहसील कार्यालय त्र्यंबकेश्वर

२७. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक

२८. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण

२९. तहसील कार्यालय, सुरगाणा

३०. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण

३१. दिंडोरी पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३२. पेठ पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३३. त्र्यंबकेश्वर पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३४. इगतपुरी पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३५. कळवण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३६. सुरगाणा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३७. सटाणा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालय

३८. जिल्हा निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी नाशिक.

# प्रकरण पाचवे

# पंचायत राज्यातील नेतृत्वाचे

# विश्लेषण

## प्रकरण पाचवे

# पंचायत राज्यातील नेतृत्वाचे विश्लेषण

**प्रस्तावना :**

भारत हा खेड्यांचा देश असल्याने स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर भर देण्यात आला. प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेनंतर त्यास गती प्राप्त झाली. ग्रामीण विकासाचे कार्यक्रम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राबविले जातात. त्यातच आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात विकास कार्यक्रमांच्या अमंलबजावणीमध्ये स्थानिक पंचायत राज्यातील राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असल्याने प्रस्तुत संशोधनात स्थानिक राजकीय नेतृत्वाची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती, पुरुष व महिला नेतृत्व, नेतृत्वाच्या माध्यमातून राबविलेले विकासाचे कार्यक्रम व त्याद्वारे आदिवासी समाजाचा / भागाचा विकास कितपत झाला याबाबतचा अभ्यास केला आहे.

आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाविषयी अभ्यास करतांना नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास निश्चित करुन नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यांतील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्यांची निवड केली. सन १९९५ ते २०१२ या कालखंडात पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केलेल्या १७६ लोकप्रतिनिधींकडून प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहिती मिळविण्याचे नियोजन केले आहे.

या १७६ सदस्यांपैकी १२ सदस्य मयत आहेत. उर्वरित १६४ सदस्यांपैकी १३ सदस्यांना दोन वेळा काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रत्यक्षात (१६४–१३) १५१ सदस्यांची संशोधनासाठी निवड करण्यात आली. संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार प्रश्नावली तयार करण्यात आली. प्रश्नावली व मुलाखतीद्वारे सदस्यांची माहिती मिळविली. प्रश्नावलीद्वारे मिळालेली माहिती आणि प्रत्यक्ष निरिक्षणाच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

## १. जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे आरक्षण

आरक्षणामुळे समाजातील सर्व जाती, धर्मातील स्त्री–पुरुषांना राजकारणात सक्रीय सहभागाची व समाजाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. हे पुढील तक्त्यावरुन स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. ५.१**

**जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे आरक्षणानुसार वर्गीकरण**

| प्रवर्ग | खुला / सर्वसाधारण | | इतर मागास प्रवर्ग | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| पुरुष | २१ | १३.९१ | २१ | १३.९१ | ०० | ०० | ५५ | ३६.४२ | ९७ | ६४.२४ |
| महिला | ११ | ०७.२८ | ०८ | ०५.३० | ०२ | ०१.३२ | ३३ | २१.८५ | ५४ | ३५.७६ |
| एकूण | ३२ | २१.१९ | २९ | १९.२१ | ०२ | ०१.३२ | ८८ | ५८.२७ | १५१ | १००.०० |

तक्ता क्र. ५.१ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १५१ जि. प. सदस्य पं. स. सभापतींचे आरक्षणानुसार खुला / सर्वसाधारण, इतर मागास प्रवर्ग, अनु. जाती, व अनु. जमाती असे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, खुला / सर्वसाधारण वर्गातील पुरुषांना १३.९१ टक्के व महिलांना ७.२८ टक्के प्रतिनिधित्व मिळाले आहे. तसेच इतर मागास प्रवर्गातील पुरुषांना १३.९१ टक्के तर महिलांना ५.३० टक्के आरक्षण मिळाले आहे. सर्वसाधारण वर्गातील पुरुषांना व इतर मागास प्रवर्गातील पुरुषांना सारख्याच प्रमाणात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून येते.

अनु. जातीतील महिला प्रवर्गासाठी आरक्षण मिळाले नसून याच प्रवर्गातील पुरुषांसाठी १.३२ टक्के प्रतिनिधीत्व मिळालेले आहे. हे प्रतिनिधित्व अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार दिलेले आहे.

अनु. जमातीच्या पुरुषांना ३६.४२ टक्के व महिलांना २१.८५ टक्के प्रतिनिधित्व मिळालेले आहे. एकूण ५८.२७ टक्के आरक्षण या जमातीला मिळाल्याचे दिसून येते. जिल्ह्याच्या आदिवासीबहुल तालुक्यांतील लोकसंख्येचा विचार केला तर अनु. जमातीची लोकसंख्या ६४.६१ टक्के आहे. त्यामुळे या जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणात प्रतिनिधित्व दिल्याचे दिसून येते.

वरील तक्त्यावरुन हेच स्पष्ट होते की, आरक्षणामुळे समाजातील सर्व प्रवर्गातील स्त्री–पुरुषांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

## २. खुल्या / सर्वसाधारण जागेतून निर्वाचित अनुसूचित जमातीचे नेतृत्व

आरक्षणामुळे प्रत्येक समाजाला नेतृत्व करण्याची संधी मिळाली. मात्र तरीही लोकप्रियतेच्या व समाजाच्या लोकसंख्येच्या बळावर खुला / सर्वसाधारण जागेतून देखील अनु. जमातीच्या नेतृत्वाला संधी मिळते. ते पुढील तक्त्यावरुन स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. ५.२**

**खुला / सर्वसाधारण जागेतून निवडून आलेले अनु. जमाती नेतृत्वानुसार वर्गीकरण**

| प्रवर्ग | सर्वसाधारण आरक्षण | | सर्वसाधारण आरक्षणातून निवडून आलेल अनु. जमातीचे नेतृत्व | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| पुरुष | २१ | ६५.६२ | ०३ | ९.३८ |
| महिला | ११ | ३४.३८ | ०२ | ६.२५ |
| एकूण | ३२ | १०० | ०५ | १५.६३ |

तक्ता क्र. ५.२ मध्ये खुल्या / सर्वसाधारण जागेचे आरक्षण दर्शविलेले असून त्यात पुरुष ६५.६२ टक्के व महिला ३४.३८ टक्के असे एकूण १०० टक्के आरक्षण मिळालेले आहे. या खुल्या / सर्वसाधारण जागेतून अनुसूचित जमातीच्या नेतृत्वाने निवडणूक लढवून पुरुष सर्वसाधारण जागेवर ९.३८ टक्के व महिला सर्वसाधारण जागेतून ६.२५ टक्के जागेवर असे एकूण १५.६३ टक्के जागेवर अनु. जमातीच्या नेतृत्वाला प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली.

वरील तक्त्यावरुन हेच स्पष्ट होते की, खुल्या / सर्वसाधारण जागेचे आरक्षण असतांना देखील मतदार संघाच्या आपल्या जमातीच्या / समाजाच्या लोकसंख्येच्या बळावर व आपल्या लोकप्रियतेच्या बळावर अनु. जमातीच्या नेतृत्त्वाला खुल्या / सर्वसाधारण जागेतून देखील संधी मिळाल्याचे दिसून आले.

## ३. जातवार विश्लेषण :

भारतीय राजकारणावर प्रभाव पाडणारा घटक म्हणजे जात होय. ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत 'जात' हा घटक प्रभावी राहिलेला आहे. त्यास स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारण देखील अपवाद राहिलेले नाही.

**तक्ता क्र. ५.३**

**आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातवार वर्गीकरण**

| जाती गट | अनु. जाती | | | अनुसूचित जमाती | | | | | | इतर मागास प्रवर्ग | | | | | सर्वसाधारण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पोट जात | महार | नवबौध्द | एकूण | हिंदू– महादेव कोळी | हिंदू – कोकणा | भिल्ल | महादेव ठाकूर | वारली | एकूण | माळी | कुणबी | वंजारी | तेली | एकूण | मराठा | जैन | इतर | एकूण | |
| संख्या | ०२ | – | ०२ | १४ | ६४ | ०४ | ०१ | ०५ | ८८ | ०८ | १९ | ०१ | ०१ | २९ | २६ | ०१ | ०५ | ३२ | १५१ |
| टक्केवारी | १.३२ | – | १.३२ | ९.२७ | ४२.३८ | २.६५ | ०.६६ | ३.३१ | ५८.२७ | ५.३० | १२.५८ | ०.६६ | ०.६६ | १९.२१ | १७.२२ | ०.६६ | ३.३१ | २१.१९ | १०० |

तक्ता क्र. ५.३ मध्ये आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातीनुसार असलेल्या प्रमाणानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, अनुसूचित जमातीला ५८.२७ टक्के आरक्षण मिळालेले आहे. अनु. जमातीतील सर्वाधिक हिन्दू–कोकणा या घटकाला ४२.३८ टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यानंतर हिंदू महादेव कोळी या घटकाला ९.२७ टक्के त्याचप्रमाणे हिंदू–वारली या घटकाला ३.३१ टक्के व भिल्ल या घटकाला २.६५ टक्के तर हिंदू महादेव ठाकूर या घटकाला ०.६६ टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले.

अनुसूचित जातीला सर्वाधिक कमी १.३२ टक्के प्रतिनिधीत्व मिळाले आहे.

इतर मागास प्रवर्गातील जातीला १९.२१ टक्के प्रतिनिधीतव मिळालेले असून त्यानुसार कुणबी या घटकाला सर्वाधिक १२.५८ टक्के प्रतिनिधीत्व मिळाले आहे. त्यानंतर माळी या घटकाला ५.३० टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली तर वंजारी व तेली या घटकाला प्रत्येकी ०.६६ टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

तसेच सर्वसाधारण वर्गाला २१.१९ टक्के प्रतिनिधीत्व मिळाले आहे. त्यात मराठा व या जातीला सर्वाधिक १७.२२ टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. तर हिंन्दू जैन या जातीला ०.६६ टक्के प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्याचप्रमाणे याच सर्वसाधारण प्रवर्गातील 'ब्राम्हण' या जातीची लोकसंख्या कमी असून प्रतिनिधित्वासाठी लागणाऱ्या लोकसंख्येच्या अटींची पूर्तता त्याद्वारे होत नाही. म्हणून ब्राम्हण या जातीला जिल्हा परिषदेत प्रतिनिधीत्व मिळाले नाही. मात्र सर्वसाधारण वर्गातून समाजाच्या लोकसंख्येच्या व लोकप्रियतेच्या बळावर अनुसूचित जमातीचे ३.३१ टक्के प्रतिनिधींना नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

वरील माहितीवरुन असे दिसून येते की, लोकसंख्येच्या प्रमाणात जातीनुसार सर्व वर्गातील घटकांना राजकीय सहभागाबरोबरच नेतृत्वाची संधी मिळालेली आहे. नाशिक जिल्हा परिषदेतील आदिवासीबहुल सात तालुक्यांतील राजकारणावर लोकसंख्येनुसार अनुसूचित जमातीचेच वर्चस्व आजही कायम दिसून येते.

## ४. आर्थिक परिस्थितीनुसार वर्गीकरण :–

व्यक्तिंचा समाजात राजकारणात प्रभाव निर्माण करणारा घटक म्हणजे उत्पन्न होय. व्यक्तिच्या जीवनात आर्थिक घटक फार महत्त्वपूर्ण आहे. उत्पन्नाच्या आधारे व्यक्तिचा समाजातील स्थान / दर्जा ठरत असतो. जीवनातील अनेक पैलूंवर आर्थिक परिस्थितीचा म्हणजेच उत्पन्नाचा प्रभाव दिसून येतो. याला राजकीय क्षेत्र देखील अपवाद नाही. या अनुषंगाने विचार करुन जि. प. सदस्य व प. स. सभापतींच्या उत्पन्नाचा आढावा घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ५.४**

**जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे वार्षिक उत्पनानुसार वर्गीकरण**

| आर्थिक परिस्थिती | बरी | मध्यम | चांगली | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उत्पन्न | वार्षिक उत्पन्न ४०,००० पर्यंत | वार्षिक उत्पन्न १,००,००० पर्यंत | वार्षिक उत्पन्न १,००,००० पेक्षा जास्त | |
| संख्या | ०८ | ६९ | ७४ | १५१ |
| टक्केवारी | ५.३० | ४५.७० | ४९.०० | १०० |

जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचा व त्यांच्या उत्पन्नाचा जवळचा संबंध असतो. कारण जि. प. सदस्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यास प्रभावीपणे कार्य करु शकतात. जर आर्थिक परिस्थिती कमकुवत असेल तर सार्वजनिक कामात मन रमणार नाही. तसेच निवडणूक लढविण्यासाठी जो खर्च येतो तो सोसण्याची त्यांची क्षमता असली पाहिजे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम / संपन्न असलेल्या व्यक्ती सार्वत्रिक निवडणूक लढवून निवडून येऊ शकतात व निवडून आल्यावर प्रभावीपणे काम करु शकतात.

या दृष्टीने नाशिक जिल्हा परिषदेतील आदिवासीबहुल तालुक्यातील सदस्यांची आकडेवारी खूप बोलकी आहे. तक्ता क्र. ५.४ मध्ये नमुना ५.३० टक्के जि. प. सदस्यांचे वार्षिक उत्पन्न हे ४०,००० पर्यंत आहे. हे जि. प. सदस्य सुरगाणा व पेठ, बागलाण तालुक्यातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे. मात्र निर्णय प्रक्रियेतील सहभाग हा काहीसा कमी दिसून येतो.

ज्यांचे वार्षिक उत्पन्न हे १,००,००० पर्यंत आहे अशांची वर्गवारी मध्यम वर्गीयात केली आहे. मध्यम वर्गातील जि. प. सदस्यांचे प्रमाण ४५.७० टक्के आहे. आदिवासीबहुल सातही तालुक्यातील लोकसंख्येनुसार असणाऱ्या आरक्षणामुळे मध्यम वर्गीयांचा राजकीय सहभाग वाढविण्याबरोबरच राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये अभ्यासूपणाने नेतृत्व करण्याची संधी आरक्षणाच्या माध्यमातून मिळाली आहे.

तसेच ४९ टक्के जि. प. सदस्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न १,००,००० पेक्षा जास्त आहे अशा जि. प. सदस्यांचा राजकीय सहभाग व नेतृत्व करण्याची क्षमता सर्वात जास्त असल्याचे दिसून आले.

यावरुन असे दिसून येते की, सधन कुटुंबातील व्यक्तिचा / जि. प. सदस्यांचा राजकीय सहभाग सर्वात जास्त आहे. कारण आर्थिक घटकांचा राजकीय प्रक्रियेवर प्रभाव पडतो.

## ५. जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतीचे व्यावसायिक विश्लेषणः-

स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करीत असतांना अशा संस्थांमध्ये काम करणाऱ्या प्रतिनिधींचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते. नाशिक जिल्ह्यातील सात आदिवासीबहुल तालुक्यातील जि. प. सदस्य व पं. स. सभापतींचे व्यावसायिक वर्गीकरण खालील तक्ता क्र. ५.५ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ५.५**

**जि. प. सदस्य व पंचायत समिती सभापतींचे व्यवसायानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| व्यवसाय / आर्थिक स्थिती | शेती | | व्यवसाय | | नोकरी / इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| गरीब | (०८) | ५.३० | -- | -- | -- | -- | ०८ | ५.३० |
| मध्यम | (६३) | ४१.७२ | (०६) | ३.९७ | - | - | ६९ | ४५.६९ |
| श्रीमंत | (७४) | ४९.०१ | - | - | - | - | ७४ | ४९.०१ |
| एकूण | १४५ | ९६.०३ | ०६ | ३.९७ | - | - | १५१ | १०० |

तक्ता क्र. ५.५ मध्ये व्यवसायानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, ९६.०३ टक्के जि. प. सदस्य व पं. स. सभापती हे शेती व्यवसाय करतात. त्यात ५.३० टक्के जि. प. सदस्यांची शेती व्यवसाय करुनही त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे. यामध्ये सुरगाणा, पेठ तालुक्यातील सदस्यांचा समावेश आहे तर ४१.७२ टक्के जि. प. सदस्य व पंचायत समिती सदस्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेती व्यवसायासाठी घेतलेला दिसतो. त्यामुळे त्यांची

आर्थिक स्थिती मध्यम स्वरुपाची आहे. तसेच ४९.०१ टक्के जि. प. सदस्यांचे शेती क्षेत्र हे बागायती स्वरुपाचे दिसून आले. त्यात ऊस, द्राक्षे, कांदा, भाजीपाला यांसारखे शेती उत्पादन घेतले जात असल्यामुळे व त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार केला असता हे सदस्य सधन व श्रीमंत आहेत. दिंडोरी व कळवण तालुक्यातील काही जि. प. सदस्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा साहाय्याने शेती करीत असल्यामुळे त्यांच्या एकरी उत्पादनात वाढ झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. तसेच दिंडोरी तालुक्यातील एका जि. प. सदस्यास राज्यस्तरीय 'शेतीनिष्ठ' पुरस्कार देखील महाराष्ट्राच्या राज्यपालाच्या हस्ते मिळाल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे ३.९७ टक्के जि. प. सदस्य हे किराणा मालाचे दुकान, उपहारगृह, पान स्टॉल यांसारख्या व्यवसायात गुंतल्याचे दिसून आले. यामध्ये पेठ, सुरगाणा, इगतपूरी, दिंडोरी तालुक्यातील सदस्यांचा समावेश दिसून आला व त्यांची आर्थिक स्थिती मध्यम स्वरुपाची दिसून आली.

यावरुन असे दिसून येते की, शेती व्यवसाय व इतर व्यवसायाशी निगडीत मध्यम व श्रीमंत स्वरुपाची आर्थिक स्थिती असणारे जि. प. सदस्य प पंचायत समिती सभापती हे स्वतःच्या व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्यात देखील वेळ देतांना दिसून आले. त्यामुळे समाजाचे नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात दिसून येते व ज्यांची आर्थिक स्थिती बिकट व गरीबीची आहे. ते समाज कार्यासाठी वेळ देऊ शकत नाही. ते प्रत्यक्ष अधिकाराबाबतही नामधारी असल्याचे जाणवले. त्यांच्यावर तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्तीचा व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांचा प्रभाव आहे.

## ६. शैक्षणिक दर्जा :

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षणाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येतो. व्यक्तीला आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव निर्माण होऊन त्यासंदर्भात व्यक्ति आग्रही भूमिका घेऊ शकतात. प्राचीन व मध्ययुगीन काळात शिक्षणास विशेष महत्त्व नव्हते.

परंतू अलिकडच्या काळात शिक्षण सर्वांनाच मिळाले पाहिजे. यासाठी शासनस्तरावर तसेच पंचायत स्तरावर साक्षरता मोहिम, सर्व शिक्षा अभियान यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. तसेच केवळ साक्षर होऊन चालणार नाही तर संगणक साक्षर होणे आवश्यक आहे. शैक्षणिक दृष्टीकोनातून नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील जि. प. सदस्यांचा व पंचायत समिती सभापतींचा शैक्षणिक दर्जा खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ५.६**

**जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| शिक्षण | अशिक्षित | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | (०२) | (४९) | (५७) | (२७) | (१६) | १५१ |
| टक्केवारी | १.३२ | ३२.४५ | ३७.७५ | १७.८८ | १०.६० | १०० |

तक्ता क्र. ५.६ वरुन असे दिसून येते की, अशिक्षित जि. प. सदस्यांचे प्रमाण १.३२ टक्के असून प्राथमिक शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण ३२.४५ टक्के आहे तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण ३७.७५ टक्के आहे व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण १७.८८ टक्के आहे. त्याचप्रमाणे पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण हे १०.६० टक्के आहे.

यावरुन असे दिसून येते की, शासनाने शिक्षणाच्या बाबतीत विविध योजना खेड्यापाड्यापर्यंत राबविलेल्या आहेत. त्यामुळे अशिक्षित जि. प. सदस्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे. ज्या जि. प.

सदस्यांना लिहिता वाचत येत नाही त्या सुरगाणा तालुक्यातील महिला जि. प. सदस्या असून त्यांना जि. प. सदस्य पद मिळाल्यानंतर सही करायला शिकविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले या जि. प. सदस्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाबद्दल व नेतृत्व करण्याच्या क्षमतेबद्दल साशंकता निर्माण होते.

प्राथमिक शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्य व पंचायत समिती सभापतींचे प्रमाण ३२.४५ टक्के आहे. यामध्ये काही जि. प. सदस्यांचे (विशेषतः महिला) ५ वीपर्यंत शिक्षण होऊनही नीट वाचता येत नाही. त्यामुळे स्वतः माहिती विचारुन प्रश्नावली भरुन घेतली. मात्र ही प्रश्नावली भरुन घेत असतांना काही महिला जि. प. सदस्यांकडून माहिती घेत असतांना त्यांचे पती व नातेवाईक अडथळा निर्माण करुन तेच माहिती देऊ लागले. त्यामुळे प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत या महिलांना भाग घेता येत नसेल असे दिसून आले व त्यामुळे त्यांच्यात नेतृत्व करण्याची क्षमता दिसून आली नाही.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण अनुक्रमे ३७.७५ व १७.८८ टक्के इतके आहे. या जि. प. सदस्यापैकी बऱ्याच सदस्यांना आपल्या जि. प. गटातील, तालुक्याच्या समस्याची जाणीव आहे व त्या समस्या सोडविण्याबाबतची तळमळ त्यांच्या बोलण्यातून जाणवली. त्यासाठी जास्तीत जास्त जि. प. सदस्य हे उच्च शिक्षित असणे आवश्यक आहे.

तसेच पदवीधर जि. प. सदस्यांचे प्रमाण १०.६० टक्के असून ह्या जि. प. सदस्यांना आपापल्या गटातील समस्यांची त्यांना प्रकर्षाने जाणीव असल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून आले. तसेच यातील बरेच सदस्य स्थानिक व तालुक्याच्या राजकारणात सक्रिय असल्याचे दिसून आले. स्थानिक तसेच जि. प. गटातील प्रश्न सोडविणे, तालुक्याची विकास कामे करणे, अन्यायाविरुध्द लढणे, विकासात्मक कार्यक्रम राबविण्यासंदर्भात निर्णय घेणे हे गुण त्यांच्या बोलण्यातून जाणवले. त्याचबरोबर त्यांच्या गटातील व त्या त्या तालुक्यातील लोकांशी बोलतांना समजले की, त्या जिल्हा परिषद सदस्यांनी तालुक्याच्या विकासासाठी विविध समाजोपयोगी कार्यक्रम, उपक्रम राबविल्याचे सांगितले. हे जि. प. सदस्य दिंडोरी, कळवण, बागलाण तालुक्यातील दिसून आले.

यावरुन शिक्षणाचा व जि. प. सदस्यांच्या नेतृत्वाचा किती जवळचा संबंध आहे हे वरील विश्लेषणावरुन दिसून येते.

## ७. राजकीय वारसा :–

कुटूंब ही राजकीय सामाजिकीरणाची पाठशाळा मानली जाते. म्हणजे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राची ओळख ही कुटुंबातूनच केली जात असते. कुटुंबातच आवडी–निवडी, प्रवृत्ती, मूल्ये, मत विचार इ. ची जडणघडण होत असते. त्याबाबतीत राजकारण देखील अपवाद ठरत नाही. कुटूंबातील राजकीय वातावरण, वारसा, आदर्श, प्रेरणास्थान, गुरु इ. चा राजकीय नेतृत्वावर प्रभाव पडत असतो. कुटूंबातील राजकीय वातावरणातूनच राजकीय नेतृत्व निर्माण होत असते. या अनुषंगाने नाशिक जिल्हा परिषदेतील आदिवासीबहुल सात तालुक्यांतील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) जि. प. सदस्यांना तुमच्या नातेवाईकांपैकी सक्रिय राजकारणात कोणी भाग घेतलेला आहे का? त्यांच्या कुटूंबातील कुणीतरी व्यक्ती किवां सासर, माहेर कडील पूर्वी राजकारणात होते का? तसेच कोणाच्या प्रेरणेने जि. प. सदस्य म्हणून राजकारणात आले हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांची नावे विचारली व त्यांचे प्रेरणास्थान गुरु, आदर्श कोण याची विचारणा केली व त्यावरुन खालील विश्लेषण केले.

**तक्ता क्र. ५.७**

**राजकीय वारसानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| सामाजिक पार्श्वभूमी | राजकीय वारसा असलेले | राजकीय वारसा नसलेले | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | (१०१) | (५०) | १५१ |
| टक्केवारी | ६६.८९ | ३३.११ | १०० |

तक्ता क्रमांक ५.७ मध्ये ज्या जि. प. सदस्यांना राजकीय वारसा लाभलेला आहे. त्यांचे पती, आई, वडील, भाऊ, सासू, सासरे, दीर, काका, मेव्हुणे, मामा, आई जवळचे नातवाईक यापूर्वी राजकारणात होते अथवा आता आहेत. यावरुन हे वर्गीकरण केले असता असे दिसून आले की, ६६.८९ टक्के जि. प. सदस्यांना सामाजिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. बहुतांश जि. प. सदस्यांच्या घरातच सामाजिकीकरणाचे व राजकीय वातावरण असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला चालना मिळाल्याचे दिसून आले. मात्र इगतपूरी, बागलाण व दिंडोरी तालुक्यातील दोन जि. प. सदस्या व पेठ तालुक्यातील एक जि. प. सदस्या ह्या पती राजकारणात असल्यामुळे व स्त्री राखीव जि. प. गट झाल्यामुळे पतीच्या आग्रहास्तव राजकारणात आली असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

तसेच राजकीय वारसा नसलेल्या जि. प. सदस्यांचे प्रमाण ३३.११ टक्के आहे. यापैकी सुरगाणा तालुक्यातील दोन जि. प. सदस्या ह्या निरक्षर असून देखील आरक्षणामुळे व एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या पाठींब्यामुळे त्या जि. प. सदस्या झाल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग नावापुरताच दिसून आला.

तसेच त्र्यंबकेश्वर व सुरगाणा तालुक्यातील प्रत्येकी एक सदस्य व कळवण, बागलाण तालुक्यातील दोन जि. प. सदस्य तर बागलाण तालुक्यातील चार जि. प. सदस्य हे स्थानिक समस्या बघून राजकारणात आल्याचे दिसून आले. या जि. प. सदस्यांना जि. प. गटातील समस्या, तालुक्यातील समस्या त्यावर कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे. विकास कामे करतांना कोणती कामे प्राधान्याने करावीत. भविष्यात कोणत्या योजना राबवायच्या आहेत. या अनुषंगाने माहिती विचारली असता त्यांनी दिलेली उत्तरे अभ्यासपूर्ण असल्याचे दिसून आले. मात्र पुढल्या निवडणुकीत आरक्षणामुळे जि. प. सदस्य होण्याची संधी मिळाली नसल्याचे त्यांनी खेदाने नमूद केले.

## ८. राजकीय पक्ष

आधुनिक काळात राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाला अनन्य साधारण स्थान प्राप्त झाले आहे. भारतात बहुपक्षीय पध्दती अस्तित्वात असल्यामुळे भारतातील प्रत्येक घटक राज्यात विविध राजकीय पक्ष कार्यरत असून त्या त्या राजकीय पक्षाची विचारप्रणाली, तत्वप्रणाली, ध्येय, उद्दिष्ट्ये, धोरणे काय आहेत यावर त्या राजकीय पक्षाचे भवितव्य ठरत असते. महाराष्ट्र राज्याचा विचार करता स्थानिक स्वराज्य संस्थांतील / जि. प. सदस्य व पं. स. सभापती देखील राजकीय पक्षाचे सदस्य असून त्यांचे राजकीय पक्षानुसार विश्लेषण पुढील तक्त्यावरुन करता येते.

**तक्ता क्र. ५.८**

**जि. प. सदस्य व प. स. सभापतींचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| राजकीय पक्ष | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | भा.ज.पा | भा.क.पा | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | (७६) | (३४) | (१५) | (०६) | (१३) | (०८) | १५२ |
| टक्केवारी | ५०.०० | २२.३७ | ९.८७ | ३.९५ | ८.५५ | ५.२६ | १०० |

अभ्यासासाठी १५१ जि. प. सदस्य व पं. स. सभापतींची निवड करण्यात आली आहे. मात्र इगतपूरी तालुक्यातील एक जि. प. सदस्य सन १९९२ ते १९९७ या कालखंडात काँग्रेस या पक्षाकडून निवडून आले व सन २००७ ते २०१२ या कालखंडात ते राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाकडून निवडून आल्यामुळे वरील तक्ता क्र. ५.८ मध्ये १५२ सदस्यसंख्या दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र. ५.८ मध्ये जि. प. सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण केल्यामुळे आदिवासीबहुल सात तालुक्यात (दिंडोरी, पेठ, सुरगाणा, कळवण, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, बागलाण) कोणत्या पक्षांचा प्रभाव आहे हे समजते.

सन १९९२ ते १९९७, १९९७ ते २००२, सन २००२ ते २००७ व सन २००७ ते २०१२ या चार पंचवार्षिक कालखडातील जि. प. सदस्य व पं. स. सभापतींचा विचार केला असता हयात असलेल्या १५२ पं. स. सभापती व जि. प. सदस्यापैकी ७६ जि. प. सदस्य व पं. स. सभापती काँग्रेस पक्षाचे असून त्यांचे प्रमाण ५० टक्के आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ३४ जि. प. सदस्य व पं. स. सभापती असून त्यांचे प्रमाण २२.३७ टक्के आहे तर शिवसेना या पक्षाचे एकूण १५ जि. प. सदस्य व पं. स. सभापती असून त्यांचे प्रमाण ९.८७ टक्के आहे व भाजपा या पक्षाचे एकूण ०६ जि. प. सदस्य व पं. स. सभापती असून त्यांचे प्रमाण ३.९५ टक्के आहे. तसेच माकपा या पक्षाचे एकूण १३ जि. प. सदस्य व पं. स.सभापती असून त्यांचे प्रमाण ८.५५ टक्के आहे. त्याचप्रमाणे अपक्ष पं. स. सभापती व जि. प. सदस्यांची संख्या ८ असून त्यांचे प्रमाण ५.२६ टक्के आहे.

सन १९९९ साली काँग्रेस या पक्षात फूट पडून शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची निर्मिती झाल्यानंतर दिंडोरी तालुक्यातील माजी पंचायत समिती सभापती श्रीराम शेटे, सुरगाणा तालुक्यातील मा. आमदार श्री. हरिश्चंद्र चव्हाण, बागलाण तालुक्याचे नगराध्यक्ष संजय चव्हाण, इगतपूरीतून मा. आमदार शिवराम झोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे सन १९९७ मध्ये काँग्रेस या पक्षाच्या तिकीटावर निवडून आलेले बहुतांश जि. प. सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यामुळे जिल्ह्यात व आदिवासीबहुल तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव निर्माण झाला.

जिल्हा परिषद सदस्यांची पक्षीय दृष्टीकोनातून माहिती मिळवित असतांना पक्षाचे धोरण, उद्दिष्ट्ये कोणती आहेत? याच पक्षाचे नेतृत्व का मानतात याबाबतची माहिती विचारली तसेच त्यांच्या राजकीय पक्षातील सक्रिय सहभागाबद्दल माहिती मिळविण्यासाठी पक्षाचे मेळावे, सभा, पक्षाचे सभासदत्व सक्रिय सभासदत्व, पक्ष संघटना पदाधिकारी याबाबत माहिती विचारली. मिळालेल्या

माहितीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जि. प. सदस्यांपैकी ७० टक्के सदस्य पक्ष कार्यात सक्रिय दिसून आले.

काँग्रेस या पक्षाचे ३० टक्के जि. प. सदस्य पक्ष कार्यात सक्रिय भाग घेतांना दिसून आले तर शिवसेना या पक्षाच्या जि. प. सदस्यांपैकी ६० टक्के सदस्य पक्ष कार्यात सक्रिय भाग घेत असल्याचे दिसून आले. त्यांना पक्षासाठी कोणत्या प्रकारचे कार्य केले आहे हे विचारले असता त्यात पाणी, वीज यांविषयी आंदोलनात्मक कार्य, पक्षाचे मेळावे, सभा इत्यादीतील उपस्थितीतून सक्रियता दिसून आली. तसेच भाजपा या पक्षाच्या जि. प. सदस्यांपैकी ५५ टक्के सदस्य हे पक्षकार्यात सक्रिय दिसून आले तर माकपा या पक्षाचे ९० टक्के जि. प. सदस्य पक्ष कार्यात सक्रीय दिसून आले. त्यांची वनजमीन हक्कासंदर्भात व पक्षकार्यासाठी सभा, मेळावे, आंदोलनात्मक कार्यातून सक्रियता दिसून आली. त्याचप्रमाणे अपक्ष जि. प. सदस्यांची भूमिका आपल्या गटातील विकासासंदर्भात आंदोलन करुन राजकीय पक्षांशी संघर्ष वा तडजोडीतून निर्णय प्रक्रियेत सक्रियता दर्शविल्याचे दिसून आले. सर्व पक्ष मिळून ६१ टक्के जि. प. सदस्य व पं. स. सभापती हे सक्रिय पक्षांचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.

वरील माहितीवरुन असे दिसून येते की, जि. प. सदस्य हे राजकीय पक्षाचे नेतृत्व मानतात. या नेतृत्वाच्या अनुषंगाने नवीन नेतृत्वाच्या जडणघडणीत वाव मिळत आहे. त्याचबरोबर पक्षनिष्ठ राजकारणापेक्षा व्यक्तिनिष्ठ राजकारणाला महत्व दिल्याचे दिसून येते.

## ९. राजकारणातील पूर्वानुभव :–

कोणतेही राजकीय पद सांभाळणाऱ्या व्यक्तिला जबाबदारीचे पद सांभाळण्याकरिता व कार्यक्षम नेतृत्वासाठी दिर्घकालीन अनुभव असणे केव्हाही चांगले असते. अनुभवामुळे दूरदृष्टी निर्माण होते. निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होऊन निर्णय घेता येतात. समस्यांची चांगली जाण होते व त्यांची सोडवणूक करता येते.

या उद्देशाने नाशिक जिल्हा परिषदेतील आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) जि. प. सदस्य व पं. स. सभापती होण्यापूर्वी आपण राजकीय पक्षाच्या तसेच वेगवेगळ्या सहकारी संस्थेच्या कोणत्या पदावर कार्यरत होते. या संदर्भात विचारणा करुन माहिती मिळविली व त्यातून त्यांचा राजकारणातील पूर्वानुभव स्पष्ट होतो.

**तक्ता क्र. ५.९**

**जि. प. सदस्य व पं. स. सदस्यांचे (नेतृत्त्वाचे) पूर्वानुभवानुसार वर्गीकरण**

| पूर्वानुभव | ग्रा. पं. सदस्य | ग्रा. पं. सरपंच | सहकारी संस्था संचालक | सहकारी संस्था चेअरमन | राजकीय पक्ष पदाधिकारी | पूर्वानुभव नसणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ३३ | ३० | ३२ | १० | ४४ | ०२ | १५१ |
| टक्केवारी | २१.८५ | १९.८७ | २१.२० | ६.६२ | २९.१४ | १.३२ | १०० |

तक्ता क्र. ५.९ मध्ये पूर्वानुभवानुसार ग्रामपंचायत, सहकारी संस्था, राजकीय पक्ष पदाधिकारी या अर्थाने वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार २१.८५ टक्के जि. प. सदस्यांना ग्रामपंचायत सदस्य पदाचा पुर्वानुभव आहे. तसेच १९.८७ टक्के जि. प. सदस्यांना ग्रामपंचायत सरपंच पदाचा पूर्वानुभव

असल्याचे दिसून आले. त्यामुळे ग्रामीण भागातील समस्यांची जाण त्यांच्या बोलण्यातून दिसून आली. तसेच सहकारी संस्थांच्या संचालक पदाचा २१.२० टक्के जि. प. सदस्यांना पूर्वानुभव दिसून आला तर सहकारी संस्थेच्या चेअरमन पदाचा ६.६२ टक्के जि. प. सदस्यांना पूर्वानुभव असल्याचे दिसून आले. या अनुभवामुळे जिल्हा परिषदेतील या सदस्यांचे नेतृत्व हे अभ्यासनीय दिसून आले. तर राजकीय पक्ष पदाधिकारी पदाचा अनुभव २९.१४ टक्के जि. प. सदस्यांना दिसून आला तर १.३२ टक्के जि. प. सदस्यांना कुठल्याही संस्थेचा पूर्वानुभव नसल्याचे दिसून आले.

अभ्यासासाठी निवडलेल्या १५१ जि. प. सदस्यांपैकी १४९ जि. प. सदस्यांना जि. प. सदस्य होण्यापूर्वीचा पुर्वानुभव असल्याचे दिसून आले. मात्र १४९ पैकी २१ जि. प. सदस्यांना विविध संस्थांचे संचालक, चेअरमन, राजकीय पक्ष पदाधिकारी पदाचा अनुभव असल्याचे दिसून आले. तर सुरगाणा तालुक्यातील एक व इगतपूरी, दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर या तालुक्यातील प्रत्येकी दोन जि. प. सदस्यांना त्याचप्रमाणे कळवण व बागलाण तालुक्यातील प्रत्येकी तीन जि. प. सदस्यांना विविध संस्थांचे संचालक, चेअरमन, सरपंच, राजकीय पक्षाचे पदाधिकारी या पदांचा अनुभव असल्याचे दिसून आले. त्यामुळे जि. प. तील हे नेतृत्व अभ्यासपूर्ण विकासात्मक दिशेने पाऊल टाकणारे त्या त्या तालुक्यातील एक कार्यक्षम नेतृत्व म्हणून नावारुपास आल्याचे दिसते.

## १०. पक्ष संघटनेतील पदाधिकारी :–

प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या पक्षाची ध्येयधोरणे, विचारप्रणाली जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करतो. त्यासाठी पक्ष संघटना मजबूत असणे आवश्यक असते. पक्ष संघटनेतील पदाधिकारी म्हणून काम करीत असतांना आपल्या पक्षाची ध्येयधोरणे रुजवत असतांना लोकांच्या समस्याही समजतात व त्या समस्या सोडविण्यासाठी पक्षसंघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव महत्त्वाचा ठरतो.

**तक्ता क्र. ५.१०**

**पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभवानुसार वर्गीकरण**

| पदाधिकारी | अनुभव असणारे | अनुभव नसणारे | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ६५ | ८६ | १५१ |
| टक्केवारी | ४३.०५ | ५६.९५ | १०० |

तक्ता क्र. ५.१० मध्ये पक्षसंघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव ४३.०५ टक्के जि. प. सदस्य व पं. स. सभापतींना आहे तर ५६.९५ टक्के जि. प. सदस्य व पं. स. सभापतींना पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव दिसून आला नाही.

यावरुन असे दिसून येते की, पक्ष संघटनेतील पदाधिकारी म्हणून कामाचा ज्या जि. प. सदस्य व पं. स. सभापतींना अनुभव आहे त्यांना ग्रामीण स्तरावरील समस्यांची चांगली जाण दिसून आली. पक्ष संघटनेचे काम करीत असतांना पक्षाची ध्येयधोरणे, विचारप्रणाली ही गावागावात पोहचवित असतांना त्या गावातील, तालुक्यातील समस्या कोणत्या आहेत? त्या समस्या दूर करण्यासाठी नेमके काय केले पाहिजे? यासारखे प्रश्न आदिवासीबहुल तालुक्यातील जि. प. सदस्यांना विचारले असता

काही जि. प. सदस्यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. तसेच पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून काम केल्याच्या अनुभवाचा फायदा जि. प. सदस्य म्हणून काम करीत असतांना मोठ्या प्रमाणात झाल्याचे बहुतांश जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव नसणारे ५६.९५ टक्के जि. प. सदस्य आहेत. त्यापैकी बऱ्याच सदस्यांना तळागाळातील ग्रामीण भागातील समस्यांची जाण पुरेशी नसल्याचे दिसून आले. मात्र यापैकी बहुतांश जि. प. सदस्यांना सहकारी संस्थांचा अनुभव असल्यामुळे त्याचा फायदा त्यांना बऱ्याच प्रमाणात जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून काम करीत असतांना झाल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून आले.

## ११. सहकारी संस्थावर केलेले काम :

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागाला व ग्रामीण तालुक्यांच्या विकासाला चालना देण्याचे काम सहकारी संस्थाच्या माध्यमातून झाले. म्हणून सहकारी संस्थांवर केलेल्या कामामुळे दूरदृष्टी निर्माण होते. तसेच निर्णय घेण्याची क्षमता, ग्रामीण समस्यांची जाणीव निर्माण होऊन त्या समस्यांची सोडवणूक करता येते. सहकारी संस्थांवर जि. प. सदस्य होण्यापूर्वी आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, कळवण, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, बागलाण) जि. प. सदस्यांनी ज्या संस्थेच्या पदावर काम केले आहे त्यांचे वर्गीकरण करण्यात येऊन माहिती मिळविली आहे.

### तक्ता क्र. ५.११

### जि. प. सदस्य व पं. स. सभापती होण्यापूर्वी सहकारी संस्थावर केलेल्या कामानुसार वर्गीकरण

| सहकारी संस्था | विविध कार्यकारी / आदिवासी सेवा सोसा. संचालक | पत संस्था संचालक | पत संस्था चेअरमन | दुध संस्था संचालक | दुध संस्था चेअरमन | कृ. बा. समिती संचाालक | कृ. बा. समिती चेअरमन | सहकारी संस्थावर काम न केलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ४६ | १५ | ०५ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ७५ | १५१ |
| टक्केवारी | ३०.४७ | ९.९३ | ३.३१ | १.९९ | १.३२ | १.९९ | १.३२ | ४९.६७ | १०० |

तक्ता क्र. ५.११ मध्ये जि. प. सदस्यत्व प्राप्त होण्यापूर्वी सहकारी संस्थांवर केलेल्या कामानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये ३०.४७ टक्के जि. प. सदस्यांनी विविध कार्यकारी / आदिवासी सेवा सोसायटीचे संचालक म्हणून काम केले आहे तर पतसंस्था संचालक व पतसंस्था चेअरमन म्हणून अनुक्रमे ९.९३ व ३.३१ टक्के जि. प. सदस्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व चेअरमन पदाची अनुक्रमे १.९९ व १.३२ टक्के जि. प. सदस्यांनी तर दुग्ध संस्था संचालक व चेअरमन पदाची अनुक्रमे १.९९ व १.३२ टक्के जिल्हा परिषद सदस्यांनी या पदाचे काम केल्याचे दिसून आले. त्याचबरोबर ४९.६७ टक्के जि. प. सदस्यांनी जि. प. सदस्य होण्यापूर्वी सहकारी संस्थावर काम केले नसल्याचे दिसून आले.

यावरुन असे दिसून येते की, सहकारी संस्थावर ज्या जि. प. सदस्यांनी जि. प. सदस्य होण्यापूर्वी काम केले आहे. त्यांना ग्रामीण भागातील विशेषतः आदिवासींच्या समस्यांची जाण असल्याचे दिसून आले. तसेच आदिवासी शेतकऱ्यांना सोसायटीच्या व पतसंस्थेच्या माध्यमातून पतपुरवठा करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे आदिवाासीबहुल सात तालुक्यातील बहुतांश जि. प. सदस्यांच्या बोलण्यातून जाणवले व त्यातून जिल्हा परिषदेत काम करतांना अनुभवाचा फार मोठ्या प्रमाणात फायदा झाल्याचे बहुतांश सदस्यांनी बोलून दाखविले. तसेच शेतीमालाला भाव मिळावा व शेतकऱ्यांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करता आल्याचेही दिंडोरी, कळवण, इगतपूरी तालुक्यातील जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. मात्र सहकारी संस्थांवर काम न केलेल्या बहुतांश जि. प. सदस्यांमध्ये आत्मविश्वासाचा व अभ्यासूपणाचा काही प्रमाणात अभाव दिसून आला.

## १२. जिल्हा परिषदेनंतर उच्च स्तरावर (राज्य व राष्ट्रीय स्तरावर) कार्य :

स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीच्या पाठशाळा असून ह्या संस्थांद्वारे राजकीय नेतृत्वाची जडणघडण होते. या संस्थांमध्ये ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटविला आहे अशा नेतृत्वास उच्च पदावर काम करण्याची संधी उपलब्ध होते. १९९० नंतर या संस्थांमधून राज्यपातळीवर नेतृत्व करण्याची संधी अनेक नेत्यांना मिळाली आहे. उदा. हर्षवर्धन पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, आर. आर. पाटील, वसंत डावखरे, मधुकर पिचड, गिरीष बापट, शिवाजीराव मोघे इ. प्रस्तुत संशोधनाद्वारे जिल्हा परिषदेतील नेतृत्वास राज्यपातळीवर अशा उच्चस्तरावर कार्य करण्याची संधी मिळाली आहे का? याचा शोध घेतला आहे.

**तक्ता क्र. ५.१२**

**जिल्हा परिषदेनंतर उच्च स्तरावर (राज्य व राष्ट्रीय स्तरावर) केलेल्या कार्यानुसार वर्गीकरण**

| लिंग | उच्च पदावर काम केलेले | | उच्च पदावर काम न केलेले | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| पुरुष | ०७ | ४.६४ | ८७ | ५७.६१ | ९४ | ६२.२५ |
| स्त्री | -- | -- | ५७ | ३७.७५ | ५७ | ३७.७५ |
| एकूण | ०७ | ४.६४ | १३४ | ९५.३६ | १५१ | १०० |

तक्ता क्र. ५.१२ मध्ये जिल्हा परिषद सदस्यत्वानंतर राज्यपातळीवर काम केलेल्या आणि न केलेल्या सदस्यांनुसार वर्गीकरण केले आहे. संशोधन कालखंडातील १५१ पैकी ०७ जि. प. सदस्यांना उच्च स्तरावर (राज्यस्तरावर) काम करण्याची संधी मिळाली. इगतपूरी तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्यांना (१९९२) जिल्हा स्तरावर चांगले काम केल्यामुळे त्यांना विधानसभा सदस्य

(१९९५) म्हणून संधी मिळाली व याच सदस्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळावर संचालक म्हणून संधी मिळाल्याचे दिसते. तसेच दिंडोरी तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्यांना (२००२) तालुका स्तरावरुन जिल्हा स्तरावर चांगले काम केल्यामुळे ते विधानसभा सदस्य (२००४) म्हणून निवडून आले. एका तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना राज्यस्तरावर कार्य करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले.

तसेच कळवण तालुक्यातील तीन जिल्हा परिषद सदस्यांना राज्यस्तरावर काम करण्याची संधी मिळाल्याचे दिसते. यामध्ये एका सदस्याला पक्षाचे प्रदेश चिटणीस म्हणून तर एका सदस्याला पक्षाचे प्रांतिक सदस्य म्हणून संधी मिळाल्याचे दिसून आले तर एका सदस्याला महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाचे संचालक (२००९) म्हणून संधी मिळाल्याचे दिसून येते. तर हेच जि. प. सदस्य आज पक्षाचे प्रांतिक सदस्य म्हणून देखील कार्यरत आहेत व पेठ तालुक्यातील एका जि. प. सदस्यांनी (१९९७) जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून व सहकार क्षेत्राच्या माध्यमातून चांगले काम करीत असल्यामुळे पक्षाचे प्रांतिक सदस्य म्हणून कार्यरत असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे बागलाण तालुक्यातील एका जि. प. सदस्यांनी (१९९७ ते २००७) या दहा वर्षाच्या कालखंडात जिल्हा स्तरावर उत्तम कार्य केल्यामुळे ते देखील पक्षाचे प्रांतिक सदस्य म्हणून कार्यरत असल्याचे दिसून आले.

त्याचबरोबर सुरगाणा तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्यांना (१९९२) तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर चांगले काम केल्यामुळे त्यांना विधानसभा सदस्य (१९९५) म्हणून संधी मिळाली. तसेच याच सदस्यांना महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळावर संचालक म्हणून देखील संधी मिळाल्याचे दिसून आले. राज्यस्तराबरोरच राष्ट्रीय स्तरावर देखील हे सदस्य लोकसभा सदस्य (२००४ व २००९) म्हणून संधी मिळून या दहा वर्षाच्या कालखंडात ते आज कार्यरत असल्याचे दिसते. मात्र राज्यस्तरावर काम करण्याची एकाही महिलेला संधी मिळाली नाही.

यावरुन असे स्पष्ट होते की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चांगले काम करणाऱ्या नेतृत्वाला उच्च पातळीवर / राज्य स्तरावर काम करण्याची संधी मिळते. त्यासाठी ज्यांना संधी मिळेल अशा प्रत्येक नेतृत्वाने विकास योजनांच्या माध्यमातून आदिवासी सामान्य जनतेवर प्रभाव निर्माण करणे आवश्यक ठरते.

## १३. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वाधिक प्राधान्य दिलेले उपक्रम :

पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने जि. प. च्या माध्यमातून रस्ते, पिण्याचे पाणी, पाणलोट क्षेत्र, शिक्षण, आरोग्य, कृषी, वीज यांसारखे उपक्रम राबवले आहेत. मात्र हे उपक्रम राबवितांना ज्या उपक्रमांवर जिल्हा परिषद सदस्यांनी विशेष भर दिलेला आहे त्यानुसार त्यांचे खालील तक्ता क्र. ५.१३ मध्ये तक्त्यात वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ५.१३**

**जिल्हा परिषद सदस्य व पं. स. सभापतींनी विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य दिलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण**

| पर्याय | रस्ते | पिण्याचे पाणी | पाणलोट क्षेत्र | शिक्षण | आरोग्य | कृषी | वीज | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ३० | २२ | २७ | २१ | २१ | २० | १० | १५१ |
| टक्केवारी | १९.८७ | १४.५७ | १७.८८ | १३.९१ | १३.९१ | १३.२४ | ६.६२ | १०० |

तक्ता क्र. ५.१३ मध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण केले आहे. त्यानुसार १९.८७ टक्के जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाने रस्ते विकासावर भर दिला आहे. त्यात रस्त्यांची डागडुजी करणे, गटात व तालुक्यात रस्ते तयार करणे यासारखे उपक्रम राबविल्याचे दिसते. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका जि. प. सदस्याने सांगितले की, सेझमधून ६ कोटींचा निधी उपलब्ध करुन कोटशी ते ठाणापाडा, बेरवड ते मुलवड, शिरसगांव ते भागओहोड, आडगांव ते गावठा यासारखी ३ कि. मी. अंतराची रस्ते केली. त्यामुळे गांवे जोडली जाऊन विकास होण्यास मदत झाल्याचे बोलून दाखविले. मात्र आरक्षणामुळे पुढील निवडणूक लढविता आली नाही. तालुक्यात आदिवासींची संख्या लक्षणीय, जास्त असतांना देखील आरक्षण धोरणामुळे इतर तालुक्यातील व्यक्ती आर्थिक क्षमतेच्या जोरावर आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा उचलून निवडणूकीत निवडून आल्याचे सांगून गटाच्या विकासाऐवजी इतर तालुक्यात तो निधी वळवून आदिवासी विकासापासून वंचित

राहतांना दिसतो. ही खंत त्यांनी बोलून दाखविली. तसेच कळवण तालुक्यातील जि. प. सदस्यांनी रस्ते जोडणीवर भर असल्याचे सांगून इतर तालुक्यांच्या तुलनेत कळवणचा रस्ते विकासात अग्रक्रम असल्याचे ठासून सांगितले. तसेच कळवण नंतर बागलाण, दिंडोरी व काही प्रमाणात इगतपूरी व त्र्यंबकेश्वरचा विकास दिसून आला. मात्र पेठ व सुरगाणा तालुका रस्ते विकासात काहीसा मागे असल्याचे दिसून आले.

तसेच १४.५७ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने पिण्याच्या पाण्याकडे विशेष लक्ष दिले. जवाहर योजनेतून १०० टक्के अनुदानातून विहिरी खोदून डीआरडीच्या माध्यमातून व जलसंधारणाच्या माध्यमातून वॉटर सप्लाय, बोअरवेल व विहिरी खोदून वीजपंप बसून जि. प. गटात व तालुक्यात पाणी आणल्याचे आदिवासीबहुल तालुक्यातील बहुतांश जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. पेठ तालुक्यातील एका सदस्यांनी पं. स. सभापती असतांना रोजगार हमी योजनेतून आदिवासी शेतकऱ्यांना १८०० विहिरी दिल्याचे सांगून महाराष्ट्रात सर्वात जास्त विहिरी दिल्याचा दावा करुन शासनाकडून अनुदान स्वरुपात वेळेवर रक्कम मिळत नव्हती. त्यावर मात करुन वेळोवेळी पाठपुरावा करुन अनुदान स्वरुपातील पैसे आदिवासी शेतकऱ्यांना मिळवून दिले. मात्र पावसाचे पाणी अडविले जात नसल्यामुळे जमिनीची धुप होऊन सुपिकता नष्ट होते. त्यामुळे बऱ्याच विहिरी पाण्याअभावी कोरड्या असल्याने बऱ्याच आदिवासींचे स्थलांतर होतांना दिसून येते. ही खंत त्यांनी व्यक्त केली. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका सदस्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ४ कोटींचा निधी आपल्या संपूर्ण गटात सुमारे २० गावांना वॉटर सप्लायच्या रुपाने आणून फायदा केल्याचे सांगितले तर कळवण तालुक्यातील एका सदस्याने ३५ पाणीपुरवठा योजना आणल्याचे सांगितले तर बागलाण तालुक्यातील एक महिला सदस्याने पं. स. सभापती असतांना ३६ लाखाची पाणीपुरवठा योजना आणून मोरेनगर व मुंजवाड येथे जलकुंभ बांधल्याचे सांगितले.

पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत कळवण व दिंडोरी तालुका वगळता बागलाण, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी तालुक्यात काही प्रमाणात तर पेठ व सुरगाणा तालुक्यात उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची वाणवा दिसून आली.

तसेच १७.८८ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने पाणलोट क्षेत्र अधिक निर्माण करण्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो. आदिवासीबहुल तालुक्यातील कृषी क्षेत्र अधिकाधिक जलसिंचनाखाली आणण्यासाठी पाझर तलाव, छोटे छोटे बंधारे, सिमेंट प्लग, के. टी. बंधारे बांधल्याचे दिसते. दिंडोरी तालुक्यातील एका जि. प. सदस्यांनी सांगितले की, आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानातून आळंदी धरणातून लिफ्ट योजना आणून पाणलोट क्षेत्र वाढविण्यास मदत केल्याचे बोलून दाखविले. या तालुक्यातील व कळवण तालुक्यातील बहुतांश सदस्यांनी पाणलोट क्षेत्र वाढविण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न केल्याचे दिसून आले. मात्र सुरगाणा व पेठ तालुक्यात कमी अधिक प्रयत्न करुनही पाण्याच्या अभावामुळे प्रयत्नांना यश मिळण्यात अडचण येत असल्याचे तेथील नेतृत्वाने सांगितले तर त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने सांगितले की, आदिवासी विकास विभागाकडून २५ लाखाची योजना आणून पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून ९ ते १० गावांत सिमेंट प्लग बंधारे बांधले. मात्र त्यात सांडवे ठेवले नसल्यामुळे त्याठिकाणी चिखल झाला व पर्यायाने अतिसिंचनामुळे जमिन नापिक झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. याशिवाय बागलाण व इगतपूरी तालुक्यात कमी अधिक प्रमाणात पाणलोट क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

तसेच १३.९१ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने शिक्षण क्षेत्रावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. जिल्हा परिषदेच्या शाळा बांधणे, शाळेची दुरुस्ती, डागडूजी करणे, प्रौढ शिक्षणासारखे उपक्रम राबविणे, प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन करणे इत्यादी उपक्रम जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने राबविल्याचे दिसते. कळवण तालुक्यातील एका जिल्हा परिषद नेतृत्वाने सांगितले की, आदिवासी विद्यार्थ्यांचे जातीचे दाखले शाळेतून मिळवून देण्याचा प्रयत्न केल्यामुळे ही योजना सर्वत्र राबविण्यासाठीची वाटचाल सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र पेठ व सुरगाणा तालुक्यात जि. प. शाळेत शिक्षकांची संख्या कमी असून शिक्षणाकडे विशेष लक्ष केंद्रित नसल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे १३.९१ टक्के जि. प. तील नेतृत्वाने आरोग्य या क्षेत्रावर काही उपक्रम राबविल्याचे दिसते. प्रत्येक गावात ग्रामस्वच्छता अभियान, हगणदारीमुक्त योजना राबविण्यासंदर्भात प्रयत्न केल्याचे दिसून आले. जनतेला आरोग्य सुविधांचा लाभ तत्पर मिळावा याठी जि. प. गटातील काही गावांत प्राथमिक आरोग्य केंद स्थापन केल्याचे आदिवासीबहुल सातही तालुक्यातील बहुतांश

जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. मात्र त्याचबरोबर पेठ व सुरगाणा तालुक्यात आरोग्य केंद्रात औषधांचा अभाव असल्याचे व वेळेवर डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. मात्र त्यात आता सुधारणा केल्याने काही प्रमाणात बदल झाल्याचे काही जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून ज्या योजना राबविल्या जातात. उदा. जननी शिशु सुरक्षा योजना, प्रसवानंद योजना, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना, सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम व मातृत्व अनुदान योजना या योजना इगतपूरी, दिंडोरी, बागलाण, कळवण तालुक्यात राबविण्यासंदर्भात प्रयत्न होत असल्याचे तेथील जि. प. सदस्यांनी सांगितले.

तसेच १३.२४ टक्के जि. प. तील नेतृत्वाने 'कृषी' या क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून आले. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लाभाच्या योजना, शेतीची अवजारे, बियाणे, आदिवासी विकास विभागामार्फत १०० टक्के अनुदानाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत काही प्रमाणात पोहचविल्याचे दिसते. तसेच कृषी विभागामार्फत १०० टक्के अनुदानातून शेतीचे सपाटीकरण केल्याचेही त्या त्या तालुक्यातील जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. कृषी विभागाच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानातून ताडपत्री, प्लॅस्टिक क्रेटस, कडबाकुट्टी यांसारख्या योजना राबविल्याचे बहुसंख्य जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. दिंडोरी तालुक्यातील एका पंचायत समिती सभापतींनी १९८३–८४ साली तत्कालीन खासदारांवर प्रभाव टाकून तालुक्यातील एका गावासाठी दिली जाणारी १०० टक्के अनुदान असणारी कृषी पंढरी योजना ही पिंप्री आँचला या गावी आणण्यात यश मिळवून या योजनेच्या अनुदानातून ६० लाख रुपये खर्च केल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर वीजेसारखा उपक्रम ६.६२ टक्के जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाने राबविलेला दिसतो. कळवण, दिंडोरी, इगतपुरी तालुक्यातील जि. प. सदस्यांनी वीज प्रश्नांसदर्भात चर्चात्मक व आंदोलनात्मक भूमिका घेऊन आपल्या तालुक्यात व गटात ३३ के. व्ही. चे सबस्टेशन मंजूर करुन घेतल्याचे बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे बहुतांश जि. प. सदस्य, पं. स. सभापतींनी रस्ते, पाणी, कृषी, शिक्षण यासारखे उपक्रम राबविल्याचे दिसून आले. मात्र ज्या जि. प. सदस्यांनी ज्या योजना प्रभावीपणे राबविल्या त्या योजनांचा उल्लेख वरील तक्त्यात करण्यात आलेला आहे.

## १४. आदिवासींच्या विकासासाठी राबविलेले विशेष उपक्रम :

केंद्र व राज्य सरकार आदिवासींच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना व उपक्रम राबवित असून काही उपक्रम जि. परिषदेच्या माध्यमातून वा अन्य विभागाच्या माध्यमातून देखील राबविले जातात. आदिवासींच्या विकासासाठी राबविण्यात येणारे जे विशेष उपक्रम आहेत त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यात करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. ५.१४**

**आदिवासींच्या विकासासाठी राबविलेल्या विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण**

| उपक्रम | सामुहिक कन्यादान योजना | ठक्कर बाप्पा योजना | इंदिरा आवास घरकुल योजना | जनसुविधा योजना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | ४४ | ४० | ४१ | २६ | १५१ |
| टक्केवारी | २९.१४ | २६.४९ | २७.१५ | १७.२२ | १०० |

तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये आदिवासींच्या विकासामध्ये राबविलेले विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार २९.१४ टक्के जि. प. तील नेतृत्वाने सामुहिक कन्यादान योजनेच्या माध्यमातून आदिवासींचा सामुदायिक विवाहासारखा उपक्रम राबविल्याचे दिसून आले. हा उपक्रम पेठ, सुरगाणा, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, बागलाण, दिंडोरी या आदिवासीबहुल बहुतांश जि. प. सदस्यांनी कमी अधिक प्रमाणात राबविल्याचे दिसून आले. पेठ तालुक्यातील एका जि. प. सदस्यांनी सांगितले की, १०१ आदिवासी जोडप्यांचा सामुहिक विवाहासारखा उपक्रम राबविल्याने त्यांच्यात आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, प्रेम निर्माण करण्याबरोबरच त्यांना या योजनेअंतर्गत संसारोपयोगी भांडी, मंगळसूत्र दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सुरगाणा तालुक्यातील एका सदस्याने सांगितले की, १००१ आदिवासी जोडप्यांचा सामुहिक विवाह केल्याचे सांगून या विवाह

समारंभात आदिवासी आई वडिलांबरोबरच त्यांच्या मुलांचेही विवाह लावण्यात आले. या योजनेचा परिणाम तालुक्यातील आदिवासी समाज एकसंघ होण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच २६.४९ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत आदिवासी जोडवस्ती रस्ते काँक्रिटीकरण करणे, डांबरीकरण करणे, सभागृह बांधणे, पाणीपुरवठ्याची कामे करणे यासारखे उपक्रम राबविल्याचे आदिवासीबहुल सात तालुक्यातील बहुतांश जिल्हा परिषद सदस्यांनी बोलून दाखविले. इगतपुरी तालुक्यातील एका सदस्याने सांगितले की, पंचायत समिती सभापती असताना तालुक्यात १५ आदिवासी जोडवस्ती रस्ते काँक्रिटीकरण केले व कारकिर्दित ८ गावात सभागृहे बांधल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बागलाण, दिंडोरी कळवण तालुक्यात ही योजना प्रभावीपणे राबविली गेल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे २७.१५ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने इंदिरा आवास घरकुल योजना राबविल्याचे दिसून येते. या योजने अंतर्गत आदिवासी भागात दारिद्र्य रेषेखालील आदिवासी व्यक्तीस बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लाभार्थीस कायमस्वरुपी पक्की घरे बांधण्यासाठी अर्थसहाय्य देऊन घरकुल बांधून त्या आदिवासी व्यक्तीस कायमस्वरुपी निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन दिली असल्याचे आदिवासीबहुल तालुक्यातील बहुतांश जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने बोलून दाखविले. बागलाण तालुक्यातील एका पंचायत समिती सभापतीने सांगितले की, या योजने अंतर्गत आदिवासींना १५० घरे दिली. मात्र इंदिरा आवास घरकुल योजनेचा येणारा निधी पूर्वी ४५ हजार रुपये होता व घरकुलासाठी ६० हजार रुपये खर्च येत असे. १५ हजार रुपये जास्त लागत होते. आज हा निधी वाढवून ७० हजार रुपये येतो. मात्र या व्यतिरिक्त घर, पत्रा, सिमेंट, शौचालये बांधण्यासाठी ३५ ते ४० हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे निधी वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ही योजना कमी अधिक प्रमाणात सातही तालुक्यात राबविली गेल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे १७.२२ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने जनसुविधा योजनेअंतर्गत स्मशानभूमी बांधणे, व त्यांचे नियमन करणे, जमीन सपाटीकरण करणे, विद्युत वाहिनी, पाण्याची सोय, स्मृती उद्यान, ग्रामपंचायत कार्यालय बांधणे व विस्तार करणे, वृक्षारोपण, परिसर सुधारणा केली असल्याचे बहुतांश जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने बोलून दाखविले. कळवण तालुक्यातील एका जिल्हा

परिषद सदस्याने सांगितले की, पंचायत समिती सभापती असताना तालुक्यात जनसुविधा योजने अंतर्गत ३० ग्रामपंचायत कार्यालये आणली व बांधली. त्यामुळे आदिवासींच्या विकासाला हातभार लावल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका जि. परिषदेतील नेतृत्वाने आपल्या गटातील व गटाबाहेर २० ते २२ गावांना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून स्मशानभूमी बांधून विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. तसेच दिंडोरी, इगतपुरी, बागलाण तालुक्यातही ही योजना प्रभावीपणे राबविल्याचे दिसून आले तर पेठ व सुरगाणा तालुक्यात ही योजना राबविण्यासंदर्भात विशेष प्रयत्न दिसून आले नाहीत.

थोडक्यात आदिवासींच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासींचा विकास होण्यास मदत झाल्याचे दिसून येते.

## १५. शासकीय योजनेची अंमलबजावणी :

आदिवासींच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकार विविध प्रकारच्या योजना तयार करीत असते. त्या शासकीय योजनांची अंमलबजावणी शासन स्तराबरोबरच जिल्हा स्तरावर कशा पध्दतीने होते हे बघणे आवश्यक ठरते.

**तक्ता क्र. ५.१५**

**शासकीय योजनांचे अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| योजना | वैयक्तिक लाभाच्या योजना | सार्वजनिक लाभाच्या योजना | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ५२ | ९९ | १५१ |
| टक्केवारी | ३४.४४ | ६५.५६ | १०० |

तक्ता क्र. ५.१५ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांनी व पंचायत समिती सभापतींनी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासकीय योजनांची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार वैयक्तिक लाभाच्या योजना ३४.४४ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने गावपातळीवर, गटात, तालुक्यात राबविल्या आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत पीव्हीसी पाईप पुरविणे, आदिवासी लाभार्थ्यांना घर बांधणीसाठी ४५ हजार रुपये अनुदान देणे, आदिवासी महिलांना शेवया मशीन पुरविणे, ऑईल इंजिन, मंगलोरी कौले, इलेक्ट्रीक मोटार, सौर ऊर्जा, कंदील, महिलांना पीठ गिरणी, ताडपत्री तसेच जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाच्या माध्यमातून सुधारित शेती अवजारे, बैलगाडी, बैलजोडी, पाईपलाईन, पंपसंच, नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, शेततळे, तुषार ठिबक सिंचन संच, तसेच कृषी विभागाच्या माध्यमातून ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना प्लॅस्टिक क्रेटर्स पुरविणे, व जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ७५ टक्के अनुदानातून दुधाळ जनावरे वाटप यांसारख्या योजना आदिवासीबहुल सात तालुक्यातील बहुतांश जि. प. सदस्यांनी राबविल्याचे बोलून दाखविले. सुरगाणा तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्याने ६०० आदिवासी लाभार्थ्यांना

मंगलोरी कौलाचे वाटप, इलेक्ट्रीक मोटार आदि योजना जि. प. च्या माध्यमातून व आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र योजनांच्या अंमलबजावणीबाबत जिल्हा परिषदेत व आदिवासी विकास विभागातील प्रकल्प कार्यालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांकडूनही दिरंगाई झाली. कारण कळवण प्रकल्पाचे अध्यक्ष हे विरोधी पक्षाचे असल्याने अडचणी आल्या. पण योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची संवाद व वारंवार पाठपुरावा, लाभार्थ्यांच्या त्रुटी दूर करुन दिरंगाई का होइना योजना लाभार्थ्यांना मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. अशाच प्रकारचा काहीसा अनुभव बागलाण, पेठ, इगतपुरी, दिंडोरी,कळवण, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील जि. परिषदेतील नेतृत्वाने बोलून दाखविला.

तसेच ६५.५६ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सार्वजनिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी केल्याचे दिसून आले. यामध्ये जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागांतर्गत सिमेंट प्लग बंधारे,गावतळे, साठवण बंधारे, पाझर तलाव, को. प. बंधारे बांधणे तसेच जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागांतर्गत ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती, खडीकरण, डांबरीकरण, नवीन रस्ते, त्यावरील पूल व ठक्कर बाप्पा योजनेतून रस्ते, काँक्रिटीकरण करणे, पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून रस्ते जोडणी करण्याचे काम तसेच जनसुविधा योजनेतून ग्रामपंचायती बांधणे व स्मशानभूमी बांधणे यासारख्या योजना आदिवासीबहुल सात तालुक्यातील बहुतांश जिल्हा परिषद सदस्यांनी राबविल्याचे सांगितले. मात्र त्यात विशेषतः कळवण तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्याने ३० ग्रामपंचायत कार्यालये आणली व ती बांधली. तसेच याच तालुक्यातील बहुतांश जि. प. सदस्यांनी रस्ते विकासावर भर दिल्याचे दिसून आले. तर इगतपुरी, बागलाण, दिंडोरी या तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्यांनी पाझर तलाव, को. प. बंधारे, सिमेंट प्लग बंधारे, गावतळे, रस्ते काँक्रिटीकरण यासारख्या योजना प्रभावीपणे राबविल्याचे दिसून आले. मात्र या योजनांच्या संदर्भात प्रशासकीय स्तरावर दफ्तर दिरंगाई, अधिकाऱ्यांची काही प्रमाणात होणारी टाळाटाळ, मात्र त्यावर मात करुन योजनांची अंमलबजावणी करण्यास भाग पाडल्याचे या तालुक्यातील सदस्याने सांगितले.

थोडक्यात योजनांची माहिती, अभ्यासपूर्ण पाठपुरावा करणाऱ्या तालुक्यातील जिल्हा परिषदेतील नेतृत्वाला यश मिळते तर इतरांना कमी प्रमाणात यश मिळताना दिसून आले.

## १६.   शासकीय योजनांशिवाय अन्य कार्यक्रमांची अंमलबजावणी   :

जिल्हा परिषदेतील नेतृत्व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शासकीय योजनांची अंमलबजावणी करीत असतात. यामध्ये वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण, समाजकल्याण यासारख्या योजनांचा त्यात समावेश होतो. मात्र यापेक्षा वेगळ्या विकास कार्यक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण खालील तक्त्यात केले आहे.

**तक्ता क्र. ५.१६**

**शासकीय योजनांशिवाय अन्य उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| पर्याय | महिला बचत गट | पाणी वापर संस्था | संपूर्ण स्वच्छता अभियान | सार्जनिक आरोग्य | शैक्षणिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ४० | १६ | ३१ | २९ | ३५ | १५१ |
| टक्केवारी | २६.४९ | १०.६० | २०.५३ | १९.२० | २३.१८ | १०० |

तक्ता क्रमांक ५.१६ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकासाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार २६.४९ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने गाव पातळीवर गटात, तालुक्यात, जिल्ह्यात महिला सबलीकरणासाठी महिला बचत गटाची स्थापना केलेली आहे. या बचत गटाच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणून महिलांशी निगडीत असणाऱ्या समस्या व त्यावर कोणत्या शासकीय उपाययोजना आहेत तसेच जि. प. माध्यमातून मिळणारी अनुदाने, शासकीय अनुदाने, विविध उपक्रम या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन महिलांना या बचतगटाच्या माध्यमातून स्वयंरोजगारक्षम कसे करता येईल या दृष्टीने जि. प. नेतृत्वाने प्रयत्न केल्याचे दिसते. तसेच या बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम, सबल करण्याठीचा आपला प्रयत्न असल्याचे बहुतांश महिला जि. प. सदस्यांनी बोलून दाखविला. यात त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका महिला पंचायत समिती सभापतींनी

जि. प. च्या समाजकल्याण विभागांतर्गत योजनेतून बचत गटांना शेवया मशिन तसेच बांबूच्या टोपल्यासाठी अनुदान उपलब्ध करुन (कुटीरोद्योगांसाठी) देवून स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. तसेच दिंडोरी तालुक्यातील एका महिला जि. प. सदस्याने जि. प. महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडरबाबत व आरोग्य व कुटुंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देऊन प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात एक या प्रमाणे प्रबोधन शिबिरे घेण्यासाठी अनेक महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बागलाण, कळवण, इगतपुरी, पेठ, सुरगाणा तालुक्यातही कमी अधिक प्रमाणात अशा प्रकारचे उपक्रम राबविले असल्याचे दिसून आले.

तसेच १०.६० टक्के जि. प. नेतृत्वाने पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून गावाच्या गटाचा, तालुक्याचा विकास करण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचे दिसून आले. ही संस्था / योजना दिंडोरी, इगतपुरी, कळवण तालुक्यात कार्यरत आहे. इगतपुरी तालुक्यातील एका जि. प. सदस्याने ४ पाणी वापर संस्था कार्यरत असून तालुक्यात बहुतांश जमीन खडकाळ, मुरबाड असल्याने जलसिंचनाखालील क्षेत्र अल्प असून उत्पन्न देखील अत्यंत कमी असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. मात्र दिंडोरी तालुक्यातील वाघाड धरणांतर्गत जवळ जवळ २४ पाणी वापर संस्था कार्यरत आहेत. उदा. जगदंबा पाणी वापर संस्थेचे संचालक म्हणून कार्यरत असलेले जि. प. सदस्याने सांगितले की, पूर्वी शासन पाणी वाटप इंरगेशन मार्फत करीत असे. त्यामुळे आता शासनाकडून पाणी न घेता स्वतःच संस्था शेतकऱ्यांना एकरी भाव तासावर ठरवून पाणी वाटप करते. उदा. पूर्वी एका तासाला चार एकराला हजार रुपये शेतकऱ्याला द्यावे लागत होते. आता एका तासाला चार एकराला साधारणतः अडीचशे रुपये शेतकऱ्याला खर्च येतो. थोडक्यात संस्थेचे योग्य नियोजन, पाण्याची काटकसर व व्यवस्थापणामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला व शासनाचाही फायदा होऊन महसुलात पाच पटीने वाढ झाली. पुर्वी शासनाला अंदाजे ४ ते ५ लाख महसूल मिळत असे. आता पाणी वापराच्या योग्य नियोजनामुळे शासनाला अंदाजे २० ते २५ लाख महसूल मिळत आहे व कमी खर्चात, कमी वेळेत शेतकऱ्यांना शेतीला पाणी मिळू लागल्याचे त्यांनी सांगितले.

वाघाड धरणांतर्गत पाणी वापर संदर्भातला हा प्रकल्प जागतिक बँकेने देखील गौरविलेला आहे. या पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने विकास करण्याची

संधी मिळाल्याचे या संस्थाशी निगडीत जि. प. सदस्यांनी बोलून दाखविले. या पाणी वापर संस्थांमुळे बहुतांश कोरडवाहू भाग हा जलसिंचनाखाली आल्याचे दिसून आले. तसेच २०.५३ टक्के जि. परिषदेतील नेतृत्वाने संपूर्ण स्वच्छता अभियान राबविल्याचे सांगितले. या अभियान अंतर्गत कळवण, बागलाण, दिंडोरी, इगतपूरी या तालुक्यात हागणदारीमुक्त गांव, व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यासारखे विशेष उपक्रम राबविल्याचे या तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्याने बोलून दाखविले. विशेष म्हणजे बागलाण तालुक्यातील एका जिल्हा परिषद सदस्याने संपूर्ण स्वच्छता अभियान व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत बागलाण तालुक्यातील किकवारी व चाफ्याचा पाडा या गावांनी वेगळा ठसा उमटविला असून चाफ्याचा पाडा या चिमुकल्या गावाला ग्रामस्वच्छता अभियानाचा राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. सदर गावांची दखल घेत शासनाने मुख्य संसाधन संस्थांचा दर्जा दिला आहे. ही या अभियानाची सर्वात मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता १९.२० टक्के जि. प. सदस्यांनी गावात, तालुक्यात सार्वजनिक आरोग्याविषयी प्रबोधनात्मक विविध उपक्रम राबवून आरोग्य विषयीचे महत्त्व तळागाळातील आदिवासीं जनतेपर्यंत पोहोचवून त्यांच्यातील आरोग्य संदर्भातील एक वेगळी समजूत व त्यांच्यात रुढी परंपरेने चालत आलेली अंधश्रध्दा देखील दूर करण्याचा प्रयत्न आदिवासीबहुल सातही तालुक्यातील बहुतांश जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने केल्याचे दिसून आले.

त्याचबरोबर २३.१८ टक्के जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्यांनी शैक्षणिक बाबतीत शाळेचा दर्जा, शिक्षकांच्या गुणांचा व त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श शाळा पुरस्कार यांसारखे उपक्रम राबविल्याचे दिसून आले. तसेच विद्यार्थी व पालकांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करणारे उपक्रम राबवून शिक्षक विद्यार्थी पालक यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न आदिवासीबहुल सातही तालुक्यात विशेषतः कळवण, दिंडोरी, इगतपूरी, बागलाण या तालुक्यात तर काही अंशी त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा या तालुक्यातील जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून दाखवून दिला.

## १७. जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची अंमलबजावणी बाबतची भूमिकाः

केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून करण्यात येते. तसेच शासकीय अनुदानातून या संस्था अनेक उपक्रम राबवित असतात. विकास योजनांच्या लाभार्थींची निवड शासकीय निकषानुसार केली जाते व प्रशासनाच्या माध्यमातून अंमलबजावणी केली जाते. मात्र या शासकीय योजनांची अंमलबजावणी समाधानकारक होत नसल्याची भावना व्यक्त होताना दिसते. याबाबत या अंमलबजावणीवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणाऱ्या जि. प. सदस्याची भूमिका महत्त्वाची ठरते.

**तक्ता क्र. ५.१७**

**जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची अंमलबजावणी बाबतच्या भूमिकेनुसार वर्गीकरण**

| पर्याय | नावापुरती होते | साधारणतः होते | पूर्ण क्षमतेने होते | एकूण |
|---|---|---|---|---|
| संख्या | २६ | ८४ | ४१ | १५१ |
| टक्केवारी | १७.२२ | ५५.६३ | २७.१५ | १०० |

तक्ता क्र. ५.१७ मध्ये जि. परिषदेच्या विकास योजनांच्या अंमलबजावणीनुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, १७.२२ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाच्या मते जि. प. च्या विकास योजनांची अंमलबजावणी नावापुरतीच होते. प्रामुख्याने विकास योजनांच्या अंमलबजावणीचे ध्येय साकार करण्याचे (उद्दिष्ट्य / लक्ष पूर्ण करणे) यास महत्त्व दिले जाते. तसेच ५५.६३ टक्के जिल्हा परिषदेच्या नेतृत्वामध्ये जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची अंमलबजावणी साधारणतः होते. मात्र या सर्व योजनांची अंमलबजावणी विचारात घेता निम्म्याहून अधिक विकास योजना यशस्वीरित्या राबविल्या जातात. त्याचप्रमाणे २७.१५ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाच्या मते पूर्ण क्षमतेने जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची अंमलबजावणी केली जाते.

वरील विश्लेषणातून असे दिसून येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजना पूर्ण क्षमतेने यशस्वीरित्या राबविल्या जात नाहीत. प्रामुख्याने अंमलबजावणीवर देखरेख ठेवणारे नेतृत्व कार्यक्षम असेल अशा भागातील / तालुक्यातील योजना योग्य पध्दतीने राबविल्या जातात तर अन्य ठिकाणी त्यास साधारण यश मिळाल्याचे दिसून येते. यावरुन असे स्पष्ट होते की, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांच्या अंमलबजावणीचे यशापयश प्रशासनाबरोबरच राजकीय नेतृत्वावरही अवलंबून असल्याचे दिसते.

## १८. आदिवासी समाजात जागृती निर्माण करणारे उपक्रम :

जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्याबरोबरच प्रबोधनात्मक उपक्रम, कृषीविषयक उपक्रम, शिक्षण, साक्षरता उपक्रम यांसारखे आदिवासी समाजात जागृती निर्माण करणारे उपक्रम देखील राबविलेले आहेत. या उपक्रमांचे खालील तक्त्यात वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ५.१८**

**आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| उपक्रम | प्रबोधनात्मक उपक्रम | कृषीविषयक उपक्रम | शिक्षण | साक्षरता उपक्रम | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | ४६ | ३४ | ३६ | ३५ | १५१ |
| टक्केवारी | ३०.४६ | २२.५२ | २३.८४ | २३.१८ | १०० |

तक्ता क्र. ५.१८ मध्ये आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांच्या अंमलबजावणीनुसार वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार ३०.४६ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाने डोंगऱ्यादेव माऊल्या या उत्सवाच्या माध्यमातून प्रबोधन होण्यापूर्वी हरिनाम सप्ताह, भारुडे याद्वारे लोकप्रबोधन करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. तसेच तालुक्यातील, गटातील प्रत्येक गांव हागणदारीमुक्त होण्याच्यादृष्टीने आदिवासी जनतेत जागृती करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. क्रिडा मंडळाची स्थापना, सत्संग, स्वाध्याय यांसारख्या उपक्रमाबरोबरच आरोग्य तपासणी शिबीरे व व्यायामशाळा बांधून युवकांमध्ये आरोग्यासंदर्भात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे बहुतांश तालुक्यात दिसून आले. तसेच दारुबंदी, व्यसनमुक्ती अभियानासारखे उपक्रम राबवून आदिवासी जनतेत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न आदिवासीबहुल सातही तालुक्यात कमी अधिक प्रमाणात झाल्याचे दिसून आले. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका जि. प. सदस्याने शेषराव महाराजांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती मेळावा आयोजित करुन या मेळाव्याला तालुका व लगतच्या तालुक्यातून १ ते १.५० लाख आदिवासी समाज उपस्थित असल्याचे सांगून या मेळाव्याचा परिणाम ५० टक्के समाज व्यसनमुक्त झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. याच तालुक्यातील त्र्यंबकेश्वर पं. स. च्या पहिल्या महिला सभापतींनी कन्यादान योजना, आदिवासी जनजागृती सप्ताह व पारंपारिक लोकनृत्य कला याद्वारे जनतेत प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून त्याचा परिणाम समाज एकसंघ होण्यात, लोकनृत्यामुळे संस्कृतीचे जतन करण्यात तसेच जनजागृती सप्ताहामुळे आदिवासी योजनांची माहिती तालुक्यांतील आदिवासी जनतेला मिळाली असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच कळवण तालुक्यातील एका जि. प. सदस्यांनी आदिवासी बहुतांश महिला मिस्त्री लावत त्यामुळे या संदर्भात मोठ्या प्रमाणात शिबीरे आयोजित करुन काही प्रमाणात यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सुरगाणा व बागलाण तालुक्यातील काही सदस्यांनी लिंग भेदाच्या संदर्भात जनतेत प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे जागृती करुन समाजात नवा आत्मविश्वास निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच २२.५२ टक्के जिल्हा परिषद सदस्यांनी कृषीविषयक उपक्रमांची अंमलबजावणी केल्याचे दिसते. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची शेती करण्याबरोबरच झाडे लावा, झाडे जगवा व सामाजिक वनीकरणासारखे उपक्रम राबवून कृषीविषयक आदिवासी जनतेत जागृती निर्माण करण्याचा

प्रयत्न बहुतांश तालुक्यातून केल्याचे दिसून आले. कळवण, बागलाण, दिंडोरी, इगतपूरी या तालुक्यात कृषी मेळावे देखील आयोजित करुन जनतेला कृषीविषयक प्रबोधन केल्याचे या तालुक्यातील जि. प. नेतृत्वाने बोलून दाखविले. मात्र दिंडोरी तालुक्यातील जि. प. तील नेतृत्वाने अशा पध्दतीचा मेळावा आयोजित करुन त्यात आधुनिकतेची कास धरून शेतीसाठी आवश्यक बी–बीयाणे, माहिती व एकरी उत्पादन वाढविण्यासाठी मार्गदर्शन करुन कृषी विषयीचा / शेती विषयीचा आत्मविश्वास आदिवासी जनतेत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. व या नेतृत्वाने सन १९९५ साली राज्यस्तरीय शेतीनिष्ठ पुरस्कार तत्कालिन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांच्या हस्ते प्रदान झाल्याचे बोलून दाखविले.

त्याचबरोबर २३.८४ टक्के जि. प. सदस्यांनी शिक्षणासंदर्भात आदिवासी समाजात जागृती केल्याचे दिसून आले. वाड्यांतील जनसामान्यांमध्ये शैक्षणिक जागृती करण्यासाठी शैक्षणिक शिबीरे, विविध शैक्षणिक उद्‌बोधन कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम आदिवासीबहुल तालुक्यातील बहुतांश जि. प. सदस्यांनी केल्याचे बोलून दाखविले.

तसेच २३.१८ टक्के जिल्हा परिषद सदस्यांनी साक्षरता सारखा महत्त्वाचा उपक्रम राबविल्याचे दिसते. आदिवासी सामान्य जनता साक्षर होण्यासाठी जि. प. नेतृत्वाने जि. प. च्या माध्यमातून गावात, गटात व त्या त्या तालुक्यात प्रौढ शिक्षणासारखे उपक्रम राबविल्याचे दिसून आले. तसेच सण, उत्सव व मेळाव्याच्या माध्यमातून गावात, गटात, तालुक्यात साक्षरतेसंदर्भात सार्वजनिक व सांस्कृतिक स्वरुपाचे कार्यक्रम राबवून काही प्रमाणात साक्षरता मोहिम यशस्वी करण्याचा प्रयत्न आदिवासीबहुल तालुक्यातील दिंडोरी, कळवण, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, बागलाण या तालुक्यात व पेठ व सुरगाणा तालुक्यात काही अंशी जि. प. सदस्यांनी केलेला दिसून आला.

## १९. निर्णय प्रक्रियेतील सहभाग

प्रातिनिधीक लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदविणे अपेक्षित असते. यामध्ये आरक्षण धोरणामुळे एक नवा आयाम प्राप्त झाला आहे. आरक्षण धोरणाच्या माध्यमातून अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग व महिला या निर्णय प्रक्रियेपासून वंचित असलेल्या घटकांना निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधी प्राप्त झाली. प्रामुख्याने स्त्री–पुरुष या दोन घटकाच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागाची तुलना करणे आवश्यक ठरते.

**तक्ता क्र. ५.१९**

**निर्णय प्रक्रियेतील सहभागानुसार वर्गीकरण**

| निर्णय प्रक्रियेतील सहभाग | नाममात्र सहभाग | | सर्वसाधारण सहभाग | | सक्रिय सहभाग | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| स्त्री | १० | ६.६२ | २७ | १७.८८ | १८ | ११.९२ | ५५ | ३६.४२ |
| पुरुष | ०३ | १.९९ | १३ | ०८.६१ | ८० | ५२.९८ | ९६ | ६३.५८ |
| एकूण | १३ | ८.६१ | ४० | २६.४९ | ९८ | ६४.९० | १५१ | १०० |

तक्ता क्र. ५.१९ मध्ये निर्णय प्रक्रियेतील सहभागानुसार वर्गीकरण केले आहे. त्यानुसार ८.६१ टक्के जिल्हा परिषदेतील नेतृत्वाचा सहभाग नाममात्र असल्याचे दिसून येते. यामध्ये ६.६२ टक्के स्त्रीया व १.९९ टक्के पुरुष नेतृत्वाचा समावेश दिसून येतो.

तसेच २६.४९ टक्के जि. प. तील नेतृत्वाचा सहभाग हा सर्वसाधारण दिसून येतो. म्हणजे हे नेतृत्व मोजक्याच निर्णयाच्या वेळी सहभागी होते. यामध्ये १७.८८ टक्के स्त्रीया व ८.६१ टक्के पुरुषांचा समावेश होतो.

त्याचप्रमाणे ६४.९० टक्के जि. परिषदेतील नेतृत्व जिल्हा परिषदेतील निर्णय प्रकियेत सहभागी असल्याचे दिसून येते. यामध्ये ११.९२ टक्के स्त्रीया तर ५२.९८ टक्के पुरुष नेतृत्वाचा समावेश झाल्याचे दिसते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, आरक्षण धोरणाच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचा राजकीय नेतृत्व उपयोग करुन घेताना दिसते. पूर्वीच्या प्रस्थापित नेतृत्वाऐवजी सामान्य स्तरातून आलेले नेतृत्व सामान्य आदिवासी जनतेच्या विकासाबाबत जागरुक झालेले आहे. निर्णय प्रक्रियेत लोकप्रतिनिधींनी घेतलेला सहभाग हा लोकशाहीस पोषक असल्याचे जाणवते. विशेषतः पुरुषांबरोबर संख्येने अल्प का होईना महिलांची निर्णय प्रक्रियेतील सक्रिय सहभागाची सुरुवात समाधानकारक वाटते.



# प्रकरण सहावे

# विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या योगदानाचे विश्लेषण

# प्रकरण सहावे

# विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या योगदानाचे विश्लेषण

## प्रस्तावना :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर सामाजिक विषमतेचे मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलण्याची जबाबदारी भारतीय राज्यघटनाकर्त्यांनी स्विकारुन भारतीय समाजातील जे वंचित व आदिवासी घटक आहेत. त्या घटकाला विकासात्मक व राजकीय प्रवाहात आणण्याचे काम राज्यघटनाकर्त्यांनी करुन भारतीय लोकशाहीला बळकट करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. त्या अनुषंगाने भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून लोकसभा निवडणूकीत व त्या त्या घटकराज्याच्या विधानसभा निवडणूकीत आदिवासी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा निर्माण करण्यात आल्या व त्यातून आदिवासींच्या विकासाला चालना मिळण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात विधानसभा व लोकसभेच्या राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असल्याने प्रस्तुत संशोधनात विधानसभा व लोकसभा नेतृत्वाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती, पुरुष व महिला नेतृत्व, नेतृत्वाच्या माध्यमातून राबविलेले विकासाचे कार्यक्रम व त्याद्वारे आदिवासी समाजाचा विकास कितपत झाला. याबाबतचा अभ्यास करण्यात आला आहे.

आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाविषयी अभ्यास करीत असतांना नाशिक जिल्हा एक विशेष अभ्यास निश्चित करुन नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) विधानसभा व लोकसभा सदस्यांची निवड केली. सन १९९५ ते २०१२ या कालखंडात विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य म्हणून काम केलेल्या लोकप्रतिनिधींकडून निरिक्षण, प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहिती मिळविली.

सन १९९५ ते २०१२ या कालखंडात एकूण २७ विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांपैकी एका विधानसभा सदस्याला सलग चारवेळा निवडून येण्याची संधी मिळाली असून दोन विधानसभा व दोन लोकसभा सदस्यांना दोन वेळा निवडून येण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले. मात्र यापैकी एक लोकसभा सदस्य मयत असून एका लोकसभा सदस्याला विधानसभा सदस्य म्हणून यापूर्वी निवडून येण्याची संधी मिळाली होती. त्याचबरोबर एक विधानसभा सदस्य व दोन लोकसभा सदस्य मयत असल्याने उर्वरित १५ विधानसभा व लोकसभा सदस्यांशी प्रत्यक्ष भेटून माहिती मिळविली व या सर्व विधानसभा व लोकसभा सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले आहे.

तसेच सन २००९ च्या लोकसभा व विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल पाच विधानसभा मतदारसंघाचे चार विधानसभा मतदारसंघात रुपांतर करण्यात आले असून आदिवासींचा एक विधानसभा मतदारसंघ कमी करण्यात आल्याचे दिसून आले तर मालेगांव आदिवासी लोकसभा मतदारसंघाचे दिंडोरी आदिवासी लोकसभा मतदारसंघात रुपांतर करण्यात आले असून नाशिक लोकसभा मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी तयार करण्यात आला असून या मतदार संघात त्र्यंबकेश्वर व इगतपूरी या आदिवासी तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून प्रश्नावली तयार करण्यात आली व प्रश्नावलीच्या आधारे व मुलाखतीच्या आधारे मिळालेली माहिती, गृहितके तपासण्यासाठी उपयोगात आणली. गृहितके तपासतांना पुढीलप्रमाणे विश्लेषण केले आहे.

## १)   विधानसभा सदस्यांचा कालखंड :–

१९९५ ते २०१२ या कालखंडातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) तालुक्यातील मतदारसंघनिहाय सर्व विधानसभा सदस्यांची संशोधनासाठी निवड केली आहे.

**तक्ता क्र. ६.१**

**विधानसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | विधानसभा मतदारसंघाचे नांव | कालखंड | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५ ते १९९९ | | १९९९ ते २००४ | | २००४ ते २००९ | | २००९ ते २०१२ | | | |
| | | संख्या | टक्के वारी | संख्या | टक्के वारी | संख्या | टक्के वारी | संख्या | टक्के वारी | संख्या | टक्के वारी |
| १ | दिंडोरी | ०२ | ३३.३३ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | -- | -- |
| | दिंडोरी–पेठ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०५ | २५ |
| २ | सुरगाणा–पेठ | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | -- | -- |
| | त्र्यंबकेश्वर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | १५ |
| ३ | इगतपूरी | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | -- | -- |
| | इगतपूरी–त्र्यंबकेश्वर | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०४ | २० |
| ४ | कळवण | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | -- | -- | -- | -- |
| | कळवण–सुरगाणा | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | २५ | ०४ | २० |
| ५ | बागलाण | ०१ | १६.६७ | ०१ | २० | ०१ | २० | ०१ | २५ | ०४ | २० |
| | **एकूण** | **०६** | **१००** | **०५** | **१००** | **०५** | **१००** | **०४** | **१००** | **२०** | **१००** |

तक्ता क्र. ६.१ मध्ये कालखंडानुसार १९९५ ते १९९९, १९९९ ते २००४, २००४ ते २००९, २००९ ते २०१२ असे कालखंडनिहाय वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, १९९५ ते १९९९ या कालखंडात दिंडोरी विधानसभा मतदारसंघात ३३.३३ टक्के सदस्यांना विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी मिळाली तर सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, बागलाण विधानसभा मतदार संघात प्रत्येकी १६.६७ टक्के सदस्यांना विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून येते.

तर १९९९ ते २००४ या कालखंडात दिंडोरी विधानसभा मतदारसंघात २० टक्के विधानसभा सदस्य निवडून आले तर सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, बागलाण या विधानसभा मतदार संघात प्रत्येकी २० टक्के विधानसभा सदस्य निवडून आले.

तसेच २००४ ते २००९ या कालखंडात दिंडोरी विधानसभा मतदार संघात २० टक्के विधानसभा सदस्य निवडून आले तर सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, कळवण, बागलाण या विधानसभा मतदार संघात प्रत्येकी २० टक्के विधानसभा सदस्य निवडून आले.

त्याचप्रमाणे २००९ ते २०१२ या कालखंडात दिंडोरी–पेठ विधानसभा मतदार संघात २५ टक्के विधानसभा सदस्य निवडून आले तर इगतपूरी–त्र्यंबकेश्वर, कळवण–सुरगाणा, बागलाण या विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी २५ टक्के विधानसभा सदस्य निवडून आल्याचे दिसून आले.

वरील तक्त्यात असे दिसून येते की, चारही कालखंडाचा विचार केला असता दिंडोरी विधानसभा मतदारसंघात २५ टक्के लोकप्रतिनिधींना विधानसभा सदस्य म्हणून नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे तर इगतपूरी, कळवण व बागलाण विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी २० टक्के लोकप्रतिनिधींना विधानसभा सदस्य म्हणून नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे तर सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघात १५ टक्के लोकप्रतिनिधींना विधानसभा सदस्य म्हणून नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले. मात्र १९९५ ते १९९९ या कालखंडात दिंडोरी विधानसभा मतदारसंघात निर्वाचीत विधानसभा सदस्य मयत झाल्यामुळे नव्याने पोटनिवडणूक झाल्यामुळे दिंडोरी विधानसभा मतदारसंघातील विधानसभा सदस्यांची संख्या वाढली. त्यामुळे इतर विधानसभा मतदारसंघापेक्षा या मतदार संघातील लोकप्रतिनिधींना नेतृत्व करण्याची संधी अधिकची मिळाल्याचे दिसून आले तर २००९ च्या विधानसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर हा विधानसभा मतदारसंघ कमी करण्यात आल्यामुळे सुरगाणा तालुका कळवण विधानसभा मतदारसंघाला जोडण्यात आला तर पेठ तालुका दिंडोरी विधानसभा मतदारसंघाला तर त्र्यंबकेश्वर तालुका इगतपूरी मतदारसंघाला जोडला गेल्यामुळे या मतदार संघातील लोकप्रतिनिधींना नेतृत्व करण्याची संधी कमी झाल्याचे दिसून आले.

## २. लोकसभा सदस्यांचा कालखंड :–

१९९५ ते २०१२ या कालखंडातील नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित जमाती (आदिवासी) साठी राखीव मतदार संघातील सर्व सदस्य संशोधनासाठी निवडले आहेत.

### तक्ता क्र. ६.२

### लोकसभा सदस्यांच्या कालखंडानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | लोकसभा मतदार संघाचे नांव | कालखंड | | | | | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५ ते १९९९ | | | | | | १९९९ ते २०१२ | | | | | | | |
| | | ११९१ ते १९९६ | | १९९६ ते १९९८ | | १९९८ ते १९९९ | | १९९९ ते २००४ | | २००४ ते २००९ | | २००९ ते २०१४ | | | |
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १ | मालेगांव | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | | | ०५ | ७१.४२ |
| २ | दिंडोरी | | | | | | | | | | | ०१ | ५० | ०१ | १४.२९ |
| ३ | नाशिक | | | | | | | | | | | ०१ | ५० | ०१ | १४.२९ |
| | एकूण | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०१ | १०० | ०२ | १०० | ०७ | १०० |

तक्ता क्र. ६.२ मध्ये कालखंडानुसार १९९५ ते १९९९, १९९९ ते २००४, २००४ ते २००९, २००९ ते २०१२ असे कालखंडनिहाय वर्गीकरण केले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, १९९५ ते १९९९ या कालखंडात तीन वेळा लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्यानुसार १९९१ ते १९९६, १९९६ ते १९९८ व १९९८ ते १९९९ या तीनही लोकसभा निवडणूकीत नाशिक जिल्ह्यातील मालेगांव लोकसभा मतदारसंघातून १०० टक्के लोकसभा सदस्य निवडून आल्याचे दिसते. तर १९९९ ते २००४, २००४ ते २००९ या दोन्हीही कालखंडात नाशिक

जिल्ह्यातील मालेगांव लोकसभा मतदार संघातून १०० टक्के लोकसभा सदस्य निवडून आल्याचे दिसून आले तर २००९ ते २०१२ या कालखंडात नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी व नाशिक या लोकसभा मतदार संघातून ५० टक्के लोकसभा सदस्य निवडून आल्याचे दिसून येते.

वरित तक्त्यावरुन असे दिसून येते की, मालेगांव लोकसभा मतदारसंघातून सर्वाधिक जास्त ७१.४२ टक्के प्रतिनिधींना लोकसभा सदस्य होण्याची संधी मिळाली तर दिंडोरी व नाशिक लोकसभा मतदार संघातून प्रत्येकी १४.२९ टक्के प्रतिनिधींना लोकसभा सदस्य होण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले. मात्र २००९ च्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार मालेगाव आदिवासी लोकसभा मतदारसंघ रद्द करण्यात येवून त्याऐवजी दिंडोरी आदिवासी लोकसभा मतदारसंघाची निर्मिती झाल्यामुळे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात लोकसभा सदस्य म्हणून नेतृत्व करणाऱ्यांची संख्या ही मालेगांव लोकसभा मतदारसंघातील नेतृत्व करणाऱ्या लोक प्रतिनिधींच्या संख्येपेक्षा कमी असल्याचे दिसून येते तर याच पुनर्रचनेत नाशिक लोकसभा मतदारसंघात त्र्यंबकेश्वर व इगतपूरी या आदिवासी तालुक्यांचा समावेश केल्यामुळे या मतदारसंघातील नेतृत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीची संख्या ही मालेगांव लोकसभा मतदारसंघातील नेतृत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीपेक्षा तक्ता क्र. ६.२ प्रमाणे कमी असल्याचे दिसून आले.

## ३. विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे आरक्षण :

आरक्षणामुळे समाजातील सर्व जाती धर्मातील स्त्री–पुरुषांना राजकारणात सक्रीय सहभागाची व समाजाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे हे पुढील तक्त्यावरुन स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. ६.३**

**विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे आरक्षणानुसार वर्गीकरण**

| आरक्षण | अनु. जाती | | अनु. जमाती | | इतर मागास वर्ग | | सर्वसाधारण | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| पुरुष | – | – | १३ | ९२.८६ | – | – | ०१ | १०० | १४ | ९३.३३ |
| महिला | – | – | ०१ | ०७.१४ | – | – | – | – | ०१ | ०६.६७ |
| एकूण | – | – | १४ | १०० | – | – | ०१ | १०० | १५ | १०० |

तक्ता क्र. ६.३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १५ विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे आरक्षणानुसार वर्गीकरण केले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, अनु. जाती व इतर मागासवर्गाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाले नसून अनु. जमातीतील पुरुषांना ९२.८६ टक्के व महिलांना ७.१४ टक्के आरक्षण मिळाल्याचे दिसून आले. तर सर्वसाधारण वर्गातील पुरुषांना १०० टक्के आरक्षण मिळाले असून या सर्वसाधारण जागेवर इतर मागासवर्गातील माळी समाजाच्या प्रतिनिधींना नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले. सर्वसाधारण वर्गातील महिलांना मात्र प्रतिनिधीत्व मिळाले नाही.

वरील तक्त्यावरुन हेच स्पष्ट होते की, नाशिक जिल्ह्यातील सात आदिवासीबहुल तालुक्यातील अनु. जमातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे याच जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाल्याचे दिसून आले. इतर घटकांना आरक्षण मिळाले नाही. मात्र एका जागेवर सर्वसाधारण वर्गाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाल्याचे दिसून आले.

## ४. जातवार विश्लेषण :

भारतीय राजकारणावर प्रभाव पाडणारा घटक म्हणजे 'जात' होय. ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत 'जात' हा घटक प्रभावी राहिलेला आहे. त्यास राज्य व केंद्र स्तरावरील राजकारण अपवाद राहिलेले नाही.

### तक्ता क्र. ६.४

### आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातवार विश्लेषण

| जाती गट | अनु. जाती | | | अनुसूचित जमाती | | | | | | इतर मागास प्रवर्ग | | | | सर्वसाधारण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पोटजात | महार | नव बौध्द | एकूण | हि. महादेव कोळी | हिंदू-कोकणा | भिल्ल | हि. महादेव ठाकूर | हिंदू-वारली | एकूण | माळी | कुणबी | तेली | एकूण | मराठा | इतर | एकूण | एकूण |
| संख्या | – | – | – | ०३ | ०६ | ०३ | ०२ | – | १४ | – | – | – | – | – | १ | १ | १५ |
| टक्केवारी | – | – | – | २०.०० | ४० | २० | १३.३३ | – | ९३.३३ | – | – | – | – | – | – | ६.६७ | १०० |

तक्ता क्र. ६.४ मध्ये आरक्षणानुसार मात्र प्रत्यक्ष जातीनुसार असलेल्या प्रमाणानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, अनुसूचित जमातीला ९३.३३ टक्के आरक्षण मिळालेले आहे. अनुसूचित जमातीतील हिन्दू कोकणा या घटकाला ४० टक्के व हिन्दू महादेव कोळी या घटकाला २० टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. तसेच हिन्दू भिल्ल या घटकाला २० टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. तर हिंन्दू ठाकूर या घटकाला १३.३३ टक्के नेतृत्व करण्याची संधी मिळाली असल्याचे दिसून आले.

इतर मागास प्रवर्ग व अनु. जातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळालेले नसून सर्वसाधारण वर्गात इतर या घटकांमधून माळी या इतर मागास वर्गातील घटकाला सर्वसाधारण वर्गातून नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले.

वरील माहितीवरुन असे दिसून येते की, लोकसंख्येच्या प्रमाणात अनु. जमातीला आरक्षण मिळाले आहे तर लोकसंख्येच्या प्रमाणानुसार एका जागेवर सर्वसाधारण वर्गातून इतर मागास प्रवर्गातील माळी या घटकाला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. थोडक्यात, नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सातही तालुक्यात अनु. जमातीचेच वर्चस्व व आरक्षण आजही कायम दिसून येते.

## ५. आर्थिक परिस्थितीनुसार वर्गीकरण :

व्यक्तीचा समाजात व राजकारणात प्रभाव निर्माण करणारा घटक म्हणजे व्यक्तीचे उत्पन्न होय. व्यक्तीच्या जीवनात आर्थिक हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण समजला जातो. उत्पन्नाच्या आधारे व्यक्तीचा समाजातील दर्जा निश्चित होत असतो. जीवनातील अनेक पैलूंवर आर्थिक परिस्थितीचा म्हणजे उत्पन्नाचा प्रभाव दिसून येतो. त्यापासून राजकीय क्षेत्र देखील अपवाद नाही. राजकीय क्षेत्रात तर सत्ता व संपत्ती एकत्रच नांदतात असे म्हणतात. या अनुषंगाने विचार करुन विधानसभा व लोकसभा सदस्यांचा उत्पन्नाचा आढावा घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ६.५**

**विधानसभा व लोकसभा सदस्यांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण**

| आर्थिक परिस्थिती | बरी | मध्यम | चांगली | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उत्पन्न | वार्षिक उत्पन्न ५,००,००० पर्यंत | वार्षिक उत्पन्न २५,००,००० पर्यंत | वार्षिक उत्पन्न २५,००,००० पेक्षा जास्त | |
| संख्या | -- | ०४ | ११ | १५ |
| टक्केवारी | -- | २६.६७ | ७३.३३ | १०० |

तक्ता क्र. ६.५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १५ विधानसभा व लोकसभा सदस्यांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण केले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, ज्यांचे वार्षिक उत्पन्न ५,००,००० पर्यंत आहे अशा सदस्यांची वर्गवारी बरी या वर्गात केली आहे. मात्र असा एकही विधानसभा वा लोकसभा सदस्यांची या वर्गवारीत समावेश झालेला दिसत नाही. मात्र ज्यांचे उत्पन्न २५,००,००० पर्यंत आहे अशा लोकसभा व विधानसभा सदस्यांची वर्गवारी मध्यम वर्गीयांत केलेली आहे. मध्यम वर्गीयातील विधानसभा सदस्यांचे प्रमाण २६.६७ टक्के आहे. या वर्गवारीतील दिंडोरी विधानसभा मतदारसंघातील एका विधानसभा सदस्याने लोकवर्गणीतून निवडणूक लढवून निवडून आल्याचे सांगितले. या वर्गवारीतील सदस्यांचा राजकीय सहभाग वाढलेला दिसत असून लोकप्रियतेच्या जोरावर नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले.

तसेच ७३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. ज्यांचे उत्पन्न २५,००,००० पेक्षा जास्त आहे अशा विधानसभा व लोकसभा सदस्यांचा राजकीय सहभाग व नेतृत्व करण्याची क्षमता ही सर्वात जास्त असल्याचे दिसून आले.

यावरुन असे दिसून येते की, सधन कुटुंबातील व्यक्तीचा / सदस्यांचा राजकीय सहभाग सर्वात जास्त आहे. कारण आर्थिक घटकांचा राजकीय प्रक्रियेवर फार प्रभाव पडतो.

## ६. विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे व्यावसायिक विश्लेषण :

सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करीत असणारी प्रत्येक व्यक्ती कुठल्यातरी व्यवसायात कार्यरत असते. त्या अनुषंगाने केंद्र व राज्य स्तरावर काम करणाऱ्या विधानसभा व लोकसभा सदस्यांचे व्यावसायिक विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

**तक्ता क्र. ६.६**

**विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे व्यवसायानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| व्यवसाय / आर्थिक स्थिती | शेती | | व्यवसाय | | नोकरी / इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| गरीब | – | – | – | – | – | – | – | – |
| मध्यम | (०४) | २६.६७ | – | – | – | – | ०४ | २६.६७ |
| श्रीमंत | (०७) | ४६.६६ | (०४) | २६.६७ | – | – | ११ | ७३.३३ |
| एकूण | ११ | ७३.३३ | ०४ | २६.६७ | – | – | १५ | १०० |

तक्ता क्र. ६.६ मध्ये व्यवसायानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, ७३.३३ टक्के विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य हे शेती व्यवसाय करतात. त्यात २६.६७ टक्के विधानसभा सदस्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेती व्यवसायासाठी घेतलेला दिसतो. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती मध्यम स्वरुपाची आहे. तसेच ४६.६६ टक्के विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे शेती क्षेत्र हे बागायती स्वरुपाचे दिसून आले. त्यात ऊस, द्राक्षे, डाळींब, कांदा,

भाजीपाला, भात यासारखे शेती उत्पादन घेतले जात असल्यामुळे व त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता हे सदस्य सधन व श्रीमंत आहेत. बागलाण तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करीत असल्यामुळे त्यांच्या एकरी उत्पादनात वाढ झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. तसेच कळवण व दिंडोरी विधानसभा सदस्यांनी देखील शासनाच्या विविध योजनांचा वापर करुन मुबलक पाणी पुरवठ्याबरोबरच आधुनिक शेतीची कास धरुन एकरी उत्पादन वाढविण्यात यश मिळविल्याचे सांगितले.

त्याचप्रमाणे २६.६७ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्य हे गॅस पुरवठा एजन्सी, कॉन्ट्रॅक्टर, पेट्रोल पंप व उपहारगृह यांसारख्या व्यवसायात गुंतल्याचे दिसून आले. यामध्ये बागलाण, दिंडोरी व त्र्यंबकेश्वर–इगतपूरी तालुक्याचे विधानसभा सदस्य व नाशिकचे लोकसभा सदस्यांचा समावेश दिसून आला व ते आर्थिकदृष्ट्या सधन व श्रीमंत असल्याचे दिसून आले.

यावरुन असे दिसून येते की, शेती व्यवसायाशी निगडीत मध्यम स्वरुपाची आर्थिक स्थिती असणारे विधानसभा सदस्य हे आपल्या व्यवसायाबरोबरच समाज कार्यात वेळ देतांना दिसून आले. मात्र त्यांच्यावर काही प्रमाणात तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्तीचा व पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्याचा प्रभाव असल्याचे दिसून आले तर जे विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य शेती व्यवसायाशी निगडीत व त्यांची श्रीमंत स्वरुपाची आर्थिक स्थिती आहे. ते समाजकार्यासाठी व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी वेळ देतांना दिसून आले. त्यामुळे समाजाचेही नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात दिसून येते. मात्र एकही विधानसभा व लोकसभा सदस्य व्यवसाय वा आर्थिक स्थितीने गरीब असल्याचे दिसून आले नाही.

## ७. शैक्षणिक दर्जा :–

आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या स्वतःच्या विकासाबरोबरच समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास चालना मिळते. शिक्षणामुळे आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव होऊन समाजापुढे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक योग्य पध्दतीने करता येते. प्राचीन व मध्ययुगीन काळात शिक्षणास विशेष स्थान नव्हते.

परंतू अलिकडच्या काळात शिक्षण समाजातील सर्व घटकांना मिळाले पाहिजे. यासाठी शासन स्तरावरुन विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जात असतात. या विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून केवळ साक्षर होऊन चालणार नाही तर बदलत्या परिस्थितीनुसार संगणकीय साक्षर होण्याबरोबरच पुढील शैक्षणिक वाटचाल योग्य दिशेने ठरविणे काळाची गरज ठरते. त्या अनुषंगाने शैक्षणिक दृष्टीकोनातून नाशिक जिल्ह्यातील विशेषतः आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचा शैक्षणिक दर्जा खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ६.७**

**विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात.)

| शिक्षण | अशिक्षित | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर पदवीधर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | – | (०१) | (०२) | – | (१०) | (०२) | १५ |
| टक्केवारी | – | ६.६७ | १३.३३ | – | ६६.६७ | १३.३३ | १०० |

तक्ता क्र. ६.७ मध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण ६.६७ टक्के असून माध्यमिक शिक्षण घेतलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण १३.३३ टक्के आहे. मात्र उच्च

माध्यमिक स्तराचे शिक्षण एकाही सदस्याचे दिसून येत नाही तर ६६.६७ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतल्याचे दिसून आले तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण १३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी घेतल्याचे दिसून आले. मात्र एकही विधानसभा व लोकसभा सदस्य अशिक्षित असल्याचे दिसून येत नाही.

यावरुन असे दिसून येते की, शासनाने शिक्षणाच्या बाबतीत विविध योजना खेड्यापाड्यापर्यंत राबविलेल्या आहेत. त्यामुळे अशिक्षितांचे प्रमाण खूपच कमी झाल्याचे दिसून आले. त्याचाच परिणाम वरील तक्त्यात एकही विधानसभा वा लोकसभा सदस्य अशिक्षित असल्याचे दिसून येत नाही.

प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण ६.६७ टक्के आहे. हे विधानसभा सदस्य इगतपूरी तालुक्यातील असून त्यांची मुलाखत व इतर माहिती घेतली असता त्यांचे सामाजिक स्वरुपाचे काम चांगले दिसून आले. त्यामुळे लोकप्रियतेच्या जोरावर त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. मात्र शिक्षण कमी असल्या कारणाने मतदारसंघाची जाणीव थोड्याफार प्रमाणात असली तरी त्यांच्याकडे मतदारसंघासंदर्भात पुढील योजनांचा अभाव दिसून आला.

माध्यमिक शिक्षण घेतलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण १३.३३ टक्के इतके आहे. हे विधानसभा सदस्य इगतपूरी व बागलाण तालुक्यातील असून त्यांना आदिवासींच्या प्रश्नांची जाणीव आहे व ते प्रश्न सोडविण्यासाठीची तळमळ त्यांच्यात दिसून आली. मात्र प्रश्न सोडवित असतांना काही अडचणी जाणवतात असेही त्यांच्या बोलण्यातून दिसून आले. त्यासाठी जास्तीत जास्त विधानसभा सदस्य हे उच्च शिक्षित असणे आवश्यक वाटते.

तसेच पदवीपर्यंत शिक्षण असलेल्या विधानसभा व लोकसभा सदस्यांचे प्रमाण ६६.६७ टक्के आहे. राज्यस्तरावर व राष्ट्रीय स्तरावर काम करीत असतांना शैक्षणिकदृष्ट्या सक्षम व्यक्ति असेल तर त्या त्या मतदारसंघाच्या विकासाला काही प्रमाणात चालना मिळू शकते. पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या बहुतांश विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी आपल्या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी त्यांची यशस्वी वाटचाल सुरु असल्याचे दिसून आले. मात्र सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघातील एका विधानसभा सदस्याला विरोधी व आंदोलनात्मक विचारांच्या माध्यमातून

आदिवासींचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांची विकासाची संकल्पना व इतर विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या विकासाची संकल्पना यात मुलभूत फरक दिसून आला.

त्याचप्रमाणे १३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्य पदव्युत्तर पदवीधर असल्याचे दिसून आले. यामध्ये २००९ च्या विधानसभा व लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार कळवण–सुरगाणा विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य व नाशिक लोकसभा मतदारसंघाचे लोकसभा सदस्यांच्या बोलण्यातून मतदार संघाचे प्रश्न, मतदारसंघात विकासाचे कार्यक्रम राबविण्याबाबत निर्णय घेणे व भावी विकासाची दिशा व फलित हे गुण त्यांच्यात दिसून आले. त्याचबरोबर मतदार संघातील त्या त्या तालुक्यातील लोकांशी बोलताना समजले की, त्या विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी विविध समाजोपयोगी व सार्वजनिक विकासात्मक कार्यक्रम राबविल्याचे सांगितले. यावरुन शिक्षणाचा व विधानसभा व लोकसभा नेतृत्वाचा किती जवळचा संबंध आहे हे वरील विश्लेषणातून दिसून येते.

## ८. राजकीय वारसा :

कुटूंब ही राजकीय सामाजिकीकरणाची पाठशाळा मानली जाते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राची ओळख ही कुटूंबातूनच केली जात असते. कुटूंबातच आवडी–निवडी, प्रवृत्ती, मूल्य, विचार, मत इ. ची जडणघडण होत असते. त्या बाबतीत राजकारण देखील अपवाद ठरत नाही. कुटूंबातील राजकीय वातावरण, वारसा, आदर्श, प्रेरणास्थान, गुरु इ. चा राजकीय नेतृत्त्वावर प्रभाव पडत असतो. कुटूंबातील राजकीय वातावरणातूनच राजकीय नेतृत्त्व निर्माण होत असते. या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांना तुमच्या नातेवाईकांपैकी सक्रिय राजकारणात कोणी भाग घेतलेला आहे का? त्यांच्या कुटुंबातील कुणीतरी व्यक्ती किंवा सासर, माहेरकडील पूर्वी राजकारणात होते का? तसेच कोणाच्या प्रेरणेने विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून राजकारणात आले हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांची नांवे विचारली व त्यांचे प्रेरणास्थान गुरु, आदर्श कोण यांची विचारणा केली व त्यावरुन खालील विश्लेषण केले.

### तक्ता क्र. ६.८

### राजकीय वारसानुसार वर्गीकरण

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| सामाजिक पार्श्वभूमी | राजकीय वारसा असलेले | राजीकीय वारसा नसलेले | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | (०८) | (०७) | १५ |
| टक्केवारी | ५३.३३ | ४६.६७ | १०० |

तक्ता क्र. ६.८ मध्ये ज्या विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांना राजकीय वारसा लाभलेला आहे त्यांचे वडिल, भाऊ, काका, आजोबा, सासरे, मामा अशी जवळचे नातेवाईक यापूर्वी राजकारणात होते अथवा आता आहेत यावरून हे वर्गीकरण केले असता असे दिसून आले की, ५३.३३ टक्के विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचा घरातच सामाजिकीकरणाचे व राजकीय वातावरण असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला चालना मिळाल्याचे दिसून आले. तसेच सन २००९ साली नव्याने निर्माण झालेल्या इगतपूरी–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदारसंघाच्या एका महिला विधानसभा सदस्याने सांगितले की, या मतदार संघात अनुसूचित जमातीचे आरक्षण असल्याने व वडिलांना लोकसभा सदस्यत्वाचा दिर्घकालीन अनुभव असल्या कारणाने त्यांच्या आग्रहास्तव व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्याचबरोबर मला नाशिक महानगरपालिकेत नगरसेविका पदाचा अनुभव व निवडून येण्याची क्षमता या मुद्यांवर पक्षाने मला माझा मतदारसंघ नसतांना देखील आरक्षणामुळे उमेदवारी दिली व निवडून आल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

तसेच राजकीय वारसा नसलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण ४६.६७ टक्के आहे. यामध्ये सर्व विधानसभा सदस्यांना राजकीय वारसा संदर्भात विचारणा केली असता व बहुतांश विधानसभा सदस्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा, सहकार क्षेत्राचा, राजकीय पक्षाच्या अनुभवाचा व केलेल्या

कार्याच्या जोरावर विधानसभा सदस्य झाल्याचे बोलून दाखविले. त्याचबरोबर इगतपूरी विधानसभा मतदारसंघातील एका विधानसभा सदस्याने नाशिक येथील कंपनीत कामगार म्हणून काम करीत असतांना तसेच वारकरी संप्रदायाचा कार्यकर्ता व किर्तनकार म्हणून तालुक्यात सर्वदूर परिचित असल्यामुळे या सामाजिकतेच्या जोरावर राजकारणाचा कुठलाही अनुभव नसतांना पक्षाने विधानसभेची उमेदवारी दिली व निवडून आल्याचे त्यांनी सांगितले.

यावरून असे दिसून येते की, राजकीय वारसा नसतांनादेखील परिचित व्यक्तिमत्व, लोकप्रियता व जनसंपर्कामुळे देखील काही प्रमाणात विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळू शकते.

## ९. राजकीय पक्ष

आजच्या आधुनिक काळात राजकीय पक्षांना अनन्य साधारण महत्त्व आहे. भारतात बहुपक्षपध्दती अस्तित्वात असल्यामुळे केंद्रस्तरावर व राज्य स्तरावर विविध राजकीय पक्ष कार्यरत असून त्या त्या राजकीय पक्षांचे ध्येयधोरणे, उद्दिष्ट्ये, तत्वप्रणाली, विचार प्रणाली कशी आहे यावर त्या राजकीय पक्षांचे भवितव्य ठरत असते. त्या अनुषंगाने विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य हे देखील राजकीय पक्षांचे सदस्य असून त्यांचे राजकीय पक्षांनुसार विश्लेषण खालील तक्त्यावरुन करता येते.

**तक्ता क्र. ६.९**

**विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण**

(कंसातील आकडे संख्या दर्शवितात)

| राजकीय पक्ष | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | भा.ज.पा. | मा.क.पा. | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०३ | ०६ | ०३ | ०५ | ०२ | ०३ | २२ |
| टक्केवारी | १३.६४ | २७.२७ | १३.६४ | २२.७२ | ९.०९ | १३.६४ | १०० |

अभ्यासासाठी १५ विधानसभा व लोकसभा सदस्यांची निवड करण्यात आली आहे. मात्र कळवण विधानसभा मतदारसंघातील एक विधानसभा सदस्य सन १९९५ ते १९९९ या कालखंडात भारतीय जनता पक्षाकडून निवडून आले व सन २००९ च्या विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार कळवण–सुरगाणा मतदारसंघात देखील राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाकडून निवडून आल्याचे दिसून आले. तसेच दिंडोरी विधानसभा मतदार संघातील एक विधानसभा सदस्य सन १९९५ ते १९९९ या कालखंडात काँग्रेसकडून निवडून आले तर १९९९ ते २००४ या कालखंडात राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाकडून निवडून आल्याचे दिसून आले. तसेच सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर मतदारसंघातील एक विधानसभा सदस्य १९९९ ते २००४ व २००४ ते २००९ या सलग दोन्ही कालखंडात मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीकडून निवडून आल्याचे दिसून आले. त्याचबरोबर सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर मतदारसंघातील एक विधानसभा सदस्य १९९५–१९९९ या कालखडात अपक्ष म्हणून निवडून आल्याचे दिसून आले. मात्र हेच विधानसभा सदस्य मालेगांव लोकसभा मतदारसंघातून सन २००४ ते २००९ या कालखंडासाठी भा.ज.पा. कडून निवडून आले व सन २००९ च्या लोकसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार दिंडोरी लोकसभा मतदार संघातून २००९ ते २०१४ या कालखंडासाठी पुन्हा भा.ज.पा. तर्फे निवडून आल्यामुळे वरिल तक्ता क्र. ६.९ मध्ये विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांची संख्या २२ दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र. ६.९ मध्ये विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण केल्यामुळे आदिवासीबहुल सात तालुक्यांवर कोणत्या पक्षांचा प्रभाव आहे हे समजते.

सन १९९५ ते १९९९, सन १९९९–२००४, सन २००४–२००९ व सन २००९–२०१४ या चार विधानसभा कालखंडात व सन १९९१–१९९६, १९९६–१९९८, १९९८–१९९९, सन १९९९–२००४, २००४ ते २००९ व २००९ ते २०१४ या सहा लोकसभा कालखंडातील विधानसभा व लोकसभा सदस्यांचा विचार केला असता ह्यात असलेल्या २२ विधानसभा व लोकसभा सदस्यांपैकी ०३ सदस्य हे काँग्रेस पक्षाचे असून त्यांचे प्रमाण १३.६४ टक्के आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ०६ विधानसभा व लोकसभा सदस्य असून त्यांचे प्रमाण २७.२७ टक्के आहे तर शिवसेना या पक्षाचे एकूण ०३ विधानसभा व लोकसभा सदस्य असून त्यांचे प्रमाण १३.६४

टक्के आहे व भाजपा या पक्षाचे ५ विधानसभा व लोकसभा सदस्य असून त्यांचे प्रमाण २२.७२ टक्के आहे. तसेच मा.क.पा या पक्षाचे एकूण ०२ विधानसभा सदस्य असून त्यांचे प्रमाण ९.०९ टक्के आहे. त्याचप्रमाणे अपक्ष विधानसभा सदस्यांची संख्या ०३ असून त्यांचे प्रमाण १३.६४ टक्के आहे.

सन १९९९ साली काँग्रेस या पक्षात फूट पडून शरद पवारांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निर्मिती झाल्यानंतर दिंडोरी, इगतपूरी, कळवण, सुरगाणा विधानसभा मतदार संघातील विधानसभा सदस्यांनी प्रवेश केल्यामुळे जिल्ह्यात व आदिवासीबहुल तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव निर्माण झाला.

विधानसभा व लोकसभा सदस्यांची पक्षीय दृष्टीकोनातून माहिती मिळवित असतांना पक्षाचे धोरण, उद्दिष्ट्ये कोणती आहेत? याच पक्षाचे नेतृत्व का मानतात याबाबतची माहिती विचारली तसेच त्यांच्या राजकीय पक्षातील सक्रिय सहभागाबद्दल माहिती मिळविण्यासाठी पक्षाचे मेळावे, सभा, पक्षाचे सभासदत्व, सक्रिय सभासदत्व, पक्ष संघटना, पदाधिकारी याबाबत माहिती विचारली. मिळालेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा व लोकसभा सदस्यांपैकी ७५ टक्के सदस्य पक्ष कार्यात सक्रिय असल्याचे दिसून आले.

काँग्रेस पक्षाचे ५० टक्के विधानसभा सदस्य पक्ष कार्यात सक्रिय भाग घेतांना दिसून आले तर शिवसेना या पक्षाच्या विधानसभा सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य पक्ष कार्यात सक्रिय भाग घेत असल्याचे दिसून आले. त्यांनी पक्षासाठी कोणत्या प्रकारचे कार्य केले आहे यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी वीज, पाणी, शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे यासारख्या विषयांवर आंदोलनात्मक कार्य, पक्षाचे मेळावे, सभा इ. तील उपस्थितीतून त्यांची सक्रियता दिसून आली. तसेच भा.ज.पा. या पक्षाच्या विधानसभा व लोकसभा सदस्यांपैकी ६५ टक्के सदस्य हे पक्ष कार्यात सक्रिय दिसून आले तर मा.क.पा. या पक्षाचे १०० टक्के विधानसभा सदस्य पक्ष कार्यात सक्रिय दिसून आले. त्यांची वनजमीन हक्कासंदर्भात आंदोलनात्मक कार्यातून व पक्षकार्यासाठी सभा, मेळावे यांतून सक्रियता दिसून आली. त्याचप्रमाणे अपक्ष विधानसभा सदस्यांची भूमिका आपल्या मतदार संघाच्या विकासासंदर्भात आंदोलन करुन राजकीय पक्षांशी संघर्ष वा तडजोडीतून निर्णय प्रक्रियेत सक्रियता

दर्शविल्याचे दिसून आले. सर्व पक्ष मिळून ६८ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्य हे पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.

यावरुन असे दिसून येते की, विधानसभा व लोकसभा सदस्य हे राजकीय पक्षाचे नेतृत्व मानतात. त्या नेतृत्वाच्या अनुषंगाने नवीन नेतृत्वाच्या जडणघडणीला पक्षकार्यातून वाव मिळत आहे. त्याचबरोबर पक्षनिष्ठ राजकारणाबरोबरच व्यक्तिनिष्ठ राजकारणाला देखील महत्व दिले जात असल्याचे दिसून आले.

## १०. राजकारणातील पूर्वानुभव

व्यक्तीला राजकारणात कोणतेही राजकीय जबाबदारीचे पद सांभाळण्याकरिता व सक्षमपणे नेतृत्व करण्याकरिता राजकारणांत पूर्वानुभव असणे आवश्यक असते. कारण पूर्वानुभवामुळे व्यक्तिला दिर्घ अनुभव, दूरदृष्टी व निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होऊन योग्य निर्णय घेता येतात व त्याचबरोबर योग्य त्या समस्यांची जाण निर्माण होते व त्यांची सोडवणूक देखील करता येते.

या उद्देशाने नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांना, विधानसभा व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी आपण राजकीय पक्षाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्या पदावर कार्यरत होते या संदर्भात विचारणा करुन माहिती मिळविली व त्यातून त्यांचा राजकारणातील पूर्वानुभव स्पष्ट होतो.

**तक्ता क्र. ६.१०**

**विधानसभा व लोकसभा सदस्यांचे (नेतृत्वाचे) पूर्वानुभवानुसार वर्गीकरण**

| पूर्वानुभव | ग्रा. पं. सदस्य | ग्रा. पं. सरपंच | पं. स. सभापती | जि. प. सदस्य | राजकीय पक्ष पदाधिकारी | पूर्वानुभव नसणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०१ | ०२ | ०१ | ०४ | ०५ | ०२ | १५ |
| टक्केवारी | ६.६७ | १३.३३ | ६.६७ | २६.६७ | ३३.३३ | १३.३३ | १०० |

तक्ता क्र. ६.१० मध्ये पूर्वानुभवानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, राजकीय पक्ष पदाधिकारी या अर्थाने वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार ६.६७ टक्के विधानसभा सदस्यांना ग्रामपंचायत सदस्य पदाचा पूर्वानुभव आहे. तसेच १३.३३ टक्के विधानसभा सदस्यांना ग्रामपंचायत सरपंच पदाचा पूर्वानुभव असल्याचे दिसून आले तर ६.६७ टक्के विधानसभा सदस्यांना पंचायत समिती सभापतीपदाचा पूर्वानुभव दिसून आला तर २६.६७ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांना जिल्हा परिषद सदस्य पदाचा पूर्वानुभव असल्याचे दिसून आले. या अनुभवावरुन विधानसभा व लोकसभेतील नेतृत्व अभ्यासनीय दिसून आले तर राजकीय पक्ष पदाधिकारी पदाचा पूर्वानुभव ३३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांना दिसून आला तर १३.३३ टक्के विधानसभा सदस्यांना कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा वा राजकीय पक्ष पदाधिकारी पदाचा पूर्वानुभव नसल्याचे दिसून आले. त्यापैकी सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघातील एका विधानसभा सदस्याचा समावेश असून त्यांना या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी सन १९७२ च्या दुष्काळात रोड कारकून होतो. त्यामुळे लोकांशी संपर्क आला. रोड कारकून म्हणून व इतर आदिवासी कामगारांनी काम केलेले असतांना कामावरचे पैसे मिळत नव्हते. त्यामुळे लोकांना बरोबर घेऊन संघर्ष करुन पैसे मिळविण्यात यश मिळविले. त्यातच याच वर्षी गोदाताई परुळेकरांशी वैचारिक संबंध आला. अन्यायाविरुध्द वेळोवेळी संघर्षाची तयारी व न्याय मिळवून

देण्याची भूमिका असल्याने याच मुद्यावर पक्षाने सन १९७८ साली विधानसभेची उमेदवारी दिली व या निवडणूकीत माझ्यासहीत सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले व त्यात मला सर्वाधिक मते मिळाली असल्याने विधानसभा सदस्य म्हणून मला घोषित करण्यात आले होते. अशा प्रकारची महाराष्ट्रातील पहिली घटना असल्याचेही त्यांनी सांगून तेव्हापासून सन १९९५ चा अपवाद वगळता विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेपर्यंत म्हणजे २००९ पर्यंत विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

अभ्यासासाठी निवडलेल्या १५ विधानसभा व लोकसभा सदस्यांपैकी १३ विधानसभा व लोकसभा सदस्यांना सदस्य होण्यापूर्वीचा पूर्वानुभव असल्याचे दिसून आले. त्यामुळे या सदस्यांना ग्रामीण तळागाळातील आदिवासींच्या प्रश्नांची खऱ्या अर्थाने जाण असून त्यांच्या विकासाच्या संदर्भात वेळोवेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्या त्या नेतृत्वात दिसून आली.

## ११. पक्ष संघटनेतील पदाधिकारी :

प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या पक्षाची ध्येयधोरणे, विचारप्रणाली जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करीत असतो. त्यासाठी पक्षसंघटना मजबूत असणे आवश्यक आहे. पक्ष संघटनेतील पदाधिकारी म्हणून काम करीत असतांना आपल्या पक्षाची ध्येयधोरणे सामान्य व तळागाळातील जनतेत रुजवित असतांना लोकांच्या समस्या देखील समजतात व त्या समस्या सोडविण्यासाठी पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव महत्त्वाचा ठरतो.

**तक्ता क्र. ६.११**

**पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाच्या अनुभवानुसार वर्गीकरण**

| पदाधिकारी | अनुभव असणारे | अनुभव नसणारे | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०८ | ०७ | १५ |
| टक्केवारी | ५३.३३ | ४६.६७ | १०० |

तक्ता क्र. ६.११ मध्ये पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव ५३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांना आहे तर ४६.६७ टक्के विधानसभा सदस्यांना पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव दिसून आला नाही.

यावरुन असे दिसून येते की, पक्ष संघटनेतील पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव ज्या विधानसभा व लोकसभा सदस्यांना आहे त्यांना ग्रामीण स्तरावरील, तळागाळातील आदिवासींच्या समस्यांची चांगली जाण दिसून आली. पक्ष संघटनेचे काम करीत असतांना पक्षाची ध्येयधोरणे, विचार प्रणाली ही गावागावात पोहचवित असतांना त्या त्या गावातील, तालुक्यातील समस्या कोणत्या आहेत? त्या समस्या दूर करण्यासाठी नेमके काय केले पाहिजे? यासारखे अनेक प्रश्न विचारण्यात आले असता बहुतेक विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. तसेच पक्ष संघटनेत काम केल्याच्या अनुभवाचा फायदा विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून काम करीत असतांना मोठ्या प्रमाणात झाल्याचे सर्व विधानसभा व लोकसभा सदस्यांनी बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव नसणारे ४६.६७ टक्के विधानसभा सदस्य आहेत. त्यापैकी काही सदस्यांना तळागाळातील ग्रामीण स्तराची व आदिवासी भागातील समस्यांची पुरेशी जाण नसल्याचे दिसून आले. मात्र कळवण–सुरगाणा मतदार संघातील एका विधानसभा सदस्यांनी पक्ष संघटनेत पदाधिकारी म्हणून कामाचा अनुभव नसून स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदांचा अनुभव असल्यामुळे मतदार संघाचा मोठ्या प्रमाणात विकास केल्याचे सांगून व प्रत्यक्षदर्शनी विकास झाल्याचे दिसून आले.

## १२. सहकारी संस्थावर केलेले काम :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रत्येक राज्यातील जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील विकासाला चालना देण्याचे काम सहकारी संस्थांच्या माध्यमातून झाले. म्हणून सहकारी संस्थावर केलेल्या कामामुळे दूरदृष्टी निर्माण होऊन निर्णय घेण्याची क्षमता, ग्रामीण समस्यांची जाण निर्माण होऊन त्या समस्यांची सोडवणूक करता येते. सहकारी संस्थावर विधानसभा व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी आदिवासीबहुल सात तालुक्यातील विधानसभा व लोकसभा सदस्यांनी ज्या संस्थेच्या पदावर काम केले आहे त्याचे वर्गीकरण करण्यात येऊन माहिती मिळविली आहे.

**तक्ता क्र. ६.१२**

**विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी सहकारी संस्थावर केलेल्या कामानुसार वर्गीकरण**

| सहकारी संस्था | आदिवासी वि. कार्य. सोसा.संचालक | आदिवासी वि. कार्य. सोसा. चेअरमन | तालुका दूध संस्था चेअरमन | म.रा. आदिवासी महामंडळ संचालक | कृ. बा. समिती संचालक | सहकारी संस्थावर काम न केलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०४ | ०४ | ०१ | ०२ | ०१ | ०३ | १५ |
| टक्केवारी | २६.६७ | २६.६७ | ६.६७ | १३.३३ | ६.६६ | २० | १०० |

तक्ता क्र. ६.१२ मध्ये विधानसभा व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी सहकारी संस्थावर केलेल्या कामानुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये आदिवासी विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक व चेअरमन म्हणून अनुक्रमे २६.६७ टक्के विधानसभा सदस्यांना काम करण्याची संधी मिळाली तर ६.६७ टक्के विधानसभा सदस्यांना तालुका दुधसंस्थेच्या चेअरमनपदी संधी मिळाल्याचे दिसून आले. तसेच १३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांना महाराष्ट्र राज्य आदिवासी वि. महामंडळाचे संचालक म्हणून संधी मिळाल्याचे दिसते तर ६.६६ टक्के विधानसभा सदस्यांना तालुका

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून संधी मिळाली. त्याचबरोबर २० टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी विधानसभा व लोकसभा सदस्य होण्यापूर्वी सहकारी संस्थांवर काम केले नसल्याचे दिसून आले.

यावरुन असे दिसून येते की, सहकारी संस्थांवर ज्या विधानसभा व लोकसभा सदस्यांनी सदस्य होण्यापूर्वी काम केलेले आहे त्यांना ग्रामीण आदिवासी भागातील सदस्यांची जाण असल्याचे दिसून आले. तसेच आदिवासी वि. कार्य. सोसायटीच्या माध्यमातून आदिवासींना पतपुरवठा करुन समाजाचा कृषी व आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केल्याचे बहुतेक सदस्यांनी बोलून दाखविले. तर महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून आदिवासींना महामंडळांतर्गत येणाऱ्या शासनाच्या विविध प्रकारच्या योजना समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केल्याचे या सदस्यांनी आवर्जून नमूद केले. एकंदरीत या विविध सहकारी संस्थावर काम केल्यामुळे विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून काम करतांना या अनुभवाचा फार मोठ्या प्रमाणात फायदा झाल्याचे बहुतांश सदस्यांनी बोलून दाखविले. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळावा, शेतकऱ्यांना योग्य सुविधा मिळवून देण्याची जबाबदारी ही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करता आल्याचेही बागलाण तालुक्यातील विधानसभा सदस्यांनी बोलून दाखविले. तसेच कळवण व दिंडोरी तालुक्यातील प्रत्येकी एक विधानसभा सदस्यांना आदिवासी वि. कार्य सोसायटी संचालक, चेअरमन, तालुका दुध संघ चेअरमन यांसारख्या सहकारी संस्थांच्या पदावर त्यांनी विधानसभा सदस्य होण्यापूर्वी काम केल्याचे दिसून आले. मात्र सहकारी संस्थांवर काम न केलेल्या विधानसभा सदस्यांमध्ये आत्मविश्वास व अभ्यासूपणाचा अभाव दिसून आला. याला अपवाद नाशिक लोकसभा मतदार संघातील लोकसभा सदस्य असल्याचे दिसून आले. त्यांना सहकारी संस्थांचा अनुभव नसतांनाही वारसा, संस्था, उच्च शिक्षण या जोरावर त्यांनी या मतदारसंघातील इगतपूरी व त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या आदिवासींच्या सार्वत्रिक विकासाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका घेतल्याचे दिसून आले.

## १३. पंचायत राज्यातून पुढे आलेले नेतृत्व :

स्थानिक स्वराज्य संस्था नेतृत्व निर्माण करणारी पाठशाळा असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने नेतृत्वाची जडणघडण होऊन नेतृत्व तयार होत असते. या ठिकाणी पंचायत राज्यातून निवडून आल्यानंतर देखील विधानसभा व लोकसभेत नेतृत्व करण्याची संधी मिळाली हे बघणे महत्त्वाचे आहे.

**तक्ता क्र. ६.१३**

**पंचायत राज्यातून पुढे आलेल्या नेतृत्त्वानुसार वर्गीकरण**

| लिंग | पंचायत राज्यातून पुढे आलेले नेतृत्व | | पंचायत राज्यातून पुढे न आलेले नेतृत्व | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| पुरुष | ०९ | ६०.०० | ०५ | ३३.३३ | १४ | ९३.३३ |
| स्त्री | ०१ | ६.६७ | – | – | ०१ | ६.६७ |
| एकूण | १० | ६६.६७ | ०५ | ३३.३३ | १५ | १०० |

तक्ता क्र. ६.१३ मध्ये पंचायत राज्यातून पुढे आलेले व पुढे न आलेल्या नेतृत्वानुसार वर्गीकरण केले आहे. संशोधन कालखंडातील १५ पैकी १० सदस्य याप्रमाणे ६६.६७ टक्के सदस्य पंचायत राज्यातून पुढे आलेले आहेत तर ०५ सदस्यांना पंचायत राज्यातील अनुभव नसतांनाही त्यांना विधानसभा व लोकसभा सदस्यत्वाची संधी मिळाली.

पंचायत राज्यातून पुढे आलेल्या नेतृत्वामध्ये दिंडोरी तालुक्यातील सदस्य नरहरी झिरवाळांना वनारे या गावाचे सरपंच, त्यानंतर पंचायत समिती सदस्य, उपसभापती, जिल्हा परिषद सदस्यत्वानंतर सन २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातर्फे निवडणूक लढवून विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली तर याच तालुक्यातील सदस्य धनराज महाले यांना वारे या गावाच्या सरपंच पदानंतर सन २००९ मध्ये शिवसेना या पक्षातर्फे निवडणूक लढवून विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली.

तसेच कळवण तालुक्यातील सदस्य ए. टी. पवार यांना दळवट गावाचे सरपंच, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य, त्यानंतर सन १९७२ मध्ये सुरगाणा–पेठ–कळवण मतदारसंघातून विधानसभा सदस्यत्वाची संधी मिळाली तर १९७८ मध्ये कळवण विधानसभा सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर १९९० चा अपवाद वगळता आजपर्यंत ते विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

तसेच बागलाण तालुक्यातील सदस्य दिलिप बोरसे यांना लाडूद गावातील ग्रामपंचायत सदस्यत्वानंतर शेतकरी संघटनेच्या पाठिंब्यावर अपक्ष म्हणून १९९५ मध्ये विधानसभा सदस्य म्हणून निवडून येण्याची संधी मिळाली तर याच तालुक्यातील सदस्य शंकर अहिरे यांना गावाचे सरपंच, त्यानंतर पंचायत समिती सदस्य, सभापती, जिल्हा परिषद सदस्यत्वानंतर भाजपातर्फे सन १९९९ मध्ये निवडणूक लढवून विधानसभा सदस्य म्हणून संधी मिळाल्याचे दिसून आले तर याच तालुक्यातील सदस्य संजय चव्हाण यांना सटाणा (बागलाण) नगर पालिकेचे नगरसेवक, नगराध्यक्षानंतर सन २००४ मध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढवून विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली. तसेच या तालुक्यातील सदस्य उमाजी बोरसे यांना जिल्हा परिषद सदस्यत्वानंतर भाजपातर्फे सन २००९ मध्ये निवडणूक लढवून विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली.

तसेच सुरगाणा तालुक्यातील सदस्य हरिश्चंद्र चव्हाणांना प्रतापगड या गावाचे सरपंच, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्यत्वानंतर सन १९९५ मध्ये अपक्ष म्हणून विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली. त्यानंतर सन २००४ मध्ये मालेगांव लोकसभा मतदार संघात भाजपा तर्फे निवडणूक लढवून लोकसभा सदस्यत्वाची संधी मिळाली व सन २००९ च्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार मालेगांव ऐवजी दिंडोरी लोकसभा मतदारसंघ राखीव होऊन या मतदारसंघातून पुन्हा भाजपातर्फे निवडणूक लढवून लोकसभा सदस्य होण्याची संधी मिळाल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे पंचायत राज्यातून पुढे न आलेल्या नेतृत्वात दिंडोरी तालुक्यातील सदस्य रामदास चारोस्करांचा उल्लेख करता येईल. सन १९९५ मध्ये दिंडोरी विधानसभा निवडणूकीत वडिल किसन चारोसकर निवडून आल्यानंतर त्याच दिवशी त्यांचे अपघाताने निधन झाले. त्यामुळे निवडणूक आयोगाला लागलीच निवडणूक घ्यावी लागली. घरातील सदस्य म्हणून काँग्रेस पक्षाने

उमेदवारी दिली व निवडून आल्याचे दिसून आले. (कार्यकाल १९९५ ते १९९९ व १९९९ ते २००४) यावरुन सहानुभूती व घराण्याचा वारसाचा परिणाम दिसून आला.

तसेच इगतपूरी तालुक्यातील दोन सदस्यांपैकी एक सदस्य पांडूरंग गांगड यांना कुठलाही राजकीय वारसा वा अनुभव नसून ते वारकरी सांप्रदायातील असून तालुक्यात किर्तनकार म्हणून परिचित व प्रबोधनात्मक कामातून हे नेतृत्व विधानसभा सदस्य झाल्याचे दिसून आले. (सन १९९९ ते २००४) तर दुसरे सदस्य काशिनाथ मेंगाळ यांना शिवसेना तालुकाध्यक्ष या पदावर कार्यरत असतांना आदिवासी जनतेशी आलेल्या संपर्कामुळे व लोकप्रियतेच्या जोरावर विधानसभा सदस्य म्हणून निवडून आल्याचे दिसून आले. (सन २००४ ते २००९)

तर सुरगाणा तालुक्यातील अलंगुण गावातील जीवा पांडू गावीत यांना कुठल्याही पंचायत राज्यातील संस्थेचा अनुभव वा वारसा नसतांना देखील एक आंदोलनात्मक चळवळीतील कार्यकर्ता ही तालुक्यातील ओळख लक्षात घेता आदिवासी जनतेने सन १९७८ च्या विधानसभा निवडणूकीत विधानसभा सदस्य म्हणून संधी दिल्यामुळे सन १९९५ चा अपवाद वगळता सन २००९ च्या विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेपर्यंत ते सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर या मतदारसंघाचे विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत होते.

त्याचप्रमाणे नाशिक लोकसभा मतदार संघातील सदस्य समीर भुजबळांना स्थानिक स्वराज्य संस्थेचा / पंचायत राज्याचा कुठलाही अनुभव नसतांना देखील काका राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री हा राजकीय वारसा व निवडून येण्याची क्षमता लक्षात घेऊन जनतेने त्यांना लोकसभा सदस्य म्हणून निवडून दिल्याचे दिसून आले. (सन २००९ ते २०१४)

यावरुन असे स्पष्ट होते की, पंचायत राज्याचा अनुभव व घराणेशाहीचा वारसा या बाबी विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य होण्यासाठी कारणीभूत ठरल्याचे दिसून आले. मात्र कुठलाही राजकीय वारसा, राजकीय पक्षाचा वा पंचायत राज्याचा कुठलाही अनुभव नसतांनाही प्रबोधनात्मक स्वरुपाचा उपक्रम राबवून लोकप्रियतेच्या जोरावर देखील विधानसभा सदस्यत्वाची संधी मिळू शकते ही देखील बाब महत्त्वपूर्ण दिसून आली.

## १४. संस्थात्मक व संघटनात्मक काम :

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासन स्तरावर ज्या विविध योजना राबविल्या जातात त्या व्यतिरिक्त आदिवासी समाजासाठी समाजातीलच नेतृत्वाने समाजाच्या विकासासाठी योग्य भूमिका घेणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने विधानसभा सदस्य व लोकसभासदस्यांची संख्यात्मक व संघटनात्मक कामानुसार माहिती मिळवून त्याचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ६.१४**

**संस्थात्मक व संघटनात्मक कामानुसार वर्गीकरण**

| | संस्थात्मक पातळीवरकाम करणारे | संघटनात्मक पातळीवर काम करणारे | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०६ | ०९ | १५ |
| टक्केवारी | ४० | ६० | १०० |

तक्ता क्र. ६.१४ संस्थात्मक व संघटनात्मक कामानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. संस्थात्मक पातळीवर काम करणारे विधानसभा व लोकसभा सदस्यांचे प्रमाण ६० टक्के असल्याचे दिसून आले,

यावरुन असे दिसून येते की लोकसभा व विधानसभा सदस्यांची आदिवासी म्हणून स्वतः संस्था व संघटना स्थापन करून वा त्या संस्थेशी व संघटनेशी संलग्न राहून समाजाच्या प्रगतिसाठी महत्वपूर्ण पाऊल टाकल्याचे दिसून आले संस्थात्मक पातळीवर इगतपूरी, दिंडोरी या तालुक्यातील प्रत्येकी एका विधानसभा सदस्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसते. इगतपूरी विधानसभा मतदारसंघातील एका विधानसभा सदस्याने १९७७ रोजी इगतपूरी तालुक्यातील घोटी या गावी आदिवासी तरूण मंडळ स्थापन करून मंडळाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या योजना आदिवासींपर्यंत पोहचविण्याचे काम करून शिक्षण संस्था देखील स्थापन केली. आज या संस्थेत २००० ते २५०० आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. तसेच दिंबेरी विधानसभा मतदारसंघातील एका विधानसभा सदस्यांनी शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना जो

भाजीपाला पूरवठा करण्यात येतो तो पुरवठा आदिवासी संस्था, मंडळाच्या माध्यमातून झाला पाहिजे त्यामुळे आदिवासींचे मंडळ व संस्था बळकट होतील व आदिवासींना मोठया प्रमाणात रोजगारही उपलब्ध होईल अशा प्रकारची भूमिका घेतल्याने त्यांना बऱ्याच प्रमाणात यशही मिळाल्याचे दिसून आले. तसेच इतर तालुक्यात कमी अधिक प्रमाणात संस्थात्मक पातळीवर काम सुरू असल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे संघटनात्मक कामातून आदिवासींच्या योजना, आदिवासींवरील अन्याय दूर करण्याचे काम संघटनात्मक कार्यातून होते. जिल्ह्यातील आदिवासींबहुल तालुक्यात कोकणा–कोकणी आदिवासी सेवा संघ, ठाकर समाज संघटना, महादेव कोळी समाज संघटना, आदिवासी समाज बांधव संघटना, आदिवासी भिल्ल संग्राम परिषद आदि संघटना कार्यरत असून या संघटनेत विधानसभा व लोकसभा सदस्य कमी – अधिक प्रमाणात क्रियाशील असून प्रत्येक आदिवासी बांधवांना शासकीय योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. प्रत्येक आदिवासी बांधवांच्या हक्काचे संरक्षण झाले पाहिजे. बोगस आदिवासींना संरक्षण न देता त्यांना आदिवासी म्हणून मिळालेले प्रमाणपत्र रद्द केले पाहिजे. यासारख्या बाबींसाठी न्याय हक्कांसाठीचा लढा संघटनात्मक पातळीवरुन आदिवासीबहुल तालुक्यातून सुरु असल्याचे दिसून आले. दिंडोरी लोकसभा मतदार संघातील एका लोकसभा सदस्याने सांगितले की, सन १९७५ मध्ये अखिल भारतीय युवक क्रांती संघटना स्थापन करुन राज्य पातळीवर काम सुरु करुन जिल्ह्यातील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात जनजागृती करुन आदिवासींमधील भिती दूर करण्याचा प्रयत्न करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करुन सावकारशाहीस अटकाव करण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून केल्याचे सांगून आज समाजाच्या विविध प्रकारच्या संघटना अस्तित्वात आहेत. महत्त्वाचा प्रश्न बोगस आदिवासींचा असून, हा प्रश्न अजूनही न्यायालयात भिजत पडला आहे. त्यासाठी व्यापक लढा देण्याची गरज आहे. एकवाक्यतेचा अभाव, संघटनेची वर्गणी दिली जाते, मात्र लढाईसाठी तत्परता दिसत नाही हे दुर्दैव आहे. मात्र तरीही यावर मात करुन आदिवासींच्या १७ संघटना एकत्र आणण्यात / करण्यात यश मिळविले. तरुणांमध्ये जागृती केली, लढा सुरु आहे, यश मिळणार असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

थोडक्यात आदिवासीबहुल तालुक्यातील विधानसभा व लोकसभा सदस्य संघटनात्मक पातळीवर कमी – अधिक प्रमाणात सक्रीय असल्याचे दिसून आले.

## १५. शासनाच्या माध्यमांतून सर्वाधिक प्राधान्य दिलेले उपक्रम :-

विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने शासनाच्या माध्यमातून रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज यासारखे उपक्रम राबविले आहेत. आज हे उपक्रम राबविताना ज्या उपक्रमांवर विधानसभा व लोकसभा सदस्यांनी विशेष भर दिला आहे त्यानुसार त्यांचे खालील तक्त्यात वर्णन केले आहे.

**तक्ता क्र. ६.१५**

**विधानसभा व लोकसभा सदस्यांनी विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य दिलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण**

| पर्याय | रस्ते | पाणी व सिंचन | शिक्षण | आरोग्य | वीज | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०३ | ०५ | ०३ | ०३ | ०१ | १५ |
| टक्केवारी | २० | ३३.३३ | २० | २० | ६.६७ | १०० |

तक्ता क्र. ६.१५ मध्ये शासनाच्या माध्यमातून राबविलेल्या उपक्रमानुसार वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार २० टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी रस्ते विकासावर भर दिला आहे. त्यात आदिवासी गावागावात व तालुक्यात रस्ते तयार करण्यासारखे उपक्रम राबविल्याचे दिसते. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील एका लोकसभा सदस्याने प्रत्येक आदिवासी तालूक्यात रस्ते विकास करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगून कळवण तालुक्यात ६० गावांत रस्ते विकासासाठी ८.०७ कोटींची कामे त्यात १.८५ कोटींच्या सुविधा व ७.८५ कोटींचे पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून काम सुरू केले तर दिडोंरी तालुक्यात ३३ गावांत १.५९ कोटींची कामे लोकांच्या मागणीनूसार केले. तसेच पिंप्रीपाडा,चौताळे, कोकणगांव, शिंदवड, गोंडेगाव, जऊळके, वर्णाळ चिंचखेड आदि गावांत पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून ८.२९ कोटींची कामे केली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचा अध्यक्ष असल्याने

ज्या ज्या तालूक्यातील ज्या ग्रामपंचायतींचा प्रस्ताव माझ्याकडे येतो. तो शिफारशीसह पाठवून मंजूर केला जात असल्याचे त्यानी सांगितले. तसेच हरसुल–पेठ ते गूजरातपर्यंत जोडणारे रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून बांधले. त्यामुळे दुर्गम भागात एस.टी (बस) जात आहे. स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या दळणवळणाच्यासंदर्भात विकास करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. तसेच नाशिक लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सदस्याने आदिवासी तालुके विकसित व्हावे यादृष्टीने नाशिक–पेठ–सुरगाणा–सूरत हा महामार्ग केद्रिंय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालयाशी सतत पाठपूरावा करून मंजूर केला व त्याचे काम लवकरच सुरु होणार असल्याचे सांगून नाशिक व त्र्यंबकेश्वर मार्गाचे चौपदरीकरण प्रगतिपथावर असून त्यासाठी १५० कोटींचा निधी खर्च केला जाणार असून हा मार्ग २२ कि.मीचा व रस्त्याच्या दोन्ही बाजूस पालखी व सायकल ट्रक. वारकरी यांच्यासाठी उपयोगी ठरणार असून पर्यावरणासाठी ८ हजार वृक्षांसह फुल झाडांची लागवड करण्यात येणार आहे, डिसेंबर २०१४ पर्यंत हा मार्ग वाहतूकीसाठी खुला करण्याचे नियोजन असून हा मार्ग देशातील पहिला हिरवा चौपदरी असल्याचे त्यांनी आवर्जुन नमूद केले. इतरही तालुक्यात कमी–अधिक प्रमाणात रस्ते विकास झाल्याचे दिसून आले.

तसेच ३३.३३ टक्के विधानसभा सदस्यांनी पाणी या घटकाकडे विशेषतः पिण्याचे पाणी, सिंचन या घटकाकडे विशेष लक्ष दिले. जवाहर योजनेतून १०० टक्के अनुदानातून विहिरी खोदणे, पाणी अडवा पाणी जिरवा अंतर्गत के.टी. बंधारे लघुपाटबंधारे, वॉटर सप्लाय, बोअरवेल, वीजपंप यासारख्या योजना, उपक्रम राबवून विधानसभा मतदारसंघात, तालुक्यात पाणी आणण्याचे काम अनेक विधानसभा सदस्यांनी केल्याचे बोलून दाखविले. कळवण विधानसभा मतदारसंघाच्या एका विधानसभा सदस्याने मतदारसंघामध्ये पुनंद या ५०० कोटींचा महत्वपूर्ण ( मेजर ) पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. तसेच चणकापूर व पुनंद या दोन मोठयाधरणांतर्गत १६० कि.मी. अंतराचे पाच कालवे काढून त्याद्वारे कळवण, बागलाण, देवळा, मालेगांव, चांदवड या तालुक्यातील एक लाख एकर क्षेत्र सिंचनाखाली आणून आदिवासी बांधवाचे व सर्वसामान्य शेतकरी बांधवाचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर २३ लघु पाटबंधारे प्रकल्प व १०० ते १५० पाझरतलाव बांधून त्या अंतर्गतही ६०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणल्याचे त्यांनी सांगितले. तसेच

कृषी विभागांतर्गत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम मेघा पाणलोट अंतर्गत मेगा पाणलोट क्र.टी.ई. १२५ अंतर्गत ३८ गांवे, मेगा पाणलोट क्र.टी.ई अंतर्गत ४० गांव तसेच मेघा पाणलोट क्र.टी.ई. ११६ अंतर्गत ४५ गांव असे एकूण १२३ गांव समाविष्ट असून त्या अंतर्गत २०,००० हेक्टर क्षेत्रामध्ये मजगी, दगडीबांध, सिमेंट नालाबांध, मातीनालाबांध, सि.सि.टी. ही कामे करण्यात येणार असल्याचे सांगून पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण व वीजेच्या बाबतीत कळवण तालुका आदिवासी तालुका असतांना देखील विकासाच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे त्यांनी ठासून व आत्मविश्वासपूर्वक बोलून दाखविले व त्याचबरोबर २००९ च्या विधानसभा मतदार संघ पुनर्रचनेनुसार सुरगाणा तालुका कळवण विधानसभा मतदारसंघास जोडला गेल्याचे सांगून सुरगाण्याचा पाणीप्रश्न अतिशय भीषण व गंभीर असून वषानुवर्षे हा तालुका विकासापासून वंचित ठेवण्यात आला असून या तालुक्याच्या विकासास अग्रक्रम देत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बागलाण विधानसभा मतदार संघाचे एका विधानसभा सदस्यांनीही पाणी प्रश्नासंदर्भात महत्त्वाची भूमिका घेऊन सिंचनासाठी १२५ कोटींचा निधी उपलब्ध करुन के. टी. बंधारे, १७ लघुपाटबंधारे योजना व गुजरातकडे वाहून जाणारे पाणी अडविण्याचे प्रयत्न करुन ते हरणबारी धरणात टाकण्याचे काम केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दिंडोरी विधानसभा मतदार संघातील विधानसभा सदस्यांशी चर्चा केल्यानंतर व प्रत्यक्ष पाहणीतून पाण्याच्या सिंचनाच्या संदर्भात तालुका समृध्द असल्याचे दिसून आले. इतर तालुक्यातही कमी अधिक प्रमाणात प्रयत्न होतांना दिसून येत आहेत. मात्र सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील परिस्थिती पाणी प्रश्नाबाबतीत गंभीर दिसून आली तर इगतपूरी तालुक्यात धरणे असून देखील वैतरणा धरणातील पाणी मुंबईसाठी राखीव ठेवले जात असल्याने तेथे पाणी टंचाई निर्माण होतांना दिसून येते.

तसेच २० टक्के विधानसभा सदस्यांनी शिक्षण क्षेत्रावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून आले. आदिवासींचे शैक्षणिक अज्ञान व आर्थिक परिस्थितीचा विचार करता आदिवासी तालुक्यात आश्रमशाळा व अनुदानित शाळेंची संख्या वाढविणे आवश्यक असल्याने बहुतेक विधानसभा सदस्यांनी यादृष्टीने प्रयत्न केल्याचे दिसून आले. इगतपूरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्यांनी सांगितले की, तालुक्यात आदिवासी विकास विभागांतर्गत अनेक शासकीय आश्रमशाळा आणल्या. तसेच टेक्नीकल हायस्कूल, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मंजूर केले व सन २००५ मध्ये केंद्र सरकार पुरस्कृत ५ वी ते

१२ वी पर्यंतचे एकलव्य रेसिडेन्सीयल इंग्लिश मेडियम पब्लीक स्कूलच्या राज्यात ४ शाळा सुरु करण्यात आल्या. त्यापैकी एक शाळा मुंडेगांव ता. इगतपूरी येथे मंजूर करण्यात यश मिळाल्याचे त्यांनी बोलून दाखविले तर दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्यांनी तालुक्यातील शासकीय आश्रमशाळेतील इमारतींची दुरावस्था लक्षात घेऊन आर.सी.सी. बांधकामासाठी शासन स्तरावर प्रयत्न करुन इनामबारी, बोरवट, ननाशी, पिंपरखेड, ठेपणपाडा आदि शाळा भौतिक सुविधांनी युक्त केल्याचे सांगून परिसरातील शासकीय व अनुदानित शाळेंची संख्या व विद्यार्थी संख्या लक्षात घेता शासकीय आश्रमशाळेंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने बाहेरील अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे कठीण होत होते ही बाब लक्षात आल्याने शासन स्तरावर ही वास्तव परिस्थिती लक्षात आणून दिल्याने तातडीने अत्यावश्यक बाब म्हणून ६ ऑगस्ट २००८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार राज्यात फक्त ननाशी व कोहोर या शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयात अतिरिक्त तुकडीला कायमस्वरुपी मान्यता मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केल्याचे त्यांनी बोलून दाखविले. इतर तालुक्यातही कमी अधिक प्रमाणात शैक्षणिक विकास झाल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे २० टक्के विधानसभेतील नेतृत्त्वाने आरोग्य या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून आले. आदिवासी तालुक्यात आदिवासी आरोग्य सेवेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र निर्मिती करणे, सोयी–सुविधा निर्माण करणे, फिरती आरोग्य पथके, पिण्याचे पाणी निर्जंतुक करणे, आरोग्य संदर्भात विविध योजना व उपक्रम राबविणे आदि बाबींसाठी बहुतेक विधानसभा सदस्यांनी प्रयत्न केल्याचे दिसून आले. सुरगाणा तालुक्यातील एका विधानसभा सदस्यांनी सांगितले की, प्रारंभी तालुक्यात सुरगाणा, बाऱ्हे या गावी आरोग्य केंद्र होते. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण जास्त होते. शासन स्तरावर सततच्या पाठपुराव्यामुळे आज सुरगाणा तालुक्यात २ ग्रामीण आरोग्य केंद्र व ९ प्राथमिक आरोग्य असून १४ सबकेंद्र आहेत. तर पेठ तालुक्यात ९ प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याचे सांगून कुपोषणांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. मात्र दवाखान्यात वेळेवर औषध, मेडीसीन उपलब्ध नसते. यासाठी तालुका स्तरावर मोर्चे काढले. मुंबईला आरोग्य संचालकांकडे जाऊन चर्चा केली. शासन स्तरावरुन वेळेवर व योग्य पुरवठा होत नसल्यामुळे देखील मोर्चे काढले. आज काही अंशी सुधारणा दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर ६.६७ टक्के विधानसभा सदस्यांनी वीज या घटकांकडे लक्ष केंद्रित केल्याचे दिसून आले. इगतपुरी–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदारसंघाच्या एका महिला नेतृत्वाने सांगितले की, या मतदार संघात पेठ तालुक्यातील ७२ गावे सन १९९९ मध्ये तालुक्यांच्या निर्मितीत सामाविष्ट झालेली होती. त्या गावांना रस्ते, पाणी तर सोडाच अनेक गावात वीजही नव्हती. दोन ते अडीच वर्षे पाठपुरावा करुन जिथे पायवाट होती तिथे रस्ते विकासाची कामे व प्रत्येक गावात वीजपुरवठा करुन तेथील गरीब आदिवासी नागरिकांच्या घरात ऊजेड आणण्याचे समाधान मिळाल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे बहुतांश विधानसभा व लोकसभा सदस्यांनी रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज यांसारखे उपक्रम राबविल्याचे दिसून आले. मात्र ज्या विधानसभा व लोकसभा सदस्यांनी ज्या योजना प्रभावीपणे राबविल्या त्या योजना / उपक्रमांचा उल्लेख वरील तक्त्यात केलेला आहे.

एकूणच आदिवासीबहुल सातही तालुक्यांचा विचार करता कळवण व दिंडोरी तालुका रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज या विकासात्मक उपक्रमात अग्रेसर असून इगतपुरी, बागलाण तालुक्यांची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरु असून पेठ, सुरगाणा तालुके विकासापासून काही प्रमाणात वंचित असल्याचे दिसून आले तर त्र्यंबकेश्वर तालुक्याचा विकास काही प्रमाणात होत असल्याचे दिसून आले.

## १६. आदिवासींच्या विकासासाठी राबविलेले विशेष उपक्रम

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासासाठी विविध स्वरुपाचे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रमापैकी आदिवासींच्या विकासासाठी जे विशेष उपक्रम राबविले जातात. त्यांचे वर्गीकरण पुढील तक्त्यात करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ६.१६**

**आदिवासींच्या विकासासाठी राबविलेल्या विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण**

| उपक्रम | सामुहिक कन्यादान योजना | एकाधिकार धान्य खरेदी योजना | इंदिरा आवास घरकुल योजना | खावटी कर्ज योजना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०४ | ०४ | ०४ | ०३ | १५ |
| टक्केवारी | २६.६७ | २६.६७ | २६.६६ | २० | १०० |

तक्ता क्र. ६.१६ मध्ये आदिवासींच्या विकासासाठी राबविलेल्या विशेष उपक्रमानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २६.६७ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने सामुहिक कन्यादान योजनेच्या माध्यमातून आदिवासींचा सामुहिक विवाहासारखा उपक्रम राबविल्याचे दिसून आले. हा उपक्रम आदिवासी विकास विभागातील न्यूक्लिअस बजेट अंतर्गत सामुहिक कन्यादान योजना म्हणून राबविण्यात येतो. हा उपक्रम सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, कळवण या तालुक्यातील विधानसभा सदस्यांनी राबविल्याचे दिसून आले. सुरगाणा–पेठ–त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, सामुहिक कन्यादान योजनेची सुरुवात सन १९८२ मध्ये झाली. त्यावेळी आदिवासी आयुक्तांच्या उपस्थितीत तालुक्यातील राक्षस भुवन येथे ३२ सामुहिक विवाह पार पडले. १९८४ साली कवी कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली ३५१ जोडप्यांचा विवाह पार पाडला. त्यानंतर लोकांनीच पैसे जमा करावयाचे व सामुदायिक विवाह घडवून आणण्याचा अभिनव उपक्रम राबविला. २० मे २००५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या

अध्यक्षतेखाली सुरगाणा–अलंगुण येथे १००१ जोडप्यांचा सामुहिक विवाह सोहळा पार पाडला. या विवाह समारंभात त्यांनी १०,००० (दहा हजार रु.) कन्यादान योजना देण्याचे जाहीर केले. या योजनेत संसारोपयोगी भांडी, मंगळसूत्र देण्यात येऊन ही योजना आज महाराष्ट्रभर आदिवासीबहुल तालुक्यात सुरु असल्याचे सांगून या सामुहिक विवाहामुळे त्या तालुक्यातील आदिवासी समाज एकसंघ होण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच २६.६७ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने महाराष्ट्र सहकारी आदिवासी विकास महामंडळांतर्गत एकाधिकार धान्य खरेदी योजना दिंडोरी, पेठ, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, बागलाण या आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये प्रभावीपणे राबविल्याचे दिसून आले. दिंडोरी मतदार संघातील विधानसभेतील नेतृत्वाने सांगितले की, व्यापाऱ्यांकडून आदिवासींची पिळवणूक होत होती. व्यापारी बाजार भावापेक्षा कमी किंमतीत शेतमाल खरेदी करीत असत. शिवाय मालाच्या वजनात देखील फसवणुक केली जात असे. पावसाळ्यापूर्वी आदिवासींकडे धान्य नसते तेंव्हा त्यास व्यापारी व दुकानदाराकडे कर्जासाठी जावे लागत असे. व्यापारी कर्जाच्या मोबदल्यात धान्य देण्याची अट घालून त्या धान्याची वसुली करत असे. शेतमाल अतिशय कमी दराने खरेदी करुन व्याज आगाऊ वसूल करुन सावकार व व्यापारी आदिवासींची पिळवणूक करीत असे. ही पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाने ही योजना सुरु केली असताना देखील व्यापारी आदिवासींना शेतमालाला जास्त किंमत देत असल्याचे भासवीत व वजनात, हिशोबात फसवणूक करत. त्यामुळे आदिवासी जनतेत प्रभावी जनजागृती करुन एकाधिकार धान्य खरेदी योजनेच्या माध्यमातून ज्या आदिवासी सोसायट्या आहेत त्या सोसायट्यांच्या माध्यमातून खरेदी केंद्र उघडली व बाजार भावाप्रमाणे आदिवासींना वजन, माप व रक्कम खरेदी केंद्रावरच दिली जात असल्याचे सांगून आज सावकारशाहीचा व व्यापाऱ्यांची पिळवणूक थांबविण्यात यश मिळाल्याचे सांगून आदिवासींमध्ये ही योजना रुजविण्याचे व मोठ्या प्रमाणात लोकप्रिय करण्याचे महत्त्वपूर्ण काम झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

तसेच २६.६६ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने इंदिरा आवास घरकुल योजना राबविल्याचे दिसून आले. या योजने अंतर्गत आदिवासी भागातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी व्यक्तीस बेघर / कच्चे घर असलेल्या लाभार्थीस कायमस्वरुपी पक्के घर बांधण्यासाठी अर्थसहाय्य

देऊन घरकुल बांधून त्या आदिवासी व्यक्तीला कायमस्वरुपी निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन दिली असल्याचे आदिवासीबहुल बागलाण, दिंडोरी, कळवण, पेठ या तालुक्यातील विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने बोलून दाखविले. बागलाण तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, आदिवासींना २५०० घरकुल दिले. मात्र इंदिरा आवास योजनेचा निधी घरकुल बांधण्यासाठी कमी पडतो तो वाढविण्यासाठी प्रयत्न केला व आज ७० हजार येत असल्याचे सांगून तरी देखील आदिवासींना ३० हजार रुपये अतिरिक्त खर्च येतो. हा निधी देखील वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे २० टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळांतर्गत खावटी कर्ज योजना इगतपुरी, दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर तालुक्यात प्रभावीपणे राबविल्याचे दिसून आले. इगतपुरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, आदिवासी पावसाळ्याच्या दिवसात लहानशा कर्जापायी आपली भाताची पिके व्यापाऱ्यांना तारण देत असत व गुजरान करण्यासाठी अवाढव्य व्याजाच्या दराने धान्य व पैसा व्यापाऱ्याकडून व सावकारांकडून घेत असत. त्यात आदिवासींची फार मोठी फसवणूक होत असे. या संदर्भात आदिवासींमध्ये आत्मविश्वास व खावटी कर्जाच्या संदर्भात जनजागृती केली. आदिवासींना कोणतीही पतसंस्था किंवा बँक कर्ज देत नसल्यामुळे सावकारशाही बळावली होती. त्यामुळे ८० टक्के खावटी कर्जवाटप भूमीहिनांना करण्यात येते. या खावटी कर्जावर महामंडळामार्फत ४ टक्के व्याज आकारले जाऊन खावटी कर्जाची वसुली आदिवासी सहकारी संस्थांमार्फत केली जात असत. कर्जाची वसूली हप्त्याहप्त्याने एकाधिकार धान्य खरेदी केंद्रावर करण्यात येत असल्याचे सांगून तालुक्यातील बहुतांश आदिवासींची खावटी प्रकरणांची पूर्तता करुन ती मंजूर करुन दिल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

## १७. शासकीय योजनांची अंमलबजावणी :

आदिवासींच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकार विविध प्रकारच्या योजना तयार करीत असते. त्या शासकीय योजनांची अंमलबजावणी शासन स्तरावरुन कशा पध्दतीने होते हे बघणे आवश्यक ठरते.

**तक्ता क्र. ६.१७**

**शासकीय योजनांच्या अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| योजना | वैयक्तिक लाभाच्या योजना | सार्वजनिक लाभाच्या योजना | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०८ | ०७ | १५ |
| टक्केवारी | ५३.३३ | ४६.६७ | १०० |

तक्ता क्र. ६.१७ मध्ये विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने केंद्र व राज्य शासनाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासकीय योजनांची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार वैयक्तिक लाभाच्या योजना ५३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा नेतृत्वाने तालुका व मतदारसंघात राबविल्याचे दिसून आले. त्यामध्ये आदिवासी विकास विभागातील न्यूक्लिअस बजेट अंतर्गत शेतीसाठी जमीन सपाटीकरण करणे, शेती उपयोगी उपकरणे, बियाणे, खते झोपडपट्यांसाठी मंगलोरी कौलाचा पुरवठा तसेच महाराष्ट्र राज्य आदिवासी मंडळातर्फे – सायकल दुरुस्ती दुकान, किराणा दुकान, शिलाई मशीन, कुक्कुटपालन यासारख्या बऱ्याच योजना इगतपुरी, दिंडोरी, सुरगाणा, पेठ, बागलाण या तालुक्यातील विधानसभा सदस्यांनी प्रभावीपणे राबविल्याचे दिसून आले. दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांना २०० शेततळे मंजूर करुन घेतले. विशेष बाब म्हणून अधिकच्या मंजूरीसाठी पाठपुरावा सुरु असून ताडपत्रींचा पुरवठा केला व तालुक्यात तीन हजार ऑईल इंजिन वाटप केले. जंगलतोड रोखण्यासाठी

जंगल लगतच्या वस्त्यांना सात हजार कुटुंबाना स्वयंपाकाचा गॅस आदिवासी विकास विभाग व वन विभागाच्या संयुक्त उपक्रमातून देणे यासारख्या योजना राबविल्या.

मात्र या योजनांची अंमलबजावणी शासन स्तरावरुन होत असताना अनेक अडचणी आल्या. आदिवासी लाभार्थीचे जातीचे दाखले, रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला अशा अनेक अडचणी आल्या. मात्र काही वेळा अधिकाऱ्यांकडून योजना देण्यासंदर्भात टाळाटाळ देखील आढळून आली. त्यामुळे वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे येऊन लाभार्थींच्या त्रुटी दूर करण्यासाठी भूमिका घेतली. त्यातून लाभार्थीची बहुतांश प्रकरणे निकाली काढल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

तसेच ४६.६७ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सार्वजनिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी केल्याचे दिसून आले. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, आश्रमशाळा, रस्ते, पाणी, लघुपाटबंधारे, पूल बांधणे, समाजमंदिरे, रस्ते काँक्रिटीकरण, रस्ते जोडणी प्रकल्प यांसारख्या अनेक शासकीय योजना कळवण, दिंडोरी, बागलाण, इगतपुरी तालुक्यातील विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी राबविल्याचे दिसून आले. कळवण विधानसभा मतदार संघातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, कळवण या आदिवासी भागात ४१ शासकीय आश्रमशाळा, २८ शासकीय वसतिगृहे व ३९ अनुदानित आश्रमशाळा शासनाकडून मंजूर करुन घेतली. आश्रमशाळांच्या बांधकामाच्या बाबतीत कळवण तालुक्याचा महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक असल्याचे सांगून राज्याचा राज्यमंत्री असताना शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी राज्यात ३७ फिरते आरोग्य पथकांची निर्मिती केली तर रस्ते, धरणे, कृषी, पाणलोट क्षेत्र आदि योजना व कामे तालुक्यात केल्याचे सांगून शासनाकडून या सर्व योजना मंजूर करुन घेताना विशेष अडचण आली नसल्याचे त्यांनी सांगितले.

एकूणच शासनाच्या सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून दफ्तर दिरंगाई व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी वेगवेगळ्या स्वरुपाच्या अडचणी आणल्या जातात व येतात. त्यामुळे आदिवासींच्या विकासास खिळ बसते. मात्र ज्या ज्या तालुक्यातील विधानसभा सदस्य वा लोकसभा सदस्यांनी अभ्यासपूर्ण पाठपुरावा केला. त्यांना यश मिळाले, मात्र इतरांना कमी प्रमाणात यश मिळाल्याचे दिसून आले.

## १८. शासकीय योजनांशिवाय अन्य कार्यक्रमांची अंमलबजावणी :

आदिवासीबहुल तालुक्यातील विधानसभा व लोकसभा सदस्य शासनाच्या विविध खात्यांमार्फत शासकीय योजनांची प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अंमलबजावणी करीत असतात. यामध्ये रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज यासारख्या योजनांचा समावेश होतो. मात्र यापेक्षा वेगळ्या विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी काही विधानसभा व लोकसभा सदस्यांनी केल्याचे दिसते. त्यात विकास कार्यक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण खालील तक्त्यात केले आहे.

**तक्ता क्र. ६.१८**

**शासकीय योजनांशिवाय अन्य उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| पर्याय | महिला बचत गट | पाणी वापर संस्था | संपूर्ण स्वच्छता अभियान | शैक्षणिक | वन जमीन हक्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०१ | ०२ | ०४ | ०४ | ०४ | १५ |
| टक्केवारी | ६.६६ | १३.३३ | २६.६७ | २६.६७ | २६.६७ | १०० |

वरील तक्ता क्र. ६.१८ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यातील विधानसभा व लोकसभा सदस्यांनी शासनाच्या माध्यमातून विकासाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार ६.६६ टक्के विधानसभा सदस्यांनी तालुक्यात व मतदारसंघात महिला सबलीकरणासाठी महिला बचत गटांची स्थापना केली व या बचत गटांच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणून महिलांशी निगडीत असणाऱ्या समस्या व त्यावर कोणत्या शासकीय उपाययोजना आहेत. तसेच शासनाकडून विविध खात्याची अनुदाने या संदर्भातील माहिती घेऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम,

स्वयंरोजगारक्षम, सबळ करण्यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न करुन त्या दिशेने योग्य वाटचाल सुरु असल्याचे इगतपुरी–त्र्यंबकेश्वर विधानसभेच्या महिला सदस्यांनी बोलून दाखविले.

तसेच १३.३३ टक्के लोकसभा व विधानसभा सदस्यांनी पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून तालुक्यांचा विकास करण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचे दिसून आले. ही संख्या दिंडोरी, इगतपुरी या तालुक्यात कार्यरत आहे. या पाणी वापर संस्थेशी निगडीत दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, तालुक्यात वाघाड धरणांतर्गत जवळ जवळ २४ पाणी वापर संस्था कार्यरत असून पूर्वी शासन पाणी वापर, इरिगेशन मार्फत करीत असे. मात्र आज या संस्था सक्षम होऊन स्वतः शेतकऱ्यांना पाणी वाटप करतात. पाणी वाटपाचे योग्य नियोजन, काटकसर, व्यवस्थापन यांमुळे शासनाचा महसूल पूर्वीपेक्षा पाच पटीने वाढून २० ते २४ लाख मिळू लागला आहे. हा प्रकल्प जागतिक बँकेने देखील गौरविला असून या प्रकल्पामुळे बहुतांश कोरडवाहू भाग जलसिंचनाखाली आल्याचे दिसून आले.

तसेच २६.६७ टक्के लोकसभा व विधानसभा नेतृत्वाने तालुक्यात संपूर्ण स्वच्छता अभियान राबविल्याचे सांगितले. या अभियानांतर्गत त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, बागलाण, दिंडोरी या तालुक्यात हागणदारीमुक्त गांव, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यासारखे विशेष उपक्रम राबविल्याचे या विधानसभा सदस्यानी बोलून दाखविले. विशेष म्हणजे बागलाण तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने या अभियानांतर्गत तालुक्यातील किकवारी व चाफ्याचा पाडा या गावांनी वेगळाच ठसा उमटवून चाफ्याचा पाडा या गावाला राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला असल्याचे त्यांनी सांगितले. इतर तालुक्यात कमी–अधिक प्रमाणात हा उपक्रम राबविला जात असल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे २६.६७ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने वनजमीन हक्कांसंदर्भात आंदोलन, मोर्चे या माध्यमातून आदिवासींमध्ये वन हक्कांसदर्भात जाणीव निर्माण करण्याचे काम सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, कळवण या तालुक्यात केल्याचे दिसून आले. सुरगाणा तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, तालुक्यात ५० टक्के आदिवासी भूमिहीन आहेत. त्यांना उद्योगधंदा नाही म्हणून जी पडीक वनजमीन आहे तिथे पिक येऊ शकते. यासाठी पेठ,

त्र्यंबक, सुरगाणा, कळवण तालुक्यातून आदिवासींना संघटित करुन आंदोलन करुन वनजमीनीवर पिक काढले. वेळोवेळी आंदोलन करुन सन १९८७ मध्ये वांगणबारीत आंदोलनात एक कार्यकर्ता लक्ष्मण गावीत मारला गेला. त्यामुळे पुढे जाऊन ही चळवळ व्यापक झाली. जेल भरो आंदोलने होऊन वारंवार शासनाला निर्णय घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला. सन २००५ मध्ये केंद्रात मा.क.पा. ने काँग्रेसला पाठींबा दिला. त्यावेळी 'वनाधिकार कायदा' काँग्रेसला करण्यास भाग पाडले व त्यामुळे आदिवासींचा वन जमीनीवरील हक्क कायद्यातून निर्माण झाला. वन जमीनीचे महाराष्ट्रात १२,००० (बारा हजार) प्रकरणे झाले. वन हक्क कायद्यानुसार ७३०० पात्र झाले. परंतु त्यांना क्षेत्र कमी आहे. त्या संदर्भात आंदोलन सुरु आहे. जे अपात्र केले आहेत त्या संदर्भात देखील आंदोलन सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

## १९. शासनांच्या विकास योजनांची अंमलबजावणीबाबतची भूमिका :

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विकास योजनांची अंमलबजावणी होते. विकास योजनांच्या लाभार्थीची निवड शासकीय निकषानुसार केली जाते व प्रशासनाच्या माध्यमातून अंमलबजावणी केली जाते. मात्र या शासकीय योजनांची अंमलबजावणी समाधानकारक होत नसल्याची भावना व्यक्त होताना दिसते. या अंमलबजावणीवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणाऱ्या विधानसभा व लोकसभा सदस्यांची भूमिका महत्त्वाची ठरते.

**तक्ता क्र. ६.१९**

**शासनांच्या विकास योजनांची अंमलबजावणीबाबतची भूमिका**

| पर्याय | नावापुरती होते | साधारणतः होते | पुर्णक्षमतेने होते | एकूण |
|---|---|---|---|---|
| संख्या | ०३ | १० | ०२ | १५ |
| टक्केवारी | २० | ६६.६७ | १३.३३ | १०० |

तक्ता क्रमांक ६.१९ मध्ये शासनाच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीनुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, २० टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्त्वाच्या मते शासनाच्या विकास योजनांची अंमलबजावणी नावापुरतीच होते. प्रामुख्याने विकास योजनांच्या अंमलबजावणीचे ध्येय साकार करणे (उद्दिष्ट्ये पूर्ण करणे) यास महत्त्व दिले जाते. तसेच ६६.६७ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाच्या मते शासनाच्या विकास योजनांची अंमलबजावणी साधारणतः होते. मात्र या सर्व योजनांच्या अंमलबजावणीचा विचार करता निम्म्याहून अधिक विकास योजना यशस्वीरित्या राबविल्या जातात. त्याचप्रमाणे १३.३३ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाच्या मते पूर्ण क्षमतेने शासनाच्या विकास योजनांची अंमलबजावणी केली जाते.

वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते की, शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजना पूर्ण क्षमतेने यशस्वीरित्या राबविल्या जात नाहीत. प्रामुख्याने अंमलबजावणीवर देखरेख ठेवणारे नेतृत्व कार्यक्षम असेल अशा तालुक्यातील / मतदार संघाच्या योजना योग्य पध्दतीने राबविल्या जातात तर अन्य ठिकाणी यात साधारण यश मिळाल्याचे दिसून येते. यावरुन असे स्पष्ट होते की, शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांच्या अंमलबजावणीचे यशापयश प्रशासनाबरोबरच राजकीय नेतृत्त्वावरही अवलंबून असल्याचे दिसून येते.

## २०. शासनाकडून विकासाच्या योजना राबविण्यासाठी मिळणाऱ्या निधीची उपलब्धता :-

शासनाकडून विकासाच्या योजना राबविण्यासाठी मिळणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य विकासाच्या योजना राबवित असतात. या विकासाच्या योजना राबवित असताना शासनाकडून मिळणारा निधी पुरेसा आहे की नाही हे बघणे महत्त्वाचे आहे.

**तक्ता क्र. ६.२०**

**शासनाकडून विकासाच्या योजना राबविण्यासाठी मिळणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण**

| पर्याय | पुरेसा आहे | पुरेसा नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०४ | ११ | १५ |
| टक्केवारी | २६.६७ | ७३.३३ | १०० |

तक्ता क्र. ६.२० मध्ये शासनाकडून विकासाच्या योजना राबविण्यासाठी मिळणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, २६.६७ विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने शासनाच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी निधी पुरेसा असल्याचे सांगितले तर ७३.३३ टक्के विधानसभा व लोकसभेतील नेतृत्वाने निधी पुरेसा नसल्याचे सांगितले.

यावरुन असे दिसून येते की, शासनाकडून विकासाच्या योजना राबवित असताना ज्या विधानसभा व लोकसभा सदस्यांनी निधी पुरेसा आहे असे सांगितले त्यांनी आपल्या मतदार संघाचा मोठ्या प्रमाणात विकास केल्याचे दिसून आले. त्यात कळवण विधानसभा मतदार संघातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, मला विकास निधीच्या संदर्भात कधीही अडचण आली नाही. काम केले तर निधी मिळतो. मागणी, पुरवठा, कामाचे स्वरुप, आवश्यकता लक्षात आणून दिली तर निधी उपलब्ध करता येतो. काही तालुक्यांचा निधी खर्च होत नाही तो देखील निधी मतदार संघात वळविण्याचे काम केल्याचे त्यांनी सांगितले. अशाच स्वरुपाची माहिती नाशिक लोकसभा मतदार संघातील एका लोकसभा सदस्यांनी, बागलाण तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने, दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने दिल्याचे दिसून आले.

तर ७३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्याने विकासाच्या योजना राबविण्यासाठी निधी पुरेसा नाही असे सांगून निधीत पक्षीय राजकारण आणले जाते. तसेच महागाईच्या तुलनेत निधी कमी असल्याचेही काही सदस्यांनी बोलून दाखविले.

एकूणच विकासाच्या योजना राबवित असतांना सकारात्मक व योग्य रितीने प्रयत्न केला तर निधी उपलब्ध करता येतो. त्यासाठी नेतृत्त्वातील क्षमता, कामाचा अनुभव, विकासात्मक सखोल दृष्टी, अभ्यासूपणा यांसारख्या बाबी ज्या तालुक्यातील विधानसभा वा लोकसभेतील नेतृत्वाकडे आहेत त्या तालुक्याचा विकास झाल्याचे दिसून येते.

## २१. आदिवासी समाजात जागृती निर्माण करणारे उपक्रम :

विधानसभा व लोकसभेतील नेतृत्त्वाने विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्याबरोबरच प्रबोधनात्मक उपक्रम, कृषीविषयक उपक्रम, शिक्षण, साक्षरता उपक्रम यांसारखे आदिवासी समाजात जागृती निर्माण करणारे उपक्रम देखील राबविलेले आहेत. या उपक्रमाचे खालील तक्त्यात वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ६.२१**

**आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण**

| उपक्रम | प्रबोधनात्मक उपक्रम | कृषी विषयक उपक्रम | शिक्षण | साक्षरता उपक्रम | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | ०७ | ०३ | ०३ | ०२ | १५ |
| टक्केवारी | ४६.६७ | २० | २० | १३.३३ | १०० |

तक्ता क्र. ६.२१ मध्ये आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणीनुसार वर्गीकरण केले आहे. त्यानुसार ४६.६७ टक्के विधानसभा व लोकसभा नेतृत्वाने प्रबोधनात्मक उपक्रम राबविल्याचे दिसून आले. आदिवासी जनतेचे सण, उत्सव, दिवाळी, बोहाडा, डोंगऱ्यादेव, बाहुल्या या उत्सवाच्या माध्यमातून प्रबोधन होण्यासाठी हरिनाम सप्ताह, भारुडे, प्रवचने याद्वारे लोक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे व आपल्या पारंपारिक लोकनृत्य व कला यांची या सणांच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन करुन इगतपुरी, सुरगाणा, दिंडोरी, बागलाण, त्र्यंबकेश्वर, पेठ या तालुक्यांतील विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी व्यसनमुक्ती संदर्भात देखील अभियान राबवून आदिवासींमध्ये जनजागृती केल्याचे दिसून आले. त्याचबरोबर आदिवासी जनजागृती सप्ताहाचे आयोजन करुन आदिवासींच्या योजनांची तालुक्यात माहिती दिल्याचेही इगतपुरी विधानसभा सदस्यांनी बोलून दाखविले.

तसेच २० टक्के विधानसभा सदस्यांनी कृषी विषयक उपक्रमांची अंमलबजावणी केल्याचे दिसून आले. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करण्याबरोबरच झाडे लावा, झाडे जगवा व सामाजिक

वनीकरणासारखे उपक्रम तालुक्यात राबवून तालुक्यात कृषी मेळावे आयोजित करुन कृषी तंत्रज्ञानाची माहिती या मेळाव्यातून देऊन एकरी उत्पादन वाढविण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येऊन आदिवासींचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरला असल्याचे कळवण तालुक्यातील विधानसभा सदस्यांनी सांगितले व काहीसा अशाच पध्दतीचा उपक्रम बागलाण व दिंडोरी तालुक्यातील विधानसभा सदस्यांनी राबविल्याचे दिसून आले.

तसेच २० टक्के विधानसभा सदस्यांनी शिक्षणासंदर्भात आदिवासी समाजात जागृती केल्याचे दिसून आले. दिंडोरी तालुक्यातील एका विधानसभा सदस्याने सांगितले की, आदिवासी विद्यार्थ्यांना, माध्यमिक, कनिष्ठ वा वरिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात प्रवेश मिळाला नाही तर आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. हे लक्षात आल्यानंतर गावातील, परिसरातील तालुक्यातील वंचित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची भूमिका घेतली. प्रसंगी शासनाकडून तातडीने प्रवेश क्षमतेची मर्यादा वाढवून वंचित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे काम करुन आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून त्यांच्यात आत्मविश्वास जागृती निर्माण करण्याचे काम  केले. आज शैक्षणिकदृष्ट्या वंचित असलेला विद्यार्थी माझ्याकडे आशेने बघतो व त्याला प्रवेश मिळवून देऊन त्यांचा शैक्षणिक उत्कर्ष होण्याचा आनंद होत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

त्याचप्रमाणे १३.३३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी साक्षरता सारखा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविल्याचे दिसून आले. आदिवासी सामान्य जनता साक्षर होण्यासाठी विधानसभा व लोकसभेच्या नेतृत्त्वाने शासनाच्या माध्यमातून गावा–गावात व तालुक्यात प्रौढ शिक्षणासारखे उपक्रम राबविल्याचे दिसून आले. तसेच काही मंडळांना व संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देऊन साक्षरता मोहिम यशस्वी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

## प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

**प्रस्तावना :**

देशात व घटकराज्यात विशेषतः महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून तळागाळातील दुर्बल घटकांचा तसेच आदिवासींच्या विकासाच्या संदर्भात नेतृत्त्वाने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे आदिवासींच्या विकासास चालना मिळाली. आदिवासींचे प्रश्न नेमके काय आहेत हे जाणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या महत्त्वपूर्ण ठरल्या. त्यामुळे या संस्थाच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक करणे शक्य होऊ लागले. पर्यायाने विकासाला गती आली. याच स्थानिक स्वराज्य संस्थाबरोबरच विधीमंडळाच्या व कायदे मंडळाच्या माध्यमातून विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांची भूमिका देखील महत्त्वाची ठरली. त्यांच्या माध्यमातून मतदारसंघाच्या, तालुक्याच्या तसेच जिल्ह्याच्या विकासास गती मिळाली.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात राजकीय नेतृत्त्वाचे योगदानाविषयी माहिती जाणून घेण्यासाठी नाशिक जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडून नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांची निवड करुन त्यांची प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षणाद्वारे माहिती मिळविली व या माहितीचे विश्लेषण करुन गृहीतकांची पडताळणी केली आहे व निष्कर्ष काढण्यात आले असून त्यानंतर शिफारशी करण्यात आल्या आहेत.

## १. गृहितकांची पडताळणी :

**गृहितक १ :– आदिवासी समाजातून राजकीय नेतृत्व पुढे आले आहे.**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यात ६४.६१ टक्के लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या एकूण १५१ जागांपैकी ८८ जागा अनु. जमातीसाठी

राखीव असून एकूण जागेच्या संख्येच्या ५८.२७ टक्के आरक्षण अनु. जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात मिळाले आहे. (तक्ता क्र. ५.१). १९९५ ते २००९ या कालखंडातील आदिवासीबहुल सात तालुक्यातील पाच विधानसभा मतदारसंघ व २००९ च्या विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार एक विधानसभा मतदारसंघ कमी होऊन चार विधानसभा मतदारसंघ अनु. जमातीसाठी राखीव असल्यामुळे आदिवासी समाजातील नेतृत्त्वाला विधानसभा सदस्य होण्याची संधी मिळाली तर अनु. जमातीसाठी मालेगांव लोकसभा मतदारसंघ राखीव होता. मात्र २००९ च्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेनुसार मालेगांव लोकसभा मतदारसंघाऐवजी दिंडोरी लोकसभा मतदारसंघ अनु. जमातीसाठी राखीव केल्यामुळे आदिवासी समाजातील नेतृत्वाला लोकसभा सदस्यत्वाची संधी मिळाली. तसेच या समाजातील पाच व्यक्तींनी खुल्या प्रवर्गातील जागेवरुन जिल्हा परिषदेवर निवडून येऊन जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. (तक्ता क्र. ५.२) तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये काम केलेल्या आदिवासी नेतृत्वाला विधानसभा व लोकसभेत काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे आदिवासी समाजातून राजकीय नेतृत्व पुढे आले आहे. हे गृहितक सिध्द झाले आहे.

## गृहितक २ :– विकास योजनांच्या अंमलबजावणीत राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाच्या माध्यमातून समाजासाठी रस्ते, पिण्याचे पाणी, पाणलोट क्षेत्र, शिक्षण, आरोग्य, कृषी, वीज यासारख्या विकासाच्या योजना राबविल्या गेल्या आहेत. या योजनांचा फायदा आदिवासी समाजातील सामान्य जनतेला व्हावा यासाठी राजकीय नेतृत्वाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रामुख्याने या योजनांची माहिती जनतेस देण्याचे काम लोकप्रतिनिधींनी केले आहे. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सात तालुक्यांपैकी कळवण, दिंडोरी या तालुक्यात योजना प्रभावीपणे राबविल्या गेल्या. याचे श्रेय तेथील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती आणि विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांना जाते. तुलनेत सुरगाणा, पेठ,

त्र्यंबकेश्वर, बागलाण, इगतपुरी या तालुक्यात विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय पातळीवरुन येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विधानसभा व लोकसभा सदस्यांनी वरिष्ठ पातळीवर समन्वयातून तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे आदिवासी योजनांच्या अंमलबजावणीस मदत झाली. ज्या ठिकाणी लोकप्रतिनिधींनी सकारात्मक भूमिका घेऊन विकास योजनांची माहिती समाजाला दिली. त्यांच्यात जागृती घडवून आणली. तेथील समाजाचा तुलनेत अधिक विकास होण्यास मदत झाली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांच्या अंमलबजावणीत राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. हे गृहितक सिध्द झाले आहे.

## गृहितक ३ :– राजकीय नेतृत्वामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतातील आदिवासींचे दुर्गम भागात व्यापारी व सावकारी वर्गाकडून शोषण होत होते. हा समाज पूर्वापारपासून उदरनिर्वाहासाठी जंगलव्याप्त जमीनीचा व तेथील संपत्तीचा आधार घेत होता. त्यास उदरनिर्वाहाच्या साधनापासून परावृत्त केल्याने व त्यांचे सतत शोषण झाल्याने तो गुन्हेगारी प्रवृत्तीकडे ओढला गेला. काही ठिकाणी पोलीस यंत्रणेकडूनही छळ झाला. परिणामी आदिवासी समाजातील काही घटकांनी नक्षलवादाचा आधार घेतला. भारतात असा पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश नक्षलवादाचा प्रभाव वाढत असताना महाराष्ट्रात गडचिरोली, चंद्रपूरचा अपवाद वगळता हे चित्र पहावयास मिळत नाही. कारण महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभाग व आदिवासी विकास महामंडळाची निर्मिती केली. त्यांच्या माध्यमातून आदिवासी भागाच्या विकासासाठी अनेक विकास योजना राबविल्या. यामध्ये शासन व्यवस्था आणि राजकीय नेतृत्व यांनी ठोस धोरण आखले. परिणामी इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा अधिक विकास झाल्याचे दिसून येते. तसेच आदिच्या तुलनेत अलिकडे आदिवासींचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्तर उंचावला आहे. महाराष्ट्रातील विशेषतः नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विकासाला राजकीय नेतृत्वामुळे चालना मिळाली आहे हे गृहितक सिध्द झाले आहे.

## गृहितक ४ :– आदिवासी तालुक्यांचा समतोल विकास झालेला नाही.

कोणत्याही समाजाच्या विकासासाठी त्या समाजासाठी काम करणाऱ्या तसेच त्या समाजातून पुढे आलेल्या नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची ठरते. राजकीय नेतृत्वास सामाजिक परिस्थितीची जाण असेल, त्या समाजासाठी चांगले काम करण्याची भूमिका असेल, वैचारिक अधिष्ठान व विकासाचा दृष्टीकोन असेल तर असे नेतृत्व समाजाच्या विकासात मध्यवर्ती भूमिका बजावते. स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा व लोकसभा यांच्या पातळीवर नाशिक जिल्ह्याच्या आदिवासीबहुल भागातून पुढे आलेल्या नेतृत्वाचा विचार करता असे दिसून आले की, काही चांगल्या व विकासाभिमुख दृष्टीकोन असलेल्या नेत्यांनी त्यांच्या तालुक्यांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले. जिल्हा परिषदेच्या आणि आदिवासी विकास विभागाच्या योजनांची माहिती सामान्य आदिवासी जनतेस देण्यासाठी पुढाकार घेतला. सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर केले. त्यामुळे संशोधन कार्यक्षेत्रातील सात तालुक्यांपैकी कळवण व दिंडोरी या तालुक्यांचा चांगला विकास झालेला आहे. त्यामध्ये तेथील विधानसभा सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतीचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. इगतपूरी व बागलाण या तालुक्यांच्या विकासाला चालना मिळाली असली तरी कळवण व दिंडोरीच्या तुलनेने कमी विकास झाल्याचे दिसून आले तर सुरगाणा, पेठ व त्र्यंबकेश्वर हे तालुके आजही मागासलेले आहेत. यावरुन असे दिसून येते की, आदिवासी तालुक्यांचा समतोल विकास झालेला नाही हे गृहितक सिध्द झाले आहे.

## गृहितक ५ :– वरिष्ठ पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या कार्याची सुरुवात पंचायत राज्यातून झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था नेतृत्व निर्माण करणारी पाठशाळा असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने नेतृत्वाची जडणघडण होऊन नेतृत्व तयार होत असते. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात संशोधनासाठी निवडलेले १३ विधानसभा सदस्यांपैकी ९ आणि २ लोकसभा सदस्यांपैकी १ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवरील कार्याचा अनुभव असलेले

आहेत. त्यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या ग्रामीण संस्थांमध्ये ८ आणि नागरी संस्थांमध्ये २ सदस्यांनी काम केले आहे. उर्वरित पाच सदस्यांपैकी एक राजकीय पक्ष पातळीवर, एक प्रबोधनात्मक चळवळीतून. एक सामाजिक चळवळीतून व राजकीय वारशातून, वारसा असलेले दोन सदस्य पुढे आले आहेत. यामध्ये ६७ टक्के सदस्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर चांगले काम केल्याने त्यांना विधानसभा आणि लोकसभा या वरिष्ठ पातळीवर कार्य करण्याची संधी मिळाली आहे. (तक्ता क्र. ६.१३) त्यामुळे वरिष्ठ पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या कार्याची सुरुवात पंचायत राज्यातून झाली आहे हे गृहितक ६७ टक्के सिध्द झाले आहे.

## २. निष्कर्ष :–

प्रश्नावली, मुलाखती आणि निरिक्षणाच्या आधारे प्रस्तुत संशोधनातून निघालेले प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे –

१. अनुसूचित जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाले आहे. नाशिक जिल्ह्याच्या आदिवासीबहुल तालुक्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६४.६१ टक्के असून या जमातीच्या एकूण लोकसंख्येच्या ५८.२७ टक्के जागा राखीव आहेत. आदिवासीबहुल तालुक्यांच्या राजकारणावर अनुसूचित जमातीचे वर्चस्व आहे. म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी जिल्हा परिषदेत व पंचायत समितीत झाली आहे. (तक्ता क्र. ५.१)

२. अनुसूचित जमातीला व खुल्या वर्गाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाले आहे. मात्र खुल्या वर्गातील जागेवर अनुसूचित जमातीचे १५.६३ टक्के प्रतिनिधींना आपल्या समाजाच्या लोकसंख्येच्या व लोकप्रियतेच्या बळावर नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, अनुसूचित जमातीचे नेतृत्व राजकीयदृष्ट्या सक्षम होऊन राजकारणात सक्रिय होतांना दिसून येते. (तक्ता क्र. ५.२)

३. नाशिक जिल्ह्यात हिंदू महादेव कोळी, हिंदू कोकणा, हिंदू भिल्ल, हिंदू ठाकूर, हिंदू वारली या पाच आदिवासी जमाती आहेत. यापैकी हिंदू कोकणा ही जमात राजकीयदृष्ट्या अधिक प्रभावी आहे. या समाजास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर अनु. जमातीसाठी राखीव असलेल्या जागांच्या ७५ टक्के आणि विधानसभा व लोकसभेमध्ये ४५ टक्के जागा मिळाल्या. यावरुन नाशिक जिल्ह्यात आदिवासींमधील कोकणा ही जमात राजकीयदृष्ट्या पुढारलेली आहे. (तक्ता क्र. ५.३, ६.४)

४. आर्थिकदृष्ट्या सधन कुटुंबातील सदस्यांचा राजकीय सहभाग जास्त आहे. कौटुंबिक, आर्थिक परिस्थितीचा राजकारणातील निर्णय प्रक्रियेवर प्रभाव पडतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेले सदस्य निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभागी नाहीत. तसेच मध्यम कुटुंबातील व्यक्तींना लोकप्रियतेच्या व अभ्यासूपणामुळे संधी मिळाली. अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर

उमेदवारी देतांना उमेदवाराच्या आर्थिक स्थितीबरोबर त्यांचे नेतृत्व, कार्यपध्दती, लोकप्रियता या बाबी विचारात घेतल्या जातात. (तक्ता क्र. ५.४, ६.५)

५. शेती व व्यवसाय सांभाळून सामाजिक कार्यासाठी वेळ देणाऱ्या सदस्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामध्ये आर्थिक स्थिती मध्यम व चांगली असलेले सदस्य प्रभावीपणे काम करतात तर आर्थिक स्थिती बिकट असलेले सदस्य समाजकार्यासाठी वेळ देऊ शकत नाहीत. अशा सदस्यांवर त्यांच्या तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्ती व राजकीय पदाधिकाऱ्यांचे वर्चस्व आहे. (तक्ता क्र.५.५,६.६)

६. जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करणाऱ्या सदस्यांमध्ये पदवीधर असलेल्या सदस्यांचे प्रमाण १० टक्के आहे तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या विधानसभा सदस्यांचे प्रमाण ८० टक्के एवढे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपेक्षा उच्च पातळीवर काम कतांना उच्च शिक्षित उमेदवारांना प्राधान्य मिळाले आहे. (तक्ता क्र. ५.६, ६.७)

७. जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून काम केलेल्या ६७ टक्के सदस्यांना राजकीय वारसा लाभलेला आहे तर विधानसभा व लोकसभेत सदस्य म्हणून काम केलेल्या ५३ टक्के नेतृत्वाला राजकीय वारसा लाभलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व उच्च पातळीवरील संस्थांमध्ये नेतृत्वाची संधी मिळण्यासाठी राजकीय वारसा हा घटक महत्वाची भूमिका बजावतो. उर्वरित सदस्यांना आरक्षणाबरोबरच जनसंपर्क, लोकप्रियता आणि विकासाभिमुख भूमिका यांमुळे राजकारणात संधी मिळाली आहे. (तक्ता क्र. ५.७ व ६.८)

८. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात १९९९ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व होते. १९९९ साली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षची स्थापना झाल्यानंतर या भागावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व निर्माण झाले असे असले तरी कॉंग्रेस, शिवसेना व भाजपा यांचे अस्तित्व आहे. तसेच जिल्हा परिषद सदस्य व विधानसभा सदस्य वेळोवेळी आपली राजकीय भूमिका, पक्ष बदलतांना दिसतात. अलिकडे पक्षनिष्ठ राजकारणाबरोबर व्यक्तिनिष्ठ राजकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. (तक्ता क्र. ५.८ व ६.९)

९. जिल्हा स्तरावर काम करण्यापूर्वी ९९ टक्के सदस्यांनी गाव पातळीवरील ग्रामपंचायत सहकारी संस्था व राजकीय पक्षामध्ये पदाधिकारी म्हणून काम केले आहे. तसेच विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून काम करण्यापूर्वी ८७ टक्के सदस्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि राजकीय पक्षांमध्ये काम केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये चांगले काम करणाऱ्या नेतृत्वाला वरिष्ठ पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे. (तक्ता क्र. ५.९ व ६.१०)

१०. पक्ष संघटनेत काम केलेल्या ४३ टक्के नेतृत्वाला जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तसेच ५३ टक्के विधानसभा व लोकसभा सदस्यांनी विविध राजकीय पक्षांच्या संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून काम केले आहे. राजकीय पक्षांकडून जिल्हा पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी उमदेवारी देताना त्यांच्यात पक्ष संघटनेतील कार्याचा विचार केला गेला. पक्षाची विचारसरणी आणि भूमिका यांचा प्रसार करणाऱ्या व पक्षाच्या माध्यमातून आपल्या पक्षाचा प्रभाव वाढविण्याचे काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना उमेदवारी दिल्याचे दिसून आले. (तक्ता क्र. ५.१० व ६.११)

११. जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करण्यापूर्वी ५० टक्के सदस्यांनी गाव व तालुका पातळीवरील विविध कार्यकारी सोसायटी, आदिवासी विकास सहकारी सोसायटी, पतसंस्था, दुधसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती अशा संस्थांवर पदाधिकारी म्हणून काम केले आहे. तसेच ८० टक्के विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्यांनी गाव व तालुका पातळीवरील सहकारी संस्थांचे पदाधिकारी म्हणून काम केले आहे. विधानसभा व लोकसभा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच सहकारी संस्थाच्या माध्यमातून केलेली विकासाभिमुख कामे उपयुक्त ठरली आहेत. (तक्ता क्र. ५.११ व ६.१२)

१२. स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थांच्या पातळीवर विकासात्मक काम करणाऱ्या ६७ टक्के नेतृत्वाला राज्यपातळीवर काम करण्याची संधी मिळाली. वरिष्ठ पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या कार्याची सुरुवात पंचायत राज संस्था व सहकारी संस्थांच्या माध्यमातून झाली आहे. (तक्ता क्र. ५.१२ व ६.१३)

१३. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, कृषी, वीज अशा विविध योजना आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात आल्या. त्या राबविताना जिल्हा परिषदेच्या उपलब्ध निधीचा उपयोग करण्यात आला. वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड करतांना सदस्यांकडून वैयक्तिक हितसंबंधाना प्राधान्य दिले आहे. तसेच गरजूंचाही विचार केला गेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना मिळाली आहे. (तक्ता क्र. ५.१३)

१४. विधानसभा व लोकसभा सदस्यांनी पाणी व सिंचन, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य या विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. असे असले तरी आदिवासी तालुक्यांचा समतोल विकास झालेला नाही. जे विधानसभा सदस्य नियोजनबध्द विकासकामे करतात. राजकीय हितसंबंधाच्या आधारे शासनाच्या विविध खात्यांकडून महत्त्वाच्या विकास योजना राबवितांना निधी मिळवितात व आदिवासी विकास विभागाच्या योजना आदिवासी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करतात व वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर करतात. अशा विधानसभा सदस्यांमुळे काही तालुक्यांचा अधिक विकास झाला आहे. (तक्ता क्र. ६.१५)

१५. आदिवासी विकास विभाग व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नातून ठक्करबाप्पा योजना, सामुहिक कन्यादान योजना, इंदिरा आवास योजना, जनसुविधा योजना, एकाधिकारी धान्य खरेदी योजना, खावटी कर्ज योजना अशा उपक्रमांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडविल्या जातात. अशा योजनांमुळे आदिवासी समाज एकसंघ होण्यास मदत झाली आहे. तसेच आदिवासींच्या विकासास गती मिळाली आहे. (तक्ता क्र. ५.१४ व ६.१६)

१६. आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील बेरोजगारांना व्यवसायासाठी अल्प दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे आदिवासी समाजातील नवशिक्षित तरुण पिढीचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली आहे. तसेच हा समाज पारंपारिक व्यवसायाकडून आधुनिक व्यवसायाकडे वळला आहे.

१७. आदिवासी विकास विभागाच्या वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या योजनांबाबत प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दफ्तर दिरंगाई व कागदपत्रांची पूर्तता याबाबत अडचणी आणल्या जातात. त्यामुळे आदिवासी विकासाला खिळ बसते. (तक्ता क्र. ६.१७)

१८. महिला बचत गटांच्या माध्यमातून आदिवासी महिलांचे आर्थिक सबलीकरण व संघटन करण्यात जिल्हा परिषदेतील महिला सदस्या व महिला विधानसभा सदस्यांनी पुढाकार घेतल्याने महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळाली आहे.

१९. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाकडून उपलब्ध होणारा निधी अपूरा ठरतो. त्यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला मर्यादा येतात. काही सदस्य वैयक्तिक हितसंबंध व विकास कामांचा पाठपुरावा करुन अधिक निधी मिळवितात.

२०. आदिवासी समाजाचे पारंपारिक लोकनृत्य व कला यांचे जतन करण्यासाठी लोकप्रतिनिधी पुढाकार घेत आहेत. त्यामुळे आदिवासी संस्कृतीचे वेगळेपण आजही टिकवून ठेवण्यास मदत होत आहे.

२१. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम व योजना राबविल्या गेल्या त्यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना मिळाली. परिणामी छत्तीसगड, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश इ. राज्यातील आदिवासी पट्ट्यात नक्षलवाद्यांचा प्रभाव वाढला असला तरी महाराष्ट्रात गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याचा अपवाद वगळता उर्वरित महाराष्ट्रातील आदिवासी समाज नक्षलवादाच्या प्रभावापासून दूर आहे.

२२. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी पट्ट्यातील काही दुर्गम भागात मार्क्सवादी कम्युनिष्ट पार्टीचा आजही प्रभाव टिकून आहे. प्रामुख्याने या पक्षातील स्थानिक नेतृत्वाने आदिवासींच्या वनजमीन हक्कांसाठी दिलेला लढा या समाजाच्या विकासासाठी पुरक ठरला आहे.

## ३. शिफारशी :

१. शासनाने आदिवासी विकास विभागातील चार क्षेत्रीय कार्यालयांवर योजना व कामाचा ताण विचारात घेतला असता योजना प्रभावी व यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रशासकीयदृष्ट्या योग्य पध्दतीने नियंत्रण ठेवण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांचे विभाजन करुन या कार्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रकल्प कार्यालयांची संख्या देखील वाढविणे आवश्यक आहे.

२. शासनाकडून आदिवासी लाभार्थ्यांना शेतीशी निगडीत एक योजना दिल्यानंतर त्याला असणारी दुसरी निगडीत पुरक योजना योग्य वेळी दिली जात नाही. त्यामुळे आदिवासींच्या शेतीचा विकास होण्यास विलंब किंवा अडथळे येतात. म्हणून आदिवासी लाभार्थ्यांना शेतीशी निगडीत असणाऱ्या सर्व योजनांची आदिवासी लाभार्थ्यांना आवश्यकतेनुसार एकाचवेळी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

३. शासनाच्या माध्यमातून आदिवासींना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी जिल्हा, तालुका, गाव पातळीवर व वाड्या–पाड्यांवर प्रभावीपणे शिबीरांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

४. आदिवासी भागात विशेषतः त्या त्या आदिवासी जिल्ह्यात तालुक्यांच्या बाबतीत विकासात जो असमतोल आहे, तो दूर करण्यासाठी त्या त्या तालुक्यांची नेमकी गरज लक्षात घेऊन शासनाने त्या पध्दतीने तेथे वेगळ्या स्वरुपाच्या योजना वा उपक्रम सुरु करुन त्या तालुक्यांच्या विकासास गती देणे आवश्यक आहे.

५. आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती असून त्या शेतीत बहुतांश ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेला नाही. त्यासाठी शेतीपयोगी योजनांची माहिती देण्यासाठी गाव समित्या स्थापन कराव्यात. गाव समित्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करणारे शेतकरी, आदिवासी समाजातील सुशिक्षित शेतकरी व कृषी विद्यापीठाकडून पारंगत पदवीधारक, व्यावसायिक यांचा समावेश करावा.

६. राजकीय नेतृत्त्वाने शासनाच्या माध्यमातून अविकसित आदिवासी भागात / तालुक्यांत तेथील नैसर्गिक, प्राकृतिक रचनेचा विचार करुन सिंचन क्षमतेसाठी लहान मोठी धरणे बांधणे आवश्यक आहे.

७. आदिवासी समाजातील नेतृत्वावर पक्षीय पातळीवर राजकीय दबाव आणला जातो. म्हणून आदिवासी समाजातील नेतृत्वाने आपल्या अधिकारांचा प्रभावीपणे वापर करावा.

८. स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी नेतृत्वाला वेळोवेळी प्रशिक्षण देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा.

९. आदिवासी महिला नेतृत्त्वास सक्षम व स्वंयसिध्द करुन त्यांचा राजकारणातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

१०. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाकडून राज्याच्या अर्थसंकल्पात दरवर्षी ९ टक्के निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्या निधीचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन दर तीन महिन्याला निधी किती, कसा, कोणत्या योजनांवर खर्च होतो हे निश्चित करुन त्या पध्दतीने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

११. आदिवासींसाठी सामूहिक कन्यादान योजना राबविताना होणारी अनियमितता टाळण्यासाठी शासनाने सामाजिक संस्थांना विनामूल्य तत्वावर ही योजना राबविण्यासाठी द्यावी.

१२. आदिवासी भागांमध्ये उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संपत्तीवर आधारित उद्योग व्यवसायास प्रोत्साहन देण्यात यावे.

१३. इंदिरा आवास घरकूल योजनेंतर्गत असणारा निधी वाढविण्यात यावा.

१४. आदिवासी भागात शासकीय रुग्णालयांची संख्या वाढविणे आवश्यक असून त्यात औषधांचा पुरवठा कायमस्वरुपी व योग्य पध्दतीने करावा.

१५. आदिवासींची बोलीभाषा, संस्कृती व कला यांचे जतन करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन द्यावे.

१६. शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गाव पातळीवरील कनिष्ठ महाविद्यालयांना तालुका व जिल्हा पातळीवर स्थलांतरीत करुन विद्यार्थ्यांना आधुनिक व विकसित समाजाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांतील न्यूनगंड दूर होऊन त्यांच्यात संगणक, स्पर्धा परीक्षा, आधुनिक चालू घडामोडी, उद्योग, व्यवसाय, बौध्दिक स्तर, सभोवतालचे वातावरण, संवाद कौशल्य विकसित होण्यास मदत होईल.

१७. शासनाने आदिवासी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी स्वतंत्र वरिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ तंत्रशिक्षण महाविद्यालय सुरु करावे.

१८. आदिवासी समाजातील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी व्यसनमुक्त आदिवासी गावांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात यावे.

# संदर्भ सूची :

## English Reference


1. Elwin Verrier, Report of the committee on Special Multipurpose, Tribal Blacks, 1960.
2. Elwin Verrier, Philosophy of Nefa, introduction of literature written by Pandit Jawaharlal Nehru.
3. Gare Govind, Tribal in an urban settings – A case study of Mahadev Kolis, Ph.D., University of Pune, 1971.
4. Ghurye G. S., The Scheduled Tribes, Popular Publication, Mumbai, 1956.
5. Gillin and Gillin – Cultural Socieology, The Macmillan Co. Ltd., New York, 1950,
6. Govind Sadashiv Ghurye, The Scheduled Tribes of India, Transaction Publishers, ISBN 0-87855-692-3, 1980.
7. Hazra, The Kolam of Yeotmal, Anthropological Survey of India, Ministry of Education and Culture, Dept. of Culture, Govt. of India, Culcutta, 1983.
8. Mujumdar D. N., Races and Culture of India, Asia Publishing House, Bombay, 1958,
9. Report on Westage and Strognation in Primary, Secondary Education of Scheduled Tribes in the Scheduled area of the Nashik District, Dr. P. A. Shirsalkar, Tribal Research and Training Centre, Maharashtra State, Pune, 1970.
10. Report of Observation inTribal Leader, Tribal Research and Training Centre, People of India, Anthropolgical Survey of India, Kalkatta, 1997.
11. Sathe M. D., conomics study of a region with special reference to the consumption pattern – A tribal region in Ahmednagar District, Maharashtra State, Ph.D., University of Pune, 1967.
12. Singh K. S., Tribal Society in India, An Anthropo Histoical perspective, Manohar Publication, Delhi, 1985.
13. Universal Banch Mark Survey, 1996-97, TR & TI Maharashtra State, Pune, 2001.

14. Webster's New Twentieth Century Dictionary of the English Language,

15. http://nashik.nic.in/htmldocs/zillaparishad.htm

16. http://planningcommission.nic.in/

17. http://mah.gov.in

18. himj/tribal.nic.in.

19. http://trti.mah.nic.in

20. www.eci.nic.in/eci_main1/election statistcs.aspx.

21. www.eci.nic.in

22. www.wikipedia.com

## मराठी संदर्भ

१. आगलावे प्रदिप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती, फेब्रुवारी २०११.

२. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे आणि कंपनी, नागपूर, जुलै १९९८.

३. भगत एस. जे., कोळी समाज दर्शन, कोळी समाज दर्शन प्रकाशन, मुंबई, १९८३.

४. देसाई जयराम, सहकार जगत, आदिवासी विशेषांक, सहकार मुद्रणालय, पुणे, जुलै १९७६.

५. देवगांवकर एस. जी., देवगावकर शैलजा, डुमरे जयमाला, सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – नोव्हेंबर २००९.

६. देवगावकर एस. जी., आदिवासी विकास प्रशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – २३ फेब्रुवारी २०११.

७. देशपांडे पी. एस., जिल्हा नकाशा, नाशिक, प्रकाशक–विज्ञान मंदिर औरंगाबाद.

८.	देशपांडे श्रीकांत व्ही., लोक प्रशासन, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती १९९४.

९.	गायकवाड दिपक, आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट, २००५.

१०.	गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २०००,

११.	गारे गोविंद, आदिवासी विकासाचे शिल्पकार, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००३.

१२.	गारे गोविंद, आदिवासी विकासातील दिपस्तंभ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २५ डिसेंबर २००३.

१३.	गारे गोविंद, आदिवासी वीर पुरुष, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १५ डिसेंबर १९९४.

१४.	गारे गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, आदिम साहित्य प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, मार्च २००३.

१५.	गारे गाविंद, वारली चित्र संस्कृती, श्री. विद्या प्रकाशन, पुणे.

१६.	गारे गोविंद, आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, प्रथमावृत्ती – १९०८.

१७.	गोरे गोविंद, स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००४.

१८.	गारे गोविंद, आदिवासींच्या समस्या : विचार आणि विश्लेषण, आदिवासी समाज विज्ञान संस्था, नाशिक, १९७६.

१९.	कऱ्हाडे बी. एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै २००७.

२०. कोडीतकर सुरेश, आदिवासी जीवन कथा आणि व्यथा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च २००८.

२१. केशिरसागर शोभादेवी, महाराष्ट्रातील जिल्हे, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००८.

२२. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑक्टोंबर २००९.

२३. केतकर एस. व्ही., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, (व्हा. दोन), १९२३.

२४. खेकाळे ना. रा., राजकीय नेतृत्त्व, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९९.

२५. लोटे रा. ज., आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै, २०१०.

२६. मडावी शेषराव एन, आदिवासी महानायकांचे चरित्र, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती, मार्च २०१०.

२७. मुखर्जी रविंद्रनाथ, सामाजिक मानवशास्त्र की रुपरेषा, विवेक प्रकाशन, दिल्ली, २००८.

२८. निकम गौतम, क्रांतीकारी आदिवासी जननायक, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगांव जि. जळगांव, प्रथमावृत्ती – १७ ऑक्टोंबर २०१०.

२९. नाडगौडा गुरुनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

३०. नाडगौडा गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे – ३०.

३१. नारगोलकर कुसुम, जंगलचे राजे, मौनी विद्यापीठ प्रकाशन, गारगोटी.

३२. नाशिककर मीना, नाशिक मंदिरे, लेडिज टाईम्स प्रकाशन, नाशिक.

३३. पवार पंडितराव, जनस्थान, प्रकाशक – प्रा. डॉ. पवार वसंत, नाशिक,

जाने. २००५.

३४. पाटील बी. बी., लोक प्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल १९९८.

३५. पुरी चंद्रकांत, आदिम समाजाचा विकास एक चिकित्सक अभ्यास, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, प्रथम आवृत्ती २८ डिसें. २०१०.

३६. उन्मेश, आपला नाशिक जिल्हा (तालुके व जिल्ह्याची विशेष माहिती), वैशाली प्रकाशन, पुणे – ३०, मार्च २०१०.

३७. वाघमारे एम. एल., पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासी विकास, सौ. वैशाली वाघमारे प्रकाशन, हडपसर, पुणे – २७, प्रथमावृत्ती – जुलै २०११.

३८. वर्मा आर. सी, भारतीय जमाती काल, आज आणि उद्या, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण, मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, २००३.

## संशोधन प्रबंध

१. बच्छाव अे. वाय, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन – विशेष संदर्भ साक्री तालुका, पुणे विद्यापीठ अप्रकाशित एम.फिल प्रबंध, १९९०.

२. बोराडे बी. एच., ग्रामपंचायतीच्या विकास कार्यातील नेतृत्वाचा सहभाग : भोर तालुका एक दृष्टीक्षेप, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल प्रबंध, जुलै १९९०.

३. बानवाडे प्रमोद, गडचिरोली जिल्ह्याच्या राजकारणात ७३ व्या विशोधनानंतर उदयास आलेले आदिवासी नेतृत्व, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अप्रकाशित एम. फिल् प्रबंध, सन २००८.

४. देशमुख भाऊसाहेब, आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला खर्च, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित पीएच, डी. प्रबंध, २००४.

५. देशमुख सुरेश, आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनावर झालेला परिणाम, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सप्टेंबर २०११.

६. जाधव छाया, एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन – विशेष संदर्भ, आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, २००५.

७. केदार अभिमन्यू, अहमदनगर जिल्हा तालुका अकोले येथील महादेव कोळी या आदिवासी जमातीचा राजकीय विकास, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल प्रबंध, ऑक्टोंबर, १९८८.

८. खारगे संतोष, पलुस–कडेगांव विधानसभा मतदारसंघाच्या विकासामध्ये डॉ. पतंगराव कदम यांचे योगदान (२००४–०९), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अप्रकाशित एम.फिल प्रबंध, सन २०१०.

९. शिंदे सुरेखा, ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याचा विशेष संदर्भ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, मे २०११.

१०. ठाकरे रमाकांत, एच.ए.एल. (नाशिक विभाग) एम्प्लॉइज क्रेडीट को–ऑप. सोसायटी लि. ओझर टाऊनशिपचे आर्थिक अध्ययन, (कालखंड सन १९८४–८५ ते १८८८–८९), एम्. फिल्. पदवी शोध प्रबंध, अमरावती विद्यापीठ, १९९० (अप्रकाशित).

## शासकीय अहवाल / कार्यालय

१. आदिवासी विकास विभाग (आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाहेरी क्षेत्र), कार्यक्रम अंदाजपत्रक २०१२–२०१३, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर, २०१२.

२. भुरिया समिती अहवाल, भारत सरकार, ग्रामीण विकास विभाग, १९९५–९६.

३. ढेबर समिती अहवाल, भारत सरकार, आदिवासी विकास मंत्रालय, १९६०–६१.

४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नाशिक

५. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण

६. गट शिक्षण अधिकारी, दिंडोरी पंचायत समिती कार्यालय

७. गट शिक्षण अधिकारी, इगतपुरी पंचायत समिती कार्यालय

८. गट शिक्षण अधिकारी, पेठ पंचायत समिती कार्यालय

९. गट शिक्षण अधिकारी, सुरगाणा पंचायत समिती कार्यालय

१०. गट शिक्षण अधिकारी, त्र्यंबकेश्वर पंचायत समिती कार्यालय

११. जिल्हा निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.

१२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक जिल्हा २००६–२००७.

१३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक २००७–२००८

१४. जिल्हा सांख्यिकी माहिती संचलनालय, नाशिक.

१५. जिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी परिपत्रकावरुन दिलेली प्रत्यक्ष माहिती.

१६. जिल्हा वार्षिक उपयोजना २००३–२००४, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, मुंबई.

१७. मधुकर पिचड समिती अहवाल, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, सन ८४–८५.

१८. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे, नववी आवृत्ती, २००९.

१९. महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक यांच्या दफ्तर नोंदीवरुन.

२०. नाशिक जिल्हा परिषद नाशिक, सामान्य प्रशासन विभाग, उपमुख्यकार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके यांनी परिपत्रकावरुन दिलेली प्रत्यक्ष माहिती.

२१. नाशिक जिल्हा परिषद, वार्षिक प्रशासन अहवाल, सन २०१०–२०११.

२२. पंचायत समिती कार्यालय पेठ

२३. तहसील कार्यालय इगतपूरी

२४. तहसील कार्यालय सटाणा.

२५. तहसील कार्यालय त्र्यंबकेश्वर

२६. तहसील कार्यालय पेठ

२७. तहसील कार्यालय दिंडोरी.

२८. तहसील कार्यालय, सुरगाणा

२९. वळवी समिती अहवाल, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, सन १९८०–८१

## मासिके / वर्तमानपत्रे

१. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, नोव्हेंबर २०१३

२. दैनिक सकाळ.

३. दैनिक गांवकरी.

४. दैनिक देशदूत.

५. दैनिक देशदूत.

६. दैनिक पुण्यनगरी.

## परिशिष्ट – १

## आदिवासीबहुल तालुक्यातील (दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, कळवण, सुरगाणा, बागलाण) पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, विधानसभा सदस्य (आमदार), लोकसभा सदस्यां (खासदारां) साठी प्रश्नावली :

### अ) सामान्य माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सदस्याचे नांव | :– | .................................................... |
| | पत्ता | :– | .................................................... |
| २. | मतदार संघ | :– | .................................................... |
| ३. | कार्यकाल | :– | .................................................... |
| ४. | पद | :– | .................................................... |
| ५. | आरक्षणाचा प्रवर्ग | :– | .................................................... |
| ६. | जात व धर्म | :– | .................................................... |
| ७. | वय | :– | .................................................... |
| ८. | शिक्षण | :– | .................................................... |
| ९. | नोकरी / व्यवसाय | :– | .................................................... |
| १०. | कामाचा अनुभव | :– | .................................................... |
| ११. | राजकीय पार्श्वभूमी | :– | .................................................... |
| १२. | राजकीय पक्ष कोणता | :– | .................................................... |

१३. पक्षांतर केले आहे काय? :– ....................................................

१४. पक्षांतर केले असल्यास :– ....................................................

आपला पूर्वीचा पक्ष कोणता?

१५. राजकीय पक्ष संघटनेतील कार्य

..........................................................................................................

..........................................................................................................

१६. उत्पन्नाचे साधने :– ....................................................

१७. अंदाजित वार्षिक उत्पन्न :– ....................................................

## ब) सामाजिक माहिती :

१. पक्षीय राजकारणातील सहभाग

..........................................................................................................

..........................................................................................................

२. राजकीय मार्गदर्शक कोण?

..........................................................................................................

..........................................................................................................

३. राजकारणात येण्यापूर्वी केलेले समाजकार्य कोणते?

..........................................................................................................

..........................................................................................................

४. आदिवासी समाजाच्या विकासासाठी आपण राबविलेले विशेष कार्यक्रम कोणते?

..............................................................................................

..............................................................................................

५. शासन स्तरावरील उपक्रमांचा फायदा तळागाळातील आदिवासी लोकांना कसा झाला?

..............................................................................................

..............................................................................................

६. आदिवासींच्या विकासासाठी ज्या अनेक शासकीय योजना / कार्यक्रम राबविले त्यामध्ये येणाऱ्या अडचणी कोणत्या? त्यावर उपाय काय?

..............................................................................................

..............................................................................................

७. राजकीय नेतृत्व म्हणून आदिवासी समाजाविषयी आपली काय भूमिका आहे?

..............................................................................................

..............................................................................................

८. आपल्या मतदारसंघात शासकीय पातळीवरील कोणत्या योजना / कार्यक्रम राबविले जातात? त्यासाठी अडचणी येतात का? येत असल्यास त्या अडचणी कशा सोडविल्या जातात?

..............................................................................................

..............................................................................................

९. आदिवासींच्या संदर्भात काम करतांना आपल्याला कोणकोणत्या समस्या जाणवतात?

..............................................................................................

..............................................................................................

१०. आपल्या पदाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विकासासाठी आपण कोणते प्रयत्न केले?

...............................................................................................

...............................................................................................

११. विकासकामे करताना आपल्याला कोणत्या अडचणी आल्या?

...............................................................................................

...............................................................................................

१२. विकासकामे करताना आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी आपण काय केले?

...............................................................................................

...............................................................................................

१३. विकासाच्या योजना राबविण्याबाबत शासनाकडून मिळणारा निधी पुरेसा आहे काय? नसल्यास आपले मत मांडा.

...............................................................................................

...............................................................................................

१४. आपण सामान्य जनतेत / आदिवासी समाजामध्ये जागृती निर्माण करणारे कोणते उपक्रम राबविले आहेत? त्याचा परिणाम काय झाला?

...............................................................................................

...............................................................................................

# परिशिष्ट – २

## जिल्हा परिषद सदस्य यादी

(कालखंड १९९५ ते २०१२)

| अ. क्र. | कार्यकाल | तालुका | जि. प. मतदार संघ | आरक्षण | नांव | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| **कार्यकाल : १९९२ ते १९९७** | | | | | | |
| १ | १९९२–१९९७ | दिंडोरी | ननाशी | अनु. जमाती | श्री. गायकवाड पंडितराव नारायण | काँग्रेस |
| २ | १९९२–१९९७ | दिंडोरी | कोशिंबे | अनु. जमाती स्त्री | श्रीम. चौधरी विठाबाई पांडूरंग | काँग्रेस |
| ३ | १९९२–१९९७ | दिंडोरी | वणी | अनु. जमाती | श्री. बोबले त्र्यंबक हरि | काँग्रेस |
| ४ | १९९२–१९९७ | दिंडोरी | खेडगांव | सर्वसाधारण | श्री. शेटे श्रीराम महादू | काँग्रेस |
| ५ | १९९२–१९९७ | दिंडोरी | उमराळे | अनु. जमाती | श्री. कऱ्हाटे दशरथ लक्ष्मण | काँग्रेस |
| ६ | १९९२–१९९७ | दिंडोरी | दिंडोरी | सर्वसाधारण | श्री. कावळे बाजीराव पांडूरंग | काँग्रेस |
| ७ | १९९२–१९९७ | पेठ | हरसूल | अनु. जमाती स्त्री | श्रीम. भोये अंजनाबाई यादवराव | काँग्रेस |
| ८ | १९९२–१९९७ | पेठ | पेठ | अनु. जमाती | श्री. चौधरी भिका कृष्णा | काँग्रेस |
| ९ | १९९२–१९९७ | पेठ | करंजाळी | अनु. जमाती | श्री. वाघेरे आनंदा गंगाराम | काँग्रेस |
| १० | १९९२–१९९७ | इगतपूरी | नांदगांव सदो | अनु. जमाती स्त्री | श्रीम. घारे झुंबराबाई विठ्ठल | काँग्रेस |
| ११ | १९९२–१९९७ | इगतपूरी | घोटी बु. | अनु. जमाती | श्री. झोले शिवराम शंकर | काँग्रेस |
| १२ | १९९२–१९९७ | इगतपूरी | टाकेद बु. | अनु. जमाती | श्री. नवाळे मारुती गोविंद | काँग्रेस |
| १३ | १९९२–१९९७ | कळवण | अभोणा | अनु. जमाती | श्री. चौधरी हिराजी विठ्ठल | काँग्रेस |
| १४ | १९९२–१९९७ | कळवण | कनाशी | अनु. जमाती | श्री. वाघ पोपट हिरामण | काँग्रेस |
| १५ | १९९२–१९९७ | कळवण | कळवण | अनु. जमाती स्त्री | श्री. पवार जिजाबाई मोतीराम | काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १९९२–१९९७ | कळवण | भऊर | सर्वसाधारण | श्री. पवार कृष्णा काशिराम | काँग्रेस |
| १७ | १९९२–१९९७ | कळवण | देवळा | सर्वसाधारण | श्री. झाल्टे सुकदेव फुलाजी | काँग्रेस |
| १८ | १९९२–१९९७ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. पगार अशोक कारभारी | काँग्रेस |
| १९ | १९९२–१९९७ | कळवण | बाऱ्हे | अनु. जमाती | श्री. महाले हरिभाऊ भावडू | भा.क.पा. |
| २० | १९९२–१९९७ | कळवण | ऊंबरठाण | अनु. जमाती स्त्री | श्रीम.भुसारे सुंदरा भास्कर | भा.क.पा. |
| २१ | १९९२–१९९७ | कळवण | सुरगाणा | अनु. जमाती | श्री. चव्हाण हरिश्चंद्र देवराम | काँग्रेस |
| २२ | १९९२–१९९७ | बागलाण | लोहणेर | इ. मा. प्र. स्त्री | श्रीम. अहिरे उषा दत्तात्रय | अपक्ष |
| २३ | १९९२–१९९७ | बागलाण | मुंजवाड | अनु. जमाती स्त्री | श्रीम. बागुल सिताबाई बळीराम | अपक्ष |
| २४ | १९९२–१९९७ | बागलाण | मुल्हेर | अनु. जमाती पुरुष | श्री. गांगुर्डे राजाराम म्हैपत | काँग्रेस |
| २५ | १९९२–१९९७ | बागलाण | जायखेडा | सर्वसाधारण | श्री. कांकरिया साखरचंद मोतीलाल | अपक्ष |
| २६ | १९९२–१९९७ | बागलाण | जामपूर | इ.मा.प्र.पु | श्री. निकम प्रभाकर मांगा | काँग्रेस |
| २७ | १९९२–१९९७ | बागलाण | करंजाड | इ. मा. वर्ग | श्री. खैरनार रामदास वामन | अपक्ष |
| २८ | १९९२–१९९७ | बागलाण | ब्राम्हणगांव | इ.मा.प्र स्त्री | श्रीम. अहिरे अलका रामदास | अपक्ष |
| २९ | १९९२–१९९७ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. पवार देवाजी राजाराम | काँग्रेस |
| **कार्यकाल : १९९७ ते २००२** | | | | | | |
| ३० | १९९७–२००२ | दिंडोरी | ननाशी | अनु. जमाती | श्री. हिंडे गणपत सोनीराम | काँग्रेस |
| ३१ | १९९७–२००२ | दिंडोरी | कोशिंबे | अनु. जमाती स्त्री | श्रीम. पवार जिजाबाई लक्ष्मण | काँग्रेस |
| ३२ | १९९७–२००२ | दिंडोरी | वणी | अनु. जमाती स्त्री | श्रीम. चारोस्कर सुशिला शिवाजी | काँग्रेस |
| ३३ | १९९७–२००२ | दिंडोरी | खेडगांव | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. डोखळे इंदूबाई बाबुराव | काँग्रेस |
| ३४ | १९९७–२००२ | दिंडोरी | दिंडोरी | ना. मा. प्र. | श्री. काठे शंकरराव लक्ष्मण | काँग्रेस |
| ३५ | १९९७–२००२ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. देशमुख प्रकाश मनोहर | काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | १९९७-२००२ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. दळवी अशोक बाबुराव | काँग्रेस |
| ३७ | १९९७-२००२ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्रीम. पाटील सत्यभामा गोविंदराव | रा. काँग्रेस |
| ३८ | १९९७-२००२ | पेठ | पेठ | अनु. जमाती | श्री. भोये यशवंत महादू | काँग्रेस |
| ३९ | १९९७-२००२ | पेठ | नाचलोंढी | अनु. जमाती स्त्री | श्रीम. पाटील ताराबाई रामचंद्र | काँग्रेस |
| ४० | १९९७-२००२ | पेठ | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. महाले विठाबाई मुरलीधर | काँग्रेस |
| ४१ | १९९७-२००२ | इगतपूरी | नांदगांव सदो. | अनु. जमाती | श्री. ठाकरे लक्ष्मण गंगाराम | शिवसेना |
| ४२ | १९९७-२००२ | इगतपूरी | शिरसाटे | अनु. जमाती स्त्री | श्रीम. कडाळे शांताबाई देवराम | शिवसेना |
| ४३ | १९९७-२००२ | इगतपूरी | वाडीवऱ्हे | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. गोवर्धने भारती लक्ष्मण | शिवसेना |
| ४४ | १९९७-२००२ | इगतपूरी | घोटी बु. | सर्वसाधारण | श्री. भोर बाबुलाल गणपत | शिवसेना |
| ४५ | १९९७-२००२ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. वाघ गणपत भाऊ | भा.ज.पा. |
| ४६ | १९९७-२००२ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. मुसळे अरुण दादा | शिवसेना |
| ४७ | १९९७-२००२ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. जाधव निवृत्ती भिकाजी | शिवसेना |
| ४८ | १९९७-२००२ | कळवण | अभोणा | अनु. जमाती | श्री. गवळी यशवंत लक्ष्मण | काँग्रेस |
| ४९ | १९९७-२००२ | कळवण | कनाशी | अनु. जमाती | श्री. पवार सोमनाथ महारु | काँग्रेस |
| ५० | १९९७-२००२ | कळवण | कळवण | अनु. जमाती | श्रीम. जगताप सुरेखा देवराम | काँग्रेस |
| ५१ | १९९७-२००२ | कळवण | निवाणे | अनु. जमाती | श्री. बहिरम काशिनाथ नारायण | काँग्रेस |
| ५२ | १९९७-२००२ | कळवण | देवळा | सर्वसाधारण | श्री. आहेर शशिकांत रमेश | काँग्रेस |
| ५३ | १९९७-२००२ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. गायकवाड काशिनाथ यादव | काँग्रेस |
| ५४ | १९९७-२००२ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. पवार शांताबाई सावळीराम | काँग्रेस |
| ५५ | १९९७-२००२ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. भोये संपत रामा | काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | १९९७–२००२ | सुरगाणा | खोबळा (मा.) | अनु. जमाती | श्री. धुम गोपाळ यमाजी | काँग्रेस |
| ५७ | १९९७–२००२ | सुरगाणा | उंबरठाण | अनु. जमाती | श्री. गायकवाड काशिनाथ शिंत्रु | भा.क.पा. |
| ५८ | १९९७–२००२ | सुरगाणा | सुरगाणा | अनु. जमाती स्त्री | श्री. चव्हाण कलावती हरिश्चंद्र | काँग्रेस |
| ५९ | १९९७–२००२ | सुरगाणा | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्रीम. खंबाईत कमळाबाई नारायण | काँग्रेस |
| ६० | १९९७–२००२ | बागलाण | मुंजवाड | अनु. जमाती पु. | श्री. साबळे नारायण धोंडू | काँग्रेस |
| ६१ | १९९७–२००२ | बागलाण | मुल्हेर | अनु. जमाती | श्री. गवळी पोपट मुरलीधर | काँग्रेस |
| ६२ | १९९७–२००२ | बागलाण | जायखेडा | अनु. जमाती | श्री. सोनवणे अभिमान फुला | काँग्रेस |
| ६३ | १९९७–२००२ | बागलाण | नामपूर | सर्वसाधारण पु. | श्री. सावंत अशोक प्रभाकर | अपक्ष |
| ६४ | १९९७–२००२ | बागलाण | करंजाड | इ. मा. प्र. | श्री. भदाणे यादव गोबजी | अपक्ष |
| ६५ | १९९७–२००२ | बागलाण | ब्राम्हणगांव | इ. मा. प्र. स्त्री | श्रीम. बच्छाव लताबाई विलास | काँग्रेस |
| ६६ | १९९७–२००२ | बागलाण | लोहनेर | इ. मा. प्र. | श्री. सोनवणे यशवंत पंडित | काँग्रेस |
| ६७ | १९९७–२००२ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्री. शेवाळे लक्ष्मीबाई नारायण | काँग्रेस |
| ६८ | १९९७–२००२ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. मोरे नरहरी देवबा | काँग्रेस |
| ६९ | १९९७–२००२ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. निकम चिला दोधा | काँग्रेस |
| **कार्यकाल : २००२ ते २००७** | | | | | | |
| ७० | २००२–२००७ | दिंडोरी | हस्ते दुमाला | अनु. जमाती | श्री. झिरवाळ नरहरी सिताराम | रा. काँग्रेस |
| ७१ | २००२–२००७ | दिंडोरी | कसबे वणी | अनु. जमाती | श्री. गांगोडे मधुकर दगु | रा. काँग्रेस |
| ७२ | २००२–२००७ | दिंडोरी | खेडगांव | सर्वसाधारण स्त्री | श्री. पाटील विद्या दत्तात्रय | रा. काँग्रेस |
| ७३ | २००२–२००७ | दिंडोरी | दिंडोरी | ना. मा. प्र. वर्ग | श्री. गायकवाड रमेश देवराम | रा. काँग्रेस |
| ७४ | २००२–२००७ | दिंडोरी | उमराळे बु. | ना. मा. प्र. वर्ग पु. | श्री. वडजे प्रकाश बाळासाहेब | रा. काँग्रेस |
| ७५ | २००२–२००७ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. शेळके सदाशिव हरिभाऊ | रा. काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | २००२–२००७ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्रीम. गावंडे लक्ष्मीबाई गोपाळराव | रा. काँग्रेस |
| ७७ | २००२–२००७ | पेठ | नाचलोंढी | अनु. जमाती स्त्री | श्रीम. चौधरी आशाबाई जिवला | रा. काँग्रेस |
| ७८ | २००२–२००७ | पेठ | पेठ | अनु. जमाती स्त्री | श्रीम. गवळी छबाबाई प्रभाकर | शिवसेना |
| ७९ | २००२–२००७ | पेठ | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. चौधरी मनोहर राजाराम | काँग्रेस |
| ८० | २००२–२००७ | पेठ | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्रीम. चौधरी वत्सलाबाई भिकाजी | काँग्रेस |
| ८१ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | अंजनेरी | अनु. जमाती | श्रीम. कडाळी कमळू सोमा | शिवसेना |
| ८२ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | खरशेत | अनु. जमाती | श्री. साबळे पुंडलिक धर्मा | रा. काँग्रेस |
| ८३ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | हरसूल | अनु. जमाती | श्री. माळेकर लक्ष्मण शंकर | काँग्रेस |
| ८४ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. भोये सुनंदा खंडू | काँग्रेस |
| ८५ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. दिवे मोतीराम किसन | काँग्रेस |
| ८६ | २००२–२००७ | त्र्यंबकेश्वर | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. वारघडे काशिनाथ देवराम | काँग्रेस |
| ८७ | २००२–२००७ | इगतपूरी | नांदगांव सदो | अनु. जमाती | श्री. आगीवाले यशवंत ठमा | भा.ज.पा. |
| ८८ | २००२–२००७ | इगतपूरी | धारगांव | अनु. जमाती | श्री. ठोंबरे ढवळू धोंडू | काँग्रेस |
| ८९ | २००२–२००७ | इगतपूरी | वाडीवऱ्हे | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. गुळवे इंदुमती गोपाळराव | काँग्रेस |
| ९० | २००२–२००७ | इगतपूरी | घोटी बु. | ना. मा. प्र. वर्ग | श्री. जाधव उदय देवराम | काँग्रेस |
| ९१ | २००२–२००७ | इगतपूरी | टाकेद बु. | अनु. जमाती | श्री. खतीले केरु दादा | रा. काँग्रेस |
| ९२ | २००२–२००७ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. रहाणे आनंदा शंकर | काँग्रेस |
| ९३ | २००२–२००७ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. घारे वैजयंता हुशार | काँग्रेस |
| ९४ | २००२–२००७ | कळवण | अभोणा | अनु. जमाती स्त्री | श्रीम. बागुल विमलाबाई राजाराम | काँग्रेस |
| ९५ | २००२–२००७ | कळवण | कनाशी | अनु. जमाती स्त्री | श्रीम. बागुल भिमाबाई मोहन | रा. काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९६ | २००२–२००७ | कळवण | खर्डे दिगर | अनु. जमाती स्त्री | श्री. खांडवी जया शंकर | रा. काँग्रेस |
| ९७ | २००२–२००७ | कळवण | कळवण | ना. मा. प्र. वर्ग | श्री. देवरे रविंद्र शंकर | काँग्रेस |
| ९८ | २००२–२००७ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. कवर रघुनाथ सुका | रा. काँग्रेस |
| ९९ | २००२–२००७ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. भोये बापू सुक्राम | काँग्रेस |
| १०० | २००२–२००७ | कळवण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. पगार कौतिक केदा | रा. काँग्रेस |
| १०१ | २००२–२००७ | सुरगाणा | ऊंबरठाणा | अनु. जमाती स्त्री | श्रीमती गायकवाड मोहनाबाई काशिराम | भा.क.पा. |
| १०२ | २००२–२००७ | सुरगाणा | सुरगाणा | अनु. जमाती स्त्री | श्रीम. चौधरी इंदिरा चिमणा | भा.क.पा. |
| १०३ | २००२–२००७ | सुरगाणा | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. गावित रामजी गंगाजी | भा.क.पा. |
| १०४ | २००२–२००७ | बागलाण | विरगांव | अनु. जमाती स्त्री | श्रीम. महाले कुमोदिनी ओंकार | रा. काँग्रेस |
| १०५ | २००२–२००७ | बागलाण | जायखेडा | अनु. जमाती | श्री. बोरसे उमाजी मंगळू | भा.ज.पा. |
| १०६ | २००२–२००७ | बागलाण | नामपूर | सर्वसाधारण | श्री. कापडणीस गुलाबराव कृष्णा | काँग्रेस |
| १०७ | २००२–२००७ | बागलाण | ब्राम्हणगाव | सर्वसाधारण स्त्री | श्री. चव्हाण अनिता गजेंद्र | शिवसेना |
| १०८ | २००२–२००७ | बागलाण | पठावे दिगर | अनु. जमाती | श्री. गांगुर्डे बळीराम राजाराम | काँग्रेस |
| १०९ | २००२–२००७ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. भामरे आत्माराम गोबजी | काँग्रेस |
| ११० | २००२–२००७ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. अहिरे रामकृष्ण जगन्नाथ | अपक्ष |
| १११ | २००२–२००७ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. बागुल रामदास केदा | भाजपा |
| **कार्यकाल : २००७ ते २०१२** | | | | | | |
| ११२ | २००७–२०१२ | दिंडोरी | अहिंवतवाडी | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. चौधरी अंजनाबाई आनंदराव | रा. काँग्रेस |
| ११३ | २००७–२०१२ | दिंडोरी | कसबे वणी | ना. मा. प्र. | श्री. कड विलास नामदेव | रा. काँग्रेस |
| ११४ | २००७–२०१२ | दिंडोरी | कोचरगांव | सर्वसाधारण | श्री. भरसट संपत लक्ष्मण | रा. काँग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११५ | २००७-२०१२ | दिंडोरी | उमराळे बु. | ना. मा. प्र. | श्री. चौधरी श्रीपत नामदेव | शिवसेना |
| ११६ | २००७-२०१२ | दिंडोरी | दिंडोरी | अनु. जमाती स्त्री | श्रीम. चारोसकर सुनिता रामदास | रा. कॉंग्रेस |
| ११७ | २००७-२०१२ | दिंडोरी | खेडगांव | अनु. जमाती | श्री. वाघ वसंत महादू | रा. कॉंग्रेस |
| ११८ | २००७-२०१२ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. पवार नंदू रामचंद्र | रा. कॉंग्रेस |
| ११९ | २००७-२०१२ | दिंडोरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. भगरे भास्करराव मुरलीधर | रा. कॉंग्रेस |
| १२० | २००७-२०१२ | दिंडोरी | पंचायत समिती पेठसभापती | पदसिध्द सदस्य | श्री. भरसट सुनिता मधुकर | रा. कॉंग्रेस |
| १२१ | २००७-२०१२ | पेठ | पेठ | ना. मा. प्र. | श्री. गोंगे मनोज जगन्नाथ | शिवसेना |
| १२२ | २००७-२०१२ | पेठ | कोहोर | ना. मा. प्र. स्त्री | श्रीम. आव्हाड मालती कोंडाजी | कॉंग्रेस |
| १२३ | २००७-२०१२ | पेठ | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. गावित भास्कर गोपाळ | शिवसेना |
| १२४ | २००७-२०१२ | पेठ | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्रीम. गावंढे सिताबाई भगवान | शिवसेना |
| १२५ | २००७-२०१२ | त्र्यंबकेश्वर | ठाणापाडा | सर्वसाधारण | श्री. राथड भाऊसाहेब रामदास | भा.क.पा. |
| १२६ | २००७-२०१२ | त्र्यंबकेश्वर | हरसूल | ना. मा. प्र. | श्री. म्हैसधुणे विष्णू रुंजा | रा. कॉंग्रेस |
| १२७ | २००७-२०१२ | त्र्यंबकेश्वर | अंजनेरी | अनु. जाती स्त्री | श्रीम. अंबापुरे हौसाबाई हरि | कॉंग्रेस |
| १२८ | २००७-२०१२ | त्र्यंबकेश्वर | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. राऊत अंजना सुरेंद्र | भा.क.पा. |
| १२९ | २००७-२०१२ | त्र्यंबकेश्वर | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. बरफ रमेश काशिनाथ | भा.क.पा. |
| १३० | २००७-२०१२ | इगतपूरी | शिरसाठे | ना. मा. प्र. स्त्री | श्रीम. जाधव अंजनाबाई निवृत्ती | शिवसेना |
| १३१ | २००७-२०१२ | इगतपूरी | वाडीनऱ्हे | अनु. जमाती स्त्री | श्री. मेंगाळ गंगुबाई रघुनाथ | शिवसेना |
| १३२ | २००७-२०१२ | इगतपूरी | नांदगाव सदो | ना. मा. प्र. | श्री. माळी जनार्दन कचरु | कॉंग्रेस |
| १३३ | २००७-२०१२ | इगतपूरी | खेड | ना. मा. प्र. | श्री. गाढवे नारायण दामोदर | रा. कॉंग्रेस |
| १३४ | २००७-२०१२ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. ठाकरे कावजी गंगाराम | कॉंग्रेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३५ | २००७–२०१२ | इगतपूरी | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. घारे रामदास विठ्ठल | काँग्रेस |
| १३६ | २००७–२०१२ | कळवण | खर्डे दिगर | ना. मा. प्र. स्त्री | श्रीम. भामरे मनिषा राजेंद्र | रा. काँग्रेस |
| १३७ | २००७–२०१२ | कनाशी | ना.मा.प्र. | ना. मा. प्र. | श्री. पवार शैलेश जयेश | काँग्रेस |
| १३८ | २००७–२०१२ | कनाशी | पं.स. सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. पवार नितिन अर्जुन | रा. काँग्रेस |
| १३९ | २००७–२०१२ | सुरगाणा | गोंदूणे | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. खंबाईत संजाबाई पांडूरंग | भा.क.पा. |
| १४० | २००७–२०१२ | सुरगाणा | सुरगाणा | सर्वसाधारण | श्री. भोये जनार्दन सावळीराम | भा.क.पा. |
| १४१ | २००७–२०१२ | सुरगाणा | भवाडा | ना. मा. प्र. स्त्री | श्रीम. राऊत लताबाई हिरामण | भा.क.पा. |
| १४२ | २००७–२०१२ | सुरगाणा | पं. स. सभापती | पदसिध्द सदस्य | श्री. चौधरी हिराजी देवाजी | भा.क.पा. |
| १४३ | २००७–२०१२ | बागलाण | पठावे दिगर | अनु. जमाती | श्री. अहिरे पोपट बुधा | रा. काँग्रेस |
| १४४ | २००७–२०१२ | बागलाण | ताहराबाद | सर्वसाधारण स्त्री | श्री. भामरे सिमा किशोर | भाजपा |
| १४५ | २००७–२०१२ | बागलाण | जायखेडा | ना. मा. प्र. | श्री. सावळा विजय भटू | रा. काँग्रेस |
| १४६ | २००७–२०१२ | बागलाण | नामपूर | अनु. जमाती | श्री. मोरे विक्रम बारकू | भाजपा |
| १४७ | २००७–२०१२ | बागलाण | विरगांव | सर्वसाधारण स्त्री | श्रीम. पाटील संगीता यशवंत | काँग्रेस |
| १४८ | २००७–२०१२ | बागलाण | ठेंगोडा | अनु. जमाती स्त्री | श्रीम. पिंपळसे अंजना मोतीराम | रा. काँग्रेस |
| १४९ | २००७–२०१२ | बागलाण | ब्राम्हणगांव | अनु. जमाती स्त्री | श्रीम. पवार भारती भरत | काँग्रेस |
| १५० | २००७–२०१२ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्रीम. माळी अलका पंडित | रा. काँग्रेस |
| १५१ | २००७–२०१२ | बागलाण | पंचायत समिती सभापती | पदसिध्द सदस्या | श्री. महाले विमल पोपट | रा. काँग्रेस |

# परिशिष्ट – ३

## विधानसभा सदस्यांची यादी

(कालखंड १९९५ ते २०१२)

| अ. क्र. | कार्यकाल | विधानसभा सदस्यांचे नांव | मतदार संघ | आरक्षण | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| **कार्यकाल : १९९५ ते १९९९** | | | | | |
| १ | १९९५–१९९९ | श्री. चारोस्कर रामदास किसन | दिंडोरी | अनु. जमाती | काँग्रेस |
| २ | १९९५–१९९९ | श्री. चव्हाण हरिश्चंद्र देवराम | सुरगाणा पेठ त्र्यंबकेश्वर | अनु. जमाती | अपक्ष |
| ३ | १९९५–१९९९ | श्री. पवार अर्जुन तुळशीराम | कळवण | अनु. जमाती | भा.ज.पा. |
| ४ | १९९५–१९९९ | श्री. झोले शिवराम शंकर | इगतपूरी | अनु. जमाती | काँग्रेस |
| ५ | १९९५–१९९९ | श्री. बोरसे दिलिप मंगळू | बागलाण | अनु. जमाती | अपक्ष |
| | | | | | |
| **कार्यकाल : १९९९ ते २००४** | | | | | |
| ०६ | १९९९ ते २००४ | श्री. चारोस्कर रामदास किसन | दिंडोरी | अनु. जमाती | रा.काँग्रेस |
| ०७ | १९९९ ते २००४ | श्री. गावीत जीवा पांडू | सुरगाणा पेठ त्र्यंबकेश्वर | अनु. जमाती | मा.क.पा. |
| ०८ | १९९९ ते २००४ | श्री. पवार अर्जुन तुळशीराम | कळवण | अनु. जमाती | रा. काँग्रेस |
| ०९ | १९९९ ते २००४ | श्री. गांगड पांडूरंग छापू | इगतपूरी | अनु. जमाती | शिवसेना |
| १० | १९९९ ते २००४ | श्री. अहिरे शंकर दौलत | बागलाण | अनु. जमाती | भा.ज.पा. |
| | | | | | |
| **कार्यकाल : २००४ ते २००९** | | | | | |
| ११ | २००४ ते २००९ | श्री. झिरवाळ नरहरी सिताराम | दिंडोरी | अनु. जमाती | रा. काँग्रेस |
| १२ | २००४ ते २००९ | श्री. गावीत जीवा पांडू | सुरगाणा पेठ त्र्यंबकेश्वर | अनु. जमाती | मा.क.पा. |
| १३ | २००४ ते २००९ | श्री. पवार अर्जुन तुळशीराम | कळवण | अनु. जमाती | रा. काँग्रेस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | २००४ ते २००९ | श्री. मेंगाळ काशिनाथ दगडू | इगतपुरी | अनु. जमाती | शिवसेना |
| १५ | २००४ ते २००९ | श्री. चव्हाण संजय कांतीलाल | बागलाण | अनु. जमाती | अपक्ष |
| **कार्यकाल : २००९–२००४** | | | | | |
| १६ | २००९–२०१४ | श्री. महाले धनराज हरिभाऊ | दिंडोरी–पेठ | अनु. जमाती | शिवसेना |
| १७ | २००९–२०१४ | श्री. पवार अर्जुन तुळशीराम | कळवण–सुरगाणा | अनु. जमाती | रा. काँग्रेस |
| १८ | २००९–२०१४ | श्री. गावित निर्मला माणिकराव | इगतपूरी–त्र्यंबकेश्वर | अनु. जमाती | काँग्रेस |
| १९ | २००९–२०१४ | श्री. बोरसे उमाजी मंगळू | बागलाण | अनु. जमाती | भा.ज.पा. |

# परिशिष्ट – ३

## लोकसभा सदस्यांची यादी

| अ. क्र. | निवडणूक वर्ष | लोकसभा सदस्यांचे नांव | मतदार संघ | आरक्षण | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००४–२००९ | श्री. चव्हाण हरिश्चंद्र देवराम | मालेगांव | अनु. जमाती | भा.ज.पा. |
| २ | २००९–२०१४ | श्री. चव्हाण हरिश्चंद्र देवराम | दिंडोरी | अनु. जमाती | भा.ज.पा. |
| ३ | २००९–२०१४ | श्री. भुजबळ समीर मगन | नाशिक | सर्वसाधारण | रा. काँग्रेस |